श्री गुरुःशरणम्

प्रयाग

प. पू. श्रीदत्तमहाराजांचे चरित्र

सुधारीत दुसरी आवृत्ती



प्रकाशक

श्रीवासुदेव निवास विश्वस्त मंडळ,
४२/१७ एरंडवणे, कर्वे पथ, पुणे - ४११ ००४

❀

संकलन व लेखन
श्रीमती नीला कृष्ण जोशी

❀

मुद्रक
श्री. प्रविण गजानन जोशी
श्री प्रसाद प्रिन्टर्स, जोगेश्वरी (पूर्व),
मुंबई - ४०० ०६०, दूरध्वनी क्र. ८३७ १७ ७८.

© सर्व हक्क प्रकाशन संस्थेकडे सुरक्षित

❀

प्रकाशन दिन
प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराज पुण्यतिथी
आषाढ शुद्ध प्रतिपदा, गुरूवार, दिनांक २९-६-१९९५

मूल्य रु. ४५/-

अंतरंग

	पाने
कृष्णाकाठी रम्य तटी	१
श्री नारायणस्वामी/श्री मौनीस्वामी	२
प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती	३
प. प. श्रीदीक्षितस्वामी	४
सद्‌गुरुंची भेट	६
नारायणाचा गृहस्थाश्रम	७
सन्यांसदीक्षा	९
संस्कृत पाठशाळा	११
अजोड गुरुप्रेम	१२
श्रीदीक्षितस्वामींचे महानिर्वाण	१५
प. पू. श्रीगुळवणीमहाराज	१६
कवीश्वरांची कुलपरंपरा	१७
प. पू. श्रीवक्रतुंडमहाराज	१८
श्री धुंडिराजमहाराज	२०
बालपण	२२
ओढ लागली गुरुभेटीची	२३
श्रीदीक्षितस्वामींचा सहवास	२४
पहीला भागवत सप्ताह	२६
अध्ययन व गुणगौरव	२७
म्हैसूरची विद्वत् परीक्षा	२८
जगत्‌गुरुकृत अलौकिक सन्मान	२९
सुवर्ण कंकण	३०
अथा तो ब्रह्मजिज्ञासा	३१
पाठशाळेचा हिरक महोत्सव	३२
कैवल्यस्वामी पादुका प्रतिष्ठापना	३३
प. प. श्रीनारायणस्वामींचा अतिरुद्र स्वाहाकार	३४
उगार येथील श्रीगुरुंची आराधना	३५
श्रीदत्तमूर्ती स्थापना, शास्त्राभ्यास	३५
प. पू. श्रीदत्तमहाराजांची ग्रंथसंपदा	३७
विवाह व गृहस्थाश्रम	४०
लग्नसोहळा	४१
पहिले दिवस	४२
पुण्यात बिऱ्हाड	४३
मातृदेवो, पितृदेवो भव!	४५
औरवाडला गायत्री अनुष्ठान	४७
पुण्यातील वास्तव्य	४७
श्रीशंकराचार्यांचे सोन्याचे कडे	४८
चि. अशोकचा विवाह	४९
पंढरीची वारी	५०
अनाकलनीय व्यक्तिमत्तव	५२
साधी रहाणी	५३
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ	५५
श्रीवासुदेव निवास	५६
भागवतसोहळा	५७
श्रीभागवताचे अमोघ सामर्थ्य	५९
मातृवियोग	६०
श्रीमहाराजांचा षष्ठ्यब्दीपूर्ती समारंभ	६१
शक्तीपात दीक्षा	६२
आणखी एक वैशिष्ठ्य	६४
मंत्रोपदेशाचा अधिकार	६६
मातोश्रींची समाधी	६६
स्वप्नांत रोग निवारण	६७
श्रीधुंडीराजमहाराजांची शिकवण	६८
श्रीगुरूमहाराजांचे अखेरचे पर्व	६९
भक्तांना सावली	६९

	पाने
संधिकाळ	७३
शक्तीपात दीक्षेचे अधिकारी	७३
संकल्प दीक्षा देण्यास प्रारंभ	७४
प. पू. श्रीधुंडिराज महाराजांचे निर्याण	७४
पिताश्रींची समाधी	७५
अग्निहोत्राची सुरवात	७५
भागवत सप्ताहाची थोरवी	७५
काही उल्लेखनीय गोष्टी	७६
प. पू. श्रीमहाराज अमृत महोत्सव	७८
यज्ञमंडप	८१
गरवारे प्रशालेतील अतिथी-निवास	८४
सत्कार सभामंडप	८५
श्रीदत्तमहाराजांचा प्रकट सत्कार	८६
पुष्पहार समर्पण	८७
शुभेच्छा संदेश, गौरव भाषणे	८८
मानपत्र	८९
श्रीदत्तमहाराजांचा आशीर्वाद	९०
ऋणिनिर्देश	९१
श्रीवामन निवास	९२
प. पू. श्रीदत्तमहाराजांचे काही दौरे	९६
स्वागत	९८
आकाश लहरी	१००
पावस येथे भेट	१०१
श्रीगणपतीपुळे गणेशपूजन	१०२
श्रीमहाराजांची बालमंदिराला भेट	१०४
रत्नागिरीचा निरोप	१०६
माणगावकडे प्रयाण	१०६
श्रीवासुदेवानंद सरस्वती विद्यालय	१०९
माणगावचा निरोप	१११
सावंतवाडी	११२
नमस्कार श्रीसद्गुरू वामनाना मु. कुडुत्री	११३
कोल्हापूरच्या अंबाबाईचे दर्शन	११८
रात्र सुरू झाली तरी ज्ञानाचा उजेड	११९
श्री परशुराम दर्शन	१२१
श्री दत्तमहाराजांचा दिल्ली दौरा	१२२
श्री दत्तविनायक प्रतिष्ठापना	१२४
बिर्ला मंदिर व जगन्नाथ मंदिर	१२५
रामशरण	१२७
श्रीशंकर मंदिर, स्वामी मलाई मंदिर, श्री विनायक मंदिर	१२८
प. पू. श्रीमहाराजांचा भागवत सप्ताह	१३०
सहस्रचंद्रदर्शन शांती महोत्सव	१३४
कार्यकारी मंडळ	१३७
पुरस्कृत संस्थाने व संस्था	१३८
सहस्रचंद्रदर्शन विधी	१४०
श्रीमहाराजांचे आशिर्वाद व चिंतन	१४२
देवांना आमंत्रणे	१४६
सहस्रचंद्रदर्शन शांती सोहळा	१४८
कार्यक्रम स्थान और निवासस्थान	१४९
वासुदेव निवासात होणाऱ्या यष्टी	१५२
यज्ञयाग	१५३
अन्नदान	१५४
कुमारिका पूजन, कृतज्ञतेचा दिवस	१५५
पं. धुंडीराज दातेशास्त्र्यांविषयी	१५७
श्री. आर्विकर व श्री. सप्रे	१५८

	पाने
सुवर्ण क्षण	१६७
गुरूमातेचा सत्कार, ताईमहाराजांचे गौरव	१६९
मानपत्र समर्पण, आशीर्वादपर भाषण	१७०
श्रीज्ञानदेव दत्तात्रय काजळकर महाराज	१७७
सौ. ताईमहा. जीवनाचा कानोसा	१७८
सौ. ताईची आतिथ्यशीलता	१८०
भगवत् सेवेचा एक नमुना	१८१
रामनवमी जन्मोत्सव	१८२
प. पू. श्रीआत्मारामशास्त्री जेरे	१८५
पू. कै. यशवंतराव मराठे	१८९
यती नारायणानंद सरस्वती स्वामी	१९०
रौद्रीशांती सोहळा, देऊळगावराजा	१९४
हिंगोलीत प. पू. श्रीदत्तमहाराज	२०२
बीडला प्रयाण	२११
बार्शीच्या भगवंताकडे	२१२
पुण्याची रौद्रीशांती	२१४
श्रीगुळवणीमहाराजांचे आशीर्वाद	२१८
राष्ट्रपतीकडून गौरव	२१९
श्री वासुदेव निवासातील भावपूजन	२२०
स्मृतींची चाळता पाने	२२२
वाई येथून शिष्य मंडळीची पत्रे	२४०
धन्योद्गार	२४६
डॉ. इंगाल्स यांचे (इंग्लिश) पत्र	२६४
सत्कार्ये/सत्कर्मे	२७६
कविश्वरांच्या वास्तुचा जिर्णोद्धार	२८६
आश्रमातील अतिरुद्र अनुष्ठान	२८७
जगदंब नमोस्तुते	२९५
एक वेगळीच प्रचिती	३०१
आमचे आजोबा	३०३
सदगुरूंचे सहाय्य	३०४
सुसंवाद	३१०
युवकांचे मनोगत	३२१
संताना मनुष्य स्वभावाची कल्पना, एक समन्वय ग्रंथ भागवत, शुद्धविचारदर्शक व चिंतनीय पत्रे	३३३
खर्डा येथील भागवत सप्ताह	३४२
दादर येथील भागवत सप्ताह	३४३
भागवताबद्दल बोलताना	३४५
भागवत एक समन्वय ग्रंथ	३४६
भागवत धर्माचे प्रयोजन	३४७
धर्मे प्रीतिं सन्मति देवभक्तिम्।	३५१
प. पू. श्रीदत्तमहाराजांचा पत्र संदेश	३५४
निबंधातील विचार दर्शन	३६३
प्रश्न आणि उत्तरही काव्यातून	३६६
परिवार	३६९
महाराजांची कुंडली	३७२
लग्नपत्रिका	३७३
आवडती गाणी	३७४
ऐश्वर्य योग	३७५
द्वैतातून अद्वैताकडे जाणाऱ्या आनंदयात्रींना वंदन	३७८
सद्गुरू	३८७
पुरूषोत्तम	३९२
तुळशीपत्र	३९५
परिशिष्ट	३९७
वासुदेव निवास	३९८
सन्मानपत्रे	४०६

अभिवादन



प. पू. श्रीधुंडामहाराज देगलूरकर

वे. शा. सं. प. पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांच्या परिचयाचे भाग्य मला अनेक वर्षांपासून लाभले आहे. त्यांचे वडील आदरणीय विद्वद्वर प. पू. श्रीधुंडिराजशास्त्री कवीश्वर यांच्यापासून मी त्यांच्या घराण्याशी परिचित आहे. त्यात विशेषतः प. पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांच्या प्रसन्न सात्विक आणि ज्ञानसंपन्न व्यक्तिमत्वाबद्दल माझ्या मनात प्रथमपासूनच अत्यंत आदराची भावना आहे. प. पू. श्रीवामनरावजी गुळवणी महाराज यांच्यामुळे अनेक उत्सवादिक निमित्तांनी प. पू. श्रीदत्तमहाराज यांच्याशी अधिक संबंध आला आणि आता प. पू. श्रीगुळवणी महाराजांनंतर त्यांच्या कार्याची धुरा ते समर्थपणे सांभाळीत असता तो संबंध अधिक दृढ आणि अधिक आत्मीयतेचा झाला आहे. अर्थात् यात माझ्या कर्तृत्वापेक्षा त्यांच्या उदार चरितत्वाचा भाग अधिक आहे!

प. पू. श्रीदत्तमहाराज यांची विद्वत्ता व अधिकार हा आजच्या काळात सहजा सहजी कळणे कठिण आहे. न्यायमीमांसावेदान्तादि शास्त्रांचे प्रगाढ पंडित असूनही अत्यंत विनयशील असा त्यांचा स्वभाव आहे. एका श्रेष्ठ परंपरेच्या आचार्यपदावर आरूढ असूनही अत्यंत साधी त्यांची राहाणी आहे. लोककल्याणाच्या हेतूने अनेक कार्यात व्यग्र असूनही ते सर्वांपासून अलिप्त आहेत. असे श्रेष्ठगुणसंपन्न त्यांचे व्यक्तिमत्त्व असूनही तो श्रेष्ठपणा मिरवण्याचा त्यांचा स्वभाव नसल्यामुळे कित्येकदा जवळच्या लोकांनाही त्यांची खरी ओळख होत नाही! काही लोक नसलेला मोठेपणा मिरवतात व काही लोक असलेला मोठेपणा झाकतात! पण तो झाकून राहणे लोकहिताच्या दृष्टीने योग्य नाही. कारण त्या मोठेपणाचे दर्शन हे अनेक लहानांना मोठे करीत असते.

हे लक्षात आल्यामुळेच श्रीमती नीलाताई कृ. जोशी यांनी प. पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांचे चरित्र लिहिण्याचे ठरविले असावे. श्रीगुरुकृपेने हे चरित्र लिहिण्याचे कार्य त्यांच्या हातून उत्तमप्रकारे पार पडले आहे. या लेखनामागे जसा आदरभाव आहे तसाच जिव्हाळा देखील आहे, त्यामुळे चरित्र वाचनीय झाले आहे.

या चरित्र वाचनामुळे **'ते सर्वांहि सदा सज्जन। सोयरे होतु।।'** ही श्रीज्ञानदेवांच्या शब्दात भावना व्यक्त करतो.

मार्गशीर्ष शु. १, शके १९०७
पुणे

धुंडामहाराज देगलूरकर

आशीर्वाद

।।श्री गणेशदत्त गुरूभ्योनमः।।



समर्थ श्री नानामहाराज

समर्थ श्री नानामहाराज तराणेकर
८१/१, स्नेहलता गंज, गणेश मंडळाच्या मागे,
इन्दोर (म. प्र.) ४५२ ००३, दूरध्वनी : ३१८४७

सौ. नीलाताई जोशी यांस,

स. आ. वि. वि.

आपण प. पू. श्रीदत्तमहाराज यांचे चरित्र गुरूप्रेरणेने लिहिलेत हे कौतुकास्पद आहेच. पण चरित्रलेखनाकरिता जी व्यक्ति निवडलीत ती देखील अत्यंत थोर आहे. 'अध्यात्मज्ञाने जी चोखडी। ते संत माझी रुपडी' या उक्तीप्रमाणे प. पू. श्रीदत्तमहाराजांचा अधिकार फार मोठा आहे. 'स जातो येन जातेन। याति लोकः समुन्नतिम्।' ज्याचे जन्मास येण्याने लोकांचा भाग्योदय होतो तोच खरा जन्मला व 'शोषणं भवसिंधोश्च ज्ञापनं सारसंपदम्' या न्यायाने आत्मानंदातून सर्वात्मभावाची प्रचिती घेणे व इतरांना त्याची अनुभूति आणून देणे हे त्याचे कार्यही अविरत चालू आहे. 'धर्मोऽथ पापनिश्चयः श्रुतमस्नपांसि। यद्दत्तमात्रविभव प्रकट प्रभावा।' वेदान्ताच्या अध्ययनांतून धर्माचे वैभव प्रगट करणे व त्याची उधळण सर्वत्र करणे त्यामुळेच 'विद्या वाचस्पति' ही उपाधि महाराजांना पुरेपूर लागू पडते.

या त्यांच्या जीवन साधनेतूनच प. पू. श्रीधुंडिराज महाराज व प. पू. श्रीगुळवणी महाराज यांच्याकडून दीक्षा देण्याचा त्यांना अधिकाराचा लाभ झाला. 'मायाजले भवसा गरू। भरला असे अतिदुस्तरु। त्याचा उतरावया पैलपारु। होय तूं तारु मुनिराया।' अशा ह्या अधिकारी व्यक्तीचे चरित्र आपल्या सिद्धहस्त लेखणीतून चांगलेच उतरले आहे. उत्तरोत्तर असेच यश लाभो व निरनिराळ्या संतचरित्राचे गायन व लेखन आपल्या हातून घडो असा आमचा पूर्ण आशीर्वाद आहे.

'येणे वचनामृत तुषारे। ग्रंथभूमिकाविवेकांकुरे। अंकुरली एकसरे फळभारे फलित' 'ग्रंथारंभू पडला चोख मुक्त मुमुक्षु इतर लोक। श्रवणमात्रेचि देख।। निजात्मसुख पावती' असेच हे चरित्र झाले आहे यांत शंका नाही.

दिनांक : ७-१२-८

नानामहाराज तराणेकर

मनोगत

(पहिल्या आवृत्तीचे)

योग चूडामणी श्री. वामनरावजी गुळवणीमहाराजांचे हे जन्म शताब्दी वर्ष आहे. या महोत्सवाचे निमित्ताने या नव्या वर्षाच्या शुभारंभी पुण्यपावननगरी गजबजून गेली आहे. प. पू. श्रीदत्तमहाराजांचे संकल्पाने वामन निवासाची ही भव्य वास्तु श्री. गुळवणीमहाराजांच्या कीर्तीत भर घालीत आहे.

या पर्व काळात आपणही कांही सेवा करावी असे वाटू लागले. प. पू. श्रीदत्तमहाराजांचे चरित्र लिहावे असे मनाला वाटू लागले. हा विचार मनात येणे हे काही माझ्या बुद्धीचे काम नव्हे. ही प. पू. श्रीगुळवणीमहाराजांची प्रेरणा असावी असे निश्चितपणे मला वाटले. मनात विचार येऊ लागले की श्री. गुरूमहाराजांच्या सहवासात इतकी वर्षे प. पू. श्रीदत्तमहाराजांना पहात आहोत, बोलत आहोत, त्यांची प्रवचने ऐकत आहोत पण त्यांची माहिती आपणाजवळ किती आहे? अगदी अल्प! मग त्यांना जाणणे ही तर आणखी दूरची गोष्ट झाली हे लक्षात येताच मला गुरूमहाराजांच्या प्रेरणेचे औचित्य कळून आले. आपल्याप्रमाणे असे किती लोक असतील की ज्यांना माहित नाही. तर सर्वांना ती होणे उचित आहे.

श्री. गुरुमहाराजांचीच ही प्रेरणा आहे असे म्हणण्याचे आणखी एक कारण नुसती प्रेरणा करून ते थांबले नाहीत तर त्याच्या प्रकाशनाची त्यांनी व्यवस्था केली. श्री अण्णासाहेब फणसे हे एकदा अचानक घरी येऊन म्हणाले, 'नीलाताई, दत्तमहाराजांचे चरित्र आहे का? मी नाही म्हटले, त्यावर ते म्हणाले. 'हे काम तुम्ही करावे असे मला वाटते. पुढची सारी व्यवस्था मी करीन. ती प्रकाशनाची जबाबदारी माझी' आजच्या या सर्व प्रकारच्या महागाईच्या काळात हे आपणहून चरित्र लिहा असे सांगत आहेत तेव्हा ही प्रेरणा श्री. गुरूमहाराजांचीच याची मला संपूर्ण खात्री झाली.

हे येथपर्यंत सर्व ठीक झाले. परंतु प. पू. श्रीदत्तमहाराजाचे चरित्र लेखन ही काही साधी गोष्ट नाही. त्या लेखनासाठी तसाच त्यांना जाणणारा अंतर्निष्ठ मनुष्य हवा. आपल्यासारख्या सामान्य बुद्धीच्या ताकतीला हे जमावे कसे? आपण एक धाडस करीत आहोत असे वाटले तरी आतील तळमळ थांबेना.

या गोष्टी प्रथम प. पू. श्रीदत्तमहाराजांचे कानी तरी घालाव्या असे वाटू लागले. म्हणून त्यांचेपाशी विषय काढला. पण त्यांनी ही गोष्ट केव्हाच नाकारली. 'सर्व संत मंडळींनी आम्हाला उचलून धरले म्हणून आम्ही मोठे. बाकी आमच्या चरित्रात काही नाही' असे ते म्हणाले. त्यांनी जी थोडी फार माहिती सांगितली त्यात खरे दत्तमहाराज कळणार नाहीत याची काळजी घेतली. आप्तस्वकीय म्हणू लागले श्री. दत्तमहाराज इतके साधे आहेत व अबोल आहेत की त्यांचे थोरपण आम्हाला कळलेले नाही.

प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या मोठेपणाची कल्पना येथेच येऊ लागली.

थोरपण पन्हा सांडिजे। उत्पत्ती आघवी विसरीजे। जगा धाकुटे होईजे। तै जवळीक माझी।।

परमेश्वराला आपलासा करताना त्यांनी जे जे काही अनुभूतीचे ज्ञान मिळविले ते ते त्यांनी झाकून ठेवले. आपला मोठेपणा कोणालाही कळू नये याची अत्यंत दक्षता जीवनभर घेतली हाच यांचा चरित्र विशेष हे मनाला जाणवले.

प. पू. श्रीदत्तमहाराज हे सर्वांना पावन करणारे एक चालते बोलते प्रयागतीर्थ आहे. प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराज व प. प. श्रीदीक्षित स्वामीमहाराज यांच्याकडून प्राप्त झालेली ज्ञानगंगा वंशपरंपरेने व पिताजींकडून मिळालेली प्रपंचरूपी यमुना व ज्यात सांसारिक किंवा व्यावहारिक सुखदुःखे भरलेली आहेत आणि परमपूज्य गुळवणीमहाराजांकडून मिळालेल्या शक्तिपात दीक्षा स्वरूप सरस्वतीचा गुप्त प्रवाह अशा तीन अलौकिक गंगा यमुना सरस्वती याचा त्रिवेणी संगम आपल्याला श्रीदत्तमहाराजांच्या ठिकाणी सगुण रूपात दिसतो असे हे प्रयागक्षेत्र आहे.

त्यांचे सर्वांग परिपूर्ण असे मोठे चरित्र भविष्य काळात गुरुभक्त पोटभऱ्यांसारखे लोक लिहितील. माझा हा केवळ एक श्रीगणेशा आहे.

साहित्याचे दृष्टीने भाषालालि त्याने शब्दबद्ध केलेले असे हे मोठे चरित्र नाही. भावभक्तीने, श्रद्धेने रेखाटलेले शब्दांकन आहे.

श्रीगुरूमहाराजांच्या जन्मशताब्दीच्या सोहळ्यात हा एक तीर्थाने भरलेला मंगल कलश आहे. या तीर्थोदकातील तुषार ज्यांचेवर पडतील ते पावन होणारच.

जग जरी अशाश्वत असले तरी प्रयाग क्षेत्र हे शाश्वत आहे असे शास्त्राचे म्हणणे आहे. तीन तत्वांचा मिलाफ झालेले प्रयाग क्षेत्र अविनाशी अशा दत्तात्रेयांचा अवतार आहे.

या यंत्रयुगाच्या काळातही मनाच्या स्वास्थ्याकरिता अशा चरित्रांची गरज आहे.

या चरित्र लेखनाचे कामी मला अनेकांची मदत झाली. मला **श्री. गोपाळ गोडसे** यांनी प. पू. श्रीदत्तमहाराजांची प्रवचने संग्रहित केली होती. तो अमोल ठेवा मला उपलब्ध करून दिला. शिवाय अत्यंत श्रद्धेने आपला वेळ दिला याबद्दल आभार मानलेले त्यांना आवडणार नाहीत श्रीगुरुमहाराजच त्यांना योग्य आशीर्वाद देतील. छायाचित्रांच्या कामी मोठीच धावपळ करून **श्री म्हसवडकर** यांनी मोठी मदत केली त्याचेही मला स्मरण आहे.

श्री. अण्णासाहेब फणसे यांनी कशाचीही अपेक्षा न करता हे चरित्र छापण्याची तयारी दाखविली त्यांचे आभार मानणे शब्दांच्या पलीकडचे आहे. त्यांच्यावर श्रीगुरूमहाराज कृपा करतील याची खात्री आहे.

सौ. सुलभाताई व श्री. माधवराव तांबोळी (श्रीदत्तमहाराजांची कन्या व जावई) यांनीही मला माहितीसाठी बरीच मदत केली याबद्दल फक्त शुभेच्छा व्यक्त करते. श्रीगुरुमहाराजांचा लोभ त्यांच्यावर होताच, त्यांचे चरणी ही सेवा रुजू झाली.

ज्या गुरुमहाराजांच्या प्रेरणेने हे काम झाले व ज्या गुरुमहाराजांनी आम्हाला आपल्या निरपेक्ष प्रेमाचे सतत संरक्षण दिले व देत आहेत त्या **श्री गुरुमहाराजांचे चरणी ही सेवा अर्पण करीत आहे.**

दि. ३।१।१९८६

श्रीमती नीला कृष्ण जोशी

मनोगत

(दुसऱ्या आवृत्तीचे)

प. पू. श्रीवामनरावजी गुळवणीमहाराज यांना नम्र भावाने वंदन करुन आणि श्रीमंगलमूर्तींच्या चरणी 'मला चरित्र लेखनास सहाय्य करावे' अशी प्रार्थना करुन मनोगत लिहित आहे.

ज्येष्ठ गुरुभक्त व विश्वस्त श्री. भाऊसाहेब वाकडे यांनी प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या 'प्रयाग' या चरित्राची नूतन आवृत्ती काढावी व त्याचे लेखन लवकरात लवकर करावे, अशी विनंती केल्यामुळे ही सेवेची संधी पुन्हा उपलब्ध होत आहे. हे मी माझे परमभाग्य मानते. त्यांच्या विनंतीला मान देऊन आज श्रीमंगलमूर्तींच्या आशिर्वादाने त्या मंगल चरित्राचा श्रीगणेशा करीत आहे.

प. पू. श्रीगुरुमहाराजांच्या जन्मशताब्दीचे निमित्त साधून प. पू. श्रीगुरुमहाराजांचे उत्तराधिकारी ब्रम्हश्री दत्तमहाराज यांचे चरित्र साधकाना मार्गदर्शक व्हावे या इच्छेने श्रीगुरुंच्या प्रेरणेने लिहिले गेले. प्रयाग तीर्थाप्रमाणे ललामभूत अशा व्यक्तिमत्त्वाचे संपूर्ण चरित्रलेखन करणे कठीण असते. अशा व्यक्ती प्रसिद्धीच्या झोतात कधीही येत नाहीत कारण लोकेषणेचा त्यांच्या जीवनाला स्पर्शही नसतो. त्यांच्या चरित्रांत अव्यक्त राहिलेल्या चांगल्या गोष्टी अनंत असतात. अशा या आत्मबोध प्रसन्नता लाभलेल्या जीवनचरित्राचे कौतुक भगवंतालाही करावेसे वाटते. श्री तुकाराम महाराजांच्या उक्तीप्रमाणे,

'मुंगिचीया घरा कोण जाय मूळ। देखोनिया गूळ धाव घाली।।'

अनासक्त जीवनाची गुप्तपणे वाटचाल चालू होती. पण तरीही फुलाचा सुगंध दरवळल्याशिवाय रहात नाही. त्यांच्या तपःपूत जीवनाने मोहीत होऊन अनेक सामान्य तृषार्त जीव आणि अनेक विद्वान पंडीत त्यांच्याकडे आकर्षिले जाऊ लागले. सहस्त्रचंद्रदर्शनशांती, रौद्रीशांती अशासारखे समारंभ करण्याचे जनताजनार्दनाच्या मनाने घेतले. अनेक सत्कर्मे हातून घडतच राहिली. श्री ज्ञानेश्वरांच्या भाषेत सांगायचे तर जीवनातील मंगल क्षण 'भगवंताचा ऐश्वर्ययोग' प. पू. श्रीदत्तमहाराजांना भगवंताच्या इच्छेनेच लाभला. त्यायोगे त्यांच्या जीवनचरित्रावर अधिक प्रकाश पडला. दैवी गुणसंपत्ती प्राप्त झालेल्या पुण्यपुरुषाचे वर्णन करताना श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात,

गुण कुसुमांची माळा। हे घेऊन मुक्तीबाळा।
वैराग्य निरपेक्षाचा गळा। गिवसित असे।।

'प्रयाग' ची प्रथमावृत्ती प्रसिद्ध झाल्यानंतरच्या कालावधीत प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या हातून अनेक उज्ज्वल कार्ये घडली. त्या कार्यांचा अंतर्भाव या चरित्रात व्हावा या हेतूने ही नूतन आवृत्ती निघत आहे. कालौघात अनेक बदल घडत असतात. पहिली आवृत्ती काढताना ज्या व्यक्तींचा आधार पाठीशी असल्यामुळे ती चरित्रलेखनाची अल्पस्वल्प सेवा हातून घडली त्या व्यक्ती आज हयात नाहीत. त्यांच्या हयात नसण्याची रुखरुख व त्यांच्या स्मृती मनांत आहेत. त्यांचा उल्लेख केल्याशिवाय लेखणी पुढे उचललीच जाणार नाही.

प. पू. श्रीगुळवणी महाराजांनी सतत कृपेचा वर्षाव करुन श्री. कृ. ह. जोशी यांचे संपूर्ण जीवनच उजळून टाकले होते. ते प्रत्येक बारीक सारीक कार्यक्रमाला स्वतः आश्रमात हजर असत. सर्व कार्यक्रमात उत्साहाने भाग घेत. असे गुरुभक्त आज ही नूतन आवृत्ती काढताना हजर नाहीत. 'शेवटचा दिवस गोड व्हावा' या उक्तीप्रमाणे त्यांचा शेवट श्रीगुरुमहाराजांच्या कृपेने गोड झाला. श्री. ज्ञानेश्वरांनी आठव्या अध्यायांत म्हटल्याप्रमाणे

तिही जे वेळी मी स्मरावा। ते वेळी स्मरला की पावावा।
तो आभारूही जीवा साहवेचिना ।। ज्ञाने. ८/१३०
ते ऋणवैपण देखोनि अंगी । मी आपुलियाची उत्तीर्णसालागी।
भक्ताचिया तनु त्यागी परिचर्याकरी।। ज्ञाने. ८/१३१

श्रीगुरुमहाराजांनी त्यांना फुलासारखे अलगद उचलून नेले. दुःखातही ही त्यांची कृपा मनाला शीतल छाया देते. एकाकीपणा वाटत असला तरी अध्यात्माचा आधार जीवाला उभारणी देतो. श्री भाऊसाहेब वाकड्यांनी हे काम मला करण्यास सांगितले. ही गुरुमहाराजांनी माझे जीवनवैफल्य घालविण्यासाठी दिलेली प्रेरणा वाटते आणि त्यांच्या प्रेमळ कृपाप्रसादाने मन भारावून जाते.

कृतज्ञता

'प्रयाग' च्या प्रथमावृत्तीची संपूर्ण जबाबदारी घेणारे व हे लेखन मी करावे असा आग्रह धरणारे माननीय स्वातंत्र्यसैनिक श्री. अण्णासाहेब फणसेही आज हयात नाहीत. ते सुद्धा अगदी अचानक परमेश्वरचरणी लीन झाले. त्यांनाही कृतज्ञतापूर्वक अभिवादन करते.

श्रीवासुदेव निवासाचे विश्वस्त सर्वश्री भाऊसाहेब वाकडे, श्री. आघारकर, श्री. सु. अ. दामले, श्री. नारायणराव ढेकणे यानी मला चरित्र लेखनाची संधी उपलब्ध करुन दिल्याबद्दल त्यांचे पुनः पुनः आभार मानावेसे वाटतात.

आश्रमातील सर्वांनीच या चरित्र लेखनाच्या कामात मदत केली. त्यात चि. विद्याधर फडके, चि. प्रसाद पाटणकरानी माझेबरोबर ठिकठिकाणी येऊन, पत्ते

शोधून, स्वतः जाऊन माहीती गोळा करुन देण्याचे बहुमोल काम केले. त्यांची ही सेवा श्रीगुरुचरणी मान्य व्हावी अशी प्रार्थना प. पू. श्रीदत्तमहाराजांचे चरणी नित्य असते. सर्वश्री निजामपूरकर, अविनाश कोल्हटकर यानी छायाचित्रे निवडण्यात ती उपलब्ध करुन देण्याची मोठी कामगिरी बजावली त्याबद्दल त्याना धन्यवाद. सर्वश्री भास्करराव कुळकर्णी, बी. आर. कुळकर्णी, नारायणराव दाते यानी माझ्या प्रत्येक पुणे भेटीची वेळी लेखनाची आस्थेवाईक चौकशी करुन मला नेहमीच प्रोत्साहीत केले त्यांचीही मी ऋणी आहे.

या चरित्र लेखनाच्या निमित्ताने अनेक श्रेष्टतम् सत्प्रवृत्त मंडळीशी संपर्क आला. विद्वान, व्यासंगी, साधक, भक्त मंडळीचा परिचय झाला. डॉ. सौ. नलिनी चाफेकरांसारख्या विदुषींची गाठ झाली. त्यांनी प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या वाङमयसंपदेचे रसग्रहण करुन मोलाचे साह्य केले. अतिशय आपलेपणाची, प्रेमाची त्यांची मदत हे चरित्र समृद्ध करण्यास उपयोगी झाली. त्यांना धन्यवाद. अनेक साधक भक्तमंडळीनी आठवणी पाठविल्या, अनुभव सांगितले, माहीती दिली, हे चरित्र अधिकाधिक चांगले कसे होईल त्यासाठी मेहनत घेतली, सद्भावना व्यक्त केली त्या सर्व परीचित, अपरीचित व्यक्तींना शतशः प्रणाम. भागवत ग्रंथातील सुवचना प्रमाणे 'अचंहि परमो लाभो। नृणां साधुसमागमः' संताची संगती हाच श्रेष्ठ लाभ होय. तो मला झाला त्याबददल मी सर्वांची कृतज्ञ आहे.

श्री प्रसाद प्रिन्टर्सच्या श्री. प्रविण जोशींनी सेवाभावनेने हे चरित्र छपाईचे काम केले. अनेक दुरुस्त्या कराव्या लागल्या त्याबद्दल कुरकुर न करतां, लवकरात लवकर पुरे कसे करता येईल हा ध्यास ठेवला त्याचा विशेष उल्लेख करुन प. पू. श्रीदत्तमहाराजानी या तरुण मंडळीकडून अशीच सेवा करवून घ्यावी अशी प्रार्थना करते.

घरच्या मंडळीचा ह्या सेवेत मोठा भाग आहे. ह्या कामात माझी सून सौ. सुमती जोशी हीने प्रुफे तपासून देण्यात, माझा भाचा श्री. शरद दाते याची माहीती संकलन करण्यात विशेष मदत झाली. आमच्या घरावर श्रीमहाराजांची कृपा अखंड बरसत रहावी अशी प्रार्थना.

हे चरित्र सामान्य आबालवृद्धांना मार्गदर्शक ठरावे असे मागणे ही सेवा परमेश्वरचरणी अर्पण करताना करते.

दि. २९।६।१९९५

श्रीमती नीला कृष्ण जोशी.

विश्वस्तांचे निवेदन

श्रीगुरुःशरणम्

आषाढ शुद्ध प्रतिपदेला प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराजांच्या पुण्यतिथीला प. पू. श्रीदत्तमहाराजांचे सविस्तर चरित्र 'प्रयाग' प्रकाशित होत आहे ही फार आनंदाची गोष्ट आहे. ज्येष्ठ गुरुभगिनी श्रीमती नीलाताई कृष्ण जोशी बोरिवली याना ही सेवा परिश्रमपूर्वक व आनंदाने पार पाडली याबद्दल आम्हा विश्वस्तांना समाधान वाटले.

प. पू. श्रीवामनरावजी गुळवणीमहाराजाच्यानंतर १९७४ पासून २१ वर्षे आश्रमाची धुरा अत्यंत समर्थपणे प. पू. श्रीदत्तमहाराज संभाळीत आहेत. ''आमच्यानंतर मोक्षमार्गाचे मार्गदर्शन श्री दत्तमहाराज करतील'' या वाक्यातच प. पू. श्री गुळवणीमहाराजांनी त्यांचा अधिकार दाखविला आहे. ''श्रीदत्तमहाराजांकडे ज्ञान हे मुरलेले दिसते'' असे त्यांचे यथार्थ वर्णन कांची गुरुस्वामींनी केले आहे.

अत्यंत मृदू व मितभाषी असलेले श्रीदत्तमहाराज. त्यांचे सविस्तर चरित्र प्रकाशित व्हावे अशी सर्वांची इच्छा या चरित्राने पूर्ण होईल. प. पू. श्रीदत्तमहाराजांना दिर्घ आयुरारोग्य लाभावे व आम्हा सर्वांना त्यांचा सहवास व मार्गदर्शन अखंड मिळो हीच श्री गुरुमहाराजांच्या चरणी आपली सर्वांची प्रार्थना .

आपले विश्वस्त

ल. त्यं. वाकडे
ना. य. ढेकणे
श्री. पा. आघारकर
सु. अ. दामले

श्री. वासुदेव निवासाश्रम,
एरंडवणे, कर्वे पथ, पुणे ४११ ००४.
दि. २९-६-१९९५.

प्रयोजन

प. पू. श्रीवामनरावजी गुळवणी महाराजांनी लौकिकार्थाने देह सोडून एकवीस वर्षे झाली. या काळात त्यांनी स्थापन केलेल्या श्रीवासुदेव निवासचे कार्य प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या मार्गदर्शनाखाली गुरुमहाराजांच्या इच्छेप्रमाणे चालू आहेच. पण या कार्यात श्रीवामन निवासाची भर पडून तेथे रुग्णसेवा कार्यही चालू आहे. प. पू. श्रीयोगीराज गुळवणीमहाराजांच्या वाडीच्या जीर्णोद्धाराच्या ईश्वरप्रेरक कामाप्रमाणे, कृष्णेच्या पैलतटावर असलेल्या श्रीदत्तअमरेश्वर श्रीवासुदेव पीठाच्या जीर्णोद्धाराचे काम आज चालू आहे.

बिंब - प्रतिबिंब ह्या न्यायाने दोन संतांची जीवनगंगा या ठिकाणी वहात आहे.. प. पू. श्रीयोगीराज गुळवणी महाराज यांची पवित्र असामान्य जीवनगाथा येथे विसावली आहे. ''उपासनेस दृढ चालवावे सत्कर्म योगे वय घालवावे'' या श्रीसमर्थ रामदासांच्या वचनाप्रमाणे प. पू. श्रीगुळवणीमहाराजांचे जीवन या ठिकाणी व्यतीत झाले आहे. त्यांच्या पाऊलावर पाऊल ठेवून प. पू. श्रीदत्तमहाराजांचे अखंड कार्य या ठिकाणी सुरु आहे. दिसायला दोन पण विचाराने एक असलेल्या सत्पुरुषांची अध्यात्मिक परंपरा येथे एकत्र झाल्यामुळे हा संगम घडला आहे. तो जगाच्या कल्याणासाठी वहात राहीला आहे. त्यांच्या जीवनात जो आनंद भरुन राहीला आहे, जे अध्यात्मिक सत्य भरलेले आहे ते शोधून मानवी जीवनमूल्यांची अंतरंगात जोपासना करणे, हेच प्रयोजन या चरित्रलेखनामागे आहे.

आज वैज्ञानिक सुविधांमुळे माणसाचे जीवन सुखी झालेले दिसते. विज्ञानयुगाचा प्रभाव संपूर्ण जगावर दिपवून टाकण्या इतका पडला आहे. अध्यात्मिक प्रेरणा दुबळ्या झाल्या आहेत. प्रत्यक्ष इंद्रियांच्या मार्फत माणसाच्या बुध्दिला जे अनुभव येवू शकत नाही, ते नसलेच पाहिजे, अशी विचारसरणी सर्वत्र दिसून येते. समाधानी व सुखी जीवन सर्वांनाच हवे असते. त्याचप्रमाणे मानवी बुद्धी व मन , विकसीत व्हावी, उक्रांत व्हावी असेही व्यक्तीला वाटत असते. नेमके काय करावे हे मात्र प्रत्येकाला सुचतेच असे नाही.

आजच्या यांत्रिक युगात सकाळपासून संध्याकाळपर्यंत मनुष्य धावत असतो. तंत्रज्ञानाच्या विकासात लोक एकएकटे काम करीत असतात. करमणूक सुद्धा समुदायाने न भोगता संगणक, दूरदर्शन यामुळे एकटेपणाच पसंत करतात. या सगळ्या धावपळीत काही वेगळा विचार त्यांना स्फुरत नाही. बराचसा काळ असा निघून जातो. त्या काळात स्वकेंद्रीत वृत्ती वाढीला लागलेली असते. मनाची कुरकुर चालू असते. सत्प्रवृत्ती वाढीस लागण्यास प्रयत्न केलेला नसतो. आसक्ती वाढत असते. प्रतिकुल परिस्थिती आली की मनाची गडबड उडते. समतोलता ढासळते.

याचाच अर्थ असा की अधिकाधिक कार्यक्षमता हे सुद्धा पूर्ण सुख नाही. आपली प्रगती ही नेमक्या कोणत्या गोष्टींबाबत होते आहे याचा विचार आवश्यक आहे. स्वैराचार, सामाजिक अस्थिरता, स्वतंत्र कुटूंबामुळे असलेल्या उणिवा याचा विचार करावा असे आधुनिकशास्त्रात प्रगत असलेल्या देशांनाही वाटू लागले आहे. ध्येयहीन जीवन झाले तर त्याचे भीषण परिणाम भोगावे लागतात. म्हणूनच समाधानी जीवनाची कला शिकविणाऱ्या संतांची चरित्रे आपण अभ्यासली पाहीजेत. ज्या जगात आपण येतो, वाढतो आपला जिव्हाळ्याचा संबंध ज्या जगाशी असतो. त्या जगातील समाजाला सुसंघटीत करण्याचे काम संत करीत असतात.

श्री समर्थ रामदास म्हणतात, **''सकळ गुणामध्ये सार । तजविजा विवेक विचार। जेणे पाविजे पैलपार । अरत्र परत्रींचा ।।** दासबोध १८/६ या ओवीची या ठिकाणी आठवण होते. विचार करणे हा सर्वात मोठा सारभूत गुण आहे. त्यामुळे मन विकसीत होते व आचार त्याप्रमाणे घडतो. विज्ञानाचे महत्त्व मला नाकारायचे नाही. पण विज्ञान व अध्यात्म याची सांगड मनुष्याने घातली नाही तर तो पशुसारखे जीवन जगायला शिकेल. म्हणून विचाराने व आचाराने पवित्र असलेल्या ज्ञानी माणसाचे अनुकरण करणे, हे महत्वाचे ठरते. आत्मज्ञानी माणसे जगात नेहमी होऊन जातात व आजही आहेत. 'ईश्वरनिष्ठांची मांदियाळी' निर्माण व्हावी असे श्रीज्ञानेश्वर महाराज आपल्या पसायदानात मागणे मागतात.

ज्या विचाराने प्रपंच व परमार्थ दोन्ही साधता येते, तो विचार हा सद्‌गुण आहे. चार्वाक मताचे लोक (भोगवादी) सर्व जग खरे मानतात तर संन्यासी वृत्तीचे लोक सर्व जग मिथ्या मानतात. संत मात्र सांगतात की देहाला योग्य तितके महत्त्व देवून त्याला सत्कर्मासाठी उपयोगात आणा.

काही सांडावे लागत नाही । काही मांडावे लागत नाही।
एक विचार शोधून पाही। म्हणजे कळे ।। दासबोध २०/७/२

श्री समर्थ आणि सगळेच संत सांगतात. अध्यात्म किंवा परमार्थ करायचा म्हणजे वेगळे काही करायचे नसते. रोजचे जीवनच पारमार्थिक करायचे ही मनाची यथार्थ समजुत करावी लागते. ही विचारांची शक्ती संतजीवनातून मिळते. मनाची दृढ भुमिका तयार होते. असे संतजीवन आज आपण पाहत आहोत. असे महात्मे दुर्मिळ असतात. पण अनेकांची जीवने उजळून टाकतात. असा उन्मन झालेला पुरुष गीतेने उत्तम पुरुष म्हणून वर्णिलेला आहे. प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या ज्ञानाला शास्त्राची बैठक ठामपणे आहे. शास्त्रनिष्ठेप्रमाणे त्यांचा आचार आहे हे विशेष आहे. इतके ज्ञानसंपन्न, आचारसंपन्न पंडीत असूनही त्यांचे आणखी एक आगळेवेगळे वैशिष्ठ्य आहे.

ज्ञानाचेच व्यसन असल्यामुळे अशा प्रकारचे संशोधनात्मक लेखनाचे कार्य त्यांनी कितीतरी केले असते. पण ते थांबले व प्रत्यक्ष अनुभवांकडे वळले. मानवी


जीवनाचे जे अंतिम ध्येय आत्मज्ञान, त्याचा अनुभव घेतला. आपल्या अंतरंगात असलेला ज्ञानाचा झरा त्यांनी मिळविला, शांती, सुखाचा अनुभव घेतला. ज्ञानाचे सुध्दा त्यांना वैराग्य आले. ही उत्क्रांत जीवनाची अवस्था आहे. **पुरुषोत्तम** ही पदवी त्यांना पूर्णपणे लागू पडते. त्यांच्या प्रकांड पंडीत्वामुळे सामान्य माणसे व ते यामध्ये स्वाभाविक दुरावा निर्माण झाला असता तो त्यांच्या आत्मवैभवामुळे उरलेला नाही. अगदी कोणत्याही स्तरावरील माणूस बाल, वृद्ध, तरुण, शिक्षित-आशिक्षित, गरीब-श्रीमंत, त्यांचेजवळ पोहचू शकतो. कारण त्यांच्या हृदयात समाजाविषयी प्रेमभाव, तळमळ व समदृष्टी आहे.

श्रेष्ठ लोक म्हणतात 'आत्मस्वरुप हे बुद्धीने आकलन करता येत नाही. त्यामुळे तत्त्वचिंतकाला संपूर्ण समाजजीवनाचे आकलन होत नाही. पण तत्त्वज्ञानी संतांना जीवनाचा समग्र अर्थ कळलेला असतो. हा फरक आपल्याला जाणवतो त्यामुळेच प. पू. श्रीदत्तमहराजांचेकडे लोकांची रीघ सुरु होते. उत्तम पुरुष होण्यासाठी भगवंताशी एकरुप व्हावे लागते, तसे प. पू. श्रीदत्तमहाराज झाले आहेत. अस्सल सोन्याशी तद्रुपता साधायला अस्सल सोनेच व्हायला लागते. मगच भगवंताची भक्ती सुरु होते. **साडे पंधरा मिसळावे । तै साडेपंधराची होआवे। तेवी मी झालीया संभवे । माझी भाक्ति ।।** १५।५६६ श्रीज्ञानेश्वरी अशा पूर्णपुरुषांच्या चरित्रलेखनाची म्हणूनच फार फार जरुरी वाटते. श्रीज्ञानदेव म्हणतात, 'झाडांच्या टवटवीतपणावरुन वसंताचे आगमन कळते. त्याप्रमाणे ज्ञानी माणसांची इंद्रिये ज्ञानाचे अस्तित्व दाखवतात. झाडांच्या मुळाशी असलेले पाणी दिसत नाही पण झाडांच्या विस्तारावरुन ते कळून येते. जमिन सुपिक आहे हे लवलवत्या कोंबावरून समजते. आदरातिथ्यावरुन प्रेम समजते. एखाद्या माणसाच्या दर्शनाने होणाऱ्या समाधानावरुन पुण्यपुरूष समजतो. प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या जीवनचरित्रावरुन त्यांचे संतपण आपल्याला कळून येते, अनुभवास येते.

नाक व फुले यांचा संबंध सुवासाने जोडला जातो, पण सुवास डोळ्याला दिसत नाही, म्हणून तो नाही असे कोणी म्हणू शकणार नाही. सूर्याचे बिंब व पाण्यात पडणारे प्रतिबिंब या दरम्यान असलेले तेज कोणत्याही उपायाने घेऊ शकलो नाही, तरी ते असतेच. पाहणारा व दृश्य दोन्ही ही नाहीसे झाल्यावर उर्वरित स्थिती तीच स्थिती होवून राहते. तेच परात्मरुप होय. जगात राहून न राहणारे, संसार व्यस्थितपणे करुनही त्यांत निमग्न अथवा आसक्त न होणारे असे हे जीवन. त्यांला गीतेने 'पुरुषोत्तम' असे म्हटले आहे.


ज्यांच्याजवळ समाधान व आनंद आहे, त्यांच्याजवळ गेले तरच दुसऱ्याला समाधान मिळू शकेल. अशा थोर महात्म्यांकडे माणसांची रीघ सतत लागलेली असते. आत्मज्ञान प्राप्त होणाऱ्या मार्गात ते आपल्याला मदत करत असतात. प. पू. श्रीदत्तमहाराजांचे तृप्तजीवन व त्यांचे विचारधन घेऊन आपणही खऱ्या अर्थाने सुखी समाधानी जीवनाची वाटचाल करुया हेच संत चरित्राचे प्रयोजन आहे. हे काम श्रीवासुदेव निवासाश्रम सतत करीत आहे.

योगीराज श्रीवामनरावजी गुळवणी महाराज



योगचुडामणी असूनही, ज्यांच्या पवित्र जीवनात भक्ति-कर्म-ज्ञान यांचा त्रिवेणी संगम झाला होता, ज्यांच्या भक्तीलाही परिमल होता, कर्मात कौशल्य होते, ज्ञानाला अहंकाराचा वास नव्हता, मानवी जीवनावर ममत्व करण्याची कला ज्यांना साधली होती, कुणाच्याही अंतःकरणात न दुखविण्याचे व्रत ज्यांनी घेतले होते, असे हे आदरणीय, वंदनीय गुरूमहाराज.

मातृपितृदेवो भव



प. पू. श्रीदत्तमहाराजांचे मातापिता

प. पू. श्रीवक्रतुंड महाराज




प. पू. श्रीदत्तमहाराजांचे आजोबा

श्रीक्षेत्र नरसोबाची वाडी




औदुंबरातळवटी

प. पू. श्रीदत्तमहाराज कविश्वर




पवित्रं दर्शनं यस्य पावनं स्मरणं तथा
शक्तिदं सान्निधानं तद् श्रीदत्तस्य महात्मनः


श्री गुरुपंचायतन




प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराज



प. प. श्रीलोकनाथतीर्थ स्वामीमहाराज



प. पू. श्रीयोगीराज गुळवणीमहाराज



प. प. श्रीदिक्षीत स्वामीमहाराज



प. पू. श्रीधुंडीराजमहाराज

: १ :

कृष्णाकाठी रम्य तटी। पांघरुनी बैसे छाटी ॥



कृष्णामाई संथ वाहत आहे. आजूबाजूला रम्य वनश्री आहे. लिंबाच्या वनातील पानांची सळसळ ऐकू येत आहे. त्या सळसळीतून जणू श्रीदत्तदिगंबराचे गान ऐकू येत आहे वायुलहरींबरोबर या ध्वनीलहरी कृष्णामाईच्या कानावर पडत आहेत. जललहरी व वायुलहरी एकमेकांना साथ करीत आहेत. वृक्षांवरील पक्ष्यांचे कूजन मोठे गोड वाटत आहे. सारा निसर्ग आनंदाने डोलत आहे. लहानसे गाव संथपणे आपला जीवनक्रम श्रीगुरुमाऊलींच्या कृपाप्रकाशात उजळीत आहे.

नदीच्या घाटावर स्वस्थ बसताच मनात अनंत स्मृती उमटतात. मन एकदम गतकाळात जाते. संथ वाहणारी कृष्णामाई नि निर्जन वन याशिवाय येथे काही नव्हते असा तो काळ होता. भक्तवत्सल अशा गुरु दत्तात्रेयांनी ही आपली तपोभूमी निवडली. या औदुंबर वृक्षाखाली ते बारा वर्षे तप करीत राहिले. कृष्णामाईच्या जलात स्नान करावे, औदुंबरातळवटी ध्यान करीत बसावे, आकाश मंडप, पृथ्वी आसन, आजूबाजूचे वृक्ष ही सोयरी मानावीत असा तो पर्वणीकाळ. गुरुदेवांनी आपल्या तपाने हे वाडीगाव पुनित केले. श्री गुरुदत्तांचा वास येथे होणार म्हणून त्यापूर्वीच श्री. रामचंद्रयोगी महान अधिकारी येथे वास्तव्य करून राहिले होते. त्यांची समाधी येथेच आहे. श्री. नारसिंह अवतारात आपला राग शांत होण्यासाठी, आपल्या हाताचा दाह शांत होण्यासाठी, नारसिंहाने ज्या औदुंबर वृक्षाचा उपयोग केला, त्याच औदुंबर वृक्षाखाली बसून श्री गुरुदेवांनी सामान्य जनाला शांत होण्याचा मार्ग सांगितला. सारी पंचक्रोशी पवित्र केली. रंकापासून रावापर्यत कृपा केली. गरीबाघरच्या कण्या खाल्ल्या, घेवड्याच्या वेलाची भिक्षा मागून त्यांचे दारिद्रय नाहीसे केले. भास्कर ब्राह्मणांची श्री गुरुदेवांना जेवायला घालायची इच्छा सहस्त्रभोजन घालून पूर्ण केली. अशा अनेक तऱ्हेच्या कृपा या ठिकाणी श्री गुरुदेवांनी केल्या. श्री. भैरव गुरुजींची विशुध्द भक्ती पाहून श्री. दत्तगुरु येथे राहिले. मनोहर पादुका स्थापून युगायुगाची पुण्याई येथे साठवून ठेविली. इतकेच नव्हे, तर दत्तप्रभूंच्या राजधानीत, थोर संन्यासी संतांची एक प्रभावळ तयार झाली. त्या नरसोबा वाडीचे वर्णन

शब्दांच्या चौकटीत करणे अशक्य आहे. भावसुमनांची ओंजळ मूकपणे वाहणे हेच उचित वाटते.

श्रीनारायणस्वामी

श्रीनारायणस्वामी भक्तीने येथेच रंगले होते. भजनानंदाचा आनंद घेत होते. ज्यांना साक्षात चौसष्ट योगिनींनी दर्शन दिले, स्वतः नरसिंह सरस्वतींनी संन्यास दिला, असे थोर महात्मे येथेच राहिले. ज्या ठिकाणी उत्सवमूर्ती विसावा घेते ती ही जागा. आपले हात येथे आपोआप जोडले जातात. मन विनम्र होते.

श्रीनारायणस्वामी समाधिनंदात मग्न असताना श्री नरसिंह सरस्वती स्वामी महाराजांनी स्वतः येऊन त्यांच्या मुलींची सेवा केली. केवढे तपाचरण! हीच पहिली घाटावरील वंदनीय व्यक्ती. श्रीदत्तात्रयांच्या दरबारातील एक अमोल रत्न. प. पू. श्रीगुळवणीमहाराजांच्या घरी कुडूत्रीला श्रीनारायणस्वामीमहाराज आजोबांना कृपाप्रसाद देऊन गेले आहेत. प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या दैवी संपत्तीत अशा थोर सत्पुरुषांच्या आंशीर्वादाची भर पडलेली आहे.

श्रीनारायणस्वामी समाधिस्थ झाल्यावर दुःखाने व्याकुळ झालेले व आता आम्ही काय करावे असे विचारणारे गुरुभक्त श्रीगोपाळस्वामींची समाधी घाटावर आहे. वाडीच्या नित्य पाठात गोपाळस्वामींचे पुढील पद आहे व वाडीला हे पद पालखीच्या वेळी गायिलेही जाते. या पदाचे शब्दच मनाला संवेदना देणारे असे आहेत.

कवणा ठाया जावे । कवणा ते स्मरावे ।
कैसे काय काय करावे । कवण्या परि मी रहावे ।
कवण येऊन कुरुंदवाडी । स्वामी ते मिळवावे ।

गुरुदेव श्रीनारायणस्वामी हा देह सोडून गेले. आता आमचे काय? कोण सांगणार आम्हाला? आम्ही कसे वागावे, कसे बोलावे? अशी विनवणी चालली असताना त्यांच्या प्रार्थनेने कळवळलेले, दयाघनप्रभू श्रीपाद श्रीवल्लभ हे आले. त्यांनी श्री. गोपाळस्वामींना धीर दिला. तेसुद्धा या तपोभूमीतच विसावले. आपली परम पुण्याई येथे ठेवून गेले.

❖

श्रीमौनीस्वामी

वाडीच्या या दरबारात श्रीमौनीस्वामी हा एक अमोलिक हिरा तपोतेजाने पावन करीत होता. ते प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती यांना गुरुस्थानी मानीत होते. या स्वामींनी बारा वर्षे मौन पाळले होते, म्हणून त्यांना मौनीस्वामी म्हणत असत. प. पू. श्रीदत्तमहाराजांचे आजोबा प. पू. श्रीवक्रतुंड महाराज हे त्यांची शिष्याप्रमाणे सेवा

करीत असत. या मौनीस्वामींची कृपा कवीश्वर घराण्यावर फार होती. त्यांच्याजवळ असलेला सोटा आजही प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या पूजेत आहे. मौनीस्वामींनी वाडीत वास्तव्य केले. अनेकांना मार्गदर्शन केले. प. पू. श्रीवक्रतुंड महाराजांचे **भारत** आवडीने ऐकले. आपल्या पुण्याईची धनदौलत येथे ठेवून तेही या ठिकाणीच विसावले.



प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामी

'दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा' या महामंत्राचा उद्घोष ज्यांनी आपल्या जीवनात सतत केला व इतरांना करावयास सांगितला ते स्वामीमहाराज श्री वासुदेवानंद सरस्वती येथे बराच काळ राहिले. त्यांनी अनेक शिष्यगण तयार केले. घाटाखाली ही कृष्णामाई जशी सतत वाहत आहे, आपले जीवन इतरांसाठी समर्पित करीत आहे, तसेच या अनेक जीवनमुक्तांनी या दत्तदरबारी आपले जीवन देऊन अनेकांना खऱ्या अर्थाने जीवदान दिले. हा वाहणारा ओघ आजही सतत चालू आहे. भक्ती, ज्ञान व कर्म या त्रयीचा हा झरा अखंड झुळझुळत आहे. साक्षात श्री दत्तप्रभूंचे वास्तव्य येथे अमूर्तरूपाने असल्यामुळे हा वाहता ओघ चालूच राहणार आहे.

प. प. श्रीटेंबेस्वामीमहाराजांनी सतत भक्ती व परिश्रम करून हा ओघ फार दूरवर नेला. भारतभर पसरविला. या स्वामींच्या मठात गेले, दर्शन घेतले की अनेक गोष्टी डोळ्यांपुढे साकार होऊं लागतात. स्वामींची पावले या परिसरांत फिरली. भिक्षा मागितली. खरेच, वाडीचे हे फार मोठे सौभाग्य!

माणगावी जन्म घेऊन धर्मप्रसारासाठी भारतभ्रमण करणारे, श्रीशंकराचार्यानंतर दत्तात्रेयांचे चौथे अवतार असे श्रीवासुदेवानंदांना मानले जाते. यात्रा, पदे, आरत्या, भजने, स्तोत्रे, श्रीगुरुचरित्र अशी किती तरी वाङ्मयसेवा त्यांनी केली. प. पू. श्रीगुळवणीमहाराज, दीक्षित स्वामीमहाराज, रंगावधूत महाराज, नानामहाराज तराणेकर अशी एकापेक्षा एक सरस शिष्यमालिका आपल्यासारख्या सामान्य जनांना मार्गदर्शन करण्याकरिता उभी केली. असे हे महान दत्तभक्त या वाडीक्षेत्रीच राहिले. वैराग्य, विवेक, ज्ञानभक्ती, संस्कृत अध्ययन या सर्वच बाबतीत स्वामीमहाराजांची कीर्ती दिंगत होतीच, पण साक्षात दत्तप्रभू त्यांचेजवळ राहण्यास उत्सुक होते. हा सर्व वारसा आपल्यापर्यंत आणून पोचविण्याचे काम प. पू. श्रीगुळवणीमहाराजांनी केले. आता पं. पू. श्रीदत्तमहाराज करीत आहेत. प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती येथून जाताना त्यांनी प. प. श्रीदीक्षितस्वामी महाराजांची नियुक्ती केली. प. प. श्रीवासुदेवानंदाचे मन दत्ताच्या अनुज्ञेशिवाय एकही गोष्ट करीत नसे आणि श्रीदीक्षित स्वामींचे मन गुरुआज्ञेत मग्न असे. सारांश अशा अनेक वंदनीय विभूती या घाटावर जागृत आहेत.

प. प. श्रीदीक्षितस्वामी

प. प. श्रीदीक्षितस्वामी महाराज यांच्या सहवासात श्रीदत्तमहाराजांचे बालपण गेले. श्रीदीक्षितस्वामी महाराज हे श्रीवासुदेवांनदसरस्वती टेंबे स्वामीमहाराज यांचे शिष्य होते. त्यांचा अधिकार फार मोठा होता. नरसोबाच्या वाडीच्या मंदिरासमोर औरवाड म्हणून एक छोटेसे खेडेगाव आहे. त्या ठिकाणी स्वामी महाराजांच्या पादुका आहेत. तेथे दरवर्षी उत्सव होतो. कृष्णेच्या ऐल तटावर हे अमरेश्वर जेथे स्वामी महाराजांच्या पादुका, तर पैल तटावर श्रीनृसिंहसरस्वती स्वामीमहाराजांचे पवित्र वास्तव्य, अशा ह्या महन्मंगल ठिकाणी श्रीदत्तमहाराजांचे बालपण गेले.

श्रीनृसिंहसरस्वती स्वामी दर्शन

श्रीदीक्षित स्वामीमहाराज यांचे पूर्वज नृसिंहवाडीच्या दक्षिणेस **शंकरापूर** नावाचे एक ठिकाण आहे तेथे राहत असत. ह्या पूर्वजांनी यज्ञयाग केल्याने त्यांना 'दीक्षित' ही उपाधी मिळाली. हे पूर्वज एकनिष्ठ दत्तभक्त होते. दर शनिवारी भल्या पहाटे ते उठत असत. आपल्या घरून दत्तनामाचा मुखाने उद्घोष करीत करीतच बाहेर पडत. वाटेत कुठेही विश्रांतीसाठी थांबत नसत. अशारीतीने अनवाणी सुमारे नऊ मैलांची पायपीट करून ते श्रीनरसोबाच्या वाडीस पोहोचत. अशी शनिवारी व दर पौर्णिमेस श्रीदत्तदर्शनाची त्यांची वारी होती ती कधीही त्यांनी चुकवली नाही. असे करता करता कालांतराने त्यांचे शरीर थकले, पण वारी काही चुकली नाही. एकदा उन्हाळ्याचे ते असेच वारीसाठी निघाले होते. तापदायक उन्हाने आणि नऊ मैल अनवाणी चालल्याने ते फारच थकले. कृष्णा-पंचगंगा संगमावर स्नान करून पुढे जावे म्हणजे थोडी तरतरी येईल असे त्यांना वाटले. आपल्या ह्या थोर भक्ताची श्रीनृसिंहसरस्वतींना करूणा आली. त्यांनी ब्राह्मणाच्या स्वरूपात त्यांच्यापुढे प्रगट होऊन विचारले, 'काय हो दीक्षित, घाटावर स्नान न करता दर्शनास येण्याचे कसे काय करता?' त्यावर दीक्षित म्हणाले, मी पुन्हा घाटावर स्नान करणारच आहे. पण उन्हाचे चालून थकवा आल्याने मी येथे स्नान केले. त्यावर त्या ब्राह्मणस्वरूपी श्रीनृसिंहसरस्वती स्वामींनी विचारले, 'ऐवढे शरीर थकले आहे तुमचे वयही झालेय तर श्रीदर्शनाची वारी तरी कशाला करता?' त्यावर दीक्षित म्हणाले, 'जोवर शरीर स्वाधीन आहे तोवर श्रीदर्शन-वारी होणारच. एकदा का हे शरीर पार थकले की मग दर्शन कसे मिळणार' त्यांची दृढ श्रद्धा पाहून श्रीनृसिंहसरस्वती प्रगट झाले आणि पाण्यातून तीन गोटे काढून त्यांना दिले आणि आशीर्वाद देत म्हणाले, 'आता यापुढे वाडीला दर्शनास येऊ नका. ह्या तीन गोट्यांचे दर्शन घ्या. तुमच्या भक्तीचे फळ म्हणून श्रीदत्त भक्त स्वरुपात प्रकट होतील!' असे म्हणून ते गुप्त झाले. ह्या दीक्षितांपैकी एक दाम्पत्य श्रीनृसिंहवाडीस येऊन राहिले. ह्या वंशजापैकी एक श्री.

लक्ष्मणशास्त्री व त्यांची प्रतिव्रता पत्नी अहिल्याबाई हे दीक्षितस्वामींचे आई वडील होते. श्रीदत्तमूर्तीपुढे भजने-कीर्तन करणे हा श्री. लक्ष्मणशास्त्रींचा आवडता छंद. अहिल्याबाई श्रीप्रदक्षिणा घालीत. श्रीगुरुचरित्र ऐकत असत. कितीही माधुकरी आले तरी त्यांना अन्न वाढायला त्या कधी कंटाळा करीत नसत.

आपले वरदान पुरे करण्यासाठी श्रीदत्तप्रभूंनी त्यांच्या घराण्यात जन्म घेतला. चैत्र शुद्ध प्रतिपदा शके १७८८ ह्या दिवशी दीक्षितस्वामी ह्यांचा जन्म झाला. त्यांचे नाव नारायण असे होते. वडिलांनी त्यांच्यावर यथोचित संस्कार केले. आठव्या वर्षी मौजीबंधन केले. नारायणाचे सर्व शिक्षण त्यांच्या मावशीकडे झाले. ते इंग्रजी शाळेत जाऊ लागले, तेव्हा त्यांचा पोषाख अव्वल इंग्रजांसारखा होता. इंग्रजीत ५ व्या इयत्तेत परीटघडीचा शर्ट, त्यावर जाकीट व पाटलोण असा त्यांचा वेष होता. शेल्याचे घड्याळ ते वापरीत असत, शेंडीला घेरा होता. त्यांच्या वडिलांचे श्री. शंकरशास्त्री नावाचे एक स्नेही होते. त्यांनी त्यांना ह्या पोषाखात पाहिले, तेव्हा ते त्यांना म्हणाले, 'बाळ, तुझे वडील सनातन धर्माचे व श्रीदत्ताचे कट्टर भक्त आहेत आणि तू त्यांचा मुलगा साहेबी थाटात असतोस हे काही ठीक दिसत नाही. तुमच्या दीक्षित कुळाची कीर्ती अशाने कलंकित होईल' नारायणासारख्या तेजस्वी बुद्धी असलेल्या या मुलाला एवढा शब्दांचा अंकुश पुरेसा झाला. आपल्या कुळाची अपकीर्ती करण्याकरिता आपण जन्मास आलेलो नाही याची जाणीव त्यांना ताबडतोब झाली. 'त्यांनी तत्क्षणी ते साहेबी कपडे फेकून दिले. एवढेच नव्हे तर इंग्रजी पुस्तकेही फेकून दिली, घड्याळ काढून टाकले. हे सर्व पाहून श्री. शंकरशास्त्री एकदम चकितच झाले व त्याला म्हणाले, अरे बाबा, हे तू काय केलेस? तुझे वडील ह्यामुळे रागावणार नाहीत का?' छे, छे, आपला हा मानव देह तपश्चर्येसाठीच असतो!' छोट्या नारायणाने मोठ्या माणसासारखे उत्तर दिले.

ह्या प्रकारानंतर नारायणामध्ये खूपच परिवर्तन झाले. जणू त्यांना काहीतरी निमित्तच हवे होते व ते मिळालेही. त्यानंतर ते स्वतः खूप विरक्तवृत्तीने वागावयास लागले. परंतु घरी त्यांची धर्म-पत्नी वाराणसी होती. तिला यांचे वैराग्य कसे पेलणार? ध्येयवादी माणसांच्या पत्नींना खरोखरच आपल्या मनाला मुरड घालावी लागते. सर्वसामान्य गृहिणीच्या दृष्टीकोनातून ही एक कठोर कसोटी असते. नारायणांनी शास्त्रशाळेत नांव घातले व शास्त्राध्ययन केले. बुद्धी फार तीक्ष्ण असल्यामुळे गुरुजी नारायणावर फार खूष होते. साहजिकच नारायण शास्त्रव्युत्पन्न झाला. पण हे सारे आत्मसात करूनही भगवदभक्ती व ईश्वरसेवेचे महत्त्व त्यांना फार वाटू लागले. एकान्तात एकनाथी भागवत व वेदेश्वरी ग्रंथाचा त्यांनी फार अभ्यास केला.

नारायण शास्त्रव्युत्पन्न झाले होते. शिवाय अभ्यासाने मनावर त्यांनी कमालीचा संयम मिळविला होता. एकदा ते जेवावयास बसले होते. त्यांच्या बहिणीने अजाणता त्यांना दोडक्याची भाजी वाढली. ती त्यांनी खाल्ली म्हणून आणखी तिने वाढली. तीही त्यांनी खाल्ली. त्यानंतर काही वेळाने बहीण जेवावयास बसली. तेव्हा तिला ती भाजी कडू आहे हे कळले. तिला फार वाईट वाटले. ती भावाला कळवळून म्हणाली, 'अरे दादा तू ही इतकी कडू भाजी कशी काय खाल्लीस? पुन्हा वाढताना तरी सांगायचे की नाही?' 'अग तू इतक्या प्रेमाने वाढलीस, तर मी कसा बरे त्याचा अव्हेर करू?' असे नारायणाने उत्तर दिले.

नारायणाच्या आकस्मिक झालेल्या परिवर्तनातील दोन गोष्टी महत्त्वाच्या वाटतात. व्युत्पन्न पंडित होऊनही त्यांना भक्तिभाव जवळचा वाटला. ईशसेवेला त्यांच्या मनात एक वेगळेच स्थान मिळाले. नारायणाचे हे सर्व आचरण पाहून त्यांच्या वडिलांना-लक्ष्मणशास्त्री यांना फार आनंद झाला. योग्य सद्गुरू मुलाला मिळावा म्हणजे त्याच्या जीवनाचे सार्थक होईल असे त्यांना वाटू लागले. त्यादृष्टीने ते विचार करू लागले.

सदगुरुंची भेट

त्यावेळी वाडीला महान दत्तभक्त श्री टेंबेस्वामी येत असत. तेच आपल्या मुलाला सन्मार्ग दाखवतील असे लक्ष्मणशास्त्र्यांना वाटले. एके वर्षी श्री. वासुदेवशास्त्री टेंबेस्वामी आपल्या पत्नीसह वाडीस आले होते. तेव्हा आपल्या मनातील ही इच्छा लक्ष्मणशास्त्र्यांनी श्रीसद्गुरू टेंबेस्वामीमहाराजांपाशी बोलून दाखवली. आश्चर्य म्हणजे टेंबेस्वामींनीही ती तात्काळ मान्य केली. श्री. लक्ष्मणशास्त्र्यांनी मुलाला बोलावून सांगितले की, 'तुझी परमेश्वराकडे वळणारी वृत्ती, चित्ताला उत्पन्न झालेले वैराग्य या सर्वांचा उपयोग आत्मज्ञानासाठी करून घेण्याचे सामर्थ्य श्रीवासुदेवशास्त्रींमध्ये आहे. तेव्हा तू त्यांना मनोमन शरण जा. त्यांच्यावर श्रद्धा ठेव व आपली प्रगती करून घे!' नारायणाला याआधीच श्रीटेंबेस्वामींचा अधिकार पटला होता. त्यांनी वडिलांचे म्हणणे मान्य केले. त्याप्रमाणे गुरूपत्नी व गुरूदेव यांच्या सेवेत नारायण मोठ्या आनंदाने, जिज्ञासेने व निष्ठेने राहू लागला.

श्री ज्ञानेश्वरीच्या तेराव्या अध्यायातील गुरूभक्तीप्रमाणे नारायणाचे जीवन सुरु झाले. श्री वासुदेवशास्त्री पुढे वासुदेवानंद सरस्वती झाले आणि त्यानंतर लोक त्यांना 'वासुदेवदत्त' म्हणू लागले. श्रीवासुदेवानंद सरस्वती हे कर्मनिष्ठ होते. कर्माशिवाय मनःशुद्धी होत नाही, मनःशुद्धी झाल्याशिवाय खरी ईश्वरभक्ती साधत नाही, आत्मज्ञान व्हायलादेखील मनःशुद्धीची फार जरुरी असते, असे त्यांचे ज्ञानमार्गातले पाठ होते.

श्री नारायणाने वेदेश्वरी या ज्ञानप्रधान ग्रंथाचा अभ्यास केला होता. हे कळल्यावर स्वामीमहाराजांनी नारायणाला एकदा विचारले, 'वेदेश्वरी या ग्रंथाचा तुझ्यावर काय परिणाम झाला?' नारायणाने उत्तर दिले, 'या ग्रंथात ईश्वर तेवढा खरा आहे व त्यावर आधारित जग हे खोटे आहे! (ब्रह्म सत्य जगन् मिथ्या) अशा या परमेश्वराची प्राप्ती सद्गुरूकृपेने होते. गुरूसेवा व गुरूभक्ती करावी असे माझे मत झाले आहे!'

भक्तियोग व ज्ञानयोग हे आत्मज्ञानाकरिता अधिक महत्वाचे योग आहेत, असे नारायणाला वाटत होते. पण स्वामीमहाराजांनी त्याला कर्मयोगाचे महत्त्व पटवून दिले. स्वामी म्हणाले, 'आत्मचिंतनाची गोडी निर्माण व्हावी लागते व ती लागण्यासाठी स्वधर्माचरण करावे लागते. ज्ञानमार्गाने अज्ञान नाहीसे होत असले तरी ते ज्ञान उत्पन्न होण्यासाठी विवेक-वैराग्य-शम-दम हे सारे लागते. स्वच्छ बुद्धीतच ज्ञान राहते. भक्तियोग-कर्मयोग-ज्ञानयोग हे एकमेकांना पूरकच आहेत!'

ईश्वरप्राप्तीसाठी कर्म कसे करावे हेही स्वामींनी नारायणाला समजावून सांगितले. शिवाय तू गृहस्थाश्रमी आहेस, तेव्हा गृहस्थाप्रमाणेच तू आचरण कर, असेही सांगितले. इतकेच नव्हे, तर संध्या, पूजा, ब्रह्मयज्ञ, वैश्वदेव वगैरे कर्म शुद्ध कसे करावे हेही शिकविले. विष्णुसहस्रनाम, गीता, स्वशाखेचे उपनिषद् शिकविले. स्मार्ताग्नीची उपासना त्यांनी सुरु केली व सर्व तयारी करून घेतल्यावर 'लघु वासुदेव नमन' हा वेदान्ताचा ग्रंथ समजावून सांगितला. श्रीदत्ताची सगुणोपासना करावयास सांगितली.

दत्त ह्या शब्दाचा अर्थ-रहस्य. स्वामीमहाराज जेव्हा सांगू लागले त्यावेळी स्वामीमहाराजांना दत्तभक्तिने भरून आले. ते प्रेमभावाने सद्गदित झाले. सामान्य माणसाला हा भक्तिमार्ग कठिण आहे. आकर्षण वाटते ते एवढ्याचकरता की परमेश्वराबद्दलचा थोडा तरी भावनेचा ओलावा मनात निर्माण व्हावा! यथासांग ते कर्म काही घडेना अशी स्थिती होते. 'खरा तो एकचि धर्म जगाला प्रेम अर्पावे' हे कै. साने गुरूजींचे गाणे मनाला पटते ते एवढ्याचकरिता!

एवढ्यावरच स्वामीमहाराज थांबले नाहीत. त्यांनी आपल्या या तीव्र, कुशाग्र बुद्धीच्या, ईश्वरभेटीसाठी तळमळणाऱ्या शिष्याला अलिंगन दिले व गुरूशिष्य एकरूप झाले. आत्मानंदात निमग्न झाले.

नारायणाचा गृहस्थाश्रम

आता नारायण घरी राहून व्यवस्थित संसार करू लागले. वृत्ती मात्र अनासक्त होती. त्यांची वडिलोपार्जित शेतीवाडी होती. तिचे उत्पन्न त्यांना येत असे. पण श्री नारायणरावांना वाटू लागले, की आपण हे उत्पन्न घेऊ नये. आपल्या स्वतःच्या

कष्टाने जे काही मिळेल त्यावर उपजीविका करावी. मन निश्चयी नव्हते. याबाबत त्यांनी अखेरीस श्रीगुरूमहाराजांना विचारावयाचे ठरविले. त्याप्रमाणे पत्र पाठविले. श्रीगुरूमहाराजांनी उत्तर पाठविले की वडिलोपार्जित धनदौलत नको असे वाटते ते ठीक आहे. भिक्षेवर चरितार्थ चालवताना लोक तुम्हाला हसतील. ते सोसण्याची तयारी हवी. प्रथम हसलेले लोक पुढे स्तुतीही करतील. दोन्हीही समान मानण्याची तयारी हवी. श्रीदीक्षितस्वामींना ते पटले. त्यांनी कोरडी भिक्षा रोज मागून आणून ती पत्नीच्या स्वाधीन ते करू लागले. त्यावेळी त्यांच्या घरी रोज कोणी ना कोणी अतिथी येत असत. श्रीदीक्षितस्वामींनी जेवणासाठी ताट पुढे घेतले, की अचानक कोणी अतिथी येई. दारात उभा राही. मग तेच ताट स्वामी अतिथीला देत आपण उपाशी राहत. असे एकदा ओळीने दहा दिवस घडले. श्रीदीक्षितस्वामी परीक्षेत उतरले. **त्यांची श्रद्धा देव येथे येतो व जेवून जातो** अशीच होती. या भावनेमुळे मला वाटते, दीक्षितस्वामींची क्षुधाही आपले काम विसरली. तृप्त झाली.

गुरूदेव सांगतील तसे आचरण दीक्षितस्वामींचे होते. ते गुरुशब्दाचे पालन तंतोतंत करीत असत. त्यांची काही व्रते कठीण असून गुरुमहाराजांच्या आज्ञेप्रमाणे त्यांनी ती आचरली होती.

१) खाल्लेल्या अन्नाला नावे न ठेवणे. थोडे बोलणे पण खरे बोलणे व तेही हितकारी बोलणे.
२) कोणत्याही स्त्रीला पाहून मनात कामवासना येऊ न देणे.
३) योजनाचे आतच राहणे. स्नान, शौच, भिक्षेशिवाय आपला मठ न सोडणे.
४) चालताना किंवा बसले असता १६ हातापेक्षा अधिक दूरवर दृष्टी जाऊ न देणे.
५) लोकांचे चांगले किंवा वाईट भाषण ऐकूनदेखील त्याचा कोणताच परिणाम मनावर न होऊ देणे.
६) विषयसन्निध असतादेखील त्याची इच्छा न धरणे.

ही सहा लक्षणे श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामींजवळ होती. त्याच साही लक्षणांचा अंगीकार श्री. दीक्षितस्वामींनी केला. इतकेच काय, ती लक्षणे त्यांचा सहजस्वभाव बनला आणि सरतेशेवटी त्यांची **निर्विकल्प समाधी** लागू लागली. जीवनात जे काय साधायचे ते साधले जाऊ लागले.

वाडीत ब्रह्मानंदस्वामींच्या मठात संस्कृत पाठशाळा होती. तेथे बाहेरची व पुजाऱ्यांची मुले होती. त्यांना श्रीदीक्षितस्वामींनी रोज काही शिकविण्यास सुरवात केली. भजन, सायंकाळची आरती मोठ्या प्रेमाने होई. मुलांच्या मनावर सुसंस्कार करण्याचे त्यांनी ठरविले. वाडीत अनेक उत्सव त्यांनी सुरू केले. त्यासाठी या बाळगोपाळांनाच हाताशी धरले. पंच महायज्ञ, स्नान, संध्या वगैरे ब्रह्मकर्म ते त्यांचेकडून करवून घेत. प. प. श्रीवासुदेवानंदांनी केलेली दत्तपंचपदी म्हणवून घेत.

वारांची पदे, आरत्या, स्तोत्रे व रात्री भजन ते मुलांकडून म्हणवून घेत असत. वाडीमध्ये राहून अखंड दत्तचिंतन म्हणजेच गुरूमहाराजांचे स्मरण, स्वावलंबन, उत्सवमूर्तींची सेवा, असा कार्यक्रम रोज चालू असे.

संन्यासदीक्षा

वाडीगावात **प्लेगची** साथ आली. या साथीत सापडून दीक्षितस्वामींच्या पत्नी वाराणसी व मुलगा राम या उभयतांचे निधन झाले. एवढेच नव्हे तर श्रीदीक्षितस्वामींनाही प्लेगची लागण झाली. यातून आपण गुरूकृपेने वाचलो. आता ईश्वराने प्रपंचातूनही मुक्त केले आहे, तर संन्यास घ्यावा असे त्यांना वाटले. पत्नीचे व मुलाचे दुःख त्यांनी सहजतेने सोसले. आपणही आपल्या जीवनाचे आपल्या वडिलांप्रमाणे सार्थक करून घ्यावे असे त्यांनी ठरविले. त्यासाठी श्रीदीक्षितस्वामींनी वयाच्या अवघ्या **३८** व्या वर्षी संन्यास घेतला. हा संन्यास त्यांनी पत्नीचे क्रियाकर्मांतर आटोपल्यावर दुसऱ्या दिवशी म्हणजे **१४** व्या दिवशी घेतला. वास्तविक ते विरक्त झाले होते. मी देह हा अहंकारही त्यांचा गेला होता. तरीसुद्धा त्यांना वाटत होते, महावाक्याचा बोध, तू ब्रह्म आहेस असा पहावयाचा बोध पटवून घेण्याचा अधिकारी होण्यास आपण शास्त्राधाराने संन्यास घेणे योग्य आहे. ही संन्यास-दीक्षा कुरुंदवाड येथे **श्रीदत्तंभटजी** नावाचे एक तपस्वी ब्राह्मण होते. त्यांचेकडून त्यांनी घेतली. **पूर्वाश्रमीच्या नारायणाने** भगवी कौपीन व छाटी परिधान करून हाती कमंडलू घेतला. कपाळी व सर्वांगाला भस्माचे त्रिपुंड लावले. संन्यासाचा दंड मात्र घेतला नाही. हा दंड आपले स्वामीमहाराज श्रीवासुदेवानंद सरस्वती यांच्याकडून घ्यावयचा असे त्यांनी ठरविले. वाडीत राहून भक्तिमार्गाने ईश्वराशी प्रेम साधीत ते कालक्रमणा करू लागले.

विवेक-वैराग्य अंगी बाणले होते. मी एक साक्षी आहे हा बोध त्यांना पटला होता. पण तेवढ्याने त्यांचे समाधान होईना. मी साक्षी या बोधाच्या पलीकडे जे जाणावयाचे आहे ते केवळ जाणणेच आहे, ज्ञानच आहे, जाणीवच आहे व ते स्वसंवेद्य असे आहे. ते आपल्या प्रयत्नांनी मिळणारे नाही. म्हणून संन्यास घेऊनसुद्धा ते तळमळत राहिले. गुरूवाचून बोध नाही. यासाठी गुरूमहाराज जिकडे असतील तिकडे जाण्यास ते तयार झाले.

स्वसंवेद्य जाणीव सर्व जगात भरलेली आहे. श्रीदीक्षितस्वामींना लागलेली ही तळमळ श्रीसद्गुरू वासुदेवानंदांना कळणारच. तेही त्याच तळमळीने निघाले. दोघांची भेट झाली. भेटल्याबरोबर लगेच श्रीदीक्षितस्वामींनी सांगितले की, ''आपल्या हातून दंड घेण्याची माझी इच्छा आहे.'' श्रीवासुदेवानंदांनी ती तात्काळ मान्य केली नाही. 'आम्ही वाडीला परत येत आहोत, तेव्हा पाहू. श्रीदत्त आपल्या मनातील हेतू पूर्ण करील!'' असे म्हणून वाडीला त्यांना परत पाठवून दिले.

प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वतःही दंडधारी यती झाल्यावर शके १८२६ फाल्गुन शुद्ध द्वादशी या दिवशी वाडीत आले. त्यावेळी सर्व वाडीकर मंडळींना फ़ारच आनंद झाला. श्रीदीक्षितस्वामींच्या आनंदाला तर सीमा राहिली नाही. आपणांस आता स्वामींकडून दंड मिळेल असे त्यांना वाटू लागले. तोच स्वामी म्हणाले, ''श्रीदत्तमहाराजांनी अजून मला परवानगी दिली नाही. ती दिली तर मी तुम्हाला दंड देईन!'' हे ऐकून श्रीदीक्षित स्वामींनी फार वाईट वाटले. त्यानी एका पुजाऱ्यामार्फत स्वामीमहाराजांकडे सांगून पाहाण्याचा प्रयत्न केला. त्यावर दत्तमहाराज सांगत नाहीत तोपर्यंत मी दंड देणार नाही असे उत्तर मिळाले. श्रीदीक्षितस्वामींची अतिशय निराशा झाली. ज्याअर्थी दत्तमहाराज स्वामीमहाराजांना आपल्याला दंड देण्याबद्दल सांगत नाहीत त्या अर्थी आपण त्यांच्या कृपेला पात्र झालो नाही. काहीतरी नक्कीच आपल्यात न्यून आहे, असे म्हणून ते देवाजवळ सतत बसून राहिले, खाणेपिणे सारे सोडले. डोळ्यांतून सारखा अश्रुपात सुरु होता. मनाची अवस्था फार केविलवाणी झाली होती. खरे पाहता स्वामींच्यात काय कमी होते? वैराग्य होते,. विवेक होता, ते साधनचतुष्ट्य संपन्न होते, गुरुभक्ती होती, सारे काही होते. तरीही त्यांची कठोर परीक्षा चालू होती. शेवटी स्वामीमहाराजांना श्रीदत्तमहाराजांची आज्ञा झाली. स्वामी महाराजांकडून यथाशास्त्र दंड त्यांनी धारण केला.

पूर्ण ब्रह्मज्ञानी होणे हे सर्व जग ज्या सत्तेवर चालू आहे, तीच सत्ता आपण आहो हे जाणणे, आनंदरुप होऊन राहणे, त्या प्रकाशात जगाकरिता वावरणे. या जगात सत्धर्माचा प्रचार करणे, सत्प्रवृत्ती निर्माण करणे, ईश्वराविषयी श्रध्दा निर्माण करणे या गोष्टीकरिता जीवन व्यतीत करणे, एवढाच कार्यभाग श्रीमद् वासुदेवानंद सरस्वतींचा उरला होता. आता श्रीदीक्षितस्वामीमहाराज गुरुदेवांसारखेच झाले होते. त्यामुळे गुरुशिष्य एकरुप झाले.

श्रीदीक्षितस्वामीमहाराजांची सर्वात आवडीची गोष्ट राहिली ती म्हणजे गुरुभक्ती. आत्मरुप प्राप्त झाल्यावर उरते काय तर गुरुभक्ती. त्याला ज्ञानोत्तर भक्ती म्हटली जाते. श्रीज्ञानेश्वरांनी म्हटलेच आहे. 'व्दैत न मोडता केले आपणा ऐसे अर्जुन।' त्याप्रमाणे वाडीमधे फक्त आपल्या गुरुदेवांचेच महत्त्व असावे असे त्यांना वाटू लागले. आपले येथे काही राहू नये असेही श्रीदीक्षितस्वामींना वाटत असे. त्यानंतर तीन-चारवेळा स्वामी महाराज वाडीला आले ते श्रीदीक्षितस्वामी महाराजांकरिताच. वाडीमधे त्यांनी पुजाऱ्यांना दोन गोष्टी सांगितल्या. श्रीदीक्षितस्वामीमहाराजांची आज्ञा पाळा. ते सांगतील ते योग्यच सांगतील. इतकेच काय पण त्यांनी तसे पुजाऱ्याकडून लिहून घेतले होते. श्रीदीक्षितस्वामींना सांगितले, की वाडीमधे श्रीदत्ताची सेवा तुम्ही करता ती मला पोचते. तशीच सेवा तुम्ही निरंतर करीत रहा.

उत्सवमूर्तींची सेवा श्रीदीक्षितमहाराज करीत असत. पालखीची तिसरी प्रदक्षिणा झाली की वेदघोष होई. त्यानंतर मूर्ती नारायणस्वामींचे मंदीरात येई. तोपर्यंत स्वारीची

बसायची जागा झाडून सारवून स्वच्छ होई. स्वारी आली की श्रीदीक्षितस्वामींना ती दमली आहे असे वाटे. तिची आता किती सेवा करावी असे त्यांना होई. दुसरे स्वच्छ कपडे, उपरणे ते नेसवत. गंधलेपन करीत, बासुंदीसारख्या गोड मधुर पदार्थाचा नैवेद्य दाखवीत. फुलांच्या माळा घालीत. धूप-दीप लावीत आणि तल्लीनतेने भक्तीची पदे म्हणत असत.

जय जय श्रीमद् गुरुवर देवाधिदेवा ।
पंचारती हे चरणी, घडवी मजसेवा ।। जयदेव जयदेव.

ही आरती अगदी मन:पूर्वक म्हणत. रात्री शेजारती म्हणून छाटी पांघरायला घालीत.

संस्कृत पाठशाळा

प. प. श्रीदीक्षितस्वामी महाराजांचे आणखी मोठे कार्य म्हणजे श्रीमद् वासुदेवानंदांनी काढलेली संस्कृत पाठशाळा. आध्यापक होते वे. शा. सं. श्री धुंडीराजशास्त्री कवींश्वर व अध्यक्ष होते प. पं. श्रीदीक्षितस्वामी महाराज.

वाडीतील मुलांना शिकविणे, त्यांच्याकडून वाडीतील वेगवेगळे उत्सव करुन घेणे, रामचंद्र योग्यांपासून सर्वांचे उत्सव दीक्षितस्वामी महाराज या मुलांच्याकडून नित्य करुन घेत. समाधीला रंगसफेती करणे, कथा-कीर्तन करणे, पूजा-अभिषेक करणे या साऱ्या गोष्टी मुलांकडून ते करवून घेत. वाडीचे वातावरण मोठे निर्मळ व पवित्र झाले होते. वाडी सोडू नये अशी गुरुदेवांची आज्ञा होती. त्यामुळे ते वाडीतच राहिले. येथे प. पू. श्रीदत्तमहाराजांची व त्यांची गाठ पडली. सहवास घडला. त्यांच्याबरोबर तीर्थयात्राही त्यांनी केल्या. पण त्या काही फार लांबच्या नव्हत्या. कृष्णा पंचगंगा या नद्यांच्या आजूबाजूच्या यात्रा त्यांनी केल्या. प. प. श्रीदीक्षितस्वामींचा बाळपणाचा सहवास हा प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या जीवनयात्रेचा एक फार मोठा महत्त्वाचा भाग आहे.

प. प. श्रीदीक्षितस्वामींना वाडी सोडू नका असे सांगितले होते. श्रीमद् वासुदेवानंदसरस्वतींची ही आज्ञा त्यांनी तंतोतंत पाळली. श्रीदीक्षितस्वामींचे गरुडेश्वरी जाणेही झाले नाही. श्री. वासुदेवानंद सरस्वती आजारी होते तरीदेखील इतर अनेक पुजाऱ्यांना दीक्षितस्वामींनी तिकडे पाठविले. बरे वाटण्याकरिता वाडीमधे पादुकांवर अनेक अनुष्ठाने केली, पण स्वत:चा जीव तळमळत असूनही ते जाऊ शकले नाहीत. कारण गुरु आज्ञा.

शृंगेरीपीठ शंकराचार्यांचे एक शिष्य ब्रह्मानंद हे जीवनमुक्तीचा अभ्यास करण्यासाठी, आत्मसुखाची प्राप्ती करुन घेण्यासाठी श्रीवासुदेवानंदांकडे आले होते. गरुडेश्वरी त्यांना वासुदेवानंदांनी आपला सहवास दिला. जीवनमुक्तीचे स्वरुप व

तिची साधने याबद्दल जितके सांगावयाचे तितके सांगितले. त्यांना म्हणाले, ''आपण नरसिंहवाडीला कधी गेला होतात काय? नसाल तर एकदा अवश्य जा. तेथे आम्ही सांगितलेला जीवनमुक्त पुरुष तुम्हाला प्रत्यक्ष पहावयास मिळेल. त्यांची योग्यता कोणी जाणू शकत नाही. आमच्यापेक्षा ते काकणभर सरस आहेत!'' स्वामी समाधिस्त झाल्यानंतर श्री. ब्रह्मानंदस्वामी तेथून निघाले. मृगाजीन व एक वही गुरुप्रसाद म्हणून प. प. श्रीदीक्षितस्वामींना वाहीली. आपल्या गुरुमहाराजांचा अखेरचा प्रसाद त्यांनी वंदनीय मानला. त्या मृगासनावर गुरुमहाराज बसले आहेत असे समजून ते मृगासन घालून ठेवून त्याला वंदन करुन ते आपले उर्वरित जीवन घालवू लागले.

अजोड गुरुप्रेम

प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामीमहाराज यांनी देह ठेवल्यानंतर गुरुविरहाचे दुःख दीक्षितस्वामींना जरी झाले तरी उर्वरित आयुष्य गुरुसेवेत घालवायचे, लोकांना आध्यात्मिक मार्गदर्शन करायचे, लोकांच्या अडीअडचणीत त्यांना मदत करायची, त्यांचे दुःख दूर करण्याचा प्रयत्न करायचा, वाडीच्या बाळगोपाळांना मार्गदर्शन करायचे, सुरु केलेला मुख्य उत्सव, प. प. श्रीवासुदेवानंदांची पुण्यतिथी उत्सव हा उत्तम तऱ्हेने साजरा करायचा, गुरुमहाराजांचा जन्मदिन व गुरुमहाराज संन्यास घेऊन पुन्हा प्रथम वाडीला आले, तो फाल्गुन वद्य व्दादशी हा दिवस मनोत्सव म्हणून ते साज़रा करीत असत. हे सारे चालू असताना केवळ गुरुमहाराजांची महती वाढावी एवढीच इच्छा होती.

प. प. श्रीनारायणस्वामींचा उत्सव चैत्र अमावस्येला होतो. त्यावेळी कथा-कीर्तनपुराण होते. यावेळी उत्सवमूर्ती (स्वारी) नारायणस्वामीं जवळ बसवतात. उचलून स्थानावर ठेवीत नाहीत. श्रीदीक्षितस्वामींचे मनात लगेच आले, की श्रीस्वामीमहाराजांच्या जन्मोत्सवात ही स्वारी आपल्या श्रीगुरुमहाराजांचे सन्निध राहावी. नारायणस्वामींच्या प्रमाणेच आपल्या श्री गुरुमहाराजांचा उत्सव व्हावा. ही उत्सवमूर्ती वासुदेवांच्याजवळच असावी. बाळगोपाळ मंडळींजवळ त्यांनी असे बोलून पाहिले. मुले म्हणाली, 'पुजारी म्हणतील अशी प्रथा नाही. मग प्रथेच्याविरुध्द आम्ही काही करणार नाही!' श्रीदीक्षितस्वामींना ते पटले.पण त्यांच्या मनात मात्र आपल्या श्रीगुरुमहाराजांजवळच उत्सवमूर्ती असावी, अशी ठाम इच्छा होती.

गुरूप्रेमाने अंतःकरण इतके भरल्यानंतर त्या तळमळीतून जे प्रेरित झाले तसेच घडून आले. त्यांनी देवाकडे जाऊन तशी प्रार्थना केली, काहीही करून ही गोष्ट घडावी. आपण जन्मोत्सवाचे उत्सवात श्रीगुरुमहाराजांजवळ असावे! ही प्रार्थना त्या सर्वात्मक ईश्वराला पोचली. श्रावणात जन्मोत्सवाचे आधी दोन दिवस खूप पाऊस

पडू लागला. जोराचा वारा सुटला सगळीकडे पाणीच पाणी झाले. श्री नारायणस्वामींचे मंदिरात पाणी आले. उत्सवमूर्तींला हलवावे लागले. उत्सवमूर्ती हल्ली श्रीवासुदेवानंदांचा जो मठ आहे तेथे आली. तेथे स्थानापन्न झाली. श्रीदीक्षितस्वामींना आनंद झाला. स्वामीमहाराजांच्या पादुकादिमूर्ती हे सर्व वरच्या माडीवर होते व तेथे उत्सव सुरू होता. श्रीदीक्षितस्वामींना वाटले, आता मूर्ती खाली तर आली. आता वरती कशी आणणार? पुजारी ऐकणार नाहीत. तोच मठात आणखी पाणी शिरले. मूर्तींच्या चौरंगापर्यंत-पाणी चढले. तेव्हा श्रीदीक्षितस्वामींनी सांगितले की मूर्ती पाण्यात कशी ठेवणार व पूजा कशी करणार? तरीही पुजाऱ्याचे मन द्रवले नाही. ते म्हणाले, ''चौरंगाखाली कळशा ठेवून आम्ही त्यावर चौरंग ठेवू. पण वरच्या माडीत उत्सवमूर्ती कधी आलेली नाही व येणारही नाही!'' इतके ठरवून रात्री सर्व मंडळी निघून गेली आणि इकडे पाणी वाढू लागले. सुरक्षितता कमी होऊ लागली. श्रीदीक्षितस्वामी श्रीपाद पुजाऱ्यांना म्हणाले, 'बघा! देवाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने काय करावयाचे ते तुम्ही ठरवा!' श्रीपाद्भटजी म्हणाले, ''पुजाऱ्यांचे व आपले दोघांचेही म्हणणे मला पटते. प्राणांताची वेळ आल्यावर जुनी प्रथा उराशी बाळगून कसे चालेल? काही हरकत नाही, आपण माडीवर उत्सवमूर्ती नेऊया!'' श्रावणातल्या पौर्णिमेच्या रात्री बारा वाजता उत्सवमूर्ती माडीवर आली. वाडीच्या प्रथेप्रमाणे प्रतिपदेपासून जन्मोत्सव सुरू झाला. अष्टमीपर्यंत रात्रंदिवस उत्सवमूर्ती श्री वासुदेवानंदांच्या पादुकांसह राहिली. श्रीदत्तप्रभूंनी उत्सव अशातऱ्हेने साजरा करून घेतला. श्रीदीक्षितस्वामींची इच्छा पूर्ण झाली.

उत्सवमूर्ती माडीवर गेल्यावर श्री दीक्षितस्वामींनी प्रार्थना केली. कृष्णामाईची ओटी भरली. त्यानंतर पाणी कमी कमी होऊ लागले. ओसरू लागले. गुरूभक्ती पुरी करून घेण्याकरिता निसर्गसुद्धा मदतीला धावून आला. ते तृप्त झाले. पण त्या दिवसापासून श्री दीक्षितस्वामींना वाटू लागले की, पुजारी आता यापुढे कोणतीच गोष्ट ऐकतील असे दिसत नाही. श्री गुरुमहाराज देहाने निघून गेल्यावर पुजाऱ्यांच्या वागण्यात जो फरक पडला त्याचा आघात श्रीदीक्षितस्वामींच्या मनावर जबरदस्त झाला. यापुढे पुजाऱ्यांशी विरोध नको म्हणून कृष्णेच्या पैलतीरावर औरवाड गावी श्री वासुदेवानंदांचे मंदिर बांधून तेथे उत्सव सुरू करण्याचे त्यांनी ठरविले.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे पुजारी हे आता पूर्वीचे राहिले नाहीत. त्यांचा स्वभाव व लोकांचा आपल्याकडे असलेला ओढा हा देखील एक विरोधाला कारणीभूत होणारा प्रसंग आहे. वाडी सोडू नये असे तर आपल्याला श्री गुरुमहाराजांचे सांगणे आहे. वाडीत यापुढे राहणे योग्य होणार नाही. शिवाय अनेकजण जवळ येऊ लागले आहेत हेही ठीक नाही. लोक चिकटता उपयोगी नाही. वाडीच्या पुजाऱ्याच्या तोंडातून तुम्ही येथून जा, असे उद्गार आल्याशिवाय येथून हालता येणार नाही.

वाडीचे पुजारी तसे म्हणाले की ती देवाची आज्ञा समजून आपल्याला वाडी सोडता येईल. याकरिता काय करावयाचे? फार कठीण असा मार्ग त्यांनी अवलंबिला. विपरीत वागणे सुरू केले. कोणाचे अंतःकरण न दुखविणारे स्वामी लोकांना तोडून बोलू लागले. साहजिकच लोक हळूहळू जवळ येईनासे झाले. उपवास सुरु केले. खोलीत एकांतात बसू लागले. मौन सुरु केले. ही तर योगचर्येची महत्त्वाची पायरी मानतात. त्यामुळे लोक बाजूला झालेच पण तरीही पुजाऱ्यांच्या तोंडून नाही काढणे कठीण. तेव्हा तोही प्रसंग त्यांनी मुद्दाम घडवून आणला.

एकदा एका पुजाऱ्याने विचारले, 'उत्सवमूर्तींच्या शयनारतीचीसेवा तुमच्याकडे आहे. तुम्ही तर औरवाडला मंदिर बांधणार आहात. मग ही शयनारती कोण करणार?' तेव्हा ते म्हणाले, 'उत्सवमूर्ती आम्ही घेऊन जाऊ. त्यातले बिंब आम्ही काढून घेऊ!' पुजाऱ्यांना ही बातमी समजली. एके दिवशी पालखीला उत्सवमूर्ती (स्वारी) गेल्यावर श्री नारायणस्वामींचे मंदिराला पुजाऱ्यांनी कुलूप ठोकले. श्रीदीक्षितस्वामींना वाटले, आता एवढ्यावर सोडून चालणार नाही. त्यांच्या तोंडून शब्द बाहेर काढले पाहिजेत, की तुम्ही येथून जा! म्हणून त्यांनी लळीत घडविले. ते तणातणा श्री नारायणस्वामींचे मंदिराशी गेले. दारावर जोरात धक्का दिला. कुलूप न काढताच दार उघडले गेले. त्यांनी रोजच्या प्रमाणे सर्व स्वच्छ करून स्वारी येण्याची वाट पहात बसले. पालखी झाल्यावर तीर्थ-अंगारा पुढे येतो. त्याप्रमाणे नेहमीचे पुजारी ते घेऊन आले. श्री नारायण स्वामींचे मंदिरात प्रथम थोडा अंगारा व दगडीत तीर्थ ओतले. श्रीदीक्षितस्वामींनी हात पुढे केला. पण तीर्थ दिले नाही. ते निमित्त करून दीक्षितस्वामींनी दगडी पुजाऱ्यांकडे फेकून मारली. जो प्रसंग अपेक्षित होता तो ओढवला. सारे पुजारी जमले. मोठा ओरडा झाला. पुजारी शेवटी स्वामींना म्हणाले "दीक्षितस्वामी, तुम्ही शयनारती करू नका एवढेच आम्ही म्हणत होतो. पण आता सांगतो, तुम्ही येथून जा. येथे राहू नका!" हे शब्द ऐकताच प. पू. श्रीदीक्षितस्वामींना हसू आले. आपले कार्य साध्य झाले असे त्यांना वाटले. मनात म्हणाले की वाडीच्या पुजाऱ्यांकडून जा म्हणवून घ्यायला मला फार कष्ट करावे लागले. उपासापासून सारे काही केले!

स्तुती व निंदा समान मानणे, त्याचा मनावर कोणताही परिणाम होऊ न देणे, ही एक गोष्ट झाली. दुसरे मुद्दाम निंदेला पात्र करून घेणे ही तर फारच अवघड गोष्ट झाली. संत ओळखणे खरोखरच कठीण. आपल्या सामान्य बुद्धीच्या फुटपट्टीने केलेले मोजमापन चुकीचे ठरणार हे नक्कीच!

वाडीचे उत्सव बंद न पडता त्यांनी ते औरवाडला सुरू केले. वाडी येथे आता उत्सव पुजारी करतीलच. औरवाडला मात्र आपण सुरू करून श्रीगूरूमहाराजांची कीर्ती सर्वत्र दूरवर नेली पाहिजे. ज्यायोगे मनुष्य स्वधर्माचरणी व नीतिमान होइल. हेच

आता आपले कार्य असे मानून त्यांनी औरवाडला श्री वासुदेवानंदांचे मंदिर स्थापन केले. या ठिकाणीच दरवर्षी गणपतीच्या वेळी भागवतसप्ताह सुरू केला. तोच प. पू. श्रीदत्तमहाराजांचा पहिला सेवाभावी भागवतसप्ताह.

प. प. श्रीदीक्षितस्वामी पुढे गरुडेश्वरला गेले. बरोबर बरीच मंडळी होती, अनेक भक्तांची कामे करीत करीत लोकांना बरोबर घेऊन ही गरुडेश्वर यात्रा झाली. या सर्व भक्तमंडळींना पुन्हा औरवाडला पोचवून मंदिराचे काम पुरे झालेले पाहून ते पुढील यात्रेला दोन-चार भक्तांबरोबर निघाले. अमरापूर ही काशी, औरवाड ही गया व संगम हा प्रयाग मानला. अशा यात्रेच्या वेळी प. पू. श्रीदत्तमहाराज बरोबर होते. प. पू. श्रीदत्तमहाराजांना स्वामींचा सहवास घडत होता.

लोकसंग्रह खूप केला. आत्मज्ञानी असे हे थोर संत होते. अशांची चरित्रेसुद्धा उपलब्ध होणे कठिण असते. काळाच्या वाळूवर या महामानवांची पावले ठसा अलगदपणे उमटून जातात. मानवतेचे हे पुजारी मानवत्वाचे शुचित्व टिकावे म्हणून सतत कार्यरत असतात. देहाने, मनाने, वाचेने यांची अशी पूजा देह असेपर्यंत चालू असते, या प्रयत्नामुळेच मानवतेचा दिव्य वंश अमर होतो.

श्रीदीक्षितस्वामींचे महानिर्वाण

प. प. श्रीदीक्षितस्वामीच्या दिव्य जीवनाचा शेवट अयोध्या निवासी झाला. तेथे त्यांची समाधि आहे. शेवटपर्यंत गुरूभक्तित रमणारे त्यांचे मन श्री वासुदेवचरणी विलीन झाले तो दिवस अश्विन वद्य सप्तमी. त्यांच्या जीवन चरित्रातील हे काही ओघळलेले मोती वेचून ही श्रीदत्तमुक्तिमाला ओवली. त्यांतील मेरुमणि हे आपले प. पू. श्रीदत्तमहाराज आहेत. श्रीदत्तांनी जसे २४ गुरू केले व प्रत्येकाकडून आशीर्वादाचा एकेक गुण मिळविला त्याप्रमाणेच या दत्तमौक्तिक माळेतून श्रीदत्तात्रेयशास्त्री कवीश्वरांनी एकेक गुण मिळवून ते मेरुमणि ठरले. असा अन्योन्य संबंध या सर्व वाडीतील चारित्रांशी प. पू. श्रीदत्तमहाराजांचा आहे म्हणूनच या सर्व विभूतींच्या चरणी नम्र वंदन.



☆ *भगवान दत्तात्रेयांना स्मर्तुगामी म्हंटले आहे स्मरण केल्याबरोबर श्री दत्तात्रेयांचे दर्शन होते.*

☆ *ग्रंथ हे सुद्धा परमेश्वराचे रुप आहे.*

☆ *गुरुचरित्र हा ग्रंथ प्रासादिक आहे.*

दत्तमहाराज

प. पू. श्रीगुळवणीमहाराज

वाडीतील या सर्व महान व्यक्तींना मानणारे, त्याप्रमाणे वागणारे, वाडीची गुरुद्वादशी कधीही न चुकविणारे, साक्षात वाडीच्या कृपाप्रसादाने झालेले असे गुरूदेव श्री वामनरावजी गुळवणीमहाराज! नरसोबाची वाडी म्हणजे खरोखरच महाराजांचे जीवन होते. वाडीमध्ये महाराज फारच प्रसन्न असत. त्यांची चित्तवृत्ती सुगंधमय झालेली असे. पहाटे पाचला त्यांच्याबरोबर कट्ट्यावर जाताना खरोखरच मन प्रसन्न होत असे. त्यांची चाल खूप जलद होती. पहाटे थंडीत काकड्याला ते उभे रहात असत. पादुकांचे दर्शन झाले की घाट उतरून ते स्नानासाठी जात. सारे काही आखीव रेखीव असे. ते कृष्णामाईच्या पाण्यात तीन बुड्या थंडीतही सहजतेने मारीत असत. त्यावेळी ओलेत्याने देवाला पाणी घालता येत होते. कृष्णामाईचे पाणी तांब्यात भरून आणून केव्हाच पादुकांवर ओलेत्याने घालून होई. महापूजेला श्री गुरूदेव निश्चिंतपणे स्वतःचे भान विसरून तन्मयतेने पूजा करीत. बाह्यजगाचा विसर पडलेला अनेक वेळा दिसे. प्रदक्षिणा तर इतक्या घालीत की आश्चर्यच वाटे की ते दमत कसे नाहीत? सायंसंध्येसाठी कृष्णातटाकी बसत. भावमग्न स्थिती वेळोवेळी होई. सूर्याचे परतीचे सोनेरी किरण पाण्यात पडलेले असत. पश्चिम दिशा लालबुंद झालेली असे. महाराजांचे अर्घ्य प्रदान शांतपणे चाले. संध्याकाळी धूप पडला की आरतीला महाराज गर्दी टाळून उभे राहात. पालखीबरोबर प्रदक्षिणा करीत. अशी शुभद सायंकाळी श्रीगुरूमहाराजांच्या पवित्र सहवासात वाडीसारख्या निर्मल तीर्थात मन खरेच सारे काही विसरे! पुण्याहून येताना महाराजांच्याजवळ कित्येक जण महापूजा करण्यासाठी पैसे देत. तितक्या महापूजा केल्या जात. प्रत्येक प्रसाद नारळावर ज्याची पूजा झाली त्याचे नाव लिहिले जाई. पुण्याला परत जाताना महाराजांबरोबर पोतेभर नारळच असत. ते ज्याचे त्याला पोचते होत हे विशेष. आयुष्याच्या अखेरच्या वर्षापर्यंत त्यांची गुरुद्वादशी चुकली नाही. प्रदक्षिणेच्या वाटेवर सावली असावी असे गुरूदेवांना फार वाटे. ते वाडीचे काम हे सर्वात मोठे काम पुरे झाल्यावर गुरुमहाराजांनी आपले अवतारकार्य संपविले. या जगाचा निरोप घेतला. अशा गुरूदेवांनी जिथे आपली श्रद्धा सर्वस्वाने ठेवली ती वाडी आजही साधकांना प्रियच आहे व सदैव राहील असे हे पवित्र नरसोबावाडी क्षेत्र प. पू. श्रीदत्तमहाराजांचे जन्मस्थान. येथेच त्यांचे बालपण घडले. त्यांच्या हाती ऐश्वर्यनगरीच्या किल्ल्या देऊन महाराज शांत झाले. शेवटी सर्व साधनसंपत्ती श्रीदत्तमहाराजांकडे देऊन त्यांना सधन केले, त्या श्रीदत्तमहाराजांचा वारसा हा किती मोठा आहे हे काय सांगायला हवे!





कवीश्वरांची कुलपरंपरा

कवीश्वर घराण्याचा पूर्व इतिहास अत्यंत उज्ज्वल आहे. पूर्वजांची खडतर व तीव्र तपश्चर्या श्रेष्ठ दर्जाची आहे. त्यामुळे या घराण्यावर श्रीगणपती व श्रीदत्त या उभय देवतांचा कृपाप्रसाद झाला आहे.

वे. शा. सं. दादा दीक्षित, बाळकृष्ण शास्त्री, भालचन्द्र उर्फ दाजी दीक्षित, श्रीवक्रतुंडमहाराज, श्रीधुंडीराजमहाराज व श्रीदत्तमहाराज अशीही विद्वानशास्त्री व उपासकांची अखंड परंपरा. वैदिक प्राच्य संस्कृत विद्या, श्रौत-स्मार्त योगानुष्ठान, मंत्रतंत्रशास्त्र, महाभारत, भागवत इत्यादींवर प्रभुत्व असलेल्या, ईशसेवेत रममाण होणाऱ्या, ईश्वरी वरदान पावलेल्या, पवित्र, पंडित व थोर नामवंत शास्त्री घराण्यांमधील श्रीदत्तमहाराज!

श्रीदत्तमहाराजांचे घराणे मूळचे नगरजवळील मांडवगण येथील असून त्यांचे गोत्र 'उपमन्यू' व आडनांव 'सप्तर्षी' असे होते. नंतर यांची एक शाखा वाईस आली. प. पू. श्रीदत्तमहाराज यांचे पणजोबा श्री. दाजी दीक्षित यांचा रामायण, महाभारत या ग्रंथांचा फार चांगला व्यासंग होता. त्यावर ते पुराण, प्रवचन करीत. मंत्रशास्त्रही त्यांना चांगले अवगत होते. श्रौत स्मार्त याज्ञिक कर्मातही ते प्रवीण असून धर्मशास्त्रांतील पंडित व तज्ज्ञ होते. ते प्रतिभासंपन्न कवी असून त्यांनी संस्कृतात व प्राकृतात आख्याने रचिली आहेत.

सातारा दरबारात धर्मशास्त्राच्या प्रश्नावरील निर्णयासाठी वाईच्या पंडितांना मुद्दाम निमंत्रण येई. श्री. दाजी दीक्षित हे व्युत्पन्न पंडित व धर्मशास्त्रांत पारंगत असल्याने त्यांना प्रामुख्याने निमंत्रण येत असे. असाच एकदा एक ग्रामण्य प्रश्न निघाल्यावर ह्यावर दरबारमान्य निर्णय देण्याचा प्रसंग टाळण्यासाठी श्री. दाजी दीक्षित यांनी वाई सोडली. घोड्यावरून नरसोबाचे वाडीस आले. ते तेथेच राहिले. केवळ धर्मनिष्ठेकरिता केलेला असा स्थान त्याग आजकाल दुर्मिळ आहे.

श्री नरसोबाचे वाडीला श्री. दाजी दीक्षित यांनी श्री. दत्तात्रेयाची उत्कृष्ट उपासना केली. जप-जाप्य, अध्यात्मचिंतन, श्रीगुरुचरित्राची पारायणे व दत्तसेवा यात ते दंग असत. रोज पाच श्लोक रचत. ती स्तुति-सुमने श्री दत्ताच्या चरणी अर्पण करण्याचा त्यांचा परिपाठ नित्य होता. त्यांच्या उत्कृष्ट व प्रासादिक काव्यप्रतिभेवरून लोक त्यांना 'कवीश्वर' म्हणू लागले. तेच नाव पुढे प्रचलित झाले. ''कविं कवीनां'' असा महागणपति-मंत्रात शब्द आहे. सप्तर्षि हे उपनाव जाऊन तेव्हापासून कवीश्वर हेच आडनांव प्राप्त झाले. त्यांच्याच काव्यावरून प. पू. श्रीगुळवणीमहाराजांचे वडील बंधू बाबा यांनाही काही काव्यस्फूर्ती मिळाली व ते मधून मधून तुरळक काव्य करीत.

श्री. दाजी दीक्षित यांच्या घराण्याची कुलस्वामिनी माहुरची श्रीरेणुकामाता आहे. कुळात उपासना श्रीगणपतीची आहे. त्यांचे आजोबा श्री. दादा दीक्षित यांच्या वडिलांनी मोरगाव क्षेत्री जाऊन मुद्गल पुराण भाष्यलेखक श्री. गणेश योगीन्द्र महाराज यांच्याकडून श्रीगणेशमंत्रोपासना घेतली होती. त्यांनी श्रीगणेश व्रत पुरश्चरण करून नुसत्या दुर्वांकुरावर वर्षभर राहून श्रीगणेशाची कडकडीत उपासना केली. तेव्हा श्रीगणेश प्रसन्न होऊन त्यांना श्रीगणेशाची एक स्वयंभू मूर्ती प्रसाद म्हणून मिळाली. तसेच स्वप्नांत एका तेजस्वी ब्राह्मणाचे दर्शन होऊन "तुझी सेवा पावली. तुझे काम झाले. तू आता घरी जा. तुझ्या कुळात ईश्वरी अनुग्रह असलेले व पुराण वाङ्मय पारंगत असे विद्वान जन्माला येतील" असा आशीर्वाद मिळाला. ही मूर्ती श्रीधुंडिराजमहाराजांचे जवळ होती.

श्री. दाजी दीक्षित हे वाडीला श्री दत्तात्रेय व श्रीगणेश या दोन्ही देवतांची कडक उपासना करीत. पहाटे उठून ते "वांच्छाकल्प व विद्यागणेश" यांचा पाठ करीत. विद्या गणेश हा स्वतंत्र मंत्र असून त्याचा प्रथम सोळा वेळा ब्राह्मी मुहूर्तावर पाठ करावयाचा असतो व नंतर वाच्छांकल्प या मंत्राचा सबीज सरळ व व्युत्क्रम पद्धतीने एकदा पाठ म्हणावयाचा प्रघात आहे. श्री गणेश व श्रीदत्त एकच आहेत अशी त्यांची अभेदबुद्धी व श्रद्धा होती. हल्ली प. पू. श्रीदत्तमहाराज यांच्या प्रत्येक लेखनाचे प्रारंभी "श्रीगणेशदत्तगुरुभ्योनमः" असे जे असते, ती याचीच परिणती होय.

श्री. दाजी दीक्षितांच्या पत्नी सौ. सगुणाबाई या आदर्श पतिव्रता व धार्मिक प्रवृत्तीच्या होत्या. पतीच्या आज्ञेवरून, त्या वाडीस श्री. दत्तास औदुंबर पादुकांना दररोज १०८ प्रदक्षिणा घालून जप करीत असत. त्याचे पर्यवसान त्यांना महान भगवद्भक्त सुपुत्र प्राप्तीत झाले. शके १७६१ मध्ये आश्विन संकष्टी चतुर्थीला त्यांना पुत्ररत्न झाले. सर्वत्र आनंद पसरला. तेच हे आपल्या प. पू. श्रीदत्तमहाराजांचे आजोबा श्रीवक्रतुंडमहाराज होत.



प. पू. श्रीवक्रतुंडमहाराज

श्रीवक्रतुंडमहाराज वाडीला रहात असत ते दत्ताला पुत्रवत् मानीत असत. **दत्तात्रय हाच आपला बाळ। असे समजून केला वत्सलतेने सांभाळ।।** त्यांचा जास्त उपासनेचा काळ नारायणस्वामींच्या देवळात जी श्रीदत्तात्रेयांची उत्सवमूर्ती आहे तिथे जाई. वक्रतुंडमहाराजांवर सरस्वतीचा मोठा वरदहस्त होता. महाभारत व भागवतावर ते फार उत्तम प्रवचने करीत. हजारो श्रोत्यांना मंत्रमुग्ध करीत असत. त्यांचे प्रवचन प्रभावी होई. असे म्हणतात की वाडीला गोविंदशास्त्री नावाचे एक फार मोठे

सत्पुरुष होते. त्यांची श्रीवक्रतुंडमहाराज मन लावून सेवा करीत. श्रीवक्रतुंडमहराजांची संतती जगत नसे. त्यांना वीस अपत्ये झाली. परंतु दोन मुलींशिवाय कुणीही जगलेले नव्हते. त्यामुळे ते चिंतातुर होते. एक दिवस त्यांनी संन्यास घेण्याचे ठरविले. मला संन्यास द्या असा श्रीगोविंदस्वामींजवळ हट्ट धरला. श्रीगोविंदस्वामींनी त्यांना त्याविचारापासून परावृत्त केले. ते म्हणाले,''तुम्हाला मुलगा पाहिजे ना, मग संन्यास घेऊन कसे चालेल? तुम्ही चिंता करु नका. हा घ्या दत्तूबाळ!'' असे म्हणून आपल्याजवळील दत्ताची मूर्ती त्यांना दिली. श्रीवक्रतुंडमहाराजांचा कंठ भरुन आला. डोळ्यातून अश्रू सुरु झाले. त्यांनी मोठ्या प्रेमाने त्या दत्तमूर्तीला जवळ घेतले. ''**दत्तूबाळ, दत्तूबाळ**'' असे म्हणून खरोखरच आपल्या मुलाप्रमाणे हाक मारू लागले. हे दृश्य पाहून श्रीगोविंदस्वामींचे डोळे ओलावले. दत्तूबाळाला घेऊन मोठ्या आनंदाने श्रीवक्रतुंडमहाराज घरी आले. आपल्या पत्नीला मोठ्या आनंदाने हांका मारु लागले. आपल्या पतीदेवांचा तो एकदम हर्षभरित असा आवाज ऐकून त्या बाहेर आल्या. पत्नीला पाहताच शास्त्रीबुवा म्हणाले, ''हे बघा पाहिलंत का कोण आहे ते! श्रीगोविंदस्वामींनी आपल्याला हा मुलगा दिला आहे! दत्तूबाळ याचे नाव. हा घ्या बरं आपल्याजवळ. नीट सांभाळा बरं का त्याला!'' सावित्रीबाईच्या डोळ्यातून वात्सल्याचे अश्रू ओंघळू लागले. त्यांनी प्रेमाने त्याला कुरवाळले. कडीखांदी घेतले व म्हटले, ''तुझ्यासारखा पुत्र लाभला आता कसली चिंता?'' लिंबलोण उतरुन त्या माऊलीने त्याला घरात नेले आणि हृदयात विराजमान केले.

सावित्रीबाईच्या प्रदक्षिणा। करी कुलाच्या रक्षणा ।। या दत्तूबाळाची पाठ भाग्याचीच. सौ. सावित्रीबाईंची दत्तसेवा अधिक जोमाने सुरु झाली. त्या रोज पहाटे देवाच्या कट्ट्यावर जात. देवाला पाचशे प्रदक्षिणा तरी त्या घालत असत. सातत्याची सेवा त्यांच्या फळाला आली. ईश्वरभक्तीपरायण असा कुलदीपक मुलगा परमेश्वरांनी त्यांना दिला. तेच दत्तमहाराजांचे पिताजी श्री धुंडिराजशास्त्री होत. श्री वक्रतुंडशास्त्री व त्यांच्या पत्नी दत्तूबाळाबरोबर या झालेल्या मुलाला सांभाळीत. भांड्यांवरसुध्दा ते दत्तूबाळ अशी नावे घालीत. या दत्तूबाळाची मुंजसुध्दा त्यांनी केली होती. प्रवासात ते सतत दत्तूबाळाला आपल्याबरोबर नेत. इतकेच काय तर ज्या ठिकाणी ते उतरत त्या ठिकाणी कोणी विचारले किती माणसे? तर ते दत्तूबाळाला जमेला धरुन सांगत, तीन माणसे जेवायला. पाने मांडल्यावर लक्षात येई. तिसरे कोणाचे? तर दत्तूबाळाचे! इतके दत्तूबाळाशी ते एकरुप झाले होते.

जाणे भक्तीचा जिव्हाळा । तोच दैवाचा पुतळा ।। ही नुसतीच उक्ती नव्हे, तर ती प्रत्यक्ष जीवनात उतरविणारे संत महाभाग असतात. ही पुराणकालीन कथा नव्हे. अगदी अलिकडच्या काळात प्रत्यक्ष पाहिलेली, घडलेली घटना आहे.

श्रीधुंडिराजमहाराज

श्रीधुंडिराजशास्त्र्यांचे बाळपण वाडीला गेले. त्यांचे सारे शिक्षण श्रीकृष्णशास्त्री वष्ट यांच्याजवळ इंदूर येथे झाले. श्रीधुंडीराजशास्त्र्यांनी न्यायशास्त्रावरील ग्रंथांचा अभ्यास पूर्ण केला होता. न्यायशास्त्र वाक्यवृत्ती, पंचशील, सामान्य निवृत्ती यांचा अभ्यास केला होता. वडिलांच्या सांगण्यावरून त्यांनी आपले अध्ययन पुरे केले व वाडीला ते पुराण सांगू लागले. श्रीदत्तांची उत्सवमूर्ती सायंकाळी पूजा होऊन पालखीत बसेपर्यंत ते पुराण सांगत असत. उत्सवमूर्तीचा उपचार करताना पुराण सांगण्याची प्रथा श्रीवक्रतुंडमहाराजांनी सुरू केली ती आजपर्यंत चालू आहे. श्रीमत् वासुदेवानंदांचा श्रीधुंडिराजशास्त्र्यांवर फार लोभ. वाडीला स्वामीमहाराज चारचार महिने असत. तो सहवास श्रीधुंडिराजशास्त्र्यांना खूप लाभला होता. वाडीमध्ये श्रीधुंडिराजशास्त्र्यांनी पाठशाला आणि संस्कृत पाठशाळाही सुरु केली होती.

श्रीधुंडिराजशास्त्रींचा विवाह वयाच्या १८ व्या वर्षी सिरहट्टी येथील श्री गोपाळराव हणमसागर यांची कन्या गंगुबाई यांचेशी झाला. त्यांचे नांव सासरी सरस्वतीबाई असे ठेवण्यात आले. दैवगती काय असते कुणास ठाऊक! श्री वक्रतुंडशास्त्री व त्यांची पत्नी सावित्रीबाई यांनी खूप तपस्या केल्यावर त्यांना श्रीधुंडिराजमहाराज लाभले. आता श्रीधुंडिराजमहाराजांनाही संतती नव्हती. त्यामुळे सौ. सरस्वतीबाई दु:खीकष्टी होत्या.

श्रीधुंडिराजमहाराजांनी श्रीटेंबेस्वामींना पत्र लिहिले. श्रीटेंबेस्वामींनी धर्म-सिंधूत सांगितलेल्या मंत्राचा जप, विधीविधान, होमहवन त्यांचेकडून करुन घेतले. आईवडिलांनी केलेल्या देवाच्या सेवेचा संस्कार हा आईवडिलांनी मुलाला दिलेला फार मोठा संस्कार ठरला. ज्या संस्कारातून कुटुंबाचा, समाजाचा, देशाचा अभ्युदय होईल असा कुलदीपक जन्माला आला.

सौ. सरस्वतीबाई करिती भक्ती । सत्कर्मांची त्यांना प्रीती ।

सौ. सरस्वतीबाई याही आपल्या सासूबाईप्रमाणे वाडीला प्रदक्षिणा घालीत. त्या सासूबाईचा नेम पुढे चालवीत होत्या. व्यंकटेशस्तोत्र, शिवलीलामृत, श्रीगजानन महाराज व लोणीचे श्री सखाराम महाराज यांच्या पोथ्यांची पारायणे करीत. सप्तशती श्रीगुरुचरित्र संपूर्ण रोज वाचीत असत. त्या अतिशय आतिथ्यशील होत्या. श्रीधुंडिराज महाराजांकडे भक्त येत. त्यांची कामे त्यांच्या पत्नीना त्या करु देत नसत. माहेरपणाला आलात आता काही करु नका असे त्या म्हणत असत. अहेवपणीच आपण जाणार असे निग्रहाने सांगत. अडीअडचणीत सर्वांना मदत करण्याची त्यांची प्रवृत्ती होती असे सतीसावित्रीसारखे त्यांचे व्यक्तिमत्व होते.

त्यांचा आणखीन एक गुण विशेष लिहिण्यासारखा आहे. प. पू. श्रीधुंडिराज महाराजांबरोबर त्या गावोगावी जात. त्यावेळी श्रीदत्तमहात्म्य, स्वामीमहाराजांचे विस्तृत चरित्र व तृतीय पुष्प श्रीस्वामीमहाराजांची ग्रंथसंपदा मराठीत असल्यामुळे स्त्रियांनी ती वाचावी म्हणून आग्रह भरीत. आपल्याबरोबर ती घेऊन जात. त्यासाठी त्यानी एक आपल्या सहीने पत्रकही काढले होते. सौ. आईसाहेबांचे हे परमार्थ प्रेम, तळमळ, ज्ञान, जिज्ञासा पुस्तकांच्या प्रचाराची तयारी या सर्व गोष्टी त्यांची ईश्वरनिष्ठा दाखविणाऱ्या आहेत.

नरसोबा वाडीचा येथपर्यंतचा सर्व वृत्तांत पाहिला तर वाडीच्या मनोहर पादुकांच्या कृपासावलीत नारायणस्वामींसारखे महान भक्त हे श्रीगुळवणीमहाराजांच्या आजोबांचे गुरु. श्रीवक्रतुंडमहाराजांनी या ठिकाणीच पुराणसेवा केली. श्रीगोपाळस्वामींना या ठिकाणीच श्रीपादवल्लभांचे दर्शन झाले. श्रीमौनीस्वामींचा तर कवीश्वर घराण्यावर कृपाप्रसाद. श्रीमत् वासुदेवानंदांचा आशीर्वाद कवीश्वर घराण्याला लाभला. श्रीगुळवणीमहाराजांचे सतत कृपाछत्र यासारख्या कृपांची एकच अतूट साखळी निर्माण झाली. आजीआजोबांच्या, आईवडिलांच्या दत्तसेवेचे फ्तन श्रीदत्तमहाराजांच्याँ असे पाठीशी आहे.

वासुदेव यती वदती। वक्रतुंडबुवा फिरुनी जन्म घेती।

सौ. सरस्वतीबाई ज्या अपत्यलाभासाठी येवढी तपश्चर्या करीत होत्या. त्याचे फळ प्राप्त होण्याची वेळ आली. सर्वानाच फार आनंद झाला. प्रदक्षिणासेवा श्रीनरसिंहसरस्वती स्वामीमहाराजांनी मान्य करून घेतली. इतक्या सत्वशील ईश्वरी कृपापात्र कवीश्वर घराण्यावर गणेशदत्त प्रसन्न झाले. प. पू. श्रीधुंडिराजमहाराज व सौ. सरस्वतीबाई यांच्या जीवनात निराशेची रात्र जाऊन उषकाल झाला. प. पू. श्रीदत्तमहाराजांचा जन्महो उषःकाली म्हणजे सकाळी ६ वाजता झालेला आहे. घरादाराला प्रसन्नता आली. फार मोठा प्रसाद स्वामीवासुदेवानी दिला आज महाराजांचे हातून उत्तुंग लोकोत्तर कार्य स्वामीमहाराजांच्या कृपाप्रसादाने होत आहे.

बुधवार दि. २ मार्च १९१० माघ वद्य शके १८३१ या दिवशी वाडीत श्रीदत्तमहाराजांचा जन्म झाला. श्रीधुंडिराजशास्त्रींना फार आनंद झाला. सकाळची वेळ होती. वाडीच्या दिवसाचा प्रारंभ कट्ट्यावरील काकड आरतीने होई. पादुकांचे दर्शन घेऊन मंडळी परत येत होती. घाटावर स्नानाची गर्दी उसळलेली होती. सूर्याची कोवळी किरणे घराघरांतून पसरु लागली होती. सौ. सरस्वतीबाई आपल्या मुलाला घेऊन ओटीवर बसल्या होत्या. तोंडाने अभंग गुणगुणत होत्या. इतक्यात **''दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा''** असा गोड गजर कानी आला. त्यांनी पाहिले, तो स्वामीमहाराज घराकडेच येत आहेत. प्रातःकाळी होणारे हे श्रीवासुदेवानंदांचे दर्शन.

मोठा आनंद झाला. सौ. सरस्वतीबाई चटकन उठल्या. आपल्या बाळाला खाली दुपट्यावर ठेवून त्यांनी महाराजांना आसन दिले. नमस्कार करुन महाराजांसाठी फळे आणावी म्हणून लगबगीने घरात गेल्या. स्वामीमहाराज मुलाशी बोलू लागले. त्याच्याजवळ जाऊन बसले. आई बाहेर येत आहेत, तो त्यांच्या कानावर स्वामींच्या हास्याचा ध्वनी उमटला. महाराज म्हणत होते ''काय वक्रतुंडमहाराज आलांत? आपण या पांढऱ्या वेषात व आम्ही या भगव्या वेषात एवढाच काय तो तुमच्या आमच्यात फरक!'' असे म्हणून स्वामी महाराज मनापासून हसले. आईना कळून चुकले की दत्तमहाराज कोण आहेत ते! त्यामुळे दत्तमहाराजांच्या पिताजींनी ते इतके मनोमनी ठसवून घेतले की त्यांनी कधी त्यांना एकेरी नावाने संबोधले नाही.

बालपण

कृष्णामाईच्या तीरावर या सर्व दत्तभक्तांच्या दरबारात श्रीदत्तमहाराजांचे बालपण गेले आहे. पादुकांचे दर्शन, कृष्णामाईत रोज स्नान हा नित्याचा नेम. कृष्णामाई, मौंजीबंधन झालेल्या बटूला स्नान करताना मनात आशीर्वाद देत म्हणत असेल, ''औक्षवंत व्हा, ज्ञानवंत व्हा या वाडीची ही ज्ञानपरंपरा अशीच पुढे पुढे नेत चला!'' या बाल बटूने स्नान करताच ही जलदेवता संतुष्ट होत असेल यात काय संशय! श्रीदत्तमहाराजांना पोहण्याची फार आवड! आट्यापाट्या, खोखो हे तर त्यांचे आवडते खेळ होते. पुरात उड्या मारून पोहण्यात त्यांना फार आनंद वाटे. नदीकाठचे त्यांचे बालपण आहे. नदीला तर विश्वमाता मानतात. जगाएवढे मोठे मन या मातेचे असते. या सरितेच्या सान्निध्यात दत्तमहाराजांसारख्या चिंतनशील व्यक्तिमत्त्वाने किती तरी संस्कार घेतले असतील. या पवित्र जलांत पोहताना वर विशाल आकाशाचे छत्र व आजूबाजूच्या मोहक निसर्गाशी मैत्री करीत, परमेश्वराच्या अथांग शक्तीचे गूढ विचार त्यांच्या मनात निश्चितच स्फुरत असतील. स्वच्छ वाहत्या पाण्याने त्यांचे शरीर निर्मळ तर केलेच, त्याचबरोबर बुद्धीलाही पवित्र केले. परमेश्वरी ज्ञान सामावून घेण्याइतके तरल केले. पण बुद्धी किंवा तर्काने ही कामे होणार नाहीत. ज्या हृदयातून स्फूर्तीचा उगम होतो असे मृदु अंतःकरणही सरितेच्या सान्निध्यातून त्यांनी मिळविले असेल. कर्म, भक्ती, ज्ञान ह्या तिन्ही गोष्टी प्राप्त होण्यासाठी वाडीक्षेत्री घालविलेल्या रम्य बालपणाचा फार उपयोग झाला असे श्रीदत्तमहाराज मानतात.

१९१८ साली म्हणजे वयाच्या ८ व्या वर्षी देवाच्या कट्ट्याजवळ श्रीदत्तमहाराजांचे **मौंजीबंधन** झाले. ७ वी पर्यंत ते वाडीलाच शाळेत होते. संस्कृत अध्ययनाला बालपणापासूनच सुरवात झाली होती. वाडीत श्रीमद् जगतगुरू शंकराचार्य जेरेस्वामी महाराज यांची पाठशाळा होती. त्या शाळेत त्यांचे काव्य व व्याकरण यांचे अध्ययन झाले.

मुंजीनंतर लगेच त्यांचे श्रीगुरूचरित्रवाचन सुरू झाले. यावेळी वाडीला प. प. श्रीदीक्षितस्वामी रहात होते. मुंजीनंतर त्यांना मंत्रोपदेश मिळाला प. प. श्रीदीक्षितस्वामींचा सहवासही मिळाला. **तैसीच गुरूकृपा उखा उखळली। ज्ञानाची वोतपली पडली । तेथ साम्याची हद्धि उघडली तयाचिये दिठी।।**

प. प. श्रीदीक्षितस्वामींच्या कृपाप्रसादाने श्रीदत्तमहाराज अंतर्बाह्य बदलून गेले. देवाच्या दर्शनाची ओढ तीव्र होऊ लागली. ज्ञानाने ती मिळविण्याचा प्रयत्न सुरू झाला. प. प. श्रीदीक्षितस्वामीं महाराजांनी भागवत वयाच्या १६ व्या वर्षी हाती दिले. पहिले सप्ताहवाचन प. प. श्रीदीक्षितस्वामींचे समोर झाले.

श्रीदत्तमहाराजांना देवाचा कट्टा फार प्रिय. अभ्यास संपवून कट्ट्यावर यावे. सायंकाळ व्हायला आली की तो परिसर मोठा विलोभनीय होतो. सूर्याची किरणे नदीवर आपला हात फिरवितात. पादुकांपाशी येऊन दिवसाच्या अखेरची वंदना करून निरोप घेतात. पक्ष्यांचे थवेच्या थवे घरट्याकडे जाऊ लागतात. सरिताही शांत भासते. घाटावर सायंदर्शनासाठी भक्तांची रीघ लागलेली असते. उदबत्त्यांचा सुवास दरवळत असतो. प्रदक्षिणा घालणाऱ्यांची गर्दी झालेली असते. अशावेळी श्रीदत्तमहाराज घाटावर त्यातल्या त्यात एका बाजूची निवांत जागा बघून चिंतनात मग्न होऊन जात. आजही गंभीर, अबोल, विरक्त असणारी त्यांची वृत्ती त्यावेळीही मूकपणे गुरूपादुकांशी एकरूपता साधायला बघत होती. परमेश्वरी ज्ञानाची ओढ त्यांना लागली होती. गुरूभक्तीची ओढ त्यांना खेचत होती.

पलिकडच्या काठावरच असलेले श्रीदत्तअमरेश्वर मंदिर. तिथे निवास करणारे प. प. श्रीदीक्षितस्वामी महाराज. वारंवार भेटीगाठी घ्याव्या असे त्यांना वाटे. औरवाडला चौसष्ट योगिनीचे स्थान आहे. तेथे भजनपूजन चाले. श्रीदत्तमहाराजांचे मन येथे फार ओढ घेई.

ओढ लागली गुरूभेटीची

औरवाडला जावयाचे म्हणजे त्याकाळी फारशा नावा वगैरे नव्हत्या. पोहूनच जावे लागे. श्रीदत्तमहाराज सांगलीला शिकावयास गेले होते व वाडीला आले होते. घरी आजीकडे अधिक महिन्याचे तीस तीन ब्राह्मण जेवायला होते. श्रीदत्तमहाराज आजीला म्हणाले, ''मी औरवाडला जाऊन स्वामींना भेटू येतो.'' आजी म्हणाल्या, 'आज ब्राह्मण घरी आहेत. तेव्हा जायलाच पाहिजे का? बरे, जाऊन परत येणे तरी वेळेवर होईल का?' श्रीदत्तमहाराजांना गुरूमहाराजांना भेटायची इतकी ओढ लागली होती की त्यांचे मन राहीना. ते आजीला म्हणाले, 'मी अकरा वाजेपर्यंत नक्की परत येईन.' आजी म्हणाल्या, 'बरं. पण नीट जपून जा!' श्रीदत्तमहाराज निघाले. घाटावर

आले. नदीला पूर आला होता. पुरात पोहणे तर महाराजांना फार आवडे. कृष्णामाई आईसारखीच परिचित असल्यामुळे देवाला वंदन करून त्यांनी कृष्णामाईत उडी घेतली आणि सपासप अंतर कापून औरवाडला पोचले. गुरूदेवांचे दर्शन घेतले.

प्रसन्न चेहरा, दिव्य तेज, मुखावर स्मितहास्य असे श्रीदीक्षितस्वामींचे व्यक्तिमत्व होते. त्यांनी श्रीदत्तमहाराजांची विचारपूस केली. पोहून आल्याचे पाहून कौतुकपूर्ण दृष्टी टाकली. नेसायला कोरडे वस्त्र दिले. अंगावर उपरणे घातले. कृपादृष्टीने पाहिले. या प्रेमपूर्ण वागणुकीने महाराज भारावून गेले. प्रसाद घेऊन जेवण करून चला म्हणाले. आजी वाट पाहील म्हटल्यावर श्रीदीक्षितस्वामींनी जाण्याची परवानगी दिली. गुरुदेवांचा निरोप घेतला. दर्शनाने, स्पर्शाने, हास्याने मधुशब्द व कल्याण करणारे आशीर्वाद मिळवून श्रीदत्तमहाराज मोठ्या उत्साही मनाने परतले. मन आनंदाने भारावून आले होते. गुरूमाऊलीच्या निर्हेतुक प्रेमाचे मनात चिंतन चालले होते. डोळ्यांतून अश्रूधारा येत होत्या. **ऐसी कळवळ्याची जाती। करी लाभावीण प्रीती।** असे विचार मनात येत होते. सद्गदित मनाने कृष्णामाईला म्हणाले, 'ने मजसी परत तीराला.' महाराज पोहू लागले. पण मन मात्र या सद्भावाने, गुरूप्रेमाने उचंबळले होते. त्या भानात ते कृष्णामाईच्या जवळ असलेल्या भोवऱ्यात सापडले. खोल खोल जाऊ लागले. क्षणाक्षणाला आपण खाली जात आहोत असे वाटू लागले. मन आनंदात होते. हातापायाच्या क्रिया थांबल्या आता तळाला जाणार असे वाटले. एकच विचार मनात आला, घरी ब्राह्मणभोजन आहे. काही घोटाळा तर होणार नाही? इतक्यात **त्या स्थळी दत्तगुरु पाहिले। धन्य जीवन झाले। पुण्य फळा आले।।** असे दर्शन होऊन श्रीदत्तमहाराज भोवऱ्यातून सुटले. कृष्णामाईने त्यांना परत केले हेच खरे!

श्रीदीक्षितस्वामींचा सहवास

अमरेश्वर येथे आल्यावर प. प. श्रीदीक्षितस्वामी महाराजांनी तेथील पंचक्रोशी व जवळपासच्या यात्रा कराव्या असे ठरविले. कोल्हापूर म्हणजे गया. त्रिस्थळीपैकी एक असे मानून ते अमरेश्वर येथील मंडळींना म्हणाले, ''आम्ही करवीरक्षेत्री जाऊन येतो. यात्रा करून येईपर्यंत तुम्ही सुंदर मंदिर तयार करा!'' असे म्हणून आपल्या गुरूदेवांची प. प. श्रीवासुदेवानंदांची मूर्ती बरोबर घेऊन ते निघाले. तेव्हा अमरेश्वर येथील मंडळी नावेतून आम्ही मिरजेपर्यंत येऊन आपल्याला सोडतो असे म्हणू लागली. सर्वमंडळी नौकारूढ झाली. या भक्तमंडळीत दत्तात्रेय कवीश्वर, दिगंबर हबळे, बापू कोडणीकर असे अनेक बालभक्त होते. प. प. श्रीदीक्षितस्वामी महाराज या बालभक्तांना म्हणाले, दत्त दिगंबर आपल्याबरोबर आहेतच. श्रीगुरुंचे भजन करीत ही नौका जेव्हा कृष्णेतून जाऊ लागली तेव्हा सर्वांनी मोठा जयजयकार केला. मध्ये वासुदेवानंद सरस्वतीची मूर्ती घेऊन बसलेले श्रीदीक्षितस्वामी महाराज व त्यांच्या

भोवती बसलेली ही बालभक्त मंडळी. श्रीदीक्षितस्वामी महाराज रंगून गेले आहेत. बालभक्त मंडळी दिगंबराची धून भावभक्तीने आळवताहेत. सारेजण तल्लीन झाले आहेत. श्रीदीक्षितस्वामी म्हणत असत, हे बालभक्त आम्हाला प्रिय आहेत. पाचपेचवाली मंडळी आम्हाला आवडत नाहीत. 'पाचपेचवाली मंडळी म्हणजे काय' एकाने प्रश्न केला. स्वामी म्हणाले, 'पंच विषयाचे व पंच कोशाचे पेचात जी मंडळी सापडतात ती, आसुरी वृत्तीची पाचपेचवाली मंडळी! त्या पेचात न सापडलेली ही मुले होत. मुलांवर महाराजांचे प्रेम होते. ते मुलांना आपला लळा लावत होते. त्यांना चाक्षुषी दीक्षा देत होते. श्रींदीक्षितस्वामींना खात्री होती, की या बालभक्तांवर केलेले प्रेम त्यांच्या मनोमनी नक्की सुफलित होणार आहे. मुले त्यांना सोडायला तयारच नव्हती. ही प्रेमधारणा कशी सुफलित झाली हे आजचे श्रीदत्तमहाराजांचे जीवनकार्य पाहून आपल्याला उमगत आहे. नौका पुढेपुढे जात होती. त्यांचे बोलणे आपल्या हृदयसंपुटात साठवीत होते. हेच आपले खरे मायबाप होत. यांना आपण काही झाले तरी सोडायचे नाही असा या बालभक्तांचा निर्धार होता. नौका अनेक छोट्यामोठ्या ठिकाणी थांबे. प्रेमाचा स्वीकार करीत स्वामीमहाराज पुढे पुढे चालले होते. कवडे गाव, नंतर गणेशवाडी क्षेत्रात गणेशपूजन झाले. सर्व मंडळी श्रीस्वामीमहाराजांकडे आकर्षित होत होती. श्रीदत्तात्रेय कवीश्वर हे सर्व दृश्य मनांत साठवून घेत होते.

वानवडी गावी तर जैन व मुसलमान लोक होते. त्या लोकांनी श्रीदीक्षितस्वामींना उतरायला लावले. समदर्शी स्वामी उतरले. असे ठिकठिकाणी उतरून लोकांना भजनाची व 'दिगंबरा दिगंबरा' या नामगजराची गोडी लावीत अनेक लोकांना आपलेसे करीत करीत कोल्हापुरी आले. श्री वासुदेवानंद सरस्वतींना घेऊन आपण यात्रा करीत आहोत ही श्रीदिक्षितस्वामींची भावना होती म्हणून अखंड नाम चालले होते.

कोल्हापुरात श्रीदीक्षितस्वामी महाराजांचे एक जुने मित्र श्री गोपाळराव दंडगे हे होते. ते भेटावयास आले तेव्हा श्रीदीक्षितस्वामींना आनंद झाला. प. प. श्रीदीक्षितस्वामींनी त्यांना चाक्षुषी दीक्षा दिली. चाक्षुषी दीक्षा म्हणजे डोळे उघडून भक्तांकडे पाहत असताना त्यांच्या हृदयात पितृशक्तीचा उदय करून देणे. ही चाक्षुषी दीक्षा, स्पर्श दीक्षा, संकल्प दीक्षा श्रीदीक्षितस्वामी महाराज देत असत.

या ठिकाणी अनेक भक्तमंडळींना स्वामीमहाराजांनी निरोप दिला. पण बालभक्त मंडळी परतायलाच तयार होईनात. पालक शाळा बुडते म्हणून न्यायला आले तरीही मुले जायला तयार होईनात. त्यांनी रडून रडून गोंधळ केला. श्री धुंडिराजशास्त्री पण आपल्या मुलाला नेण्यासाठी आले होते. दत्तात्रेयांची समजूत घालता घालता त्यांच्या नाकी नऊ आले. श्रीदीक्षितस्वामींनाही ही मुले परत जावयाला नको होती. या सर्वांना गुरूकृपादृष्टीने त्यानी आपले म्हटले होते. घरी जा

असे म्हणवेना. निरोप न घेताना श्रीदीक्षितस्वामी त्यांना म्हणाले, 'मी परत येतोच आहे' मुले घरी आली. पण सर्व बेचैन झालेली. आम्हाला श्रीदीक्षितस्वामींकडे पोचवा असे म्हणू लागली. करवीर क्षेत्रातील असा हा रम्य अनुभव श्री दत्तात्रेय कवीश्वरांना घडविण्याचे काम करीत होता.



पहिला भागवत सप्ताह

श्री अमरेश्वर मंदिर पुरे व्हायचे होते. ते पुरे होईपर्यंत व तेथे गुरूदेवांची नीट व्यवस्था लागेपर्यंत श्रीदीक्षितस्वामींना अमरेश्वर सोडायचे नव्हते. वाडीला श्री दीक्षितस्वामी वेदशास्त्रसंपन्न श्रीधुंडिराज महाराजांकडून भागवत सप्ताह करून घेत असत. इथे आल्यावरही श्रीदीक्षितस्वामींनी भागवत सप्ताह करायचे ठरवले. रडून नाईलाजाने वडिलांबरोबर गेलेल्या श्रीदत्तात्रेय कवीश्वरांना अमरेश्वराला बोलावून घेतले. कवीश्वर हे आता संस्कृत पाठशाळेत जाऊ लागले होते. चिमुकल्या शास्त्र्यांना बोलावून श्रीदीक्षितस्वामी म्हणाले, 'तुम्हीच सप्ताह करा भागवताचा! नुसता मूळ ग्रंथ वाचा म्हणजे झाले!' कोल्हापूरहून आपणाला आणले त्याचा त्यांनी आईवडिलांना फार त्रास दिला होता, ते म्हणाले होते की मला पाठशाळा नको. मला श्रीदीक्षितस्वामींकडे पोचवा! पण ते घडले नव्हते. आपल्याला स्वामींनी सप्ताहासाठी बोलावले याचा श्रीदत्तमहाराजाना विलक्षण आनंद झाला. संहिता वाचण्याइतपत आपली तयारी नाही. आपण संस्कृतची नुकतीच सुरुवात केली आहे. स्वामी महाराजांसमोर बसून वाचन होणार. महाराज काय ते बघून घेतील, या विचाराने ते तयार झाले. या बालशास्त्र्यांनी संहितेचा आरंभ केला. संपूर्ण संहिता वाचन होईपर्यंत श्रीदीक्षितस्वामी उठत नसत. त्यांची गुरूकृपादृष्टी दत्तात्रेयांकडे सतत लागलेली होती. असे सात दिवस एकापेक्षा एक आनंदाचे गेले. सप्ताह पूर्ण झाला. श्रीदीक्षितस्वामी महाराज संतुष्ट झाले. दत्तात्रयाच्या पाठीवरून हात फिरवून प्रेमाने म्हणाले, 'वा! फारच छान! एकाग्र मनाने वाचलेस. तू पुढे मोठा ज्ञानी होशील. तू माझा प्रिय भक्त आहेस. असे म्हणून दत्तबाळाला आशीर्वाद दिला. त्याचे अंगावर आपले हाताने उंची शाल घातली. कृपेचे पांघरूण होते ते! चांदीचे संध्यापात्र दिले. भागवताची मिरवणूक काढूया म्हणून एक नौका तयार केली. प. प. श्रीदीक्षितस्वामी महाराज, जवळ दत्तात्रयेशास्त्री हातात भागवताची पोथी व तोंडाने चाललेले दिगंबराचे भजन. कृष्णामाई या सर्वांना घेऊन मोठ्या डौलाने वाहत होती. काय तो अनुपम सोहळा! दोन्ही तीरावरील लोक नावेतील ही मिरवणूक मोठ्या कौतुकाने पाहत होते. पशुपक्षीदेखील झाडावर थबकले होते. श्रीदत्तात्रेयशास्त्रींच्या डोळ्यातून प्रेमाश्रू वाहात होते. असे हे नौकानयन चालले होते. भागवतासारखा पावन ग्रंथ दत्तात्रयांचे हाती देऊन श्रीदीक्षितस्वामी त्यांना प्रेमाने सांगत होते, 'माझ्याबरोबर येण्याचा हट्ट तू करू

नकोस. पण मी सांगतो म्हणून एक काम अवश्य कर. या अमरेश्वराच्या देवळात माझे गुरूदेव श्रीवासुदेवानंद सरस्वती निवास करीत आहेत. दर भाद्रपद महिन्यात भागवताचा सप्ताह करीत जा. माझ्याबरोबर न येता येथे येऊन हे काम करशील ना?'' श्रीदत्तात्रेयांनी अर्थातच गुरूमहाराजांचे चरणी वंदन करून मान्यता दिली. पण आपल्याला बरोबर नेत नाहीत हे दुःख त्यांना अतीव झाले. चरणांवर डोके ठेवून ते म्हणाले. **तू माय मी लेकरू । गुरू रे नको विसरू । रे नको विसरू**

श्रीदीक्षितस्वामींनी पुन्हा एकदा महाराजांचे पाठीवर हात फिरविला. कृपापूर्ण दृष्टीने त्यांच्याकडे पाहून मनात म्हटले, 'छोटे शास्त्रीबुवा तुमचे कार्य फार मोठे आहे! एक महान योगीराजांचे आपण मानसपुत्र होणार आहात. भागवत सप्ताहातून ज्ञानप्रबोधन करणार आहात. आपल्या निरूपणावर श्रोते लुब्ध होणार आहेत. म्हणून मी माझे गुरूदेव श्रीवासुदेवानंद यांना प्रार्थना करीत आहे की त्यांचा आशीर्वाद आपल्याला लाभावा! **दत्तात्रेय सांगे लोकां भक्ती भागवता ।। निरूपण सांगायला द्यावे बळ गुरूनाथा ।।**

अध्ययन व गुणगौरव

कर्नाटक प्रांतातले **धारवाड** हे तसे लहानसे शहर. बेळगावला जवळ असल्यामुळे मराठी भाषिकांची वस्ती मोठी. वैदिक परंपरा आजही अखंडपणे चालू आहे. धारवाडचे एक वैशिष्ट्य म्हणजे तेथील **१०० वर्षाहुन** जुनी असलेली **श्रीजगद्गुरु शंकराचार्य संस्कृत पाठशाळा.** याच पाठशाळेत **ब्रह्मश्री पं. नागेशशास्त्री उप्पन बेट्टीगिरी** यांचे कडून प. पू. श्रीदत्तमहाराजांचे **न्यायशास्त्राचे** अध्ययन झाले. सन १९३३ ते १९३७ या पाच वर्षांच्या काळात श्रीमहाराजांचा विद्वान पंडित म्हणून नावलौकिक झाला. पंडित श्रीनागेश शास्त्री यांचे पुत्रवत् प्रेम त्याना लाभले. ते अनेकवेळा त्यांचे विषयी गौरवोद्गार काढीत की श्रीदत्तमहाराज **जेष्ठाप्रमाणे** सर्वगुणांनी अनुरुप असे विद्यार्थी आहेत.

धारवाडला येण्यापूर्वी श्रीमहाराजांचे पुण्याला मीमांसा विद्यालयात पं. श्रीसुब्बाशास्त्रीवर्यांजवळ मिमांसाशास्त्राचे अध्ययन झाले. वेदान्त, अलंकार, धर्मशास्त्र व शास्त्रातील विविध परीक्षा देवून त्यानी पदव्याही मिळविल्या होत्या. तरल, सूक्ष्म, कुशाग्र बुद्धी आणि परिश्रम करण्याची वृत्ती त्यामुळे कोणत्याही शास्त्रांचा परीपूर्ण अभ्यास श्रीदत्तमहाराजांचा होत असे. लहानवयातच प. पू. श्रीदत्तमहाराजानी वेदाभ्यास, व्रत, उपोषण, तपश्चर्या, ज्ञान, शुचित्वादि पावित्र्य संपादन केले असल्यामुळे त्यांचे ठिकाणी वेदाभ्यासतपस्वी ज्ञान या मनुस्मृतीप्रणीत सात्विक गुणांची लक्षणे दिसू लागली.

धारवाडला श्रीमहाराजांबरोबर पं. श्री. नागेशशास्त्रींचे जेष्ठ चिरंजीव ब्रह्मश्री भालचंद्रशास्त्री, पं. श्रीपादशास्त्री जेरे, श्री. ह. रा. महाजनी-पुढे लोकसत्ता या दैनिकाचे संपादक म्हणून प्रसिद्धीस आलेले-अशी नावारुपाला आलेली मंडळी पाठशाळेची भूषणे होती. विद्यार्थींवर्गाचे श्रीमहाराज केवळ सहाध्यायी नसून आवडते असे उपदेश गुरुही होते. त्यांचेबद्दल सर्वांना नितांत आदर वाटायचा. त्यांच्या तोंडातून कोणतेही प्रसंगी अपशब्द, परद्वेष, परनिंदा, क्रोधावेश दिसत नसे. **विद्याध्ययन व्यसनम् अथवा हरिपादसेवनं व्यसनम्** ही त्यांची नित्यवृत्ती असे. गुणांचा आदर व कौतुक करण्याची त्यांची प्रवृत्ती होती.

श्री. ह. रा. महाजनींनां पं. नागेशशास्त्रीनी त्यावेळी प्रसिद्ध झालेल्या श्री. प्रज्ञानेश्वरयंति विधवा-विवाह या पुस्तकाचे खंडन करण्यास सांगितले होते. उपजत कुशाग्रबुद्धी लाभलेल्या श्री. ह. रा. महाजनीनी न्याय व धर्मशास्त्रांच्या आधारे एक विस्तृत लेख लिहिला. तो प. पू. श्रीदत्तमहाराजांकडे वाचावयास दिला. प. पू. श्रीदत्तमहाराजानी त्या लेखाला सुचविलेल्या दुरुस्त्या श्री. महाजनीनाही आवडल्या. श्रीदत्तस्पर्श झालेल्या ह्या लेखाला पं. श्री. नागेशशास्त्रींची प्रशंसा श्रीमहाजनीना मिळविता आली. श्री महाजनींचा पुढील जीवनप्रवाह बदलला. ते व्यासंगी, रॉयवादी पत्रकार झाले. परंतु प. पू. श्रीमहाराजांविषयी त्याना नितांत आदर होता.

*

म्हैसूरची विद्वत् परीक्षा

धारवाडला अध्ययन करीत असतानाच विद्वतसभांमधे शास्त्रचर्चा करण्यासाठी पं. श्रीनागेशशास्त्री प. पू. श्रीदत्तमहाराजांना आवर्जून नेत असत वा पाठवीत असत. त्यांचेबरोबर श्री ब्रह्मश्री भालचंद्रशास्त्रीही असत. प्रत्येक ठिकाणी प. पू. श्रीदत्तमहाराज आपल्या विद्वतेने, विनम्रतेने सभेचे मन जिंकून घेत असत. म्हैसूरच्या विद्वत परीक्षेत प. पू. श्रीदत्तमहाराज गेले असता, परीक्षा घेणाऱ्या विद्वानाना प. पू. श्रीमहाराजांची विद्वता पाहून अचंबा वाटला. प. पू. श्रीमहाराजानी सर्व शास्त्रांचे अध्ययन, मनन व चिंतन केले होते. त्यामुळे त्यांच्या विचारात परिपूर्णता होती. शास्त्रकारांना नेमके काय सांगायचे आहे त्याचे अचूक ज्ञान त्यांनी आपल्या सर्वांगीण अभ्यासाने प्राप्त करून घेतल्याचा प्रत्यय विद्वत सभेत यायचा. **एकस्मिन जन्मनि एकमेव शास्त्रम्** अशा आर्यविद्यातील नियमाला प. पू. श्रीदत्तमहाराज अपवाद होते.

परमगुरुजी ब्रह्मीभूत कुडली शृंगेरीचे जगद्गुरु श्रीविद्यामिनव वाळुकेश्वर भारती स्वामी महाराज (पूर्वाश्रमीचे पंडित विरुपाक्षशास्त्री, हनगळ) यानी धारवाडला अद्वैत ब्रह्मविद्या परिषदेचे आयोजन केले होते. स्वाहाकार, अनुष्ठान व विद्वतसभा असा भरगच्च कार्यक्रम होता. 'वेदान्ता' वर प. पू. श्रीदत्तमहाराजांनी आपले विचार मांडले.

त्यावेळी प. पू. श्रीदत्तमहाराजांची प्रतिमा, विद्वता, गांभीर्य, सात्विकता, सदाचार आदी गुणसमुच्चय पाहून आपल्या विद्यावंशामध्ये हे प्रदीपक शिष्यरत्न आहेत असे गौरवोद्गार श्रीशंकराचार्यांनी काढले. पूर्वाश्रमीचे पं. विरुपाक्षशास्त्री हे पं. नागेशास्त्रीचे गुरु म्हणजेच प. पू. श्रीदत्तमहाराजांचे परात्परगुरु होते. गुरुजीनी केलेल्या गौरवाने प. पू. श्रीदत्तमहाराज अतिशय सद्‌गदित झाले.

शृंगेरीच्या बद्रीशंकराचार्यांनी एक विद्वत सभा मद्रासच्या ताम्रम् विभागी बोलाविली होती. ह्या सभेला भारतात सर्वोमुखी झालेले मद्रासचे प्रकांड पंडित श्री व्यंकटेशशास्त्री उपस्थित होते. त्यानी प. पू. श्रीदत्तमहाराजांवर 'चिद्-सुखी' ह्या वेदान्तातील प्रसिद्ध ग्रंथावर भाष्य करण्याची जबाबदारी सोपविली होती. ह्या ग्रंथाचे अध्ययन व अध्यापन फार विरळपणे होत असते. ही कठीण, अवघड गोष्ट प. पू. श्रीदत्तमहाराजानी ज्या सहजतेने केली की त्याला तोड नाही. कोणच्याही भाष्यावर टीका करणारे म्हणून श्रीव्यकंटेशशास्त्रींची प्रसिद्धी होती. परंतु प. पू. श्रीमहाराजांच्या भाष्यावर ते एकदम संतुष्ट झाले. आपला टीका करण्याचा स्वभाव विसरले. प. पू. श्रीदत्तमहाराजांची त्यानी मुक्तकंठाने प्रशंसा केली.

ब्रह्मश्री भालचंद्रशास्त्री सांगतात की ह्या प्रशंसेने श्रीमहाराजाना समाधान लाभले. पण त्याने ते विचलित झाले नाहीत तर अधिकच विनम्र झाले. देवीसरस्वतीची कृपा झाली असेच म्हणाले.

जगद्‌गुरुकृत अलौकिक सन्मान

कांचीकामकोटीचे जगत्‌गुरु शंकराचार्य परमाचोर्य श्री. चंद्रशेखरसरस्वती यानी श्रीशंकरजयंतीनिमित्त एक विद्वत्तसभा बीजवाडला आयोजित केली होती. भारतातले ४०० घनपाठी, २०० शास्त्रीविद्वान मंडळी सभेला हजर होती. हा सोहळा पाहण्यासाठी असंख्य भक्तमंडळी श्रोते म्हणून आली होती. प. पू. श्रीदत्तमहाराजांवर वेदान्तावर बोलण्याची जबाबदारी होती.

सभेला आदल्या दिवशी प. पू. श्रीदत्तमहाराज व ब्रह्मश्री भालचंद्रशास्त्री पोहचले. श्रीजगत्‌गुरु शंकराचार्याना श्रीदत्तमहाराज आले आहेत हे कळतांच तातडीने शिष्याना पाठवून श्रीमहाराजाना सन्मानपूर्वक आपल्या खोलीत आणविले. खोलीचा दरवाजा बंद करून घेतला. महाराजांबरोबर शास्त्रचर्चा तास दीडतास केली. प. पू श्रीदत्तमहाराज बाहेर दर्शनोत्सुक भक्तांसाठी अस्वस्थ होत होते. न राहवून शेवटी श्री. शंकराचार्याना मृदू शब्दात श्रीमहाराजानी बाहेर दर्शनासाठी आलेल्या लोकांची आठवण करून दिली. श्रीशंकाराचार्यांनी आवरते घेताना उद्गार काढले की, "बाहेरची मंडळी नेहमींचीच आहेत. आपला सत्संग कधीतरी श्रीकृपेने लाभतो"

दुसरे दिवशींच्या विद्वतसभेत प. पू. श्रीदत्तमहाराज तास दीड तास उत्कृष्ट बोलले. सर्वांना समजेल अशा सोप्या भाषेत, सामान्यांना तर समजेलच पण विद्वानांचेही समाधान होईल अशा तऱ्हेने केलेली विषयाची मांडणी तर श्रीशंकराचार्यांनाही मोहित करून गेली. कुणालाही सहसा स्पर्श करु न देणारे श्रीशंकराचार्य आपल्या आसनावरून पटकन उठले. सभेच्या लक्षात येण्यापूर्वी प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या गळ्यात आपल्या गळ्यातील ताजा टवटवीत घसघशीत हिरव्यागार बेलपत्रांचा हार घालते झाले. जणू साक्षात शिवप्रभू शंकरानी तो घातला आहे असे अभूतपूर्व भावपूर्ण, हृदयंगम दृश्य साकारले आहे असे लक्षात येताच् टाळ्यांचा प्रचंड निनाद वातावरण भारून टाकता झाला. ही आठवण सांगताना ब्रह्मश्री भालचंद्रशास्त्रींच्या चर्मचक्षू समोर आजही तो प्रसंग तरळत असावा. त्याने आजही अंगावर रोमांच उभे राहिले.

*

सुवर्ण कंकण

धारवाडला अद्वैत ब्रह्मविद्या परिषद झाली. त्याचा समग्र अहवाल कांची कामकोटीच्या श्री. शंकराचार्यांनी मागविला. ब्रह्मश्री भालचंद्रशास्त्रीनी तत्परतेने तो पाठविला. त्याने श्रीशंकराचार्य फार प्रभावित झाले. प. पू. श्रीदत्तमहाराजांसाठी सुवर्ण कंकण, मानाचा हार, श्रीफळ व वस्त्र मुद्दाम सेवेकरी पाठवून अर्पण केले, आणि रु. पाचशेचे वर्षासन सुरु केले. हा फार मोठा सन्मान प. पू. श्रीदत्तमहाराजांचा झाला. प. पू. श्रीगुळवणीमहाराजाना तो कळताच त्यानीही त्यांचा जाहीर सत्कार केला.

ब्रह्मश्री भालचंद्रशास्त्री त्यानंतर काही दिवसानी पुण्यास आले. प. पू. श्रीदत्तमहाराजांचे बिऱ्हाडी गेले. प्राथमिक क्षेमकुशल झाल्यावर प. पू. श्रीमहाराजानी आईसाहेबांना हाक मारून श्रीशंकाराचार्यांकडून आलेले सुवर्ण कंकण आणायला सांगितले. सौ. आईसाहेबांनी ते सुवर्ण कंकण श्रीभालचंद्रशास्त्रींचे हाती ठेवले. त्यावेळी प. पू. श्रीमहाराज म्हणतात की ही किमया सर्व श्रीभालचंद्रशास्त्रींची आहे. त्यानी आमचे नांव पुरस्कारासाठी सुचविले म्हणून आमचा हा सन्मान झाला. प. पू. श्रीदत्तमहाराजांचा हा विनम्र भाव पाहून ब्रह्मश्री भालचंद्रशास्त्री अचंबित झाले. त्यांना प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या विनयाची माहिती असल्यामुळे ते म्हणाले की, **न ही कस्तुरी कामोदः रापयेन विभायते** । कस्तुरीला कुठे आपल्या गंधासाठी सांगावे लागते. प. पू. श्रीशंकराचार्यानाच ते ज्ञात झाले त्याचा आम्हाला आनंद झाला. प. पू. श्रीदत्तमहाराजांचा गुणविशेष आजही तसाच कायम आहे. त्याची प्रचिती प्रसंगोपात सर्व मंडळींना आजही येत असते.

अथा तो ब्रह्मजिज्ञासा

आंध्रप्रदेश सरकारच्या पुढाकाराने एक विद्वतसभा तिरुपतीला आयोजित करण्यात आली होती. शृंगेरीचे अभिनवविद्यातीर्थ जगद्-गुरु श्रीशंकराचार्य हे अध्यक्षस्थानी होते. अनेक त्रिमतस्थ पंडित, विद्वान, सभेला मुद्दाम बोलविले होते. ब्रह्मश्री भालचंद्रशास्त्रीबरोबर श्रीदत्तमहाराज ही खास निमंत्रित म्हणून उपस्थित होते. अथा तो ब्रह्मजिज्ञासा हा आयोजित केलेल्या चर्चासत्राचा विषय होता. विद्वान पंडितात महामहोपाध्याय श्री. अनंत कृष्णशास्त्री, मद्रासचे बाळसुब्रह्मण्यम्शास्त्री अशी विद्वान मंडळी होती. 'अथ' शब्दाचे एवढे सुंदर विवरण प. पू. श्रीदत्तमहाराजानी करून एक नवीन दृष्टीच सर्वांना दिली. आपल्याला हा अर्थ कसा सुचला नाही असेच सर्व विद्वानाना वाटले. प. पू. श्रीदत्तमहाराजांची एकमुखी तारीफ सर्वांनी केली. प. पू. श्रीदत्तमहाराजांचा व्यासंग, अभ्यास असा परिपूर्ण असतो याची प्रचिती सर्वांना आली. आधुनिक विद्वान मंडळी भारतीय शास्त्राना, वेदाना त्यांचा अभ्यास न करता नांवे ठेवीत असतात ते त्यामुळेच प. पू. श्रीदत्तमहाराजांना पसंत पडत नाही. बुद्धीवादी मंडळी पाश्चात्यांचे अंधानुकरण पदोपदी करताना, भारतीय वैदिक मंडळीना अंधानुकरण करतात म्हणून दोष लावतात. दोन्हीही चुकीचे. विषयाला दोन बाजू असतात असे आपण म्हणतो परंतु त्याचा विचार विषयावर विचार मांडताना करीत नाही.

●

बारा प्रश्नांची चर्चा

साण्डूर संस्थानातील कुमारस्वामी मंदिर प्रसिद्ध आहे. त्या संस्थानचे अधिपती श्री. यशवंतराव घोरपडे हे शास्त्रकर्माची आवड असणारे होते. त्यांनी **कुंडाभिषेक** व **मयूरस्वामी प्रतिष्ठापना** असा जोडकार्यक्रम आयोजित केला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चिंतामणी मठाचे स्वामी श्रीनिवासशास्त्री होते. या कार्यक्रमाची प्रस्तावना प. पू. श्रीदत्तमहाराजानी फार उत्तम तऱ्हेने केली. या साण्डूर संस्थानाचे युवराज हे आंग्लविद्या विभूषित असे बॅरिस्टर मुरारी म्हणून प्रसिद्ध होते. त्यानी धर्म व राजकारण यावर आधारित अशा बारा प्रश्नांची मांडणी केली. त्याची उकल करावी अशी प. पू. श्रीदत्तमहाराजांना विनंती केली. युवराजांची प्रशंसा करून या बारा प्रश्नांचे पाच प्रश्नात रुपांतर करून सर्वांवर श्रीमहाराजांनी एवढे सुंदर विवरण केले की बॅ. मुरारींचे समाधान झाले. प. पू. श्रीमहाराजांचा गौरव करताना आपण अनेक ठिकाणी हे प्रश्न विचारले होते. परंतु कुणीही समाधान करणारे उत्तर दिले नव्हते याचाही उल्लेख केला. भारतीय वैदिकशास्त्र, अध्यात्मशास्त्र केवढे प्रगत आहे याची प्रचीती श्रीमहाराजांच्या उत्तराने आज मिळाली असा गौरवपूर्ण उल्लेख केला.

संस्कृत पाठशाळेचा हीरक महोत्सव

धारवाडच्या **श्रीजगद्गुरु शंकराचार्य संस्कृत पाठशाळेचा हीरक महोत्सव १९५१ साली झाला.** ह्या पाठशाळेत ब्रह्मश्री भालचंद्रशास्त्रीचे पिताश्री, ब्रह्मश्री नागेश शास्त्रींचे अध्ययन याच पाठशाळेत झाले होते त्यावेळी त्यांचे सहाध्यायी कुडली शृंगेरीचे शंकराचार्य झालेले न्याय, वेदान्त, पंचाग, महामहोपाध्याय, ब्रह्मश्री विरुपाक्षशास्त्री होते. तसेच शृंगेरीमठाचे श्री चंद्रशेखर स्वामीही त्यावेळी त्याच पाठशाळेत अध्ययन करीत होते. अशी परंपरा लाभलेली शंभर वर्षाहूनही जुनी असलेली संस्कृत पाठशाळा धारवाड शहराचे भूषण आहे. त्यावेळी प्रमुख अतिथी म्हणून काशीचे श्री. राजेश्वरशास्त्री द्रविड उपस्थित होते. प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या मार्गदर्शनाखाली सर्व समारंभ पार पडला. त्यावेळी पाठशाळेची माहिती देण्याचे काम प. पू. श्रीदत्तमहाराजांकडे होते. त्याचे खास वैशिष्ट्य म्हणजे थोडक्यात पण प्रभावी शब्दात, अगदी पाच मिनिटांच्या अल्पकाळात पाठशाळेची माहिती देवून पाठशाळेची महती सांगितली. त्यावेळी पं. राजेश्वरशास्त्री द्रवीडानीही प. पू. श्रीदत्तमहाराजांचे कौतुक केले. वेळेच बंधन प. पू. श्रीमहाराज फार पाळतात. कोणताही विषय असो तो संक्षिप्त शब्दात किंवा विस्तृतपणे तितक्याच समर्थपणे ते विशद करु शकतात. रत्नागिरीच्या आकाशवाणीसाठी त्यानी चार महावाक्यावर संक्षिप्त व्याख्याने दिली 'आम्हाला किती वेळ बोलायचे आहे' अशी प. पू. श्रीमहाराजानी आकाशवाणीच्या संचालकांकडे पृच्छा केली. प्रत्येक महावाक्यासाठी ९ ते १० मिनिटे चालतील असे उत्तर आले. आश्चर्य म्हणजे ९ व्या मिनिटाला श्रीमहाराजांचे व्याख्यान संपायचे. कुठे साधे टिपणही नव्हते. विषयाचे सखोल सूक्ष्म परिपूर्ण ज्ञान असल्यामुळे वेळेचे बंधन त्यांना सहज पाळता येते.

औचित्य साधून पाठशाळेने प. पू. श्रीदत्तमहाराजांचे संक्षिप्त कानडी चरित्र त्यावेळी प्रसिद्ध केले. पाठशाळेचे विद्यार्थी, त्याशिवाय काहीकाळ अध्यापक, त्याशिवाय परंपरा पाळणारे शिष्य म्हणून गुणगौरव करणारे असे हे चरित्र धारवाड प्रांतात प. पू. महाराजांचे विषयी कमालीचा आदर, प्रेम, सद्भावना व्यक्त करणारे आहे.

*

श्रीगुरुदक्षिणा

धारवाडच्या ह्या संस्कृत पाठशाळेसाठी स्वाभाविक आत्मीयता, सद्भावना व प्रेम प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या मनात सदैव होते. ह्या पाठशाळेचे प्रमुख ब्रह्मश्री नागेशशास्त्री तर त्यांचे गुरु व पुत्रव्रत प्रेम करणारे असे होते. वेळोवेळी प. पू.

श्रीदत्तमहाराजांचा योग्य सल्ला त्यांना लाभत असे. ब्रह्मश्री भालचंद्रशास्त्री सांगतात की ब्रह्मश्री नागेशशास्त्रीचे वय झाले होते. अशावेळी ते पुण्याला प. पू. श्रीमहाराजांचे बिऱ्हाडी आले होते. जाता जाता प. पू. श्रीमहाराजाना त्यानी पाठशाळेची बिघडलेली आर्थिक परिस्थिती सांगितली. पाठशाळेकडे लक्ष पुरविण्यास सांगितले. प. पू. श्रीमहाराजानी पित्यासम असलेल्या आपल्या गुरूना पुढील काळात भरघोस गुरुदक्षिणा दिली. सद्‌गदीत कंठाने ब्रह्मश्री भालचंद्रशास्त्री सांगतात की ह्या दानाची कुठेही वाच्यता नाही. प. पू. श्रीदत्तमहाराजानी वडिलांच्या विनंतीप्रमाणे पुढे त्यांचेकडून झालेल्या भागवतसप्ताहातील रक्कम पाठशाळेकडे पाठविली. जवळजवळ ४० हजारांच्या आसपास ही गुरुदक्षिणा असेल. दानशूर म्हणून महाभारतातील कर्ण दानासाठी प्रसिद्ध आहे किंवा गुरुदक्षिणेसाठी एकलव्य प्रसिद्ध आहे. प. पू. श्रीदत्तमहाराजांची गुरुदक्षिणा त्याच तोडीची आहे असे म्हणणे उचित होईल. प. पू. श्रीदत्तमहाराज हस्ते परहस्ते असे अनेक दात्याना त्या पाठशाळेला मदत करण्यासाठी प्रेरणा देत असतात. पुण्याच्या अशाच ठाकूर नावाच्या उद्योगपतीने प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या सांगण्यावरून पासष्ट हजारांची देणगी पाठशाळेस दिली. संतांच्या संकल्पनाने अशा संस्था टिकतात, वाढतात आणि जनताजर्नादनाची सेवा त्यांचे हातून घडत रहाते. ब्रह्मश्री भालचंद्रशास्त्री आजही तिथे अध्यापन करीत असतात त्यांचे दोन सुपुत्र संस्थेचे कामकाज पाहतात तर धाकटे चिरंजीव श्री. राजेश्वरशास्त्री अध्यापकाचे कार्य तितक्याच समर्थपणे करीत असतात. धारवाड पंचागचा नुकताच सुवर्ण महोत्सव झाला. त्या पंचागसमितीत श्री. राजेश्वरशास्त्रीचा मोठा सहभाग आहे.

प. पू. श्रीदत्तमहाराज वस्तीला त्यांचे आप्त श्री. केळकर वकील यांचकडे असत. परंतु पाठशाळेत त्यांचे न्याय मीमांसा व्यतिरिक्त इतरही अभ्यास चालू असे. ब्रह्मश्री भालचंद्रशास्त्री सांगतात की ब्रह्मश्री नागेशशास्त्रींच्या आज्ञेवरून शांकरभाष्यावर ते पाठ देत असत. संध्याकाळी त्यांचेबरोबर फिरायला जाण्यातही शास्त्रचर्चेचा लाभ घडत असे. गावापासून दूर असलेल्या एखाद्या शेतात ही संध्याकाळची चर्चा रंगत असे. ब्रह्मश्री भालचंद्रशास्त्रीनी त्याचा अनेकवार सहभाग लुटला आहे. श्रीपादशास्त्री जेरें सारखी मंडळी धारवाडला आली की ही चर्चा अधिकच सखोल व्हायची आणि ती एक पर्वणीच ठरायची.

कैवल्यस्वामी पादुका प्रतिष्ठापना

धारवाड सोडल्यानंतर प. पू. श्रीदत्तमहाराज पुण्याला आले तरीही धारवाडमुळे कर्नाटक प्रांतात त्यांचा संबंध कायम राहिला. कैवल्यस्वामींची पादुका प्रतिष्ठापना प.

पू. श्रीदत्तमहाराजांचे शुभहस्ते गोकाकला झाली. गोकाकला प. पू. श्रीमहाराजावर प्रेम करणारी, त्यांच्या विद्वतेबद्दल आदर असणारी, त्याना देवपुरुष मानणारी अनेक भक्त मंडळी आहेत. पादुका स्थापनेनंतर प. पू. श्रीमहाराजानी पादुकाचे महत्त्व आणि सद्गुरु महात्म्य यावर दिलेले प्रवचन आजही अनेकांच्या स्मरणात आहे.



हल्याळ, गोकाकचा भागवत सप्ताह

हल्याळ येथेही प. पू. श्रीदत्तमहाराजानी एक भागवत सप्ताह केला होता. शृंगेरी पीठाचे श्रीशंकराचार्य त्याला उपस्थित होते.

गोकाकला प. पू. श्रीदत्तमहाराजांचा भागवत सप्ताह प. पू. श्रीयोगीराज गुळवणी महाराजांचे उपस्थितीत झाला. दशमस्कंधावरील भागवत तीन दिवसात पार पडले हे त्याचे खास वैशिष्ट्य. त्या व्यतिरिक्त होमहवनही झाले. त्यावेळी तिथे आंध्रातले ब्रह्मश्री नरसरामशास्त्री हे मांत्रिक शास्त्रात पारंगत असलेले एक पंडित आले होते. त्यानी अनसूया मंत्राचे विधान प. पू. श्रीगुळवणीमहाराजाना दिले. नरसोबावाडीचे श्रीविष्णूस्वामीनी दत्तमंत्र लिहून ठेवला होता. त्यावरून प. पू. श्रीगुळवणीमहाराज पाठ करीत होते. अनसूया मंत्राने प. पू. श्रीगुळवणीमहाराजाना परम संतोष झाला.



प. प. श्री नारायणस्वामींचा अतिरुद्र स्वाहाकार

केडगांवचे श्रीनारायणस्वामीमहाराज यानी ब्रह्मश्रीनागेशशास्त्री यांच्या अधिपत्याखाली अतिरुद्र स्वाहाकार आयोजित केला होता. ठिकठिकाणच्या एकंदर २५०० ऋत्विजांची निमंत्रणे, त्यांची सर्व व्यवस्था प. पू. श्रीदत्तमहाराजांवर सोपविली होती. त्यासाठी पत्रव्यवहारापासून त्यांचे मान, सन्मान वगैरे सर्व बाबी प. पू. श्रीदत्तमहाराजानी समर्थपणे सांभाळल्या. नऊ दिवस चाललेल्या त्या सोहळ्यात निरनिराळी अनुष्ठानेही चालू होती. असंख्य भक्तगणानी ह्या सोहळ्यास आपली उपस्थिती लावली. अभिषेक, स्वाहाकार, पूर्णाहुती व महाप्रसाद झाल्यावर संध्याकाळी ६ चे सुमारास प. प. श्रीनारायणस्वामी महाराजानी देह ठेवला तेव्हा एकच हल्लकल्लोळ झाला. प. पू. श्रीदत्तमहाराजानी त्यावेळी समर्थपणे भक्तांचे सांत्वन तर केलेच त्याचबरोबर श्री. नारायणस्वामी महाराजांचे और्ध्वदेहिक अंत्यसंस्कार शास्त्राधारे कसे केले पाहिजे त्याचे मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली प. पू. श्रीनारायणस्वामीमहाराजाना अंत्यसंस्कार घडले.



उगार येथील श्रीगुरुंची आराधना

कांची कामकोटीचे जगद्गुरू श्रीशंकराचार्य यांचा उगार येथे १५ दिवस मुक्काम होता. त्याच्या गुरुंच्या आराधनेचा कार्यक्रम त्यावेळी आयोजित केला होता. प. पू. श्रीदत्तमहाराजाना अगत्यपूर्ण निमंत्रण होते. त्यावेळी वेदान्तचर्चा घडायची. प. पू. श्रीदत्तमहाराजांचा वेदान्ताचा अभ्यास, त्यावरील त्यांचे मुद्देसूद विवरण, त्यातील निरनिराळ्या प्रश्नांची त्यानी केलेली उकल सर्वानाच आनंद देणारी ठरली. ज्ञानलालसी प्रश्नकर्त्याचे पूर्ण समाधान करणारी उत्तरे यानी जगद्गुरु श्रीशंकराचार्याना परमसंतोष झाला.

उगारचे यति श्रीनारायणानंद सरस्वतीमहाराजानी पूर्वाश्रमी प. पू. श्रीदत्तमहाराजांपाशी वेदान्ताचे अध्ययन केलेले होते. त्यानाही वेदान्ताच्या अभ्यासाचा पुन्हा आनंद लाभला.

*

श्रीदत्तमूर्ती स्थापना

मूळगुंद येथील श्री. श्रीपाद दीक्षित तापस हे प. पू. श्रीमहाराजांचे अनुग्रहीत. तिथे श्री. तापसांच्या आग्रहावरून ३ दिवसात भागवत वाचन व स्वाहाकार झाला. श्रीदत्तमूर्तीची स्थापना प. पू. श्रीदत्तमहाराजांचे हस्ते झाली. ही दत्तमूर्ती आम्हा सर्वांचे सांभाळ करीत आहे अशी श्रद्धा समस्त गावकऱ्यांची आहे.

*

शास्त्राभ्यास

प. पू. श्रीदत्तमहाराजांनी **न्यायमीसांसा, व्याकरण, वेदान्त, वेदांगे** यांचा अभ्यास केला त्या त्या शास्त्रात ते पारंगत झाले असे आपण वाचतो. आमच्यासारख्या सामान्यांना ही शास्त्रे म्हणजे काय याची कल्पनाच येत नाही. प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या ज्ञानाची खोली त्यामुळे आम्हा सामान्यजनांना अज्ञात असते. ती खोली थोडी तरी समजावी म्हणून त्याबद्दल थोडक्यांत झलकः

न्यायदर्शन

षडदर्शन न्याय हे प्रमुख दर्शन आहे. विविध प्रमाणांच्या साहाय्याने वस्तुतत्त्वाची परीक्षा करणे म्हणजे न्याय होय अशी त्याची व्याख्या केली आहे. न्यायाचे प्रतिपादन करणे हा न्यायदर्शनाचा विषय आहे.

न्यायविद्येचा उगम कधी झाला हे निश्चित सांगता येत नाही. पण तर्काच्या सहाय्याने वस्तुतत्त्व पारखण्याची पद्धती फार प्राचीन आहे. आत्मदर्शनासाठी तर्कानुकूल मनन करणे हा एक उपाय श्रुतींनी सांगितला आहे. न्यायदर्शनाची ग्रंथसंपदा विपुल आहे. सनपूर्व ६ व्या शतकापासून तो विसाव्या शतकापर्यंत अनेक प्रथितयश नैय्याकरणी होऊन गेले. निःश्रेयस प्राप्ती हे न्यायशास्त्राचे मुख्य प्रयोजन आहे. त्यामुळे आत्मसाक्षात्कार होतो.

मीमांसाशास्त्र

परस्परविरोधी वेदमंत्रातला विरोध दूर करून त्यांच्या अर्थाचा निर्णय ठरविणे याचे नाव मीमांसा होय. मीमांसा या शब्दाचा नेमका अर्थ म्हणजे संबंध निश्चिती होय. एखाद्या शब्दाचा अथवा वाक्याचा अर्थ निश्चित करतांना जो विचार करावा लागतो, जो तर्कवाद स्वीकारावा लागतो त्याला मीमांसा असे म्हणतात. ज्या परस्परावलंबी शब्दांनी अथवा वाक्यांनी अशी पद्धती शिकवली जाते त्या शब्दांना अथवा वाक्यसमूहाला मीमांसाशास्त्र हे नाव दिले गेले. धर्म या नावाच्या विषयाचे विवेचन करणे हे मीमांसेचे प्रयोजन आहे.

श्रुतीचे धर्मकांड व कर्मकांड असे दोन भाग आहेत.

यज्ञयागाच्या विधीचे व अनुष्ठानाचे वर्णन करणे हा कर्मकांडाचा विषय आहे. जीव, जगत, ईश्वर यांचे रूप व परस्परसंबंध या गोष्टीचे निरूपण करणे हा ज्ञानकांडाचा विषय आहे. या दोहोत दिसून येणाऱ्या विरोधांचे निराकरण करण्याच्या प्रधान उद्देशाने या दर्शनाची प्रवृत्ती झाली.

कर्मकांड हे वेदांचे पूर्वखंड आहे, तर ज्ञानकांड हे वेदांचे उत्तरकांड आहे. म्हणून या दर्शनाला पूर्व मीमांसा व ज्ञानकांडाला उत्तर मीमांसा असे म्हणतात.

वेदान्त

अद्वैत वेदान्त दर्शनाला वेदान्त म्हणतात. अद्वैत वेदान्त हे भारतीय अध्यात्म शास्त्रात मुकुटमणी मानले जाते. हे दर्शन उपनिषदातील सिद्धांतावर आधारलेले आहे. उपनिषदातील रहस्यमय वैदिक सिद्धांताचे प्रतिपादन करीत असल्यामुळे त्याला दिलेले वेदान्त (वेदाचा अंत) हे नाव सार्थ ठरते.

वेदांगे

वेदातील मंत्राचा अर्थ नीट समजण्यासाठी तसेच त्याचे विशेष विवरण करण्यासाठी वेदांग ग्रंथाचा उपयोग होतो. **शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंद आणि ज्योतिष** ही सहा वेदांगे आहेत. वेदांगे शब्दाची फोड वेद + अंगे वेदाचे

अंग अशी होत असली तरी वेदांगाचे समावेश श्रुतीत करीत नाहीत. **श्रुती म्हणजे वेद.** हे अपौरुषेय मानले आहेत. **वेदांगे ही मानवनिर्मित** आहेत म्हणून त्याचा अंतर्भाव श्रुती वाङ्मयात करीत नाहीत. श्रौतविधी व यज्ञयाग करण्यासाठीही हे ग्रंथ सहाय्यकारी होतात.

हे सर्व वाचल्यावर आपली बुद्धी विस्मय पावते, हे तत्वज्ञान ग्रहण करणारी बुद्धी किती निर्मळ सूक्ष्म असेल याची कल्पना येते.

❊

प. पू. श्रीदत्तमहाराजांची ग्रंथ संपदा

श्री. निंबाकाचार्य

श्री निंबाकाचार्यांचे मूळ नाव नियमानंद होते. ते दिसायला सुंदर असल्यामुळे लोक त्यांना **सुदर्शन** असेही म्हणत. यांचा जन्म दक्षिणेत तेलंगण प्रदेशात झाला असला तरी त्यांची कर्मभूमी व्रजमंडळ ही होती. श्रीनिंबाकाचार्यांनी ज्या स्वतंत्र दर्शनाचा पाया घातला त्याला द्वैताद्वैत दर्शन असे म्हणतात. त्यांनी वेदान्त **पारिजात सौरभ** हा ग्रंथ लिहिला. त्याचा अनुवाद श्रीदत्तमहाराजांनी केला. या सिद्धांतावरील पारिजात सौरभ या ग्रंथाचा प. पू. श्रीमहाराजांनी मराठी अनुवाद केला असून तो ग्रंथ प्रसिद्ध आहे.

श्री. माधवाचार्य

श्री. माधवाचार्य हे इ. स. १४ व्या शतकातील एक महापंडित व भाष्यकार होऊन गेले. यांच्या आईचे नाव श्रीमती व वडिलांचे नांव मायण होते. **भारततीर्थ, विद्यातीर्थ व श्रीकंठ** असे यांचे तीन गुरू.

श्री. माधवाचार्य हे विजयनगरच्या बुक्कराजाचे अमात्य होते. बुक्कराजा हा वैदिक वाङ्मयाचा चाहता होता. त्याला वाटले की वेद हे अर्थज्ञानास कठीण आहेत. त्याच्यावर भाष्य झाले तरच ते सुगम होतील. ही कल्पना त्यांच्या मनात बळावली व त्याने माधवाचार्यांना भाष्यरचनेची प्रेरणा दिली. 'सर्वज्ञ सही माधव' अशी माधवाचार्यांविषयी विदुक्ती आहे. पण ते केवळ विद्यापारंगत होते असे नाही, तर त्यांचे आचरणही शुद्ध, निर्मल, आणि श्रुती-स्मृतींना अनुसरून होते. आयुष्याच्या अखेरीस त्यानी संन्यास घेऊन विद्यारण्य हे नाव धारण केले. हे दार्शनिक विद्वान होते. त्यानी सर्वदर्शन संग्रह नावाचा एक ग्रंथ लिहिला असून तो दार्शनिक वाङ्मयाच्या इतिहासात महत्त्वाचा ठरला आहे.

श्री. माधवाचार्य यांच्या **सर्वदर्शन संग्रहावरही** प. पू. श्रीदत्तमहाराजांनी मौलिक टीका लिहिली आहे, पण ती अजून अप्रकाशित आहे.

प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांचे चरित्रलेखन त्यांनी रसाळ भाषेत केवळ एक महिन्यात लिहिले. त्याची एक आवृत्ती संपून दुसरी आवृत्ती छापली गेली आहे.

श्री वासुदेवानंद सरस्वती ग्रंथप्रकाशन

१९५१ साली श्रीगुरूमहाराजांकडे वासुदेवानंद सरस्वती यांचा **जन्मशताब्दी उत्सव** साजरा करण्याची बोलणी सुरू झाली. त्यावेळी स्वामीचे सर्व वाङ्मय ग्रंथरुपाने प्रकाशित करण्याचा विचार झाला. प. प. स्वामी महाराजांची वाङ्मयसंपदा शक्तिसंपन्न आहे ती पुर्नमुद्रित व्हावी असे श्री गुरुमहाराजांना वाटत होते. त्यासाठी संस्कृत जाणकार तज्ञ पाहिजे होता. प. प. दीक्षीत स्वामीमहाराजांकडे प. प. स्वामी महाराजांची ही वाङ्मयसंपदा प. पू. श्रीदत्तमहाराजांनी पाहिली होती. त्यावेळी त्यांनाही वाटत होते की स्वामी महाराजांचे हे सर्व वाङ्मय प्रकाशित झाले पाहिजे आपण तर अकिंचन. हे कसे जमणार?

प. पू. श्रीगुरुमहाराजानी विचारताच प. पू. श्रीदत्तमहाराजाना आनंद झाला. त्यानी तात्काळ संमती दिली. जीवनाचे धागे एकमेकात गुंफलेले असतात. प. पू. श्रीगुळवणीमहाराज श्रीदत्तमहाराजांना म्हणाले, 'आपण केलेत तर होणार आहे.' श्रीदत्तमहाराजांनी कार्यवाह पदाची सूत्रे स्विकारली. प्रकाशन मंडळ स्थापन झाले.

श्रीवासुदेव ग्रंथ प्रकाशन मंडळ

प. पू. श्री. वामन दत्तात्रय गुळवणी महाराज	अध्यक्ष
ब्रह्मश्री श्री. दत्तात्रयशास्त्री कवीश्वर	कार्यवाह

मंडळाचे सदस्य

साहित्याचार्य श्री. बाळशास्त्री हरदास
श्री. शंकर कृष्णाजी देशमुख (आजेगावकर वकील)
श्री. भुजंग बळवंत भालेराव (पुणे)
श्री. विश्वनाथ जोशी वकील हिंगोली
श्री. विष्णू अनंत पंची, हैद्राबाद
श्री. लक्ष्मणराव वरुडकर, वकील
श्री. नानासाहेब नाईक, उमरेड
श्री. बापुसाहेब कुबडे, सोलापूर
श्री. दिगंबर एरंडे, एम. ए. बी. टी., पुणे

माणगावहून, वाडीहून मूळच्या हस्तलिखित पोथ्या आणल्या, टीपा, अर्थ, भाषांतर इ. आवश्यक ते संपादन केले. संस्कृत भाषा म्हणून मुद्रिते काळजीपूर्वक तपासली. या सर्व कार्यात प. पू. श्रीदत्तमहाराज जातीने सर्व नियोजन करीत होते. बरीच कामे स्वतःच करीत.

त्याशिवाय प. पू. श्रीगुरूमहाराजांकडे कितीतरी आध्यात्मिक पुस्तके प्रास्ताविकासाठी. अभिप्रायासाठी, आशीर्वादासाठी येत असत. श्रीगुरूमहाराज हे सारे लेखनाचे काम श्रीदत्तमहाराजांकडे सोपवीत. त्यांनी वाचून दाखविले कीं सही करीत. शब्दाचाही बदल करीत नसत. कोणाच्या सत्कारानिमित्त बोलणे, आशीर्वादपर बोलणे सारे काही ते प. पू. श्रीदत्तमहाराजांवर सोपवीत.

प. पू. श्री रंगावधूत स्वामी महाराजांचे पत्र

प. पू. श्रीवासुदेवानंदांचे समग्र साहित्य प्रसिद्ध होणार हे पाहून रंगावधूत स्वामींना फार आनंद झाला व त्यांचे पत्र आले त्याचा भावार्थ –

सुर्योदयापूर्वी ज्याप्रमाणे अरुणाची प्रभा तशी ही योजना आहे. मधमाशीच्या मुखातून जसा मध बाहेर पडतो तसा आमच्या अंतःकरणातून या कार्याच्या सिद्धीविषयी आपोआप आशिर्वाद रुपी जलाचा वर्षाव होत आहे. श्री सद्गुरुप्रेरणेने तुमच्या सर्व इच्छा सफल होवोत हे अंगीकृत महान कार्य लवकर तडीस जावो. पूर्वीप्रमाणे या भारतवर्षात धर्माची अभिवृद्धी होवो.

जीवनगंगा कलश ३ रा वरून

विवाह व गृहस्थाश्रम

प. पू. श्रीदत्तमहाराजांचे जन्मस्थान वाडी. मौजीबंधन व विवाह वाडीलाच झाला. दत्तपीठाचे अधिकारी दत्तांच्या राजधानीत जन्म घेतात, विद्यार्जन करतात, गृहस्थाश्रम स्वीकारतात. जीवनातील महत्त्वाची कामगिरी ठरलेली भागवताची सुरवात वाडीमध्येच सुरु झाली हा विशेष योग आहे. अशा दत्तसांप्रदायी नरसोबावाडीतून दत्तनाम घेऊन दत्तयोगी गुळवणी महाराजांचे दरबारी प. पू. श्रीमहाराज आले हा विलक्षण योगायोग.

१९३० साली वाडीलाच महाराजांचा विवाह झाला व गृहस्थाश्रमाची सुरूवात झाली. त्यावेळी महाराजांचे वय वीस वर्षाचे होते व सौ. लक्ष्मीवहिनींचे वय अवघे बारा वर्षांचे होते.

वैराग्याशी जडले नाते। पाठक दुहितेचे। शुभमंगल झाले कवीश्वरांचे ।।

आजच्या सौ. लक्ष्मीबाई कवीश्वर या पूर्वाश्रमीच्या सुंदरताई भगवंतराव पाठक होत. अंबऋषीकरिता भगवंत ज्या ठिकाणी अवतार घेऊन राहिले तेच बार्शीगाव सुंदरताईचे माहेर. या गावात त्यांचे पिताजी भगवंतराव रहात असत. साधे बाळबोध घराणे होते. सुंदरताईना एकच बहीण. सुंदर एक-दीड वर्षाची असतानाच आई गेली. आईची उणीव वडिलांनीच भरून काढली. दोन्हीकडची आजोबा-आजी, काका-काकू वगैरे मंडळी होती. एकत्र कुटुंबपद्धतीमुळे घर भरलेले असे. बार्शीच्या शाळेत त्या जात असत. सातवीपर्यंत शिक्षण झाले होते.

वडील भगवत्भक्त, मनाने साधे सरळ होते. अशा ह्या बार्शी गावातच महाराजांचे पिताश्री प. पू. श्रीधुंडिराज महाराजांचा मुक्काम वारंवार होत असे. पुराण-प्रवचने होत. येथेही त्यांच्याभोवती अनेक लोकांचा समुदाय असे. एका भक्ताने तर श्रीधुंडिराज महाराजाना घर बक्षीस दिले होते. त्या ठिकाणी ते मातोश्री सौ. सरस्वतीबाईबरोबर राहात असत. जन-जागृतीचे काम अखंड चालू असे. सर्वजण सौ. सरस्वतीबाईना आईसाहेब म्हणत असत.

श्री पाठक मंडळींनी धुंडिराज महाराजांना गुरूस्थानी मानून त्यांचा मंत्रोपदेश घेतला होता. श्री पाठक व श्री कवीश्वर यांचे भगवंताच्या दरबारी गुरुशिष्य असे नाते जोडले गेले होते. भगवंताच्या मनात काही वेगळाच योग जुळवून आणावयाचा होता. एका सकाळी सरस्वतीबाई सहज ओटीवर बसल्या होत्या. परकर-पोलका नेसलेली कु. सुंदर दुरून काहीतरी बाजारातून घेऊन येत होती. तिला सौ. सरस्वतीबाईनी पाहिल्यावर सहज हाक मारली ''सुंदर जरा ये ना घरात''

कु. सुंदर थोडी गडबडली. परकराच्या ओच्यातच बाजारातून आणलेली वस्तूंची पुडी धरलेली होती. सौ. आईसाहेबांनी बोलावले की जायलाच पाहिजे असा गावात देखील शिरस्ता होता. त्याप्रमाणे सुंदरलाही वाटले. ताबडतोब ती आत आली व म्हणाली,

''आपण मला हांक मारलीत''

आईसाहेब म्हणाल्या ''हो. कुठे गेली होतीस?''

''बाजारात वस्तू आणावयास गेले होते'' सुंदर म्हणाली.

''काय ग, या वाड्यात मैत्रिणी आहेत का तुझ्या?'' आईसाहेबांनी विचारले. सुंदरचा नि आईसाहेबांचा हा संवाद चालू होता. तेवढ्यात सुंदरने सहज बाजूला पाहिले. तो एका खुर्चीवर एक व्यक्ती वाचीत असलेली व वाचनात गुंग असलेली तिने पाहिली.

सौ. आईसाहेब तिला म्हणाल्या, ''येत जा बरं का मैत्रिणीकडे आलीस की इकडे.''

''हो येईन की'' असे म्हणून सुंदरने ओच्यातील पुडी बाजूला ठेवली. चटकन आईसाहेबांना वाकून नमस्कार केला. 'येते बरं का' असे म्हणून ती घरी गेली.

काकांनी विचारले, ''का ग सुंदर, वेळ कां लागला?''

''अहो काका, शेजारच्या आईसाहेबांनी हाक मारली म्हणून गेले होते त्यांच्या घरी'' कु. सुंदर उत्तरली.

''अशीच गेलीस? परकरात पुडी घेऊन? घरी येऊन नीटनेटके होऊन तरी जायचेस''.

''सौ. आईसाहेबांनी बोलावले की लगेच जायला हवे अशी तुमचीच सांगी असते म्हणून मी लगेच गेले.'' सुंदर म्हणाली.

''अगं पण, आज त्यांचा थोरला मुलगा दत्तात्रेय घरी आलेला आहे'' काका म्हणाले. कु. सुंदरच्या डोक्यात काही या वाक्याचा फारसा प्रकाश पडला नाही. घरी येऊन नीटनेटके होऊन का जायला हवे होते त्याच्याकडे? तिला वाटले ''या वडील मंडळीच्या मनातले काही कळत नाही एवढे खरे!'' असेच काही दिवस गेले. सुंदरचे बाळपण जात होते. एक दिवस घरात गडबड उडालेली दिसली. काकांचे व वडिलांचे बोलणे तिच्या कानी पडत होते की आज टांगा घेऊन स्टेशनवर जावयाचे. कारण श्रीधुंडिराजमहाराज आज देऊळगावराजाहून येणार आहेत. त्यांना प्रथम आपल्याकडेच आणावयाचे, बोलणे करूनच सोडायचे. सौ. आईसाहेबांच्या सुंदर मनात भरली होती.

छोट्या कु. सुंदरला समजेना की स्टेशनवरून परस्पर घरी आणावयाचे आहे ते कशाला आणि बोलणे करायचे आहे म्हणजे काय?

गंमत अशी झाली होती की चार वधू-पित्यांचे टांगे स्टेशनवर उभे होते. चारी मुली आईसाहेबांनी नजरेखालून घातलेल्या होत्या. चौघांनाही वाटत होते, की श्री धुंडिराज महाराजांना आपल्या घरी आणावयाचे. ज्याच्या घरी ते प्रथम जातील त्यांनी लग्नाचे बोलणे पक्के करावयाचे.

गाडी आली. चार वधू-पित्यांचे टांगे स्टेशनवरच आले होते. सुंदरच्या काकांचा नंबर पहिला लागला. काकांच्या टांग्यात प. पू. श्रीधुंडिराजमहाराज बसले. त्यांना घरी आणले. मुलगी आधीच पाहिलेली आहे. पत्रिका जमलेली आहे. तेव्हा आज बैठक करूनच बाहेर पडावयाचे, असे वडिलांनी सांगितले.

श्रीधुंडिराजमहाराज म्हणाले, ''ठीक आहे. आमच्या अटी कांही नाहीत. मानपान वगैरे अपेक्षाही नाहीत. वाडीला येऊन लग्न करून द्या म्हणजे झाले. कु. सुंदरच्या वडिलांनी ते मान्य केले. सुंदरचे लग्न पक्के झाले! इतर वधूपित्यांना वाईट वाटले नाही. उलट आनंदच झाला. खुल्या मनाची माणसे असणारा असाही एक काळ होता.

कु. सुंदरचे असे लग्न ठरले. घरी मोठा आनंदी-आनंद झाला. सुंदर मोठी भाग्याची ठरली. ईश्वरी कृपाप्रसाद असलेल्या कवीश्वरांच्या घराण्यात ती पडली याचा फार मोठा आनंद वडीलांना झाला. ते आईसाहेबांना म्हणाले, ''माझ्या मुलीला आई नाही. आपण तिला आई मिळालात. माझी सर्व चिंता मिटली!''

लग्नसोहळा

श्री. भगवंतराव पाठकांनी लग्नाची तयारी मोठी हौशीने-उमेदीने केली. सर्व सामानसुमान घेऊन ही मंडळी वाडीला आली. वडील सुंदरला घेऊन प्रथम देवापाशी गेले. प्रार्थना केली, 'गुरूराया, कृपाहस्त आपुला ठेवा। अन्य मागणे नाही देवा.'

वाडीकरांचे अंगणात माघ वद्य चतुर्थीच्या शुभमुहूर्तावर विवाह झाला. चि. कु. सुंदर आता चि. सौ. लक्ष्मीबाई झाल्या. कवीश्वर घराण्यात गणपतीचीही उपासना होती. त्यामुळे लग्न माघी चतुर्थीलाच झाले. त्यादिवसापासून चतुर्थी करावयास सुरुवात झाली. लग्नसोहळा पाच दिवस फार कौतुकाने चालला होता. वरदक्षिणा म्हणून वडिलांनी एक हजार एक रुपये दिले. सौ. आईसाहेबांचे मानपान हौशीने केले. चि. सुंदरची आई नसूनसुध्दा लग्नात कुठे कशाचीही उणीव सौ. आईसाहेबांनी भासू दिली नाही.

विद्याव्यासंगी श्रीदत्तमहाराजांसारखा जावई मिळाला म्हणून भगवंतराव पाठकांना फार आनंद झाला. तो त्यांच्या चेहेऱ्यावरुन ओसंडत होता. धन्यता वाटत होती. शब्दांनी ते कसे बोलावे हे समजत नव्हते. शेवटी श्री. धुंडिराज महाराज व सौ. आईसाहेब यांचा साश्रुनयनांनी निरोप घेतला, 'मुलगी आता आपलीच झाली' एवढेच बोलून ते बार्शीला परत आले.

पहिले दिवस

१९३० सालापासून श्रीदत्तमहाराजांच्या वैवाहिक जीवनास सुरवात झाली तीही वाडीतच. सौ. लक्ष्मीबाईचा वाडीसेवेचा शुभारंभ प्रदक्षिणांनी झाला. आजे-सासूबाई, सासुबाईप्रमाणेच त्याही श्रीपादुकांभोवती प्रदक्षिणा घालू लागल्या. श्रीदत्तमहाराजांनी त्यांना सांगितले की रोज झोपण्यापूर्वी दत्तमहात्म्याचा एक तरी अध्याय वाचीत जा आणि श्रीवासुदेवानंद सरस्वतींच्याही ओवरीत रोज संध्याकाळी थोडावेळ दिगंबराची धून सांगत जा. त्याप्रमाणे त्या वाचू लागल्या. आपल्या या सुरुवातीच्या पाच वर्षांच्या वाडीतील सांसारिक जीवनाचे वर्णन त्या 'फार आनंदाचा काळ' असे करतात. त्या म्हणतात, 'बारातेरा वर्षांचे वय इतके लहान होते की संसारातील गंभीरता किंवा सासर हा फरक फारसा कळलाच नव्हता. नदीवर जायचे, पाणी आणायचे, स्नान करायचे, प्रदक्षिणा घालायच्या. उरलेल्या वेळात समवयस्कर मुलींबरोबर गप्पाटप्पा करायच्या ह्यातच वेळ कसा भुरकन निघून जाई.''

एकदा वाडीला तंबूतला सिनेमा आला होता. श्रीधुंडिराजमहाराजांना वाटले की सूनबाईचे वय लहान आहे. तिला पाहावासा वाटत असेल. श्रीदत्तमहाराज काही तिला घेऊन जाणार नाहीत. त्यांनी सूनबाईसाठी म्हणून मुद्दाम आईसाहेबांना विचारले, 'काय आपण सिनेमाला जाऊ या का?'- आईसाहेब म्हणाल्या, 'मला नाही काही तुमचा सिनेमा-बिनेमा आवडत? तुम्ही आपल्या सुनेला घेऊन जा!' खरं म्हणजे श्रीधुंडिराजमहाराजांना थोडाच सिनेमात रस होता? पण आपल्या सुनेचे बालवय लक्षात घेऊन त्यांनी सिनेमा पाहिला. सौ. लक्ष्मीबाई बालपणीच्या आठवणी काढीत म्हणाल्या, 'माझ्या मामंजींबरोबर तंबूतला सिनेमा मोठ्या गंमतीने पाहिला. सासरी असलेले धार्मिक किंवा उपासनेचे वातावरण माहेरी नव्हते. त्यामुळे अष्टौप्रहर चाललेली चर्चा, मोठ्या भक्तीभावनेने जमलेली मंडळी याचा उलगडा माझ्या मनाला होत नसे. ह्यांचा प्रथमपासूनचा असलेला अबोल, गंभीर स्वभाव व काहीतरी मोठमोठे ग्रंथ वाचण्यात एकाग्र झालेले मन हे सारे पाहून मन जरी भांबावले परिचयाचे झाले तरी, झेपले मात्र नाही. मी आपली साधी-सुधी संसारी गृहिणीच राहिले!' सौ. आईसाहेबांनी सांगितलेला, शिकविलेला कुळधर्म, कुलाचार, व्रतवैकल्ये, जप, वाचन हे मात्र न चुकता केले.

एकदा १९३३ साली श्रीधुंडिराजमहाराज व सौ. आईसाहेबांबरोबर आम्ही उभयता माहुरला गेलो होतो. आमचेबरोबर प. पू. श्रीगुळवणीमहाराज पण होते. माहुरला एक आठवडाभर श्री. विष्णुदासबुवांच्या मठात होतो. बडनेरा, कारंजा, मूर्तिजापूर, वाशिम इत्यादी झाले. कारंजा येथे पूजाअर्चा सर्व यथासांग झाले. येथपासून श्रीधुंडिराज महाराजांप्रमाणेच त्या श्रीगुळवणीमहाराजांच्या सतत सहवासात आलेल्या आहेत. त्यांच्या मूर्तिमंत वात्सल्याचा झरा कवीश्वर घराण्याला सतत लाभलेला आहे. कुठलेही कार्य घ्या, त्यामध्ये श्रीगुळवणीमहाराज नाहीत किंवा त्यांचा सल्ला घेतलेला नाही असे काही झालेले नाही. सौ. लक्ष्मीबाईना ते सूनबाईच म्हणत असत.

पुण्यात बिऱ्हाड

१९३३ ते १९३७ या काळात प. पू. श्रीदत्तमहाराजांनी धारवाडला अध्ययन तर केलेच त्याशिवाय आचारसंपन्न जगतमान्य विद्वान असा नांवलौकिक मिळविला तो भाग मागे पाहिलाच आहे.

१९३७ साली श्री. दत्तमहाराज, सौ. लक्ष्मीबाई, दत्तमहाराजांची आजी सावित्रीबाई असे सर्वजण पुण्यात आले. त्यांचे नातूंच्या वाड्यात बिऱ्हाड झाले. श्री नातूंना श्रीदत्तमहाराजांच्याविषयी फार जिव्हाळा व कवीश्वर घराण्याविषयी आपुलकी वाटे. काकड आरतीपासून सर्व धार्मिक कार्ये त्यांचेकडे होत. त्यांच्याकडे पांडुरंगाची एक फार सुरेख मूर्ती होती. शेजार फार चांगला होता. जागाही छान होती. यावेळी श्रीदत्तमहाराजांकडे शिकायला काही विद्यार्थी गुरुकुल पध्दतीने रहात असत. त्यामुळे त्यांना जेवू घालण्यात लक्ष्मीबाईना फार मोठा आनंद वाटे. ह्या गोष्टीचा लक्ष्मीबाईना कधी कंटाळा आला नाही. हे विद्यार्थीही मोठ्या नम्रतेने वागत. श्रीदत्तमहाराजांचेविषयी त्यांना मोठा आदरभाव वाटे. सारी कामे मोठ्या आनंदाने करीत असत.

लक्ष्मीबाई म्हणतात, 'हाही काळ कसा झटपट व आनंदात गेला. एक दिवस गंमतच झाली. एका लग्नाला त्या गेल्या होत्या. लग्नकार्याहून परत येताना रात्र झाली. घरी यायला खूप उशीर झाला. मुले व त्या लग्नाला गेलेल्या. साधारण व्यवहाराचा सर्व भार श्रीदत्तमहाराजांनी त्यांचेवरच सोपवला होता. त्यामुळे श्रीदत्तमहाराज स्वत: घरी होते. टांगा करुन घरी यावयाचे म्हटले तरी नऊ वाजले होते. आता घरी जाऊन पिठलं-भात जरी करुन श्रीदत्तमहाराजांना व विद्यार्थ्यांना वाढावयाचा म्हटले तरी एक तास लागणार होता. खूपच उशीर झाला. उशीर होणार ह्याच गोष्टीची धास्ती सौ. लक्ष्मीबाईना वाटली. त्यामुळे श्रीदत्तमहाराज रागावतील की

काय असे त्यांच्या मनात येत होते. घरी आल्यावर पाहातात तो काय, सगळीकडे सामसूम होते. बापरे! सर्व मंडळी वाट पाहून तशीच झोपली की काय, असे वाटून सौ. लक्ष्मीबाईना जास्तच रुखरुख वाटली. विचारणार कुणाला? बघितले तर सारेजण आपले वाचीत, गप्पा मारीत बसले होते. इतक्यात एक विद्यार्थी पुढे येऊन म्हणाला, ''आम्ही पिठलेभात करुन गुरुजींना वाढले. सारे काही आटपून तुमचे झाकून ठेवले आहे.'' सौ. लक्ष्मीबाईना त्या शिष्यवर्गाचे अतिशय कौतुक वाटले. किती हा सेवाभाव! धन्य ते शिष्य व धन्य ते गुरुवर्य!

सौ. लक्ष्मीबाईनी असे आनंदाचे क्षण त्यांच्या संसारात वेळोवेळी वेचले आहेत. एक दिवस श्रीदत्तमहाराजांनी नातूंचा वाडा सोडावयाचे ठरविले. कारण श्री नातू श्रीदत्तमहाराजांचेकडून भाडे घेईनात. श्रीदत्तमहाराजांचा स्वभाव पहिल्यापासून भिडस्त, संकोची. असे विनामूल्य राहणे त्यांच्या मनाला मुळींच पटणारे नव्हते. श्री. नातूंना श्रीदत्तमहाराजांनी भाडे घेण्याविषयी पुष्कळ सांगून पाहिले पण ते ऐकेनात अखेरीस सौ. लक्ष्मीबाईनी तोडगा काढला की आपण श्री. नातूंना ह्या ना त्या स्वरुपात काहीतरी देऊ. प. पू. श्रीदत्तमहाराजांना काही ही गोष्ट पटली नाही. ते म्हणाले, असे भाडे न देता राहणे योग्य नव्हे. शेवटी त्यांनी नातूंच्या वाड्यातील बिऱ्हाड हलविले. ते दुसरीकडे राहावयास गेले. नातूंना ह्या गोष्टीचे फार वाईट वाटले. श्रीदत्तमहाराज आपले तत्त्व सोडीनात. त्यांचे म्हणणे कुणाचेही काही विनाकारण घेऊ नये. कर्ज काढून संसार करु नका. आपले अंथरुण पाहूनच पाय पसरा स्वत: श्रीदत्तमहाराजांनी हे स्वीकारले आणि अंगीकारले आहे.

आता श्रीदत्तमहाराजांचे बिऱ्हाड सदाशिव पेठेत आगाशांच्या वाड्यात आले. त्यांचा पहिला मुलगा चार वर्षांचा होऊन देवाघरी गेला. सर्वांनाच विशेषत: मामंजी-सासूबाईना दु:ख झाले. पुढे सुमनचा जन्म झाला. तिच्या पाठीवर अशोक झाला. प्रतिकूल परिस्थितीला शांतपणे तोंड देण्याचा स्वभाव! अशोकच्या वेळी सासूबाई देवाजवळ नवस बोलल्या होत्या, की मुलगा होऊ दे. त्याचे जावळ माहूरला येऊन करु! माहूर म्हणजे श्रीदत्ताचे जन्मस्थान व रेणुकादेवीचे म्हणजे श्रीदत्तमहाराजांच्या कूलदेवतेचे देवस्थान. **१९४४** सालची ही गोष्ट. श्रीदत्तमहाराज, सौ. लक्ष्मीबाई, सौ. सासूबाई व मामंजी असे सर्वजण प. पू. श्रीगुळवणीमहाराजांसह पुन्हा माहूरला आले. यावेळेससुध्दा मुक्काम विष्णुदासबुवांच्या आश्रमात होता. प. पू. श्रीगुळवणीमहाराज अगदी आपलेपणाने साऱ्या गोष्टीत भाग घेत असत. प. पू. श्रीगुळवणीमहाराजांचा खरोखरीच मोठा आधार श्रीदत्तमहाराजांना प्रथमपासून मिळाला होता.

धारवाडहून **१९३७** साली परत आल्यावर प. पू. श्रीदत्तमहाराजानी पुण्यात बिऱ्हाड केले. श्री. शंकराचार्य शिरोडकर स्वामीमहाराज यांच्या सांगण्यावरून

मुंजोबाच्या बोळातील मठात मुलाना शिकविण्यासाठी अध्यापक म्हणून जाऊ लागले. पगार फक्त तीस रुपये होता. घरुन धान्य यावयाचे स्वस्ताई होती. राहणी अगदी साधी होती. त्यामुळे सारे काही व्यवस्थित भागत असे. प. पू. श्रीदत्तमहाराजांचा स्वभाव पहिल्यापासूनच समाधानी असे. पुढे श्री. शंकराचार्यांचे ओळखीने वर्तक वाड्यात जागा मिळाली. लौकीक जीवनात दिसून येणारी अनासक्त वृत्ती गृहस्थाश्रम स्वीकारल्यानंतरही विना दैन्येन्य जीवनम् एवढीच मनोवृत्ती ठेवलेली दिसून येते. अन्न, वस्त्र, निवारा याच जीवनाच्या किमान गरजा त्यांनी ठेवल्या होत्या.

ते प्रवचनातून सांगतात त्याप्रमाणे ज्ञानधनं व तपोधन हेच धन आयुष्यभर त्यांनी मानले. लहानपणापासून शास्त्रांचे अध्ययन, उपासना हे चालूच असल्यामुळे जीवनाला पावित्र्य आले. त्यांच्या तरुण वयात सात्विक गुणांची लक्षणे दिसू लागली. संसारही एकनाथांप्रमाणेच करण्याची प्रवृत्ती कळून येते. कशातही ते गुंतलेले नाहीत. पद्मपत्राप्रमाणे अलिप्तपणा स्वीकारलेला कळून येतो.

सौ. लक्ष्मीबाई सांगतात की त्यावेळी मोठमोठ्या सभेत प. पू. श्रीदत्तमहाराजांची भाषणे होत, गौरव होत. सौ. लक्ष्मीबाईंना स्वतःला जाण्याची वेळ येत नसे. प. पू. श्रीदत्तमहाराजही त्यांना बरोबर घेऊन सभेत वगैरे जात नसत. ह्याविषयी त्या म्हणतात. 'संसाराची एक बाजू संभाळावी असे वाटे. ती मी जितकी चांगल्या प्रकारे संभाळता येईल तेवढी सांभाळत असे. दुसरे काही करता आले नाही तरी निदान काटकसर तरी करता येणे शक्य होते व ती केली.' सौ. लक्ष्मीबाईनी काटकसर करण्याकरिता स्वतः धुणीभांडी केली व तेही कुणाला न समजू देता.

*

मातृदेवो, पितृदेवो भव!

प. पू. श्रीदत्तमहाराज आईवडिलांना खूप मान देत असत. वडिलांच्यासमोर ते सतत उभे राहत असत. वडिलांना कुणीही बोललेले त्यांना खपत नसे. एकदा सौ. लक्ष्मीबाई घरातील नात्याच्याच कुणाचे तरी लग्नात मामंजीविषयी काहीतरी गैरसमज निर्माण होईल असे बोलल्या असे श्रीधुंडिराजमहाराजांच्या कानांवर गेले. त्यांचे तशा अर्थाचे पत्र श्रीदत्तमहाराजांना आले. ह्या गोष्टीचा त्यांना फार राग आला. आई-वडिलांविषयी आपल्या पत्नीने काहीही अवाजवी बोलणे हे श्रीदत्तमहाराजांना बिलकूल आवडले नाही. त्यांनी सौ. लक्ष्मीबाईना ताबडतोब वाडीला पाठवून दिले. तसे एरवी शांत असणारे श्रीदत्तमहाराज तत्त्वाच्या बाबतीत फार परखड होते. पुढे हा केवळ गैरसमजच आहे अशी मामंजीची खात्री पटल्यावर श्रीमहाराजांना त्यांनी तसे कळविल्यावर त्यांचा राग गेला.

औरवाडला गायत्री अनुष्ठान

प. पू. श्रीदत्तमहाराजांनी तीन महिने औरवाडला राहून गायत्री अनुष्ठान केले. त्यावेळी सौ. लक्ष्मीबाई सोवळ्यात सैंपाक करुन सोवळ्यातच नदीच्या पात्रातून श्रीदत्तमहाराजांना जेवण घेऊन जात.

पुण्यातील वास्तव्य

श्रीदत्तमहाराज पुण्यातील वास्तव्यात पहाटे लवकर उठून स्वतःचे पाणी स्वतः तापवून घेत असत. सौ. लक्ष्मीबाईना वा कोणालाच त्यांचा वैयक्तिक गोष्टीसाठी त्रास नसे. ७ वाजेपर्यंत आन्हिक आटपून विद्यापीठात जाणे होई. ११ वाजता परत आल्यावर उरलेले आन्हिक-पोथीवाचन होई. ते भोजनोत्तर कधी विश्रांती घेत नसत. त्यानंतर शिकवणीसाठी विद्यार्थी येत.

सर्वश्री गाडगीळ, जांबोरकर, जगन्नाथगुरुजी, कोडणीकर, अनंतशास्त्री पारखी ही मंडळी दीड वाजता येत. साडेतीन वाजता ही मंडळी गेली की ते विद्यापीठात जात. साडेसहा वाजता परत येत. सायंसंध्येनंतर पुन्हा वाचन. संध्याकाळी भेटू इच्छिणारे लोक येत. प. पू. श्रीगुळवणीमहाराजांकडे जाणे असे. इतर सभा-संमेलने असत. रात्री झोपावयास अकरा वाजत असतच. असा सातत्याचा कार्यक्रम असे.

या पुण्याच्या वास्तव्यात प. पू. श्रीगुळवणीमहाराजांचा सहवास श्रीदत्त-महाराजांना व सौ. लक्ष्मीबाईना फार लाभला. प. पू. श्रीगुळवणीमहाराज सकाळी एक फेरफटका मारीत असत. घरी परताना श्रीदत्तमहाराजांचे घरी थेट स्वयंपाकघरातच जात. स्वयंपाकघरात सौ. लक्ष्मीबाई त्यांचेसाठी आसन मांडूनच ठेवीत. प. पू. श्रीगुळवणीमहाराज वडिलधाऱ्यांच्या मायेने सौ. लक्ष्मीबाईची व मुलाबाळांचीसुध्दा चौकशी करीत. थोडा वेळ त्यांचेकडे बसत. मुलांना नीट अभ्यास करा असे सांगत. सौ. लक्ष्मीबाई आपली कृतज्ञता व्यक्त करुन म्हणतात की, 'एवढ्या मायेने विचारपूस करीत की त्यांच्या येण्याची मुले वाट पहात असत! नेहमी प्रसन्न चेहरा. हळुवार बोलणे. प्रेमळ शब्द यांनी खरेच खूप उत्साह येई. श्रीदत्तमहाराज कधी बाहेरगावी गेले म्हणजे सांगून ठेवत की, ''सूनबाई, काही लागलं-सवरलं तर कळव बरं का!'' आजच्या क्षणापर्यंत त्यांचा हा आधार अक्षय असाच आहे!

१९५७ ची फ्लूची साथ

१९५७ साली पुण्यात मोठी फ्लूची साथ आली. श्रीदत्तमहाराजांचे घरी सर्वजण आजारी पडले. तेव्हा श्रीदत्तमहाराज वार्षिक सप्ताहासाठी औरवाडला गेले

होते. श्रीदत्तमहाराजांची कन्या चि. शोभा जास्त आजारी झाली. सौ. लक्ष्मीबाईना ताप होताच व मुलांनाही ताप होता. चि. शोभाचा ताप वाढला म्हणून प. पू. श्रीगुळवणीमहाराजांना कळविले. प. पू. श्रीगुळवणीमहाराजांनी सौ. लक्ष्मीबाईना ह्या कठीण परिस्थितीत धीर दिला. समजावून सांगितले की, डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार चि. शोभाला हॉस्पिटलमध्ये ठेवणे आवश्यक आहे. सौ. लक्ष्मीबाई व इतर मुले आजारी असल्याने चि शोभाला घेऊन स्वतः श्रीगुळवणीमहाराज हॉस्पिटलमध्ये गेले. गुळवणी महाराजांचे प्रेमळ धीराचे बोलणे, प्रत्यक्ष सहाय्य ह्यांनी सौ. लक्ष्मीबाईना भरुन आले व अश्रू आवरेनात. केवढा मोठा आधार, दिलासा त्यांना मिळाला होता. परंतु दुर्दैवाने चि. शोभा वाचू शकली नाही. प. पू. श्रीगुळवणीमहाराज चि. शोभाजवळच होते व त्यांनासुध्दा खूप वाईट वाटलें. दैवापुढे कोण काय बोलणार! त्यांनी क्षणात निर्णय घेतला. सर्व मुले आजारी आहेत. चि. शोभाला घरी न्यावयाचे नाही. प. पू. श्रीगुळवणीमहाराजांनी श्रीदत्तमहाराजांचे घरी मनुष्य पाठवून सौ. लक्ष्मीबाईना हॉस्पिटलमध्ये बोलावून घेतले. हॉस्पिटलमध्ये पोहोचल्यावर सौ. लक्ष्मीबाईना शोक आवरेना. प. पू. श्रीगुळवणीमहाराजांनी ह्यावेळेसही धीर दिला. ते म्हणाले, ''सूनबाई, तुला दुःख होणे साहजिक आहे. पण आता शोक आवरला पाहिजे. थोडा विवेक करावयास हवा. बाकीच्या आजारी मुलांकडे पाहावयास हवे. तुझी स्वतःची तब्बेत बरी नाही. शिवाय श्रीदत्तमहाराज येथे नाहीत. तेव्हा मन घट्ट कर. मलासुध्दा तुला कसे बोलवावे असे वाटत होते. पण तू इथेच आहेस. साहजिकच तुला आपल्या मुलीला पहावेसे वाटेल, म्हणून तुला इथे आणली. ईश्वरेच्छा समज. जगात अशी एकापेक्षा एक महान दुःखे असतात, तेव्हा दुःख आवर. श्रीदत्तमहाराज जरी येथे नसले तरी त्यांची उणीव भासू न देता मीच त्यांचे ठिकाणी राहून तिचे शेवटचे संस्कार करतो. तू शांत चित्ताने घरी जा!'

ह्या प्रसंगाची आठवण होऊन सौ. लक्ष्मीबाई सांगतात, 'किती वात्सल्ययुक्त शब्द! किती मृदु अंतःकरण! खरंच, महाराजांच्या समजूत घालण्यामुळेच मी थोडातरी विवेक करु शकले. काय सांगावे, सारे काही महाराजांनी केले. पुन्हा माझी समजूत घालण्यासाठी घरी आले. यांचे येणे वाडीहून झाले. यांनाही वाईट वाटले. चि. शोभाने वाडीला जाताना तिला हवा असलेला खेळ आणा अशी चिठ्ठी दिली होती. ती चिठ्ठी खिशात होती. त्याची आठवण होऊन जास्तच वाईट वाटले. पण अत्यंत संयमी असलेला यांचा स्वभाव. थोड्याच अवधीत त्यांनी आपल्या मनातील तिच्याविषयीच्या ममतेचा कप्पा जणू कायमचा बंद केला. विवेकाने दुःखावर मात करुन निर्विकार झाले. ही यांची संयमशक्ती पाहिली, मनाची स्थिरता पाहिली की त्यांचे **मोठेपण** कळते. पण मला स्वतःला मात्र तसे होणे जमत नाही एवढे खरे!

असेही काही परीक्षेचे क्षण आले व गेले. पण सदासर्वकाळ प. पू. श्रीगुरुमहाराजांचा धीराचा हात पाठीशी होता हे विसरता येत नाही.

*

श्री गुळवणी महाराजांची शिकवण

सौ. लक्ष्मीबाई सांगतात की, संक्रांत, दसरा, पाडवा अशा सर्व शुभदिनी आम्ही सर्वजण श्रीगुरुमहाराजांकडे जात असू. त्यांच्या हातचा तिळगूळ, सोने घेत असू. ही प्रथा आम्ही पुण्यात आल्यापासून चालू होती. श्रीगुरुमहाराजांचे गोड भाषेत समजावून तळमळीने सांगणे, नेहमीच कानात घुमत राही. मला ते म्हणत, ''तू फक्त एक गोष्ट करीत जा. प. पू. श्रीदत्तमहाराजांना कोणताही त्रास होईल असे वागू नकोस. ते वैराग्यशील, विवेकी, ज्ञानसंपन्न आहेत. चांगले वागलीस की सर्व श्रेय तुला मिळेल.'' हे त्याचे सांगणे मनाचा आपोआप बदल करीत असे. मुलांना पण ते सांगत, की तुमच्या शिक्षणाचे वगैरे जे काही असेल ते मला सांगा. त्यांना कशात गुंतवू नका. आज जी उत्तराधिकारी पदाची धुरा त्यांना दिली आहे ती पाहिली की समजते की ते ह्यांना इतके का जपत होते. त्यांना बारीक-सारीक गोष्टींत गुंतवू नये असे श्रीगुरुमहाराजांना का वाटत होते हे आता त्यांचे एवढे मोठे कार्यक्षेत्र पाहिल्यावर समजते.

श्री शंकराचार्यांकडून सोन्याचे कडे

कुडली शृंगेरीचे जगद्गुरु शंकराचार्यांनी धारवाडला अद्वैत ब्रह्मविद्या परिषद भारतातील सर्व विद्वत्जनांना पाचारण करुन आयोजित केली होती. त्यावेळी श्रीदत्तमहाराजांची विद्वत्ता पाहून आचार्यसुध्दा स्तिमित झाले होते. त्यांनी प. पू. श्रीदत्तमहाराजांचा प्रदीपक शिष्य म्हणून गौरवपूर्वक सत्कार केला. हा सर्व वृत्तांत ऐकल्यावर कांची कामकोटीचे शंकराचार्यसुद्धा प्रभावित झाले. त्यानी आपल्या शिष्याना श्रीमहाराजांकडे पाठविले. त्यानी श्रीमहाराजांचे हातात सुवर्ण-कंकण घातले. मानाचे हार-वस्त्र दिले. आयुष्यभर रुपये पाचशेचे वर्षासन सुरु केले. सौ. लक्ष्मीबाईना स्त्रीसुलभ आनंद झाला. कन्या गेली पण कीर्तीरुपाने ती पुन्हा घरी आली असे वाटले. प. पू. श्रीदत्तमहाराजांची निर्विकारता कायम होती. सुख व दुःख एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. तेव्हा आपण कशाचाच परिणाम मनावर करुन घेऊ नये असे नेहमींप्रमाणे ते गंभीरतेने म्हणाले. सौ. लक्ष्मीबाईंच्याच शब्दात सांगावयाचे म्हणजे ''माझ्या मनाला हेही पेलवले नाही. मी आपले मनांत म्हटले, परमेश्वरा, किती योग्य केलेस तू हे! ह्यांचा इतका साधा स्वभाव साधी राहणी. कुणाला कळणार

आहे यांची योग्यता! तूच सारे जाणलेस हे मात्र खरे. पुढे असेही वाटले, की महाराजांना किती कौतुक वाटले असेल!'' पण गंमत अशी की, श्रीदत्तमहाराजांनी यातले काहीही महाराजांना सांगितले नव्हते. परिषद समारंभ चांगला झाला. व्यवस्था चांगली होती एवढेच बोलणे झाले होते. प. पू. श्रीमहाराजांना या गोष्टी पत्राद्वारे कळल्या. प. पू. श्रीगुळवणीमहाराजांना त्याचा इतका आनंद झाला की त्यांनी श्रीदत्तमहाराजांना व सौ. लक्ष्मीबाईना जेवावयास बोलावले. स्वतः श्रीदत्तमहाराजांचा उत्कृष्ट सत्कार करुन श्रीफळ-हार अर्पण केला. सौ. लक्ष्मीबाईची शालू देऊन ओटी भरली. हा प. पू. श्रीगुळवणीमहाराजांनी केलेला सत्कार सौ. लक्ष्मीबाईच्या जीवनात खरोखरीच अविस्मरणीय असाच आहे. त्यांची भावना प. पू. श्रीगुळवणीमहाराजांचेविषयी अशी, 'की महाराज म्हणजे परमेश्वरच आहेत आणखी ईश्वराचा शोध तो कशाला?

सर्व कौटुंबिक बाबतीत श्रीगुरुमहाराज आत्मीयतेने लक्ष देत असत. श्रीदत्तमहाराज जेवढे संसारात अलिप्त होते, तेवढेच श्रीगुळवणीमहाराज आत्मीयतेने लक्ष देत. ह्याविषयीच्या एकदोन आठवणी सौ. लक्ष्मीबाईच्याच शब्दात येणेप्रमाणेः

चि. अशोकचा विवाह

''आमचा मोठा मुलगा अशोक याच्याकरिता पत्रिका येऊ लागल्या. श्रीगुरुमहाराजांना सुर्डीला जावयाचे होते. लगेच श्रीगुरुमहाराज म्हणाले, आधी आपण वैरागला जाऊ. तेथे पत्रिका व मुलगी पाहू. तेथून सुर्डीला जाऊ. वैरागला माझी मोठी मुलगी सौ. सुमन होती. श्रीगुरुमहाराज तिच्या घरी येणार हे कळल्यावर तिला फार आनंद झाला. श्रीगुरुमहाराजांनी मुलगी पाहिली. त्यावेळी माझे मामंजी पण होते. प. पू. श्रीमहाराजांनी मुलीला प्रश्न विचारले-सारे काही आपलेपणाने केले मला म्हणाले, 'काय सूनबाई तुला मुलगी पसंत आहे ना?' मी साहजिकच म्हटले की आपण सर्वांनी पाहिल्यावर माझे काय हो? त्यावर लगेच हसून ते म्हणाले, 'अग, तू सासूबाई आहेस. तेव्हा तुझी पसंती हवीच!' अशोक सविता यांचा साखरपुडा आश्रमातच झाला.

पणतू पूजन

पुढे अशोकला मुलगा झाला. त्यावेळी माझे मामंजी पुण्यास आले होते. पणतू पूजनाचा कार्यक्रमही आश्रमातच झाला. २४ सुवर्णफुले केली होती. महाराजांनी व माझ्या मामंजींनी बाराबारा फुले वाहिली, ती दान केली. हे व असे अनेक घरगुती प्रसंग मुद्दाम सांगण्याचे कारण इतकेच की प. पू. श्रीगुळवणीमहाराजांचा आपलेपणा

हा ह्यांना पुत्रवत मानल्यामुळे होता. हा जो काही योग साधला जात होता त्यामुळे भगवंताची इच्छाच काहीतरी मंगल घडवत होता, असे मलातरी वाटते. ह्यांच्याबद्दल बोलताना जसा आईवडिलांचा उल्लेख करावा लागेल तसाच महाराजांचा उल्लेख केल्याशिवाय बोलणे पुरेच होणार नाही.

प्रथमपासूनच वैराग्यशील वृत्ती असल्यामुळे इतरांसारख्या संसाराच्या कल्पना नव्हत्या. परंतु त्याचबरोबर माझ्यावर मात्र त्यांनी तशी कोणतीही गोष्ट लादली नाही. सहज सांगून पटले तर बघायचे असा सगळ्याच्यांच बाबतीत त्यांचा स्वभाव आहे. आग्रही वृत्ती नाहीच, रागावणे, कातावणे, आवाज चढवून बोलणे हा स्वभाव नाही. त्याचवेळेस कर्तव्याकडे डोळेझांक नाही. सुनांना-मुलींना सारखेच वागवणे, त्यांचे कौतुक करणे या गोष्टी मात्र ते आवर्जून करतात.

स्वतःची मुले बघायला रुग्णालयात आले नसले तरी नातवंडांना बघायला जातात. नातवंडांना जुन्या गोष्टी सांगतात. गप्पा मारतात. भाऊबीजेच्या दिवशी आमच्या देवघरातील दत्तूबाळाजवळ दोघी सुनांना सारखी पाकिटे ठेवतात. माझेही ठेवतात व सांगतात दत्तूबाळाला ओवाळा व भाऊबीज घ्या.

आमची मोठी सून सौ. सविता दर महिन्याला भिशी भरते तर कौतुकाने तिची भिशीची वर्गणी ते देतात. अशोकचा मुलगा आमोद आता आठवीत आहे. त्याला श्रीगुरुचरित्राचे पारायण करायला सांगतात. सुटी असली की करीत जा म्हणतात.

प. पू. श्रीदत्तमहाराजांनी आपल्या मधल्या सुनेला अनितेला स्वप्नात दीक्षा दिली. स्वप्नातच साधनक्रिया सुरु झाल्या. सौ. लक्ष्मीबाईनी सुनेला हे सर्व प. पू. श्रीदत्तमहाराजांना सांगावे असे सुचविले. श्रीदत्तमहाराजांनी सर्व हकिगत ऐकल्यावर म्हणाले, 'तुम्हाला आता दीक्षा झालेलीच आहे. आता वेगळे काही करावयास नको.' त्यांच्या सुनेने प्रत्यक्ष दीक्षेचा आग्रह धरला. प. पू. श्रीदत्तमहाराजांनी त्याप्रमाणे एका शुभदिनी सुनेला स्पर्श दीक्षा दिली. आता सासऱ्यांच्या ठिकाणी तिच्या मनामध्ये वेगळाच गुरुभाव निर्माण झाला. तिची ह्या मार्गात झालेली प्रगती पाहून सौ. लक्ष्मीबाईनासुध्दा खूप धन्यता वाटते.

पंढरीची वारी

सौ. लक्ष्मीबाईची खूप दिवसांची इच्छा होती की पंढरीच्या वारीला एकदा पायी जाऊन यावे. मुला-बाळांच्या संसारात जमता-जमता एक दिवस हा योग जुळून आला. तोसुध्दा श्रीदत्तमहाराजांचेमुळे! एके दिवशी श्रीदत्तमहाराजांनी सांगावा केला की पायी वारी करण्यासाठी पैसे भरलेले आहेत. आता तुम्ही पंढरपूरची पायी वारी

करु शकता. सकाळी आळंदीला सौ. लक्ष्मीबाई आपल्या पाचसहा मैत्रिणींबरोबर गेल्या. गर्दी खूप होती. वारीमध्ये चहाची व्यवस्था मात्र नव्हती. सौ. लक्ष्मीबाईंना चहा हवा होता पण काय करणार! कारण इतरजणी जरी म्हणत होत्या, की चहा जवळच्याच कुठच्यातरी हॉटेलमध्ये घेऊ या. हॉटेलमध्ये चहा घ्यावयास सौ. लक्ष्मीबाई तयार नव्हत्या. ह्या त्यांच्या निर्धारामुळे चहा मिळणे कठीण होते. चहा नसल्यामुळे त्यांचे डोके दुखू लागले. तरीही निर्धार कायम होता आणि आता पालखी निघणार म्हणून, 'श्री ज्ञानेश्वर माऊली तुकाराम' असा गजर झाला. एवढ्यात तेथे एक माऊली चहाचा गडवा घेऊन आली. सौ. लक्ष्मीबाई व इतरेजणांच्या पुढ्यात ठेवून म्हणाली, 'आपल्याला चहा हवा होताना, म्हणून आणलाय हो!' सर्वजणीनी तो चहाचा गडवा पाहिला. चहा घेऊन होतोय न होतोय तोच ती चहा घेऊन येणारी माऊली कुठे अदृश्य झाली हे समजलेही नाही. सौ. लक्ष्मीबाईनी ही सर्व हकिकत प. पू. श्रीदत्तमहाराजांना वारीहून परतल्यावर सांगितली. त्यावर श्रीदत्तमहाराजांनी सौ. लक्ष्मीबाईना सर्वप्रथम विचारले की, 'चहा देणाऱ्या माऊलीचे आपण पाय धरलेत की नाही? आपण बाहेर हॉटेलात चहा घेणार नाही हा जो निर्धार केलात त्यासाठीच आपली काळजी ईश्वराने घेतली. तो दर्शनच देऊन गेला!' सौ. लक्ष्मीबाईच्या आता कुठे लक्षात आले. झालेल्या गोष्टींचा अन्वयार्थ समजावयाला वेळ लागला. ह्यावर सौ. लक्ष्मीबाईची प्रतिक्रिया ऐकण्यासारखी आहे. 'ह्यांच्या सतत सान्निध्यात राहूनही अशा गोष्टी आम्हाला चटकन उमजल्या नाहीत, कळल्या नाहीत. कारण मी आपली साधी गृहिणीच राहिले!'

प. पू. श्रीदत्तमहाराजांना कानडी उत्तम येते. त्यांची इच्छा सौ. लक्ष्मीबाईनाही ती यावी. खरे पाहता, ह्या भाषेचा सौ. लक्ष्मीबाईना शिकून तसा फारसा उपयोग नव्हता. पण प. पू. श्रीदत्तमहाराजांनी एके दिवशी मराठी-कानडी असा शब्दकोशच आणून दिला. रोज थोडे-थोडे शब्द शिकून-पाठ करुन कानडी बोलण्याचा प्रयत्न करा, असे सांगितले. त्यामुळेच त्यांनाही आज थोडे-फार कानडी येते.

प. पू. श्रीदत्तमहाराजांना मिळालेले अनेक गौरव, मानपत्र सत्कार हे खरोखरी त्यांच्या प्रकांड विद्वत्तेमुळे! ही विद्वत्ता खूप जणांना त्यांनी दान केली हे त्यांच्या उत्तमोत्तम विद्यार्थींवर्गाकडे पाहिले की समजते. हा सर्व विद्वान विद्यार्थींवर्ग जेव्हा सौ. लक्ष्मीबाईंना गुरुपत्नी म्हणून आदराने आईसाहेब असा हांक मारतो, तेव्हा खरोखरीच त्यांना समाधान वाटते, कृतार्थ वाटते. ह्यावरही सौ. लक्ष्मीबाई म्हणतात, 'आत्मज्ञानाची भाषा मला समजत नाही, तद्वत विरक्तीही आलेली नाही. पण ह्यांच्या सावलीतच, अर्धांगीच असल्याने पुण्यकर्माचाही अर्धा वाटा मला मिळणारच ह्या एकाच गोड आशेने मी तृप्त आहे!'

अनाकलनीय व्यक्तिमत्त्व

श्री. अशोकराव, श्री. अनिलभाऊ व चि. अजित यांच्या बोलण्यावरुन असे कळून चुकले की, श्रीदत्तमहाराजांच्या अत्यंत अबोल व निगर्वी स्वभावामुळे त्यांची उंची कळतच नाही. अजित हा सर्वांत लहान व तरुण. नुकताच कॉलेजमधून बाहेर पडलेला. त्याने श्रीदत्तमहाराजांबद्दल स्वानुभव सांगितला. आपले वडील हे आगळे-वेगळे व्यक्तिमत्त्व आहे ह्याची जाणीव त्याला झाली. त्याचा अनुभव येणेप्रमाणे-

सकाळची वेळ होती. पुण्यातील एक गृहस्थ आपल्या पत्नीला घेऊन पिताजींकडे आले होते. बाई सांगत होत्या. "काल रात्री श्री. प. पू. श्रीगुळवणीमहाराज स्वप्नात आले त्यांनी सांगितले की आपणाला जो काही त्रास होत आहे तो वर्तक इंजिनिअराच्या बंगल्यात श्रीदत्तमहाराज रहातात त्यांना जाऊन सांगा. ते योग्य तो इलाज करु शकतील म्हणून आपल्याकडे आलो आहोत. मला अशा क्रिया होतात की एकदम बेचैन व्हावयास होते. आपण काही उपाय सांगावा म्हणून आपल्याकडे आलो आहोत."

पिताजी डोळे मिटून बसले होते. ते त्यांनी उघडले नाहीत किंवा एक शब्दही ते बोलले नाहीत. आलेल्या पती-पत्नींचा आवाज वाढत होता. शेवटी त्या बाईचे पती म्हणाले, "अहो यांना इतका त्रास होतो आहे हे आता तुम्ही पहाता आहात तरी बोलत कां नाहीत? आपल्याकडे आम्हाला श्रीगुळवणी महाराजांनी स्वप्नांत दृष्टान्त देऊन पाठवले आहे!" तरीही पिताजी काहीच बोलत नव्हते.

मलासुध्दा वाटू लागले की हे काय आपले पिताजींचे? एवढी तळमळून ती माणसे बोलतायत हे काहीच कसे बोलत नाहीत? मला मनापासून त्यांचा राग आला. आपणच आपल्या वडिलांना म्हणावे की सांगा ना त्यांना काहीतरी. इतक्यात पिताजींनी डोळे उघडले. त्या बाई हळूहळू पूर्ण शांत झाल्या, स्वस्थ झाल्या. हे सर्व स्वतःच्या डोळ्यांनी पाहिल्यावर हे न बोलताही केलेले कार्य पाहून मी खरोखरी थक्क झालो, हे सामर्थ्य काही अलौकिकच आहे याची प्रचिती आली.

प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या साध्या राहाणीचा आणखी एक अनुभव त्यांच्या कन्येकडून मिळाला तो असा. माटुंग्याच्या सौ. सुलभाताई सांगतात की, सकाळी लवकर उठून आपले आन्हिक आटपून कॉफी घेऊन आमचे वडील विद्यापीठात जात. ते कॉफी घेऊन गेले की मग आम्ही कॉफी घेत असू. एकदा असे झाले की मी व माझी भावंडे कॉफी घेण्यास बसलो. एकदम आईपाशी गिल्ला केला की हे काय "आई, कॉफीत साखर घातली नाहीस. कसली ही कॉफी?" आई म्हणाली, "अरे बापरे! म्हणजे 'हे' तसेच कॉफी पिऊन गेले. काही बोलले नाहीत. काय बाई स्वभाव हा!"

वडील दुपारी आल्यावर आई म्हणाली, ''हे काय, आपण सकाळी कॉफीत साखर नाही हे बोलला नाहीत!'' त्यावर श्रीदत्तमहाराज उद्‌गारले, ''त्यात काय बोलावयाचे. घाईत रहाते एखादेवेळी!'', वडिलांचे हे शब्द ऐकल्यावर आम्हाला आम्ही केलेला गिल्ला आठवला. लाज वाटली. वडिलांच्या साधेपणाने मन भरून आले. सर्व चुका सांभाळून घेणारे, अबोल व म्हणून अनाकलनीय असे त्यांचे व्यक्तिमत्त्व आहे.

प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या सुनांनासुध्दा बोलते करावे लागले. त्या म्हणतात, आमचे मामंजी आम्हाला कधीच रागावत नाहीत. आमच्या मुलाबाळांचे ते कौतुक करतात, त्यांना जवळ घेतात यातच आम्ही आमचे भाग्य समजतो. नामात रहावे, संध्याकाळी देवापुढे निरांजन, उदबत्ती लावून करुणात्रिपदी म्हणावी असे त्यांचे सांगणे असते. दोन्ही चतुर्थींचे उपवास आम्ही करतो. देवाला हळदीकुंकू वाहणे, तीर्थ घेऊन मगच जेवायला बसणे असे साधे धार्मिक उपचार करणे ही पध्दत त्यांनी लावून दिली आहे. नाम-जप कमीत कमी एकवीस वेळा तरी सर्व मुलेबाळे मिळून करतो. अशी त्यांची साधी शिकवण आहे. त्यांच्याकडून अधिक काही मिळवावे, अधिक काही देवाचे करावे असे मात्र वाटते. प्रसंगोपात प. पू. श्रीदत्तमहाराज कांही नेम सांगतात.

सुना, मुली,मुलगे-जावई, नातवंड व पतवंडांनी भरलेल्या संसारात प. पू. श्रीदत्तमहाराजांचे वागणे करुन-सवरुन अकर्तेपणाचे आहे. पद्मपत्राप्रमाणे त्यांची राहणी आहे. अनाक्रोश असा परमार्थ चालू आहे. क्षमाशील वृत्ती अंगी मुरलेली आहे. प. पू. श्रीदत्तमहाराजांचे वागणे बघितल्यावर एकनाथमहाराजांची आठवण येते. प. पू. श्रीदत्तमहाराजही संसाराचा व परमार्थाचा गाडा सारखाच चालवत आहेत, ते एकनाथासारखे शांतिसागर आहेत म्हणूनच!

संसारापासून लांब न पळता, तो न सोडता वा त्याची घडी न विस्कळता चाललेला हा परमार्थाचा पसारा पाहिला की वाटते कुटुंबाची, समाजाची घडी नीट बसावी असे वाटत असेल तर त्यादृष्टीने या व्यक्तिविकासाचा विचार करावयास हवा.

*

साधी राहणी

अनासक्त जीवन हे श्रीदत्तमहाराजांच्या जीवनाचे वैशिष्ट्य आहे. अनासक्त जीवन ओळखायला आपण सामान्य माणसे त्यांच्या बहिरंगाकडेच पाहतो. पण ते पाहतानासुध्दा जे वेगळेपण आपल्यासारख्या सामान्यांना कळते ते त्यांच्या साध्या राहणीतून. धोतर, अंगावर उपरणे, पायात काही नाही, हा कित्येक वर्षे पाहत असलेला त्यांचा पेहराव आहे. थंडी वगैरे असली तर अंगावर फार तर शाल घेतात. स्वेटर, मफलर कधी वापरत नाही. कुठेही प्रवासाला जा. एखादी पडशी बरोबर

असली की त्यात सगळे असते. बॅग दिली तरीही वापरणार नाहीत. उपरण्याचे गाठोडे स्वतःच हातात घेणार. तेही कुणाला घेऊ देणार नाहीत. कारण त्यात नित्य वाचनाची पोथी व थोरल्या महाराजांचा फोटो असतो. काही कपडा अंगात घालायचा असला तर प्रवासात रात्री घालण्यासाठी फक्त एक कुडता. हे सर्व साधेपण पाहिले त्याबरोबरच त्यांची विद्वत्ता पाहिली की मन थक्क होऊन जाते!

साध्या राहणीबरोबरच स्वावलंबन हा गुण अंगी बाणलेला आहे. आपले पाणी आपण तापविणे, आपले कपडे आपण धुणे, आपले सामान आपण उचलणे या सवयी अंगी पूर्ण बाणवून घेतल्या आहेत. जीवनाच्या गरजा अन्न, वस्त्र व निवारा त्याही त्यांनी किमान ठेवल्याचा प्रत्यय येतो. कधी चांगले कपडे घालावे असे वाटलेच नसेल का, असा विचार मनात येतो, तोच त्यांच्या सहज बोलण्यातून ऐकलेल्या गोष्टीचे स्मरण होते व प्रश्नाचे उत्तर आपोआप मिळते.

गीताकोश

त्यावेळचे पुण्यातील एक नामवंत वकील. त्यांनी गीताकोश लिहिण्याचा संकल्प केला. गीतेवरील निरनिराळ्या टीका वाचावयास मिळतील व द्रव्यार्जनही होईल, अशादृष्टीने श्रीदत्तमहाराजांनी छोटी नोकरी पत्करली व काम स्वीकारले. तीनचार महिने काम करुन त्यांना किती रुपये मिळावे? फक्त तीस रुपये! दुसऱ्या माणसाने काम त्यांच्याबरोबरच केले. तासावर हिशेब करुन ताशी पाच रुपये याप्रमाणे मागितले, ते त्याला वकीलांनी दिलेही. ते श्रीदत्तमहाराजाना खटकले. असे कां व्हावे? असा विचार एकदाच मनात आला आणि ईश्वरेच्छा असे मनाशी म्हणून ते गप्प राहिले. त्यानंतर लगेचच नागपूरला बुटींचे दत्तमंदिरात महाराजांना प्रवचनाचे बोलावणे आले. थोडे दिवसच प्रवचने झाली. पण अडीचशे रुपये मानधन मिळाले. श्रीदत्तमहाराजांनी या दोन गोष्टींचा मेळ मोठा मजेदार घातला. सरस्वतीचे दरबारात कोणाला कमीजास्त होत नाही. तेथील कसर येथे भरुन निघाली. आपण उगीच खेद करीत असतो. मनाचा तोल त्यांनी किती सहजपणे सांभाळला, इतके साधे, सरळ राहणे, कसलीही चिंता न करणे हा सहज स्वभाव झाला.

प. पू. श्रीदत्तमहाराज आजही म्हणतात, पुण्यात आलो तर आमचे कोण होते? पण परमेश्वरीकृपेने जागेपासून सगळे होत गेले. प. पू. श्रीगुळवणीमहाराजांचा आधार मिळाला. स्वतःकडे कर्तृत्त्वाचा अहंकार घेतला की परमेश्वर लक्ष घालीत नाही हे तर श्रीदत्तमहाराजांच्या जीवनाचे प्रमुख सूत्र आहे.

परमेश्वराशी अंतरंगाने जोडलेले सत्पुरुष व्यावहारिक जीवनात असे साधेपणाने वागतात. हे अंतरंग ओळखायला ज्ञानवंत मनुष्य हवा. संत भेटणे कठीण. भेटले तर ते ओळखणे कठीण. प. पू. श्रीदत्तमहाराजांचे अंतरंग ओळखणे असेच फार कठीण आहे.

निंदा व स्तुती समान मानणे हे फार अवघड व्रत आहे. पण श्रीदत्तमहाराजांच्या बाबतीत हे गुण त्यांच्या जीवनात ठळकपणे प्रत्ययास येतात.

टिळक महाराष्ट्र संस्कृत विद्यापीठ

१९४५ साली टिळक महाराष्ट्र विद्यापीठात प. पू. श्रीदत्तमहाराजांना शास्त्री म्हणून नोकरी लागली. पगार एकशे साठ रु. मिळत होता. न्याय व मीमांसाशास्त्र हे विषय ते शिकवित असत. त्यावेळी घडलेला प्रसंग प. पू. श्रीमहाराजांच्या अनासक्त वृत्तीची साक्ष देतो. एकदा देऊळगावराजाला गेल्यावर श्रीदत्तमहाराजांना ताप येऊ लागला. विद्यापीठात जाता येईना म्हणून तात्पुरती दोनतीन दिवसांची रजा मागितली. तो ताप विषमज्वराचा निघाला. त्यामुळे त्यांनी वैद्यकीय दाखला पाठवून जास्त दिवस रजा मागितली. ती रजा बिनपगारी झाली. वैद्यकीय रजा असूनही मंजूर केली गेली नाही. पगारही त्यामुळे दिला नाही. श्रीदत्तमहाराज काही बोलले नाहीत, की कुणालाही दोष दिला नाही. ही गोष्ट विद्यार्थ्यांना समजल्यावर त्यांनी पाचशे रुपये जमविले. साऱ्या विद्यार्थ्यांनी आपली इच्छा प्रकट केल्यावर श्रीदत्तमहाराजांनी विरस होऊ नये म्हणून फक्त २५० रुपये घेतले. त्याहून अधिक घेण्याचा मला अधिकारच नाही. ते पैसे तुम्ही ठेवून द्या. एक शिक्षकनिधी तयार करा. त्यातून गरजू शिक्षकाला जसे लागेल तेव्हा त्याच्या अडचणीसाठी पैसे देता येतील अशी व्यवस्था करा असे सांगितले!

पुण्यात आल्यावर प. पू. गुरूमहाराजांकडे जाणे येणे हे जास्त वाढले. महाराजांचे लक्षही त्यांचेकडे वाडीपासूनच होते. १९०७ पासून गुरुद्वादशीला महाराज वाडीला जात. श्रीदत्तमहाराजांच्या आईला महाराज बहीण मानीत असत. भाऊबीज घालीत असत. दिवाळीच्या वेळी त्या गुळवणीमहाराजांना तेल लावीत व स्नानाला ऊन पाणी देत. दिवाळीच्या दिवशी ब्रह्मचारी व संन्याशानेसुध्दा गार पाण्याने स्नान करु नये असे सांगत असत. असे घरोब्याचे संबंध प्रथमपासूनचे कवीश्वर घराण्याचे व महाराजांचे होते. पुण्याला वास्तव्य झाल्यावर ते अधिकाअधिक घनिष्ट झाले. श्रीगुरुमहाराजांची सहस्त्रदर्शन शांती, रौद्री शांती व रौप्यतुला हे सारे उत्सव श्री दत्तमहाराजांचे संकल्प होते.

श्रीदत्तमहाराजांचा गौरव झाला की श्रीगुरुमहाराजांना फार आनंद होई जणू आपलाच गौरव झाल्यासारखे त्यांना वाटे. श्रीगुरुमहाराज घरगुती, कौटुंबिक सत्कार करीत व आशीर्वाद देत असत.

*

श्रीवासुदेव निवास

श्रीगुरुमहाराजांचा आश्रम असावा अशी श्रीदत्तमहाराजांची फार इच्छा होती. पण श्रीगुरुमहाराजच या गोष्टीला तयार नव्हते. त्यांना वाटे,'नको हा व्याप!' प. पू. श्रीदत्तमहाराजांनी त्यांना समजावून सांगितले की, आपल्याकडे येणाऱ्या मंडळींची गर्दी फार वाढली आहे. चाळीत सोवळे ओवळेही टिकत नाही. तेव्हा स्वतंत्र वास्तू असणे आवश्यक आहे! तो अचानक घटना घडली. वाईटातून चांगले निघाले. स्वामी महाराजांच्या पुण्यतिथीच्या वेळी पानशेत धरण फुटले. सगळीकडे पाणीच पाणी झाले. नदीला पूर आला आहे असेच वाटले. धरण फुटल्याची कल्पना प्रथम आली नाही. श्रीगुरुमहाराजांकडे उत्सवाची गडबड सुरु झाली होती. श्रीगुरुचरित्र आदिवाचन चालले होते. तेवढ्यात पाणी आले असा आरडाओरडा झाला. म्हणता म्हणता पाणी गोवईकरांचे चाळीत आले. श्रीगुरुमहाराजांनी खणानारळानी नदीची ओटी भरण्यास सांगेपर्यंत पाणी गळ्यापर्यंत आले. महाराजांना हात धरून लोकांनी बाहेर काढले. श्रीजगन्नाथगुरुजींच्या सिध्दमाता मंदिरात श्रीगुरुमहाराजांना आणले. देव पोथी-चष्मा काही आणता आले नाही याचे महाराजांना फार वाईट वाटले. देव मिळेपर्यंत श्रीगुरुमहाराजांनी उपोषण केले. दुसऱ्या दिवशी तर पुण्यतिथी होती. पुराचे पाणी ओसरल्यावर रात्री जाऊन लोकांनी अक्षरशः मातीतून देव शोधून काढले. देव म्हणजे घरातील प्रसाद पादुका, तुळजाभवानी, पोथी चष्मा सुद्धा सारे काही सापडले. श्रीगुरूमहाराजांना अतिशय आनंद झाला. पुण्यतिथी महाराजांनी आनंदाने साजरी केली.

त्या दिवशी मात्र श्रीगुरुमहाराजांना वाटू लागले, आपले भाग्य थोर म्हणून देव मिळाले. देवांची व्यवस्था नीटनेटकी करावयास हवी. गोवईकरांची चाळ ही संपूर्ण पडली होती. शिवाय प. पू. श्रीदत्तमहाराजांचे म्हणणे होतेच की शास्त्रवचनाप्रमाणे गुरुंचे नावे आश्रम बांधणे मोठे पुण्यकर्म आहे, तेव्हा आता देवासाठी तरी काही सोय करणे आवश्यक आहे.

श्रीगुरुमहाराज नेहमी म्हणत असत की श्रीदत्तमहाराजांचा संकल्प नेहमीच खरा होतो. 'सत्य संकल्पाचा दाता भगवान,' असे ते म्हणत असत. श्रीदत्तमहाराजांनी संकल्प केला. आश्रम झाला. अनेक साधकांची, मुमुक्षूंची सोय झाली. लोकांची रीघ लागली. पाणपोईच जणू घातली. तृषार्तांनी यावे व आपली तहान भागवून जावे. आश्रमात भजने, कथाकीर्तने, यज्ञयाग, भागवत सप्ताह, नामजप अशी अनेक कार्ये घडू लागली. आश्रम भक्तमंडळींनी सदा भरून जात असे. साधनाकरिता अनेक मंडळी आश्रमात पहाटेपासून त्यावेळी येत व आजही येतात.

प. पू. श्रीदत्तमहाराजांचे वडील व श्रीगुरुमहाराज यांच्या वयात अवघ्या सहा महिन्यांचा फरक होता. त्यामुळे आधी पिताजींचे उत्सवास सुरुवात होई. सहस्रचंद्रदर्शन शांती, रौद्री शांती हे सारे उत्सव आधी श्रीधुंडिराज महाराजांचे झाले आहेत नंतर सहा महिन्यांनी महाराजांचे झाले आहेत.

या महोत्सवांचे मुख्य सूत्रधार श्रीदत्तमहाराजच होते. अशावेळी सर्व धार्मिक कार्याची जबाबदारी श्रीदत्तमहाराजांकडे असे. भारतातून मोठेमोठे अधिकारी विद्वान गुरुजन बोलाविले जात असत. त्यांचे आदरातिथ्य, सन्मान करणे हे काम प. पू. श्रीदत्तमहाराजांचे असे. असे महान धार्मिक कार्यक्रम श्रीगुरुमहाराजांचे श्रीदत्तमहाराजांनी पुढाकार घेऊन केले आहेत. ते सर्व कार्यक्रम पाहून साधकांच्या डोळ्यांचे पारणे फिटले आहे. खूप आनंद साधक मंडळींनी लुटला आहे.

'वासुदेव निवास' हे साधकांचे आधारस्थान झाले आहे. संसारापासून थोडे बाजूला जाऊन दोन दिवस ईश्वरचिंतनात घालवायचे म्हटले तर आज निवांत जागा आहे. हा साधकांना मोलाचा, प्रेमाचा आसरा आहे.



श्रीवासुदेव निवासातील भागवतसोहळा

प. पू. श्रीगुरूमहाराजांची फार दिवसांची इच्छा होती की भागवत सप्ताह करावा. पण गोवईकरांच्या दोन खोल्यांच्या जागेत हे शक्य नव्हते. श्रीवासुदेव निवास झाल्यावर महाराजांची ही इच्छा पुरी होण्याचा योग आला. महाराज येणाऱ्या जाणाऱ्या साधकांना, भक्तांना सांगू लागले, की यंदा भाद्रपदात भागवत सप्ताह करावयाचा आहे. अगदी लग्नासारखा सोहळा करावयाचा आहे. सर्वांनी यायचे बरे का! प. पू. श्रीवामनरावजी गुळवणी महाराजांची उत्सवाची पद्धत फार आखीव रेखीव नीटनेटकी असे. तयारीला सुरूवात झाली. प्रथम सभामंडप सजला. पताका लावण्यातही विविधता होती. रंगसंगती आधीच केली होती. श्रीगुरुमहाराजांचे याकडे जातीने लक्ष असे. तोरणे लागली. ठिकठिकाणी छोट्या दिव्यांच्या सुंदर माळा लागल्या. षटकोनी सभामंडप शोभू लागले. मनाला प्रसन्नता वाटू लागली. दाराशी केळीचे खांब उभारले गेले. चौकात नावीन्यपूर्ण रांगोळ्या घातल्या गेल्या. व्यासपीठ तर फारच सुंदर सजवले होते. बसायला मृगाजीन, टेकायला लोड, पुढे चौरंग त्यावर बाळकृष्णाची सुंदर मूर्ती, त्याही पुढे खाली चौरंगावर एक हास्यमुख कृष्णाचा फोटो. त्यापुढे डवरलेली तुळस, व्यासपीठाभोवती सुंदर रांगोळी व अखंड तेवती समई अशी सर्व साग्रसंगीत तयारी झाली. श्रीगुरुमहाराज फार प्रसन्न होते. पण त्याच वेळी पुण्यात जातीय दंगल उसळली. कर्फ्यू जारी झाली. दुकाने, मंडई बंद झाली.

श्रीगुरुमहाराज थोडेच व्यथित होणार? 'सत्य संकल्पाचा दाता भगवान' असे म्हणून ते शांत होते. मुंबईच्या काही लोकांना प्रेरणा झाली. ते भाजीपाला, केळीची पाने, भरपूर फुले, तुळशी हे सर्व साहित्य बरोबर घेऊन आले. श्रीगुरूमहाराजांना मोठा आनंद झाला. भागवत माहात्म्य सांगून झाले तो आदला दिवस. श्रीगुरूमहाराज सभामंडपात शिरल्यावर उजवीकडील खिडकीच्या बाजूला येऊन स्थानापन्न होत. श्रीदत्तमहाराज आले. श्रीगुरुमहाराजांना नमस्कार करू लागले. श्रीगुरूमहाराज म्हणाले, ''आज आपण व्यास आहात. आम्हीच आपणाला नमस्कार करणार''

उदबत्त्यांचा घमघमाट, निरांजनांच्या अनंत ज्योती, सगळीकडे घातलेले सुगंधी फुलांचे हार, विजेची माफक पण नेत्ररम्य रोषणाई. सारे कसे प्रसन्न वातावरण!

देव्हाऱ्यातील भवानीदेवी मोठी प्रसन्न झाली. हसू लागली होती. श्रीदत्तमहाराज्यांच्या मस्तकी कोणाच्या न कळत तिने मंत्राक्षता टाकल्या. श्रीवासुदेवानंद सरस्वती, श्रीलोकनाथतीर्थ स्वामीमहाराजांच्या प्रतिमेत मंद स्मित विलसू लागले. अनेक देवता गुप्तपणे आपापल्या जागी येऊन स्थानापन्न झाल्या. श्रीगुरूमहाराजांनी श्रीदत्तमहाराजांना औक्षण करा असे सांगितले. सौ. गोदूताई, दुर्गाताई, माई क्षीरसागर इ. सर्वांनी चांदीच्या निरांजनांनी श्रीदत्तमहाराजांना ओवाळले. समारंभाचा असा थाट झाल्यावर श्रीदत्तमहाराजांच्या मुखातून ज्ञानगंगा वाहू लागली. श्रोत्यांच्या जनमानसापर्यंत पोचू लागली. श्रीज्ञानेश्वर महाराजांनी म्हटल्याप्रमाणे–

ऐक रसाळपणाचिया लोभा। की श्रवणींची होती जिभा।
बोले इंद्रिया लागे कळंभा एकमेका ।।१६।।

सहजे शब्दू तरी विषोश्रवणाचा। परी रसना म्हणे हा रस आमुचा।
घ्राणांसि भावो जाये परिमळाचा हा तोचि होईल ।।१७।। ज्ञाने. ६ वा अध्याय

साऱ्या ज्ञानेंद्रियांनी लोक श्रवण करीत होते. या उत्सवाचे वैशिष्ट्य असे की, काही प्रसंग भावनिर्मितीसाठी मोठ्या प्रेमाने, अगत्याने केले होते. गोवर्धन पर्वताची पूजा हा प्रसंगसुद्धा मोठ्या भावभक्तीने केला गेला. लाह्यांचा मोठा पर्वतासारखा उंचवटा करून त्याच्या अवतीभोवती सुरेख सजावट केली होती. श्रीगुरूमहाराजांनी स्वतः त्यावेळी फुलांची आरास केली होती. सुंदर कुंड्या मोठ्या सौंदर्यपूर्ण दृष्टीने लावल्या होत्या. फळेफुले आकर्षकपणे लाह्यांच्या भोवती मांडली गेली. त्यावर गोपाळकृष्णाची मूर्ती सालंकृत करून ठेवली होती. गोवर्धनाची पूजा पुण्याहवाचन बसवून एका दांपत्याने केली. तुलसीविवाह असाच झाला. मंगलाष्टके म्हणायला चार खास पुरोहित होते. त्यानंतर आशीर्वादाचे मंत्र म्हणायला सहा वेगळे ब्राह्मण होते. बँड होता. लग्न लागल्यावर तो काही वेळ निनादत होता. अत्तर, गुलाबाची फुले, बत्तासे, कॉफी असे सारे काही होते.

दिवसामागून दिवस मागे पडत होते. अन्नदान सढळपणे होत होते. सप्ताहाला बसलेल्या मंडळींचे जेवण आश्रमातच होते. दोन्ही वेळा चहापाणी वगैरे सर्व व्यवस्था उत्तम ठेवीली होती.

दुपारी निरूपणाला अफाट गर्दी होई. मधून मधून 'श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारे' असा गजर होई. श्रोते मंडळी पुन्हा श्रवणासाठी सावध होत.

श्रीव्यासपूजेचा शेवट गुरूजींच्या मंत्रोपचाराने व पूजेने साजरा झाला. प्रसाद झाला. फळे, हार, उदबत्या, निरांजने या सर्वांची उत्तम व्यवस्था. प. पू. श्रीगुरूमहाराजांचा नीटनेटकेपणा प्रत्येक गोष्टींत दिसून येई. श्रीगुरूमहाराजांनी शांत स्थिर प्रसन्न मनाने सारे श्रवण केले. दिगंबराची धुन आळवीत सारेजण भागवताच्या मिरवणुकीत सामील झाले. गीता पठण होऊन शेवटी हा सोहळा संपूर्ण झाला.

प. पू. श्रीदत्तमहाराजांचे वाचन, निरूपण म्हणजे गंगेच्या ओघाप्रमाणे श्रवणसंपुटावर येणारा एक स्त्रोतच होता. श्रोते, वक्ते प्रसन्न झाले. पहिला सप्ताह दत्त अमरेश्वर मंदिरात प. पू. श्रीदीक्षितस्वामींसमोर झाला. वासुदेव निवास स्थापन झाल्यावर योगीराज गुळवणी महाराजांचे सान्निध्यात हा भागवतसप्ताह झाला. श्रीगुरूमहाराज प्रसन्न झाले. दरवर्षी तितक्याच उत्कटतेने भागवत सप्ताह वासुदेव निवासात सुरू झाला. श्रीदीक्षितस्वामी महाराजांनी सुरू केलेली ही गंगा वासुदेव निवासामध्ये वहात राहिली.

श्रीभागवत सप्ताहाचे अमोघ सामर्थ्य

व्यासांनी आपल्या समाधि अवस्थेत श्रीकृष्णचरित्राचे चिंतन केले. ते आपल्या बुद्धीने जाणून घेतले. मग ते चरित्र लिहिले असे हे भक्तिपूर्ण भागवत म्हणजे ईश्वरभक्तीने भारलेला ग्रंथ असे श्रीदत्तमहाराजांचे मत आहे. पहिला सप्ताह अमरेश्वर येथे श्रीदीक्षितस्वामींच्या समोर १९२६ साली वयाच्या १६ व्या वर्षी श्रीदत्तमहाराजांनी केला. प. पू. श्रीदीक्षितस्वामींच्या सांगण्याप्रमाणे तो दरवर्षी भाद्रपद महिन्यात अमरेश्वर येथे जाऊन चाळीस वर्षे सातत्याने केला. १९५० सालापासून बाहेरचेही भागवत सप्ताह सुरू झाले. बाहेरगावचा असा पहिला सप्ताह खर्डी येथे झाला. प. पू. श्रीदीक्षितस्वामींच्या समोर जसा पहिला सप्ताह झाला. त्याचे वर्णन ऐकूनही काना, मनाला तृप्तता आली तसाच एक सुंदर भागवत सप्ताह महोत्सव पाहण्याची प्रथम संधी अनेकांना वासुदेवनिवासात मिळाली.

पूजनीय श्रीदीक्षितस्वामींचे आशीर्वाद असे सुफलित झाले. त्यावेळी असलेल्या दत्तात्रेयशास्त्र्यांचे रूपांतर श्रीवामनरावजींनी दत्तमहाराजांत केले.

जैसा पंचमालापु सुगंधु । की परिमळू आणि सुस्वादु

प. पू. श्रीगुरुमहाराजांचा व प. पू. श्रीदत्तमहाराजांचा साधारणपणे साठ वर्षांचा सतत सहवास घडला याला श्रीज्ञानेश्वरांनी म्हटल्याप्रमाणे- गोड पंचमाला सुगंधाची जोड आणि सुगंधाला उत्तम चव ह्याप्रमाणे गुरुदेव व श्रीदत्तमहाराजांचा सहवास परस्पर कल्याणकारी झालाच, पण सामान्य जनांना तो सतत मिळत राहिला.

प. पू. श्रीदत्तमहाराजांविषयी असलेली आपुलकी श्रीगुरुमहाराजांच्या साध्या वागण्यातूनही दिसून येई. श्रीदत्तमहाराज जेवावयास येणार असले तर श्रीगुरुमहाराज आधी जेवत नसत. श्रीदत्तमहाराज पायात काही घालत नाहीत याचेही श्रीगुरुमहाराजांना फार वाईट वाटे. उन्हाचे जाऊ नका असे मायेने म्हणत असत. रिक्षा आणून देण्यासाठी सांगत. श्रीगुरुमहाराज इतरांना सांगत की, श्रीदत्तमहाराज फार भिडस्त आहेत. ते कोणाला काही सांगणार नाहीत, तेव्हा आपणच त्यांची काळजी घेतली पाहिजे.

प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती यांच्या जन्मशताब्दि उत्सवानिमित्त त्यांचे ग्रंथ पुनर्मुद्रित करण्याच्या अत्यंत महत्त्वाच्या कामगिरीपासून तो वासुदेव निवास स्थापन होईपर्यंत अनेक महत्त्वाची कामे प. पू. श्रीदत्तमहाराजांनी केलेली आहेत. श्रीवासुदेव निवासाचा संकल्पच मुळी श्रीदत्तमहाराजांनी लिहिला आहे. पं. श्रीआत्मारामशास्त्री जेऱ्यांसारखी मंडळी व इतरही थोर अधिकारी व्यक्ती श्रीदत्तमहाराजांना श्रीगुरुमहाराजांचे मानसपुत्रच संबोधित असत.

गृहस्थाश्रम अनासक्त वृत्तीने, जबाबदाऱ्या न चुकविता चालला होता. श्रीगुरुसेवाही अशी अखंड चालूच होती. अध्यापन व ज्ञानार्जन अव्याहतपणे चालूच होते. संसारात अनुकूल-प्रतिकूल घडत होते. त्यांच्या विद्वत्तेचा नांवलैकिक महाराष्ट्रातच नव्हे, तर संबध देशभर सर्वत्र होत होता. वडील, मातोश्री व श्रीगुरुमहाराज यांना धन्यता वाटत होती. समाधान वाटत होते. श्रीदत्तमहाराज जसे गुरुभक्त तसेच मातृपितृभक्त होते. आपल्या ईश्वरी प्रसादाने झालेल्या या पुत्राचे हे सारे कार्य पाहून मातोश्री तृप्त झाल्या

❋

मातृवियोग

या मातृवियोगाबद्दल बोलताना आजही ते भारावतात. त्यांच्या मातोश्री त्यावेळी विदर्भ मराठवाड्याकडे होत्या. शेगावचे जसे श्रीगजानन महाराज तसेच तेथे श्रीसखाराम महाराज म्हणून फार मोठे संत होऊन गेले. त्यांचा पुण्यतिथी उत्सव मोठ्या थाटामाटाने होतो. खूप अन्नदान होते. त्या उत्सवाला आईसाहेब गेल्या होत्या. तेथून त्या जालन्याला परत गेल्या व आजारी झाल्या. त्यातच त्यांचे देहावसान झाले. श्रीदत्तमहाराजांना पुण्याला तार आली. तार आल्याबरोबर ते महाराजांना

सांगण्यासाठी गेले. श्रीगुरूमहाराज लगेच म्हणाले. ''बरे झाले. त्यांच्या इच्छेप्रमाणे झाले. अलिकडे त्या कोणाही सतपुरुषाकडे मला आधी जाऊ दे. हा आशीर्वाद मागत असत. तो फळाला आला व अहेवपणी जाण्याची त्यांची इच्छा पुरी झाली!''

प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या पिताजींना मातोश्री नेहमीच म्हणत असत की, ''मला अग्नी तुम्ही द्या. श्रीधुंडिराज महाराज म्हणत, ते काम दत्तात्रेय बघतील. त्या भाग्यवान माउलीची तीही इच्छा पूर्ण झाली. त्या गेल्या त्यावेळी प. पू. श्रीदत्तमहाराजही जवळ नव्हते, त्यांचे भाऊही नव्हते, शेवटी योग असा आला की श्रीदत्तमहाराजांच्या पिताजींना अग्नीसंस्कार करावे लागले. मातोश्रींच्या मनात जी जी इच्छा होती ती पुरी झाली. श्रीदत्तमहाराज गहिवरून सांगत होते की, ''आम्ही घरी आलो की एक नमस्कार वडिलांना करीत होतो व एक आईला. आता दुसरा नमस्कार कुठे करायचा?'' हे सांगताना मातृवियोगाचे दुःख तीव्रतेने त्यांच्या चेहऱ्यावर जाणवले. संतांचे मन कोवळे असते. त्यांच्या दहनानंतर पायातील जोडवी, मणी-मंगळसूत्र व हातातील बांगड्या या अग्निदेवाने प्रसाद म्हणून परत दिल्या. त्या आज प. पू. श्रीदत्तमहाराजांजवळ आईची दौलत म्हणून आहेत.

श्रीधुंडिराज महाराजांप्रमाणे मातोश्रींचाही अधिकार मोठा होता. त्या लोकांच्या अडीअडचणीच्या वेळी फार उपयोगी पडत. औषधेही सांगत असत. बारीकसारीक उपाय सांगत. त्यांच्या हाताला यश होते. आईसाहेब नावाप्रमाणे माऊली बनून त्या सर्वांना उपयोगी पडत. श्रीदत्तमहाराजांची साठीशांती बघायला मात्र त्या नव्हत्या. साठी शांती बघायची इच्छा आहे, असे त्या पं. श्रीआत्मारामशास्त्री जेरे यांच्याजवळ बोलल्याही होत्या. पण आता तो उत्सव त्यांना श्रुतीगम्य झाला होता. पं. श्रीआत्मारामशास्त्री म्हणाले, 'पुत्राच्या वैभवाच्या दर्शनापेक्षा ईश्वर कदाचित आपली पारलौकिक सेवा महत्त्वाची समजत असेल!'

प. पू. श्रीदत्तमहाराजांचा षष्ठ्यब्दीपूर्ती समारंभ

प. पू. श्रीगुळवणीमहाराजांनी मोठ्या हौसेने, अगत्याने, आपुलकीने श्रीदत्तमहाराजांचा षष्ठ्यब्दी समारोह करण्याचे ठरविले. एक सुंदर कार्यक्रम आश्रमात घडवून आणला. प. पू. श्रीदत्तमहाराजांनी आजपर्यंत अनेक समारंभाचे नियोजन केले होते. हे काम यावेळी स्वतः महाराजांनी केले. दुपारी सत्कार समारंभासाठी एस. पी. कॉलेजचा हॉल घेतला होता. सभास्थान खऱ्या अर्थाने सुशोभित दिसत होते. एका बाजूला योगीराज श्रीगुळवणी महाराज, तर दुसऱ्या बाजूला तितकेच अधिकारी असे त्यांचे पिताजी श्रीधुंडिराजशास्त्री होते. श्रोतृवर्गाच्या डोळ्यांचे अक्षरशः पारणे फिटले. अनेकांची प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या गौरवार्थ भाषणे झाली. विशेषतः श्रीगुरूमहाराज कधीही समारंभात बोलत नसत. पण या समारंभात माईक हातात घेऊन

श्रीगुरूमहाराज स्वतः चार शब्द बोलले. श्रीगुरूमहाराजांनी आशीर्वाद तर दिलाच, पण यापुढील आश्रमाची संपूर्ण जबाबदारी आपणांवर आहे, आपणच ती धुरा हातात घ्यावयाची आहे, शेवटपर्यंत सांभाळायची आहे, अशा तऱ्हेचे आर्शीवादाचे शब्द त्यावेळी श्रीगुरूमहाराजांच्या मुखातून बाहेर पडत होते. ती देववाणीच होती. श्रीगुरूमहाराजांचे चार शब्द खरेच, कानामनाची तृप्ती करून गेले!

'मितले आणि रसाळ। शब्द जैसे कल्लोळ अमृताचे।।' या ज्ञानेश्वरांच्या उक्तीप्रमाणे खरेच ते शब्द भासले. सारी सभा तटस्थ झाली. श्रीगुरूमहाराजांची ती प्रसन्न मुद्रा, तो शांत भाव, डोळ्यातून प्रगट होणारा कृपाप्रसाद श्रीदत्तमहाराजांवर आशीर्वादाचा वर्षाव करीत होता. सर्वांची मने एकाग्र झाली. श्रीगुरूमहाराजांचे शब्द हृदयात धारण करू लागली. श्रीदत्तमहाराज म्हणजे विनयाची मूर्ती फारच भारावून गेल्यासारखी वाटली. त्यांची मुद्रा या आनंदाचा उपभोग घेत होती. जणू श्रीगुरूमहाराजांच्या आत्मरूपाशी एकरूप झाली होती.

श्रीधुंडीराजमहारांजाचे देऊळगावराजाहून श्रीगुरुमहाराजांना पत्र आले ते मोठे हृदयस्पर्शी होते. ते म्हणतात, 'आमच्या दत्तात्रेयाना आपण पदरात घेतलेत याचे समाधान शब्दाने करवत नाही. आपल्यासारख्यांच्या संतकृपेने आमचे कुळ धन्य झाले!'

श्रीदत्तमहाराजांच्या हाती सर्व सूत्रे स्वतःच्या शब्दांतून जाहीरपणे श्रीगुरूमहाराजांनी त्यांच्या हाती दिली आहेत, हे या भाषणावरून व्यक्त होत आहे. समारंभ झाल्यावर सायंकाळी सौ. गोदूताई भालेराव, सौ. माई क्षीरसागर यांना श्रीदत्तमहाराजांची दृष्ट काढा असे सांगितले. श्रीदत्तमहाराजांची आई या समारंभास नव्हती. पण गुरूमाऊलीने तीही उणीव भासू दिली नाही. अशी ही माया गुरूदेवांनी श्रीदत्तमहाराजांवर अखंडपणे केली!

मुंबईच्या 'दीपलक्ष्मी' या सुविख्यात मासिकाने श्रीदत्तमहाराजांचा गौरव विशेषांक काढला. त्यात पं. श्रीआत्मारामशास्त्री जेरे, श्रीदत्तमहाराजांचे शिष्य रघुनाथशास्त्री जोशी, ब्रह्मश्री भालचंद्रशास्त्री उप्पिन बेट्टिगिरी यांनी महाराजांवर गौरवपूर्ण लेख लिहिले आहेत. साठी शांत खरोखरच शांती प्रदान करणारी ठरली!

शक्तीपात दीक्षा

गीतेच्या अठराव्या अध्यायात शेवटी श्रीकृष्णांनी सर्व उपदेश अर्जुनाला करून झाल्यावर अर्जुनाला आलिंगन दिले. अर्जुनाची समाधी लागली. 'नारायणे विश्व कोंदले' ही अनुभूती आली.

आत्मस्वरूपाचा बोध जो प्रत्यक्ष केला होता त्याचा अनुभव आला व तो आत्मस्वरूप काय हे जाणू लागला. प्रत्यक्ष श्रीकृष्णांनी केलेल्या स्पर्शामुळे त्याला

अनुभव आला. हा स्पर्श शक्तीपातच आहे, असे अध्यात्म ज्ञानी लोकांचे म्हणणे आहे. श्रीज्ञानेश्वरांनी शक्तिपात रहस्याची उकल अशी बहारदार केली आहे.

श्रीसमर्थ रामदास स्वामींचा दासनवमी उत्सव गडावर चालू होता. प. पू. श्रीश्रीधरस्वामींकडून निरोप घेऊन माणूस पुण्याला आला. आपणाला श्रीदत्तमहाराजांना घेऊन सज्जनगडावर येण्यास सांगितले आहे असे गुरूदेवांकडे येऊन सांगू लागला.

प. पू. श्रीदत्तमहाराज त्यावेळी आजारी होते. त्यांना फार ताप येत होता. अशक्तपणा होता. प. पू. श्री श्रीधरस्वामींकडून मुद्दाम बोलावणे आले आहे. तेव्हा तुम्ही जरूर जा, असा सल्ला श्रीगुरूमहाराजांनी श्रीदत्तमहाराजांना दिला. त्यावेळी श्रीदत्तमहाराजांचे वडील पुण्यातच होते तेही म्हणाले, ''संताचे बोलावणे आहे तेव्हा जरूर जा तुम्हास बरे वाटेल.''

ताप व अशक्तपणा असतानाही आलेल्या मनुष्याबरोबर श्रीदत्तमहाराज निघाले. आपणाला गड चढून जाता येईल की नाही, याचा विचार त्यांनी फारसा केला नाही. प. पू. श्रीधरस्वामींचे बोलावणे आणि श्रीगुरूमहाराजांची अनुज्ञा यामुळे आपल्याला काही होणार नाही याची खात्री त्यांना वाटत होती. सज्जनगडाच्या पायथ्याशी आल्यावर त्यांनी श्रीसमर्थांना मनोमन वंदन केले प. पू. श्रीधरस्वामींना निरोप पाठविला की, आपल्या आज्ञेप्रमाणे पायथ्यापर्यंत आलो आहे. प्रकृती अस्वस्थ आहे, तेव्हा काय करू? प्रकृति ठीक नाही तर डोली करून या, असा प. पू. श्री श्रीधरस्वामींचा निरोप आला. डोलीतून येणे स्वभावाच्या विरूद्ध होते. अखेरीस तसेच वर गेले. दुसऱ्याच दिवसापासून ताप उतरून हुशारी वाटू लागली. श्रीगुरुमहाराजांचे व वडिलांचे शब्द खरे ठरले.

उत्सव फार मोठ्या प्रमाणावर झाला. वातावरण फार प्रसन्न होते. समर्थांच्या स्मरणाने मनाला आनंद वाटत होता. रामनामाचा जप, करुणाष्टके, मनाचे श्लोक यांचे धीरगंभीर स्वर कानांवर पडत होते. जयजय रघुवीर समर्थ असा गजर कानांवर पडत होता. रामभक्त रामदासांची ही पुण्यभूमी होती. श्रीसमर्थांच्या धगधगीत वैराग्यांची त्यांना आठवण झाली. त्यांचे उत्कट भगवतप्रेम त्यांना आठवले. प. पू. श्रीदत्तमहाराजांचे आधीच विवेकी असलेले मन अंतर्मुख झाले.

तिथे एकारात्री मध्यरात्रीनंतर श्रीदत्तमहाराजांना दृष्टांत झाला. प. पू. श्रीगुळवणी महाराज स्वप्नी आले. पहाटेची वेळ होती. 'बसा' म्हणाले आणि भ्रूमध्यावर स्पर्श केला. श्रीदत्तमहाराजांना जोरदार क्रिया होऊ लागल्या. श्रीदत्तमहाराज सांगतात की, पातंजली योगसूत्रात सांगितलेल्या प्राणायामाच्या आठ प्रकारांपैकी उन्जाई प्राणायामाचा अनुभव आला. रेचक पूरक जोरदार होऊन कुंभक होऊ लागला. अत्यंत सुखद अनुभव आला. फार बरे वाटले पण तरीही मनात कुठेतरी विचाराची पाल

चुकचुकली. हे सर्व मिळाले आहे, आता पुन्हा कशाला? लगेच आठवले. 'ही देण्याघेण्याची गोष्ट नसून ईश्वरी इच्छा आहे' हा अनुभव गडावरूनच महाराजांना पत्राद्वारे कळविला. श्रीगुरूमहाराजांचे उलट टपाली उत्तर आले, ''स्वामी महाराजांची आपणांवर कृपा झाली आहे!''

'अनादिष्टस्य शास्त्रस्य स्वतएव प्रबोधनम्' श्रीदत्तमहाराज यापुढचा जो स्वानुभव सांगतात तो फार मोलाचा आहे. या कुंभकाचा आजही त्यांना फार उपयोग होतो. प्रवासातील दगदग, छातीत दुखणे यापासून कुंभकाने खूपच आराम पडतो. छातीतील दुखणे थांबते. औषध घ्यावे लागत नाही.

श्रीगुरूमहाराज संकल्पदीक्षा देत असत तशीच ही आहे. समर्थांच्या सज्जनगडावर श्रीधरस्वामींच्या सहवासात ही शक्तीपात दीक्षा श्रीदत्तमहाराजांना मिळावी, असा परमेश्वराच्या मनातील अज्ञात हेतू होता. तो आता सफल होऊन सर्वांना ज्ञात झाला.

शिष्य आणि गुरुनाथु। या दोन्ही शब्दांचा अर्थु।। श्री गुरुची परि होतु। दोहे ठाई ।।६१।। श्रीज्ञानेश्वरांच्या अमृतानुभवातील ही ओवी येथे आठवते. प. पू. श्रीवामनरावजी गुळवणीमहाराज व श्रीदत्तमहाराज दोन नसून एकच आहेत याचा बोध पटतो. शाब्दिक द्वैत लोप पावते. एक गुरुमूर्तीच डोळ्यापुढे उभी राहते. मन भारावते. मस्तक नत होते. हात जोडले जाऊन भावांजली चरणी अर्पण होते. मनाला वाटते हे दिसायला दोन कसे? सोने व सोन्याचे अलंकार, कापूर व त्याचा परिमळ, गोडी आणि गूळ. तद्वत हे दोघे शब्दाने द्वैत भासते, पण दोहोत एकत्वच नांदते. त्याचा प्रत्यक्ष अनुभव आज आपण आपल्या डोळ्याने, कानाने, मनाने अनुभवीत आहोत हे आपले केवढे भाग्य! आपल्यासारख्या सामान्य जीवांना हा प्रत्यक्ष अनुभव अंतःर्मुख होण्यास पुरेसा आहे. या एकत्वाच्या भावनेने आज आपण श्रीदत्तमहाराजांकडे पाहिले तर आपला पारमार्थिक अभ्युदय होईलच.

आणखी एक वैशिष्ट्य

प. पू. श्रीवामनरावजी गुळवणी महाराज स्वतः **प्रवचने** करीत नसत. पण त्यानी हा सारा **वारसा** श्रीदत्तमहाराजांकडे सोपविला. निवृत्तिनाथ बोलत नसत, पण त्यांनी श्रीज्ञानेश्वरांकडून श्रीज्ञानेश्वरी लिहून घेतली. या उदाहरणाप्रमाणेच पूजनीय दत्तमहाराज भागवत व श्रीगुरुचरित्र सांगून लोकांना ज्ञानदान करीत असतात. शाब्दे परेच निष्णात असा समन्वय श्रीदत्तमहाराजांमध्ये झाला आहे. श्रवणाबद्दल श्रीगुरूमहाराज म्हणत असत, की श्रवण साधनचतुष्टयसंपन्न, विवेक, वैराग्य, अनासक्त अंतःकरण असलेल्या व्यक्तीकडून करावे. अन्यथा करू नये. त्यापेक्षा तो वेळ साधनात घालवावा. अनुभवाकडे वळावयाचे असेल तर तो स्वतःच अभ्यास करून मिळवावा लागतो.

श्रीगुरूमहाराज सकाळी रोजचे आन्हिक झाल्यावर श्रीदत्तमहाराजांकडून उपनिषदांचे श्रवण करीत असत, हे श्रीवासुदेव निवास झाल्यावर सर्वांनी पाहिले आहे. भागवत सप्ताहात मोठ्या प्रेमाने श्रवणास बसत. श्रीदत्तमहाराजांना सकल वेदशास्त्राचे यथार्थ ज्ञान आहे. शिवाय विवेक-वैराग्ययुक्त अंतःकरण आहे. म्हणूनच त्यांच्याकडून श्रवण करणे आहे असे श्रीगुरूमहाराज म्हणत असत.

प्रत्यक्ष श्रीदत्तमहाराज यासंबंधी काय म्हणतात ते लक्षात ठेवण्यासारखे आहे ते म्हणतात ''प्रवचनात एखादी गोष्ट सांगून केवळ लोकानुरंजन करावे असे वाटत नाही. एकदम ज्ञानालाच हात घालून मोजके सांगावे. विषयाला सोडून इकडे तिकडे फारसे वळावे असे वाटतच नाही.'' ही ज्ञानगंगा वहात असताना श्रोत्यांनी श्रीदत्तमहाराजांची अशी भूमिका लक्षात ठेवून त्याप्रमाणे श्रवण केल्यास त्यांची चित्तशुद्धी नक्की होईल.

कोणाकडून काही अपेक्षा न ठेवणे हे प. पू. श्रीदत्तमहाराजांचे स्वभाव वैशिष्ट्य आहे. त्याची एक महाराजानीच सांगितलेली आठवण देत आहो.

श्रीगुरूमहाराज श्रीदत्तमहाराजाना आश्रमात पुष्कळ वेळा जेवावयास आमंत्रण करीत असत. श्रीदत्तमहाराज म्हणत, ''ज्या संस्थेचे आम्ही विश्वस्त आहोत त्या संस्थेत आम्ही जेवणे बरे नव्हे!'' प. पू. श्रीगुरूमहाराज लगेच प्रतिउत्तर देत की, आम्हीही एक प्रधान विश्वस्त या संस्थेचे आहोत. मग आम्ही येथे जेवणे बरोबर नाही किंवा आमचे नांव तरी विश्वस्त म्हणून पुसून टाकावे.' प. पू. श्रीदत्तमहाराज म्हणाले, यावर आम्ही निरुत्तर झालो. आपतः लक्षात आले की येथे जेवण घेणे हा श्रींचा प्रसाद आहे. आजही ते उत्तराधिकारी होऊनही आश्रमात रहात नाहीत. एकदा घरची सर्व मंडळी बाहेरगावी गेली होती. श्रीदत्तमहाराज एकटेच होते व्यवस्थापक श्री. नाना कुळकर्णी यांना श्रीदत्तमहाराजांनी विचारले की, ''नाना, अशी अशी अडचण आहे, तर चार दिवस आश्रमात प्रसादास येऊ का?'' केवळ उपचार नव्हे पण नियमांचा भंग होऊ नये अशी इच्छा असे.

प. पू. श्रीदत्तमहाराजांना आजही कुणी बक्षीसपत्राने जमीन देऊ पाहतात, पैसे देतात, पण ते कोणतेही पैसे स्वतः घेत नाहीत. वासुदेव निवासाला देऊन टाकतात किंवा देऊळगावराजाला मिळाले तर तेथील पिताजींच्या विश्वस्त निधीला देऊन टाकतात. अपरिग्रह हा गुण विशेष करून प्रत्ययास येतो. गुरुत्वाची पदवी बहाल होते ती अशा शुचित्वानेच. अंतर्बाह्य शुचित्व असल्यामुळे त्यांची आणखी एक अकर्तेपणाची तीव्र भावना मनामध्ये आहे.

परी मने वाचो देहे। जैसा जो व्यापारु आहे।। तो मी करीत आहे। ऐसे न म्हणे करणे वा न करणे हे आघवे तोची जाणे।। विश्व चळतसे जेणे परमात्मेनी ।।

ज्ञानेश्वरीतील या ओव्यांचा उल्लेख करून हे सारे कार्य भगवंताच्या इच्छेने चालते असे ते म्हणतात. 'मीपणाच्या भोवऱ्यात अडकून फिरणाऱ्या मनाला ॲटमबॉम्बप्रमाणे तो एक दणका आहे.' जगातील साऱ्या घटना त्याच्या इच्छेने घडत असतात. आपण फक्त निमित्तमात्र असतो. आपल्या जीवनात चांगले किंवा वाईट प्रसंग येतील ते सगळे भगवंताच्या इच्छेनेच येतात ही श्रद्धा साधकाने ठेवली पाहिजे, असे त्यांचे सांगणे असते. आपल्या स्वतःच्या मनातील आग्रह वजा केला तर भगवंताच्या इच्छेशी असलेला तिचा विरोध आपोआप गळून पडतो. आपले मन विश्वमनाशी संपूर्ण सहकार्य करायला शिकते आणि आपले समाधान कायम टिकते.

पिताजींकडून मंत्रोपदेशाचा अधिकार

पुण्यातील श्रीवासुदेव निवासाचे प. पू. श्रीदत्तमहाराज जसे प्रधान विश्वस्त आहेत तसेच देऊळगावराजा येथील पिताजींच्या संस्थानचेही ते प्रमुख विश्वस्त आहेत. देऊळगावराजा येथेही त्यांना वारंवार जावे लागते.

१९७२ साली प. पू. श्रीधुंडिराजमहाराजांनी प. पू. श्रीदत्तमहाराजांना मंत्रोपदेश देण्याचा अधिकार दिला. प. पू. श्रीदत्तमहाराज अशारीतीने वंशपरंपरेप्रमाणेही गुरूपदाचे अधिकारी झाले.

मराठवाड्यातील लोक श्रीदत्तमहाराजांची वाट तिकडे पहात असतात. महाराष्ट्रातील लोक त्यांना इकडे ओढत असतात. दोन्हीकडचा हा फार मोठा पसारा सांभाळणे किती जबाबदारीचे आहे, किती कठीण आहे याची कल्पना करवतच नाही. हा पसारा आपलेपणाने पेलण्याकरिता त्यांच्या मनाचे विशालत्व, शुचित्व, निराहंकारित्व किती असेल याची कल्पना आपण कशी करणार! प. पू. श्रीधुंडिराज महाराजांचा लौकिक मराठवाड्यातील **फार मोठे संत** असा आहे. प. पू. श्रीदत्तमहाराजांचे आजोबा श्रीवक्रतुंडमहाराज हे प्रथम देऊळगावराजा येथे येऊन राहिल्यानंतर तेही मंत्रोपदेश देत असत. त्यावेळेपासून परंपरेने मंत्रोपदेश घेणारी अनेक घराणी मराठवाड्यात आहेत. आता तो सर्व ओघ प. पू. श्रीदत्तमहाराजांकडे आहे.

*

मातोश्रींची समाधी

सौ. आईसाहेबांचे धार्मिक आचरण व पूजा-अर्चा कडक होती. शिवलीलामृत, व्यंकटेशस्तोत्र वाचनात नित्य असे. श्रीगजानन महाराज, श्रीसखाराम महाराज यांच्या पोथ्यांची पारायणे करीत असत. दर शनिवारी डोक्यावरून स्नान व्हावयाचे. माघी पौर्णिमेला मंगलस्नान करावयाचे. त्यांचे पुष्कळ नियम होते. त्या महान पतिव्रता होत्या. त्या प. पू. श्रीधुंडिमहाराजांच्या समवेत प्रवासातही सतत असत. सुलतानपूर

येथे त्यांची समाधी आहे. त्यांच्या समाधीवर चौथरा व छत्री बांधली आहे. माघ पौर्णिमेला आईसाहेबांची पुण्यतिथी दरवर्षी साजरी केली जाते. मळ्यात अभिषेक, पूजा व अन्नदान हे सर्व कार्यक्रम व्यवस्थित होतात.

स्वप्रांत रोग निवारण

सौ. आईसाहेब गेल्यानंतरही त्यांचे अनुभव लोकांना येतात. एक अनुभव ऐकण्यासारखा आहे. देऊळगावराजा येथे प. पू. श्रीधुंडिराज महाराजांचे जगनशेट धन्नावत या नावाचे एक अनुग्रहित आहेत. त्यांचेकडून हा अनुभव कळला. त्यांच्या पत्नीस पांथरीचा विकार जडला होता. मुंबईच्या नामवंत डॉक्टराना दाखवून, शेवटी जसलोक हॉस्पिटलमध्ये ऑपरेशन करावयाचे ठरले. त्याप्रमाणे प्रत्यक्ष ऑपरेशनला सुरवात होऊन पोट फाडल्यावर डॉक्टरांना असे आढळले की रोग इतका वाढलेला आहे की शस्त्रक्रिया करण्यात काही अर्थ नाही. त्यांनी पोट पूर्ववत शिवून टाकले आणि नशिबावर हवाला ठेवण्यास सांगितले. त्यांना तसेच घेऊन जनगशेट नेपियन सी रोडवर घरी आले.

त्याच रात्री आईसाहेब जगनशेटजींच्या स्वप्नात आल्या आणि काय झाले याची चौकशी केली. शेटजींनी काय काय झाले ते सांगितले. आईसाहेबांनी काही काळजी करू नका. त्या बऱ्या होऊन घरी जातील असा आशीर्वाद दिला व स्वप्न संपले. त्यानंतर जगनशेटजींच्या पत्नी बऱ्या झाल्या व आजपर्यंत त्यांना काहीही त्रास नाही.

प. पू. श्रीधुंडिराजमहाराजांची शिकवण

असे अनेक अनुभव लोकांना श्रीदत्तमहाराजांच्या मातेकडून आलेले आहेत. तसेच थोर अधिकारी पिताजी यांचेकडूनही आलेले आहेत. भव संसारात माणसाला त्रिविधतप भोगावे लागतात. त्या तापापासून त्यांची सुटका करणे, त्यावर काही उपाय सांगणे, मनाला थोडे स्थिर करून त्याला ईश्वरभक्तीची गोडी लावणे ही लोकहिताची कामे प. पू. श्रीधुंडिराज महाराज व सौ. सरस्वतीबाईनी आयुष्यभर केली.

नाममंत्राचे साधन लोकांना देताना धुंडिराज महाराज काय सांगत असत ते सर्वांनीच मनात ठसवून घेण्यासारखे आहे. ''बाबारे, वैखरीने तरी नाम घेत जा. एक माळ रोज करीत जा. कमीतकमी एवढे तरी करा. नामस्मरण हा अज्ञानी लोकांचा मार्ग अशी समजूत करून घेऊ नका. मनुष्य तीर्थयात्रा, मंत्र-तंत्र, व्रतानुष्ठान, पूजा-पारायण इत्यादि देहाने करण्याची साधने करू शकतो. पण मनाने नाम घेणे जमत नाही तर तसे करू नका. प्रथम वैखरीने नाम घेण्यास सुरूवात करावी. नाम सोपे वाटते तितकेच ते कठीण आहे. ''सतत नामात रहा'' असा उपदेश करण्याची प. पू. श्रीधुंडिराज महाराजांची पद्धत होती.

श्रीगुरुमहाराजांचे अखेरचे पर्व

प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या नव्या पर्वाचा आरंभ होण्यापूर्वी श्रीगुरूमहाराजांच्या अखेरच्या पर्वातील काही घटना मनाला आणखी काही सूचक सांगून जातात. आतापर्यंत ज्या ज्या व्यक्तीजीवाचा उल्लेख या चरित्रात झाला त्या सर्वांचे श्रद्धास्थान नरसोबाची वाडी हे आहे. खुद्द श्रीदत्तमहाराजांचे जन्मस्थान नरसोबाची वाडी आहे. श्रीदत्तकृपेच्या सावलीतच ते वाढले आहेत.

श्रीगुरूमहाराजांच्या मातोश्रींना प्रसाद-पादुका भेट मिळाल्या त्याही नरसोबाच्या वाडीलाच. श्रीगुरूमहाराजांच्या जीवनाचे अखेरचे पर्व संपण्यापूर्वी त्यांच्या हातून जी एक फार मोठी सेवा घडली ती म्हणजे वाडीच्या मंदिराचा जीर्णोद्धार. संत एकनाथ महाराजांनी घाट बांधल्यानंतर या मंदिराची दुरुस्ती अशी झाली नव्हती.

एक दिवस वाडी देवस्थानची व्यवस्थापक पुजारी मंडळी गुरूमहाराजांकडे आली आणि मंदिराच्या जीर्णोद्धाराबद्दल आपण लक्ष घाला असे सांगू लागली. श्रीगुरूमहाराज अलिकडे निरवानिरवीची भाषा बोलू लागले होते. त्यातच हे काम करावे अशी पुजाऱ्यांनी इच्छा व्यक्त केल्यावर श्रीगुरूमहाराजांना फार आनंद झाला. पुजाऱ्यांची इच्छा म्हणजे देवाची इच्छा दिसते. तेव्हा त्याच्याच इच्छेने हे काम पूर्ण होईल, असे ते म्हणाले. काम करायचे ठरल्यावर अनंत हस्ताने मदत होऊ लागली. वासुदेव निवासाचे एक विश्वस्त श्री. वि. मो. वैद्य इंजिनियर यांनी वाडीला राहूनच काम करण्याचे कबूल केले. स्वतःचे जेवण हाताने करून ते वाडीत राहिले होते.

१९०७ ते १९७३ पर्यंत सतत श्रीगुरूमहाराज वाडीला गेले. पाच तपांची ही अखंड सेवा अखेरच्या पर्वात झालेले हे जीर्णोद्धाराचे काम हे सारे पित्याने पुत्रासाठी ठेवलेले धनच आहे. निष्काम मनाने घडलेली ही सेवा तुमच्या आमच्यासारख्या सामान्य जीवांना उपयोगी पडावी. ती सांभाळण्याइतकी ताकद, पावित्र्य असलेल्या श्रीदत्तमहाराजांचे हाती दिली, असे या घटनेवरून मनाला ठामपणे जाणवते.

भक्तांना सावली

वाडीत प्रदक्षिणा-सेवेला फार महत्त्व आहे. ती सेवा सहजपणे करता यावी, ऊन लागू नये, पाय पोळू नयेत, म्हणून प्रदक्षिणेच्या वाटेवर गोलाकार मंडप घातला. मंडपाच्या छतावर संपूर्ण श्रीगुरूचरित्र चित्रित केले. मंदिर दुरून आता फारच सुंदर दिसते. मंदिरामागील ओवऱ्यांही दुरूस्त झाल्या.

श्रीगुरूमहाराजांच्या मातोश्रींना त्या ठिकाणी वाडीत असताना दत्तप्रभूंनी दर्शन देऊन प्रसाद-पादुका दिल्या ते पवित्र स्थान आता दुरुस्त झाले आहे. ही सर्व कथा लेखाद्वारे फलकावर लिहिल्यामुळे वाचणाराचे मन पुलकित होते. माहिती असणाऱ्या

भक्तांच्या डोळ्यातून अश्रू ओघळतात. घाटावरील सर्व मंदिरे आता शोभून दिसू लागली आहेत.

हे सर्व काम सुमारे चार लाखांचे झाले. हे कार्य पुरे झाल्यावर श्रीगुरूमहाराजांनी पन्नास हजारांचा एक ट्रस्ट करून दरवर्षी दुरूस्ती व्हावी अशी सोय केली. वाडी गावाला धन्यता वाटली. पुजाऱ्यांनी श्रीगुरूमहाराजांचा सत्कार करून त्यांना एक प्रसाद उपरणे व शाल भेट दिली. त्यापेक्षा महत्त्वाचे पादुकांवर पाणी घालायची परवानगी दिली.

अलिकडे पादुकांवर पाणी घालायला बंदी झाली होती. त्याचे श्रीगुरूमहाराजांच्या मनाला फार दुःख वाटे. या सत्काराबरोबरच आपण आता पाणी घालायला सुरवात करावी अशी परवानगी पुजाऱ्यांनी श्रीगुरूमहाराजांना दिली. श्रीगुरूमहाराजांच्या अंतःकरणाला फार आनंद झाला. त्यांचे डोळे अश्रूंनी भरून आले. त्यांनी चटकन एक साष्टांग नमस्कार घातला. मूकपणे म्हणाले "देवा आपली सेवा पुरी झाली. आता जीवनातून मुक्त करा." हे वर्णन शब्दांनी लिहिता येण्यासारखे नाही. देहाने असे हे श्रीगुरुमहाराजांचे वाडीचे अखेरचेच दर्शन ठरले. त्याचवेळी मनोमन शुभाशीर्वाद मागितले.

या अखेरच्या पर्वात श्रीगुरूमहाराज मुक्तहस्ताने दीक्षा प्रदान करीत होते. थांबा म्हणतच नसत. इच्छा झालेल्याला तृप्त करीत. लग्न, उद्घाटन, भागवत सप्ताह साऱ्या समारंभाना जात होते. मुंबईलाही येत होते. त्यांच्या रूपाने मूर्तिमंत वात्सल्य वावरत आहे असाच सर्वांना भास होत होता.

श्रीदत्तमहाराजांनी नोकरीकरता आता कुठेही जाऊ नये असे श्रीगुरूमहाराजांना फार वाटत होते. ठाण्याला तत्त्वज्ञान विद्यापीठ आहे. त्यांचे संचालक श्री. पांडुरंगशास्त्री आठवले आहेत. अध्यापनासाठी श्रीदत्तमहाराजांना त्यांनी आपल्या विद्यापीठात बोलावले होते. श्रीगुरूमहाराजांनी आता आश्रम सोडून कुठेही जाऊ नका असे सांगितले. तसे स्पष्टपणे जाऊन शास्त्रीजींना सांगून या, असेही त्यांनी आवर्जून बजावले. यावरूनही श्रीगुरूमहाराजांचा संपूर्ण जीवभाव श्रीदत्तमहाराजांच्याभोवती एकवटला होता याची कल्पना येते.

तत्त्वज्ञान विद्यापीठातच वे. शा. सं. आत्मारामशास्त्री जेरे हे अध्यापनाचे काम करीत असत. श्रीदत्तमहाराज व पं. आत्मारामशास्त्री एकमेकांवर सख्ख्या भावाप्रमाणे प्रेम करीत असत. श्रीगुरूमहाराजांचा लोभ श्रीआत्मारामशास्त्रींवर पण होता. पं. आत्मारामशास्त्रींचे एकदा श्रीगुरूमहाराजांना ठाण्याहून पत्र आले, की मी आता निवृत्त होऊन वासुदेव निवासात आपल्या सहवासात राहण्यासाठी येणार आहे. पं. आत्मारामशास्त्रीचे येणे श्रीगुरूमहाराजांना फार समाधानाचे होईल. याकरता श्रीदत्तमहाराजांना फार आनंद झाला. योगायोग वेगळा होता. पं. आत्मारामशास्त्री

आजारी झाले. कर्करोगाने ते ग्रस्त झाले. उपाय काही चालला नाही आणि शांतपणे त्यांनी इहलोकाची यात्रा संपवली. त्याचे गुरूमहाराजांना फार वाईट वाटले. त्यांचा-आमचा सहवासाचा योग नव्हता असे जाणाऱ्या-येणाऱ्यांजवळ ते म्हणत असत.

श्रीगुरूमहाराजांची प्रकृती बिघडत होती. डॉक्टरी उपाय चालूच होते. श्रीगुरूमहाराज तसे प्रसन्नच होते. आल्या-गेल्याची चौकशी करीत होते. पण जास्तीत जास्त श्रीगुरूचरित्रातल्या गोष्टी बोलत होते. आल्या-गेल्याला श्रीगुरूचरित्र सांगत होते. आम्हाला मिळालेले वाढीव आयुष्य आता संपले आहे असे म्हणू लागले. वाडीवर श्रद्धा ठेवा आणि आश्रमाला विसरू नका, असे सर्वांना सांगत होते. अनुष्ठानासाठी श्रीदत्तमहाराज रोज येत होते. महाराजांना भेटून जात होते. एक दिवस श्रीदत्तमहाराजांना जवळ बोलावून गुरूमहाराज म्हणाले, ''हे बघा मी काय सांगतो ते नीटपणे लक्षात घ्या. शैलाच्या लग्नाची स्थळे आता तुम्हाला शोधायचीत. नागपूरला काही स्थळं पाहण्यात आहेत असेही मी ऐकलंय. तर तुम्ही आता नागपूराला जा आणि वरसंशोधन करा!''

श्रीदत्तमहाराज नम्रपणे म्हणाले, ''आपल्या प्रकृतीला इतके बरे नसताना मला जाणे प्रशस्त वाटत नाही. त्या कामाची काही इतकी घाई नाही. आपल्या कृपेने सर्व ठीक होईल, तेव्हा आता माझ्या जाण्याची घाई नको!' त्यावर श्रीगुरूमहाराज म्हणाले, ''मला बरे वाटेल, काळजी करू नका. वरसंशोधनाचे कामही तितकेच महत्त्वाचे आहे. निश्चिंत मनाने आपण जा आणि येण्याची घाई करू नका!'' श्रीगुरूमहाराजांची प्रकृती ठीक दिसत नव्हती आणि श्रीगुरूमहाराजांना अशा परिस्थितीत सोडून जायचे श्रीदत्तमहाराजांच्या फार जीवावर आले होते. म्हणून पुन्हा एकदा प्रयत्न करावा असे वाटून ते म्हणाले, ''आपण म्हणता, पण मला काही आत्ता आपल्याला सोडून जायचा धीर होत नाही!'' श्रीगुरूमहाराज म्हणाले, ''सारी चिंता देवाला असते. माझी तब्येत तशी बरी आहे. पत्र वगैरे मात्र पाठवा.''

इतके निक्षून सांगितल्यावर श्रीगुरूमहाराजांचा शब्द पाळायचा म्हणूनच केवळ अस्वस्थ मनाने होकार दिला. श्रीगुरूमहाराजांचा निरोप घेताना श्रीदत्तमहाराजांचा चेहरा अत्यंत दुःखी कष्टी झाला. खोलीतून पाय बाहेर निघत नव्हता. शेवटी श्रीगुरुमहाराज पुन्हा एकदा म्हणाले, 'रात्रीची गाडी आहे ना, जेवण करून निघाले पाहिजे!' असे म्हणून श्रीदत्तमहाराजांच्या हातात प्रसाद देऊन, 'या' असे एकदा हसून म्हणाले. अशा रीतीने श्रीदत्तमहाराज **८ जानेवारी १९७४** रोजी केवळ आज्ञापालन म्हणून नागपूरला गेले. श्रीदत्तमहाराज खोलीच्या बाहेर पडल्यानंतर श्रीगुरूमहाराजांनी एक मोठा निःश्वास सोडला आणि ते एकदम गप्प झाले. श्रीगुरूमहाराजांना कळून चुकले की श्रीदत्तमहाराज आता काही आपल्याला पुन्हा भेटणार नाहीत.

९ जानेवारीपासून श्रीगुरूमहाराजांची प्रकृती अधिकाधिक बिघडत गेली. डॉक्टरी उपाय चालू होते. पण गुण पडत नव्हता. श्रीगुरूमहाराज उत्तरायण लागण्याची वाट पहात होते. त्यांना आता एकांतच हवाहवासा वाटत होता. साधना चालूच होती, तरी व्यवहार चुकत नव्हता. संक्रांत आली. श्रीगुरूमहाराजांनी जगन्नाथगुरूजींना तिळगुळ व दक्षिणा दिली. सूर्याने मकर वृत्तात प्रवेश केल्याचे बघितले आणि दि. १५ जानेवारी १९७४ रोजी म्हणजे पौष वद्य ८ च्या दुपारी एक वाजण्याच्या सुमारास हा इहलोक सोडला.

'आकाशवाणी' वरून ही बातमी प्रसारित झाली आणि गावोगावांहून भक्तजनांची पुण्यनगरीकडे रीघ लागली. जो तो गुरूमहाराजांसाठी शोकविव्हल झाला होता. सगुण दर्शनाची मनाला लागलेली ओढ कोणताही विचार पटवून घेत नव्हती.

प. पू. श्रीदत्तमहाराज येथे नव्हते, हे वर सांगितलेच आहे. ते त्यावेळी नागपूरला होते. त्यांना फोनवरून हे दुःखद वृत्त कळविण्यात आले. ते ऐकून श्रीदत्तमहाराज परमावधीचे व्याकुळ झाले आणि आता जाऊन तरी काय उपयोग? गुरूमहाराजांच्या देहाचे तरी दर्शन होईल की नाही कोणास ठाऊक! त्यापेक्षा जाऊच नये असे दुःखोदगार काढून पवनीला मोठ्या महाराजांचे स्थान होते. तेथे मनःशांतीसाठी जाऊन राहावे असे त्यांनी ठरविले. तेवढ्यात आपल्याला यायलाच पाहिजे. असा परत फोन आला. श्रीदत्तमहाराजांना यावेच लागले. ते आश्रमात प्रवेश करण्यापूर्वीच शोकावेगाने इतके व्याकुळ झाले होते की तिथेच ते म्हणाले, 'काय हा आमचा योग! मातोश्रींच्या वेळेस आम्ही नव्हतो, मुलीच्या वेळेसही आम्ही नव्हतो आणि आज श्रीगुरूमहाराजांनी आम्हाला येथून दूर पाठविले. यामागे नियतीची इच्छा काय असावी कळत नाही!

दूरत्वाचा केवळ भास। गुरूनी केले जवळ तयास ।। श्रीदत्तमहाराजांना आपला वियोग सहन होणार नाही असे जाणूनच श्रीगुरूमहाराजांनी त्यांना दूर पाठवले असले तरी त्यांना आपले उत्तराधिकारी नेमून श्रीगुरूमहाराजांनी आपले चैतन्य श्रीदत्तमहाराजांच्यात विलीन केले होते.

ये हृदयीचे ते हृदयी घातले । द्वैत न मोडिता केले । आपणा ऐसे अर्जुना ।।

श्रीगुरूमहाराजांनी हा अंतरीचा हेतू आपल्या इच्छापत्रात लिहून ठेवला होता. बाळपणापासून पाहिलेल्या व पुत्रवत मानलेल्या श्रीदत्तमहाराजांना याचा सुगावा लागू न देता अशा तऱ्हेने आपल्या शक्तीपात दीक्षेचे उत्तरदायित्व दिले. हा ओघ अखंडपणे वाहता ठेवला. श्रीदत्तमहाराजांचा आधीच भिडस्त स्वभाव तो पूर्ण अबोल झाला, अंतर्मुख झाला. दत्तपीठाचे मानकरी होऊनही त्यांचे अमानित्व कायम राहिले.

संधिकाळ

श्रीगुरूमहाराज वैकुंठवासी झाल्यानंतरचा हा काळ असा संधिकाळ होता. श्रीदत्तमहाराज आश्रमात रहात नसत. आश्रमात श्रीगुरूमहाराज सतत होते. केव्हाही गेले तरी श्रीगुरूमहाराज आश्रमात भेटायचेच. आता तसे होणार नव्हते. ती उणीव प्रथम प्रथम फारच भासे.

श्रीगुरूमहाराजांजवळ कायम चाळीस पंचेचाळीस वर्षे राहिलेले कुटुंब म्हणजे भालेराव मंडळी. श्री. नाना भालेराव तर विश्वस्तच होते. श्रीगुरूमहाराजांच्या देवांची आखीव रेखीव पूजा नानांनी चाळीस वर्षे तरी केली. श्रीनानांचे व्यक्तिमत्व तेजस्वी व शांत! ती. सौ. गोदूताई भालेरावानी श्रीगुरूमहाराजांना कितीतरी वर्षे जेवू घातले. ही मोठी पुण्याईच! श्रीगुरूमहाराजांना काय लागते, कसे लागते हे सर्व या माऊलीलाच माहिती. हे वयोवृद्ध जोडपे श्रीगुरूमहाराज गेल्यावर आपल्या मुलाकडे रहात आहे. श्रीगुरूमहाराजांचे देहावसान झाल्यानंतरच्या संधिकाळात अशा घटना घडल्या की काही माणसे आम्हाला दुरावली असे श्रीदत्तमहाराज म्हणतात.

श्री. केशवराव जोशी हे सुद्धा नोकरी सोडून श्रीगुरूमहाराजांपाशी सेवा करण्यासाठी राहिले होते. श्रीगुरुमहाराजांचे पत्रलेखनाचे काम, त्यांची देखभाल करण्याचे काम ते करीत असत. असा थोडासा काळ सोडला तर वासुदेव निवासांची घडी परत बसू लागली. श्री गुरूमहाराजांच्या अस्तित्वाची प्रचीती येऊ लागली.

शक्तीपात दीक्षेचे अधिकारी

श्रीगुरूदेवांचे मनात दीक्षा गुरूत्त्वाचा अधिकार श्रीदत्तमहाराजांनाच द्यावा असा मनोमनी निश्चय होता. आतापर्यंत त्यांच्या कौटुंबिक जीवनात महाराजांनी दाखविलेली आपुलकी आपण सौ. लक्ष्मीबाईच्या तोंडूनही ऐकली. प्रत्यक्ष श्रीदत्तमहाराजांनी गुरूमहाराजांची सारी कार्ये अत्यंत आपुलकीने, पुत्रवत् प्रेमाने केली. श्री गुरुदेवांनी फार पूर्वी सोलापूरच्या वैद्यमास्तरांना लिहिलेल्या पत्राचे उत्तरात आपला मनोदय स्पष्टपणे व्यक्त केला होता. श्रीगुरूदेव त्यांना लिहितात, 'श्रीदत्तमहाराजांखेरीज इतकी योग्य साधन चतुष्टयसंपन्न विवेकवैराग्ययुक्त व्यक्ती दीक्षेचा अधिकार देण्यास दुसरी कोणती नाही!'

श्रीसमर्थसुद्धा अप्रत्यक्षपणे शक्तीचा उल्लेख शारदा या नावाने करतात. ब्रह्मस्वरूपाला सृजन होण्याची इच्छा झाल्याबरोबर या स्फुरणामध्ये अनंत शक्ती निर्माण झाल्या. सूर्य व सूर्याची प्रभा त्याप्रमाणे ही शक्ती परमेश्वराबरोबरच असते त्या शक्तीचा एक उपयोग भौतिक ज्ञान व दुसरा उपयोग आत्मा कोण हे जाणण्याचे ज्ञान.

प. पू. श्रीदत्तमहाराज हे शारदेचे सतत उपासक आहेत. सतत ते श्रीगुरूसहवासात आहेत. नाम व ज्ञान दोन्हीचा समन्वय त्यांचे ठिकाणी आहे. ही शारदेची शक्ती श्रीदत्तमहाराज भागवत व इतर प्रवचनांच्या माध्यमातूनही श्रोत्यांपर्यंत नेत असतात.

संकल्प दीक्षा देण्यास प्रारंभ

आश्रमात श्रीगुरुमहाराजांचा अस्थिकलश होता तोपर्यंत दीक्षा देण्याचा अधिकार मिळूनही श्रीदत्तमहाराज दीक्षा देत नव्हते. १५ जानेवारीला श्रीगुरुमहाराज समाधिस्थ झाले. त्यानंतर श्रीगुरुमहाराजांचा अस्थिकलश जूनपर्यत आश्रमात विसावला होता. जून महिन्यात हा कलश घेऊन श्रीदत्तमहाराज प्रयागला निघाले. २९ जून रोजी प्रयागला अस्थिविसर्जन झाले.

त्याच दिवशी श्री. व सौ. खांडेकर यांना श्रीदत्तमहाराजांनी संकल्प-दीक्षा दिली. हे सारे मोठे विलक्षण वाटते. यातील गूढ सामान्य मनाला उलगडत नाही. श्रीदत्तमहाराजांचा श्रीगुरुमहाराजांच्याबद्दलचा विनम्र भाव यातून दिसून येतो. जोपर्यंत अस्थिकलश आहे तोपर्यंत दीक्षा द्यायची नाही हा निश्चय कळून येतो. अस्थिविसर्जन झाल्यावर लगेच एका दांपत्याला दीक्षा घ्यायची इच्छा व्हावी आणि प्रयाग क्षेत्रातच त्याची सुरुवात व्हावी यावरुन या अव्यक्त घडणाऱ्या गोष्टींची सूत्रे श्रीगुरुमहाराजांनी घडवून आणली आहेत असे दिसते.

१९७४ ते १९७८ हा काळ श्रीदत्तमहाराजांच्या आयुष्यातील एक क्रांतीपर्वच होते असे म्हटले तरी चालेल. दोन्हीकडे असलेला लोकसंग्रह सांभाळणे, दोन्ही गुरुमहाराजांच्या विरहाने जनसागराच्या मनाला शांती देणे, स्वस्थ करणे, त्याकरता अनेक बऱ्यावाईट घटनांना तोंड देणे, ही मोठी कठीण जबाबदारी होती. संस्थेची घडी नीट बसविण्याचे कार्य करण्यात प. पू. श्रीदत्तमहाराजांना फार शक्ती खर्च करावी लागली, त्रास सोसावा लागला, वाईटपणाही घ्यावा लागला. हळूहळू श्रीदत्तमहाराजांचा पारमार्थिक अधिकार लोकांना कळू लागला. थोर व्यक्तिमत्व उलगडू लागले. स्वभावाची एकेक पाकळी उलगडत जावी तसे श्रीदत्तमहाराजांच्या मूक जीवनाची उकल होऊ लागली आहे आणि आत्ता कुठे त्याची जाणीव सर्वांच्या हृदयात होत आहे.

प. पू. श्रीधुंडिराज महाराजांचे निर्याण

१९७४ साली प. पू. गुळवणीमहाराज समाधिस्थ झाले. त्यांनी आपला संकल्प दीक्षेचा अधिकार प. पू. श्रीदत्तमहाराजांना दिला. १९७६ साली श्रीधुंडिराज महाराजांची सौरीशांती झाली. १९७८ साली श्रीधुंडिराज महाराज वैकुंठवासी झाले.

एक गोष्ट लक्षात येते. दोन्ही दीक्षा विधीचे अधिकार प. पू. श्रीदत्तमहाराजांना मिळाल्यावर ते पाहण्याचे भाग्य श्रीधुंडिराजमहाराजांना लाभले. हा देखील एक अपूर्व योग वाटतो. प. पू. श्रीदत्तमहाराजांचे हे ब्रह्मसाम्राज्याचे वैभव पाहून त्यांना तृप्त मनाने आशीर्वाद देऊन श्रीधुंडिराज महाराजांनी देह ठेवला.

पिताश्रींची समाधी

प. पू. श्रीधुंडिराज महाराजांची समाधी देऊळगावराजाला आहे. गावाबाहेर फार मोठी भव्य वास्तू आहे. वर श्रीदत्ताचे देऊळ आहे. खाली समाधिस्थानात श्रीधुंडिराज महाराजांची सुंदर संगमरवरी मूर्ती बसवली आहे. हे स्थानही मोठे जागृत आहे. चैतन्याने भारलेले आहे. मन ओढून घेणारे आहे. १९४६ साली पिताश्रींची साठीशांत, १९६६ ला सहस्त्रदर्शन शांती, १९७१ रौद्रीशांती देऊळगावराजाला झाली हे सर्व उत्सव प. पू. श्रीगुळवणी महाराजांचे व पिताजींचे सहा-सहा महिन्याच्या अंतराने झाले. **१९७६** साली सौरीशांत झाली, त्यावेळी मात्र प. पू. श्रीगुळवणी महाराज नव्हते. श्रीदत्तमहाराजांनी दोन्हीकडचे उत्सव सतत लक्ष घालून प्रेमाने आत्मियतेने केले. गुरुंचा नावलौकिक वाढविला. देऊळगावराजा येथे बालाजीचे देऊळ आहे. तेथेही श्रीदत्तमहाराज वर्षातून एक सप्ताह करतात.

अग्निहोत्राची सुरवात

प. पू. श्रीदत्तमहाराजांना पूर्वीपासूनच अग्निहोत्राबद्दल फार आस्था आहे. त्यामुळे श्री. राजाराम कुळकर्णी यांनी अग्निहोत्र घ्यायची इच्छा व्यक्त करताच श्रीदत्तमहाराजांना अतिशय आनंद होऊन ते त्यांना सर्वतोपरी सहाय्य करण्यास पुढे आले. योगायोगाने त्याचवेळी पुण्याचे श्री आबासाहेब पटवर्धन यांनीही त्यांच्या पाठशाळेत अग्निहोत्र ठेवायची इच्छा प्रदर्शित केली. प. पू. श्रीदत्तमहाराजानी पटवर्धनांना राजाराम कुळकर्णी यांस सन्मानपूर्वक अग्निहोत्र स्थापन करू देण्याबाबत सांगितले. अशा तऱ्हेने गेल्या पन्नास वर्षात पुण्यात अग्निहोत्र नसल्याने झालेली उणीव श्री. राजाराम कुळकर्णी यांच्या अग्निहोत्राने भरून निघाली आहे. अशा तऱ्हेने गेल्या पन्नास वर्षात पुण्यात अग्निहोत्र नसल्याने असलेली उणीव श्री. राजाराम कुळकर्णी यांच्या अग्निहोत्राने भरुन निघाली आहे. अशा तऱ्हेने श्रीदत्तमहाराजांच्या जीवनातील वामन निवासाइतकेच अग्निहोत्र स्थापना हे एक फार मोठे कार्य आहे.

भागवत सप्ताहाची थोरवी

भावगत सप्ताहाची ही गंगा आणखी एक प्रचीती आणून देते. भागवत सप्ताह ज्या ठिकाणी होतो तेथेही आनंदाचे साम्राज्य पसरते. मनोमनी सत्प्रवृत्तीचा उगम

होऊन प्रत्येक जण या सत्कर्माला मदत करावी म्हणून धावत असतो. जनमानसावर ईश्वरभक्तीचा ठसा उमटतो. तो कधी पुसला जात नाही.

श्रीगुरुमहाराजांचे जानेवारी १९७४ मध्ये महानिर्वाण झाले. त्यांच्या उपस्थितीत बोरिवलीला लेखिकेच्या घरी भागवतसप्ताह व्हावा या संकल्पाला त्यांनी संमती दिली होती. त्यांच्याच प्रेरणेने प. पू. श्रीदत्तमहाराजाना प्रार्थना केली. त्यानाही ह्या प्रेरणेचे कौतुक वाटले. त्यांची संमती मिळाली. ऑक्टोबर १९७४ साली बोरिवलीच्या परांजपेनगरातील ज्ञानयोग सहनिवासात झालेला भागवत सप्ताह असाच कायमचा ठसा ठेवून गेला. सप्ताहाला एकूण ७५ ते ८० लोक बसले होते. मांडव घातला होता, आरास केली होती. यावेळी प. पू. श्रीदत्तमहाराज, जगन्नाथ पुजारी, बापूसाहेब कुबडे इ. सर्व मंडळी आली होती. सकाळी संहितावाचन, दुपारी निरुपण, रात्री ९ ते १० श्री. सु. ग. शेवडे यांची 'हिंदूधर्म समजून घ्या' या विषयावरील प्रवचने होती. लोकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आणि सारे पटांगण फुलून गेले. सजवलेल्या पालखीतून भागवताची फार मोठी मिरवणूक निघाली. भजनी मंडळे आली. कशास काही कमी नव्हते. हे आपण करु म्हटल्याने शक्य झाले नसते ते भागवतकृपेने एक आगळे सामाजिक कार्य सुरु झाले. 'मासिक ज्ञान सत्र' दर महिन्याच्या शेवटच्या सोमवारी सातत्याने जराही खंड न पडता सुरु झाले. गुरुर्ब्रह्मा-या स्तवनाने सोमवारच्या कार्यक्रमाची सुरुवात होऊन पसायदानाने समारोप होतो. एकत्र जमून काही चांगले विचार ऐकणे, कशात सक्रीय मदत करता आल्यास करणे असे काम सुरु असते. ही भागवत सप्ताहाची कृपा आहे. **'सामर्थ्य आहे चळवळीचे। जो जो करील तयांचे। परंतु तेथे भगवंताचे । अधिष्ठान पाहिजे।'**

हे भगवंताचे अधिष्ठान प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या वास्तव्यात लाभले. भागवत सप्ताहाचे महत्त्व असे खोलवर जाऊन पोहोचणारे असते. हे एक समाजकार्यच आहे. सत्प्रवृत्तीचा प्रसार या सप्ताहातून वाढीस लागतो. सत्प्रवृत्त माणसे तयार होणे हे सुसंघटित व सुव्यवस्थित समाजरचनेच्या दृष्टिने आवश्यक गोष्ट आहे. सत्प्रवृत्ती या शिकवाव्या लागतात. सद्विचार सांगावे लागतात. सत्प्रवृत्त समाज हा देशाला अभ्युदयाला नेतो. या दृष्टीने खेडोपाडी जाऊन होणाऱ्या ज्ञान-यज्ञाचे महत्त्व फार वाटते.

◆

काही उल्लेखनीय गोष्टी

महाराजांचा ज्योतिषशास्त्राचा अभ्यास चांगला असून चेहरा पाहूनही (Face Reading) ते भविष्य सांगतात. संस्कृत, मराठी, कानडी, व हिंदी या भाषांवर त्यांचे प्रभुत्व आहे. संगीताचे शिक्षण त्यांनी घेतले आहे. तबला ते फार सुंदर वाजवतात. 'दरबारी कानडा' हा राग त्यांना विशेष प्रिय आहे. तत्त्वज्ञानी माणूस हा गंभीर

प्रवृत्तीचा असल्यामुळे कलेचा आस्वाद घेऊ शकत नांही किंवा तो कलाकार नसतो अशी सर्वसाधारण कल्पना असते. श्रीमहाराज नियमाला अपवाद आहेत. तत्त्वज्ञानी श्रीदत्तमहाराज संगीताचे भोक्ते आहेत.

गंभीर तत्त्वचिंतन करणारा तत्त्वज्ञानी माणूस विनोदाला पारखा झालेला असतो असेही समजतात. पण दुसऱ्याच्या रागाचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी प. पू. श्रीदत्तमहाराज विनोदाचा चपखल उपयोग करतात. त्यांच्या प्रवचनातही नर्म विनोद पुष्कळदा आढळतो. त्यांचा विनोद बोचणारा नसतो.

त्याचप्रमाणे दुसऱ्याचे दोष पाहण्याची दृष्टीच नसल्याने ते नेहमीच दुसऱ्यांना मोठेपणा देऊन मोकळे होतात. 'तुमचे पूर्व-सुकृत चांगले आहे. तुमच्यामुळे अमुक अमुक घडले, तुमच्यावर ईश्वराची कृपा आहे. अशा सारखे जेव्हा ते बोलतात, तेव्हा आपण चक्रावून जातो.

कुमार शिक्षेतील काही वेचे (भाषांतर)

१) ज्ञान प्राप्तीची इच्छा करणाऱ्याने आश्रमकर्म फलासक्ति सोडून करावे.

२) योगारूढ विवेकी पुरुषाने कर्म टाकून शमादि साधने स्वीकारावी.

३) अशुद्ध अंतःकरणाच्या अज्ञानी जीवाने अष्टांगयोग आणि आत्मसाक्षातकार यांची एकदम हाव धरणे म्हणजे दरिद्री क्षुधिताने आपल्या पुढील वाढलेले अन्न टाकून श्रीमंती पक्वानांची इच्छा करण्याप्रमाणे आहे.

४) थोड्याशा वैराग्याचे लहरीने व उत्कंठेने जो कर्माचरण सोडतो तो काहीच प्राप्त न होता उभयलोकी दुःख पावतो, .

५) ज्याची चित्त शुद्धी झाली नाही अशाने नुसत्या शब्द पांडित्यावर भर देऊन नित्य नैमित्तिक कर्म सोडणे म्हणजे कल्पवृक्षाची मुळे तोडून त्याचा विस्तार वाढवू पाहण्यासारखे आहे.

६) शेवटी वासुदेवानंद म्हणतात व्याकरण तर्क मिमांसा इत्यादी पक्वान्ने सेवन करणारे दुसरे कोणी असोत पण ही कुमार शिक्षा अव्युत्पन्न मुलांस सकाळच्या न्याहरीप्रमाणे होवो

दत्तभक्त-रहस्य या डॉ. सदाशीव कृष्ण फडके यांच्या ग्रंथामधून

卐

प. पू. श्रीदत्तमहाराज अमृत महोत्सव समारंभ

रविवार दि. २४-५-१९८१ ते रविवार दि. ३१-५-१९८१



प. पू. श्रीदत्तमहाराज अमृत महोत्सव सोहळा

प. पू. श्रीदत्तमहाराजांचा अमृत महोत्सव दि. **२५ मे ते ३१ मे १९८१** असा सात दिवस मोठ्या वैभवाने संपन्न झाला. महोत्सवास भारताच्या सर्व भागातून भक्त साधक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सत्कार समितीचे पदाधिकारी

वारकरी संप्रदायाचे ह. भ. प. धुंडामहाराज देगळूरकर यानी अमृत महोत्सव समितीचे अध्यक्षस्थान स्वीकारले. उपाध्यक्षपदी गुरुभक्त केसरी श्री. बापूसाहेब कुबडे व प्रा. डॉ. दि. ब. केरुर यांची नियुक्ती झाली. कार्याध्यक्ष श्री. गोविंदशेठ साबळे, कार्यवाह म्हणून वे.शा.स. श्री. ज. ल. पुजारी व श्री. प. वा. मनोळकर, सहकार्यवाह म्हणून श्री. वसंतराव गाडगीळ, कोषाध्यक्ष श्री. दत्तोपंत शिंगणे अशी निवड करण्यात आली.

सर्वच भक्तमंडळी कामाला लागली. वारंवार बैठकी होऊ लागल्या. निवेदने सर्व दूरवर पाठविण्यात आली. सकाळ, केसरी, तरुण भारत आदी वृत्तपत्रातून प. पू. श्रीदत्तमहाराजांवर लेख येऊ लागले. श्रीमहाराजांच्या अमृतमहोत्सवाची वार्ता सर्व महाराष्ट्रभर त्याशिवाय कर्नाटक, गुजराथ, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश अशी सर्वकडे गेली. पत्रांचा आणि पैशांचा ओघ वाहू लागला.

सर्वांच्या विचाराने कार्यक्रमपत्रिका ठरली. चारी शाखांच्या वैदिकांना व शास्त्रीमंडळीना आदराची व आग्रहाची निमंत्रणे गेली होती.

।।श्री गणेशदत्तगुरुभ्यो नमः।।

महामहोपाध्याय पंडित श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांचा अमृत महोत्सव समारंभ

दैनंदिन कार्यक्रम

प्रतिदिनी सकाळी ७ ते १२

दि. २४-५-८१ रविवार — वैशाख कृ. ५ सर्व प्रायश्चित विधी, सायंकाळी उदकशांती

दि. २५-५-८१ सोमवार — वैशाख कृ. ६ देवता अभिवादन, संकल्प, गणेशपूजन, पुण्याहवाचन, मातृकापूजन, नांदीश्राद्ध (भोजनासह) आचार्यादि, ऋत्विकवरण, देवतास्थापना, अग्निस्थापना, अन्वाधान, गृहहवन ऋक्संहिता स्वाहाकार आरंभ

दि. २६-५-८१ मंगळवार	वैशाख कृ. ७ ऋक्संहिता स्वाहाकार, श्री गणेश याग
दि. २७-५-८१ बुधवार	वैशाख कृ. ८ ऋक्संहिता स्वाहाकार, नवचंडी याग
दि. २८-५-८१ गुरुवार	वैशाख कृ. ९ ऋक्संहिता स्वाहाकार, सौर याग
दि. २९-५-८१ शुक्रवार	वैशाख कृ. १० ऋक्संहिता स्वाहाकार, भैमरथी शांती
दि. ३०-५-८१ शनिवार	वैशाख कृ. ११ ऋक्संहिता व लघुरुद्र स्वाहाकार
दि. ३१-५-८१ रविवार	वैशाख कृ. १३ ऋक्संहिता स्वाहाकार पूर्णाहुती, ऋत्विजांचे पूजन, समारोप, आशीर्वाद.

सायंकाळी होणारे कार्यक्रम

दि. २५-५-८१ सोमवार	श्री वासुदेव निवास भजनी मंडळ, भजन सौ. गोरे व भगिनी वेळ ४ ते ५॥
दि. २६-५-८१ मंगळवार	सौ. काळे आणि मंडळी, मुलुंड यांचे एकनाथी भारुड वेळ ४ ते ६
दि. २७-५-८१ बुधवार	सौ. राधाबाई साबळे व इतर गीता भजनी मंडळ भजन वेळ ४ ते ५॥
दि. २७-५-८१ बुधवार	पं. महेश्वरशास्त्री उप्पीनबेटगिरी यांचे इंग्रजी व्याख्यान वेळ ६ ते ७ ह. भ. प. श्री. धुंडामहाराज देगलूरकर यांचे कीर्तन वेळ रात्रौ ८ ते १०
दि.२५-५-८१ गुरुवार	साधना सेवा मंडळ, अहमदाबाद यांचे भजन वेळ ४ ते ५॥
दि. २८-५-८१ गुरुवार	पं. महेश्वरशास्त्री उप्पीनबेटगिरी यांचे संस्कृत व्याख्यान वेळ ६ ते ७ श्री. ह. भ. प. धुंडामहाराज देगलूरकर यांचे किर्तन वेळ रात्रौ ८ ते १०
दि. २९-५-८१ शुक्रवार	श्री. अण्णासाहेब शिंत्रे, अहमदाबाद यांचे प्रवचन. विषय :- दत्तयोग साधना. वेळ ४ ते ५॥

दि. ३०-५-८१ शनिवार न्याय व वेदांतशास्त्र चर्चा वेळ ३ ते ५॥
सामान्य निरुक्तीः (द्वितीय लक्षण),
वेदांतशास्त्र अद्वैतसिद्धिः (मिथ्यात्व, मिश्यत्वे, मिथ्यत्वे) अध्यक्ष : पंडित ब्रह्मश्री श्रीनिवासशास्त्री (डेक्कन कॉलेज)

डॉ. एच्. व्ही. सरदेसाई यांचे व्याख्यान.
विषय : योग आणि प्रकृती वेळ ६ ते ७

दि. ३१-५-८१ रविवार **प. पू. श्रीदत्तमहाराजांचा सत्कार समारंभ**
अध्यक्ष पंडित श्री ब्रह्मश्री श्रीनिवासशास्त्री
वेळ सायंकाळी ६ ते ७

यज्ञमंडप

वे. मू. सप्रेगुरुजींच्या मार्गदर्शनाखाली यज्ञमंडपाची मांडामांड सुरु झाली. शास्त्रोक्त यज्ञकुंड, वेदी स्थंडिल व अन्य यागकुंडे तयार झाली. वे. मू. श्री. दादा कोडणीकर, पं. राजेश्वर उप्पिन बेटगिरी आदी मंडळी समिधा, दर्भ वगैरे सामानाची जुळणी करु लागली. सर्व गोष्टीवर नजर टाकणारी श्रीदत्तात्रेयांची मूर्ती यज्ञकुंडाकडे तोंड करून वेदीच्या मागे उभी होती. तिच्या दोन्ही बाजूस श्रीयंत्र व श्रीदत्तयंत्र ठेवले होते. तर मागील बाजूस भव्य असा रेशमी पिवळा पडदा सोडला होता. वृक्षवेलीवर व यज्ञमंडपांत असंख्य दिवे लुकलुकत होते. या सर्वांमुळे यज्ञमंडप पावित्र्य आणि प्रसन्नतेने नुसता भरून गेला होता. त्याचे पावित्र्य टिकविण्याकरिता श्री. माळीबुवा व श्री. टापरे डोळ्यांत तेल घालून रात्रंदिवस उभे होते.

अशा या यज्ञमंडपात शनिवार, दिनांक २३ मेला एक अभिनव संकल्प झाला. त्या संकल्पपूर्तीसाठी, गुरुभक्त श्री. भगवंतराव पटवर्धन (ठाणे), वे. मू. आपटे, श्री. अप्पा आपटे व सर्व भक्तमंडळी सिद्ध झाली. श्रींच्या पादुकांना चोवीस तास अखंड रुद्राभिषेकाची संततधार धरायची, त्या तीर्थाने प. पू. श्रीदत्तमहाराजांना दशविध स्नान घालायचे. सकाळी सहा वाजताच श्री. भगवंतराव श्रींच्या पुढे हजर झाले. नित्याची पूजा होताच श्रींच्या पादुका, आधीच सजवून ठेवलेल्या सिंहासनावर ठेवण्यात आल्या. 'ॐ नमस्ते रुद्र मन्यव ...' च्या गजरात संतत धारेस सुरुवात झाली. दुसरे दिवशी सकाळी सहा वाजेपर्यंत आश्रम रुद्रमय होऊन गेला होता. आरती झाली. तीर्थजलाचे कुंभ बाजूला केले गेले.

चोवीस तारीख उजाडली आणि कार्यक्रमात रंग भरू लागला. एका बाजूला औदुंबर व बिल्ववृक्ष, तर समोर फळांनी बहरलेला आम्रवृक्ष, जवळच तुळशीवृंदावन अशा पवित्र छायेत प. पू. श्रीमहाराज पूर्वेकडे तोंड करून बसले होते. शेजारीच

गंगाजलाने व संततधारेच्या तीर्थाने भरलेले कुंभ. आठच्या सुमारास, ऋत्विजांच्या मंत्रघोषात व शास्त्रीमंडळींच्या उपस्थितीत दशविध स्नानास प्रारंभ झाला, वे. मू. सप्रे गुरुजी अन्य ऋत्विज मंडळी बरोबर होती. 'दुग्ध समर्पयामि' असे म्हणताच, वे. मू. प. गुरुजींच्या हातातील चांदीच्या पात्रातील दूध, प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या मस्तकावरून सर्व शरीरावरून स्पर्श करीत करीत असंख्य धारांनी पुढे पुढे जात होते; त्या पाठोपाठ दुसऱ्या रौप्यकलशातून गंगाजल व तीर्थजल यानंतर क्रमाक्रमाने दही, दूर्वा, सोमय, गोमूत्र, भस्म, मृत्तिका, तीळ, यव, कुश यासह असंख्य धारांनी स्नानाचा अपूर्व कार्यक्रम झाला.

प. पू. श्रीदत्तमहाराज सपत्नीक पुण्याहवाचन व प्रायश्चित्त विधीस बसले. हा विधी पूर्ण होतो आहे तोच प. पू. नानामहाराजांचे आगमन झाले. त्यामुळे आनंदात अधिकच भर पडली. जणू काही दुधात साखर. प. पू. श्रीदत्तमहाराजांना 'दीर्घायुरारोग्य लाभो व त्यांच्या हातून अशीच ईशसेवा घडो' अशी श्रीचरणांजवळ त्यांनी प्रार्थना केली. नंतर भोजन-विश्रांती होऊन रात्री आठच्या सुमारास उदकशांत झाली.

सोमवार, दि. २५ ला सकाळीच प. पू. श्रीदत्तमहाराजांनी सपत्निक पुण्याहवाचन व देवताभिवादन केले. थोड्याच वेळात नांदीश्राद्धास सुरुवात झाली. या विधीकरिता बावीस ब्राह्मण मंडळी बसली होती. प. पू. श्रीदत्तमहाराजांनी त्यासर्वांचे शास्त्रोक्त पूजन केले. भोजन-वस्त्रादि देऊन त्यांना संतुष्ट केले. अश्या रीतीने प. पू. श्रीदत्तमहाराजांचा प्रायश्चित विधी संपन्न झाला.

आता यज्ञमंडपातील द्राक्षवेलीच्या रम्य छायेत वेदाचार्य विनायक भट्ट घैसास गुरुजी 'ब्रह्मा' पदावर विराजमान झाले, तर वेदाचार्य वासुदेवभट्ट भातखंडेगुरुजी 'गाणपत्य' स्थानावर स्थानापन्न झाले. वे. मू. गोविंदभट्ट परांजपेगुरुजींनी 'सदस्यत्व' स्वीकारले तर वे. मू. प्रभाकरपंत कोडणीकरांनी 'सर्वोपद्रष्टा' हे पद भूषविले. आणि वे. मू. मोरेश्वरभट्ट घैसासांनी 'ऋत्विज' पद संपन्न केले.

नवग्रह देवता, अधिपत्याधिदेवता व ब्रह्मादि मंडळ-देवता त्या त्या स्थानावर स्थापना झाल्यावर, कलशावर ब्रह्मा-सावित्रीची स्थापना केली गेली. ग्रहयज्ञ व अन्वाधान होऊन अग्निमंथनास सुरुवात झाली. 'अग्निमंथन' हे कुतूहलच होते. त्यामुळे हा विधी पाहण्यास लोकांनी एकच गर्दी केली होती. बघताबघता धूर दिसू लागला. अग्निनारायण प्रकट झाले. लगेच या प्रकुंडात त्यांची स्थापना विधियुक्त रीतीने झाली. आणि 'अग्नये स्वाहा' च्या मंत्रघोषात अग्निमुखात तीळ पडू लागले. दहाच्या सुमारास मध्यंतर झाला. ऋत्विजमंडळींना अल्पोपाहार देण्यात आला. त्यांच्या या अल्पोपाहाराची रोजची व्यवस्था सौ. भागवत माई आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सातही दिवस उत्तम रीतीने ठेवली होती.

मंगळवार, दि. २६ रोजी श्रीगणपत्यथर्वशीर्ष दशखंडात्मक सहस्रमोदकांचे हवन झाले. याचे यजमानपद श्री. महागावकर यांनी सपत्निक भूषविले होते.

बुधवार, दि. २७ रोजी देवतांची स्थापना होऊन पुण्याहवाचन झाले. नवचंडी (दुर्गासप्तशती) यागास सुरुवात झाली. या यागाच्या यजमानपदी श्री. बाळासाहेब साठे होते.

गुरुवार, दि. २८ उजाडला तोच मुळी एका वेगळ्या यागाची नांदी करीत. हिरवा चाफा, सोनचाफा व फणस यांच्या शीतल सुगंधित व दाट अशा छायेत विशिष्ट प्रकारची तीन यज्ञकुंडे तयार केली होती. त्या ठिकाणी 'पवित्रेष्टी' करण्यात नागपूरचे आहिताग्नि बसले. विनायकभट्ट काली, सपत्नीक होते. या यागाचे 'अध्वर्यु' हनगळचे वे. मू. सीतारामशास्त्री काशीकर होते. 'होता' च्या महत्त्वपूर्ण स्थानावर वे. मू. प्रभाकरपंत कोडणीकर होते तर 'आग्नीध्र' चे स्थान क्षीश्रेत्र नृसिंहवाडीच्या वे. मू. सोलापूरकरांनी भूषविले आणि 'ब्रह्मा' च्या स्थानावर धारवाडचे वे. मू. वासुदेवभट्ट जोशी विराजमान झाले. हा याग सहसा पाहण्यास मिळत नाही कारण 'अग्निहोत्र' स्वीकारलेल्यांनीच हा याग करायचा असतो.

याच दिवशी, तिथेच असलेल्या दुसऱ्या स्थंडिलावर सौरयाग संपन्न होत होता. श्री. दशपुत्रे सपत्नीक यजमानपदी होते. सौरसूक्ताचे हवन होत होते. साधारण बाराच्या सुमारास दोन्ही यागांची पूर्णाहुती झाली.

या सर्व धार्मिक कार्यक्रमातील मुख्य कार्यक्रम म्हणजे प. पू. श्रीदत्तमहाराजांची 'भीमरथी शांती'. ही शांती, सत्तरी पूर्ण झाल्यानंतरच करायची असते. ही शांती शुक्रवार, दि. २९ रोजी झाली. यजमानपदी प. पू. श्रीदत्तमहाराज सपत्निक होते. याचे 'अध्वर्यू' नाशिकचे वे. मू. एकनाथ भट्ट गर्गे व वे. मू. लक्ष्मीकान्तभट्ट दीक्षित गुरुजी होते. हा सर्व विधी शुक्लयजुर्वेदीय पद्धतीने साजरा केला गेला. कारण प. पू. श्रीदत्तमहाराज स्वतः त्या शाखेचे आहेत. भोजन-विश्रांती झाल्यानंतर प. पू. श्रीदत्तमहाराजांनी, दक्षिणा वगैरे देऊन, उपस्थित ऋत्विजांचे यथासांग पूजन केले व वेदोक्त आशीर्वाद घेतले.

शनिवार दि. ३० चा लघुरुद्र स्वाहाकार, श्रीभगवंतराव पटवर्धन यांनी यजमानपद भूषवून संपन्न केला. याच दिवशी रात्री आठ वाजल्यापासून दुसरे दिवशी सकाळी सहा वाजेपर्यंत 'दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिंगबरा' या धूनने सर्वांना धुंद करून टाकले होते.

रविवार दि. ३१ चा ऋक्स्वाहाकाराचा पूर्णाहुतीचा सातवा दिवस, साडेनऊ वाजता स्वाहाकार संपताच प्रायश्चित्त व बलिदान झाले. आणि ऋत्विज मंडळी पूर्णाहुतीच्या तयारीस लागली. चारी शाखांचे वैदिक या सोहळ्यात सहभागी झाले

होते, हे केवढे मोठे भाग्य! असे भाग्य फारच थोड्यांच्या वाट्याला येत असेल. 'पूर्णाहितिमुत्तमानबुहोति।' अशा मंत्रघोषात तुपाच्या धारेसहित अग्निनारायणास खणनारळ अर्पण केले गेले. पूर्णाहुती झाली. नंतर प. पू. श्रीदत्तमहाराजांचे अवभृत स्नान होऊन देवतांचे पूजन झाले. उपस्थित ऋत्विजांचे दत्तमहाराजांनी यथासांग स्वतः पूजन केले.

यज्ञमंडप अनेक यागांनी मंडित होत असताना आश्रम अनेक जपानुष्ठानांनी नुसता गजबजून जात होता. पं. गणेश्वरशास्त्री द्रविड हे (वाराणसी) शुक्ल यजुर्वेदीय शाखेतील शतपथ ब्राह्मणांचे पारायण करीत होते तर वे. मू. दत्तभट्ट जंतळी (धारवाड) यजुर्वेदीय संहितेचे पारायण करीत होते. साधनामंदिरात वे. मू. गर्गे आणि वे. मू. दीक्षित (नासिक) यांचे यजुर्वेदीय संहितेच्या पारायणाचे स्वर घुमत होते. लघुरुद्र जपानुष्ठान, श्रीगुरुचरित्र, सप्तशती गुरुचरित्र, द्विसाहस्री गुरुचरित्र आदि अनुष्ठानांनी सर्व आश्रम सातही दिवस नुसता भारून गेला होता. दूरदूरची वैदिकशास्त्री व भक्तमंडळी ही अनुष्ठाने संपन्न करीत होती.

यज्ञमंडपातील देवदेवतांची पूजा-अर्चा करण्याचे काम राजाराम व आश्रमीय विद्यार्थी सातही दिवस पार पाडीत होते. नृसिंहवाडीचे वे. मू. अवधूतभट्ट बोरगावकर व वे. मू सोलापूरकर हे रात्रीच्या आरतीत असा रंग भरीत की लोकांच्या समोर साक्षात वाडीच उभी राही. परमेश्वराच्या योजनेचे आणखी एक कौतुक वाटते ते हे की सर्व कार्यक्रमात वाराणसीचे श्री. प. प. श्रीगजाननस्वामी महाराज मोठ्या आस्थेने सहभागी होत असत. असा हा संहिता स्वाहाकार रविवार, दि. ३१ पर्यंत रोज सकाळी आठ ते बारापर्यंत चालत असे.

गरवारे प्रशालेतील अतिथी-निवास

श्री. भाऊसाहेबांचे कुशल मार्गदर्शन, श्री. पेटकर, सौ. भोपटकर त्यांची मुलगी वीणा, श्री. दीक्षित आदि कार्यकर्त्यांचे कष्ट, श्रीमान साबळे शेटजींची मदत यामुळे बाहेरगावच्या अतिथींची उत्तम सोय झाली. या कामासाठी श्री. वारे नाशिकहून आले होते. अमृतमहोत्सवात नोंदणी झाल्यानंतर देण्यात आलेला सुंदर पास अनेकांनी जपून ठेवला आहे. सकाळी उठल्यानंतर चहा देण्याचे काम सौ. कोचकबाई फारच उत्तम रीतीने पार पाडीत. त्यांना मदत सौ. जोगळेकर, श्रीकृष्ण आर्वीकर, मधू पित्रे यांची असे.

ऋत्विजांच्या भोजनाची सर्व व्यवस्था कर्नाटक प्रशाळेत केली होती. प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या व सर्वांच्या पानाभोवताली सुंदर रांगोळ्या काढल्या जात. पी. एम्. टी. ची बस आलेली असे. सर्व ऋत्विज मंडळींना बसमध्ये बसवून भोजनगृहापर्यंत आणून सोडण्याचे व पुनः आश्रमात नेऊन सोडण्याचे काम वे. मू. मोरेश्वर भट्ट

घैसास, पं. राजेश्वर शास्त्री आणि त्यांचे सहकारी उत्तम रीतीने पार पाडीत असत. बाराच्या सुमारास ऋत्विज मंडळी हळूहळू येऊ लागत.

यावेळपर्यंत बाहेरील भोजनमंडपात, भक्तमंडळींची व इतर सर्वांची प्रसादाची सोय केली होती. श्री. प्रभाकरपंत सबनीस, अजित कुलकर्णी, अनिल कवीश्वर, शरद जोशी व राजु कुळकर्णी इतर माताभगिनीसह पाने वाढण्याची जबाबदारी पार पाडीत.

सौ. राधाबाई व अन्य सेविकांच्या मदतीने भोजनमंडपातील साफसफाई, श्री. लोहोकरे झटपट करून घेत. त्यामुळे पंक्तीपाठोपाठ पंक्ती उठत. चार वाजेपर्यंत, सर्व मंडळी प्रसाद ग्रहण करून पुढील कार्यक्रमाकरिता आश्रमाकडे निघून जात.

शनिवार दिनांक ३० रोजी रात्री 'परिचया' चा एक सुंदर कार्यक्रम झाला. साडेदहा वाजले होते. स्वच्छ पटांगणावर सर्व मंडळी गोलाकार बसली होती. एकमेकांचा परिचय करून देण्यास सुरुवात झाली. या साधकमंडळींत सर्व संप्रदायातील मंडळी होती. संप्रदाय मार्ग भिन्न असले तरी सर्व सत्पुरुषांचे ध्येय एकच असते, याची प्रचीती त्या दिवशी सर्वांना आली. शंभर-पाऊणशे मंडळींचा परिचय होईतोपर्यंत बारा वाजून गेले.

सत्कार सभा मंडप

आश्रमाच्या शेजारीच भव्य सत्कार मंडप श्री. दाते मांडववाले यांनी उभारून दिला होता. त्याची साफसफाई करण्याकरिता सर्वश्री. निजामपूरकर, कोठरे, पाळकर, राजू झानपुरे आदि मंडळी रात्रंदिवस खपु लागले, खड्डे बुजवणे, दगड काढणे, जमीन चोपणे, सारवणे आदी सुरू झाले, त्यामुळे बघता बघता कोकणातील घरासमोरील अंगणाची आठवण यावी. इतकी ती जमीन स्वच्छ झाली. उत्सवाचे साती दिवस हा मंडप स्वच्छ राखण्याचे काम ही सर्व मंडळी इतक्या आत्मीयतेने करीत की प्रत्येक वेळेस घरी जाण्यात त्यांना रात्रीचे अकरा देखील वाजत.

दुसऱ्या बाजूस, सर्वश्री. शिंदे, भुसारी, गुमास्ते आदी मंडळी 'व्यासपीठ' सजविण्यात गर्क झाली होती. श्रीनारायणराव दाते यांच्या देखरेखेखाली नऊ फूट उंच कमान उभारून, तिच्या मागील बाजूस अर्धवर्तुळाकार अशी फोटोंची रचना केली होती. मध्यभागी एकमुखी श्रीदत्तात्रेयांचे, त्याच्या दोन्ही बाजूस प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामीमहाराज व प. प. श्रीलोकनाथतीर्थ स्वामीमहाराज यांची आणि एका टोकास प. पू. श्रीगुळवणीमहाराज व त्यांच्या समोर दुसऱ्या टोकास जगन्माता तुळजाभवानी. या सर्वांना महावस्त्राने अलंकृत करण्यात देखील या मंडळींनी फारच औचित्य दाखवले होते. स्वामींना भगवी व इतरांना पिवळी अगर

पांढरी वस्त्रे नेसवली होती. ही सर्व सजावट इतकी कलात्मक होती की समोरून पाहणाऱ्यास साक्षात दरबार भरल्याचाच भास होई. या सर्व सौंदर्यात भर घालण्याचे काम श्री. अकोलकरांनी आपल्या रोषणाईने केले. त्यामुळे आधीच सुंदर असलेला मंडप अधिकच सुंदर दिसू लागला.

सायंकाळचे कार्यक्रम

सोमवार दि. २५ मे पासून संध्याकाळच्या कार्यक्रमांना सुरुवात झाली. 'गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु—' ने भजनास सुरुवात होई. यानंतर कधी गायन, कधी प्रवचन, कधी कीर्तन तर कधी शास्त्रचर्चा होत असत.

मंगळवार दि. २६ मे श्री. हरीभाऊ काळे, (मुलुंड) आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सादर केलेले एकनाथी भारूड तर अविस्मरणीय ठरले. त्यांचा 'जोहार' कार्यक्रम तर इतका बहारीचा झाला की. प. पू. श्रीदत्तमहाराजांनी 'त्या महारास' सर्वप्रथम भिक्षा घातली. सौ. वत्सलाबाई काळेनी मारवाडी इतका सुंदर वठवला होता की सर्वांची हसता हसता नुसती मुरकुंडी वळून जात होती.

बुधवार दि. २७ मे सहाचा सुमार. सर्व मंडप ठासून भरलेला. अशा वेळी पं. महेश्वरशास्त्री उप्पेनबेटगिरी खाली धोतर व खांद्यावर उपरणे अशा ब्राह्मणी पोशाखात त्यांची पल्लेदार इंग्रजी वाक्ये लोकांना आश्चर्याचे धक्के देऊ लागली. त्यांचे हे भाषाप्रभुत्व पाहून सर्वजण अवाक् झाले.

गुरुवार दि. २८ मे पं. महेश्वेरी उप्पिन बेटगिरी यांच्या समासप्रचुर संस्कृत भाषेची कारंजी अस्खलितपणे उडू लागताच श्रोतृवृंद त्यांच्यापुढे नतमस्तक झाला.

शुक्रवारी दि. २९ मे अहमदाबादचे श्री. अण्णासाहेब शिंदे यांचे दत्तयोग साधना या विषयावर प्रवचन झाले.

शनिवारी दि. ३० मे प. धुंडीराजशास्त्री दाते (पंचांगकर्ते) यांनी आपले प्रवचन यज्ञ संस्थेवरील उपस्थितांच्या प्रश्नाना व शंकांना उत्तर देत देत फारच रंगवून टाकले. बुधवार व गुरवारी रात्रौ ८ ते १० ह. भ. प. धुंडामहाराजांचे वारकरी संप्रदायाचे कीर्तन झाले. त्यांच्या आगळ्या कीर्तनात सर्व भक्तमंडळी दोन तास नुसती भक्तीत न्हाऊन निघाली होती.

प. पू. श्रीदत्तमहाराजांचा प्रकट सत्कार

रविवार दि. ३१ मे, अमृतमहोत्सवाचा सांगता दिन. गेले सात दिवस संपन्न होत असलेला उत्सव आज सिद्धीस गेला. पुणे येथील डेक्कन कॉलेजमधील संस्कृत कोश विभागाचे उपसंपादक पंडित ब्रह्मश्री श्रीनिवासशास्त्री प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या

प्रकट सत्कार सभेचे अध्यक्ष असावेत यात मोठे औचित्य होते. सामवेदाचे गाढ व्यासंगी, काव्य अलंकार, न्याय, व्याकरणादी विषयांचा प्रदीर्घ अभ्यास असे विद्वान व्यासंगी प्राचीन ऋषिसम आचारसंपन्न अधिकारी अध्यक्ष समारंभास लाभले ही भगवत् कृपाच होय. सुवासिनींच्या मंगल आरतीचा स्वीकार करीत पूजनीय श्रीदत्तमहाराज सौ. लक्ष्मीबाई आईसाहेबांच्यासह सभामंडपात आले. वैदिक मंगलानंतर सौ. शांताबाई गोवईकर यांनी स्वरचित स्वागत गीत गायिले.

शुभ मंगला आली वेळा
गजानन दत्त कृपेने अमृतमय हा सुदिन उगवला ॥धृ॥

स्वागत गीतानंतर सर्व प्रथम कांची कामकोटी आणि शृंगेरी येथील आचार्य पीठांच्या वतीने त्यांच्या खास प्रतिनिधीनी प. पू. श्रीदत्तमहाराजांना महावस्त्र, रुद्राक्षमाला आणि मंत्राक्षता जगद्गुरूंच्या आशीर्वादासह सादर करण्यात आल्या.

कार्यक्रमाचे संचालन प्राचार्य डॉ. केरूर यांनी करताच प्रथम प. पू. श्रीगुळवणीमहाराजांचे स्मरण केले. श्रीवासुदेव निवास योगाश्रमाची निर्मिती, या निर्मितीमधील श्रीमहाराजांची प्रेरणा आणि प. पू. श्रीदत्तमहाराजांची तपस्या यांचा उल्लेख करून सर्व उपस्थितांचे सत्कार समितीच्या वतीने स्वागत केले. समितीचे कार्यवाह वे. मू. जगन्नाथपंत पुजारी यांनी महोत्सव कार्याचा अहवाल सादर केला आणि समारंभाचे अध्यक्ष पं. श्रीनिवास शास्त्री यांचा परिचय करून दिला.

पुष्पहार समर्पण

माननीय अध्यक्ष स्थानापन्न झाल्यावर प. पू. श्रीदत्तमहाराजांचा खालील संस्थांच्या वतीने पुष्पहार समर्पण करण्यात आले.

१) श्रीक्षेत्र कारंजा नृसिंहसरस्वती देवस्थान २) श्रीक्षेत्र नृसिंहवाडी देवस्थान ३) श्रीक्षेत्र गाणगापूर देवस्थान ४) श्रीवासुदेवानंद सरस्वती धर्मशाळा गाणगापूर ५) श्रीक्षेत्र गरुडेश्वर देवस्थान ६) श्रीक्षेत्र नारेश्वर देवस्थान ७) श्री श्रीधर रेणुका प्रतिष्ठान तर्फे पृथ्वीराज भालेराव ८) श्रीक्षेत्र चिंचवड देवस्थान ९) श्रीगुरुचरित्र अखंड पारायण संस्था आनंदाश्रम १०) श्रीदेवदेवेश्वर संस्थान, पर्वती ११) पुणे महानगरपालिकाचे श्री शिवाजीराव आढाव १२) वेदशास्त्रोत्तेजक सभा, पुणे १३) निवडुंग्या विठ्ठल मंदिर देवस्थान, पुणे १४) घैसास गुरुजी वेदपाठशाळा, पुणे १५) फाटक गुरुजी स्मृति-समिती, पुणे १६) हिरण्यकेशी ब्रह्मवृंद मंडळ, पुणे १७) ब्राह्मण सेवा संघ, नौपाडा, ठाणे १८) महासिद्धयोग मंडळ, सेंधवा १९) आर्वीकर वेदपाठशाळा, नागपूर २०) चतुःशाखीय वैदिक ब्राह्मण सभा, नागपूर २१) श्री शंकराचार्य संस्कृत पाठशाळा, धारवाड २२) अखिल तीर्थ पुरोहित संघ, वाराणसी

२३) महाराष्ट्र भवन, प्रयाग २४) महाराष्ट्र समाज, प्रयाग २५) सांगवेद विद्यालय, वाराणसी २६) श्री नर्मदा परिक्रमासेवा प्रतिष्ठान, पुणे २७) श्री नर्मदा परिक्रमासेवा प्रतिष्ठान, इंदोर २८) सर परशुरामभाऊ महाविद्यालय, पुणे २९) न्यू. इंग्लिश स्कूल, रमणबाग ३०) पं. हेब्बारशास्त्री श्रीकृष्णाश्रमस्वामी, वाराणसी ३१) श्री वासुदेव निवास आश्रम, पुणे ३२) श्री वासुदेव निवास भगिनी मंडळ, पुणे ३३) आयत्यावेळी आलेले अनेक व्यक्तीजन

शुभेच्छा संदेश

पुष्पहार समर्पणानंतर समारंभास आलेल्या शुभेच्छा संदेशांचे वाचन झाले. मराठी संदेशांचे वाचन वे. मू. जगन्नाथपंत पुजारी यांनी केले. संस्कृत संदेशांचे वाचन पं. राजेश्वरशास्त्री उप्पिनबेटिगेरी यांनी केले.

श्रीनृसिंह सरस्वती स्वामी महाराज संस्थान कारंजा आपल्या पत्रात म्हणतात की पूज्य नृसिंह सरस्वतींचे शुभाशिर्वाद पाठविले आहेत. तसेच १०१ रुपयांचा धनादेश पाठविला आहे. त्याचा स्वीकार व्हावा. पूज्य श्री दत्तमहाराजांचे चरणी आमचे सर्वांचे शतकोटी प्रणाम अर्पण करून त्यांना दीर्घायुरारोग्य लाभो व त्यांचेकडून सतत सेवा घडो अशी नम्र प्रार्थना केली होती.

श्री. बापूसाहेब कुबड्यांची अनुपस्थिती सर्वांना फार जाणविली. त्यांनी आपल्या शुभसंदेशात ब्रह्मश्री दत्तमहाराज यांचे यापुढील सहस्त्रचंद्र दर्शन शांती, रौद्री शांती, सौरशांती, जन्मशताब्दी आदी महोत्सव साजरे होवोत अशा सदिच्छा दिल्या.

संदेशातील श्री. बापूसाहेब कुबडे यांच्या संदेशाचे वाचन होत असताना सर्वांनाच गहिवरून आले. प. पू. श्रीगुळवणीमहाराजांच्या प्रथमच्या तीन शिष्यांमधील श्री. बापूसाहेब हे एक. आश्रमात आजवर संपन्न झालेल्या सर्व महोत्सवांत संयोजक म्हणून श्री. बापूसाहेबांचे मुख्य मार्गदर्शन असे.

गौरव भाषणे

संदेश वाचनानंतर विविध वक्त्यांनी गौरवपर भाषणे करून प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या विषयीचा आपला आदर व्यक्त केला. भाषणे प्रातिनिधिक स्वरूपाची झाली.

. सर्वप्रथम, स्वर्गीय ब्रह्मश्री पं. आत्मारामशास्त्री यांचे सुपुत्र पंडित जेरे शास्त्री यांनी श्रीनृसिंहवाडीच्या वतीने भाषण करून श्रीदत्तप्रभूंचा आशीर्वाद सादर केला.

धारवाड येथील स्वर्गीय नागेश उप्पिन बेटिगेरी या गुरुगृहाच्या विद्यमाने वेणीमाधव शास्त्री यांनी संस्कृतमधून भाषण करून श्रीदत्तमहाराजांविषयीचा आदर, अभिमान व्यक्त केला.

त्यानंतर कर्नाटक विभागाचे प्रतिनिधी म्हणून श्री कुळकर्णी यांनी कानडीत भाषण केले.

पुण्यातील आनंदाश्रमातील अखंड गुरुचरित्र पारायण आणि भगवान श्रीधरस्वामी-भक्तजनांच्या वतीने श्री. अजित कुलकर्णी यांनी, मुंबई भक्तवृंदाच्या प्रतिनिधी म्हणून श्रीमती नीलाताई जोशी, मराठवाडा-देऊळगाव राजा येथील श्री. अनंत कवीश्वर यानी आदर व्यक्त केला. याशिवाय ह. भ. प. भालचंद्र मोरेश्वर दीक्षित, पं. लक्ष्मीकांत दीक्षित आणि बालयोगी श्री. ओतूरकर यांचीही भाषणे झाली.

श्रीवासुदेव निवास न्यासाचे ज्येष्ठ विश्वस्त श्री. वि. मो. वैद्य यांनी आपल्या भाषणात आश्रमाच्या स्थापनेचा इतिहास सांगून त्यामधील श्रीगुरुमहाराजांची भूमिका विशद केली आणि महाराजांच्या निर्याणानंतर आश्रमाची वाटचाल श्रीदत्तमहाराजांच्या मार्गदर्शनाखाली अपूर्व वैभवात चालू असल्याबद्दल आनंद व अभिमान व्यक्त केला.

विश्वस्त श्री. दामूअण्णा नवरे यांनी श्रीदत्तमहाराजांचा अधिकार प्रकट करणाऱ्या दोन घटना सांगितल्या. गुर्जर भूमीतील दत्तावरी ब्रह्मलीन रंगअवधूत महाराजांच्या नारेश्वरी श्रीदत्तमहाराजांना प्रत्यक्ष नर्मदामातेने दर्शन दिल्याची गोष्ट सांगितली आणि उगार येथे कांचीपीठाचे आचार्य गुरुस्वामी श्री. चंद्रशेखर भारती यांनी श्रीदत्तमहाराजांचा अभूतपूर्व गौरव केला ती गौरवकथा निवेदन केली.

संस्थेच्या विश्वस्तांना प. पू. श्रीदत्तमहाराजांविषयी वाटणारा आदर, भक्तिभाव पाहून सर्व सभेला धन्यता वाटली.

श्रीमती आनंदीबाई वझे यांनी लिहिलेल्या ''गीता माऊली'' या छोट्या ग्रंथाचे प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या हस्ते प्रकाशन झाले.

गौरव भाषणांचा प्राचार्य डॉ. केरूर यांनी यथोचित समारोप केला. आणि सर्व साधक भक्तांवर प. पू. श्रीदत्तमहाराजांचे कृपानुग्रह छत्र अखंड असावे अशी प्रार्थना केली.

मानपत्र

यानंतर प. पू. श्रीदत्तमहाराजांना सर्वांच्या वतीने 'मानपत्र' समर्पण करण्यात आले. मूळ संस्कृत मानपत्राचे वाचन पं. महेश्वरशास्त्री उप्पिन बेटिगेरी यांनी केले. संस्कृत मानपत्राची मराठी समश्लोकी रचना ह. भ. प. श्री. कवीश्वरबुवा यांनी सादर केली.

समारंभाध्यक्ष पं. श्रीनिवासशास्त्री यांनी संस्कृत मानपत्र रौप्य करंडकातून श्रीदत्तमहाराजांना समर्पित केले. चांदीचे ताट, तांब्या-भांडे आदि साहित्यही सन्मानपूर्वक दिले. सौ. लक्ष्मीबाई आईसाहेब यानाही यावेळी मंगल सौभाग्य वस्तू देऊन श्रीमान सौ. राधाबाई साबळे आणि सौ. सावित्रीबाई पुजारी यांनी सत्कार केला.

या सत्कारानंतर अध्यक्ष पं. श्रीनिवासशास्त्री यांचे भाषण झाले. त्यानी भगवान श्रीकृष्णांनी केलेल्या विप्रपूजेचा उल्लेख करून अनंत गुणमंडित श्रीदत्तमहाराज हे असे पूजार्ह विप्राग्रणी होत हे आपले परमभाग्य होय असे सांगितले. आजच्या या पूजनाने आपण सर्वही आत्मगुणसंपन्न आणि पावन होऊ. श्रीदत्तमहाराज म्हणजे प्रत्यक्ष ईश्वर होत असे सांगून **वागर्थाविव संपृक्तौ वागर्थप्रतिपत्तये। जगतः पितरौ वन्दे पार्वती परमेश्वरौ।।** या कविकुलगुरु कालिदासांच्या मंगल श्लोकाने पू. श्रीदत्तमहाराजांना अभिवादन करून अध्यक्षांनी आपले भाषण संपविले.

श्रीदत्तमहाराजांचा आशीर्वाद

प. पू. श्रीदत्तमहाराज आपले आशीर्वादपर भाषण करू लागले. महाराजांनी धर्मराजाच्या राजसूय यज्ञाचा उल्लेख केला. धर्मराजाने भगवान श्रीकृष्णाची अग्रपूजा केली. यात श्रीकृष्णांचे पूजन असले तरी मुख्य आशय 'धर्मराजाच्या सेवाभक्तीचा होता. राजसूय यज्ञाच्या मिषाने धर्मराजाची भक्ती सेवा, त्या सेवाभक्तीचा प्रभाव प्रकट झाला.' असे सांगून श्रीदत्तमहाराज म्हणाले,

''आज या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने सात्त्विक सज्जनांनी समारंभाचे औचित्य रक्षण व्हावे म्हणून गौरव भाषणे केली. तथापि खरे महत्त्व धर्मकृत्याविषयी या गुरुस्थानाविषयी व्यक्त झालेला सेवाभाव हा आजचा खरा लाभ आहे.''

'सेवा म्हणजे अखंड स्मृती' असे श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांचे भाष्य आहे. स्मृती ही कृतिसाध्य नसते, ती ज्ञानसाध्य असते, आणि हे ईशकृपेने होते. ही कृपा आजच्या समारंभाच्या निमित्ताने प्रकट झाली असे सांगून श्रीदत्तमहाराज पुढे म्हणाले,

''या महोत्सवाने एका अकिंचन विप्राला सर्वांची प्रशंसा मिळवून दिली, हे खरे! तथापि या उत्सवाच्या निमित्ताने संहिता स्वाहाकार यज्ञ-याग संपन्न होऊन धर्मसंवर्धन झाले ही ईश्वराची विशेष कृपा.'

उत्सवाच्या उपक्रमाला अध्यक्ष म्हणून महाभागवत धुंडामहाराज लाभले आणि उपसंहाराच्या वेळी ब्रह्मश्री श्रीनिवासशास्त्री अध्यक्ष आहेत या संयोजनाबद्दल श्रीदत्तमहाराजांनी संतोष व्यक्त केला.

भगवत्स्मृतिरूप सेवा अखंड घडावी अशी इच्छा व्यक्त केली. **धर्मे प्रीति सन्मतीम देवभक्ति, सत्संगति देहि भुक्ति च मुक्ति भावसक्ति चाखिलानंदमूर्ते घोरात् कष्टात् उद्धरास्मान् नमस्ते** या प्रार्थनेने श्रीदत्तमहाराजांनी आपले आशीर्वादपर भाषण संपविले.

यानंतर श्रीदत्तमहाराजांनी अध्यक्ष पं. श्रीनिवासशास्त्री यांचा सत्कार केला आणि त्यांना अभिवादन करून कृतज्ञता व्यक्त केली.

ऋणनिर्देश

आता समारंभ संपत आला. उत्सव संयोजन, सत्कार समितीच्या वतीने कार्यवाह वे. मू. जगन्नाथपंत पुजारी यांनी महोत्सवात सहभाग झालेल्या आणि महोत्सवाच्या यशास कारण ठरलेल्या सर्वाविषयी प्रकट कृतज्ञता व्यक्त केली. कार्यवाह म्हणून वे. मू. जगन्नाथपंत पुजारी, श्री. प. वा. मनोळकर आणि त्यांचे सहकारी श्री. नाना कुलकर्णी यांनी अपार श्रम केले. श्री. भगवंतराव पटवर्धन यांनी कार्यवाहांच्या कामाचा उल्लेख केला. श्रीजगन्नाथपंत गुरुजींनी प्रकृतीकडे दुर्लक्ष केले पण कामावरील लक्ष विचलित होऊ दिले नाही हे सांगून गुरुजींच्या संयोजक कुशलतेचा विशेष गौरव केला. उदराधी श्रीमान् गोविंदशेठ साबळे, ऋत्विज आणि अभ्यागत यांच्यासाठी निवासस्थान उपलब्ध करून देणारे कर्नाटक प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. बंगेरी आणि विमला गरवारे प्रशालेचे डॉ. गावडे यांचा महोत्सव समितीस आधार लाभला.

महोत्सवाच्या निमित्ताने अनेक लहान-थोर कार्यकर्ते निरलसपणे सेवामग्न होते. गरवारे प्रशालेतील भोजन-निवास व्यवस्थेत गुंतलेल्या स्वयंसेवकांना आश्रमात सभामंडपात कित्येकदा येऊन जाणेही शक्य होत नसे. जो तो आपले नियुक्त काम नियत ठिकाणी भावभक्तीने करीत सर्वांच्या यशास कारण ठरला. या सर्वांची सेवा सर्वज्ञ ईश्वराजवळ रुजू आहे. श्री. नारायणराव दाते हे एक असे नित्य तृप्त सेवा वृत्तीचे कार्यकर्ते. विश्वस्त भाऊसाहेब वाकडे याच श्रेणीतील. प्राचर्य डॉ. केरूर यांनी अशा सेवातत्पर कार्यकर्त्यांविषयी कृतज्ञता व्यक्त केली आणि श्री. दाते यांचा प्रातिनिधीक स्वरूपात विशेष उल्लेख केला.

आभार प्रदर्शनानंतर दृष्ट काढण्याचा अभिनव कार्यक्रम झाला. मुंबईच्या सौ. वत्सलाबाई काळे यांनी दृष्टीचे गीत म्हटले. सौ. लेले व सौ. माई क्षीरसागर यांनी प. पू. श्रीदत्तमहाराज आणि सौ. लक्ष्मीबाई आईसाहेब यांची दृष्ट काढली. क्षणार्धात प्रकट सभेला एका कौटुंबिक समारंभाचे हृद्य स्वरूप आले. श्रीदत्तमहाराज पीठाधीश असले तरी सर्वांच्या अंतःकरणात त्यांच्याविषयी वसणारा ममत्वाचा भावच या कार्यक्रमात उत्कटतेने व्यक्त झाला. चित्ताला हुरहूर लावणारा हा कार्यक्रम सर्व उपस्थितांच्या स्मरणात दीर्घकाल राहीला.

श्रीपाद श्रीवल्लभ त्वं सदैव श्रीदत्तास्मान् पाहि देवाधिदेव या श्लोकमंगलवर्धक प्रार्थनेने सत्कार समारंभ संपला. (वृत्तांत श्रीवासुदेवनिवास मासिका वरून

श्रीवामन निवास

प. पू. श्रीदत्तमहाराजांना आता श्रीगुरुमहाराजांच्या जन्मशताब्दीचा ध्यास लागला. त्यांच्या मनात संकल्प तयार होऊ लागले. प. पू. श्रीवासुदेवानंद सरस्वतीस्वामी महाराजांच्या जन्मशताब्दी सोहळ्याच्या निमित्ताने स्वामीमहाराजांचे समग्र वाङमय, प्रसिध्द करण्याचे अतिशय कठिण कार्य श्रीदत्तमहाराजांच्या हातूनच झाले होते. सत्कर्माची अशी वाहती गंगा म्हणजेच दत्तमहाराजांचे जीवन! त्यानंतर श्रीगुरुमहाराजांच्या जीवनातील सर्व नेत्रदीपक आणि मंगल सोहळ्यांचे सूत्रधार दत्तमहाराजच होते. 'श्री वासुदेव निवास' चा संकल्प दत्तमहाराजांचा आहे हे आपणांस माहीत आहेच. आपल्या गुरुंच्या नावे आश्रम बांधणे हे शास्त्रात मोठे पुण्यकर्म सांगितले आहे, असे त्यावेळी श्रीदत्तमहाराजांनी श्रीगुरुमहाराजांना पटवून दिले होते. श्रीगुरुमहाराजांनी संमती देताना स्पष्ट सांगितले होते की, येथे 'स्वामी महाराजांची व लोकनाथतीर्थ स्वामी महाराजांची स्मृती फक्त कायम राहावी.

आपल्या श्रीगुरुमहाराजांपेक्षा आपले मोठेपण कुठेही दिसता कामा नये अशी, श्रीदीक्षितस्वामी महाराजांप्रमाणेच, श्रीगुरुमहाराजांनीही आपली इच्छा व्यक्त केली होती. देहावसान झाल्यावर वैकुंठ स्मशान भूमीत आपले अंत्यसंस्कार करावेत. अस्थीही वासुदेव निवासात ठेवू नयेत अशी त्यांची सक्त ताकीद होती. त्याप्रमाणेच सर्व घडले होते.

प. पू. श्रीदत्तमहाराजांना आता श्रीगुरुमहाराजांचे स्मृतिमंदिर असावे असे वाटू लागले आणि वामननिवासाची कल्पना डोक्यात घोळू लागली. सामान्य माणसाच्या मनात आले, वासुदेव निवासाची व्यवस्था पाहण्यास सेवाभावी माणसे मिळणे मुष्कील झाले आहे तेव्हा वामननिवास बांधून त्याची योग्य ती देखभाल कोण करणार? उगीचच कशाला व्याप वाढवायचे?

प. पू. श्रीदत्तमहाराजांनी वामननिवासाचा संकल्प लिहिला आणि नरसोबा वाडीला जाऊन दत्तप्रभूंना तो वाचून दाखवून आशीर्वाद देण्याची प्रार्थना केली. प. पू. श्रीदत्तमहाराजांचा हाही संकल्प यशस्वी झाला.

प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या म्हणण्याचा थोडक्यात आशय असा संसाराकरता जेव्हा आपण कष्ट करतो, अनावश्यक ते व्याप वाढवतो त्यावेळी हे व्याप वाढवून कसे होईल याचा आपण विचारही करत नाही. आपण प्रयत्नवाद पुढे आणतो. परमार्थाकरिता असा निराशावादी दृष्टिकोन कशासाठी? परमेश्वर सर्व व्यवस्था करील, त्याच्या मनात असेल तसे घडेल. शिवाय वासुदेव निवासात वैदिक परंपरेनुसार उत्सवादि सर्व होतच असते, पण अन्यसेवा उपलब्ध करता येत नाहीत. ग्रंथालय, आयुर्वेद संशोधन, रुग्णचिकित्सा-सेवा, औषधालय, कथा-कीर्तने, निवासाची

सोय इ. सेवा उपलब्ध होणे जरूरीचे आहे आणि त्यासाठीच वामननिवास उभा राहिला पाहिजे.

या साऱ्या कल्पना ऐकल्यावर वामननिवासामागचा उदात्त हेतू आपल्याला समजतो. श्रीगुरुमहाराजांप्रमाणेच प. पू. श्रीदत्तमहाराजांचाही श्रीगुरुमहाराजांच्या चिरंतन स्मृतीप्रीत्यर्थ वामननिवास उभा करण्याचा संकल्प साकार झालेला दिसतो.

गुरुमहाराजांच्या जन्मशताब्दि सोहळ्यास। उभा राहिला वामन निवास।।

बांधकामाला सुरवात करायची म्हटली की पैशाचा प्रश्न आलाच. तो कसा सोडवला असे आपल्याला वाटणे साहजिकच आहे. त्या दृष्टीने प. पू. श्रीदत्तमहाराजांनी स्वतःच पहिले पाऊल उचलले. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात श्रीभागवत सप्ताह, श्रीगुरुचरित्र सप्ताहाच्या निमित्ताने त्यांचे अखंड दौरे सुरु झाले. त्यांचे वय लक्षात घेता रेल्वे, एसटीचा प्रवास त्यांना फार त्रासदायक ठरतो. प्रत्येक खेडोपाडी जेवणखाण, झोप, विश्रांती इ. वेळच्या वेळी होईलच असे नाही. शिवाय परंपरागत प्रचंड शिष्य-समुदायाची दर्शनासाठी लागलेली रीघ संपतच नाही. कितीतरी वेळा थोडीदेखील उसंत त्यांना मिळत नाही. शिवाय बदलती हवा, पाणी आहेच. पण त्यांनी श्रीवामननिवासापुढे आपल्या प्रकृतीचीही तमा बाळगली नाही. दौऱ्यात जमा झालेला सर्व निधी श्रीवामननिवासाच्या गंगाजळीत जमा होऊ लागला. त्यांच्या शिष्याने जरी दक्षिणा दिली तरी ते वामननिवासाची पावती फाडू लागले. हे पाहून काही शिष्य एक वामननिवासासाठी व एक त्यांच्यासाठी वैयक्तिक म्हणून दोन दक्षिणा देऊ लागले. प. पू. श्रीदत्तमहाराजांनी त्या दोन्ही रकमा वामननिवास निधीतच जमा केल्या.

प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या दौऱ्यांचा दुसरा मोठा फायदा म्हणजे ज्ञानगंगा खेडोपाडी वाहू लागली. महाराजांच्या मुखातून निघालेले प्रवृत्ती व निवृत्तीपर दोन्ही तऱ्हेचे ज्ञान सामान्य जनमानसात रुजू होऊ लागले. आपल्याला कल्पनाही येणार नाही एवढ्या प्रचंड प्रमाणात महाराजांचा शिष्यसमुदाय दिवसेदिवस खेडोपाडी विशेषतः विदर्भ-मराठवाड्यात वेगाने वाढतो आहे. महाराजांचे आजोबा-वक्रतुंड महाराजांपासून चालत आलेले गुरुपद महाराज अत्यंत कुशलतेने सांभाळत आहेत. तीन पिढ्यांचीशिष्य परंपरा त्या भागात आहे.

प. प. श्रीदीक्षितस्वामी महाराज आणि गुरुमहाराज अशा 'व्यक्ती दोन' दिसल्या तरी 'कृपा' एकच असते याची अनुभूती येते. ती 'कृपा' श्रीदत्तमहाराजांवर पूर्ण असल्याने १६ व्या वर्षी श्रीदत्तमहाराजांकडून आपल्यासमोर श्रीभागवत सप्ताह करुन घेणाऱ्या श्रीदीक्षितस्वामी महाराजांचा कृपाशीर्वादही श्रीगुरुमहाराजांचे कार्य पूर्ण करण्यास वामननिवासाला लाभला.

काळाचा ओघ सतत वाहात असतो. त्यात घडणाऱ्या सर्व घटना आपल्याला ज्ञात होत नाहीत. पण जेव्हा त्या ज्ञात होतात तेव्हा निसटलेले धागेदोरे स्पष्ट दिसू लागतात. प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या पूर्ण अव्यक्त असलेल्या जीवनचरित्राचे थोडेसे धागेदोरे दिसल्यावर हे काही आगळे वेगळे जीवन आहे असे वाटू लागते.

वामननिवासासाठी एवढे कठोर परिश्रम घेऊनही त्याचा गाजावाजा नाही, तक्रार नाही, अभिनिवेश नाही. सारे कसे शांतपणे सुरु आहे. कोणी म्हटले, आता या वयात कशाला इतक्या दूरवर जाता? तर ते म्हणत, 'आम्हीच स्वस्थ बसून कसे चालेल?' अशी ही गुरुसेवा अखंड चालू आहे.

वामननिवासाच्या उभारणीच्या कार्यात सर्वश्री भाऊसाहेब वाकडे, मोरेश्वर घैसास आणि शाशिकांत नागले यांचा वाटा मोठा आहे. आश्रमाचा व्याप सांभाळून भाऊसाहेब वामननिवासाच्या कामाकडे जातीने लक्ष देत असत. वे. मोरेश्वर घैसासांच्या सततच्या धावपळीमुळे बांधकामासाठी लागणारे सिमेंट, स्टील यासारखे महत्त्वाचे साहित्य त्वरित व अतिशय वाजवी दराने व भरपूर प्रमाणात मिळाल्याने कामाला वेग आला. आपल्या गुरुमहाराजांनी जे कार्य हाती घेतले आहे, ते सिध्दीस नेणे आपले आद्य कर्तव्य आहे अशा प्रखर गुरुनिष्ठेने प्रेरित होऊन शशिकांत नागले यांनी आपल्या प्रापंचिक, व्यावसायिक इ. कोणत्याही गोष्टी आड न येऊ देता या कार्यात आपली सेवा रुजू केली. त्यांच्या बहुमोल व्यावसायिक मार्गदर्शनामुळे बांधकामाबाबत किंवा खर्चाबाबत कुठेही फसगत न होता उत्कृष्ट बांधकाम झाले. या काळात सतत पुण्याला खेपा मारुन बांधकामावर स्वत:लक्ष ठेऊन त्यांनी प्रगतीचा वेग कायम ठेवला.

वामननिवासाच्या बांधकामाच्या निमित्ताने श्रीदत्तमहाराजांचा दुर्दम्य आशावाद, अविचल वृत्ती व नितांत श्रध्दा यासारख्या गोष्टी दृष्टोत्पत्तीस आल्या. मधूनच काम पैशाअभावी बंद पडते की काय अशी स्थिती निर्माण होई. पण महाराज शांतच असत. ते म्हणत, 'महाराज पाहून घेतील काय ते!' आणि खरोखरच, अचानक आणि अनपेक्षितरीत्या मोठ्या रकमेचे चेक येत. पुन्हा सर्वांना उत्साह येई आणि पुन्हा जोमाने काम सुरु होई.

१९८६ सालचा जानेवारी उजाडला. 'श्रीदत्तमहाराजांचा संकल्प खरा ठरतो, तो लवकर पूर्ण होतो' हे गुरुमहाराजांचे शब्द पुन्हा एकदा खरे ठरले! अखेर वामन निवास उभा राहिला तिथेच शताब्दी महोत्सव साजरा झाला. वामन निवासाच्या रुपाने श्रीदत्तमहाराजांची गुरुसेवा उभी राहिली आहे.

प. पू. श्रीदत्तमहाराजच ठामपणे उभे राहिल्यावर वामननिवासाच्या मदतीसाठी हजारो हात पुढे आले. मनात अकर्तेपणाची भावना ठेऊन कार्य चालू आहे.

श्रीमहाराज म्हणत असतात, 'आम्ही स्वत: काही करावयाचे म्हटले तर वेगळेच घडते. पण श्रीगुरुमहाराजांवर सर्व सोपवून मोकळे झालो तर मात्र सारे योग्यच घडते.' महाराजांच्या या बोलण्याचा थोडा खोलवर विचार केला, तर त्यांच्या थोर मनाची चाहूल लागते.

ईश्वरार्पण बुध्दीने कर्म कर असे गीता सांगते. त्याचा गर्भितार्थ हाच की जोपर्यंत मी करतो ही भावना आहे तोपर्यंत ते कर्म ब्रह्मकर्म होत नाही. कर्तेपणाची भावना नाहीशी होणे ही कर्मयोगातील अंतिम पायरी आहे. असे श्रीदत्तमहाराजांचे अकर्तेपण आपल्याला पाहावयास मिळते. यावरुनच ज्ञानी माणसाची आंतरस्थिती म्हणतात ती नेमकी कशी काय असते याचा मागोवा घेण्याचा प्रयत्न होतो.

प. पू. श्रीदत्तमहाराजांचे चरित्र समजणे फार कठीण आहे. कारण स्वत:संबंधी प्रथमपासून ते कमी बोलतात. त्यांच्या अंतरंगाची स्थिती जाणायला अंतर्निष्ठच माणूस हवा. मग आपण हे सारे चरित्र कशावरुन समजावून घेणार? तर त्यांच्याबद्दलचा त्यांच्या शिष्यवर्गाच्या अनुभवावरुन,काही थोर लोकांच्या बोलण्यावरुन व काही स्वत: विचार करुन जाणण्याचा प्रयत्न करणार आहोत.

कांचीकामकोटीच्या श्रीमत् शंकराचार्यांनी त्यांच्याविषयी पुढील उद्गार काढले-

'श्री दत्तात्रेयशास्त्री कवीश्वरांचा हा सन्मान केवळ त्यांच्या विद्वत्तेचा नाही. आम्ही विद्वानांचा सत्कार नेहमीच करतो. परंतु कवीश्वर शास्त्रींच्या असामान्य विनयवृत्तीचा सन्मान आम्ही करीत आहोत.'

असे उद्‌गार फक्त आचार्यांचेच आहेत असे नव्हे, तर शिष्यांचाही अनुभव तोच आहे.

श्री कृष्णाने इंद्राला झालेल्या पश्चातापानंतर केलेला उपदेश

देवेंद्रा, जो संपत्ति व अधिकार यांच्या धुंदीने आंधळा झालेला असतो. त्यास माझ्या हातातील कालदंड दिसत नाही तसेच ज्याच्यावर अनुग्रह करावा अशी मला इच्छा होते. त्याला प्रथम मी संपत्तिहीन करीत असतो.

हे स्वर्गपते, आता तू आपल्या लोकी परत जा. तू स्वत: किंवा वरूणादिक तुझे सहाय्यक कोणीही उन्मत्त होऊ नका. न्यायाने, सावधान चित्ताने आपआपले अधिकार चालवा म्हणजे तुमचे कल्याण होईल.

(दामोदर सावळाराम आणि मंडळी यांच्या सार्थ श्रीमद्भागवत यांचे आधारे)

प. पू. श्रीदत्तमहाराजांचे काही दौरे

श्री क्षेत्र माणगांव

दिल्ली दौरा

प्रयाग ९६

परम गुरुंचे जन्मस्थान
क्षेत्र माणगांव

ब्रह्मरुपता प्राप्त झाल्यावरही संतांची भक्तीगंगा सतत वहात असते असे आपण ऐकत असतो. याचे प्रत्यक्ष दर्शन प. पू. श्रीगुळवणीमहाराजांच्या जीवनात झाले. तसाच प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या जीवनातील भक्तीभाव प्रत्यक्ष आजही प्रत्ययास येत आहे.

प. पू. श्रीगुरुमहाराजांचा शिष्य परिवार कोकणात पसरलेला असूनही त्यांचे कोकणात जाणे कधीही झाले नाही. परंतु श्रीदत्तमहाराजांचा योग ईश्वरी कृपेने व प्रेरणेने जुळून आला.

एकदा मुलुंडला श्री. हरिभाऊ काळे यांचेकडे श्रीदत्तमहाराज आले होते. ज्ञानेश्वरी भक्त पू. ताई दामले यांच्या स्मरणार्थ एक मोठा समारंभ ताईंच्या शिष्या सौ. मोहरीरताईंनी आयोजित केला होता. त्या निमित्ताने प. पू. श्रीदत्तमहाराज यांचे मुलुंडला येणे झाले होते. प. पू. श्रीदत्तमहाराजांकडे अनेक मंडळी दर्शनासाठी येत होती. श्री. ढापरे व श्री. मनोहर पाध्ये हे दोन निष्ठावान भक्त व सेवक दर्शनासाठी आले होते. श्री. शरदभाऊ दातेही त्यावेळी हजर होते. बोलता बोलता सहज विषय निघाला. श्री. मनोहर पाध्ये प. पू. श्रीदत्तमहाराजांना म्हणाले ''आपल्याबरोबर प्रवासाला येण्याची इच्छा आहे'' हे बोलणे सहज झाले. पण त्याच मुक्कामात माणगांवला प. पू. स्वामी महाराजांचे जन्मस्थान आहे ते पहाण्याचा योग अजून आलेला नाही, हा विषय निघाला.

श्री. शरदभाऊ दाते प. पू. श्रीमहाराजांना म्हणाले आपण रत्नागिरीला या. आमचे घर आहे. तेथे मुक्काम करुन माणगावाला जाऊ या. रत्नागिरीपासून माणगांव जवळ आहे. योगायोग विलक्षण होता. प. पू. श्रीदत्तमहाराजांना माणगाव दर्शनाची फार ओढ लागली होती. अजून योग आला नाही याची त्यांना खंत होती. त्या ओढीने म्हणा किंवा आमचे व रत्नागिरीकरांचे भाग्य उजळले असे म्हणू या, जाण्याचा बेत ठरला. श्री. मनोहर पाध्ये यांची महाराजांबरोबर प्रवास करण्याची इच्छा पूर्ण झाली व श्री. शरदभाऊ दाते यांच्या घराला प. पू. श्रीदत्तमहाराजांचे पाय लागले.

''दत्त दत्त वदो भाई ये ही जगतार है।''

स्पेशल गाडी करुन पुण्यापासून प. पू. श्रीदत्तमहाराजांना घेऊन आम्ही उभयता, श्री. ढापरेकाका, मनोहर पाध्ये सकाळीच निघालो.

सकाळची शांत वेळ होती. श्री. ढापरेकाकांचा आवाजही गोड होता. प्रार्थना व धून करण्याची दोघानाही सवय होती, आवड होती. श्रीढापरेकाकांनी प्रार्थना करुन,

उदबत्ती लावून धुन म्हणण्यास प्रारंभ केला. याप्रमाणे धुन ऐकताना सर्वांचेच चित्त रंगून जाई. प. पू. श्रीदत्तमहाराज बरोबर असल्यामुळे सर्वांच्याच जीवनातील सुवर्णक्षण उपभोगल्यासारखे वाटत होते. गाडी हळूहळू वेग घेत होती. त्याबरोबर आमची मने भारावून जात होती व सुखद संवेदना घेत होती. अधून मधून महाराज बोलत असत मधेच अगदी मौन असे. आपल्या आनंदात ते मग्न असावेत असे वाटे. प्रवास कधी संपूच नये असे मनाला वाटत होते.

''नको नको मना गुंतू मायाजाळी''

ज्यावेळी मुंबईहून निघाले त्यावेळी मोठा नातू चि. अश्विन बरोबर असावा म्हणजे प. पू. श्रीदत्तमहाराजांचा सहवास त्याला मिळेल व थोडी हातून सेवा घडेल असे वाटत होते. रत्नागिरीच्या माझ्या बहिणीला फार आनंद होईल असेही वाटत होते. पण त्याचे येण्याचे जमलेच नाही. तो इयत्ता ९ वीत होता. मन खूप खिन्न झाले होते. आपण मायेच्या पाशात कसे अडकलेले असतो याचे हे उत्तम उदाहरण आहे.

देव बरोबर असल्यावर देखील नातू बरोबर नाही या योगे मन अस्वस्थ होण्याचे कोणते कारण? पण मायेचा प्रभाव बलवत्तर होता. प. पू. श्रीदत्तमहाराजांबरोबर तो असावयास हवाच होता. ही हूरहूर कमी होईना. अश्विनची एक सुवर्णसंधी जात आहे याचा खेद फार झाला. माझा मुलगा डॉ. आनंद याच वयात प. पू. श्रीगुळवणीमहाराजांच्या सहवासात आला होता. त्यांची कृपाछाया त्याचे जीवन उजळून टाकीत आहे हा स्वानुभव आहे. ती स्मृती जागी होती. प. पू. श्रीदत्तमहाराजांना ही माझी हूरहूर मी न बोलताही जाणवली. पण त्यांचे मनच मोठे असल्यामुळे ते म्हणाले,''अश्विन आमच्याबरोबर हवा होता असे वाटते आहे ना?'' तुमच्या मनात काय आहे त्याचे कल्याण व्हावे असेच आहे. आता असे करा तो बरोबर नाही असे मनांत न आणता श्रीगुरुमहाराजांकडे त्याच्या कल्याणाची प्रार्थना करुया. म्हणजे झाले.'' हे त्यांच्या तोंडचे वाक्य ऐकून माझ्या डोळ्यातून अश्रू येऊ लागले. माझ्या अज्ञानाची कीव तर आलीच पण त्यांचे उद्‌गार ऐकून मी अगदी थक्क होऊन गेले. ज्यांच्याबरोबर अश्विन असावा असे वाटत होते ते स्वतःच आपण प्रार्थना करुया असे म्हणताहेत. शब्द कुंठित झाले. आपण आता आपल्या मनातले हे विचार सोडून देऊन देवासमान असणाऱ्या गुरुंबरोबर आपण चाललो आहोत तेव्हा ईश्वर नामाशिवाय कोणताच विचार येऊ द्यावयाचा नाही असे त्यांचे चरणी प्रार्थून पुढील प्रवासास आरंभ केला.

साधेपणा, विनयशीलता, दुसऱ्याचे मन जाणणे या सर्व विशेष गुणांचे अधिष्ठान या गुणातीत अवस्था प्राप्त झालेल्या प. पू. श्रीदत्तमहाराजांचे ठिकाणी

आहेत. लौकिकाला परमार्थाचा आधार देऊन दोन्हीकडे मार्ग न सोडता त्यांचे वागणे पाहून एक फार मोठा आदर्श आपणापुढे प्रत्यक्ष जीवनात आपण पहात आहो असे वाटले.

रत्नागिरीला स्वागत

सड्यावर मारुती मंदिरावरून गाडी डॉ. दाते कॉलनीतील दात्यांच्या छोटेखानी बंगलीकडे वळली. प्रवेश द्वाराशी गाडी आली. प्रवेशद्वार केळीच्या भरघोस खांबानी सजवले होते. केळीला पिकत आलेला घड होता. मोठी डौलदार कमान दिसत होती. फळाफुलांच्या भारांनी वोल्हावलेली ही हिरवीगार झाडे वाकून जणू काही महाराजांना वंदन करीत होती. अंगण अगदी छानदार सारवलेले होते व त्यावर सुंदर रांगोळ्या काढलेल्या होत्या. कौशल्य पणाला लावून रांगोळी चितारलेली होती. कारण आज देवांचे प्रत्यक्ष आगमन होणार होते.

मंडपात प्रवेश करण्यापूर्वी रंगीत पाटावर प. पू. श्रीमहाराज उभे राहिले. पायावर दूधपाणी घालून औक्षण केले. मंडप तोरणांनी व रंगीबेरंगी पताकांनी सुशोभित केला होता. मधेमधे छोटे मोठे रंगीत आकाशकंदिल लावलेले होते. सनईचे गोड सूर कानावर पडत होते. एकूण सारे काही भव्य दिव्य भासत होते.

श्रीमती सुशीलाबाई दाते शरदभाऊंच्या आई. प. पू. श्रीमहाराजांचे पाय घराला लागले हा त्यांच्या जीवनातील फार मोठा आनंदाचा भाग होता. प. पू. श्रीमहाराजांचे वास्तव्य अतिशय स्वास्थ्याचे जावे कोठे काही कमी पडू नये अशी त्यांची इच्छा होती.

श्रीमती सुशीलाबाई दाते यांचेवर वृध्दापकाळात फार मोठ्या आपत्ती आल्या होत्या. चि. शरदभाऊंचे वडील डॉ. दाते नुकतेच गेले होते. त्यानंतर सुशीलाबाईचा मोठा मुलगा चि. प्रभाकर दाते यांचे अकाली निधन झाले होते. ''संध्या छाया भिवविती हृदया'' अशी त्यांची स्थिती होती. पण समाजसेवा करीत त्या आपले जीवन धीराने जगत होत्या. प. पू. श्रीदत्तमहाराजांचे आगमन ही घटनाही त्यांच्या जीवनातील ईश्वरी कृपेची बरसात होती.

रत्नागिरीला प. पू. श्रीदत्तमहाराजांचा मुक्काम चार दिवस होता. मार्गशीर्ष महिना. ''मासानाम् मार्गशीर्षोहम'' असे या महिन्याबद्दल प्रत्यक्ष भगवंतानी म्हटलेले आहे. श्री दत्तजन्माचा हा शुभ मास. निरभ्र आकाश व सुखद हवामान यावेळी कोकणात असते. आंबे फणसांनी लगडलेले वृक्ष या दिवसात नसले तरी शांत सागराची मौज या दिवसातच बघावी. प. पू. श्रीमहाराजांचे कुठेही जाणे येणे हे एक न कळणारे असे ईश्वरीकार्य असते. हे प्रामुख्याने जाणवले. त्यांच्या प्रकृतीची योग्य ती काळजी घेणे हे आपले कर्तव्य आहे. पण त्याचा अतिरेक होऊ देता उपयोगी नाही. खरे संरक्षण त्यांना संपूर्णपणे ईश्वराचे असते हे आपण लक्षात ठेवून संयमाने वागले पाहिजे. अनेक लोक अडचणी घेऊन येतात. त्यांना ते मार्ग दाखवितात.

लोकांना दिलासा मिळतो. सर्व समाधानाने परत जातात. त्यांचे कार्य हे असे ईश्वरी असते.

रत्नागिरीत गेल्यादिवशीच एक घटना घडली. दुपारीच एक भगिनी घरी आल्या. त्यांच्या चेहऱ्यावरुन त्या अतिशय अस्वस्थ दिसत होत्या. त्या सांगू लागल्या की आमच्या शेजारी एक दुर्घटना घडली आहे. त्या घराचे मालक कामाला परगावी गेले असताना अचानक हृदय विकाराचा झटका येऊन गेले आहेत. गृहस्थ वयाने तरुण होते. त्यांच्या मागे पत्नी व लहान मुले आहेत. अचानक बसलेल्या धक्क्यामुळे पत्नी वेड्यापिशा झाल्या आहेत. ही सर्व मंडळी महाराजांना ओळखतात. प. पू. श्रीदत्तमहाराज आल्याचे त्यांना कळले आहे. महाराज त्याना भेटावयास आले तर त्याना दुःखात सुख होईल, धीर येईल. ''श्री महाराज आताच प्रवासाहून आले आहेत, झोपले आहेत उद्या दुपारी आपण चौकशीसाठी या म्हणजे त्यांना विचारुन काय ते सांगता येईल'' असे आम्ही सांगितले. आलेल्या भगिनी जाताना पुन्हा पुन्हा म्हणत होत्या की महाराजाना घेऊन येण्याचे जमवा.

''जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले.''

सायंकाळी प. पू. श्रीमहाराजांजवळ हा विषय काढला. सर्व हकिगत सांगितली. उद्या निरोप काय देऊ असे विचारताच क्षणाचाही विलंब न लावता महाराज म्हणाले,'' जायलाच पाहिजे न जाऊन कसे चालेल?'' श्री दत्तमहाराज पुढे म्हणाले, ''मैत्री करुणामुदितो पेक्षाणां सुख दुःख पुण्यापुण्य विषयाणां भावनातश्चित प्रसादनम्'' (योगसूत्र १/३३)

''उद्या पाच वाजता येतो असे कळवून टाका म्हणजे त्याना खेप घालावी लागणार नाही'' महाराज म्हणाले.

'मनाचा मवाळू स्नेहाळू कृपाळू' अशी संतांच्या मनाची अवस्था असल्यामुळे त्यांचा अपेक्षारहित वात्सल्यभाव असतो.

दुसरे दिवशी बरोबर पाच वाजता आम्ही त्या घरापाशी पोचलो. बोलावण्यासाठी ज्या शेजारीणबाई आल्या होत्या त्या पुढे येऊन म्हणाल्या संत म्हणजे गुरुदेवच आले आहेत. एकदम त्या घरात जाण्यापेक्षा दोनच मिनिटे महाराजांनी आमचे घरी यावे. प. पू. श्रीमहाराज म्हणाले ''त्या घरी आम्ही एकदम जाऊ नये ही आपली भावना जाणून येतो. परंतु थांबणार मात्र नाही. पहिले काम ते आहे.''

शेजारीणबाईनी भक्तिभावनेने दूधपाणी घालून, फुले देऊन नमस्कार केला व हातावर एक चमचाभर दूध घातले. ते घेऊन प. पू. श्रीमहाराज म्हणाले,''बराय, निघतो आम्ही.'' लगेचच आम्ही शेजारच्या घरी गेलो.

दुःखाची गाढ छाया घरावर पसरलेली होती. आबालवृध्दांच्या नेत्रातून अश्रुधारा वहात होत्या. शोक अनावर झाला होता. प. पू. श्रीदत्तमहाराजांचे आगमन झाल्यावर दुःखाचा आवेग ओसंडून बाहेर पडला. पाच मिनिटे कोणी काहीच बोलले नाही. प. पू. श्रीदत्तमहाराजांनी असा दुःखावेग वाहून दिल्यावर अगदी शांत मनाने बाहेर बसलेल्या सर्व मंडळीचे सांत्वन केले. ज्या भगिनींवर हा प्रसंग ओढवला होता त्यांना महाराजांनी धीर दिला. काही काळ गेल्याशिवाय दुःख कमी होत नाही. लक्ष न लागले तरी नामस्मरण करीत असावे. देव सर्वांचा सांभाळ करीत असतो. आपल्या मनाला धीर यावा अशी आम्ही देवापाशी प्रार्थना करु. या वाक्याने बाईंचा शोकावेग खूप आवरला. त्या क्षणभर शांत झाल्या. महाराज काय सांगताहेत ते ऐकू लागल्या. शेवटी त्या म्हणाल्या ''आपण आलात यात सारे आले. मनाला धीर आला. प्रत्यक्ष देवच घरी येऊन बोलताहेत असे मी समजते. आपण पाठीशी आहात तेव्हा मला धीर धरायला हवा. मन सावरायला हवे. ते धैर्य आपण मला द्या.'' सर्वांचे सांत्वन करुन महाराज उठले. इतर नातेवाईकांना म्हणाले, ''त्या अतिशय दुःखात आहेत ते सोसताना त्यांना जितका आधार देता येईल तो आता दिला पाहिजे. त्यांना निराधार वाटू न देणे हेच नातेवाईकांचे काम असते. आम्ही येतो सर्वानी जपून रहावे. ईश्वराचे स्मरण ठेवून वागावे.''

''ऐशी कळवळ्याची जाती करी लाभावीण प्रिती'' असे या प्रसंगात दिसून येते. असे संताचे अबोल कार्य असते. ते आपल्याला कळत नाही. संताच्या या कामाची नोंद कुठेही नसते. त्यांची समाजसेवा म्हणजेच ईश्वरसेवा अखंड चालू असते. त्याचा गाजावाजा नसतो. प्रसिध्दी तर नकोच असते. त्यांच्या प्रवासात कितीतरी संकटग्रस्त लोकांना मदतीचा हात मिळतो. कुणाला प्रोत्साहन मिळते. आरोग्य सुधारते. अनेकविध गोष्टी संताच्या हातून घडत असतात.

रोज रात्री तास दीडतास प. पू. श्रीदत्तमहाराजांचे प्रवचन होत असे. ज्ञानयोग, कर्मयोग, भक्तियोग असे तीन विषयावर तीन दिवस प्रवचन झाले. प्रवचनाचे वेळी मांडव भरून जात असे. प्रथम दिवशी रत्नागिरी नगर परिषदेचे नगराध्यक्ष श्री जाधव आले. चार शब्द बोलून त्यांनी महाराजांचा सत्कार करुन हार घातला. ही विशेष उल्लेखनीय बाब आहे. रत्नागिरीकरांचे भाग्य थोर म्हणून प. पू. श्रीविद्यावाचस्पती श्रीदत्तात्रयशास्त्री कवीश्वरांचे पाय येथे लागले असाही उल्लेख त्यांनी आपल्या भाषणात केला.

आकाश लहरी

रत्नागिरी आकाशवाणी केंद्राचे संचालक श्री. विजयराव पटवर्धन यांनी ही संधी गमावली नाही. आपले विचार आपण आकाशवाणीकरीता द्यावे. आम्ही ते प्रसारित

करु अशी विनंती त्यानी केली. प. पू. श्रीमहाराजांनी विचारले ''किती वेळ बोलू.'' ते म्हणाले ''आपणाला असे बंधन घालणे बरोबर नाही पण तरीही साधारणपणे ९/१० मिनिटे पुरेत.''

प. पू. श्रीमहाराजांनी सुरुवात केली. शेवटी थांबले ते न पहाताही ९ व्या मिनिटाला. ही वेळेची अचूकता कशी आली? आपणांस भाषण नऊ मिनिटात बसविण्यासाठी किती वेळा प्रयत्न करावा लागला असता? कमीजास्त करण्याकरिता निश्चितपणे चाचणी घावी लागली असती. या ठिकाणी एकदम सुरुवात व नवव्या मिनिटाला संपूर्ण. ज्यांची बुद्धी विशाल झाली त्यांच्या बुध्दिचा आवाका व सामर्थ्य कल्पनातीत असते. असे या वेगवेगळ्या अनुभवावरुन कळून येते.

पावस येथे भेट

स्वामी स्वरुपानंदांची समाधी भेट घेण्याकरिता आम्ही सर्व निघालो. पावसक्षेत्र रत्नागिरीपासून १९ कि. मी. अंतरावर आहे. कोकणातले निसर्ग सौंदर्य प. पू. श्रीमहाराजांना जाणवत होते.

संध्याकाळची शांत वेळ होती. बाजूला गर्द झाडी, डोंगरातील वाट. त्यातून अधून मधून सागराचे दर्शन होत होते. पक्षांचे चीत्कार ऐकू येत होते. पानांची सळसळ मनाला मोठी गोड वाटत होती. मनात सारखे वाटत होते प. पू. श्रीमहाराज कोणता विचार करीत असतील? इतक्यात श्री. मनोहर पाध्येंनी एक अभंग म्हणण्यास सुरुवात केली. अभंग रंगला. कधी धुन, कधी अभंग तर कधी एकदम स्तब्धता. या स्तब्धतेतून प. पू. श्रीमहाराजांच्या अमृतवाणीतून बाहेर पडलेला एखादा विचार. प्रसन्नता व प्रसाद यांच्या मिलापातून कसा वेळ निघून जात होता कळतच नव्हते.

पावसला आलो. पाय धुवून समाधी दर्शनासाठी आत गेलो. प. पू. श्रीमहाराजांनी समाधीपाशी जाऊन डोके टेकून दर्शन घेतले. त्या समाधीवर शाल, उपरणे पांघरले. आदरपूर्वक सारे उपचार केले. हार घातला. हा बाह्य उपचार झाला परंतु अंतरंगाची भेट ही खरी भेट. ती अखंड चालूच आहे. ती त्यांची त्यानाच माहिती. मला स्वामीमहाराजांचा श्लोक आठवला.

अखंड आत्मा अविनाशी दत्त। तया पदी लावितो जे स्वचित्त।
वित्त भ्रमा सोडिती जे यथार्थ। तो पूर्ण आनंद गुरु समर्थ।।

अविनाशी निरंतर असणेपणाने असणाऱ्या चैतन्याचे दर्शन त्याच ''स्वरुपानंदात'' असलेल्या महाराजांना नित्यच आहे.

समर्थ आनंदरुप अशा गुरुदेवांबरोबर आपण उभयता आहोत याचाच आनंद आम्ही उपभोगीत होतो. मूकपणे वंदन करीत होतो. त्यांच्या सहवासात जे मिळाले ते

देणे ईश्वराचे होते. तेथील सर्व गोष्टी प. पू. श्रीमहाराजांनी बारकाईने व कौतुकाने पाहिल्या. तेथील विश्वस्त श्री. भाऊ देसाई यानी प. पू. श्रीदत्तमहाराजांचाही शाल, श्रीफळ व ज्ञानदेवीचा ग्रंथ देऊन सत्कार केला. श्री. भाऊ देसाई यांची स्वामी स्वरुपानंदांची अखंड सेवा चालू आहे. येथील समाधीमंदीर उभारणीत त्यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांचेही कौतुक, गौरव श्रीमहाराजांनी आपलेपणाने केला.

काही काळापुरता का होईना देहात्मबुध्दीचा विचार कमी होतो. **गती अधोगती मनाची हे युक्ती। मन लावा एकांती साधुसंगे।** या तुकोबांच्या उक्तीप्रमाणे कितीही ग्रंथ वाचून जे मिळणार नाही ते संत सहवासात मिळते. तो संत सहवास आपल्याला लाभला हे वडिलधाऱ्यांचे आशीर्वाद. पूर्वसुकृत व गुरुकृपा आहे असे सारखे वाटत होते व आम्ही सर्व मनाने अनन्य होत होतो.

श्री गणपतीपुळे येथील गणेशपूजन

ओंकार स्वरुपा सद्गुरु समर्था । अनाथांच्या नाथा तुज नमो । असे म्हणत आम्ही समुद्र किनाऱ्याजवळील डोंगरकुशीत हिरव्यागार झाडीत लपलेल्या गणपतीपुळे या स्वयंभू गणेशाचे स्थानाला भेट देण्यास निघालो.

श्री गणेशाची उपासना कवीश्वर घराण्यात चालून आलेली आहे. श्री गणेश श्री महाराजांच्या आजोबांचे दैवत आहे. प. पू. श्रीदत्तमहाराज काही लिहिताना प्रथम "श्री गणेशदत्त गुरुभ्योनमः" असे लिहितात. निसर्गरम्य अशा या ठिकाणी प. पू. श्रीदत्तमहाराजांचे मन चित्कलेला बिलगले. ते अधिकच अबोल झाले होते.

निळाभोर समुद्र त्याचा तो गंभीर नाद मनाला साद घालीत असावा. प. पू. श्रीमहाराजांना एकांत प्रिय वाटतो. असा बहरलेला नटलेला हिरवागार निसर्ग पाहून ते स्तब्ध झाले. गाडी पुढे पुढे जात होती. माझे मीपण हरवले होते. श्री गजाननाला मनात आळवीत असताना एकच मागावेसे वाटत होते की, "मोरया प. पू श्रीदत्तमहाराजांची प्रकृती सांभाळ. त्यांचे आरोग्य उत्तम ठेव. तुझ्याकडे असे काही मागितलेले प. पू. श्रीदत्तमहाराजांना आवडणार नाही. पण देवा गजानना तुझ्याशिवाय हे मागणे आम्हीतरी कोणाकडे मागणार? महाराजांकडे देहात्मबुध्दि नाही तरीही कितीतरी थकलेले शरीर आहे. ज्ञानार्जनाकरिता खूप कष्ट झाले आहेत. उपासनेचे तप सतत चालू आहे. मोठमोठ्या जबाबदाऱ्या त्यांनी पेलल्या आहेत. समाजाला सांभाळून घेण्याचे कठीण व्रत त्यांनी आचरिले आहे. त्यांना निदान शारीरिक व मानसिक कोणतेच क्लेश होऊ नयेत." माझे डोळे मिटलेले होते. मनातून असे विचार चालू होते तोच श्री गजाननाच्या दाराशी गाडी उभी राहिली. सर्वजण मंदिरात गेलो. प. पू. श्रीदत्तमहाराजांचे हातून पूजा घडावी असे वाटत होते. प. पू. श्रीदत्तमहाराज म्हणाले हल्ली डोळ्यांनी कमी दिसते तर पूजा करताना वेडेवाकडे

कुठेतरी लागेल, उपचार नीटनेटके होतील की नाही अशी भीती वाटत असते. आमच्या आग्रहावरुन महाराज सोवळे नेसून पूजेला बसले. बाजूला श्री मनोहर व शरदभाऊ होते. ते सर्व देत होते. गुरुजीनी साग्रसंगीत पूजा सांगितली. एकवीस मोदकांचा नैवेद्यही दाखविला. श्री गजाननालाही आजच्या पूजेचे वेगळे समाधान झाले असेल. ती सर्व पूजा पाहूनच सर्वाना फार प्रसन्न वाटले.

प. पू. श्रीदत्तमहाराजांची बालमंदिराला भेट

श्री. सुशीलाबाईनी रत्नागिरीत प्रथम पूर्व प्राथमिक शिक्षणाची सुरुवात केली. बालमंदिर हा त्यांचा निरपेक्ष समाजसेवेचा जिव्हाळ्याचा विषय होता. त्याकरिता सुशीलाबाईनी बालगीतांची पुस्तके लिहिली आहेत. त्या बालगीतांच्या पाचव्या आवृत्तीचे प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या हस्ते महिला मंडळाच्या वतीने प्रकाशन होते. रत्नागिरीचे जिल्हाधिकारी श्री. रमेश कानडे त्या समारंभाचे अध्यक्ष होते.

प. पू. श्रीदत्तमहाराजांचे आगमन बालमंदिरात झाले हाही एक चांगला योग जुळून आला. छोट्या मुलांनी दोन कार्यक्रम करुन दाखविले. त्यानंतर बालगीताच्या पाचव्या आवृत्तीचे प्रकाशन झाले. प. पू. श्रीदत्तमहाराजांनी ''पुस्तकाची ही पाचवी आवृत्ती आहे. यातच पुस्तकाची आवश्यकता किती आहे याचे प्रत्यंतर येत आहे. संस्कार करण्याचे काम हे पुस्तक करीत आहे. ही सुशीलाबाईची ईशसेवाच आहे.'' असे म्हणून सुशीलाबाईंच्या समाजसेवेवर ईशसेवेचा एक शिक्कामोर्तब करुन त्या सेवेला देवदरबारी सादर करुन घेतले.

श्रीगुरुमहाराजांचे रत्नगिरीला येणे किंवा त्यांचे घराला पाय लागणे जमले नव्हते ते अपुरे काम प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या हातून पुरे झाले. श्रीमती सुशीलाबाईंच्या जीवनातील हा कळसाध्याय झाला.

मावळवीत विश्वाभासु । नवल उदयला चंडांशु ।।

रत्नागिरीपासून हातखंबा दहा ते बारा किलोमीटर आहे. तेथून पुढे आत खेडेगावात श्री. मोघे नावाचे महाराजांचे भक्त रहात होते. त्यांची इच्छा होती की महाराजांनी आपणाकडे यावे. गावात जाण्यासाठी रस्ताही नव्हता. संपूर्ण शेताडीतून गाडी न्यावयाची होती. मधेमधे शेताचे बांध होते. गाडी कशी जाणार असा प्रश्न होता. पण श्री. मोघे यांना वाटत होते की महाराज पुन्हा कसे आमच्याकडे येणार? ही वेळ काही पुन्हा यावयाची नाही. प्रत्येकालाच मनात असे वाटत असते की आपल्या घरी महाराज यावे. त्यांचा एकूण भाव पाहून प. पू. श्रीमहाराजानी त्यांचेकडे जाण्याचे ठरविले .

पहाटे सहा वाजताच सर्व मंडळी निघाली. शांतवेळ होती. सुखद गारवारा होता. शुक्राची चांदणी मोठी मोहक भासत होती. मावळणारे चांदणे उषेची चाहूल

देत होते. चंदनी उदबत्तीचा सौम्य वास मनाला प्रसन्न करीत होता. श्री. ढापरेकाकांच्या मुखातून भूपाळीचे सूर उमटू लागले. विश्वात्मक परमेश्वराची चाहूल घेण्याचा मन प्रयत्न करीत होते. मनाला श्री. ज्ञानेश्वरीतील १६ व्या अध्यायाची आठवण झाली व ओवी मनात उमटू लागली.

मावळवीत विश्वाभासु। नवल उदयला चंडांशु
अब्दयाब्जिनी विकासू वंदू आता ।।१।।
जे अविद्याराती रुसोनिया। गिळी ज्ञानाज्ञान चांदणिया
जो सुदिनू करी ज्ञाविया । स्वबोधाचा ।।२।।
जेणे विवळतीये सबळे । लाहोनी आत्मज्ञानाचे डोंळे
सांडिती देहहंतेची अविसाळे। जीवपक्षी ।।३।।
जेणे पाहलिये पहाटे । भेदाची चोरळी फिटे
रिघती आत्मानुभव वाटे । पांथिक योगी ।।४।।
जो निजधाम व्योमींचा रावो। उदैलाची उदैत खेवो
फेडी पूर्वादि दिशासी ठावो । उदो अस्तुचा ।।५।। ज्ञाने. अ. १६

या ओव्या मनाला एका अनोळखी वाटेने आनंदाच्या साम्राज्यात नेत होत्या. सद्गुरुंना चित्सूर्याची उपमा देणारे ज्ञानदेव या पहाट वेळेचे वर्णन आत्मस्वरुपाचा प्रत्यय देणारे असे करीत आहेत ते मनाला भावत होते. आम्ही सद्गुरुंबरोबर वाटचाल करीत होतो. मावळवीत विश्वाभासू एवढी उंच भरारी मारता आली नाही तरी निसर्गातील त्या प्रत्यक्ष वर्णनाची अनुभूती व सद्गुरुंचे सान्निध्य यांचा प्रभाव मनावर पडला. शरीर डोलू लागले. डोळे घट्ट मिटले गेले. विचार आटले. तो पहाटेचा धूसर प्रकाश जीवाला वेडावून गेला. सारेच गप्प झाले. ही अनुभूती विलक्षण होती. कुठेतरी आत जीव लपून बसला होता. बाहेरच्या विश्वाला घट्ट धरायला चित्त आतुरले होते. सुखद तरंग मनावर ये जा करीत होते. किती वेळ असाच नीरव शांततेत व सद्गुरुंच्या पूर्ण कृपा छत्रात सामावून गेला. मी आतल्या आत गुणगुणत होते 'किती सांगू मी सांगू कुणाला आज आनंदी आनंद झाला। आज आनंदी आनंद झाला.'

हे क्षण कधीही विसरले जाणार नाहीत. आज हे लिहीत असताना सुध्दा तो भाव जागृत होत आहे. मन कसे प्रसन्न झाले आहे.

गाडीला खडबडीत रस्त्याचा धक्का बसला. सर्व भानावर आलो. श्री. ढापरेकाकांनी गाडी हातखंब्याकडे वळवली होती. रस्ता अतिशय खडबडीत होता. गाडी जाईल एवढा रस्ता शेतातिल बांध फोडून रातोरात केला होता. या लोकांच्या मेहनतीची कमाल वाटली. भक्तीचा जिव्हाळा किती असतो हे प्रत्ययास आले. प. पू. श्रीदत्तमहाराजांनी हे त्यांचे भाव जाणूनच आपण जाऊया असे म्हटले असावे.

आपल्याला दुसऱ्यांच्या भावनेची कल्पना करण्याची सवय नसते. त्यामुळे आमची आपली एक भुणभुण चालू होती. महाराजांना त्रास होईल त्यांनी इतर कुठे जाऊ नये. सुदाम्याचे पोहे गोड करणाऱ्या कृष्णाचे चरित्र वाचूनही कोणाचे भाव कसे असू शकतात याची जाण न घेता न जाण्याचा निर्णय आम्ही सतत घेऊन टाकत असतो. नकार देण्यापूर्वी संताचे कार्य हे ईश्वरी कार्य आहे असा अधिक विचार करुन प. पू. श्रीमहाराजांच्यावर निर्णय घेण्याचे सोपवावे.

इतके छोटे खेडेगाव. अगदी शांत, माणसांची वर्दळ कमी, आजूबाजूला मोठाले वृक्ष शेणाने सारवलेल्या भिंती असलेले ते घर, मोठे अंगण, अंगणात मोठे स्वस्तिक व ज्ञानकमळ काढलेले. ओटीवर बैठक घातलेली होती. प. पू. श्रीदत्तमहाराज प्रसन्नपणे स्वागताचा स्वीकार करीत होते. दूधपाणी घालून झाल्यावर पारिजातकाच्या फुलांची ओंजळ प. पू. महाराजांच्या हातात दिली मग औक्षण केले. ओटीवर महाराज बसले. पूजा झाली. रत्नागिरीचे श्री. फडकेशास्त्री आदल्या दिवशीच रात्री पूजेसाठी जाऊन राहिले होते. हार घातला वस्त्र दिले. शहाळी दिली. महाराज घरात जाऊन आले. प. पू. श्रीमहाराज म्हणाले 'पूर्वीचे ऋषीमुनी असेच मनुष्यवस्तीपासून दूर रहात असत तसे शांत येथे वाटत आहे.'

सर्व गावातील कुळे, बायकामुले दर्शनासाठी आली होती. सर्वांनी काहीना काही भेट आणली होती. मनापासून वंदन करीत होते. प. पू. श्रीमहाराज सर्वांना आशिर्वाद व प्रसाद देत होते. मोघ्यांच्या घरादाराला खूप आनंद झाला होता. निरोपाच्या वेळी सर्वांच्या डोळ्यातून अश्रू येत होते. आपण आमचा शब्द मानलात घर पावन झाले. कृपेची दृष्टी टाका बाकी काही मागत नाही. आमच्या मोघ्यांनी तर किती वेळा साष्टांग नमस्कार घातले याची गणतीच नाही. भोळा भाव सिध्दीस जातो. प. पू. श्रीदत्तमहाराज निरोप घेताना म्हणाले ''मोघे तुमचे सर्वांचे पूर्ण समाधान झाले ना? म्हणजे आम्ही जाऊन येतो.'' प. पू. श्रीदत्तमहाराज सहसा जातो असे कधी म्हणत नाहीत. जाऊन येतो असे म्हणण्याची त्यांची पध्दत आहे.

गोठ्यातील गाईवासरापासून कल्याणाच्या भावनेने सर्वांची भेट घेऊन आपल्या पवित्र पदस्पर्शाने घराला पावन करुन, सर्वांशी प्रेमाने विचारपूस करुन, स्वस्वरुपाच्या अनुसंधानात सर्वांना प्रसाद देऊन, अकर्तृत्व भावनेने वागून आपले अव्यक्त रुपात असलेले कार्य उरकून शांतपणे प. पू. श्रीमहाराज निघाले. सर्व आबालवृध्द गाडीच्या पाठीमागून मुख्य रस्त्यापर्यंत भक्तीभावाने आले. अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त असा गजर होऊन गाडी सुरु झाली.

रत्नागिरीचा निरोप

लोकमान्य टिळकांचे जन्मस्थान पाहून प. पू. श्रीदत्तमहाराजांना देव दर्शनाइतकाच आनंद झाला होता. त्यांच्या पवित्र अशा जीवन चरित्राचा उल्लेख

त्यांनी दोन तीनदा केला. विशेष म्हणजे प. पू. श्रीदत्तमहाराजांनी त्या जन्मस्थानी अगत्यपूर्वक साष्टांग नमस्कार घातला.

कुठलीही एषणा न ठेवता निरपेक्ष केलेली देशभक्ती ईश्वरभक्तीतच मोडते असेही महाराज म्हणाले. श्री. नाना भिडे स्वरुपानंदाचे परमभक्त. त्यांचेकडेही महाराज गेले होते. श्री. नाना भिडे रत्नागिरीतील प्रमुख उद्योजक आहेत. प. पू. श्रीस्वामी स्वरुपानंदांचे निःसीम भक्त. त्यांची उद्योजकता ही केवळ स्वामीमहाराजांची कृपा आहे असे मानणारे, सेवावृत्तीने काम करणारे श्री. भिडे स्वामी स्वरुपानंदांबद्दल खूप माहिती सांगत होते. श्रीमहाराज परम संतोषाने ऐकत होते. कितीतरी लोकांकडे महाराजांचे जाणे झाले. शेवटी रत्नागिरीचा मुक्काम संपण्याची वेळ झाली. सर्वांनाच वाईट वाटू लागले. माझी बहीण सुशीलाबाई यानाही वाईट वाटू लागले. आपण आलात फार बरे वाटले. चि. शरद रेखावर आपली कृपादृष्टी राहू दे असे आईच्या मायेने ती म्हणाली. पुढे तिला बोलवेना. देवाच्या खोलीत श्रीमहाराजांच्या हातावर दही घातले. सर्वांनी प. पू. श्रीदत्तमहाराजांना नमस्कार केला. सुशीलाबाईना काही काळजी करु नका असे सांगून पटकन गाडीत जाऊन बसले. दोनतीन गाड्या, जीप असे पाठोपाठ रवाना झाले. रत्नागिरी सुटली गाडी माणगावकडे निघाली.

माणगावकडे प्रयाण

सह्याद्रीच्या कुशीत असलेले सावंतवाडी हे संस्थान आहे. या ठिकाणाची भूमी पोफळी, नारळ, साग, आंबा, फणस, काजू, रातांबा, सावर, पांगारा, चिंच इ. वृक्षांनी समृध्द होती. पाऊस पुष्कळ पडत असल्याने शेतीही उदरनिर्वाहापुरती पिकत होती. अशा सुखसमृध्दीने पूर्वकाळी शोभणाऱ्या सावंतवाडी संस्थानमधील माणगाव हे श्री. देवी यक्षिणीच्या कृपाप्रसादाने आणि प. प. श्रीवासुदेवानंदांच्या अवताराने सुखाने नांदणारे हे गाव आहे. प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराज ही भारताला महाराष्ट्राने दिलेली एक फार मोठी देणगी आहे.

देवी यक्षिणी चौसष्ट योगिनीपैकी एक मुख्य योगिनी असून ती नरसिंहस्वामी महाराजांच्या अवतार समाप्तीनंतर त्यांच्या आज्ञेने माणगावी येऊन राहिली. स्वामी महाराजांचा अवतार या ठिकाणी होण्यापूर्वी नरसिंहसरस्वती स्वामीमहाराजांनी यक्षिणी देवीला सांगितले की तू थोडे दिवस अमरेश्वर येथे राहून नंतर माणगावी जा अशी पौराणिक कथा आहे. माणगावी जाण्याची फार ओढ प. पू. श्रीदत्तमहाराजांना लागली होती. तेथे जाण्यासाठी सर्व मंडळी निघालो. वाटेत पांगरी नावाचे एक गांव लागणार होते. तेथे स्वामी महाराजांचेच श्री टेंबेस्वामी नावांचे एक मोठे शिष्य होऊन गेले, त्यांचे समाधी मंदीर होते. ते पाहूनच पुढे जावे असे ठरले होते. परंतु वेळ फार

झाला होता. पांगरी मुख्य रस्त्यापासून आत होते. प. पू. श्रीदत्तमहाराजांनी बेत बदलला. ते म्हणाले आपण एकदम माणगावलाच जाऊ. मनात आले महाराज असे नको का म्हणाले? लक्षात येईना. प. पू. श्रीदत्तमहाराज केव्हाच मनाने देवळात पोचले होते. पाठोपाठ आम्ही गेलो. श्री तुकाराममहाराजां सारखी त्यांची अवस्था झाली.

तुका म्हणे केव्हा देखेन कळस । पळाली आळस निद्रा भूक ।।

प. पू. श्रीदत्तमहाराज मंदिरात श्रीमत् वासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराजांपुढे हात जोडून उभे होते. त्यांच्या नेत्रातून अश्रुधारा वहात होत्या. ते त्यांची भावावस्था कधी समजू देत नाहीत. आज मात्र अनावर झाले असावे. ज्ञानोत्तर भक्तीचे प्रात्यक्षिक देवाने आमचे नजरेपुढे ठेवले आहे. वातावरण कसे शांत शांत झाले होते. कुणालाही कुठलीही हालचाल करु नये असेच वाटत होते. कारण प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या भावावस्थेचा भंग होईल. वाटत होते की आवाज काढू नये. एकाग्रता मोडू नये.

बरेच दिवसाची प. पू. स्वामीमहाराजांची जन्मभूमी पाहण्याची अपुरी राहिलेली इच्छा पुरी झाली. त्यामुळे त्यांच्या मनाला समाधान वाटले. गुरुभक्तीमुळे, जन्मस्थान दर्शनाने, गुरुंच्या आठवणीने आलेली निर्मळ भावुकता प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या मनाला समाधान आणीत असावी. केव्हा एकदा दर्शन घेईन अशी त्यांची अवस्था झाली होती. अशा तऱ्हेने दर्शन घेऊन झाल्यावर महाराज भिंतीला टेकून स्वस्थ बसले. आम्ही मंदिराच्या गाभाऱ्यासमोर सरसावलो.

स्वामी वासुदेवानंदांच्या चरणी नमस्कार केला. मनात आले आपल्यालाही श्रीगुरुमहाराजांच्या जन्मगावी जाता आले तर? मनात असे म्हणत हात जोडून उभी होते तोच प. पू. श्रीदत्तमहाराजानी अश्विनसाठी प्रार्थना करण्याची आठवण केली. मी विस्मितच झाले. प्रवासाची सुरुवात झाली तेव्हा माझे मनातील विचार ओळखून महाराज हेच म्हणाले होते. मंदिरात आल्यावरही त्यांनी आठवण करावी या त्यांच्या कृपेला शब्दच नाहीत.

कृपा, वात्सल्य, करुणा, शुभाशिष सर्व यात एकवटले होते. मी तशी प्रार्थना केली. पुढे श्रीमहाराज लगेच म्हणाले श्रीगुरुमहाराजांच्या जन्मगावी जावे असे वाटते आहे ना? जाऊ या. आपल्या मनातील हेतू यांनी जाणला कसा? याचे पुन्हा एकदा आश्चर्य वाटले. आता ती इच्छा पुरी होणार याचा आनंद वाटला. महाराज सर्वांवर इतके सारखे प्रेम कसे करतात याचे नवल वाटले.

ते म्हणाले, "आम्ही माणगावला येण्याची घाई केली. पांगरीला थांबलो नाही. वाटले, हे मंदिर उघडे दृष्टीस पडते की नाही? पुजाऱ्याने दार बंद केले तर? आधीच इकडे येण्यास इतक्या वर्षांचा उशीर झाला आहे. त्यात आता आणखी

कोठेही विलंब नको. पादुका कधी पाहीन अशी मनाची अवस्था झाली.'' संतांचे आंतर विचार, त्यांची दूरदृष्टी याचा अंदाज येणेही कठीण आहे.

संत सहवासात भक्तीचा जिव्हाळा कळतो. निरपेक्ष प्रेमाचा अनुभव येतो. कुणाचे मन न दुखावता वागण्याची हातोटी कळते. परदुःखाची कणव संताना किती आहे हे समजते. व्यवहार करताना भगवंताचा आधार कसा धरतात हा गृहपाठ मिळतो. संत सहवास मिळत असेल तेवढा घ्यावा पण त्यातून शिकून घ्यावे. डोळसपणा ठेवावा म्हणजे जीवनात आनंद मिळेल. स्वामीमहाराजांनीच सांगितले आहे.

सदा संतांपाशी जावे त्यांचेजवळी बैसावे।
जरी ते उपदेश न देती तरी ऐकाव्या त्या गोष्टी।।
तेची उपदेश होती त्याने कष्ट नष्ट होती।
वासु म्हणे संत संगे करिती पसंत।।

मंदिरात प्रवचनाचा योग

श्रीदत्तजयंतीनिमित्त सात दिवसाच्या सोहळ्याच्या प्रथम दिवशी प. पू. श्रीमहाराजांचे माणगांवी आगमन झाले. त्यामुळे या सप्ताहातील कार्यक्रमातील पहिले प्रवचनाचे पुष्प महाराजांच्या हस्ते गुंफले गेले. या योगायोगामध्ये ईश्वरीकृपेचा संकेत होता. हे दत्तमंदिर प. प. श्रीवासुदेवानंदांनी स्वतः हाताने काम करुन बांधलेले आहे. पुढे त्याचा विस्तार झाला आहे. याठिकाणी स्वामीमहाराजांच्या पूजेतील अगदी छोट्या सोन्याच्या पादुका आहेत. त्या कोणाला पूजा करायला किंवा हात लावायलाही देत नाहीत. आमच्या सर्वांच्या मनाला वाटत होते की प. पू. श्रीदत्तमहाराजांना त्यांची पूजा करावयास मिळावी. गाभाऱ्यात पुजाऱ्याशिवाय कोणीही प्रवेश करु शकत नाही. त्या पुजाऱ्यानाच बुध्दी झाली. ते प. पू. श्रीमहाराजाना म्हणाले, ''आपण पहाटे पाच वाजता या पादुकांची पूजा करावी. प. पू. श्रीस्वामी महाराजांच्या हातची अशी एकच वस्तू येथे आहे.'' सर्वानाच आनंद झाला. प. प. श्रीदत्तमहाराजांना या सेवेचा परमानंद झाला. पूजेची सर्व तयारी यथासांग केली. पहाटे पाच वाजता प. पू. श्रीमहाराज सर्व आटपून सोवळे नेसून देवळात हजर झाले. गाभाऱ्याच्या बाहेर थोडी जागा आहे. त्या जागेपुढे लाकडी कठडा आणि पुढे सभामंडप आहे. गाभाऱ्याच्या बाहेरील थोड्याशा जागेत फक्त महाराजांचा प्रवेश झाला. सोवळ्यातून त्या अंगुष्टमात्र सुवर्ण पादुका पूजाऱ्यांनी बाहेर आणल्या आणि प. पू. श्रीमहाराजांच्या हातावर ठेवल्या. आम्हाला दुरुन दर्शन झाले. हे आमचे भाग्यच वाटले.

प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या हाती त्या पादुका आल्यावर श्रीदत्तमहाराजांची भावसमाधी लागली. डोळ्यातील अश्रुंनी पादुकाना स्नान घडायला नको म्हणून श्रीमहाराजांनी त्या पादुका मस्तकी लावल्या. स्वामीमहाराजांच्या समग्र साहित्याचे पुनर्मुद्रण झाले. पुण्याला श्री वासुदेव निवास उभा राहिला. यापेक्षाही या छोट्या सुवर्ण पादुका हाती आल्यावर प. पू. श्रीस्वामीमहाराजांच्या अंतरात प्रवेश केल्याचे सौख्य त्या पादुका स्पर्शाने झाले असणार!

प. प. स्वामीमहाराजांनी श्रीदत्तमहाराजांच्या जन्मानंतर दहा दिवसाच्या आतच श्रीदत्तमहाराजांचे घरी येऊन ''वक्रतुंड महाराज आपण आलात'' असे भविष्य वर्तविले. त्या स्वामीमहाराजांच्या सुवर्ण पादुका हाती आल्यानंतर स्वामीमहाराज भेटल्याचा आनंद मनात दाटून आला असावा. पूजा खूप शास्त्रोक्त झाली. आरती प्रसाद झाला. तृप्तीचे समाधान सर्वांच्याच चेहेऱ्यावर पसरले होतें. प. पू. श्रीवक्रतुंडमहाराज म्हणजे श्रीमहाराजांचे आजोबा. तेही मोठे अधिकारी पुरुष होते.

प. प. श्री वासुदेवानंद सरस्वती विद्यालय

येथे शिक्षणाची सोय त्यामानाने चांगली उपलब्ध आहे. येथे माध्यमिक विद्यालय आहे. कनिष्ठ महाविद्यालय आहे. त्याला प. प. श्री वासुदेवानंद सरस्वती विद्यालय हे नांव प. पू. रंगावधूत महाराजांच्या सांगण्यावरुन देण्यात आले. पूर्वी याचे नाव न्यू इंग्लीश स्कूल असे होते. त्याकरिता रंगावधूत महाराजांनी भरघोस देणगी दिली. ते शाळेच्या संचालकांना म्हणाले, ''एवढे मोठे महापुरुष या गावी जन्मले त्यांचे नांव विद्यामंदिराला देणे हे त्यांचे खरे स्मरण आहे. आपले ते कर्तव्य आहे.'' या त्यांच्या सूचनेचा योग्य तो आदर करुन श्री वासुदेवानंद सरस्वती विद्यालय असे नाव देण्यात आले.

विद्यालयाचे मुख्याध्यापक योजक व मुलांवरील सुसंस्कार याबाबतीत जागृत असल्यामुळे ते थोर लोकांना मुद्दाम शाळा दाखविण्यासाठी बोलावतात. म्हणत होते की श्री वासुदेवानंदाचे हे जन्मस्थान असल्यामुळे खूप मोठी मंडळी दर्शनासाठी या ठिकाणी येतात. त्यांना आम्ही मुद्दाम विद्यालयात बोलावतो. मुलांना अशी मंडळी पहावयास मिळतात. चांगले विचार ऐकावयास मिळतात. प. पू. श्रीदत्तमहाराजांना त्यांनी आमंत्रण केले त्याचा स्वीकार महाराजांनी मोठ्या आनंदानी केला.

टेबलखुर्च्या मांडून समारंभाची सर्व व्यवस्था उत्तम केली होती. संध्याकाळी पाच साडेपाचची वेळ. सूर्य मावळतीकडे वळला होता. सुखद अशा वेळेला पटांगणात मुले अतिशय शिस्तीने बसलेली होती. एका बाजूला मुली, मध्ये पाहुणे मंडळीना जाता येईल एवढी जागा सोडून दुसऱ्या बाजूला मुले बसलेली होती. सर्व मुलांना दिगंबराची धुन सुरेख तालबध्द म्हणायला शिकविली होती. धुन एकदा

मुलींनी व नंतर मुलांनी म्हणायची असे त्यांचे म्हणणे फार गोड व आकर्षक वाटत होते.

विद्यार्थीवर्ग पाहिला की मन त्यांच्यात केव्हाच मिसळून जाते. संध्याकाळची वेळ, मावळणाऱ्या सूर्याचे किरण निरोप घेत होते. झाडापानांची सौम्य सळसळ ऐकू येत होती. आकाशात पक्षांचे थवेच्या थवे त्यांच्या घरट्याकडे ओढीने झेपावत होते. आणि अशा वेळी हा नामघोष सात्विक संस्कार करीत होता. प. पू. श्रीदत्तमहाराजांचे आगमन होत आहे असे पाहिल्याबरोबर सर्वजण शिस्तीने उभे राहिले. आपला गजर अगदी शांतपणे चालू ठेवला.

प. पू. श्रीदत्तमहाराजांबरोबर सर्व मंडळी हळूहळू स्थानापन्न झाली. मुले उभी राहून आपली धून शांतपणे म्हणत होती. मुख्याध्यापक व शिक्षक कोणीही बसले नव्हते. प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या ते लक्षात आले की आपण सांगितल्याशिवाय ही मंडळी बसणार नाहीत. श्रीदत्तमहाराज लगेच म्हणाले आपण सर्वांनी बसायला हरकत नाही. तेव्हा प्रथम मुख्याध्यापक बसले नंतर शिक्षक बसले आणि नंतर मुले बसली. ही सर्व आदर दाखविण्याची पध्दत पाहून महाराजांना फार बरे वाटले.

प. पू. श्रीदत्तमहाराजांनी आपल्या आशीर्वादाच्या भाषणात सांगितले की आपण सर्व फार भाग्यवान आहात. एका फार मोठ्या महापुरुषांच्या जन्मभूमीत आपण जन्म घेतला आहे. आपल्याला ते कधी काही कमी पडू देणार नाहीत. आपण त्यांचे दर्शनासाठी मंदिरात जात जा. त्यांची प्रार्थना करा म्हणजे उत्तम बुध्दी प्राप्त होईल. अशा तऱ्हेचे विचार मुलांना ऐकविले. मुलांनी समारोपाला करुणात्रिपदी इतकी सुरेख म्हटली की प. पू. श्रीदत्तमहाराजांना भरून आले.

विद्यालयाच्या बागेतील श्रीफळ व केळी प. पू. श्रीदत्तमहाराजांना अर्पण केली. हा समारंभ फार देखणा, शिस्तबध्द प. प. श्री वासुदेवानंद सरस्वती विद्यालय या नावाला शोभण्यासारखा झाला. या मुलांना मोठमोठ्या देवस्थानच्या उत्सवात स्वयंसेवक म्हणून काम करण्यासाठी मुद्दाम पाठवण्याची या विद्यालयाची प्रथा आहे. हे विद्यालय पाहून खूप बरे वाटले. या ठिकाणी प. प. श्री वासुदेवानंद सरस्वती युवक क्रीडामंडळ आहे. क्रीडाविश्वात या संस्थेने भरारी मारली आहे. ती स्वामींच्या कृपेमुळे असे सर्वाना वाटते. श्रीवासुदेवानंद सरस्वती मुक्तद्वार वाचनालय व ग्रंथसंग्रहालय आहे. माणगावचा हा सर्व विकास स्वामी वासुदेवानंदांच्या कृपेमुळे होत आहे, याची जाण गावकऱ्यांना सतत आहे.

रात्री आरती, पालखी खूप छान झाली. थोडा अल्पोपहार घेऊन प. पू. श्रीदत्तमहाराजांना वंदन करुन सकाळपासून भावभक्तीने रंगून गेलेल्या मनाने एक आगळा आनंद अनुभवीत स्वामी वासुदेवांच्या कृपेच्या पांघरुणात शांतपणे विसावलो. त्यांना वंदन करता करता निद्रा कधी येऊन ठाकली ते कळलेच नाही.

सकाळी लवकर मुक्काम हलवायचा होता. खरे पाहता तीन रात्र महाराज तीर्थाच्या ठिकाणी रहातात. पण माझ्याकरिता कुडुत्रीला जावयाचे ठरल्याने एक दिवस मुक्काम लवकर हलवावा लागला. सावंतवाडीला मिरजेचे डॉ. प्राणी यांची कन्या दिली आहे. प. पू. श्रीगुळवणीमहाराजांपासून डॉ. प्राणी यांचा घरोब्याचा संबंध होता. प. पू. श्रीदत्तमहाराजांनीही ती प्रथा पाळली आहे. ते कुटुंब मुद्दाम सावंतवाडीहून येऊन बोलावणे करुन गेले. त्यामुळे तेथे उतरुन फराळ करुन पुढे जावे असे ठरले. कारण त्या दिवशी एकादशी होती.

माणगावचा निरोप

प. पू. श्रीदत्तमहाराजांची माणगांवची अध्यात्मिक यात्रा मोठ्या उत्साहाने सुरु झाली. भावभक्तीने फुलली. आमच्यासारख्या सामान्य जनांकरिता अनेक अनुभव देणारी ठरली. गुरुभक्तीची तीव्रता येथे पाहिली. संतांचे विविधकार्य, तळमळ, लोकसंग्रह यांचे दर्शन झाले. माणगावच्या पुण्यभूमीत प. प. श्रीस्वामीमहाराजांचे दर्शन घडले. त्यांचे कृपाशिर्वाद मिळाले. माणगावची उद्दिष्टपूर्ती झाली. स्वामीमहाराजांचे आशीर्वाद घेऊन निघण्याची वेळ झाली.

पुजाऱ्यांना भरुन आले. सर्वांचीच मने स्वामी महाराजांचे चरणी लीन झाली. प. पू. श्रीदत्तमहाराजांना माणगाव दर्शन झाल्यामुळे समाधान वाटत होते. त्यांनी यक्षिणी देवीचे दर्शन घेतले. निर्मला नदीवर जाऊन आले. नैवेद्य वगैरे सर्व व्यवस्थित झाले. मंदिरात जाऊन स्वामींचा निरोप घेऊन आम्ही निघालो. श्री. शरदभाऊ, व रत्नागिरीकर मंडळीनी सावंतवाडीला आमचा निरोप घेतला. माणगावचा वर्णनाचा अभंग मनात आठवत गाव सोडले.

*

श्री क्षेत्र माणगाव वर्णन

सुंदर ते गाव सुंदर ते स्थान ।। तेथे माझे मन राहे सदा ।।१।।
पश्चिमे सागर पूर्वे सह्यागिरी । मध्ये रत्नागिरी भूमी भाग ।।२।।
दक्षिण भागात माणगाव क्षेत्र । निर्मळा पवित्र वाहे तेथे ।।३।।
पर्वत राजीत निर्झर वहाती । वृक्षांची ती दाटी काय वर्णू ।।४।।
तेथे यतीराज वासुदेव राहे । उभा मागे आहे दत्तात्रय ।।५।।

(माणगाव महात्म्य मधून)

माणगावाहून सावंतवाडीला निघण्यापूर्वी थोड्याच अंतरावर चि. शरदभाऊंची जीप पंक्चर झाली. प. पू. श्रीमहाराज म्हणाले "आपण थोडा वेळ थांबू या. ती

दुरुस्त झाली की आपण निघू. वाटेला आणलेले फराळाचे त्यांना द्या म्हणजे बरे. रत्नागिरीला पोहोचेपर्यंत उशीर लागेल.'' तसेच झाले. महाराजांचे सर्वांकडे लक्ष असते. चि. शरदभांऊना म्हणाले ''रत्नागिरीचा मुक्काम चांगला झाला. तुमचे घर पाहिले. श्री. सुशिलाताईंची भेट झाली. श्रीगुरुमहाराजांची कृपा आहे. तुमचे समाजकार्य चालूच आहे. प्रकृतिकडे फार दुर्लक्ष करु नका.'' श्री. शरदभाऊ व आम्हा सर्वांच्या डोळ्याला या प्रेमळपणाने पाणी आले. एका लहानश्या प्रसंगाचा येथे उल्लेख आवश्यक वाटतो. प. पू. श्रीमहाराजाना गाडीत बसलेले पाहून एका घरातील एक आजी धावत आली. प. पू. श्रीमहाराजाना आपल्या घरी आग्रहाने घेऊन आली. आमच्या बोलण्यावरुन तिच्या लक्षात आले की महाराज एक सत्पुरुष आहेत. त्यांचे पाय घराला लागणे हे परम भाग्य आहे. आपली प्रापंचिक अडचण महाराजांपुढे मोकळ्या मनाने सांगितली. बारीकसा उपाय सांगून महाराजानी त्याचे निवारण केले. संताची कामे अशी जाता येतां घडत असतात. संताच्या पदस्पर्शाने किड्या मुंगीचाही उध्दार होत असतो.

सावंतवाडी

सावंतवाडीला डॉ. प्राण्यांचे व्याही श्री. देशपांड्याकडे फराळ झाला. डॉ. प्राण्यांची कन्या प. पू. श्रीमहाराजांना परिचित असल्यामुळे तिला आपल्या माहेराहून कोणी आल्याइतका आनंद झाला. प. पू. श्रीदत्तमहाराजांना कशातही न अडकता आपलेपणाने वागण्याची कला पूर्ण साध्य झाली होती. आपण डॉ. प्राण्यांच्या मुलीच्या सासरी आलो आहोत म्हणून एक वेगळ्या आपुलकीचा भाग होता. तिच्या सासूबाईना व सासरेबुवांना शाल प. पू. श्रीमहाराजांनी प्रसाद म्हणून दिली. फराळ केला. म्हणाले आपण उभयता मार्गदर्शनाला आहात हे चांगले आहे. मुलीला माहेरचे संस्कार चांगले आहेत. वागण्यात महाराज म्हणून वेगळेपणा तर नाहीच पण तिच्या माहेरकडून आपण आलो आहोत याची जाणीव मनात ठेवून वागणे सरळ सहज घडत होते. मला या प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या आपलेपणात न गुरफटता आपलेपणाने वागण्याच्या पध्दतीचे विलक्षण आश्चर्य वाटत होते. काही गोष्टी शब्दाने सांगता येत नाहीत. त्या अनुभवाव्या लागतात. त्याप्रमाणे प. पू. श्रीदत्तमहाराजांचे हे सर्वांशी प्रेमपूर्ण वागणे हे अगदी सहज होते. त्यात कृत्रिमता नसते. खरोखर संतांचा सहवास प्रत्येकाला मिळण्याचे भाग्य लाभले पाहिजे. त्यामुळे वृथा अहंकार कमी होण्यास मदत तर होईलच पण माणसामाणसामध्ये असलेला दुरावा कमी होण्यासाठी अशा संतसहवासाची फार जरुरी आहे. मानवतेच्या दृष्टीकोनातून कितीतरी गोष्टी त्यांच्या वागण्यातून अवलोकन केल्या गेल्या त्या गोष्टी मनोमंदिरी आजही कोरल्या गेल्या आहेत.

नमस्कार श्री सद्गुरु वामनाना मु. कुडुत्री

सावंतवाडीत श्री. देशपांडे कुटुंबाचा निरोप घेऊन आम्ही सर्व निघालो. राधानगरीवरुन कुडुत्रीला जावे असे ठरले. सर्वांनाच खूप आनंद झाला. श्रीगुरुमहाराजांच्या आठवणीत मन रंगून गेले. श्रीगुरुमहाराजांच्या अंगी जी सर्व समावेशक वृत्ती-सर्वांवर सारखे मनःपूर्वक प्रेम करण्याची शक्ती होती ती जशीच्या तशी प. पू. श्रीदत्तमहाराजांकडे असल्यामुळे दिसायला देह दोन दिसले तरी अंतरंगाने एक असलेली ही व्यक्तिमत्वे एकतेचा आनंद मनाला देतात. त्यामुळे श्रीगुरुमहाराज म्हणजेच श्रीदत्तमहाराज ही एक निष्ठा त्यांच्यापदी आमची सर्वांची आहे. ती निष्ठा बसवून घेण्याचे सामर्थ्य प. पू. श्रीदत्तमहाराजांचेच आहे. त्यामुळे श्रीगुरुमहाराजांच्या देहाच्या वियोगाने झालेली व्याकुळता शांत झाली. संपूर्ण वासुदेव निवासाची घडी उत्तम बसली. श्री. वामन निवास तत्परतेने सेवाकार्यासाठी सज्ज उभा राहिला.

आपल्याला प. पू. श्रीदत्तमहाराजांबरोबर जावयास मिळत आहे हा मणिकांचन योग आहे असे निश्चितच वाटले. तसा लांबचा प्रवास परंतु प. पू. श्रीदत्तमहाराजांनी तो आपल्याकरिता सहज केला असे वाटले.

हा सर्व रस्ता निसर्गरम्य होता. थोडे थोडे अंतर काढून गेल्यावर आपण योग्य दिशेने जात आहोत याची चौकशी करावी लागत होती. कारण आमच्यापैकी कोणीच कुडुत्रीला गेले नव्हते.

महाराष्ट्रात शक्तिपात विद्येची गंगा वाहून आणणारे योगीराज हे कुठे एका कोपऱ्यातील खेडेगावात जन्मास आले! ज्यांच्या जन्माने गावाला मोठे केले, तीर्थयात्रेचे ठिकाण बनविले त्या ठिकाणी आपण जाणार आहोत या विचाराने मनाचा कब्जा घेतला. शरीर रोमांचाने व मन स्मृतीने पूर्ण भरुन गेले. श्री. मनोहर पाध्ये व श्री. ढापरेकाका दिगंबराची धून म्हणताना रंगून गेले होते. रस्ता मागे टाकीत गाडी पुढे पुढे चालली होती. माझ्या मनात येत होते श्रीगुरुमहाराजांनी आपले खरे रुप किती झाकून ठेवले होते. कित्येक वर्षे लोकांना हे ऐश्वर्य माहीतच नव्हते. कल्याण मासिकात लेख आला तेव्हा लोकांना श्रीगुरुमहाराजांची योग्यता, थोरवी कळली. असे हे योगीराज एका छोट्या गावी जन्मले होते.

बहरलेला निसर्ग, घाटाची छोटी मोठी वळणे, वृक्षांची गर्दी यामुळे वातावरणातील गारवा. शांतीब्रह्म महाराजच बरोबर असल्यामुळे गुपचुप बसले असावे. डोळ्यापुढे असणारे एकच दृश्य म्हणजे कुडुत्रीगाव. तोच ध्यास मनाला लागला होता. अंतर काटले जात होते. चार रस्ते ज्या ठिकाणी फुटत होते त्या ठिकाणी विचारण्यासाठी गाडी उभी केली. मनाची इतकी अधीर स्थिती, श्रीगुरुमहाराजांच्या स्मृतीशी इतकी एकरुपता आली होती की एकदम म्हणून गेले

डाव्या हातालाच गाडी वळवा. इकडेच आपल्याला कुडुत्री गाव लागेल. शब्द ठासून आले. कारण माझ्या या तन्मयतेने असेल माझ्या डोळ्यापुढे काळा लाँग कोट व टोपी घातलेली श्रीगुरुमहाराजांची प्रसन्नमूर्ती क्षणभरच चमकून गेल्यासारखी वाटली. मन मोहरुन गेले. तो भावावेश असेल पण झाले मात्र खरे. या शुभसंकेतावरुनच मी 'ढापरेकाका गाडी इकडे न्या' असे म्हटले असावे.

प. पू. श्रीदत्तमहाराज हे सारे बघून थोडे हसले. माझ्या मनात नंतर आले प. पू. श्रीदत्तमहाराजांवर पुत्रवत प्रेम करणारे गुरुमहाराज त्यांच्या स्वागतासाठी असे दर्शन देणारच.

मनाच्या कल्पनेचाही हा सारा विलास असेल पण झाले खरे असे. ते वळण बरोबर ठरले. थोडे पुढे गेल्यावर काही मुले खेळत होती. त्यातील एका छोट्या मुलाला प. पू. श्रीदत्तमहाराजांनी बोलावले. ''कायरे इथे नुकताच एक उत्सव झाला. श्रीगुरुमहाराजांचा शताब्दी उत्सव त्या घरी नेशील का?'' तो मुलगा म्हणाला दाखवतो की, ''तेथे खूप मोठी जेवणावळ झाली. मी पण गेलो होतो.'' लाडू केले होते. महाराज म्हणाले त्या मुलाला गाडीत घ्या. मुलाने बरोबर घर दाखवले.

प. पू. श्रीदत्तमहाराज उतरले. घरात पाऊल टाकण्यापूर्वी नमस्कार केला. श्री. ढापरेकाका व मनोहर पाध्ये यांनी एकदम गजर केला. श्री अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त या गजराने त्या जमिनीचा कण न कण पुलकित झाला असावा. आम्हा उभयतांची अक्षरशः कंपायमान स्थिती झाली.

बाहेर पडवीला एक गाय बांधली होती. जवळच वासरु उभे होते. ओट्यावर एक शेतकरीणबाई धान्य पाखडीत होत्या. फळकट बाजूला पडत होते. दाणे सुपात रहात होते. मनात सहजच येऊन गेले. ब्रह्मरुपतेचे उत्तम बीज येथे अंकुरले. आम्हाला पाहिल्यावर बाई गडबडीने उठल्या. डोक्यावर पदर घेऊन नम्रतेने म्हणाल्या, ''कोण्या गावचे पाव्हणे?'' असे म्हणत म्हणत ओसरीवर कांबळे अंथरले. ''बसा की जरा.'' प. पू. श्रीदत्तमहाराज म्हणाले ''या ठिकाणी श्रीगुळवणीमहाराजांचे जन्मखोली दाखवाल का? आम्ही त्यासाठी आलो आहोत.''

''असे होय. बाबाला पहाण्यासाठी आला होय. दावते की. आधी पाय धुवायला देते'' असे म्हणून गार पाण्याची बादली, एक तपेली आणून परसदारात ठेवली.

प. पू. श्रीदत्तमहाराजांनी पाय धुण्यापूर्वी ते पाणी डोळ्याला लावले. येथेही महाराज खूपच गंभीर व अंतर्मुख वाटत होते. त्यांनी हातांनी पाणी सर्वांवर थोडे थोडे उडविले. प. पू. श्रीगुरुमहाराजांचे घरचे पाणी म्हणजे प. पू. श्रीदत्तमहाराजांनी ते तीर्थच मानले. मूकपणे त्यांच्या हालचालीवरुन त्यांचे भाव टिपता येत होते. उंबरठा

ओलांडून आत गेलो तो काय? एक अगदी लहानशी खोली. उजेडही बेताचाच. समोर एका कोनाड्यांत आश्रमात 'कमलपुष्पात महाराज' असा जो फोटो होता तो ठेवलेला होता. झेंडूचा हार घातलेला होता. समई तेवत होती. पुढे एक नारळ होता. त्या कोनाड्याला तारेची चौकट बसविली होती.

प. पू. श्रीदत्तमहाराजांनी साष्टांग नमस्कार घालून ते खोलीत बसले पुन्हा पुन्हा फोटोकडे बघत होते.

एकच वाक्य मुखातून बाहेर आले ''एवढे थोर योग-सामर्थ्य असलेले आपण या ठिकाणी जन्मून भारताला धन्य केलेत'' एकदम सारे गप्पच झाले. निरामय शांतता. सारे काही शांत शांत. माझे भाव अनावर झाले की आवेग थांबेनात. आतूनच सारे होत होते. पण या भावनेत खूप सुख वाटत होते. श्रीगुरुमहाराजांच्या प्रेमात अथांग बुडून गेलो आहोत असे वाटत होते. डोळ्यातील अश्रू थांबतच नव्हते. ते थांबूच नयेत असे वाटत होते. निरांजन, उदबत्ती लावली, नारळ ठेवला श्लोक म्हटले.

इतक्यात प. पू. श्रीदत्तमहाराज यांना म्हणाले ''दादा आपण सर्वच बाहेर बसू नीलाताईना थोडा वेळ येथेच बसू देत. भावनावेग फार आहे. तो एकदा येऊन जाऊ दे.'' ह्यांची सुध्दा भावना तशीच झाली होती पण त्यानी भावनावेग आवरला होता.

प. पू. श्रीगुरुमहाराजांनी आमच्यावर इतकी माया केली होती की ते सारे आठवून शरीर अक्षरशः गदगदत होते. या थोर महात्म्याचा कुठे एका कोपऱ्यात जन्म झाला. त्यावेळी त्यांच्या असामान्यतेची कल्पना कुणाला आली असेल का? आपण येथे वाढलात, राहिलात, खेळलात. या ठिकाणी आम्ही उभयता प. पू. श्रीदत्तमहाराजांबरोबर आलो. फार मोठे भाग्य! सारी तीर्थयात्रा येथे घडली. भावनांवर भावनांचा एक विलक्षण आनंदाचा अनुभव भोगला. अजूनही स्मृती आल्या की त्याचा स्पर्श मनाला येत राहतो.

गुरुवरा ओवाळू आरती ही आरती ढापरेकाका व श्री मनोहर पाध्ये यांनी म्हटली. प. पू. श्रीदत्तमहाराजांनी खूप सांभाळून घेतले. त्यांचे वाक्य सर्वानाच उपयोगी आहे. म्हणून लिहिते. ईश्वराबद्दलचा भाव हा भाव शब्दाच्या पलिकडे तर आहेच पण तो भावासंबंधी असलेल्या कल्पनेच्या फार दूर आहे. भाव निर्माण झाला की जीव सतत ईश्वरसन्मुख होतो. अशी वाक्ये ही सतत अंतरंगात कोरुन ठेवावीत. हे भाव निर्माण होणे ही देखील ईश्वरी कृपाच आहे.

प. पू. श्रीदत्तमहाराजांनी मला किती जाणून घेतले. बसण्याची संधी दिली. चला चला केले नाही. ''आता भावनावेग आवरला ना! आता घर पाहू या.'' संत कधीही समाज विन्मुख नसतात. याचा पुरेपुर अनुभव मला प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या

सहवासात आला. आपला आनंद व आपले समाधान सर्वांच्या वाट्यास यावे म्हणून ते आमच्यात मिसळले.

लौकिकार्थाने खेडेगावातील लहान घर पण माझ्या भावनिक विश्वात आपण एखादा राजवाडा पहातो आहे असे वाटत होते. स्वयंपाकघर, छोटेसे माजघर, मागे पडवी, अंगण सारे होते. हे घर ह्या बाईनी विकत घेतले होते याचे मात्र मनाला वाईट वाटत होते. ही स्मृती आपणाकडे रहावयास हवी होती असे वाटत होते.

इतक्यात गावातील जुन्या जाणत्या वृध्द भगिनी तेथे आल्या. प. पू. श्रीगुरुमहाराजांच्या आठवणी सांगू लागल्या. ''प. पू. श्रीगुरुमहाराजांना येथे सर्व दादा म्हणत असत. दादांची आई उमाबाई फार मायाळू होत्या. आम्ही सर्व येथे हरितालिका जागवायला येत होतो. फुगड्या खेळत होतो. जणू आमचे हे घरच. दादा फार मोठे झाले. पुण्यात आश्रम बांधला पण आम्हाला विसरले नाहीत. नेहमी म्हणायचे या साऱ्याजणी पुण्याला. पण आमचे जमलेच नाही बघा. त्यांचे मोठेपण इथे त्यांनी कधी दाखवले नाही. साऱ्या माहेरवाशिणी कुठे आहेत, कशा आहेत अशी चौकशी करायचे. सर्वांसाठी कापड, लुगडी काही ना काही भेटी घेऊन यायचे ते कधीही विसरले नाहीत. त्यांना कोणी महाराज म्हणतात. पण दादा इथे आले की म्हणायचे इथे मी महाराज वगैरे नाही बर कां. तुमचा दादाच आहे मी. बाकी दादा फार साधे होते.''

पडवीला एक उखळ पुरलेले होते. मनांत आले श्रीगुरुमहाराजांना दूध पोहे खूप आवडत असत. या उखळात पोहे कांडून श्रीगुरुमहाराजांच्या आईने किती वेळा तरी खाऊ घातले असतील, मनाला वाटत होते इतके सुरेख घर कुठेच नसेल. खूप आनंद वाटला. मन अगदी प्रसन्न होते. बाहेर ओटीवर त्या बाईनी गाईचे धारोष्ण दूध काढून ठेवले होते. त्या बाई म्हणत होत्या बाबाच्या घरी आलात काय देऊ तुम्हाला गाईचे दूध तरी थोडे घ्या''. प. पू. श्रीदत्तमहाराजांनी ते दूध घेतले बाई म्हणत होत्या. ''बाबा येथे आल्यापासून गुरुवारी येथे बरेच लोक येतात. नवसही बोलतात. नारळ फोडतात.''

प. पू. श्रीदत्तमहाराज म्हणाले येथे रोज समई लावून ठेवत चला. बाई म्हणत होत्या की तेवढी लावून ठेवते. कोणाला बाबांच्या जवळ जाऊ देत नाही. सोवळ्यात आहेत असे सांगते. दुरुन नमस्कार करा असे सांगते. प. पू. श्रीमहाराजांनी आत जाऊन निरोप घेतला, त्यावेळी ते डोळे मिटून शांत बसले होते. काय बरे बोलले असतील श्रीगुरुमहाराजांशी. या विचाराने माझे मलाच हसू आले. जेथे द्वैतभाव संपला आहे. अशी ती भेट होती. सिध्दभेट होती.

दोन आरसे समोरासमोर आले तर एकमेकात विरुन जातील तसे ते पहातेपण होते. आपण ती भेट जाणणे शक्य नाही. हे लक्षात आले. दोन्ही हात जोडून मनामध्ये या स्मृती खोल बंद करुन ठेवल्या.

जन्मस्थान यात्रा प. पू. श्रीदत्तमहाराजांबरोबर घडली. त्यांच्या या ईश्वरी सहवासात कितीतरी गोष्टी वेचता आल्या. संताचे चरित्र शोधावे लागते, त्यांच्या सहवासात अशा प्रकारचे ज्ञानकण खूप वेचता येतील. पण सर्व अंगाने विचार करण्याची आपली दृष्टी खूपच तोकडी असते. त्यामुळे संतांच्या जीवनातील सर्व उत्तम बाजू आपल्या लक्षात येतातच असे नाही. आपला आवाका कमी पडतो.

श्रध्दा, आदरभाव, दुसऱ्याच्या मनाची जाण, आपलेपणांनी त्या बाईंबरोबर संवाद, दुधाचा स्वीकार, स्वतःच्या भावनेवर ताबा, आनंद सर्वांना मिळावा ही इच्छा, सूक्ष्म अवलोकन या कितीतरी गोष्टी सहजपणे वागण्यात आल्या.

तिथल्या लोकांचा भाव व मनाला थोडी आलेली भावनोत्कटता याबद्दल बोलताना प. पू. श्रीदत्तमहाराज म्हणाले परमेश्वराला भक्तीने आपला करता येतो. तुकाराम महाराज म्हणतात

मन वाचातीत तुझे हे स्वरुप । म्हणोनिया माप भक्ती केले
भक्तिचिया मापे मोजतो अनंता । इतरांनी तत्वता न मोजावे
योगयाग तप देहाचिया योगे । ज्ञानाचिया यागे न सापडसी
तुका म्हणे आम्ही भोळ्या भावे देवा । घ्यावी जी केशवा करतो ऐसी

भावभक्तीची ओंजळ अशी रीतीने श्रीगुरुमहाराजांच्या चरणी अर्पण केली. चित्त शांत झाले होते. मन मात्र गुरुभक्तीनें पूर्ण भरुन गेले होते. अंतरंग सद्गदित झाले होते. आम्ही दोघांनी हा आनंद खूप घेतला. विशेष आश्चर्याची गोष्ट म्हणजे हे भाव आतल्या आत परत आल्यावरही खूप दिवस टिकले. कोणाला कुडुत्रीची हकिकत सांगू लागले की पुन्हा तोच आनंद, ते प्रेमाश्रु येत असत. संतांच्या सहवासात हे अमोल धन काही काळ मला अनुभवता आले.

कोल्हापूरच्या अंबाबाईचे दर्शन

येताना कोल्हापूरला आलो. प्रथम अंबाबाईचे दर्शन घेतले. तिची ओटी भरली. प्रसाद घेतला. शक्तिमातेकडे शक्तिपीठाचे अधिकारी आले होते. पाच मिनिटे स्वस्थ बसून दर्शन घेण्याची प. पू. श्रीदत्तमहाराजांची पध्दती होती. प. पू. श्रीदत्तमहाराजांची नात सौ. सुमनताईची कन्या कोल्हापूरात असते. तिचे घर आहे तेथे जावयाचे ठरले.

सावंतवाडीला डॉ. प्राण्यांच्या मुलीकडे फराळ केला होता. त्यानंतर काहीच खाल्ले नव्हते. त्यामुळे त्यांच्या नातीकडे सर्वजण गेलो. सौ. लीलाताईंना खूप आनंद झाला. फराळाची सर्व व्यवस्था त्यांनी झटकन केली. त्यांचा मुलगा म्हणजे प. पू. श्रीमहाराजांचा पणतु त्याच्याशी महाराज थोडे बोलले. त्याच्या सासू-सासऱ्यांशी बोलले. आणलेल्या भेटवस्तू दिल्या. वडीलधाऱ्यांचा जाणीवपूर्वक गौरव करण्याची आवड. डॉ. प्राण्यांच्या मुलीच्या सासरी गेले असताना व प्रत्यक्ष नातीकडे आल्यावर पण प. पू. श्रीदत्तमहाराजांचे वागणे दोन्ही ठिकाणी समभावाचे होते. सौ. लीलाच्या नमस्काराचा स्वीकार करुन प. पू. श्रीदत्तमहाराज पटकन गाडीत जाऊन बसले.

मार्गाधारे वर्तावे । विश्व हे मोहरे लावावे। या ज्ञानेश्वरांच्या म्हणण्याप्रमाणे आपले असामान्यत्व लपवून ते वागले. ''कधी येणार? बरेच दिवसात आली नाहीस. जावई भेटले नाहीत. भेटले असते तर बरे झाले असते असे काही न बोलता फक्त तिच्या सासऱ्यांना एकच वाक्य म्हणाले. आशीर्वाद सांगा आपल्या चिरंजीवांना'' असे म्हणून वृत्तीचा प्रेमळपणा न सोडता झटकन निघाले.

सेवितो हा रस वाटितो आणिका घ्यारे घेऊ नका रानभरी असे म्हणत ही संत पाऊले केव्हाच माघारी वळली. पुण्य नगरीकडे आमचे प्रयाण सुरु झाले.



रात्र सुरू झाली तरी ज्ञानाचा उजेड

सहासात दिवसांचा सतत सहवास संपत आला होता. पुण्याला ही ज्ञानयात्रा थांबणार होती. मन सुखावत होते. सारे कांही विसरले होते. देहबुध्दी थोडी दूर उभी होती.

श्री. ढापरेकाकांनी सायंप्रार्थनेला सुरुवात केली. सारे मूक झाले. इतक्यात थोडे पुढे गेल्यावर गाडीचे चाक पंक्चर झाले. गाडी उभी केली. चाक काढून हळूच दुसरे चाक लावले. श्रीदत्तमहाराजांना त्रास होऊ नये म्हणून आम्ही सर्व उतरलो. महाराजांना उतरावे लागले नाही. तरी या अडचणीमुळे सर्वानाच वाईट वाटले. प. पू. श्रीदत्तमहाराजांनी जागे आहोत असे दाखविलेही नाही. कुरकुर नाही काही नाही. गाडी सुरु झाली पण आमची परीक्षाच घ्यायचे देवाचे मनात होते. थोडे पुढे जातो न जातो तोच दुसरे चाक निकामी झाले. आता डिकीत दुसरे चाक नव्हते. चाक काढून वाटेने जाणाऱ्या एका ट्रकला थांबवून चाक बरोबर घेऊन ढापरेकाका पुढे गेले. पंक्चर काढण्याची सोय जवळपास नव्हती. गाडी अशी मधेच गावापासून दूर उभी होती. प. पू. श्रीदत्तमहाराजांना झोप लागली होती. मला वाटते दिवसभराच्या या धावपळीने ते

या दुसऱ्या आपत्तीने सर्वांनाच खूप वाईट वाटले. जास्त वाईट वाटले की प. पू. श्रीमहाराज आता वेळेवर घरी जाऊन विश्रांती घेऊ शकणार नाहीत. आता तास दीड तास यात सहजच जाणार होता. आम्ही सर्वजण रस्त्यावर चक्क चादर घालून बसलो. सोबत फक्त गाडीची, वरती आकाश व बाजूला अंधार. पाठीराखे श्रीमहाराज आमचे बरोबर होते.

श्रीपाद श्रीवल्लभ या स्तोत्राचे पाठ करीत आम्ही बसलो होतो. तासाभराने ढापरेकाका घामाघूम होऊन आले. एक चाक जादा घेऊन आले. पंक्चर काढून झाला. चाक बसविले व गाडी चालू झाली. ढापरेकाका गाडी अतिशय सावकाश, जपून चालवीत. महाराजांना धक्का बसू नये याची काळजी घेत असत. वेग सारखा बेताचा ठेवीत असत. पुढचा सर्व प्रवास चांगला झाला. थोडक्यासाठी हा त्रास झाला.

थोड्या वेळाने प. पू. श्रीदत्तमहाराज जागे झाले. म्हणाले ''ढापरेकाकांना गाडी फार जपून चालवावी लागली. आम्हाला जरासुध्दा त्रास झाला नाही. गाडी आमच्याकरता हळू चालवावी लागत आहे.'' ढापरेकाका लगेच म्हणाले ''आपल्या बरोबर यायचे भाग्य लाभले हेच खूप वाटत आहे. देवाची कृपा वाटत आहे. यापेक्षा अधिक आनंदाचे क्षण कोणते असणार?'' असा संवाद मधून मधून होई.

रात्र पुढेपुढे सरकत होती. पण ज्ञानाच्या उजेडात आम्ही सर्वजण होतो. गाडी साताऱ्याला आली. आता प. पू. श्रीमहाराज थोडे बोलण्याच्या ओघात होते. आम्ही म्हटले ''आपल्यामुळे आम्हाला कुडुत्रीचे दर्शन घेता आले.'' प. पू. श्रीदत्तमहाराज लगेच म्हणाले,'' कोणत्याही कर्माचे कर्तेपण मनापासून भगवंताकडे सोपविले तर ईश्वरी सत्ता आपल्या जीवनात कल्पनेच्या बाहेर गोष्टी घडवून आणते.'' असा संतांचा प्रत्यक्ष अनुभव असतो. मीपणाची जाण, अस्मिता आणि कर्तेपणावर भरवंसा हा मानवी मनाचा मूलधर्म असतो. तो संत आपल्या वाङ्मयातून घालवितात. आपण आपल समग्र जीवन हीच साधना मानावायाची असते.

''काय नीलाताई नातवंडांना भेटण्याची कितपत घाई आहे?'' आम्ही उभयतांनी म्हटले ''नाही महाराज उद्या आश्रमात रहाणार आहो. हे म्हणाले उद्या देवाला नैवेद्य करावा असे मनात आहे. आपण याल ना? प. पू. श्रीदत्तमहाराज लगेच म्हणाले ''आमच्या मनातही ते होते. नीलाताई गुरुमहाराजांच्या जन्मस्थानी जाऊन आल्या आहेत.''

गाडी पुण्यात आली. आता प. पू. श्रीदत्तमहाराज त्यांच्या घरी जाणार! आपल्याला रात्रंदिवस लाभलेला सहवास येथे संपणार म्हणून जीव गलबलला. पण घरच्या रस्त्याला लागण्यापूर्वीच प. पू. श्रीदत्तमहाराज एकदम म्हणाले ''गाडी आश्रमाकडे न्या. श्रीगुरुमहाराजांच्या दर्शनाशिवाय घरी जाणार नाही. आज आम्ही आश्रमातच राहू.''

श्रीगुरुमहाराज आश्रमात आहेतच. ते गेलेले नाहीत ही त्यांची अगदी दृढ भावना आहे. श्रीगुरुमहाराजांचे प्रथम दर्शन म्हणून ते आश्रमातच राहिले. गुरुभक्तीचा हा उच्चांक होता. उत्तराधिकारी होऊनही त्या खोलीत ते बसत नाहीत. गुरुमहाराजांपुढे ते कधीच बसले नाहीत. आजही त्यांची तीच भावना असल्यामुळे त्यांच्या नम्र मनोवृत्तीत कधीच बदल होणार नाही.

रात्री महाराज आश्रमात राहिले. सकाळी उठून सर्व सामानासह श्री. ढापरेकाकांनी त्यांना घरी पोचविले. आम्हाला दोघांना म्हणाले 'प्रसादाला येतो आम्ही.' देवाला नमस्कार करुन ते निघाले. ती. सौ. आईसाहेबांना बोलावण्यासाठी आम्ही घरी गेलो.

श्रीवासुदेवरावांनी सर्व स्वयंपाक व प्रसाद उत्तम केला होता. देवावर अभिषेकही सांगितला होता. फोटोना हार घातले होते. रांगोळ्या वगैरे काढून पाने मांडली. यांचे हातून अन्नदानाचा संकल्प झाला. मनोमन श्रीदत्तमहाराजांच्या चरणी वंदन होत होते. शांतपणे जेवणे झाली. दक्षिणा ठेवली. विडा दिला.

महाराज म्हणाले 'तुमची त्रिस्थळी झाली.' माझ्या दोन स्थळे लक्षात आली. तिसरे येईना. ''लोकमान्यांच्या जन्मस्थानचे आपण दर्शन घेतले ना! त्यांचे चरित्र फार शुद्ध आहे. निरपेक्ष राष्ट्रभक्ती आहे. ती ईश्वरभक्तीइतकी थोर असते. तेव्हा झाली ना त्रिस्थळी.''

काय बोलावे हे कोणालाच सुचेना. लोकमान्यांविषयीचे त्यांचे मत ऐकून आनंद झाला. स्वार्थ, निरपेक्ष राष्ट्रभक्ती ही उच्च प्रकारची भक्तीच आहे ही त्यांची वाणी ऐकून फार बरे वाटले.

आता निरोप घेण्याची पाळी आमची आली. खूपच अवघड वाटू लागले. ६ ते ७ दिवस प. पू. श्रीमहाराजांबरोबर होतो. खूपच जवळून सहवास झाला. कोणत्याही वेळी प. पू. श्रीदत्तमहाराज सतत शांत, स्थिर होते तसेच सतत प्रसन्न होते. इतका लांबचा प्रवास होऊनही त्यांनी कधी कोणत्याही प्रकारची तक्रार केली नाही. सतत जमवून घेण्याची वृत्ती. अनाग्रही स्वभाव. कुणाचेही मन मोडले नाही. माणगाव भेटीसाठी प. पू. श्रीदत्तमहाराज पुनः एकदा सर्वांना घेऊन गेले होते. प्रथम भेटीचा सोहळा म्हणून एवढा विस्तृत वृत्तांत दिला आहे. प्रसंग पुनः वाचताना लक्षात आले की आपण ह्या दौऱ्यातील सुरवातीचाच शुभ प्रसंग विसरलो आहोत. तो देत आहे.

श्रीपरशुराम दर्शन

पुण्याहून रत्नागिरीला येताना वाटेत श्रीपरशुरामक्षेत्री आम्ही गाडी थांबविली. दृश्य मोठे विलोभनीय होते. २१ वेळा पृथ्वी निःक्षत्रिय केलेले श्रीपरशुराम ह्या

सह्याद्रीच्या माथ्यावर विसावले या ठिकाणी प. पू. श्रीदत्तमहाराजांचे मनही प्रसन्न झाले. खाली चिपळूण शहर दिसत होते. वाशिष्टी नदी दूरवर सागराला मिळण्यासाठी जात असलेली दिसत होती. वातावरण मोठे सुखद होते. श्रीपरशुराम मंदिर थोडे खालच्या अंगाला आहे. घाटी उतरावी लागते. मंदिराचे आवार मोठे प्रशस्त आहे. श्रीपरशुरामाची मूर्ती मोठी धीरगंभीर प्रसन्न आहे. प. पू. श्रीदत्तमहाराज हात जोडून डोळे मिटून उभे होते. तेवढ्यात श्रीपरशुरामाच्या मस्तकावरील पांढरे शभ्र कमळपुष्प खाली पडले. आम्हा सर्वांनाच मोठा आनंद वाटला. प. पू. श्रीमहाराजांचा दौरा यशस्वी होणार याची पावतीच जणू मिळाली.! पुजाऱ्याना प. पू. श्रीदत्तमहाराज कोण, कुठले काही माहीत नव्हते. त्यानी श्रीमहाराजाना आसनावर बसविले. श्रीपरशुरामांचे अंगावरील प्रसाद वस्त्र, श्रीफल व हार घालून श्रीमहाराजांचा सत्कार केला. आमच्या डोळ्यातून आनंदाश्रू ओघळू लागले. जो आवडतो सर्वांना तोचि आवडे देवाला याचा प्रत्यय सहज येऊन गेला.



श्रीदत्तमहाराजांचा दिल्ली दौरा

प. पू. श्रीदत्तमहाराजांचे भारताच्या राजधानीत साधारणतः तीन वेळा निरनिराळ्या कारणानी आगमन झाले. १९७० मधे राष्ट्रीय पंडित हा सन्मान राष्ट्रपतींच्या हस्ते स्वीकारण्यासाठी १९८० श्रीदत्तविनायक मंदिराच्या स्थापनेसाठी, १९८२ साली भागवत सप्ताहासाठी.

दिल्ली भारताची राजधानी. तेथे यथार्थत्वाने भारतदर्शन होते. सर्वच राज्यांतील कित्येक मंडळी दिल्ली येथे वास्तव्य करून आहेत. मराठी समाजही मोठ्या प्रमाणावर सुप्रतिष्ठित आहे. प्रायः सर्वच भाषिक समाजांची सांस्कृतिक केंद्रे तेथे असून दिल्लीचे समाज जीवन समृध्द झाले आहे. श्रीगणेश आणि श्रीदत्तात्रेय ही मराठीजनांची विशेष प्रिय दैवते. दिल्ली येथे मंदिर उभारून या दैवतांची प्रतिष्ठापना करावी असा दिल्ली मराठी मंडळींचा संकल्प होता. ईश्वरकृपेने हा सत्संकल्प पूर्णतः सिद्धीस गेला. आज दिल्ली येथील जनकपुरी भागात श्रीदत्त विनायक मंदिर निर्माण झाले असून श्रीगणेश आणि श्रीदत्तात्रेय सर्व भक्तजनांना अभय देत विराजमान आहेत.

या श्रीदत्तविनायक मंदिराच्या उभारणीत श्री. उ. र. कुर्लेकर यांचा फार मोठा सहभाग आहे. श्री. कुर्लेकर प. पू. श्रीगुळवणीमहाराजांचे अनुग्रहीत. प. पू.

श्रीदत्तमहाराजानाही ते प. पू. श्रीगुळवणीमहाराजांचे ठिकाणी मानतात. त्यांचा असा हा सार्थ गुरूभाव आहे.

दिल्लीतील रामकृष्णपूरम भागात १९७२ साली एक विठ्ठलमंदिर स्थापन झाले. दिल्लीतील महाराष्ट्रीय मंडळीची काहींना काही विधायक कार्ये त्या त्या भागात चालू असायची. गणेशोत्सव, चतुर्थी मंडळ इत्यादी बरोबर शैक्षणिक प्रकल्पही असायचे. चौगुले शिशुविहार, नूतन मराठी विद्यालय, मराठा मित्रमंडळ अश्या अनेक संस्थांच्या व्यवस्थापनाशी श्री. कुर्लेकर यांचा संबंध येत असे. भगवत्-गीतेवर त्यांची प्रवचनेही होत असत.

विठ्ठल हे महाराष्ट्राचे दैवत. त्याबरोबर गणपती व दत्त हीही दैवते तेवढीच प्रसिद्ध व भावभक्तीची. दिल्लीतील जनकपुरी विभागातील सर्व भक्तमंडळीनी श्रीदत्तविनायक मंदिर बांधण्याचा संकल्प केला. त्यावेळी श्री. कुर्लेकर त्याच विभागात राहण्यास आले होते. या मंदिरातील व्यवस्थापकीय मंडळीशी त्यांचे पहिल्यापासून घनिष्ट संबंध होते. त्यामुळे या मंदिराच्या उभारणीत, बांधकामात त्यांचा आपोआप सहभाग घडला. त्या मंदिराच्या उद्घाटनला राजकीय पुढारी न आणता संत महात्मे बोलवावेत ही त्यांची सूचना सर्वानाच पटली. ती पुरी करण्याची जबाबदारी त्यांचेवर आली. प. पू श्रीदत्तमहाराजांचे नांव त्यांनी सुचविले. त्यांच्या इतका योग्यपुरूष अन्य नाही याची खात्री सर्वांना पटली. प. पू. श्रीमहाराजानी त्याला मान्यता दिली. एक अप्रतिम योग गुरूकृपेने घडून आला.

श्री. उ. र. कुर्लेकर हल्ली श्री. वामननिवासात योगासनाचे वर्ग चालवितात. १९७३-७४ साली त्याची सुरवात याच भागात श्री. कुर्लेकरानी केली होती. श्रीविठ्ठलमंदिरात कांची कामकोटीपीठाचे शंकराचार्य श्री. जयेंद्र सरस्वतीस्वामी महाराज यांच्या सत्काराचे भाषणाची स्वामी महाराजांनी प्रशंसाही केली होती.

शुक्रवार दि. १३-३-८० रोजी श्रीदत्तमहाराज झेलम एक्स्प्रेसने पुण्याहून निघाले. श्रीमहाराजांच्या बरोबर वे. मू. श्री. जगन्नाथपंत पुजारी, वे. मू. श्री. सप्रे, वे. मू. श्री. नवाथे ही वैदिक मंडळी होती. वाटेत प. पू. श्रीदत्तमहाराज आणि श्री. जगन्नाथशास्त्री भोपाळ येथे उतरुन सौ. आशाताई भुसे यांच्या घरी जाऊन आले. भोपाळहून शनिवार दि. १५-३-८० रोजी नवी दिल्ली येथे सकाळी पोचले.

दिल्ली स्टेशनवर महाराजांच्या स्वागतासाठी बरीच मंडळी आली होती. त्यांत श्रीदत्तविनायक मंदिराचे अध्यक्ष श्री. जोशी, कार्यवाह दादा जोशी,सर्वश्री पेंडसे, कुर्लेकर, परांजपे इत्यादी मंडळींचा समावेश होता. न्यू दिल्ली स्टेशन पासून उतरण्याचे ठिकाण १५ किलो मीटर अंतरावर होते. उतरण्याची व्यवस्था उत्तम होती. विश्रांती व नित्यकर्म आटोपून श्रीमहाराज मंदिरात गेले.

श्रीदत्तविनायक प्रतिष्ठापना

शनिवार दि. १५-३-८० रोजी १ वाजून ३० मिनिटांनी प्रतिष्ठापनाचे कार्यास प्रारंभ झाला. यजमान श्री. कुलकर्णी यांच्याकडून सपत्नीक गणेशपूजनाला प्रारंभ करुन कूष्मांड होम, पुण्याहवाचन, मातृकापूजन, नांदीश्राद्ध, उदकशांत इत्यादी कार्यक्रम झाले. आरती, मंत्रपुष्प होऊन प्रारंभिक कार्यक्रम समाप्त झाला.

रविवार दि. १६-३-८० रोजी ब्रह्मादी मंडल देवता स्थापन, मुख्य देवता स्थापन, प्रासाद वास्तु-मंडल देवता, ग्रहमंडल स्थापना व अग्निस्थापना करून स्थापित देवतांचे हवन झाले.

चैत्र शु. १ शके १९०२ रौद्रनाम संवत्सर **सोमवार दि. १७-३-८०** या साडेतीन मुहूर्तांवर पाडव्याला श्रीगणेशदत्तमूर्तींच्या प्रतिष्ठापनाकार्यास आरंभ झाला. स्थापित देवतांचे पूजन, हवन, न्यास, इत्यादी कार्यक्रम आटोपून १०.३३ ला प. पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांच्या हस्ते संकल्पानुसार मूर्तींची स्थापना झाली. या स्थापना समारंभास इंदोरचे प. पू. श्रीनानामहाराज तराणेकर हेही उपस्थित होते. नंतर मूर्तींची प्राणप्रतिष्ठा, महापूजा, आरती, मंत्रपुष्प हे सर्व कार्यक्रम उत्कृष्ट झाले. हा सर्व कार्यक्रम ३ वाजता संपला. भोजन प्रसादाला ७००/८०० मंडळी उपस्थित होती. सायंकाळी ६ वाजता मंदिरात प. पू. श्रीनानामहाराज तराणेकर व प. पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वर या उभयतांचा मंदिराचे अध्यक्ष श्री. जोशी यांच्या हस्ते भव्य सत्कार झाला.

मंगळवार दि. १८-३-८० रोजी सकाळी ११ वाजता श्री. कुलकर्णी यांचेकडे भोजन घेऊन श्रीमहाराज लोकसभा पाहून आले. पासाची व्यवस्था श्री. कुर्लेकर यांनी केली होती. रात्रौ ८॥ ते ९॥ दत्तविनायक मंदिरात श्रीदत्तमहाराजांचे मूर्ति प्रतिष्ठापना या विषयावर प्रवचन झाले.

बुधवार दि. १९-३-१९८० रोजी श्री. जाखडी यांचे साउथ पटेल नगर मधील बिऱ्हाडी श्री दत्तमहाराजांनी आपल्या तीर्थरुप वडिलांचे श्राद्धकर्म पार पाडले. श्री. जाखडी हे श्री गुळवणी महाराजांचे अनुग्रहीत आहेत. त्या दिवशी विनायकी चतुर्थी असल्यामुळे जनकपुरीतील श्रीदत्तविनायक मंदिरात गणपत्यथर्वशीर्षांची आवर्तने झाली. संध्याकाळी श्रीदत्तमहाराजांनी दान देण्याचे महत्त्व व 'इदं न मम' म्हणण्यामागची भावना स्पष्ट करुन श्रीदत्तविनायकांच्या मूर्ती स्थापन करण्यासाठी ज्यांनी ज्यांनी श्रम, द्रव्य इत्यादींचे दान केले आहे त्यांनी आता उपासनेला महत्त्व देऊन मंदिराचे माहात्म्य वाढवावे असे सांगितले. त्यानंतर जनकपुरीतून रात्रौ ११ वाजता श्री. आजगावकर यांनी आपल्या गाडीतून श्रीदत्तमहाराज यांना आपल्या

लजपतनगर मधील बिऱ्हाडी मुक्कामास नेले. श्री. आजगावकर व श्री. जाखडी हेही श्रीगुळवणीमहाराजांचे अनुग्रहीत आहेत.

गुरुवार दि. २०-३-८०, सकाळी श्री. आजगावकर यांच्याकडे पाद्यपूजा व भोजन झाले. संध्याकाळी विष्णुस्तंभ (कुतुबमिनार) पाहण्यास ते श्री. आजगावकरांच्या गाडीतून गेले. परत येताना रामकृष्णपुरम् मधील श्री. वा. द. पुराणिक यांच्या घरी आरतीच्या कार्यक्रमास श्रीदत्तमहाराज हजर राहिले. आरती नंतर रात्री ८.३० च्या सुमारास श्रीदत्तमहाराज श्री. उ. र. कुर्लेकर यांच्याकडे किडवाईनगर येथे मुक्कामास आले.

शुक्रवार दि. २१-३-१९८० रोजी पहाटे सामुदायिक बैठकीचा कार्यक्रम झाला. श्री. उ. र. कुर्लेकर हे श्रीगुळवणीमहाराजांचे अनुग्रहीत असल्यामुळे श्रीदत्तमहाराजांच्या सान्निध्यात बसून ध्यान करण्याची त्यांची इच्छा श्रीदत्तमहाराजांनी पुरी केली. सकाळी ९ वाजता पाद्यपूजा झाली. श्री. कुर्लेकर यांच्या परिचितांपैकी सरकारी नोकरीतील भिन्नभाषीय व भिन्नप्रांतीय मंडळीनी श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनाचा लाभ घेतला. श्री. कुर्लेकर यांनी गुरुचरित्राबद्दल केलेल्या आपल्या लेखनाचा काही भाग श्रीदत्तमहाराजांना वाचून दाखविला. त्याबद्दल श्रीमहाराजांनी समाधान व्यक्त केले. दुपारी इलेक्ट्रीकल इंजिनियर श्री. गर्दे त्यांच्या आय. ए. एस. पत्नी व सासूबाई श्रीमती अभ्यंकर महाराजांच्या दर्शनास आल्या. अपघातामुळे श्री. गर्दे यांच्या पाठीच्या कण्यास दुखापत होऊन त्यांच्या पायातील शक्ती गेलेली आहे. तरी देखील चाकांच्या खुर्चींवर बसून सर्व व्यवहार ते करीत असतात. श्रीदत्तमहाराजांनी त्यांची हकीकत ऐकून घेऊन श्रीदत्तभावसुधारस स्तोत्राची श्री. कुर्लेकरांच्या संग्रही असलेली प्रत त्यांना आशीर्वादपूर्वक दिली.

श्री. हरीहर खंडेश्वर हे दिल्लीतले वैदिक ब्राम्हण. पूजेसाठी पुण्याकडील वैदिकांबरोबर त्यांनीही भाग घेतला होता. प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनाने त्याना फार आनंद झाला. श्रीमहाराजानी त्यांना जवळ बोलावून त्यांच्या याज्ञिकीचे कौतुक केले. त्याशिवाय एक करवतकाठी उपरणे व दक्षिणा देऊन त्यांचा सत्कार केला. आपल्या मनातील सुप्त इच्छा श्रीमहाराजांच्या लक्षात आल्यावर त्यांच्या अलौकिकत्वाची साक्ष पटून ते नतमस्तक झाले.

बिर्ला मंदिर व जगन्नाथ मंदिर

दुपारी श्रीदत्तमहाराज दिल्लीतील सुप्रसिद्ध बिर्लामंदिर पाहण्यास गेले. श्री. बिर्ला यांच्या आप्तांपैकी श्री. बियाणी यांनी महाराजांसाठी आपली गाडी पाठविली होती. मंदिरामध्ये त्यांच्या स्वागताची व्यवस्था उत्तम प्रकारे केली होती. मंदिराचे

व्यवस्थापक श्री. ओझा यांनी महाराजांबरोबर समक्ष येऊन सर्व मंदिरे, गीतामंदिर, आरसेमहाल वगैरे दाखविले. विशेष अतिथी कक्षात प. पू. श्रीमहाराजाना नेऊन गीतेच्या इंग्रजी भाषांतराची प्रत भेट म्हणून दिली. मंदिराची दैनंदिन कारभाराची व्यवस्था कशीकशी चालते त्याची माहिती सांगितली. अतिथी-अभिप्राय-पुस्तकामध्ये महाराजांनी आपला अभिप्राय संस्कृत भाषेत लिहून ठेवला व समाधान व्यक्त केले.

संध्याकाळी प. पू. श्रीदत्तमहाराज, डॉ. ना. कृ. भिडे यांच्या ऑल इंडिया इन्स्टीट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेसमधील घरी आले. डॉ. भिडे हे पुण्याचेच असून पाश्चात्य वैद्यकशास्त्र व आयुर्वेद या दोन्हीत पारंगत असलेले, आधुनिक चिकित्सक पद्धतीने विचार करणारे शास्त्रज्ञ आहेत. एवढे असूनही श्रीगोंदवलेकर महाराजांच्या कृपेने नेहमी नामस्मरण करीत असतात. त्यांच्या पत्नी, दोन्ही कन्या व मुलगा ही सर्व मंडळी सुविद्य असून सत्पुरुषांच्या संगतीची व सेवेची त्यांना फार आवड आहे. डॉ. भिडे यांचे मित्र व इन्स्टीट्यूटमध्येच काम करीत असलेले डॉ. महापात्र यांच्या विनंतीवरुन त्यांच्याच गाडीतून सर्व मंडळी 'हौस खास' या वसाहतीमध्ये ओरिसा प्रांतातील भाविक मंडळींनी बांधलेले जगन्नाथ मंदिर पाहाण्यास गेली. जगन्नाथपुरी येथील जगन्नाथ मंदिराची दिल्ली येथे घडवलेली प्रतिकृती पाहून सर्वांनाच फार आनंद व कौतुक वाटले. मंदिरासाठी मिळालेल्या खोलगट जागेचा उपयोग तळघराप्रमाणे करुन तेथे विस्तृत सभागृह, कार्यालय, स्वयंपाकघर व अतिथींना राहण्यासाठी सुमारे १४ खोल्या या सर्वांवर वरच्या मजल्यावर पण जमिनीच्या पातळीवर असलेले विस्तृत जगन्नाथमंदिर हे रचनाकौशल्य पाहून सर्वांनाच आश्चर्य व समाधान वाटले. मंदिरामध्ये जगन्नाथपुरीच्या परंपरेप्रमाणे श्रीजगन्नाथाची आरती झाली. मंदिराच्या कार्यकारिणीच्या सदस्यांनी महाराजांचे दर्शन घेऊन मंदिरातर्फे प्रकाशित केलेल्या स्मरणिकेची एक प्रत त्यांना भेट म्हणून दिली.

डॉ. भिडे यांच्याकडे परतल्यावर श्री राघवदास जोशी, डॉ. महापात्र, श्री. मुकुंद नाईक, सौ. पाटणकर, श्री. कुर्लेकर व श्री. भिडेकुटुंबातील मंडळी यांनी श्रीमहाराजांजवळ बसून प्रश्नोत्तरे व चर्चा केली. नामस्मरण करताना एकाग्रता कशी साधावी असा प्रश्न डॉ. महापात्र यांनी विचारला. तेव्हा जपाचे शब्द, अक्षरे व अर्थ यावर मन एकाग्र करुन मन स्थिर होण्यास ईश्वराची प्रार्थना करावी असे श्रीमहाराजांनी सांगितले. श्री. कुर्लेकर यांनी श्रीवासुदेवानंदसरस्वती महाराजांचे 'मम चित्तं स्थिरं कुरु' अशी प्रार्थना असलेले दत्तात्रेयस्तोत्र म्हणून दाखविले. त्यानंतर सौ. पाटणकर यांनी त्या करीत असलेल्या भागवत वाचनाची माहिती सांगितली. सौ. नाईक यांनी एक भक्तिगीत म्हटले. श्रीमहाराज वस्तीला डॉ. भिड्यांकडेच राहोले.

रामशरण

शनिवार दि. २२-३-८० रोजी सकाळीच ६.३० वाजता डॉ. भिडे यांनी श्रीमहाराजांना लजपतनगर येथील 'रामशरण' नावाच्या जागी भजनाच्या कार्यक्रमासाठी नेले. ही संस्था श्रीसत्यानंदस्वामी नावाच्या साक्षात्कारी पुरूषांनी स्थापन केली असून त्यांत रामनामस्मरणाची शिकवण दिली जाते. या संस्थेचे प्रमुख श्री. सेठीमहाराज हेही अधिकारी पुरुष असून रात्री झोप देखील न घेता अखंड नामस्मरण करीत असतात. 'रामशरण' ची इमारत विस्तृत व प्रशस्त असून तेथे शिस्त, वक्तशीरपणा, शांतता व स्वच्छता डोळ्यांत भरण्यासारखी आहेत. तेथे नामस्मरण व भजन करणारी बरीच मंडळी नित्य येतात. पंजाबी लोकांची संख्या विशेषत्वाने असते. श्री. सेठीमहाराजांनी श्रीदत्तमहाराजांचे स्वागत अत्यंत आदराने करुन त्यांना प्रमुखस्थानी बसविले. एक तासभर नामस्मरणाचे महत्त्व वर्णन करणारे हिंदी भाषेतील दोहे व चौपाया यांचे गायन तेथील भक्तमंडळींनी केले. एकंदर कार्यक्रम श्रीदत्तमहाराजांना फारच आवडला. श्रीसेठीमहाराजांनी भजनानंतर श्रीदत्तमहाराजांना आपल्या स्वतःच्या आतल्या खोलीत नेऊन आपण आल्याने आम्हास धन्यता वाटली असे उद्‌गार काढले. श्रीदत्तमहाराजांनीदेखील त्यांची प्रशंसा करुन 'हे ठिकाण म्हणजे आनंदभुवन आहे' असा अभिप्राय व्यक्त केला. श्री. सेठीमहाराज यांच्या वाणीवरील संयमाची प्रशंसा केली.

'रामशरण' मधून परत येताना श्रीदत्तमहाराज श्री. गुरुदास आत्माराम भटकळ यांच्या साऊथ एक्स्टेन्शन मधील घरी थोडा वेळ थांबले. त्याठिकाणी डॉ. व सौ. शेटे व जनकपुरीच्या श्रीदत्तविनायक मंदिराचे आर्किटेक्ट श्री. माधव नाईक व इतर मंडळी श्रीमहाराजांच्या दर्शनास आली. श्री. भटकळ यांनी आपण करीत असलेल्या नामस्मरणाची माहिती सांगितली. श्रीदत्तमहाराजांनी आशीर्वादपूर्वक जपाची माळ त्यांना देऊन नामस्मरण चालू ठेवण्याचा उपदेश केला.

डॉ. भिडे यांचे घरी परतल्यावर डॉ. महाजन यांनी श्रीसत्यानंदस्वामींनी लिहिलेले पत्र 'उपनिषदभाष्य' हे पुस्तक व जप करण्याच्या लोकरीच्या माळा महाराजांना अर्पण केल्या. भोजनोत्तर दुपारी साडेतीनच्या सुमारास ऑल इंडिया इन्स्टीट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस मधील एम. डी. चे काही विद्यार्थी श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनास आले. त्यांनी मानसशास्त्र, योग व कुंडलिनीशक्ती यांचेबद्दल काही प्रश्न विचारले. डॉ. भिडे हे इन्स्टीट्यूटमधील विद्यार्थ्यांचे प्रश्न व श्रीदत्तमहाराजांनी दिलेली उत्तरे यांचे मराठी-इंग्रजी भाषांतर करण्याचे काम करीत होते. त्यावेळी अनेक परिचित मंडळीनी श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनाचा लाभ घेतला. सुमारे पाऊणतास हा कार्यक्रम चालला.

श्रीशंकर मंदिर, स्वामी मलाई मंदिर, श्रीविनायक मंदिर

संध्याकाळी श्री. भटकळ यांचे गाडीतून श्रीमहाराज सरोजिनीनगर येथील श्रीविनायकमंदिर, रामकृष्णपुरम् येथील स्वामी मलाई मंदिर व वसंत विहार येथील श्री शंकर मंदिर पाहण्यास गेले. तिन्ही मंदिरे दिल्लीत राहणाऱ्या दाक्षिणात्य मंडळींनी फारच उत्तमरीतीने चालविली असून तेथील उपासना व नित्य नैमित्तिक पूजा-अर्चा यांचा दर्शनास येणाऱ्या व्यक्तीवर प्रभाव पडल्याशिवाय राहात नाही. येथील आचार व्यवहारांची शुद्धता पाहून जाणकारांना देखील आनंद होतो. या सर्व मंदिरांच्या कार्यकारिणीशी संबंधित असलेले श्री. सुंदरेश पंत हे स्वतः श्रीमहाराजांबरोबर मुद्दाम होते. श्री. सुंदरेश पंत हे तंजावर प्रांतात स्थायिक झालेल्या महाराष्ट्रीय लोकांपैकी असून तामीळ व मराठी दोन्ही भाषा उत्तम बोलतात. ते स्वतः आचारसंपन्न असून महाराष्ट्रीय संतांबद्दल व श्रीगुरुचरित्र, दासबोध इत्यादी धर्मग्रंथांबद्दल त्यांना फार आस्था आहे. त्यांनी व्यवस्था केल्याप्रमाणे या सर्व मंदिरामध्ये व्यवस्थापकानी श्रीदत्तमहाराजाचे वेदमंत्रपूर्वक यथोचित स्वागत केले. पुष्पमाला, श्रीफल, प्रसाद त्यांना अर्पण केले व मंदिरांची माहिती सांगितली. स्वामी मलाई मंदिर हे कार्तिक स्वामीचे मंदिर असून त्याची स्थापना १९७२ साली कांची कामकोटीपीठाचे शंकराचार्य श्रीजयेन्द्रसरस्वती यांच्या हस्ते झालेली आहे. दाक्षिणात्य परंपरेप्रमाणे हे मंदिर टेकडीवर असून दक्षिणेकडील कारागीर व साहित्य तेथून आणवून तिकडील पद्धतीचे केलेले स्थापत्य व कोरीव काम फारच मनोहर आहे. पायथ्याशी एक गणेश मंदिर आहे. त्याचप्रमाणे वसंतविहारमधील श्रीशंकरमंदिराची स्थापना शृंगेरीपीठाचे शंकराचार्य श्रीअभिनवतीर्थ महाराजांचे हस्ते १९७७ साली करण्यात आलेली आहे. या मंदिराचे मध्यभागी शिवलिंग असून एका बाजूस शारदामाता व दुसऱ्या बाजूस आद्य शंकराचार्य यांच्या मूर्ती आहेत. तेथे श्री शंकरविद्याकेंद्र ही संस्थाही कार्य करीत आहे. मंदिराचे व्यवस्थापक श्रीशंकरन् यांनी श्रीदत्तमहाराजांचे स्वागत केले. त्यादिवशी शृंगेरीचे शंकराचार्य श्री अभिनवतीर्थ यांची जयंति असल्यामुळे मंदिरात सकाळी महारुद्राभिषेक झाला होता. संध्याकाळची आरती झाल्यावर श्रीदत्तमहाराजांनी ''गुरुमहिमा'' या विषयावर प्रासादिक संस्कृत भाषेत सुमारे अर्धा तासपर्यंत प्रवचन केले. सर्व मंडळीस फारच आवडले. संरक्षण मंत्रालयांत अधिकारी असलेल्या विद्वान सज्जनांनी संस्कृत व इंग्रजी भाषेत समारोप करून श्रीमहाराजांची प्रशंसा केली. एकंदर सर्वच कार्यक्रम ऐनवेळी घडून येऊनही सुंदर झाला.

रात्री डॉ. भिडे यांच्या घरी पाद्यपूजा व भोजन झाले. त्यावेळी रात्री पंडित रामचंद्र मोघे यांचे शास्त्रीय गायन झाले. पंडितजी ग्वाल्हेर घराण्याच्या गायकीचे चांगले जाणकार असून गेल्या पिढीतील ग्वाल्हेरचे प्रसिद्ध गवई श्री. राजाभैय्या यांचे शिष्य आहेत. त्यांच्याजवळ आस्तिक्यबुद्धि व श्रद्धाही चांगली आहे. त्यांचे गायन श्रीदत्तमहाराजांना फारच आवडले.

रविवारी दि. २३-३-८० रोजी सकाळी ९ वाजता महाराज देऊळगांवराजाच्या मंडळीबरोबर जयपूरला गेले. देऊळगांवराजा हे श्रीदत्तमहाराजांच्या वडिलांचे श्रीधुंडिराजमहाराजांचे वास्तव्यस्थान. तेही सत्पुरुष म्हणून प्रसिद्ध होते. नुकतेच ९३ वर्षाचे होऊन स्वर्गवासी झाले. त्याठिकाणी त्यांची समाधी व श्रीदत्तमूर्ती स्थापन करण्याचा तेथील मंडळींचा विचार होता. तेथे स्थापन करावयाच्या मूर्तीबद्दल मूर्तिकारांना सूचना श्रीदत्तमहाराजांनी समक्ष द्याव्यात असा देऊळगांवराजाच्या श्री. जगनशेठ वगैरे मंडळीचा आग्रह म्हणून महाराज जयपूरला गेले. त्याचदिवशी रात्रौ साडेबारा वाजता दिल्लीस परत आले.

ह्या अवचित ठरलेल्या कार्यक्रमाविषयी श्री. कुर्लेकर, डॉ. भिडे वगैरे मंडळींनी नाराजी व्यक्त केली होती. मुख्य कारण म्हणजे प. पू. श्रीदत्तमहाराजाना होणारी प्रवासाची दगदग हे होते. श्रीमहाराज रामनवमीला वेळेवर उपस्थित राहतील की नाही याची काळजीही वाटत होती. श्रीमहाराजाना यायला उशीर झाला होता. त्यामुळे आल्या आल्याच हसत म्हणाले की, 'तुमच्या संकल्पाप्रमाणे आम्ही रामनवमीला उपस्थित झालो' सर्वांना सांभाळण्याची अशी धडपड श्रीमहाराजच करू जाणे!

सोमवार दि. २४-३-८० म्हणजे रामनवमीचा दिवस. यादिवशी सकाळी श्रीमहाराजानी अनेक भक्तमंडळीना व श्री. कुर्लेकर कुटुंबातील सर्व मंडळीस श्रीमहाराजांनी नामदीक्षा दिली. तसेच श्रीकुर्लेकरांच्या मुलास चि. संजयला शक्तीपात दीक्षा दिली. त्याचवेळी इलेक्ट्रॉनिक्स खात्यात फायनान्स डायरेक्टरच्या हुद्यावर असलेले श्री. भगवान गोविंद जोशी आपली पत्नी व मुलगा चि. नचिकेत यांना घेऊन श्रीमहाराजांच्या दर्शनास आले. गेल्या पिढीतील पुण्यातील सुप्रसिद्ध विद्वान समाजशास्त्रज्ञ श्री. गो. म. जोशी यांचे ते चिरंजीव असून विद्वता व व्यासंग यांच्या जोडीला आस्तिक्यबुद्धी व सत्पुरुषांबद्दल आदरभाव त्यांच्याजवळ चांगला आहे. श्रीमहाराजांनी त्यांच्या वडिलांची आठवण देऊन त्यांना व त्यांच्या कुटुंबियांना आशीर्वाद दिले.

श्री. जोशी यांच्या गाडीतून श्रीमहाराज व इतर मंडळी जनकपुरीतील श्रीदत्तविनायक मंदिरात गेली. तेथे श्रीदत्तमहाराजांचे प्रवचन होऊन रामजन्माचा उत्सव फारच मोठ्या आनंदाने साजरा झाला. श्रीदत्तविनायक मंदिराचे अध्यक्ष श्री. जोशी यांचे घरी रामनवमीचा फराळ करुन दुपारी २.३० च्या सुमारास महाराज डॉ. भिड्यांच्या बिऱ्हाडी परतले. वाटेत श्री. राघवदास जोशी (रामदासीबुवा) यांच्या विनंतीवरुन श्रीमहाराज श्री. पाटणकर व कुमारी गोविलकर यांच्या बिऱ्हाडीही उभ्याउभा जाऊन आले. बडोदा येथे राहणारे श्री. भगवानलाल हे गुजराथी गृहस्थ सपत्नीक महाराजांच्या दर्शनास आले. त्यांनी दत्तबावनी हे श्रीरंगावधूतमहाराज रचित प्रासादिक स्तोत्र म्हणून दाखविले. श्रीरंगावधूतमहाराजांच्या प्रयत्नाने गुजराथमध्ये सुद्धा

दत्तभक्तीचा उदंड प्रसार झाला असून त्यांच्या अनुग्रहीत चाहत्या लोकांनी दत्तोपासना चालू ठेवली आहे.

थोडी विश्रांती घेऊन पाच वाजता श्री. सुंदरेश पंत यांच्या मोतीबाग येथील घरी श्रीमहाराज गेले. श्री. पंत व घरांतील सर्व मंडळीनी श्रीमहाराजांचे अत्यंत आदराने स्वागत केले. श्रीमहाराजांना फळे, सुकामेवा, कॉफी असा उपहार व एक धोतरजोडी त्यांनी अर्पण केली. तंजावरसारख्या दूरच्या प्रांतात राहून सुद्धा मराठी भाषा व धार्मिक आचारांची परंपरा कशी शुद्ध राखली हे पंतांनी थोडक्यात दाखवून दिले. आपल्या संग्रही असलेली श्रीगुरुचरित्र वगैरे धार्मिक पुस्तके, कांचीकामकोटीपीठाचे दोन्ही शंकराचार्य श्रीचंद्रशेखर सरस्वती व श्रीजयेन्द्रसरस्वती व प. प. श्रीटेंबेस्वामीमहाराज यांची चित्रे त्यांनी श्रीमहाराजांना दाखविली. सुमारे अर्धातास श्रीदत्तमहाराजांनी 'अविनयमपनय विष्णो' यापट्पदीमधील श्लोकाच्या आधारे मन परमार्थाकडे कसे लावावे याचे निरुपण केले. तेथून श्रीदत्तमहाराज श्रीजाखडी यांच्या साऊथ पटेल नगरमधील बिऱ्हाडी मुक्कामास गेले.

मंगळवार दि. २५-५-८० रोजी सकाळी भोजन आटपून पुण्यास जाण्यासाठी श्रीदत्तमहाराज व श्री. जगन्नाथशास्त्री नवी दिल्ली स्टेशनावर आले. तेथे त्यांना निरोप देण्यासाठी सर्व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाराजांना पुष्पहार घालून सर्वांनी वंदन केले. मोठ्या प्रेमाने त्यांना निरोप दिला. श्रीमहाराज व श्री. जगन्नाथशास्त्री आरक्षित डब्यात बसले होते. बाजूला परप्रांतीय, परधर्मांची मंडळी बसली होती. आपल्या डब्यात कुणी सत्पुरुष प्रवास करीत आहे हे जाणून श्री महाराजांना विनम्रपणे नमस्कार केला. आपल्या गुरुंची आम्ही काळजी घेऊ असेही सांगितले. श्री महाराज कसे स्वयंभू आहेत त्याची प्रचिती आली.

दिल्ली येथिल प. पू. श्रीदत्तमहाराजांचा भागवत सप्ताह

जून १९८२ मधे प. पू. श्रीदत्तमहाराज भागवत सप्ताहासाठी दिल्लीला आले. मार्च १९८० मधे श्रीमहाराज श्रीदत्त विनायक प्रतिष्ठापनेसाठी येऊन ८।१० दिवस राहिल्यामुळे सर्वांच्या परीचयाचे झाले होते. ह्या दोन वर्षांच्या कालखंडात दिल्ली येथे अनेक उपक्रम सुरू झाले होते. त्यात श्रीवामन पाठशाळा सुरू झाली. श्रीहरीहर खंडेश्वर या वैदीक ब्राह्मणाचा त्यात मोठा पुढाकार होता. पोथीवरून सौर व पवमान म्हणण्यास काही मंडळी शिकली.

श्री. उ. र. कुर्लेकरांकडे प्रतिवर्षी दोन उत्सव होत असत. आषाढ महिन्यात प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वतीमहाराजांची पुण्यतिथी. पौष महिन्यात प. पू. श्रीवामनरावजी गुळवणीमहाराजांची पुण्यतिथी. कुणी बाहेरचा वक्ता न मिळाल्यास ते

स्वतः प्रवचन करून प. प. श्रीटेंबेस्वामी महाराज, प. पू. श्रीगुळवणीमहाराज, प. पू. श्रीदत्तमहाराज व एकंदरीत श्रीदत्तसंप्रदायातील थोर विभूतींची माहिती देत असत. दिल्लीतील महाराष्ट्रीय व इतर प्रांतीय सश्रद्ध लोकाना व प्रवचनासाठी बोलाविलेल्या व्यक्तीना आपल्या गुरूजनांबद्दल, संप्रदायाबद्दल माहिती व्हावी हा मुख्य हेतु असे. ह्या सर्व कार्यक्रमाचे सविस्तर वृत्त प. पू. श्रीदत्तमहाराजाकडे पाठवीत असत. श्रीमहाराजही संतोष व्यक्त करीत असत.

प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या प्रेरणेने प. प. श्रीटेंबेस्वामींच्या पुण्यतिथीच्या वेळी १९८१ साली सर्व भक्तमंडळींना चातुर्मासानिमित्त काही ना कांही नियम करा त्यायोगे श्रीगुरूमहाराजांच्या दिल्ली भेटीचा योग जुळून येईल असे सांगितले. या कल्पनेला चांगला प्रतिसाद मिळाला. अनेक भक्तमंडळीनी श्रीदासबोध, श्रीगुरूचरित्र, नामजप इत्यादी साधना केली. दिल्लीमध्ये श्री. डोंगरेमहाराज नेहमी येत असत. त्यांचा हिंदी भागवत सप्ताह प्रसिद्ध आहे. मराठीत भागवत सप्ताह श्रीदत्तमहाराजानी करावा असा दिल्लीकरांचा आग्रह श्रीमहाराजांनी मान्य केला. **बुधवार दि. २३-६-१९८२** रोजी मुंबईहून राजधानी एक्सप्रेसने श्रीदत्तमहाराज व श्री. रघुनाथराव कुळकर्णी निघाले. दि. २४-६-१९८२ ला दिल्लीस सकाळी आले.

शुक्रवार दि. २५-६-१९८२ ला श्री भागवत सप्ताहास प्रारंभ झाला. गुरुवार दि. १-७-१९८२ ला आषाढी एकादशीस सप्ताहाची समाप्ती झाली. शुक्रवार दि. २-७-१९८२ ला महाप्रसाद झाला. शनिवार दि. ३-७-१९८२ ला श्रीमहाराज झेलम एक्सप्रेसने पुण्यास रवाना झाले.

सकाळी संहिता वाचन रायपूरचे वैदिक ब्राह्मण श्री. मुकंद कृष्ण जोशी यानी केले. श्री. मुकुंदशास्त्री यानी काशीक्षेत्रात श्री. विनायक दीक्षित जोशी यांच्या ऋग्वेदी वेदपाठशाळेत २० वर्षे राहून वैदिक अध्ययन पूर्ण केलेले. त्याशिवाय संस्कृत विषय घेऊन एम. ए. पदवी संपादन केलेली. संगीत विषयातही एम. ए. केलेले असून रायपूरला संगीत महाविद्यालय स्थापन केलेले. प्रसिद्ध व्हायोलिनवादक पं. गजानन जोशी यांचे ते धाकटे बंधू असे बहुगुणसंपन्न विद्वान ब्राह्मण संहिता पाठासाठी आणि श्रीदत्तमहाराजांसारखी लोकोत्तर विभूती निरूपणासाठी असा अपूर्व भागवतसप्ताह मराठी भाषेत दिल्लीत घडून आला.

सकाळी ७ ते ११-३० पर्यंत संहिता पाठ चालत असे. प. पू. श्रीदत्तमहाराजांचे निरूपण संध्या ६ ते ९ असे होई. खूप दूर दूरवरून मंडळी निरूपणास येत. श्रीदत्तमहाराज निरूपणाची वेळ कटाक्षाने पाळत. लोक लांबून येतात त्याना वेळेवर घरी पोचता यावे यासाठी श्रीमहाराजच दक्ष असत. निरूपणाचा विषय निर्धारीत वेळेत संपविण्याची विलक्षण हातोटी त्यांचेपाशी होती. एका भावसमाधीत

त्यांचे निरूपण होई. भाषा प्रवाही, ओघवती, सुसंस्कृत. सुश्लिष्ट आणि श्रोत्यांना विषय समाजावा ही आत्यंतिक तळमळ असल्यामुळे श्रोते मंत्रमुग्ध होऊन जात.

जून-जुलै हे दिल्लीतले कडक उन्हाळ्याचे दिवस. दुपारी भोजनासाठी खूप आमंत्रणे असत. श्रीमहाराज जिथे सोवळ्याने सैपाक होत असेल अशया ठिकाणी जात असत. खबरदारी घेऊनही कुठेतरी काही घोटाळा झाला तर क्षमाशील अंतःकरणाने श्रीमहाराज सांभाळून घेत असत.

ह्यावेळच्या दिल्ली वास्तव्यात श्रीमहाराजानी श्री. जगदीश ऋषी यांच्या कारखान्याला भेट दिली. श्री ऋषी हे पंजाबी सधन गृहस्थ. आध्यात्मिक विषयांची आवड. ह्या क्षेत्रात कांही करावे म्हणून विश्व अध्यात्म समाज नावांची संस्था त्यानी स्थापन केली. विश्वात्मा नावाचे हिन्दी मासिक ही चालवितात. श्रीमहाराजांचा परीचय झाल्यावर त्यांच्या मनात कमालीचा आदर उत्पन्न झाला. श्रीदत्तसांप्रदायाची माहिती ऐकूनही प्रभावित झाले. वेळोवेळी अनेक लेख हिंदीत रूपांतर करून त्यांनी त्यांच्या विश्वात्मा मासिकात प्रसिद्ध केले.

श्री जगदीश ऋषींकडे प. पू. श्रीदत्तमहाराजानी हिन्दीत भाषण करून सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला. श्रीमहाराज हिंदी भाषिक नाहीत असे सांगूनही कोणाला खरे वाटले नसते.

श्रीभागवत सप्ताहातील सुरवातीला मुरलीधर कृष्णाची पितळेची मूर्ती विधीपूर्वक मांडली होती. भागवत समाप्तीनंतर ती मूर्ती कोठे ठेवायची असा प्रश्न निर्माण झाला. श्री. कुर्लेकर नियमाने पूजा करणारे आहेत त्यांच्याकडेच ही मूर्ती ठेवावी असा निर्णय श्रीमहाराजांनी केला. आजही ती मूर्ती श्री. कुर्लेकरांच्या नित्य पूजेत आहे.

भागवत समाप्तीनंतर होमहवन केले नव्हते. पण श्रीकृष्णमूर्तीवर पोथीवरून पाच ब्राह्मणानी पवमान अभिषेक केला. त्याचा श्रीमहाराजाना आनंद वाटला. राजधानीत सुद्धा पवमान अभिषेक होऊ शकतो हे तुम्ही दाखवून दिलेत म्हणून कौतुक केले. श्री. कुर्लेकर यांचे अंगावर शाल पांघरली 'भगवंत आणि भागवतभक्त यांच्यात कांही फरक नाही' असेही प्रेमाने म्हणाले. श्री. कुर्लेकराना परम संतोष झाला.

श्री. कुर्लेकरांमुळे श्रीभागवत सप्ताहाचा हा योग जुळुन आला. प. पू. श्रीदत्तमहाराज ३।४ दिवस श्री. कुर्लेकरांकडे राहीले. नंतरचे ३।४ दिवस डॉ. भिड्यांकडे गहिले. तरीही दुपारी भोजनास निमंत्रणावरून ठिकठिकाणी जावे लागत असे. त्यामुळे श्रीमहाराजांचे सहवासाची संधी घेण्याचा प्रयत्न ते व घरातील सर्व मंडळी करत असत. श्री. कुर्लेकर सांगतात की सकाळी श्रीमहाराज उठल्याबरोबर श्रीनित्यउपासना क्रमातील 'उठी उठी श्रीगजानना' इत्यादी प्रातःस्मरणाच्या सर्व ओव्या

व पदे श्री. कुर्लेकर म्हणत असत. श्रीमहाराजानाही ती आवडत. मग चहा व्हायचा. वृत्तपत्र येई. त्यातील मथळे व विशेष बातम्या श्रीमहाराज पहात असत. आज कोणाकडे जायचे आहे याची माहीत घेत. तेवढ्यात दूधवाला येई. श्रीमहाराजाना ताज्या दुधाचा चहा घेण्यासाठी विनंती करीत असू. आमच्या समाधानासाठी श्रीमहाराज घोटभर चहा घेत असत. श्रीमहाराज गंमतीने म्हणायचे, ''ताजे दूध आल्यावर मगच चहा का करीत नाहीं?''

प. पू. श्रीदत्तमहाराज स्वतः स्वावलंबी, भिडस्त, संकोची स्वभावाचे. स्नानाला गेले तर येताना आपले धोतर, उपरणे तेव्हाच पिळून आणत. श्री. कुर्लेकर सांगतात की माझा मुलगा कु. संजय याने ही सेवा श्रीमहाराजांकडून मागून घेतली. श्रीमहाराज पुढे डॉ. भिड्यांकडे वास्तव्याला होते तर तिथे जाऊन तो ही सेवा करीत असे.

प. पू.श्रीदत्तमहाराजांचे अनेक ठिकाणी भागवत सप्ताह झालेले आहेत. प्रत्येक ठिकाणी काहीना काही वैशिष्ट्यपूर्ण अनुभूती मिळाली आहे. सगळेच भागवतसप्ताह देता येणे शक्य झाले नाही. म्हणून काही प्रातिनिधिक स्वरूपाच्या भागवत सप्ताहाची यथामती हकीगत प्रसंगोपात दिली आहे.



श्रीदत्तविनायक प्रतिष्ठापना



दिल्ली येथील एका समारंभात

ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा सहस्त्रचंद्रदर्शन शांती महोत्सव

दि. ११ मे १९९० ते १८ मे १९९०

शास्त्रमूर्ते नमस्तुभ्यं शांतचित्ताय श्रीमते
स्यातस्वस्थं दीर्घयायुस्ते दत्तराजः प्रसीदतु



नम्र निवेदन

श्री गुरुःशरणम

सर्वश्रुतिशिरोरत्नविराजित पदांबुज
वेदान्ताम्बुजसूर्योयस्त्स्मै श्रीगुरवे नमः

सप्रेम नमस्कार

परम पूजनीय योगिराज श्री. गुळवणी महाराजांचे उत्तराधिकारी श्रीवासुदेव निवास आश्रमाचे अधिष्ठाते तपःपूत धर्मजीवन व्यक्त करणारे आणि विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील धर्मप्राण, श्रेष्ठ तपस्वी, ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर यांना माघ वद्य ६, शके १९११ म्हणजेच १५ फेब्रुवारी १९९० रोजी ८० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त श्रीवासुदेव निवासचे विश्वस्तांनी आणि समस्त शिष्य व भक्तमंडळींनी महाराजांचा सहस्रचंद्रदर्शनशांतिमहोत्सव करण्याचा संकल्प केला आहे. या सत्यसंकल्पात समाजातील सर्व घटकांनी आणि लहान थोरांनी सक्रीय सहभाग घ्यावा असे गौरव समिती सर्वांना या निवेदनाद्वारे नम्र आवाहन करीत आहे.

श्रीक्षेत्र नृसिंहवाडी येथील श्रीगणेशोपासक आणि श्रीदत्तोपासक असे विख्यात कवीश्वर घराणे, त्यातच निर्माण झालेले अधिकारी महापुरुष प. पू. महाराजांचे पिताश्री प. पू. श्रीधुंडिराज महाराज, पितामह प. पू. श्रीवक्रतुंड महाराज व प्रपितामह प. पू. श्रीभालचंद्र महाराज यांनी हे कुल धन्य झाले आहे. असे हे पवित्र आणि सात्त्विक कुल. त्यातच प. पू. श्रीमहाराजांच्या मातोश्रींनी प. पू. सौभाग्य संपन्न सरस्वतीबाईंनी श्रीक्षेत्र नृसिंहवाडी येथे केलेली खडतर तपश्चर्या आणि पिताश्री प. पू. श्रीधुंडिराज महाराजांनी केलेली अनेक व्रतानुष्ठाने यांचे फल म्हणूनच जणू काही माघ वद्य ६ शके, १८३१ रोजी या अलौकिक पुत्ररत्नाचा जन्म झाला.

अशा सात्त्विक पवित्र घराण्यात प. पू. श्रीमहाराजांचा झालेला जन्म, बालपणापासून श्री गणेशाची व श्री दत्तात्रेयांची केलेली उपासना आणि श्री. प. प. नृसिंहसरस्वती दीक्षितस्वामीमहाराज यांच्या कृपेचा लाभलेला वरदहस्त यामुळे प. पू. श्रीमहाराज दैवी तेजाने संपन्न आहे.

प. पू. श्रीमहाराजांची विद्वता, न्याय व वेदांत शास्त्राचे सखोल अध्ययन, श्रीज्ञानेश्वरी, दासबोध आणि गाथा या प्राकृत ग्रंथांचा गाढा अभ्यास, सधर्माचरण व भागवताचा असामान्य व्यासंग यामुळे पहिले राष्ट्रपती डॉ. बाबू राजेंद्रप्रसाद यांनी प. पू. श्रीमहाराजांना 'विद्यावाचस्पति' ही मानाची पदवी देऊन गौरविले. राष्ट्रपती श्री. गिरी यांनीही महाराजांचा 'राष्ट्रीय' पंडित म्हणून बहुमान केला व मानधन सुरु केले. श्रीमत् आद्य शंकराचार्यांच्या ग्रंथांचे सम्यक जाणकार म्हणून प. पू. श्रीमहाराजांचा चारही पीठांच्या श्रीशंकराचार्यांनी महावस्त्र व सन्मानपत्र देऊन गौरव केला. कांचीकामकोटी पीठाधीश्वरांनी विशेष गौरव करून सुवर्ण कंकण प्रदान केले.

पुण्यामधील श्रीदेवदेवेश्वर संस्थान पर्वती, या सुप्रतिष्ठित संस्थेने श्री महाराजांचा 'श्रीमंत नानासाहेब पेशवे धार्मिक व आध्यात्मिक पुरस्कार' देऊन बहुमान केला. महाराष्ट्र शासनाने 'आदर्श अध्यापक' म्हणून सन्मान केला. पुण्यामधील अनेक मान्यवर संस्थांनी महाराजांचा गौरव केलेला आहे. हे सारे गौरव म्हणजे प. पू. श्रीमहाराजांच्या भगवत्अंशाचा प्रत्ययच होय.

सन् १९५४ मध्ये हैद्राबाद येथील भाग्यनगरमध्ये प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वतीस्वामी महाराजांचा जन्मशताब्दी महोत्सव प. पू. श्रीगुळवणी महाराजांनी मोठ्या प्रमाणात साजरा केला. त्यावेळी श्रीस्वामीमहाराजांचे समग्र वाङ्मय बारा खंडात प्रकाशित करून श्रीस्वामीचरणी समर्पित केले. या वाङ्मयाचे संशोधन, संपादन, मुद्रित शोधन आणि प्रत्यक्ष प्रकाशन ही सारी कामे श्रीदत्तमहाराजांनी ८-९ वर्षे अतीव निरलसपणे व अत्यंत साक्षेपाने केली. विद्यापीठातील प्रज्ञावंत अधिष्ठात्याला शोभेल असे हे काम होते.

वेद, शास्त्र, उपनिषदे, न्याय, वेदांत, धर्म आणि मीमांसा या साऱ्या विद्या प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या ठिकाणी पूर्णांशाने आविष्कृत आहेत. श्रीमत् भागवताचे अंतरंग प्रवक्ते, भगवत् प्रेमाने भरलेले अंतःकरण, अंतर्मुखवृत्ती 'अभयं सत्वसंशुद्धिः' या दैवी संपत्तिने अलंकृत असून विद्याविनय संपन्न व्यक्तिमत्वाचे हे प. पू. श्रीमहाराजांचे दर्शन मोठे विलोभनीय आहे.

श्री. प. प. टेंबेस्वामीमहाराज व श्री. प. प. लोकनाथतीर्थ स्वामीमहाराज, प. पू. श्रीसद्गुरु गुळवणीमहाराज आणि प. पू. श्रीवक्रतुंडमहाराजांचे अपूर्व अवतार कार्य वृद्धिंगत व्हावे, त्यांच्या सद्धर्माची शिकवण सर्वत्र प्रसृत व्हावी म्हणून प. पू. श्रीदत्तमहाराज हे अहर्निश कार्यरत असतात.

प. पू. श्रीदत्तमहाराजांचा सहस्रचंद्रदर्शनशांति महोत्सव म्हणजे जिज्ञासू, भक्त, उपासक, साधक अशा सर्वांना लाभणारे महापर्व होय. या संकल्पित महोत्सवाच्या निमित्ताने ऋग्वेद संहिता स्वाहाकार, चतुर्वेद पारायणे, प्रस्थानत्रयी अशा प्रासादिक ग्रंथांचे पारायण, तुलादान व विविध अनुष्ठाने, कीर्तने, प्रवचनादि कार्यक्रम होणार आहेत. या कार्यक्रमांचा तपशिल यथाकाल प्रसिद्ध होईलच. या निमित्ताने एक गौरव ग्रंथ प्रकाशित करण्याचा समितीचा संकल्प आहे.

प. पू. श्रीदत्तमहाराजांचा गौरव म्हणजे विद्येचा, तपस्येचा, अनुष्ठानांचा, आचारधर्माचा, भक्तीचा, उपासनेचा, ज्ञानाचा, वैराग्याचा, अमानित्वाचा गौरवच होय. अशा सर्व कल्याणकारक श्रीगुरुसेवा कार्यात आपण सर्वांनी तन-मन-धनाने सहकार्य करावे अशी गौरव समितीची आपणास नम्र विनंती आहे. त्यानिमित्ताने खालील मंडळींचे एक कार्यकारी मंडळ स्थापन झाले.

कार्यकारी मंडळ

अध्यक्ष : पं. धुंडिराजशास्त्री दाते (पंचांगकर्ते) सोलापूर

उपाध्यक्ष : डॉ. दि. ब. केरुर, पुणे. पं. किशोरजी व्यास, बेलापूर
पद्मश्री पं. जितेन्द्र अभिषेकी, पुणे.

कार्याध्यक्ष : श्रीमान् गोविंदशेट साबळे, पुणे

उपकार्याध्यक्ष : श्री. भगवानराव कृ. पटवर्धन, ठाणे

कोषाध्यक्ष : श्री. लक्ष्मण व्यं. वाकडे, पुणे

उपकोषाध्यक्ष : श्री. नंदकुमार गंगाधर जोशी , पुणे

कार्यवाह : वे. मू. कृष्णाजी गो. आर्वीकर, नागपूर.
पं. आनंदशास्त्री पारखी, पुणे. श्री. रघुनाथ द. कुळकर्णी,पुणे.
पं. राजेश्वरशास्त्री उप्पिनबेटगिरि, धारवाड.

सह कार्यवाह : डॉ. वसंतराव य. जोशी, पुणे. श्री. तुलसीदास श्री. लाटे, पुणे.

सल्लागार मंडळ

श्री. नारायणराव ढेकणे, नासिक
पू.सौ. ताईमहाराज चाटुफळे, जालना
श्री. श्री. पां. आधारकर, पुणे
श्री. रामचंद्र लुकड, पुणे
श्री. अशोकराव ओव्हाळ, पुणे
श्री. नरहर भा. जावडेकर, पुणे
श्री. डॉ. म. बा. वाघण्णा, जळगाव
श्री. तापडियाशेट, पुणे.
श्री. दा. ल. नवरे, अंबरनाथ
श्री. पद्मनाभ वा मनोळकर (ऑडिटर) पुणे.
श्री. सुभाष अनंत दामले, (ऑडिटर) पुणे
श्री. अ. सि. पोटभरे, पुणे
श्री. कमलाकर द. देशपांडे, पुणे (व्यवस्थापक)

मान्यवरांचे आशीर्वाद

श्रीमत् जगद्गुरु शंकराचार्य करवीर पीठाधीश्वर
प. पू. श्रीनानामहाराज तराणेकर, इंदोर
प. प. श्रीशिवोऽम् तीर्थ स्वामी महाराज, देवास
ह. भ. प. धुंडामहाराज देगलूरकर, पंढरपूर
प. पू. श्रीकारखानीस महाराज,

● पुरस्कृत संस्थाने व संस्था ●

श्रीमन्नृसिंह सरस्वती स्वामी महाराज संस्थान, नरसोबावाडी

श्रीमन्नृसिंह सरस्वती स्वामी महाराज संस्थान, कारंजा

श्रीमन्नृसिंह सरस्वती स्वामी महाराज संस्थान, गाणगापूर

श्रीदत्तमंदिर संस्थान, माणगांव

श्री. प.प. वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज संस्थान, गरुडेश्वर

श्री. प. प. दीक्षितस्वामी महाराज संस्थान,औरवाड

श्री. प. प. सितारामम्हाराज संस्थान, झिरी (बडनेरा)

श्री. प. प. श्रीपादश्रीवल्लभ दत्त संस्थान, कुरवपूर.

श्री. प. पू. रंगावधूत महाराज संस्थान, नारेश्वर

श्री. प. पू. माणिकप्रभु महाराज संस्थान, माणिकनगर

श्री. प. पू. नारायणमहाराज संस्थान, केडगांव बेट

श्री. प. पू. समर्थ रामदास स्वामी महाराज संस्थान, सज्जनगड

श्री. प. पू. श्रीस्वरुपानंदस्वामी महाराज संस्थान, पावस

श्री. प. प. लोकनाथतीर्थ स्वामी स्मारक संस्थान, नासिक

प. पू गुरुमाई चिद्विलासानंद परमहंस, गणेशपुरी

श्री. प. पू. ब्रह्मचैतन्य गोंदवलेकरमहाराज संस्थान, गोंदवले

श्री. प. पू. स्वामी समर्थ संस्थान, अक्कलकोट

श्रीतुळजाभवानी देवस्थान, तुळजापूर

अध्यक्ष, याज्ञवल्क्य आश्रम संस्था, पुणे,

संचालक ह. भ. प. श्रीकिसन महाराज साखरे, साधकाश्रम देवाची आळंदी

संचालक डॉ. विघ्नहरि देव, श्रीमोरयागोसावी गणपति संस्थान, चिंचवड

विश्वस्त श्रीदेवदेवेश्वर मंदिर संस्था, पुणे

अध्यक्ष, श्रीनारद मंदिर संस्था, पुणे

अध्यक्ष, वेदाचार्य द. पां. किंजवडेकरगुरुजी, श्रीरामेश्वर ब्रह्मवृंद मंडळ, पुणे

संचालक, वेदाचार्य वि. ह. घैसासगुरुजी, घैसासगुरुजी वेदपाठशाळा, पुणे

अध्यक्ष, वे. मू. वासुदेवभट्ट गोखले गुरुजी, हिरण्यकेशी ब्रह्मवृंद मंडळ, पुणे

अध्यक्ष, देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्था, पुणे,

कुलगुरु श्री. डॉ. सोहनी, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

श्री. प्रतापराव गोडसे श्रीमंत दगडूशेट हलवाई गणपती प्रतिष्ठान,पुणे

श्रीशंकराचार्य जेरे स्वामी मठ, सातारा

संचालक, पं. काशिनाथशास्त्री जोशी, श्रीअक्कलकोट स्वामी महाराज संस्थान, अहमदनगर

संचालक, श्री. कुशाभाऊ रेखी, श्रीसरस्वतीध्यान केन्द्र, तळेगांव दाभाडे

श्रीसद्गुरुमाऊली साधक मंडळ, अकलूज

डॉ. श्रीनिवास जामदार, श्री. प. पू. गुळवणीमहाराज

सिद्धयोग प्रतिष्ठान, सांगली

संचालक, श्रीसिद्ध साधक मंडळ, तुळजापूर

अध्यक्ष, सांगवेद विद्यालय, वाराणसी,

श्री. वा. कृ. जोशी साधक मंडळ, वाराणसी.

संचालक, पंडीतप्रवर श्री. भालचंद्रशास्त्री उप्पिनबेटगिरि, श्रीशंकराचार्य संस्कृत पाठशाळा, धारवाड

श्री. हरिलाल गुलझारीलाल, महासिद्ध योग साधना मंडळ, सेंधवा

श्रीवासुदेवनिवास भगिनी भजनी मंडळ, पुणे.

संगीत भजन मंदिर, पुणे.

सहस्त्रचंद्रदर्शन विधी

ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः । प्रत्येक प्राणीमात्र हा भगवंताचा अंश आहे असे गीता सांगते. पाश्चात्य जीवन व भारतीय जीवन यांत जमीन-अस्मानाचे अंतर आहे. पाश्चात्य संस्कृती ही द्राक्ष (दारु सेवन करणारी) संस्कृती आहे तर भारतीय संस्कृती ही रुद्राक्ष संस्कृती आहे. पाश्चात्य जीवन हे भोगप्रवण आहे तर भारतीय जीवन हे त्यागप्रवण आहे. कर्मानी, पूजेनी, द्रव्यादिकांनी अमृततत्त्वाची प्राप्ती होत नाही तर त्यागानीच अमृततत्वाची प्राप्ती होते. म्हणून आपल्याकंडे सर्वच 'न मम' ही शिकवण दिली आहे. म्हणून भारतीय संस्कृती ही त्यागमय संस्कृती आहे.

मनुष्य जन्म मिळाल्यानंतर त्याचे ध्येय काय असावे? याचा विचार भारताखेरीज अन्य कोठेही केलेला नाही. पशू अन्नावर जगतात. माणूस मात्र महत्त्वाकांक्षेकरता, ध्येयाकरता जगतो हे माणसांचे वैशिष्ठ्य आहे. परमेश्वराचा अंश म्हणून आपण जन्माला आलो आहोत. तर या अंशाने त्या पूर्णब्रह्म परमात्म्यामध्ये विलीन होणे हे मानवी जन्माचे अंतिम साध्य आहे. यालाच मोक्ष म्हणतात. त्या परब्रह्मामध्ये विलीन होण्याकरता मन, बुद्धी, देह, योग्य (पवित्र) झाले पाहिजे. या करिता आपल्याकडे अनेक मार्ग सांगितले आहेत.

स्वाध्यायेन व्रतैर्होमै स्थैविधेने ज्ययासुर्तेः।।
महायज्ञैश्च ब्राह्मीयंक्रियते तनुः ।।

वेदाध्ययन, व्रते, होम, पूजा, महायज्ञ केल्याने हा देह ब्रह्मपद प्राप्तीला योग्य होतो असे मनूने म्हटले आहे. हे सर्व करण्याकरता प्रथम भारतात जन्म मिळावा लागतो. भरतखंडी नरदेह प्राप्ती। हे तो परमभाग्याची संपत्ति ।। असे नाथांनी म्हटले आहे.

ज्या भूमीला भगवंताचे चरण दहावेळा लागून ती पुनीत झाली आहे. अशा या श्रेष्ठ भारत देशांत आपणांस जन्म मिळाला. आपण किती भाग्यवान आहोत. असा जन्म मिळाला असता त्याचे सार्थक केले पाहिजे. म्हणून वैदिक धर्म म्हणजे काय हे जाणून घेऊन तदनुरुप आचार करीत देह, चित्त शुद्ध कसे होईल हे पाहिले पाहिजे. या संबंधीचा सर्व विचार आपल्या शास्त्राने केला आहे. धर्माचरण करण्यातच म्हणजे धर्माच्या दास्यात खरे स्वातंत्र्य आहे. हे लक्षात येण्याकरता बुद्धी धर्मप्रवण करावी लागते. वर्णाश्रम विहित धर्माचे यथायोग्य पालन नित्य करावे लागते. या दृष्टीनेच ऋषी-मुनींनी सर्व आचार सांगितला आहे.

पूर्वकाळी कॉलरा, प्लेग, इत्यादी रोगांच्या साथीत ऐन तारुण्यात माणसे मरत असत. दीर्घायुष्य लाभणे हे कठीण होते. आता तशी स्थिती राहिली नाही. एकहजार चंद्रदर्शने झालेली माणसे तुरळक का होईना भेटतात. ही माणसे भाग्यवान आहेत.

अमावस्येनंतर शुद्ध पक्षातील द्वितीयेस जी चंद्रकोर दिसते त्यास चंद्रदर्शन असे म्हणतात. **नवो नवो भवति जायमान ।** दर महिन्याला नव्याने दिसणारा चंद्र असे वर्णन केले आहे. अशा फार थोड्या भाग्यवंतांपैकी प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज हे आहेत. त्यांचा श्रेष्ठ आचार, विद्वत्ता, वक्तृत्त्व, विनय, त्यांची श्रेष्ठ योग्यता हे सर्व आपणांस विदित आहेच. त्यांचा सहस्त्रचंद्रदर्शन विधी या वर्षी होत आहे.


या विधीत सहस्त्रसंख्याक दर्शन गुणविशिष्ट चंद्र ही मुख्य देवता आहे. अधिदेवता मृत्युंजय आहे व प्रत्यधिदेवता कालस्वरुप सूर्य आहे. चंद्र म्हणजे मन आहे. मन हे अतिशय चंचल असते. ते या वयात पूर्णपणे शांत व समाधानी व्हावे म्हणून चंद्राचे पूजन सांगितले आहे. मृत्युंजय या नावातच अर्थ भरलेला आहे. कालाचे मापन सूर्यावरुनच करावे लागते. एका सूर्योदयापासून दुसऱ्या सूर्योदयापर्यंत एक दिवस या पद्धतीने महिना, वर्ष, इत्यादी. म्हणून येथे कालस्वरुप सूर्य ही देवता घेतली आहे.

या देवतांचे पूजन, हवन, इत्यादी करुन

सतिलं गुडसंमिश्रं अंजल्यर्धमितं पयः।
मार्कंडेयाद्वरं लब्ध्वा पिबाम्यायुर्विवृध्यध्दे।।

या मंत्राने आयुष्यवृद्धीकरतां दुधात तीळ व गूळ घालून ते प्राशन करण्यास सांगितले आहे. नंतर अश्वत्थामा, बली, व्यास, इत्यादी सात चिरंजीव व मार्कंडेय यांची प्रार्थना करावयाची. हा विधी केल्याने ती व्यक्ती पुण्यवान व ब्रह्मशरीरी होते ब्रह्मधारणेस योग्य होते व त्या व्यक्तीपासून अनेकांना सन्मार्गदर्शनाचा लाभ होतो.

तमेनं क्रियायुक्तं पुण्यकृतं ब्रह्मशरीरमित्याचक्षते।
वैखानस गृह्यसूत्र ब्रह्मवित् ब्रह्मैव भवति।



विश्व हे परमेश्वराचे प्रतिबिंब आहे. बिंबाला अर्पण केलेल्या वस्तू प्रतिबिंबाला मिळतात. आपण ईश्वराचे प्रतिबिंब आहोत म्हणजे ईश्वराला दिले की आपल्याला मिळेल.

॥ श्री गणेश गुरुभ्योनमः ॥

सहस्त्रचंद्रदर्शनशांति निमित्ताने प. पू. श्रीदत्तमहाराजांनी दिलेले आशीर्वाद आणि साधकांसाठी चिंतन.



यन्नामस्मरणाद्दैन्यं पापं तापंच नश्यति
भीतिग्रहार्तिदुःस्वप्नं दत्तात्रेयं नमामि तम्॥

भगवान शंकराचार्य महाराजांनी जगामध्ये तीनच गोष्टी दुर्लभ आहेत असे सांगितले आहे, विवेकचूडामणी मध्ये,

दुर्लभं त्रयमेवैत् देवानुग्रहहेतुकम्।
मनुष्यत्वं मुमुक्षत्वं महापुरुषसंश्रयः॥

आचार्य महाराज सांगतात या तीनच गोष्टी दुर्लभ आहेत. त्यांच्यासाठी फार प्रयत्न करावे लागतात. पहिली म्हणजे मनुष्य जन्म प्राप्त होणे. मनुष्य जन्म अत्यंत दुर्लभ आहे. मनुष्य जन्म मिळाला आणि संसारामध्येच मन गुंतून राहिले तरी त्या जन्माचा काही उपयोग नाही. त्या करिता मुमुक्षत्व पाहिजे. मोक्षाची इच्छा. आपली सर्व दुःख दूर व्हावीत; कर्म बंधनातून आपण मुक्त व्हावे अशी इच्छा उत्पन्न होणे ही दुर्लभ गोष्ट आहे. आणि तिसरी म्हणजे "महापुरुष संश्रयः"

बाकी सगळे जीव हे पुरुष आहेत. पुर म्हणजे शरीर. शरीरामध्ये राहाणारे. पण महापुरुष त्याला म्हणतात. ज्याच्याजवळ मनुष्यत्त्व आहे, मुमुक्षत्त्व आहे, मनुष्य जन्माचे सार्थक ज्याने करुन घेतलेले आहे अशा महापुरुषांची संगती ही अत्यंत दुर्लभ आहे. असे शंकराचार्य महाराजांनी सांगितले आहे.

त्या प्रमाणे चांगल्या कुळामध्ये जन्माला येणे हे ईश्वर, सज्जनांच्या, सत्पुरुषांच्या कृपेने शक्य आहे. हे मनुष्यत्व आम्हाला मिळाले. त्यानंतर मुमुक्षत्व हे अत्यंत दुर्लभ आहे, कठीण आहे, असे जे आचार्यमहाराज सांगताहेत हे खरे आहे. परंतु तेही प्राप्त होण्याकरता "महापुरुष संश्रयः" त्यांनी सांगितला आहे. त्याप्रमाणे लहानपणापासून महापुरुषांचा संश्रय, संगती ही ईश्वर कृपेने मिळाली. त्या संगतीचा उपयोग मुमुक्षत्व उत्पन्न होणे, वाढणे यासाठी झाला पाहिजे. हे किती झाले आहे, किती व्हायला पाहिजे हे त्यांनाच ज्ञान आहे.

तर या जन्मामध्ये असे महात्मे, महापुरुष, त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे कार्य आतापर्यंत झाले. पूर्व संचिताप्रमाणे काही विद्याभ्यासही झाला. त्याचप्रमाणे काही थोडी फार सेवाही घडलेली आहे. आज या वेळेला वयाची ऐंशी वर्षे पूर्ण

झाल्यामुळे धर्मशील सज्जनांनी सहस्त्रचंद्रदर्शनशांति हे शास्त्रविहीत असे कर्म करावे अशी इच्छा बाळगून ईश्वरी प्रेरणेप्रमाणे हे कार्य त्यांनी केलेले आहे. या सहस्त्रचंद्रदर्शनशांतीच्या निमित्ताने वैयक्तिक शास्त्राप्रमाणे काही आयुरारोग्य याला प्रतिबंध होऊ नये, ते राहावे असे शास्त्राप्रमाणे सांगितले आहे. ते काय असेल ते फल मिळेल. परंतु विशेषतः या निमित्ताने वेदशास्त्रज्ञ मंडळीही या ठिकाणी आशीर्वाद देण्याकरता जमलेली आहेत. पुण्यकर्म मोठे आहे. पंचायतन यागयोजना केलेली आहे, स्वाहाकार आहे, शतचंडी आहे; अशी मोठी मोठी पुण्यकर्म विधिज्ञ मंडळींच्या नेतृत्वाखाली इथे होऊन राहिली आहेत. ते पाहणे हे सुद्धा, मोठे पुण्यकर्मच आहे. कारण जी काही धर्मशील मंडळी आहेत त्यांच्या इच्छेप्रमाणे हे कार्य घडत आहे.

यत्र द्रव्यांशः तत्र पुण्यांशः या शास्त्र सिद्धांताप्रमाणे या कर्मांचा पुण्यांश हा त्यांनाच मिळणार आहे. आपण फक्त ते पहाणारे आहोत. मनुष्य जन्म मिळाल्यानंतर असे पुण्यकर्म पहायला मिळत आहे, सर्व मंडळींचे दर्शन होत आहे, आशीर्वाद मिळताहेत हे एक समाधान सद्गुरु महाराजांच्या कृपेने यावेळेला मिळालेले आहे. या निमित्ताने काही तरी एक चांगले चिंतन म्हणून प्रसिद्ध करुन, एक सद्विचार हेही प्रसिद्ध करायची सर्व मंडळींची इच्छा आहे.

सद्गुरु श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराज यांनी अशा प्रकारची लहान लहान स्तोत्रेही पुष्कळ केलेली आहेत. त्यात त्यांनी निरनिराळे शास्त्र सिद्धांत मार्गदर्शनपर असे दाखवले आहेत. तेव्हा त्यांचेच एक स्तोत्र-गुरुस्तुती म्हणून गाणगापूरमध्ये झालेली- त्या गुरुस्तुतिसंबंधी काही थोडसे चिंतन हे झालेले. ते आणखी छापावे, सर्वांना द्यावे, सर्वांनी त्याचा विचार करावा. महापुरुषांचा प्रत्यक्ष समागम झाला नाही तरी त्यांचे विचार जे आहेत, सिध्दांतस्वरुप ते ईश्वराचे विचार आहेत. त्या विचारांची संगती मिळावी, ते विचार आपल्या मनामध्ये रहावे, त्याप्रमाणे आचरण व्हावे, हा हे चिंतन प्रकाशित करणाऱ्या समितीचा उद्देश आहे.

तेव्हां यथामती त्या स्तुतिबद्दल जे काही थोडे फार चिंतन झाले आहे ते चिंतन आणखी प्रकाशित करुन सर्वांना देण्याची इच्छा या समितीची आहे. तेव्हा त्याला अनुसरुन सर्वही मंडळींनी असेच विचार करावेत, असेच आचरण करावे आणखी दुर्लभ अशा प्रकारचा मनुष्यजन्म, त्यातही अत्यंत दुर्लभ अशी महात्म्यांची संगती ज्यांना ज्यांना मिळालेली आहे त्यांना त्या संगतीच्या योगाने मार्गदर्शन होतच राहाणार आहे. प्रतिबंध जरी झाला काही प्रारब्धाने तरी तो फुकट जाणार नाही.

भगवान् श्रीकृष्णांनी युद्धाच्या आरंभी मोहात सापडलेल्या अर्जुनाला गीताज्ञानाचा उपदेश केला. त्याचा मोह त्या वेळेला दूर केला. युद्ध केले. त्याने


विजयी झाला तो. पण ते गीताज्ञान त्या वेळेला काही आठवेना. श्रीकृष्णांना तो "पुन्हा सांगा" म्हणाला. "नाही, आता मला सुद्धा सांगता येणार नाही," भगवान् म्हणाले.

पण त्यांनी सांगितलेले गीताज्ञान, त्यांचा उपदेश, त्यांचे मार्गदर्शन हे शेवटी एकदम अर्जुनाला मिळाले असे सांगतात. तसा भागवतामध्ये उल्लेख आहे. गोपालकृष्ण निजधामाला गेले. अर्जुन द्वारकेमध्येच राहिला. सगळे यादव गेले. मग अर्जुनाला अतिशय शोक झालेला आहे. लहानपणापासून भगवंताची संगती. त्यांच्यावर अत्यंत प्रेम आणि भक्ती. आणखी आपल्याला सोडून गेले भगवान्. अशा अत्यंत शोक झालेल्या अवस्थेमध्ये, व्यास महर्षी लिहीताहेत की ते दिव्य ज्ञान एकदम त्याच्या चित्तामध्ये प्रकट झाले आहे. आणि त्यामुळे याचा सगळा शोक गेला. उत्तम ज्ञान संपन्न झालेला अर्जुन द्वंद्वातीत अवस्थेमध्ये जाऊन पोहोचला आहे.

म्हणजे संतांचे मार्गदर्शन हे काही फुकट जात नाही. काही प्रारब्ध प्रतिबंधांनी जरी ते स्थगित झाले तरी वेळ आली म्हणजे त्यांच्या संकल्पाने ते असे उत्पन्न होते. महापुरुषांच्या संकल्पाने सगळे जगाचे कार्य चाललेले आहे. ईश्वरालासुद्धा संमती द्यावी लागते त्यांच्या संकल्पाला. कोणत्याही पुण्यकर्मामध्ये त्यांचाच संकल्प आहे. "सर्वे भद्राणि पश्यन्तु" असा त्यांचा संकल्प आहे. मंगल कार्य व्हावीत, सगळ्या लोकांना सर्व मंगल पाहायला मिळावे ही त्यांची इच्छा आहे. त्यांचा संकल्प आहे.

त्याप्रमाणे सगळी कार्य घडताहेत. निमित्तमात्र आपण सर्वही असतो. ही जाणीव, निरभिमानवृत्ती, खरा कर्मयोग ज्याला म्हणतात ही भूमिका त्यांच्याच संकल्पाने मिळते, कृपेने प्राप्त होते. तेव्हा या सहस्रचंद्रदर्शनशांतीकर्माच्या निमित्ताने सर्व पुण्य कर्म, मोठमोठ्या वेदशास्त्रांचा अभ्यास केलेल्या मंडळींच्याकडून होऊन राहिलेली आहेत. त्यानिमित्ताने सद्गुरु श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराजांचे विचार, सिद्धांत हेही आपल्या समोर आलेले आहेत. त्याचाही सर्वांनी विचार करुन ते सिध्दांत आपल्या चित्तामध्ये स्थिर राहावेत, अत्यंत दुर्लभ असे मनुष्यत्व, त्याची जाणीव रहावी, मुमुक्षा उत्पन्न व्हावी, सत्पुरुषांचा, महापुरुषांचा समागम हा नेहमी असावा, व्यक्त अव्यक्त कोणाच्याही रुपाने त्यांची संगती निरंतर राहिली म्हणजे मिळालेले मनुष्यत्व हे सार्थकी होणार आहे. श्रीज्ञानेश्वर महाराजांनी शेवटी पसायदानामध्ये हेच सांगितलेले आहे. तीन ओव्या सत्पुरुषांचे महत्त्व वर्णन करण्यासाठी त्या पसायदानामध्ये मुद्दाम घातलेल्या आहेत. 'चंद्रमे जे अलांछन। मार्तंड जे तापहीन । ते सर्वाही सदा सज्जन। सोयरे होतु।' त्यांनी प्रार्थना देवाची केलेली आहे. संसार बंधनामध्ये, संसार सागरामध्ये सापडलेल्या जीवाने प्रार्थना करायला पाहिजे की अशी संगती आम्हाला मिळावी. पण ते महापुरुष स्वतःच देवाजवळ मागताहेत की सर्वांना असे महापुरुष सोयरे मिळावेत. त्यांची गाठ पडावी,

प. पू. श्रीदत्तमहाराज षष्ठ्यब्दपूर्ती प्रसंगी




गुरूकृपेच्या छायेत

प. पू. श्रीदत्तमहाराज - अमृत-महोत्सव




प. पू. श्रीदत्तमहाराजांची सहस्त्रचंद्रदर्शन शांती



गाय उभी ही माय होऊनी

तुलादान




अतुलनीय व्यक्तीमत्व

प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज सहस्त्रचंद्रदर्शन शांती समारोह




सत्कार समारंभ

राष्ट्रपती श्री. शंकरदयाळ शर्मा यांचे हस्ते सत्कार




राष्ट्रपतींनी गौरव केला। आनंदी आनंद झाला।

प. पू. श्रीदत्तमहाराजांचा रौद्री शांती सोहळा



देऊळगावराजा सत्कार-सन्मानपत्र

श्रींची हत्तीवरील मिरवणूक हिंगोली



थोर संत श्री गजानन महाराजांनी आपला आशीर्वाद गजराजांबरोबर पाठवून
प. पू. श्रीदत्तमहाराजांचा गौरव केला.

त्यांचे मार्गदर्शन यांना मिळावे ही प्रार्थना स्वतःच ते करताहेत. ही त्यांची दयादृष्टी आहे, समदृष्टी आहे. गुणदोषांकडे काहीही न पहाता 'सर्वेऽपि सुखिनः सन्तु' ही खरी भावना त्यांच्या चित्तामध्ये आहे. म्हणून अशी प्रार्थना ते करताहेत.

त्यांचा संकल्प आहे. तो संकल्प जरी आपल्या मनामध्ये आपण ठेवला किंवा आपली काही दुरिते आड आली तरीसुद्धा त्यांनी ज्याअर्थी म्हटलेले आहे की सत्पुरुषांचा समागम सगळ्या लोकांना व्हावा, सत्पुरुष सगळ्या लोकांना भेटावेत हा त्यांचा संकल्प ईश्वरकृपेने केव्हां तरी निश्चित पूर्ण होईल. केव्हां तरी दुरित प्रतिबंध आपला दूर होईल. अशा प्रकारची श्रद्धा, विश्वास मनामध्ये बाळगून आणि ती तळमळ मनामध्ये धरुन राहिले म्हणजे सगळे कार्य होईल. एवढेच सगळ्या लोकांच्या समोर निवेदन आहे.

तशी संगती आता केव्हां घडेल, व्यक्त अव्यक्त रुपाने, पुढचा काल काही असेल शिल्लक राहिलेला तर त्या कालामध्ये थोडी फार घडावी एवढीच सद्गुरु श्रीमहाराजांच्या चरणी शेवटची प्रार्थना.

श्री वासुदेव निवास, पुणे.
माघ व. २, श. १९११

दत्तात्रेय धुंडिराज कलिना

दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा

द्रव्य हे एकट्याचे नसते तर सर्वांकरता असावे अशी भावना तरी ठेवावी. एकदा त्यागबुद्धी निर्माण झाली की सर्वांचा विश्वास निर्माण करता येतो.

श्रीकृष्णाचे दिव्य चरित्र अखंड ऐकावे त्यामुळे श्रीहरीचे स्वरूप अंतर्मनात साठवून घेता येते.

सहस्त्रदर्शनशांती सोहळ्यानिमित्त देवांना आमंत्रणे

प. पू. श्रीदत्तमहाराजांचा सहस्त्रचंद्रदर्शनशांती सोहळ्यात प्रत्येक जण आपआपला भक्तीभाव वेगळ्या वेगळ्या पद्धतीने देवाचे चरणी अर्पण करीत होता. एक तरी तुळशीपत्र या उत्सवात आपले श्रीगुरुचरणी सादर व्हावे अशी मनःपूर्वक इच्छा बाळगून होता. या तळमळीतून, आपल्या कल्पनेतून देवाशी एकरुप होत होते. काहीशी भावनेने भिजलेली अशी प्रार्थनापत्रे देवाला लिहिली होती. या त्यांच्या भावना सर्वांच्याच मनाला सुखविणाऱ्या आहेत. भक्तिचे नवे नवे उन्मेष दाखविणाऱ्या आहेत. या इच्छेने काही पत्र नमुने खाली देत आहो.

श्री मंगलमूर्तिला आमंत्रण



श्री गजानना,

तुझ्याचरणी नम्र वंदन.

सर्व प्रथम तुला आमंत्रण करीत आहो. प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या सहस्त्र दर्शन सोहळ्यासाठी जरुर जरुर ये. सर्व सोहळा निर्विघ्नपणे पार पाडण्यास सहाय्यभूत हो. तू असलास की सर्व मंगलता मांडवी येईल. तरी लवकर येण्यासाठी निघावे. ऋद्धि सिद्धीना साऱ्या गणांना घेऊन यावे. आपण आनंदरुप ओंकार आहात. आपले आम्ही सतत स्मरण करीत आहो. तनमनाने पदी प्रार्थना करीत आहो या आमंत्रणाचा स्विकार करा व त्वरीत येण्याचे करावे.

रेणुका माऊलीस आमंत्रण

नमोजी रेणुका माता चरणी ठेवूनिया माथा ।
आमंत्रण पदी देता विनित भावे प्रार्थिते ॥
आपण जगाची माऊली श्रांत जीवाची साऊली ।
कुंकू लेवोनिया भाळी आगमनार्थ विनविते ॥
माहूरगडी तुझा वास दत्तात्रयांचा तोच निवास ।
मोक्ष लागे पायास अपरंपार महिमा असा ॥
अव्हेर करु नका पत्राचा संकल्प करावा येण्याचा ।
लाभ घडो दर्शनाचा आम्हा सर्व अज्ञजीवा ॥



सहस्त्रचंद्रदर्शनशांती सोहळ्याचे आदल्या दिवशी प्रथम मातृदेवोभव म्हणून मातेला वंदन केले व नंतर गुरुदेवांना वंदन केले ते काव्यरुपी नमस्कार व आमंत्रण.

मातृदेवोभव

आधी आमंत्रण, करा मातोश्रींना । येवोनी मांडवी आशिर्वाद द्यावा
मातृदेवो भव, आहे पहिला मान । पदकमली या करितो वंदन ॥१॥

सौभाग्याचे लेणे अखंड लेवून । अशा विभुतीला सदैव नमन
नका पाहू वाट येणे करा थेट । शांती सोहळ्याचा बघावा तो थाट ॥२॥

अग्रपूजा मान प्रथम करावा । आनंद लुटावा मनोमनी
ऐसी आस आहे भक्तांच्या मनात । पुरवावा हेतू आपल्या हातात ॥३॥

कंकण वसने देऊनिया हाती । सुपुजित केले हळदकुंकवानी
श्रीफळ अक्षता ओटी भरियेली । स्विकार करुनी गोड ती मानावी ॥४॥

'दत्त महाराज' तेज मूर्तीमंत । कोणत्या दिपाने तयासी औक्षण
माऊलीचे नेत्र निरांजने दोन । सुपुत्रास घेती स्वये ओवाळून ॥५॥

लागणार नाही दृष्ट उत्सवाला । आईच्या मायेची शाल पांघराला
इडा पिडा टळो दीर्घ आयु लाभो । माऊली चरणी भक्तांचे मागणे ॥६॥

वंदन पाच ठिकाणी

पहिला नमस्कार रेणुका मातेला । भरतभूमीला त्रिवारगे
दुसरा नमस्कार पिताजी चरणाला । पुष्पहार पदी अर्पियेला
तिसरा नमस्कार यती वासुदेवा । दीक्षित स्वामींना मनात आठवा
चौथा नमस्कार गुरुवामनांना । ऋण न फिटणे शब्द मौन झाला
पाचवा नमस्कार औदुंबरा तळी । संभाळा सकळा रक्षक होवुनी
पाच ठिकाणी हे पाच नमस्कार । येऊनी कार्याला शुभारंभ करा

सहस्त्रचंद्रदर्शन सोहळ्यात अशा अनेकविध सात्विक भावनांना पूर आला व सात्विक गुणाचे दर्शन सर्वांच्या मनाला संतोष देत होते. असा सोहळा जो यज्ञ यागादिकांनी संपन्न होता तसाच सद्भावनेनी परीपूर्ण होता. ज्ञान कर्म भक्ती यांचा एकत्र मिलाफ येथे दिसून येत होता अशी ही क्षणचित्रे भक्तांच्या जीवनातील सुवर्ण क्षण आहेत.



❋ सहस्त्रचंद्रदर्शन शांती सोहळा ❋

प. पू. श्रीदत्तमहाराजांचे जीवन शांत समाधानी व प्रसन्न आहे. त्यांची स्थिरता त्यांच्या सहवासात येणाऱ्या सर्वानाच जाणवत असते. आनंद चक्रवर्ती साम्राज्यावर ते खरोखरीच अधिष्ठित झाले आहेत. आपल्या भारतीय आध्यात्मिक तत्त्वज्ञानाप्रमाणे आत्मज्ञान झाल्यानंतरही माणसाने कार्यरत रहावे असे सांगितले आहे.

'फेडित पाप ताप। पोषित तिरीचे पादप' अशा तऱ्हेने त्यांची जीवनगंगा वहात आहे. जीवनाचे ध्येय गाठले असले तरी लोकांकरिता ते जगत आहेत. प. पू श्रीदत्तमहाराजांचे चरित्र श्रीज्ञानदेवांच्या शब्दांत सांगावे तर चातुर्य शहाणे करणारे, ज्ञानाला गोडी देणारे, कर्माला माधुरी आणणारे व भक्तीला भरती येणारे आहे.

ऐसी कळवळ्याची जाती। करी लाभावीण प्रिती लोकांवर अपेक्षारहित प्रेम करुन त्यांच्या हिताचा मार्ग आपल्यापरीने प. पू. श्रीदत्तमहाराज सांगत आहेत. कर्तेपणाचा सर्व भार ते ईश्वरावर टाकतात. करुन अकर्तेपण घेतात. अशा तऱ्हेने प. पू. श्रीदत्तमहाराजांचे जीवन 'उरलो उपकारापुरता' असे झाले आहे.

अशा निष्काम कर्मयोगी भक्ताचे कौतुक करण्याची भगवंताला खूप इच्छा असते. सामान्यपणे जीवन जगणाऱ्या संत महात्म्यांचे महत्त्व लोकांना कळावे, हा त्या कौतुकामागे हेतू असतो. त्याची प्रेरणा ईश्वर कोणाच्या तरी मनात करत असतो. प. पू. श्रीदत्तमहाराजांनी ऐंशीव्या वर्षांत पदार्पण केले. भगवंतानी वासुदेव निवास विश्वस्तांच्या मनांत प्रेरणा निर्माण केली. या पुनित जीवनाचा सहस्त्रचंद्रदर्शनशांती महोत्सव करावा असे वाटले. या विचाराला सर्वांचीच एकमताने संमती मिळाली. आदरयुक्त प्रेमाने, संयमाने व औचित्यपूर्ण असा सोहळा कसा संपन्न करावा यासाठी एक गौरव समिती स्थापन झाली. त्याला योग्य असे अधिकारी शास्त्रसंपन्न श्रीधुंडिराजशास्त्री दाते लाभले. लोकांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला. भक्तीला जणू पूर आला. सहस्त्रचंद्रदर्शनशांतीच्या सोहळ्यास आरंभ झाला.

मला मात्र प. पू. श्रीगुळवणी महाराजांची खूप आठवण झाली. माझे मन गतकाळात रममाण झाले. डोळ्यापुढे श्रीगुरुमहाराजांच्या सहस्त्रचंद्रदर्शनशांती सोहळ्याची दृश्ये येऊ लागली. त्याला कारणही तसेच होते. प. पू. श्रीगुरुमहाराजांच्या लहानमोठ्या उत्सवाचे प्रेरक प. पू. श्रीदत्तमहाराजच होते.

डिसेंबर १९६६ मध्ये देऊळगावराजा येथे आपले पिताश्री धुंडीराज महाराज यांचा सहस्त्रचंद्रदर्शनशांती सोहळा साजरा करुन प. पू. श्रीदत्तमहाराज परत आले. लगेचच गुरुमहाराजांच्या सहस्त्रचंद्रदर्शनशांती सोहळ्याची सुरुवात झाली. प. पू. श्रीदत्तमहाराज कार्यवाह होते. त्यांनी काही आमंत्रणे संस्कृतमध्ये छापली होती. ती

अनेक पंडित मान्यवराना पाठवली होती. हे सर्व मनःचक्षूसमोर तरळले. श्रीगुरुमहाराज त्यावेळी म्हणाले होते. आमच्या या उत्सवापेक्षा श्रीदत्तमहाराजांचा सहस्रचंद्रदर्शन सोहळा अतिशय मोठ्या प्रमाणात साजरा होईल. त्यांचे ते आशीर्वाद पूर्णपणे खरे ठरले. दोन्ही सोहळे पाहण्याचे भाग्य आम्हाला लाभले. त्यावेळी वाटले 'आपण किती भाग्यवान!'

आत्मलाभ प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या थोर व्यक्तींच्या जीवनातील असे उत्सव हे विश्वात्मक सणच असतात. ज्यांना आत्मानुभव आहे त्यांना या चिद्विलासाचा उपभोग घेता येईल. इतरांना दिव्यतेचा साक्षात्कार भासेल. चकोराला अमृताचे सेवन करता येते. पण इतरांना चांदण्याची शीतलता मिळते. प्रत्येकाला आपल्या कुवतीप्रमाणे आनंद लुटता येतो.

सहस्रचंद्रदर्शनशांतीच्या निमित्याने प. पू. श्रीदत्तमहाराजांनी दिलेले आशीर्वाद व साधकांसाठी चिंतन छापलेले आहे. सहस्रचंद्रदर्शनशांतीबद्दल संपूर्ण माहिती त्यांत दिली आहे.

दि. ११ मे १९९० ते १८ मे १९९० असे महोत्सवाचे दिवस होते. त्यावेळी ही कार्यक्रमपत्रिका मराठीप्रमाणे राष्ट्रभाषेत काढण्याचे ठरले. त्याला हिंदी साज देण्याचे काम श्री. मधुकर पित्रे, अलाहाबाद यांनी केले.

कार्यक्रम स्थान और निवासस्थान

श्रीवामननिवास, दशभुजागणपति मंदिर के पीछे, पुणे - ४११ ००४.

दैनंदिन कार्यक्रम

वैशाख कृ. २, शुक्रवार, दि. ११ मई १९९०

प्रातः ७.३० से १२.३० : **पुण्याहवाचन, मातृकापूजन, नांदीश्राध्द, ऋत्विकवरण, मधुपर्क, देवता स्थापन, अग्निमंथनपूर्वक ऋक्संहिता स्वाहाकार प्रारंभ.**

प्रातः ८.३० से १२.३० : **श्रीगणेशयाग**

साय. ५ से ६ : **प्रवचन : पं. धुंडिराजशास्त्री दाते, पंचांगकर्ते सोला.**
विषय : शक्तिपात संप्रदाय में आचारमहत्त्व

सायं. ६ से ८ : **प्रसन्न पारिजात गौरव ग्रंथ प्रकाशन**
अध्यक्ष : डॉ. रा. ना. दांडेकर

वैशाख कृ. ३, शनिवार, दि. १२ मई १९९०

प्रातः ७.३० से १२ : संहिता स्वाहाकार और विष्णुयाग

सायं ५ से ६ : प्रवचन : ह. भ. प. श्री किसनमहाराजजी साखरे (आळंदी)

सायं ६ से ८ : परिसंवाद

विषय : विज्ञानयुगमे संस्कारोंकी आवश्यकता,
अध्यक्ष : डॉ. भिंगारकर (एस. एन. डी. टी)

वैशाख कृ. ३, रविवार, दि. १३ मई १९९०

प्रातः ७.३० से १२ : संहिता स्वाहाकार और रुद्रयाग

सायं. ५ से ६ : प्रवचन : डॉ. ज. वा. जोशी
तत्वज्ञान विद्यापीठ, अंमळनेर

सांय. ६ से ८ : प्रवचन : श्री. शिवाजीराव भोसले कुलगुरु,
मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
विषय : विज्ञान युग की परमार्थ साधना

वैशाख कृ. ४, सोमवार, दि. १४ मई १९९०

प्रातः ७.३० से १२ : संहिता स्वाहाकार और सौरयाग

सायं. ५ से ६ : बांसुरी वादनः श्री. मल्हारराव कुलकर्णी, मुंबई

सायं. ६ से ७ : प्रवचन : पं. भालचंद्रशास्त्रीजी मुळे, त्र्यंबकेश्वर

सायं. ७ से ८ : प. पू. श्रीदत्तमहाराज वासुदेव निवास विशेषांक प्रकाशन

वैशाख कृ. ५, मंगलवार, दि. १५ मई १९९०

प्रातः ७.३० से १२ : संहिता स्वाहाकार, देवीयाग
भागवत स्वाहाकार प्रारंभ

सांय. ५ से ६ : प्रवचन : प्रा. सु. ग. शेवडे, चेंबूर

सांय. ६ से ८ : गायन : पं. छोटा गंधर्व, पुणे

वैशाख कृ. ६, बुधवार, दि. १६ मई १९९०

प्रातः ७.३० से १२ : संहिता स्वाहाकार, श्रीदत्तयाग, भागवत स्वाहाकार

सायं. ५ से ६ : प्रवचन : डॉ. सौ. उमा देशपांडे, बडोदा,
विषय : श्रीरंगहृदयम्

सायं. ६ से ८ : गायन : पद्मश्री पं. जितेन्द्र अभिषेकी

वैशाख कृ. ७, गुरुवार, दि. १७ माई १९९०

प्रातः ७.३० से १२.३० : संहितास्वाहाकार, उत्तरांग हवन गोप्रदान, बलिदान, पूर्णाहुती, चंडीयाग और भागवत स्वाहाकार पूर्णाहुती

सायं. ५ से ६ : प्रवचन : करवीर पीठाधीश्वर श्रीशंकराचार्य
प. प. श्रीविद्याशंकर भारती स्वामीमहाराज

सायं. ६ से ८ : गायन : श्री अविनाश सहस्त्रबुध्दे, नागपूर

वैशाख कृ. ८, शुक्रवार, दि. १८ मई १९९०

प्रातः ७.३० से ११ : सहस्त्रचंद्रदर्शनशांति

प्रातः ११ से १२ : तुलादान

सायं. ४.३० से ७ : प. पू. श्रीदत्तमहाराजजीका सत्कार समारंभ
और मानपत्र समर्पण

अध्यक्ष : श्रीशंकराचार्य करवीरपीठाधीश्वर
श्री. प. प. विद्याशंकरभारती स्वामीमहाराज

शुक्रवार दि. ११ मई से गुरुवार दि. १७ मई १९९०

प्रतिदिन प्रातः ७.३० से १२ : चतुर्वेद पारायण हवन, श्रीगुरुचरित्र, भागवत, रामायण, ज्ञानेश्वरी, गाथा, दासबोध, प्रस्थानत्रयी, श्री. प. प. टेंबे स्वामीमहाराज के समग्र वाङ्मय इ. प्रसादिक ग्रंथों के पारायण और अखंड नाम सप्ताहादि कार्यक्रम संपन्न होंगे।

शनिवार, दि. १२ मई से बुधवार, दि. १६ मई १९९०

प्रातः ८ से १२ : १. श्रौतयाग २. शतचंडी पाठ

स्थान : श्री वासुदेव निवास, कर्वेपथ , पुणे ४११ ००४.

श्री. वामन निवासात हे संपूर्ण कार्य पार पडले. पलीकडील मोकळ्या जागेत भव्य मांडव घातला होता. वामननिवासातील व्यासपीठावर प. पू. श्रीगुळवणी महाराज, प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराज, प. प. श्रीलोकनाथतीर्थ स्वामी महाराज, प. प. श्रीदीक्षीत स्वामीमहाराज यांची तैलचित्रे लावली होती. श्री. वासुदेव निवासात मंडप घालून वेदमूर्ती राजाराम अग्निहोत्री यांच्या सूचनेप्रमाणे श्रौत यागासाठी कुंडे बांधली गेली. वामन निवासा बाहेरील मंडपात भजन, प्रवचन, कीर्तन असे कार्यक्रम सतत आठवडाभर चालू होते. यज्ञकुंडे वामननिवासाच्या परिसरांत घातली होती. अनेक मान्यवर ऋत्विज गावोगावाहून आले होते. दिगंबरांची धुन चालू होती. त्या नामघोषाने सारा वामन निवास दुमदुमत होता.

वासुदेव निवासात होणाऱ्या यष्टी

तीन कुंडाची नावे -- **१) गार्हपत्य २) आहवनीय ३) दक्षिणाग्नि**

मंगळवार दि. ११ मे ते शुक्रवार दि. १६ मे पर्यंत वेगवेगळ्या काम्य यष्ट्या झाल्या त्यांची नावे पुढीलप्रमाणे - १) पापक्षय करणारी वैधानरेष्टि २) व्रातपतीष्टी आत्मशुद्धी करणारी ३) परमेश्वराचे प्रेम संपादन करुन देणारी पवित्रेष्टी ४) प. पू. श्रीदत्तमहाराजांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे. त्या जन्मनक्षत्राची यष्टी ५) आयुकामेष्टी ६) शत्रूंचा पराजय करुन सन्मित्र प्राप्त करुन देणारी मित्रविनदेष्टी ७) अग्नि व अनुमती या दोन देवतांचे याग. अशा तऱ्हेने वेदोमूर्ती श्रीराजाराम कुलकर्णी यानी शास्त्रोक्त पद्धतीने कार्य यथासांग पार पाडले.

वामन निवास मोठा देखणा दिसत होता. सर्वत्र सोडलेल्या झेंडूच्या माळा. सजविलेला सभामंडप सारे कसे आखीव, रेखीव शोभत होते. सर्व विश्वस्त व आश्रमवासीय लोकांची धडपड व सेवा अखंड चालू होती. पुण्यातील व पुण्याबाहेरील मंडळी झटून सेवा करीत होती. वामन निवास गजबजून गेला. गावोगावीचे लोक येऊ लागले. त्यांचे स्वागत स्वागत-समिती करीतच होती. एकमेकांना भेटल्यामुळे व प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनाने सर्व मंडळी अगदी आनंदात होती. सनई चौघड्याचे मंगल सूर कानाला सुखद वाटत होते.

पुण्याहवाचन

शुक्रवार दि ११ मे १९९०

भारतीय संस्कृतीत प्रत्येक धार्मिक आणि मंगल सोहळ्याची सुरुवात पुण्याहवाचनाने होते. पुण्य याचा अर्थ 'पुण्यकारक' 'अह' म्हणजे दिवस, वाचन म्हणजे म्हणणे. ज्योतिषशास्त्रदृष्ट्या उत्तम दिवस पाहून कोणताही कार्यक्रम ठरविला

जातो. तरीसुद्धा विद्वान ब्राह्मणानी तो 'पुण्याह' असे म्हटले की त्यावर योग्यतेचे शिक्कामोर्तब होते. अधिकारी गुरुजींकडून हे पुण्याहवाचन केले जाते. हे कर्म समृद्ध संपन्न व्हावे असा त्यांच्याकडून आशीर्वाद घेतला जातो.

'पार्वती परमेश्वर । तयापदी नमस्कार' ती. प. पू. श्रीदत्तमहाराज व प. पू. सौ. आईसाहेब या शिवशक्तीरुप असलेल्या ज्ञानवृद्ध, तपोवृद्ध अशा दंपतीला पाहून कुणाचेही हात वंदनासाठी जोडले जात होते व नतमस्तक होत होते. संसाराला परमार्थाचा आधार देऊन तो परमार्थमय केला. अशा महाराजांकडे बघताना ते देवरुप आहेत याची खात्री पटत होती. आपण त्यांच्या अंतरंगाची थोरवी जाणत नसल्यामुळे मूकपणे त्यांना वंदन करणे हेच उचित आहे.

यादिवशी ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद या चारही वेदांचे समग्र अध्ययन केलेले चार शाखांचे वैदिक ब्राह्मण उपस्थित होते. त्यांनी प. पू. श्रीमहाराजांना आशिर्वाद दिले. हा पुण्याहवाचन शुभारंभ सर्वांच्या नेत्राला, अंतराला, सुख, समाधान, शांती देणारा ठरला.

यज्ञयाग

म्हणोनी स्वधर्मानुष्ठान । ते अखंड यज्ञ याजन ।
जो करी तया बंधन कहीच नाही ।। ८३/३ ज्ञाने.

हा लोकु कर्मे बांधिला । जो परतंत्रा भुतला ।
तो नित्य यज्ञाते चुकला । म्हणोनिया।। ८४/३ ज्ञाने.

प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या जीवनात स्वधर्मानुष्ठान सतत चालू आहे. नित्यनैमित्तिक कर्मानुष्ठान अखंड चालू आहे. मिळालेली सर्व संपत्ति हे हवनद्रव्य मानून आदिपुरुषाच्या चरणी अर्पण करण्याची क्रियाही चालू आहे. त्यांचे जीवन हा एक यज्ञ आहे. असे असूनसुद्धा या सोहळ्यामध्ये पंचयाग करण्यात आले. ते जनकल्याणासाठीच! सर्व वातावरण वेदोक्तमंत्रांच्या सूक्ष्म ध्वनी लहरीनी शुद्ध व्हावे, सारा आसमंत सत्वगुणांच्या लहरीनी भरुन जावा यासाठी हे यज्ञयाग अशा सोहळ्यात मुद्दाम आयोजित केले जातात. यज्ञ याचा अर्थ शुद्धीकरण. सर्वाना समान पातळीवर आणणारी महान संस्था म्हणजे यज्ञ. सर्व आसक्तीचे आणि दुष्टप्रवृत्तीचे हवन करणारी अग्नीशिखा! म्हणून अशावेळी यज्ञ केले जातात.

कुंकुमार्चनाने सुरुवात झाली. १) गणेशयाग, २) विष्णुयाग, ३) रुद्रयाग, ४) सौरयाग, ५) देवीयाग, ६) दत्तयाग, ७) सप्तशतीयाग, ८) श्री भागवताच्या दशमस्कंधाचे हवन. या सर्व यागांची पूर्णाहुति अग्नीवर गाईच्या तुपाची संततधार धरून करण्यात आली. यज्ञपुरुषाच्या चरणी हे सर्व अर्पण झाले. सर्वे सुखिनः सन्तु असे म्हणताना यज्ञसोहळा परिपूर्ण झाला.

अनेक ग्रंथांची पारायणे, अखंड नामस्मरण, कुंकुमार्चन, मंत्रजागर असे अनेक कार्यक्रम सकाळच्या वेळात होत होते. मन, वाणी, कान डोळे सर्व इंद्रियाना तृप्तता येत होती. साधक वर्गाला ही एक वेगळ्या प्रकारची मेजवानीच होती. डोळ्यांनी प. पू. श्रीदत्तमहाराजांचे दर्शन घेऊन तृप्त व्हावे, कानानी थोरांची प्रवचने, वेदघोष ऐकून पवित्र व्हावे, मुखाने नाम घ्यावे, मनाने गुरुदेवांच्या या सोहळ्याशी तद्रूप व्हावे. रसनेने प्रसाद ग्रहण करावा. अनंत रुपानी आलेल्या थोर विद्वानाना पाहून हात जोडले जावेत. पायांनी वामन निवासाला प्रदक्षिणा घालावी अशी सर्व इंद्रिये तृप्त करणारा सोहळा सुरु होता. कितीतरी दिवस या समारंभाचे पडसाद प्रत्येक भक्ताच्या मनावर उमटलेले होते.

अन्नदान

जिही यज्ञु सिद्धि जाये । परेषा तोषु होये ।
ते हे सामान्य अन्न न होणे म्हणोनिया ।। ३/१३२ ज्ञाने.

हे न म्हणावे साधारण । अन्न ब्रह्मरुप जाण ।
जे जीवन हेतु कारण । विश्वा यया । ३/१३३ ज्ञाने.

श्रीज्ञानदेवानी आपल्या ज्ञानेश्वरीतील तिसऱ्या अध्यायात वरील ओव्या उद्धृत केल्या आहेत. त्यांत अन्नाचे अनन्यसाधारण महत्त्व सांगितले आहे. अन्न हे ब्रह्मरुप आहे, यज्ञकर्म आहे, भगवंत या अन्नदानामुळे संतुष्ट होतो असे हे अन्न सामान्य समजू नये असे प्रत्यक्ष देवाचेच म्हणणे आहे. यामुळे सर्व संताना दोन गोष्टींचे महत्त्व फार वाटत असते. १) सतत भगवंताचे नामस्मरण २) अन्नदान. याही उत्सवात रोज दोन ते अडीच हजार माणसे महाप्रसादाने तृप्त होत होती. अन्नपूर्णा प्रसन्न होती. तिची प्रथम पूजा केलेली होती. गुरुकृपा असल्यावर सर्व समृद्धीच असते. कशाचीच उणीव रहात नाही. आपल्याला गुरुचरित्रातील भास्कर ब्राह्मणाची गोष्ट माहीत आहेच. अशावेळी ती गोष्ट आठवते. तीन पात्रांची सामुग्री सर्व वाडीगावाला पुरली. या वामन निवासात गुरुकृपाच वहात होती. संपन्नता सर्वत्र पसरली होती जे असेल ते पक्वान्न पहिल्या पंक्तीपासून शेवटच्या पंक्तीपर्यंत वाढले जात होते. अन्नाला रुचि होती. वखवख नव्हती. प्रसाद ग्रहण केला की या शुद्ध पवित्र अन्नाचे वेगळेपण जाणवत होते. श्री वासुदेवराव करंबेळकर हे नेहमीचे प्रसाद करणारे पाककुशल. हजारो पाने त्यांच्या हातून जेवलेली. अशा सिद्धहस्ताकडून शिजलेले अन्न पुरवठ्याला येत होते. श्रीज्ञानेश्वर सहाव्या अध्यायात म्हणतात

सहजे ब्रह्मरसाचे पारणे। केले अर्जुनालागी नारायणे ।
की तेचि अवसरी पाहुणे । पातलो आम्ही ।। ६/२ ज्ञाने.

खरेच ब्रह्मरस वहात होता. ईशशक्तीच्या सामर्थ्याने उत्सव सुरु होता. आमचे भाग्य थोर म्हणून त्यावेळी आम्ही हजर होतो. हजारो लोकांच्या पंक्तीवर पंक्ती उठत होत्या. तरीही स्वयंसेवक कोणीही दमले नव्हते. सारे काही शांतपणे सुरु होते. आठ दिवस हे अन्नसंतर्पण चालू होते. यज्ञ, दान व नाम या त्रिवेणी संगमामुळे वामननिवास तीर्थरुप झाला होता.

कुमारिका पूजन

ज्या शारदादेवीने प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या मुखातून हजारो भागवत सप्ताह केले व अनेकांना सन्मार्गगामी केले. त्या शारदेचे कुमारीकांच्या रुपाने प. पू. श्रीदत्तमहाराजांनी पूजन केले. वामन निवासात साठ सत्तर कुमारिका सुरेख पोषाख घालून नटून थटून ओळीने बसल्या होत्या. श्री शारदेची शक्तीरुपे पाहून कोणाचेही मन आनंदित होत होते. प. पू. श्रीदत्तमहाराजांनी प्रत्येक बालिकेचे पूजन केले. तेव्हां त्या छोट्या बालिकांना खूप आनंद होत होता. सर्वांना वस्त्रे, हळदकुंकू, फुले, अत्तर, गुलाब, पेढे, नारळ देऊन त्यांचे पूजन केले. प. पू. श्रीमहाराजांना त्या जगन्माताच वाटत असाव्यात. ते स्वतः एवढे तन्मय होऊन गेले होते. त्यांचे लक्ष कोठेच नव्हते. प्रत्येकीला नमस्कार करताना त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव फार प्रसन्न होते.

ती. सौ. आईसाहेबांचे सौभाग्यवायनदान

ती. सौ. आईसाहेब कुंकुमार्चनाचा कार्यक्रम रोज करीत होत्या.याशिवाय ऐक्याऐंशी सुवासिनीना साडीचोळी देऊन त्यांची ओटी भरली. हा सुद्धा सोहळा आईसाहेबांच्या आयुष्यात भाग्याचाच होता आणि बघणाऱ्याच्या नेत्राचे पारणे फेडणारा होता.

कृतज्ञतेचा दिवस

गुरुवार दि. १० मे १९९०

सहस्त्रचंद्रदर्शन शांती सोहळ्याचा आधीचा दिवस. आजची पहाट काही वेगळे नवे रुप धारण केल्यासारखी वाटत होती. हा उषःकाल उत्साहाचे वातावरण निर्माण करत होता. रम्य प्रभात सांगत होती. 'आज या पुण्यनगरीत एक आत्मतृप्त, थोर, विद्वान अशा सत्पुरुषाच्या महन्मंगल उत्सवास सुरुवात होणार आहे.' पुणे हे संस्कृतीचे माहेरघर. ऐतिहासिक दृष्ट्या प्रसिद्ध अशा या शहराने कितीतरी पुण्यवान्, कलावान लोकांच्या जीवनगाथा आपल्या अंतरंगात सामावून घेतल्या आहेत. ज्ञानेश्वर, तुकाराम यांच्या नामसंकीर्तनाने पुण्याचा परिसर सदैव दुमदुमलेला असतो. अशी पुण्यनगरी मोठी सुखावून गेली होती. मुंबईच्या काही भक्तमंडळीनी प. पू.

श्रीमहाराज व अध्यक्ष यांच्या परवानगीने छोटासा पुण्यस्मरणाचा कार्यक्रम आयोजित करण्याचे ठरवले. प. पू. श्रीदत्तमहाराज मातृपितृभक्त आहेतच. ते गुरुभक्त आहेत. त्यांच्या जीवनात संतपुरुषांचे आशीर्वाद आहेत. त्या सर्व पुण्यशील अशा थोरांचे स्मरण करुन त्यांना वंदन केले तर ते अधिक चांगले होईल. श्रीगुरुमहाराजांना ते आवडेल असे वाटले. वामननिवासातील गॅलरीत बैठक व्यवस्था करुन प. पू. श्रीदत्तमहाराजांचे आईवडिल, गुरुमहाराज, दीक्षितस्वामीमहाराज, लोकनाथतीर्थस्वामी महाराज यांच्या प्रतिमा ओळीने मांडून त्यांना सुंदर हार घातले. समई व उदबत्या लावून वातावरण निर्मिती केली. प. पू. श्रीदत्तमहाराज, ती. सौ. आईसाहेब, प. पू. सौ. ताईमहाराज यांच्यासाठी आसने व लोडांची व्यवस्था केली. सर्वांचे प्रार्थनापूर्वक स्मरण केले. त्याकरता केलेली काव्यरुपी भावांजली सौ. सुमनताई व सौ. सुलभाताई यानी सुस्वर आवाजात म्हटली. प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या मातोश्री कै. सौ. सरस्वतीबाई यांच्या नावे सर्व सौभाग्यवायन प. पू. सौ. ताईमहाराजांना अर्पण करुन त्यांची ओटी भरली. प. पू. श्रीमहाराजांच्या पिताजींच्या स्मरणार्थ धोतर, उपरणे, श्रीफल सौ. ताईमहाराजांच्या यजमानांना दिले. प. प. श्रीदीक्षितस्वामीमहाराज, लोकनाथतीर्थस्वामी, श्रीगुरुमहाराज ह्याच्यासाठी आणलेली महावस्त्रे व श्रीफळ प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या चरणी योग्य त्या व्यक्तीना देण्यासाठी अर्पण केले. प. पू. श्रीदत्तमहाराज आईसाहेब याना औक्षण केले. हार घालून श्रीफळ दिले. वातावरणाला भावनोत्कटतेचा स्पर्श झाला होता. प. पू. श्रीदत्तमहाराजांना या सर्वांच्या स्मरणाने अतिशय समाधान झाले. इतकेच काय त्यांचे कोमल हळुवार मन मातेच्या आठवणीने भरुन आले. डोळ्यातून भक्तीयुक्त प्रेमाश्रू आले. या प्रसंगाने पहाणाऱ्याची मनेसुद्धा गहिवरुन आली. संत मनाने किती निर्मळ, शुध्द अंतःकरणाचे, वडीलधाऱ्यांबद्दल अतिशय कृतज्ञता बाळगणारे असतात हे प्रत्यक्ष उदाहरण पाहून एक सात्त्विकतेचा ठसा मनावर उमटला. आपण केलेल्या अत्यल्प अशा कृतीचा श्रीदत्तमहाराजांना आनंद झाला हे पाहून भक्तमंडळीना बरे वाटले. या दुर्वादलाच्या स्वीकाराने चित्ताला प्रसन्नता आली. त्यांच्या मनाला आवडेल अशी सेवा घडू दे अशीच प्रत्येक भक्ताची इच्छा होती आणि त्याचा स्वीकार महाराज करत होते. प्रसन्न मनोभावनेने उत्सवाला काही वेगळेच तेज आले होते. ते तेज विजेच्या रोषणाईसारखे नव्हते तर निरांजनातील ज्योतीसारखे आल्हाददायक होते.

'दीपज्योती म्हणू नये धाकुटी, सद्‌बुद्धी म्हणू नये थोकटी' श्री ज्ञानेश्वरांच्या या ओवीप्रमाणे प्रत्येकाच्या मनातील अनंत ज्योती ईश्वरभक्तीचा नंदादीप सदा तेवता ठेवण्यासाठी गुरुचरणापाशी ईश्वरनिष्ठ बुद्धीची प्रार्थना करीत होत्या. या विश्वाच्या अणूरेणूत भरलेल्या विश्वंभराची प्रार्थना करीत होते. 'गगन सदन तेजोमय' या बोलांची प्रचिती येथे साकारली होती.

आता हृदय हे आपुले। चौफाळुनिया भले। वरी बैसवू पाऊले श्रीगुरुंची ॥ ज्ञा. १५/१

वामन निवासांत व्यासपीठावर पांरपारिक असा मोठा देव्हारा ठेवला होता. हा देव्हारा थोर उपासक श्री. आबासाहेब पटवर्धन यांनी मुद्दाम या उत्सवासाठी दिला होता. हा देव्हारा म्हणजे जणू प. पू. श्रीदत्तमहाराजांचे मनोमंदीर होते. प. पू. श्रीवामनरावजी गुळवणीमहाराजांनी त्याना पुत्रवत् मानले. 'ये हृदयीचे ते हृदयी घातले। द्वैत न मोडिता केले आपणासारखे तात्काळा' अशा श्रीगुरुमहाराजांची 'पदकमले' या देव्हाऱ्यात दत्तात्रेयांसह विराजमान झाली.

प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या हृदयांत या पादुकांचे मानसपूजन अखंड चालू आहे. पुण्याहवाचनाच्या दिवशी देव्हाऱ्यातील या पादुका प. पू. श्रीदत्तमहाराजांचा सर्व सोहळा बघण्यासाठी व आशिर्वाद देण्यासाठी प्रत्यक्ष रुपाने स्थानापन्न झाल्या. या देव्हाऱ्याच्या दोन बाजूला तक्ते लावले होते. एका तक्त्यावर मध्यभागी प. पू. श्रीदत्तमहारांजाचा फोटो बसविला होता. त्याच्याभोवती दहा पैशाची हजार नवी नाणी अशा खुबीने बसविली होती की दुरुन तो पौर्णिमेचा चंद्रच वाटावा. चांद्रमासाप्रमाणे एक हजार चंद्र कसे पाहिले जातात हे त्यात दाखविले होते. दुसऱ्या तक्त्यावर ८१ हा मोठा आकडा काढून त्यावर सौर वर्षाप्रमाणे एक हजार चंद्र कसे पाहिले जातात ते आकडेवारीने दाखविले होते. हे अभूतपूर्व तक्ते नागपूरचे श्री. दिवाणजी यांनी पाचसहा महिने परिश्रम घेऊन तयार केले होते. सर्व भक्त मंडळी या शांतीच्या निमित्याने सात्विक बुद्धीने गुरुपूजन करीत होती. सामुदायिक मानस अर्चन घडत होते.

*



पं. धुंडीराज दातेशास्त्र्यांविषयी थोडेसे

शुक्रवार दि. ११ मे १९९०

पं. श्रीदातेशास्त्री पंचांगकर्ते म्हणून सुपरिचित आहेत. महाराष्ट्रातल्या या प्रमुख पंचांगकर्त्याला पंचाहत्तर वर्षे पूर्ण झाली. त्यावेळी सर्व लोकानी फार मोठ्या प्रमाणावर सत्कार सोहळे साजरे केले. सोलापूरच्या नागरिकानी त्यांच्या घरी त्यांचा भव्य सत्कार केला. शांत, प्रसन्न आणि मितभाषी श्रीदातेशास्त्री धर्मशास्त्राचा चालता बोलता ज्ञानकोश आहे. असे त्यावेळी झालेल्या भाषणात सांगितले गेले. ''आजपर्यंत होऊन गेलेल्या सर्व संतानी अशा धर्मावर भर दिला आहे. स्वधर्माचे व्यवस्थित ज्ञान करून घेऊन त्याप्रमाणे आपले आचरण ठेवून आपले ऐहिक व पारमार्थिक कल्याण साधून घेतले पाहिजे.'' असे सत्काराला उत्तर देताना पं. दातेशास्त्रींनी प्रतिपादन केले. आपला मुद्दा अधिक स्पष्टपणे मांडताना त्यांनी साध्या वाटणाऱ्या जानव्याचे उदाहरण दिले.

जानव्याचे महत्त्व : व्यवहारात आपण निरनिराळी प्रतिके मानतो. त्याप्रमाणे जानवे, चार वेद, सहा शास्त्रे, अठरा पुराणे आणि सोळा मूलद्रव्यांचे प्रतिक आहे. जानव्याचे तीन पदर हे ब्रह्मा, विष्णू, महेशाचे तर जानव्याची गाठ हे अद्वैताचे प्रतीक आहे. असे धर्माचे महत्त्व त्यांनी आपल्या भाषणात सांगितले.

वेगवेगळ्या प्रकारची अनुष्ठाने व यज्ञ हा कार्यक्रम सकाळच्यावेळी होत असे. दुपारी सत्कार व ज्ञानसत्र होत असे. पहिल्या दिवशी गौरवसमितीचे अध्यक्ष पं. श्रीधुंडीराजशास्त्री दाते यांनी आपले ज्ञानपुष्प गुंफले. त्यांचा विषय होता शक्तिपात संप्रदायात आचारांचे महत्त्व. 'आचार प्रभवो धर्म' पं. दातेशास्त्री या सुवचनाचे मूर्तिमंत उदाहरण आहेत.

श्री. कृष्णाजी गोविंद आर्वीकर

सहस्त्रचंद्रदर्शन शांती सत्कार समितीचे श्री. कृष्णाजी गोविंद आर्वीकर हे कार्यवाह होते. यांचे वास्तव्य सध्या नागपूर येथे असते. आश्रमात वेदविद्या शिकायला १०/१२ वर्षे त्यांचे वास्तव्य होते. आश्रमातील वैदिक कार्याचे आचार्यपद यांच्याकडे असते. नागपूरला वडिलोपार्जित वैदिक पाठशाळा आहे. घरी स्मार्ताग्नी आहे पाठशाळेत ५।६ विद्यार्थी आहेत. त्यांची राहण्याची सोय आर्वीकर त्यांच्या घरी करतात. सनातन वैदिक संस्कृती राखणे हा त्यांच्या जीवनाचा उद्देश आहे. प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराजांची स्तोत्रे पाठ करण्यास सांगून मुलांच्या स्पर्धा घेतात. श्री वासुदेवानंदांच्या प्रासादिक स्तोत्रांचा प्रचार होतो व लहान मुलांच्या तोंडी संस्कृत भाषा राहून वाणीला उच्चाराचे चांगले वळण लागते. विद्यार्थी वर्गाला आवश्यक असे उपयुक्त काम श्री. आर्वीकर करीत आहेत. अशी अनेक लहान मोठी कामे आश्रमाची म्हणून करत असतात.

विशेष सांगावयाचे म्हणजे वैदिक परंपरेची ही त्यांची १२ वी पिढी आहे. श्री. कृष्णराव आर्वीकरांच्या घराशी त्यांच्या आजोबांपासून प. पू. श्रीगुळवणीमहाराजांचा व प. पू. श्रीदत्तमहाराजांचा संबंध आलेला आहे.

श्री. दत्तात्रय मनोहर सप्रे

यानी याज्ञिकीचे पूर्ण शिक्षण घेतेलेले आहे. त्यांचे शालेय शिक्षण दहावी उत्तीर्ण असून त्यांच्या चित्रकलेच्या काही परिक्षाही झाल्या आहेत. १९७६ ते १९८५ हे आश्रमात होते. वेदोमूर्ती श्रीआप्पा कोडणीकर यांचेकडे शिक्षण घेतले आहे. कमला नेहरु पार्क येथील दत्तमंदिरात ते पुजारी आहेत. आश्रमातील विविध धार्मिक कार्यात त्यांचा पुढाकार असतो.



सात दिवसांचे ज्ञानसत्र

प्रसन्न पारिजात ग्रंथ प्रकाशन

शुक्रवार दि. ११ मे १९९०

प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या या शांती उत्सवानिमित्त डॉ. केरुर यांनी एक गौरव ग्रंथ प्रसिद्ध केला. या गौरव ग्रंथाचे नावच प्रसन्न पारिजात असे आहे. नाव खूप बोलके आहे. पुण्यातील विद्वान पंडितांनी त्यात लेखदान केले आहे. प. पू. श्रीदत्तमहाराजांचे जीवन प्रसन्नतेनेच डवरलेले आहे. पारिजातकाच्या फुलाप्रमाणे ते सुगंधित आहे. त्यांच्या या पवित्र जीवनाचा स्पर्श त्यांच्या सहवासात येणाऱ्या प्रत्येकाच्या जीवनाला होतो. पारिजातकाचे झाड पांढऱ्या शुभ्र फुलांनी बहरलेले असते. तसेच महाराजांचे अंतःकरण सात्विक अशा अमृतानुभवाने युक्त आहे. त्या तुषारांचा शिडकावा गुलाब पाण्याप्रमाणे आल्यागेल्यावर सहजतेने होतो. आणि येणाऱ्याला सुगंधित करतो. ही विद्वत्सभा ज्या दिवशी झाली त्यावेळी सर्व लेखक महाराजांचा आशीर्वाद घेण्यासाठी उपस्थित होते. या कार्यक्रमाची उंची इतकी वाढली होती की श्रोतृगणांची मने सार्थ अभिमानाने पुलकित झाली होती. सर्व विद्वान आणि थोर व्यक्तिमत्त्वानी त्या सभामंडपाचा जणू काही ताबा घेतला होता. तो परिणाम शब्दातीत होता. सत्संग, विचाराचा उच्चपणा या दैवी शक्ती आहेत. याचा प्रभाव जनमानसावर खूप पडतो हे प्रकर्षाने जाणवले.

प्रा. रा. नां. दांडेकर या प्रकाशन समारंभाचे अध्यक्ष होते. ते आपल्या भाषणात म्हणाले, ''ब्रह्मर्षि दत्तमहाराजांसारखे अध्यात्मशास्त्रांत उच्च पदवीला पोहोचलेले, ''आपणासारखे करिती तात्काळ'' असा अधिकार असलेले आणि ''आता राहिलो उपकारापुरता'' अशी वृत्ती निर्माण झालेले महाभाग आज आपल्यात आहेत हे आपले भाग्य आहे. त्यांचे स्फूर्तीदायक मार्गदर्शन आणि क्रियाशील सहवास असाच आपल्याला लाभत राहो.''

❊

प्रवचन : ह. भ. प. श्रीकिसनमहाराज साखरे

शनिवार दि. १२ मे १९९०

घराण्याने दिलेला विद्वत्तेचा वारसा, ज्ञानेश्वरीचा गाढा व्यासंग, माऊलीविषयीचे नसानसातून वाटणारे प्रेम, स्वच्छ व शुद्ध वाणी आणि विषयावरचे प्रभुत्व यासारख्या गुणांनी नटलेले श्रीसाखरेमहाराजांचे प्रवचन म्हणजे बुद्धीला फार मोठे खाद्य होते. त्यांनी मांडलेले विचार उच्च दर्जाचे होते आणि अनेक दृष्टान्तांच्या सहाय्यांनी त्यानी ते सुलभ करून सांगितले.

प्रवचन : प. पू. श्रीनित्यबोधानंदतीर्थ स्वामी

रविवार दि. १३ मे १९९०

शक्तिपात संप्रदायाचे अधिकारी शिवोऽम्तीर्थ यांचे शिष्य. श्रीनित्यबोधानंदतीर्थ यांचे प्रवचन हेतुपुरःस्सर आयोजित केले होते. प. पू. श्रीगुळवणी महाराजांनी १९६७ साली त्यांना शक्तिपात दीक्षा दिली व शिवोऽम्तीर्थानी संन्यास दीक्षा दिली. त्यानी आपली प्राचार्याची नोकरी सोडून देऊन या कार्याला वाहून घेतले आहे. मराठी, हिंदी, गुजराथी, तेलगु, इंग्रजी अशा विविध भाषात त्यांनी लेखन केले आहे. सध्या मुंबईजवळील दहीसर परिसरातील नेवाळी या खेडेगावात गुरुंच्या आश्रमांची संपूर्ण जबाबदारी ते संभाळत आहेत.

शक्तिपात सांप्रदायाचे महत्त्व सांगताना ते म्हणाले की, हा बोलण्याचा संप्रदाय नाही तर अनुभूतीचा विषय आहे.

प्रचितीवीण जे बोलणे। ते अवघेचि कंटाळवाणे।
जैसे तोंड पसरूनि सुणे। ओरडोनि गेले ।।

या ओवीचा दृष्टान्त त्यानी दिला. गुरूचे सामर्थ्यही ''गुरुविना ब्रह्मनान्यात'' अशा समर्पक शब्दात त्यांनी सांगितले. गुरू ही व्यक्ती नसून शक्ति आहे असे ते म्हणाले. ही शक्ति धारण करणारे मंदीर म्हणजे गुरूशरीर. गुरुजवळची शक्ति शिष्यात संक्रमित झाली की आपले मन, बुद्धी, चित्त, अहंकार सोडून आत्म्याशी संवाद साधते. शिष्यांत कुंडलिनीशक्ति जागृत होते. पण हे गुरुकृपा प्रसादाशिवाय शक्य नाही.

जयाचेनि कृपा तुषारे। परतले अविद्येचे मोहरे । अशा शब्दात गुरू महात्म्य सांगितले. नित्यबोधानंदांचे मार्गदर्शनपर भाषण व पहाटेचे साधन हेतुपुरःस्सर ठेवले होते.

भाषण : शब्दप्रभू प्राचार्य शिवाजीराव भोसले

त्यांचा विषय विज्ञानयुगातील परमार्थ साधना असा होता. सुरुवातीलाच त्यांनी सर्वांची मने जिंकली. त्यांच्या अस्खलित, प्रभावी, प्रवाही, परिणामकारक शैलीने श्रोत्यांना खिळवून ठेवले. महाराजांच्या रुपाने परमार्थाचा वस्तुपाठच आपल्यापुढे आहे असे ते म्हणाले. या भाषणानंतर श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.



प्रवचन : डॉ. शरदचंद्र कोपर्डेकर

सोमवार दि. १४ मे १९९०

ज्ञानेश्वरीतील आपल्या प्रवचनात श्री कोपर्डेकर म्हणातात, ''ज्ञानेश्वरी हा केवळ तत्वज्ञानाचा ग्रंथ नसून जगातील अत्यंत श्रेष्ठ असा काव्यग्रंथही आहे.'' भगवंताच्या मनातले हृद्‌गत त्यांनी स्पष्ट केले आहे. ज्ञानेश्वरीत कर्ममार्ग, ज्ञानमार्ग आणि भक्तिमार्ग या तिहींचा उत्तम संगम झालेला आहे. आत्यंतिक प्रेमाने भगवंताला आळवले पाहिजे. त्यासाठी विवेकाचे अधिष्ठान हवें. एका ईश्वराशिवाय सर्व नाशिवंत आहे ही जाणीव झाली की शाश्वत अशा भगवतप्रेमाची प्राप्ती होते. प्रत्येक कर्म ईश्वरार्पण करावे. आपल्या हृदयांत जर भगवंताचे अधिष्ठान असले तर व्यावहारिक सुखदुःखाच्या घटनांनी आपली शांती ढळत नाही. ज्ञानेश्वरीत वर्णन केलेली ज्ञानी महात्म्यांची सर्व लक्षणे आपल्याला प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या ठिकाणी दिसून येतात.

प्रवचन : पं. भालचंद्रशास्त्री मुळे

यादिवशीचे दुसरे व्याख्यान नासिकचे पं. मुळेशास्त्री यांचे होते. त्यानी आपले मौलिक विचार श्रोत्यांना मुक्त हस्ताने दिले. ''उच्च गतीला नेणारा धर्म समजण्यासाठी ज्ञानाची गरज आहे आणि ज्ञानासाठी महापुरुषाची गरज आहे.

भौतिक विज्ञानाच्या घोडदौडीने थकलेला समाज शांत सावलीच्या कल्पवृक्षाच्या शोधात आहे. श्रीदत्तमहाराजांसारखे कल्पवृक्ष पूर्वसंचिताने कुठेतरी लाभतात. त्यांच्या सहवासात चित्त चैतन्यमय बनते. मनोनिग्रह साधता येतो. परमार्थपर पुस्तके फॅशन म्हणून नुसती वाचून चित्त एकाग्र होणार नाही. ज्ञानेश्वरी जगता आली पाहिजे.

'सर्वावस्थासु भगवद् भक्ति', साधनेच्या सर्व प्रवासात भगवत्‌भक्ति कठड्यासारखी भक्कम आधार देते. माणसे धनाची अपेक्षा करतात व मनाची उपेक्षा करतात. हे मनरुपी धन परमेश्वराच्या कधीही न बुडणाऱ्या बँकेत ठेवावे. समारोप करताना ते म्हणाले, ''परमेश्वरापासून मनानी, विचारांनी दूर न जाण्याची अविचल श्रद्धा हीच ब्रह्मपद प्राप्तीचा सोपान आहे.''

गुरुभक्त श्री. अच्युतराव पोटभरे यांचे विशेष कार्य

श्री. अच्युतराव पोटभरे हे स्वतः शिक्षक होते. श्रीगुळवणीमहाराज गोवईकरांच्या चाळीत रहात असत तेव्हांपासून त्यांचा श्रीगुरुमहाराजांशी सहवास होता. त्यांची उल्लेखनीय कामगिरी म्हणजे चार खंडात लिहिलेले श्रीगुरूमहाराजांचे चरित्र.

प. पू. श्रीगुळवणीमहाराजांना पूर्वी आलेली लाखो पत्रे वाचून त्यांची संपूर्ण वर्गवारी त्यानी केली. हे काम अत्यंत जिकीरीचे होते. त्या पत्रांवरून पत्ते काढून त्यांनी त्या पत्राला श्रीगुरूमहाराजांनी दिलेली उत्तरेही मागवून घेतली. त्या हजारो पत्रोत्तरामधून प. पू. श्रीगुरुमहाराजांच्या चरित्राच्या माहित नसलेल्या अशा कितीतरी महत्त्वपूर्ण गोष्टींवर प्रकाश पडला. श्रीगुरुमहाराजांच्या अपार अशा लोकसंग्रहाची कल्पना आली. या कामाकरता ते आश्रमातच वास्तव्याला राहीले होते. हे काम फार जबाबदारीचे होते. ''सप्रेम आशीर्वाद'' हे श्रीगुरुमहाराजांच्या काही मार्गदर्शक उत्तरांचे त्यानी पुस्तक तयार केले. ''साधक सदगुरु संवाद'' असे प्रश्नोत्तरांचे दोन भाग काढले. श्री. लोकनाथतीर्थ स्वामीमहाराजांचे चरित्र लेखन केले. ही सर्व प्रकाशने वासुदेव निवास विश्वस्तानी अगत्यपूर्वक केली आहेत. ही त्यांची कामगिरी अजोड आहे. त्यामुळे श्रीगुरुमहाराजांच्या व्यापक चरित्राची कल्पना येते. त्यांना कृतज्ञतेने धन्यवाद.

परिसंवाद व विशेष अंकाचे प्रकाशन

विज्ञानयुगात संस्काराची आवश्यकता आहे की नाही या विषयावर परिसंवाद झाला. संध्याकाळी प. पू. श्रीदत्तमहाराज वासुदेव निवास विशेष अंकाचे प्रकाशन झाले. गुरुभक्त श्री. अच्युतराव पोटभरे यांनी हा अंक विशेष काळजीपूर्वक काढला होता. तो सर्वांच्या कौतुकास पात्र झाला. प. पू. श्रीनित्यबोधानंदतीर्थ यांनी या त्रैमासिकाचे प्रकाशन केले. गुरुभक्त श्री. अच्युतराव पोटभरे यांचा सत्कार करण्यात आला.

धर्मभूषण श्री. सु. ग. शेवडे यांचे व्याख्यान

मंगळवार दि. १५ मे १९९०

उत्तम प्राध्यापक, शिक्षक, मुख्याध्यापक अशा जबाबदाऱ्या यशस्वीपणे सांभाळून व्यवसायात स्थिरावलेले पण आपल्या आयुष्याची दिशा एकदम बदलून आंतरराष्ट्रीय किर्तीचे प्रवचनकार झालेले धर्मभूषण श्री. सु. ग. शेवडे! भारतीय संस्कृतीचे महत्त्व त्यांनी परदेशातसुद्धा सांगितले.

धर्म, विज्ञान आणि अंधश्रद्धा यांचा परस्परसंबंध उलगडून दाखवताना श्री. शेवडेशास्त्री म्हणाले, ''ज्ञानदृष्टीने जगाकडे पाहिले असता जगतात सर्वत्र परब्रह्म भरलेले दिसते. वेद अपौरुषेय आहेत. विधात्याने विश्व का निर्माण केले हे वेद सांगतात. वैज्ञानिक संशोधनाने वेदाला धक्का पोचत नाही. वेदांचा हे वेद सांगतात.

वेदांचा अभ्यास करावा, ज्ञान घ्यावे व ते जगाला द्यावे ही कामगिरी एका विशिष्ट वर्गाकडे सोपविली. 'सत्य वद धर्म चर' असा उपदेश केला. विज्ञान म्हणजे विशेषज्ञान, अनुभवसिद्ध ज्ञान. जर विज्ञान पदार्थालाच सर्वस्व समजून विचार करू लागले तर गोंधळ होईल ते यथार्थ ज्ञान न होता विपरीत ज्ञान होईल. न बदलणे हे ज्ञानाचे लक्षण आहे, तर बदलणे हे विज्ञानाचे लक्षण आहे, वेदाना धरून असलेला शब्दन्‌शब्द आमच्यापर्यंत पोहोचवण्यासाठी आलेल्या महात्म्यांपैकी प. पू. श्रीदत्तमहाराज हे एक आहेत. भक्तीभावनेचे फूल ज्यांच्या पायाशी ठेवावे असे हे स्थान आहे'' अशा शब्दात प. पू. श्रीदत्तमहाराजांबद्दलचा आदर व्यक्त करून त्यांनी भाषणाचा समारोप केला.

छोटा गंधर्वाच्या गायनाने रंगून गेलेली मने

संध्याकाळी छोट्या गंधर्वाचे गायन होते. छोट्या गंधर्वाचा आवाज पहिल्याच आलापा पासून दृष्ट लागावी असा सुरेख लागला. परब्रह्माचा मार्ग नादब्रह्मातून जातो याची सर्वांना प्रत्यक्ष प्रचिती आली. संगीतातल्या विलक्षण सामर्थ्याने सर्वांच्याच मनाच्या तारा छेडल्या गेल्या. आजकाल कलावंतांची बिदागी परवडत नाही. म्हणून अनेक उत्तम कार्यक्रमांचे संयोजन करता येत नाही. पण छोट्या गंधर्वांनी मागितलेली बिदागीही लोकविलक्षणच होती. ''प. पू. श्रीटेंबेस्वामींची सर्व ग्रंथसंपदा, प. पू. श्रीदत्तमहाराजांच्याहस्ते आशीर्वाद म्हणून आपल्याला द्यावी.'' अशा कलावंताचे मन किती सश्रद्ध असेल याची कल्पना करावी लागेल. शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह व प. पू. टेंबेस्वामींची ग्रंथसंपदा असा प्रसाद त्यांना देण्यात आला.

☆

प्रवचन : डॉ. सौ. उमा देशपांडे

बुधवार दि. १६ मे १९९०

डॉ. सौ. उमा देशपांडे यानी ''श्रीरंग हृदयम्'' म्हणजेच प. पू. श्रीरंगावधूतस्वामींच्या जीवनाचा पट आपल्या व्याख्यानातून उलगडून दाखविला. प. पू. श्रीरंगावधूतस्वामी गुजराथमध्ये दत्तसांप्रदायाचा प्रचार करणारे गुरूदेवांचे गुरुबंधू होते. नारेश्वर या गावी नामस्मरणाचा आनंद लुटण्यासाठी आणि मातृभक्तीचे दिव्य रुप पाहण्यासाठी सर्वांनी एकदा अवश्य जावे. यांचे अनुभवी असे प. पू. श्रीदत्तमहाराजांवरील काव्य पुढे आहे.

प्रवचन : पं. गणेशशास्त्री द्रवीड

पं. गणेशशास्त्री द्रवीड यांचे विश्वरचना व तिला आधारभूत अशी सात तत्वे या अवघड विषयावर विद्वत्तापूर्ण प्रवचन झाले. १) गाय, २) विप्र, ३) वेद,

४) सती, ५) सत्यवक्ता ६) अलुब्ध ७) दानशील. या सात विषयांचा आपल्या भाषणात त्यांनी उहापोह केला. सतीसंबंधी उपयुक्त माहिती सांगितली. याच विषयावर २०० पानांचे माहितीपूर्ण पुस्तक लिहून मुख्यमंत्री, पंतप्रधानांपासून राष्ट्रपतींपर्यंत सर्वांना पाठविले होते आणि मत मागितले होते. पण एकही उत्तर आले नाही. याची खंत प्रगट केली.

संध्यासमयी पद्मश्री **पं. जितेन्द्र अभिषेकी** यांच्या सेवाभावी गायनाने सभागृह नाद ब्रह्मात रंगून गेले. पं. अभिषेकी हे कार्यकारी मंडळाचे उपाध्यक्षही होते.

गाय उभी ही माय होऊनी

गुरुवार दि. १७ मे १९९०

प्रत्यक्ष गाईचे दान तिच्या वत्सासह दिले असे पाहण्याची वेळ क्वचितच येत असावी. श्रीदत्तात्रेयांच्यामागे गाय उभी असते. श्रीकृष्णाला तर गाय अतिशय प्रिय. गोधन चरायला नेणारे कृष्ण व त्याचे सवंगडी यांची यावेळी आठवण झाली. आठ दहा दिवस आधी या गाई वासराला आश्रमातच आणून ठेवण्यात आले होते. गाय फार देखणी होती. तिचे छोटेसे वासरु तर अगदी गोजिरवाणे दिसत होते. आणि आईला अगदी चिकटून होते. ते दृश्य फार मनोवेधक होते. गोदान कन्यादानासारखे सालंकृत असते. गोमातेचे महत्त्व शास्त्रात वेगळे सांगितले आहे. गुरुवारी सकाळी पार पडलेला हा गोप्रदानाचा कार्यक्रम डोळ्यांचे पारणे फेडणारा झाला.

गोर्धेनुर्भव्या माता रुद्राणां दुहिता वसूनाम्।
स्वसाऽदित्यानां अमृतस्य नाभिः ।।

गोमाता एकादश रुद्रांची माता आहे. अष्टवसूंची मुलगी आहे. बारा सूर्यांची बहीण आहे आणि अमृताची खाण आहे. दान करावयाची गाय अलंकारानी युक्त होती. तिच्या शिंगाना सोन्याची टोपणे होती. गळ्यांत मोत्याचा मोठा सर होता. कंबरेला चांदीची साखळी होती. अंगावर हिरवीगार साडी. खरोखरच धेनू भाग्यलक्ष्मी वाटत होती. प. पू. श्रीमहाराजांच्या हातून दान होण्याचा योग आला हे त्या गोमातेचे केवढे भाग्य! वैदिक मंत्राचे पठण सुरु होते. सभामंडप खऱ्या अर्थाने मंत्रमुग्ध झाला होता. माझ्या मनांत विचार येत होते ही वसुंधरा गोमातेचे रुप घेऊन प. पू. श्रीमहाराजांकडे आली आहे. त्यांच्याकडे मागणे मागते आहे की या जगातील दुरितांचे तिमीर आपण नाहीसे करा. वाढलेला हिंसाचार, अप्रामाणिकपणा, लाचलुचपत यासारख्या दुष्ट प्रवृत्ति नाहीशा करुन सत्प्रवृत्ती वाढवा असे मी आपणासारख्या सतपुरुषाशिवाय कोणाकडे मागू? सर्व जग सुखी असावे असेच

विश्वमातेला वाटत असते. प. पू. श्रीमहाराजांचे भाव या गोमातेचे दान करताना कोणते असावेत? जाणणे कठीण! कामधेनूचे रुप घेऊन आलेली ही गोमाता जेथे जाईल तेथे सुखाने राहो. तिचे दुग्ध सर्वाना आरोग्यदायी होवो. खरोखरच कामधेनूप्रमाणे, दान घेणाऱ्याला हीचा उपयोग होवो. असे जरी हिताचे विचार मनात असले तरी दान देणारा मी आहे असा कर्तृत्त्वभाव अंगी असणे शक्य नाही. कारण कार्य करुन घेणारी ईशशक्ति आहे. हे जीवनात उतरवलेले सूत्र आहे.

ती. प. पू. श्रीदत्तमहाराज व प. पू. सौ. आईसाहेब या उभयतांनी गोमातेची, वत्साची पूजा केली. तिच्या पाठीवरुन प्रेमाने हात फिरवला. गोमाता धन्य झाली, कृतार्थ झाली. कारण तो प्रभूचा स्पर्श होता. अग्नीहोत्री श्री. राजारामशास्त्री कुलकर्णींना वेदमंत्रघोषात प्रदान केली. या प्रसंगी सारे कसे शांत निस्तब्ध झाले होते. प्रत्येकाच्या मनात आनंद लहरी उठल्या होत्या. या बदलत्या भावनेच्या कालौघात एवढा मोठा साग्रसंगीत शांतीमहोत्सव व्हावा याचेसुध्दा आश्चर्य वाटले व आनंदही झाला.

सहस्त्रचंद्रदर्शन विधी

शुक्रवार दि. १८ मे १९९०

हा मुख्य कार्यक्रमाचा शेवटचा दिवस. या दिवशी सकाळी सहस्त्रचंद्रदर्शन विधीचा सोहळा संपन्न झाला. ज्याच्यासाठी वर्षभर धडपड चालली होती तो हा कार्यक्रम वासुदेव निवासाच्या इतिहासात सुवर्णाक्षरानी लिहिण्यासारखा अपूर्व होता. प्रत्येक महिन्याच्या शुक्ल व्दितीयेस दिसणाऱ्या चंद्रकोरीला चंद्रदर्शन असे म्हणतात. हा चंद्र उत्तरोत्तर वृद्धींगत होणारा असतो, तसेच दीर्घायुष्य देणारा असतो. ''चंद्रमा मनसो जातः।'' चंद्र परमेश्वराच्या मनापासून निर्माण झाल्याने मनाचा कारक ग्रह चंद्र आहे. शास्त्राने ऐंशी वर्षे पूर्ण झाल्यावर हा विधी सांगितला आहे. या निमित्याने शताभिषेक केला जातो. शंभर छिद्रे असलेले रौप्यपात्र तयार करवून घेतले होते. त्यात वेदाभिमंत्रित जल घालून शतधारांनी महाराजांच्या मस्तकावर जलाभिषेक केला ते रौप्यपात्र दान दिले. ज्या ईशशक्तीच्या प्रेरणेने इतका मोठा भव्य कार्यक्रम संपन्न झाला, ती शक्ति अनंत हस्ताने हे मंगलकार्य पार पाडत होती.

अव्यक्त अशा परमात्म्याचे व्यक्त दर्शन म्हणजे हे विश्व आहे असे आपण मानतो. त्याप्रमाणे आपल्या अनासक्त अशा भक्ताचे कौतुक करण्यासाठी ही ईशशक्ति क्षणोक्षणी कशी व्यक्त होत होती हा सुद्धा आमच्या सारख्यांच्या मनाला एक अनुभवच होता. हे चैतन्याचे काम अगदी परिपूर्ण होते. कुठेही उणेपणा नव्हता.

'झडझडोनि वहिला निघ। इये भक्तीच्या वाटे लाग। तै पावसी अव्यंग। निजधाम माझे।' या ज्ञानदेवांच्या उक्तीप्रमाणे अनासक्त जीवन घालवून आणि वाणीने सतत भगवंताचे गायन करुन ते स्वतः परमात्मरुप झाले आहेत. प. पू. श्रीवामनरावजी गुळवणी महाराजांच्या सहवासात पुण्यांत अनेक वर्षे त्यांनी घालविली आहेत. आपल्या घराण्याच्या आध्यात्मिक परंपरेप्रमाणे प. पू. श्रीगुळवणीमहाराजांचा सतत सहवास महाराजांना लाभला आहे. श्रीगुरुकृपेचा वर्षाव त्यानी सतत अनुभवला आहे. त्यामुळे त्यांना परिसत्त्व लाभले आहे. अशा गुरुशिष्याच्या जोडीचे स्मरण मनापुढे सतत होत असते व त्यात कृतार्थ झाल्यासारखे वाटते.

❀

रौप्यतुलेचा सोहळा

सहस्त्रचंद्रदर्शन शांतीचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे रौप्यतुला. फार थोड्या लोकांच्या तुला होतात. थोर संतमहात्म्यांची तुला हा दुर्मिळ होणारा सोहळा आहे. तुला करण्याचा संकल्प, मंत्रपठण या सर्व गोष्टी अगदी दूरवरुन दिसाव्यात म्हणून सर्किट टी. व्ही. ची सोय केली होती. विविध पुष्पमालानी आणि रेशमी वस्त्रानी तुला सजविली होती. सभामंडप सुशोभित केला होता. मंत्रघोष चालू होता. पूजाविधी झाल्यावर तराजूला प्रदक्षिणा करुन प. पू. श्रीदत्तमहाराज दत्तात्रेयांचा फोटो हातात घेऊन तराजूत आसनस्थ झाले. दुसऱ्या पारड्यांत रौप्य टाकले जाऊ लागले. दोन्ही पारडी समान झाली. आईसाहेबांनी त्यांत तुळशीपत्र टाकून नमस्कार केला. मंडपातून एकच गजर झाला. ''श्री गुरुदेव दत्त'' मंत्रमुग्ध झालेला जनसमुदाय हेलावला. हजारो मुखानी केलेला **अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त** हा मंत्रोच्चार कितीतरी दूरवर निनादला. या शब्दलहरी अनंत आकाशात विखरून आकाशपुष्प झाल्या. ब्रह्मरुप झाल्या. सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडत होता. आणि हसऱ्या डोळ्यांतून प्रकट होत होता. एवढी प्रचंड झुंबड उडाली की लोकांना थोपविणे अशक्य झाले. अशा तऱ्हेने अतुलनीय अशा परमात्मस्वरुपाचे तोलन त्या परमात्मस्वरुपाने करुन घेतले.

❋

गौरव व सत्कार

या उत्सवात आणखी एक आगळा वेगळा कार्यक्रम साजरा झाला. श्रीशंकराचार्यांसारख्या मान्यवर व्यक्ती उत्सवाला उपस्थित होत्या. मोठमोठे विद्वान पंडीत सत्कारासाठी आले होते. पण मुंबईतील मुलांनी वाहिलेली आदरांजली हाही एक देखणा कार्यक्रम होता. या कार्यक्रमात सुमारे १० ते १२ मुलांनी भाग घेतला होता. शाळेपासून कॉलेजपर्यंत अशा श्रेणीतील ही मुले होती. त्यांच्याही कार्यक्रमाला

आखीव रेखीवपणा होता. मुलांना फक्त अर्धा तास दिला होता. त्या अर्ध्या तासात मुलांनी तो कार्यक्रम अतिशय व्यवस्थितपणे पार पडला. जनसमुदायांनी त्या मुलांचे फार कौतुक केले. मुलांवर संस्कार करावयाचा असेल तर मुलांचा सहभाग घेणे फार आवश्यक आहे. सर्व मोठ्या समारंभात मुलांची उपेक्षा होते. पण यावेळी तसे घडले नाही. शारदास्तवनाने या कार्यक्रमाला सुरुवात झाली. प्रत्येक मुलाने स्वतःच्या मनातील प. पू. श्रीदत्तमहाराजांविषयीचे भाव आपल्या वयानुरुप भाषणातून व्यक्त केले. महाराजांविषयीच्या आठवणी सांगितल्या. महाराजांचा आधार कसा वाटतो ते व्यक्त केले. एका मुलाने उपरणे पांघरुन धोतर नेसून संस्कृतमध्ये भाषण केले. मुलांना प. पू. श्रीमहाराजांसमोर कार्यक्रम करता आल्यामुळे ती उत्साही वाटत होती.

'गुरुनी दिला ज्ञानरुपी वसा। आम्ही चालवू हा पुढे वारसा ।' या उचित गीताने कार्यक्रमाचा समारोप झाला. मुलांनी प. पू. श्रीमहाराजांना श्रीफळ दिले. तसेच अध्यक्ष श्री. दातेशास्त्री यांनाही पुष्पगुच्छ देऊन सन्मानित केले. या भावपूर्ण कार्यक्रमाने उत्सवाला गोडवा आला. प. पू. श्रीमहाराजांनी मुलांचे कौतुक केले व आशीर्वादाचे भाषण केले. बघणाऱ्यांच्या नेत्रात कौतुक दाटले होते. महाराजांचे प्रेमपूर्ण भाषण ऐकून सर्वांचे डोळे ओलावले होते. मुलांच्या मनावर उमटलेला हा ठसा भविष्यात आनंद देणारा ठरेल याबद्दल खात्री वाटते. अशा संतसत्पुरुषांच्या सोहळ्यामध्ये मुलांचा कार्यक्रम ठेवल्यामुळे समारंभाला एक गोड शोभा आली. लहान थोर सर्व मंडळीचा पूर्ण सहभाग आपोआप मिळाल्यामुळे न्यूनता राहिली नाही.

सुवर्ण क्षण

ज्या क्षणाची सर्वजण आतुरतेने वाट पहात होते तो क्षण म्हणजे सत्कार समारंभ. तो क्षण जवळ येऊन ठेपला. करवीर पीठाचे शंकराचार्य यांच्या उपस्थितीत हा समारंभ साजरा होत होता. मांडव संपूर्ण भरून गेला होता. गायकवाड बंधूंच्या सनईच्या मंगल स्वरानी वातावरण भरून गेले होते. महाराजांच्या येण्याच्या मार्गावर १०२ सुवासिनी हातांत उजळलेली तबके घेऊन उभ्या होत्या. त्या स्वागताचा स्वीकार करीत प्रत्येक भगिनीला ओवाळणी घालीत श्रीमहाराज व्यासपीठाकडे येत होते. नेत्रांना सुखावणारा असा हा सुखद सोहळा होता. जमलेल्या सर्व श्रोत्यांचे मन महाराजांच्या पदकमली वंदनासाठी जाऊन केव्हांच पोचले होते. सर्वांचे नम्र भाव एकत्र झाल्यामुळे वातावरणातील एकता मनाला जाणवत होती. व्यासपीठावर हळूहळू महाराज आले. त्यांच्या पाठोपाठ दोन्ही शंकराचार्यांचे आगमन व्यासपीठावर झाले. वेगवेगळ्या ऋत्विजांनी वैदिक मंगल पठण सुरू केले. त्याबरोबर जनमानसात भावोत्कटता आली. ते भाव इतके उत्कट होते की प्रत्येकाच्या नेत्रांतून आनंदाश्रूंच्या

रुपाने प्रकट होऊ लागले. सर्वांचे हात जोडलेले होते. शब्द मूक झाले होते. हा वातावरणातील फरक होता. तो प्रत्यक्ष अनुभवण्याचा विषय आहे. त्यानंतर संस्थान कुरवपूर, नृसिंहवाडी, औदुंबर, गाणगापूर, कांचीकामकोटीचे जगत्गुरु शंकराचार्य, शृंगेरीपीठाचे शंकराचार्य, श्रीधर स्वामी संस्थान, वरदहळीकी या पवित्र धामाकडून आलेल्या आशीर्वादपर मंगलाक्षता पंडित श्रीनिवासशास्त्री यानी महाराजांच्या मस्तकावर वाहिल्या. सर्वांना समाधान वाटले. समारंभाचे अध्यक्ष, करवीर पीठाचे जगत्गुरू शंकाराचार्य विद्याशंकर भारतीमहाराज यांचा पुष्पहार, शाल, गौरवचिन्ह व श्रीफळ देऊन सत्कार केला. प्रमुख अतिथी अविच्छिन्न परंपरा कुडली शृंगेरी मठाचे श्रीमत् शंकराचार्य योगाभिनव नरसिंहभारती स्वामीमहाराज यांचा असाच सत्कार समितीचे उपाध्याय माननीय किशोरजी व्यास यांनी केला.

नंतर, आलेले संदेश वाचून दाखविण्यात आले. माननीय श्रीनिवासशास्त्री यांनी महाराजांचे संस्कृतमधून गुणगान केले. श्री. सुशीलाबाई मोडक, प. पू. श्रीदत्तमहाराजांचे धाकटे बंधू व भाऊसाहेब शिंगणे यांनी भाषणे केली.

पं. महेश्वरशास्त्री उप्पन बेट्टीगिरी धारवाडाच्या कर्नाटक कॉलेजातील संस्कृत विभागाचे प्रमुख. त्यानी संस्कृतमधून लिहिलेले मानपत्र वाचून दाखविले. त्याचा मराठी अनुवाद श्री. राजाभाऊ जोशी यानी केला.

श्रीमत् जगत्गुरु कांची कामकोटी पीठाचे परमार्थ जगतगुरू चंद्रशेखर सरस्वती स्वामीमहाराज यांच्याकडून महाराजांचा सत्कार करण्यासाठी कामाक्षीची प्रतिमा असलेली सुवर्णसाखळी व शाल आली होती. कुडली शृंगेरी मठाकडून शालजोडी आली आणि महाराजांसाठी पुणेरी पद्धतीची खास पगडी तयार करून घेण्यात आली आणि गुलाबपुष्पांचा हार अर्पण करण्यात आला. १००१ रु. ची थैली, श्रीफळ व इतर फळांचे ताट अशा सर्व गोष्टी ज्यावेळी महाराजांना देण्यात आल्या त्यावेळी खरोखरच देव, महाराजांचे मातापिता, गुरुदेव हा सर्व सोहळा पाहण्यासाठी अव्यक्त रुपांनी आलेले आहेत असे प्रत्येकाला वाटत होते. ज्या सुवर्णक्षणासाठी हजारो लोक एकत्र आले होते तो गौरवाचा क्षण जवळ येताच आपले परमभाग्य उदयाला आले असे प्रत्येकाला वाटत होते. सर्वांनी भान विसरुन टाळ्यांचा कडकडाट केला. सर्वांनी आपल्या नेत्रानी पगडी आणि हार घातलेली, शाल पांघरलेली महाराजांची मूर्ती मनात साठवून घेतली. सारे काही स्तब्ध झाले. जो तो बोलायचे विसरला. असा हा दिव्य आनंदाचा, प्रसादाचा स्पर्श करीत, कणाकणांनी आनंदाचे तुषार सर्वत्र उडवीत भाग्याचा क्षण आला. थोड्या वेळाने लोक भानावर आले आणि मातृतुल्य असलेल्या आईसाहेबांच्या सत्काराला सुरुवात झाली.

*

गुरुमातेचा सत्कार

माते, तुझ्या ह्या नमुनी पदाला।
आम्ही सिद्ध झालो तव पूजनाला।।

प. पू. श्रीदत्तमहाराजांसारख्या महापुरुषाचे गृहिणीपद भूषविणे हे थोर भाग्य तर खरेच, परंतु तितकेच कठीण आहे. प. पू. श्रीदत्तमहाराज आधीच विवेक वैराग्य संपन्न. त्यामुळे आईसाहेबांना आपल्या इच्छा आकांक्षेला मुरड घालावी लागली असेल. सामान्य गृहिणीप्रमाणे वागता आले नसेल. 'हे विश्वची माझे घर' अशी ज्यांच्या मनाची अवस्था, त्यांचा संसार किती मोठा होता व आहे पण तरीही अत्यंत कुशलतेने कष्ट सोसून तो सांभाळला. नातवंड-पतवंडांनी तो बहरला. या वटवृक्षाच्या छायेखाली अनेक लोक येऊ लागले. त्यांचा त्यांनी सांभाळ केला. आपला संसार परमार्थरुप केला. ती. सौ. आईसाहेबांच्या संबंधी लिहिताना पुनःपुन्हा प. पू. श्रीगुरुमहाराजांची श्रीगुळवणीमहाराजांची आठवण येते. त्यांची वाक्ये आठवतात. ते म्हणत असत.

''लक्ष्मीबाई, अग, दत्तमहाराज अध्ययनात, अध्यापनात निमग्न असतात. ते चिंतनात असतात. तुझ्या आवडी, हौशी राहिल्या असतील तर आम्हाला सांग. कारण त्यांचे लक्ष लौकिक व्यवहाराकडे फारसे नसते.'' प. पू. श्रीगुरुमहाराज कौतुकाने हे म्हणत असत. आम्हाला देखील त्यांची माया वत्सलता पाहून भरून येत असे. प. पू. श्रीदत्तमहाराज व आईसाहेब यांच्यावर प. पू. श्रीगुरुमहाराजांचे फार प्रेम होते. ती. सौ. आईसाहेबांचा सत्कार करताना ही स्मृतिचित्रे आपोआपच डोळ्यासमोर आली. आज ही श्रीगुरुमहाराज आहेतच. त्या शक्तीनेच हे सर्व सोहळे साजरे होत आहेत असे वाटले.

पू. सौ. ताईमहाराजांनी तितक्याच भाग्यशाली हातानी सौ. आईसाहेबांना कुंकुमतिलक लावून पाच फळांनी ओटी भरली. सर्व सौभाग्यलेणे त्यांना अर्पण केले. हा मातृपूजनाचा सोहळा पाहताना अनंत डोळे सुखावले. आपले जीवन कृतार्थ झाले असे भाव आईसाहेबांच्या चेहऱ्यावर दिसत होते. आनंदाने, समाधानाने त्यांचा चेहरा फुलला होता, 'अनंत हस्ते कमलावराने, देता किती घेशील दो कराने' असे विचार त्यांच्या मनोमनी घोळत असावेत.

पू. सौ. ताईमहाराजांचा गौरव

''पार्वती परमेश्वर'' अशा रुपाने असणाऱ्या प. पू. श्रीदत्तमहाराज व ती. सौ. आईसाहेब अशा जोडप्याचा सत्कार झाल्यावर त्यांना भगिनीप्रमाणे शोभणाऱ्या ती. सौ. ताईमहाराजांचा गौरव होणे हे अगदी यथायोग्यच होते. त्या प. पू.

श्रीदत्तमहाराजांच्या गुरुभगिनी तर आहेतच. परंतु आपल्या आध्यात्मिक तपस्येने ही त्या प. पू. श्रीदत्तमहाराजांना भगिनी शोभतील अशा थोरवीच्या आहेत. नित्य नामस्मरणाने ज्यांचे मन पुनीत झाले आहे. ज्या देवी भगवतीस्वरुप आहेत अशा ताईंचा गौरव तितक्याच योग्यतेच्या भगिनी सौ. सुशिलाबाई दाते (गौरव समितीचे अध्यक्ष दातेशास्त्री यांच्या सहधर्मचारिणी) यांच्या हस्ते झाला. त्यानी पू. सौ. ताईना सौभाग्यलेणे देऊन ताईंची ओटी भरली.

卐 卐

मानपत्र समर्पण

काशीक्षेत्राहून आलेल्या मानपत्राचे वाचन पं. गणेशशास्त्र्यांनी केले. देऊळगाव राजा येथून प. पू. श्रीधुंडिराज महाराज कवीश्वर समाधी मंदिर व श्रीदत्तमंदिर उपासना धाम विश्वस्त मंडळींकडून आलेले मानपत्र वाचून दाखविले. पिताजींच्या गावाहून आलेल्या मानपत्राचा जिव्हाळा काही वेगळा होता. अनेक संस्थांकडून प. पू. श्रीदत्तमहाराजांना भेटी आल्या. महर्षि वेदव्यास प्रतिष्ठान अहमदनगर यांच्यातर्फे रोख पैसे, कृष्णार्जुनाची चांदीची मूर्ती असलेला रथ व मानपत्र श्री ओंकारनाथजी मालपाणी यांनी महाराजांना अर्पण केले.

वेगवेगळ्या संस्थांकडून प. पू. श्रीदत्तमहाराजांचा गौरव झाला. भेटींचा अक्षरशः वर्षाव झाला. प्रत्येक भेटीतून भक्ताचे हृदयच प्रकट होत होते. लौकिक व्यवहारातील भेटी वेगळ्या असतात. परंतु या सर्व भेटीत अहंकाराचा दर्प नव्हता तर भक्तीची शालीनता होती. देवाच्या चरणी काहीतरी पोचावे ही सद्भावना होती. म्हणून तो सोहळा बघण्यातही आनंद भरून राहिला होता.

शृंगेरी पीठाचे जगत्गुरू शंकराचार्य कुडली मठ यांचे आशीर्वादपर भाषण –

''ब्रह्मश्री कवीश्वरशास्त्रींची विद्वत्ता आणि सात्त्विकता याबरोबर साधन मार्गातही उत्कर्ष होत असलेला पाहून आम्हाला समाधान होत आहे. असे सज्जन आणि तपस्वी विरळाच आहेत.

या शांती समारोहाच्या निमित्याने त्यांचे दीर्घायुरारोग्य उत्तरोत्तर वाढून ईश्वर शरणागतीचे उत्तम साधन स्वतःला साध्य करून, अन्य अधिकारी वर्गाच्या योग्यतेप्रमाणे त्यांनाही बोध करून जिज्ञासूंना त्यांच्या साधनाचे फल मिळो अशी आम्ही अपेक्षा करतो. त्यांच्या उत्तरोत्तर कल्याणासाठी श्री विद्याशंकर चंद्रमौळीश्वर स्वामींजवळ आम्ही प्रार्थना करीत आहोत.''

करवीर पीठाचे जगत्गुरू शंकराचार्य यांचे आशीर्वादपर भाषण

हे शंकराचार्य ऋग्वेदमंत्रसिद्धी करून योगतप सिद्ध झाले आहेत. केवळ वायूवर ते ४० दिवसांचे एक मंडळ राहतात. असा वेगळा अधिकार असलेल्या करवीर पीठाच्या शंकराचार्यांचे भाषण –

''आजच्या या स्वर्गीय सोहळ्याचे वर्णन माऊलीच्या भाषेत 'आजि सोनियाचा दिनु। वरषे अमृताचा धनु'' असेच करावे लागेल. १९९० सालात जर राम, कृष्ण, दत्तात्रेय या आदिपुरुषांची प्रचिती घ्यायची असेल तर वासुदेव निवासात जा. पुण्यातील चोखंदळ लोकांनी श्रीदत्तमहाराजांचा गौरव केला म्हणजे अखिल भारताने केला असे मानायला हरकत नाही.

आजचा सत्कार एका सज्जनाचा, गुरुभक्ताचा, सत्प्रवृत्त माणसाचा आणि एका महान विद्वानाचा आहे. म्हणून त्याचे महत्त्व वेगळे आहे. वैदिक धर्माची महती की येथे विनयाच्या कोंदणात शोभणारी विद्या असेल तरच तिचा गौरव होतो. ज्ञानाच्या सात पायऱ्या ओलांडून जाणाऱ्या महापुरुषाला सर्वश्रेष्ठ मानले जाते. जीवन्मुक्त अवस्थेतल्या आमच्या ब्रह्मश्री दत्तमहाराजांचा सत्कार या समारंभाच्या सातव्या दिवशी होत आहे हा एक योग आहे. भगवान श्रीकृष्ण म्हणतात.

मनुष्याणां सहस्त्रेषु यःकश्चित् यतति सिद्धये।
यततां अपि सिद्धांना कश्चिन्मां वेति तत्त्वतः।

आपल्या बहिर्मुखतेमुळे महाराजांचे मोठेपण कळत नाही. काहीच नको असे वाटते तेव्हां अवघड अशा मुमुक्षतेला सुरुवात होते. आम्हाला जगातले सर्वच हवे असे आहे, हव्यास आहे. हा हव्यास सोडून हवन करायला शिकले पाहिजे कारण आमची संस्कृती यज्ञ प्रधान आहे. म्हणूनच इथे सात दिवस हवन चाललय! आपली संस्कृती स्वयंपूर्ण आहे. तरीही पाश्चात्यांकडे याचना करण्याची आमची जी दयनीय प्रकृति आहे त्यातून बाहेर येण्याकरता अशा समारंभाची गरज आहे.

आपल्या प्रातःस्मरणीय ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वरांचा हा जो सोहळा होतो आहे तो अनेक दृष्टीनी अर्थपूर्ण आहे. यातून काय घेऊन जायचे ते कळले पाहिजे. कारण ते वर्णन करून सांगणे कठीण आहे.

वस्तुतः सहस्त्रचंद्रदर्शन सोहळा हा घरगुती स्वरुपाचा असतो. पण त्यांचे घरचेच लोक इतक्या मोठ्या संख्येत आहेत कारण --

अयं निज परो वेत्ति गणना लघुचेतसाम्।
उदारचरितानां तु वसुधैव कुटुम्बकम्।।

त्यामुळे कौटुंबिक सोहळा खरा पण कुटुंब फार मोठे. लौकिक कार्यात मी त्यांच्या कुटुंबाचे हे वर्णन केले असले तर त्यांचे खरे कुटुंब वेगळेच आहे. सामान्य कुटुंब मृत्युलोकाच्या नियमाप्रमाणे वियोगात्मक असतात. महाराजांना लाभलेले कुटुंब ज्यांचा कधीच वियोग होत नाही असे आहे. त्यांचे वडिल आहेत अधिकारी धुंडीराज महाराज. आजोबा वक्रतुंड महाराज. त्यांचा अधिकार असा की एकदा प्रवचनाला बसले की हजारो लोकांना त्यांचे गणपती स्वरुपात दर्शन झाले आहे. लौकिक कुटुंबही इतके अधिकारी. पण सुभाषितकाराच्या मते,

धैर्यं यस्य पिता क्षमा च जननी ।
शांतिश्चिरं गेहिनी . . . .

प्रत्यक्ष धैर्य पिता, क्षमा ही माता, शांतीशी लग्न केलेले ज्ञानामृत हेच भोजन. भारतीय संस्कृतीचे पायाभूत असलेले वैराग्य दत्तमहाराजांच्या ठिकाणी मूर्तिमंत वास करत आहे. हे आदर्श स्थान आमच्या संस्कृतीचे गौरीशंकर आहे.

भगवान श्रीदत्तात्रेय महाराजांचे सान्निध्य त्यांना लाभले आहे. 'नृसिंहवाडी' या दत्तस्थानाशी त्यांचा सतत संपर्क आहे. तिथे घर आहे. वास्तव्य आहे. अगदी बालवयात प. प. श्रीवासुदेवांनदसरस्वतींचे दर्शन त्यांना झाले आहे. ही फार मोठी बाब आहे. घराण्याचा केवढा मोठा वारसा लाभला आहे आणि प्रातःस्मरणीय योगिराज गुळवणी महाराजांचा संपूर्ण वरदहस्त लाभलेला आहे. कपिला गाईचे दूध मुळात उत्तम, ते तापविलेले त्यात साय मिसळलेली, शिवाय खडीसाखर, दूधमसाला आणि केशर घातलेले अशा तऱ्हेचे हे दूध आहे ते भक्तीने सेवन करा. आपले भाग्य उजळल्याशिवाय रहाणार नाही.

हजारो वैदिकांनी याना आशिर्वाद दिले. श्रीदत्तमहाराजांना ठरलेले इळाचे, अधिकाराचे, शंभर वर्षाचे आयुष्य लाभावे एवढ्याचसाठी सात दिवसपर्यंत भगवान दत्तात्रेय महाराजांच्या समोर आपण सर्वांनी धरणे धरलेले आहे. आम्हीही त्यांत सहभागी आहोत आणि भगवान दत्तात्रेय परमकृपाळू आहेत. 'करुणा' हेच त्याचे स्वरुप आहे. आपण त्यांना दत्तमाऊली म्हणतो. एवढ्या जबरदस्त मागणीला नकार देणे त्यांना शक्य होणार नाही. महाराज शतायुषी होतीलच. आपल्याला मार्गदर्शनाकरता असे महापुरुष हवे आहेत. त्यांचे दर्शन आपल्या कल्याणाला कारणीभूत ठरेल आणि ते तसे घडावे, शेवटी

सर्वेऽपि सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः।
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित् दुःख माप्नुयात्।

प. पू. श्रीदत्तमहाराजांचे आशीर्वाद

प. पू. श्रीदत्तमहाराजांना प्रथमपासूनच व मनापासून त्यांची स्तुती केलेली आवडत नाही. प. पू. श्रीगुरुमहाराजही स्वतःची केलेली स्तुती कटाक्षाने टाळीत असत. 'सर्व कर्तृत्व ईश्वराचे' असे दोघांच्याही जीवनाचे प्रमुख सूत्र आहे. प्रत्येक गोष्टीमुळे अकर्तेपणे पहाण्याचे वळण त्यांच्या इंद्रियाना पडलेले आहे. 'पडिले वळण इंद्रिया सकळा। भाव तो निराळा नाही दुजा' या तुकारामांच्या स्वानुभवाप्रमाणे प. पू. श्रीगुरुमहाराजांचे व्यतीत झालेले जीवन डोळ्यांनी पाहिलेले आहे. कोणी जर त्यांना म्हणाले की आपल्या कृपेमुळे, आशीर्वादामुळे चांगली गोष्ट घडून आली. त्यांचे लगेच उत्तर असे. 'ईश्वराची कृपा आहे. आपले पूर्वसुकृत चांगले आहे. अकर्तृत्वभाव दोघांचाही एकच असल्यामुळे देह दोन पण शिकवण एक हा अभिन्नतेचा प्रत्यय येऊन गुरूशिष्यांच्या एकात्मतेची साक्ष सतत पटत असते.

या दृष्टिकोनातून प. पू. श्रीदत्तमहाराज या सहस्त्रचंद्रदर्शन शांतीकडे पहात आहेत. त्यामुळे त्यांच्या आशीर्वादाच्या भाषणाचे मुख्य सूत्र 'सर्वांच्या अंतःकरणात झालेला ईश्वरशक्तीचा अविर्भाव व त्यामुळे घडून आलेले कार्य' हाच असणे हे त्यांच्या अलिप्तपणाला धरूनच आहे.

आपल्या आशीर्वादाच्या भाषणात ते म्हणाले, ''सहस्त्रचंद्रदर्शन हे शास्त्रीय आणि हितकारक कर्म आहे. म्हणून या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. शिवाय अशी सत्कर्मे ज्या ठिकाणी होतात त्या ठिकाणी सामुदायिक ईश्वरशक्ती विशेष रुपाने अविष्कृत होते. बाह्य विषय विसरून जाणे हे अंतिम समाधान आहे. अशी मंडळी आत्यंतिक श्रद्धेने हे कर्म करीत आहेत हे पहायला मिळाले. या सर्व कार्यकर्त्यात ईश्वरशक्ती जागृत झाल्यामुळे हे कार्य घडलेले आहे. ती जागृत करणे हे गुरुमहाराजांच्या पीठाचे विशेष कार्य आहे. ही शक्ती गेले ७-८ दिवस जागृत होऊन कार्य करीत आहे. तिच्याशिवाय इतके संघटनात्मक कार्य झाले नसते. सर्वांच्या मनात जागृत झालेल्या ईशशक्तीसमोर आपल्या मनातील एक शंका मी बोलून दाखवत आहे. साधूंचे रक्षण व असाधुत्त्व वृत्तीचा नाश हे या ईशशक्तीचे काम आहे. वैयक्तिक दृष्टिने ईश्वरशक्तीच्या अविर्भावाने एक व्यक्तिगत कौतुक झाले असले तरी त्यामुळे साधुत्वाचे संरक्षण कसे होणार? या होणाऱ्या गौरवामुळे प्रतिबंधक असे काही होऊ नये अशी जागृत ईशशक्तीच्या चरणी प्रार्थना आहे.

पूज्यता डोळा न देखावी । स्वकीर्ती कानी नायकावी।
हा आमुका ऐसी नोहावी। सेचि लोका ।।

असे ज्ञानराजाने म्हटले आहे. तेव्हां गुरुमहाराजांनी हे सर्व करून घेतले असे मानले तरी खरी कृपा म्हणजे आपल्या सर्वांच्या हृदयात जागृत झालेल्या ईशशक्तीची

योग्यता यावी अशी त्या शक्तींच्या चरणी प्रार्थना करून त्यानी आपले आशीर्वादाचे भाषण संपवले.

मानसन्मानाच्या उच्च श्रेणीतून प. पू. श्रीदत्तमहाराज गेलेले आहेत. अहंकाराचा वारा त्यांना तसूभरही लागलेला नाही असे असूनही त्यांनी आपला विनम्रभाव व्यक्त केला आहे. श्रीगुरुमहाराजांची कृपा सतत वहाती राहून त्या ईश्वरशक्तीशी संपूर्ण एकरुपता अखंड साधावी. या होणाऱ्या कौतुक समारंभाचा, स्तुतीचा, लोकांच्या पूज्यभावाचा प्रतिकूल परिणाम घडू नये यासाठी जनताजनार्दनापुढे शरणागती प्रगट केली आहे.

शुद्ध झालेले अंतःकरण निर्मळ व मोकळे असते. बालमनाप्रमाणे साधे असते. त्याची प्रचिती सर्वांनाच आली. साधुत्व मिळालेले आहे म्हणजे लोकांनी ते दिलेले आहे. जे जे काही आहे ते सारे देवाचे आहे अशा भावातून सहस्रचंद्रदर्शन शांतीचा सोहळा म्हणजे एक महायज्ञ त्यांनी केला. यज्ञभोक्ता परमेश्वर आहे अशी धारणा अखंड ठेवून या सर्व समारंभात न मिसळता ते मिसळले. हेच वागणे आपण सर्वांनी लक्षात ठेवून आचरणात आणण्याचा मनापासून प्रयत्न करणे हाच सहस्रचंद्रदर्शन शांतीचा सोहळा पाहण्याचा खरा फायदा घेतला असे होणार आहे. श्रीगुरुमहाराजांच्या चरणी आज तशी प्रार्थना करूया.



आपण मूर्तिमंत शंकर आहात. आणि मी दुर्बल मनुष्य भक्तीने पूजा करीत आहे. बेला ऐवजी मी जरी निर्गुडी वहात आहे तरी आपण बेल समजूनच तिचा स्वाकार करावा ९/१३ ज्ञाने.

सर्व भुतांविषयी प्रेमनिर्माण होणे ही भक्तीची उच्च भूमिका आहे.

यती नारायणनंद सरस्वती स्वामीमहाराजांवर प. पू. श्रीदत्तमहाराजांचा फार लोभ आहे. तसाच भक्तिभाव यतींचा महाराजांविषयी आहे. त्या भक्तिप्रेमातून स्फुरलेली संस्कृत रचना खाली देत आहोत.


यती नारायणानंद सरस्वती यांचे पत्र

२६-२-१९९०. श्रीगणनाथ शंकराचार्य मठ, कांची

पं. वे. शा. सं. दत्तात्रेयशास्त्री कवीश्वराणां सहस्रचंद्रदर्शनम्।


मंगलात्मकरूपाय भक्तमंगलकारिणे।
विश्वमंगलनाथाय गणेशाय नमो नमः ॥१॥
भक्ताभीष्टकरो दत्तः स्मर्तृगामी सुखप्रदः।
तस्मै नृसिंहयतये गुरुदेवाय ते नमः ॥२॥
सृष्टिशासनकारिण्यः सच्चिदानंददायिकाः
नृसिंहवाटिकाक्षेत्रे नृसिंहयतिपादुकाः ॥३॥
पितृपितामहास्तत्र विद्वांसो गुणशालिनः।
एतादृशकुले जन्मस्थाने नृसिंहवाटिके ॥४॥
यतेः श्रीवासुदेवस्य कृपया भाग्यशालिनः।
पुण्ये कवीश गोत्रेऽस्मिन् दत्तात्रेय कवीश्वरः ॥५॥
न्यायवेदान्तशास्त्रज्ञः श्रद्धाभक्तिसमन्वितः।
श्रीमद्भागवतादिनां कथाचिंतनपूर्वकम् ॥६॥
उपासनादि ज्ञानान्तं मार्गदर्शनतत्परः
मत्या कृत्या च धन्योऽसौ दत्तात्रेय कवीश्वरः ॥७॥
पांडित्यं भूषणं लोके विनयेन समन्वितम्।
लोके दुर्लभमेतद्धि वर्तते तत कवीश्वरे ॥८॥
परिपक्वफलानां हि रुचिर्माधुर्योत्तमा।
तथैषामुपदेशो हि यथार्थफलदायकः ॥९॥
आश्रयः सर्वजीवानामाश्रमोचित कर्मणाम्।
गृहाश्रमः कृतो येन विद्याशांत्यादि संयुतः ॥१०॥
किमस्ति बहु जल्पेन ह्यादर्शा खलु तत् कृतिः।
दुष्करं यन्निवृत्तस्य प्रवृत्त्या तेन साधितम् ॥११॥
उक्तं हि केनाचित् कुत्र यथार्थं वर्तते खलु।
प्रवृत्तिरपि धीरस्य निवृत्ति फलभगिनी ॥१२॥
इत्थं भाग्यवतः तस्य सहस्रचंद्रदर्शनम्।
शांत्यादि योजितं कार्यं निर्विघ्नं सुफलं भवेत् ॥१३॥
तेन कल्याणमारोग्यं सर्वेषां शांतिदायकम्।
यते नारायणास्यास्तु स्मृतिर्नारायणाः शुभो ॥१४॥

॥ नारायणस्मरणम् ॥



प. पू. श्रीदत्तमहाराज व यती नारायणानंद सरस्वती महाराज

आत्मचिंतन



प. पू. श्रीदत्तमहाराज ''रेणुका-निवास'' येथे सकाळी

प. पू. श्रीदत्तमहाराजांची परंपरा संतकुळीची आहे. ही परंपरा सात पिढ्यांची आहे. तसाच प. पू. श्रीवक्रतुंडमहाराजांपासून (आजोबा) त्यांचा लोकसंग्रह अमाप आहे. लोकांची सत्प्रवृत्ती वाढविणे आणि त्यांना सन्मार्गाला लावणे यासाठी संतमहात्म्यांचा जन्म असतो. त्यांच्या कार्याची मोजदाद नसते. संत त्याचा उच्चारही करत नाहीत. 'आपुले जे विहीत, ते ईश्वराचे मनोगत' या ज्ञानेश्वरांच्या उक्तीप्रमाणे यांचे कार्य अखंड चाललेले असते. या प्रसिद्धीच्या युगात त्यांच्या कार्याची जाण फार थोड्याना असते. ही संतमंडळी प्रसिद्धीपासून दूर असतात. 'मी करतो' ही भावना पुसून गेलेली असते. सारे कर्तृत्व ईश्वराचे अशी त्यांची खात्री असते. अशा तऱ्हेने संतमंडळी काम करीत असतात. ही संतमंडळी आपल्याप्रमाणे शिष्यालाही तयार करतात. श्रीसमर्थानी 'आत्माराम' ग्रंथात म्हटल्याप्रमाणे 'स्वामी परीसाचा स्पर्श होता। शिष्य परिसचि झाला तत्त्वता। गुरुशिष्याची ऐक्यता। झाली स्वानुभवे।।'

नामयोगी संत श्रीज्ञानदेव दत्तात्रय काजळकरमहाराज

प. पू. श्रीदत्तमहाराजांचे पिताजी प. पू. श्रीधुंडिराजमहाराज यांचा सुद्धा असा ज्ञानयज्ञ चालू होता. त्यावेळी अनेक शिष्यपरिवारात श्री. ज्ञानदेव दत्तात्रय काजळकर हे एक शिष्य लाभले. 'आपणासारिखे करिती तात्काळ' असे त्यांचे सामर्थ्य होते. प. पू. श्रीधुंडीराजमहाराजांनी त्यांच्यावर परिपूर्ण कृपा केली. त्यांना परिसत्त्व दिले. लौकिकदृष्ट्या ते पोलिस खात्यात नोकरीला होते. जालन्याजवळील अंबड तालुक्यात काजळगावी स्थायिक झाले होते. तेथे त्यांचे घर आहे. त्यांचे मूळ आडनाव कुलकर्णी. ते शुल्क यजुर्वेदी माध्यंदिन शाखेचे, काजळ गावी राहिल्याने 'काजळकर' या नावानी प्रसिद्धीला आले.

माझी मज झाली अनावर वाचा । छंद या नामाचा घेतलासे ।।

अशी काजळकरांची अवस्था झाली होती. त्यानी रामनामाचा १३ कोटी जप पूर्ण केला, कितीतरी कोटी रामनाम लिहिले. रामनामानी पावन झालेल्या त्यांच्या वह्या आजही त्यांच्या कन्या ती. सौ. ताईमहाराज यानी जतन केल्या आहेत. समाजातील सर्व स्तरांतील लोकाना भक्तीमार्गाला लावणे हा त्यांच्या कार्याचा विशेष होय. हजारो लोकांना 'ते जीवनाचा फार मोठा आधार आहेत' असे वाटत असे.

हरिनाम वेली विस्तार पावली । फळे फुले भार वोल्हावली ।।

या तुकारामांच्या अभंगाप्रमाणे प. पू. श्रीकाजळकर महाराजांनी विदर्भ मराठवाड्यात खेडोपाडी जाऊन समभावाने हरिनामाचा प्रचार केला. त्यांच्या शिष्यवर्गात मुस्लीम बांधवही आहेत. वैदिक धर्माप्रमाणे इतरही धर्माचे त्याना ज्ञान

होते. त्यांचा विशेष गुण असा जसे ते भक्तांना उपासना देत. तसे भक्तांचे संकट निवारण्यासाठी स्वतः सुद्धा उपासना करीत. श्रीगुरुचरित्राची अनेक पारायणे व दुर्गासप्तशतीचे पाठ त्यांनी केले. प. पू. श्रीधुंडिराजमहाराज आणि प. पू. श्रीकाजळकरमहाराज हे हरिहरांसारखे एकरुप होते. जालन्याला त्यांच्या कन्या सौ. ताईमहाराज यानी दत्ताश्रम बांधून त्यांचे नाव अमर केले आहे. श्रीकाजळकर महाराजांचा वास दत्ताश्रमांत आहे. १९७३ साली चैत्र शुद्ध बीजेला ते चैतन्यरुप झाले. लौकिकदृष्ट्या ते आपल्यात नसले तरी ते अनेकाना सतत दर्शन देत आहेत. परिचिताना दर्शन देतात त्यात नवल नाही. पण ज्यांनी त्यांना प्रत्यक्ष पाहिले नाही अशा तरुण मंडळीना सुद्धा ते दर्शन देऊन मार्गदर्शन करीत असतात. आजही त्यांच्या भक्तांना ते संकटातून तारतात.

जे अखंड रामनामाने रामरुप झाले, आत्मारामाला ज्यांनी जाणले, त्या रामभक्त काजळकरांच्या पोटी रामनवमीच्या दिवशी ईश्वरकृपापात्र अशा कन्यारत्नाचा जन्म झाला. त्याच अबोल, सतत रामस्मरणात गुंतलेल्या, प्रपंचात परमार्थाचा आधार घेतलेल्या ताईमहाराज आहेत.

भावबळे विष्णूदास नाही नाश पावत।
योग भाग्ये घरा येती सर्व शक्ती चालत।
पित्याचे ते काय धन पुत्रा कोण वंचील।
तुका म्हणे कडे असो तेणे बने निर्भर।।

पू. सौ. ताईमहाराजानी हा परमेश्वरभक्तीचा वडिलोपार्जित वारसा पूर्णपणे मिळवला व हा लाभ त्या सर्व बालवृद्धाना मोठ्या आनंदाने देत आहेत.



पू. सौ. ताईमहाराजांच्या जीवनाचा थोडा कानोसा

प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या देवदरबारात अनेक भगवत्भक्त व्यक्तींचे दर्शन होते. त्यात ताईमहाराजांच्या कृतार्थ जीवनाचाही समावेश आहे.

पू. सौ. ताईमहाराजांचे बालपण जालना जिल्ह्यातील अंबड व काजळ या गावी गेले. पूर्वीच्या पद्धतीप्रमाणे त्यांचे पंधरा सोळाव्या वर्षीच लग्न झाले. प. पू. श्रीधुंडिराजमहाराज सौ. ताईमहाराजांच्या सासर-माहेर दोन्हीकडून कुलगुरू होते. श्रीकाजळकरमहाराजांनी समाधी घेतल्यानंतर लवकरच ताईमहाराजांच्या यजमानांची

नांदेडहून जालन्याला बदली झाली. ताईचे नांव सौ. शशिकला मधुकर चाटुफळे. श्री. मधुकरराव अे.पी.पटेल आणि कंपनी येथे अकाउंटंट आहेत. या कंपनीची संपूर्ण धुरा ते अनेक वर्ष सांभाळत आहेत. प. पू. श्रीधुंडिराज महाराजांनी पू. सौ. ताईना आपली मुलगीच मानले होते. ते त्यांच्याकडे अधूनमधून येत असत. पू. सौ. ताईसुद्धा देऊळगावराजाला त्यांच्या दर्शनासाठी जात. आज पू. ताईकडे पाहिले तर मोठे कुंकू, हातभर बांगड्या, डोक्यावर पदर, एके ठिकाणी तासन्तास बसलेल्या ताई आपल्या डोळयासमोर येतात. शांतपणाने त्या नामात निमग्न असाव्यात असे वाटते. आपल्या स्वतःबद्दल त्या एक शब्दही बोलताना आढळत नाहीत. प. पू. श्रीदत्तमहाराज त्यांच्याबद्दल आदराने बोलतात तेव्हां त्यांच्या अंतरंगाची किंचित जाणीव होते. आपण त्याना नमस्कार केला की त्या आपले हात हातात घेतात व किंचित हसतात. 'कसं काय, बरं आहे ना?' अशी प्रेमळपणाने चौकशी करतात व पुन्हा आपल्या नामात रंगून जातात. अनेकांची संकटे दूर करण्याकरता त्या सदैव प्रार्थना करीत असतात. त्यांच्या शक्तीयुक्त प्रार्थनेने अनेक लोक प्रापंचिक संकटातून मुक्त होतात. पुढच्या पारमार्थिक प्रगतीसाठी त्या अशा भक्तांना प. पू. श्रीदत्तमहाराजांकडेच पाठवतात.

एकदा पुण्याला एक गृहस्थ त्यांना भेटायला आले. त्यांना म्हणाले, 'तुमच्या सांगण्यामुळे मी संकटमुक्त झालो' पू. सौ. ताईमहाराज म्हणाल्या, 'आता तुमचे संकट नाहीसे झाले ना ! ते देवामुळे झाले. या अनुभवातून बोध घेऊन ईश्वरभक्ती करा. परमेश्वराला विसरू नका. सर्व जनसामान्यांना सकामातून उपासनेकडे वळविण्याचे ताईंचे कार्य अशा प्रकारे सतत चालू असते. ज्यावेळी मी जालन्यात गेले, दत्ताश्रमांत राहिले तेव्हां खऱ्या अर्थाने या कार्याचे मोल मला समजले.

सौ. ताईमहाराज पुण्याला आल्या व थोडे दिवस राहिल्या की, प. पू. श्रीदत्तमहाराज म्हणतात, 'इथे राहून कसे चालेल? जालन्यात आपली अनेक जण वाट पहात असतात.' या वाक्याचा नेमका अर्थ मला जालन्याला गेल्यावर कळला. सौ. ताईंच्या या मेळाव्यामध्ये अनेक तऱ्हेची जातीजमातीची माणसे आहेत. सेवा हेच त्यांचे ब्रीदवाक्य आहे. सौ. ताईनी अनेकांना ईश्वरसेवेला लावले आहे. आपल्या सारख्याना असे वाटते की हे त्यांनी जमवले कसे? चार मुलगे, चार सुना, नातवंडे असा त्यांचा प्रपंच आहे. मग साधकावस्था त्यानी कशी साधली असेल? असे मनाला कोडे पडले होते. सौ. ताई स्वतःबद्दल काही सांगणे शक्यच नाही. त्यांच्या परिवारातून त्यांचा कानोसा घ्यायचा प्रयत्न केला तेव्हां त्यांची उपासना किती प्रचंड होती त्याची कल्पना आली.

नांदेडला असताना ताईनी शक्य होतील ती सर्व व्रतवैकल्ये केली. उन्हाळा, पावसाळा, हिवाळा कोणताही ऋतू असो. पहाटेचे गोदावरी स्नान कधी चुकले नाही.

घरची सर्वमंडळी उठण्याच्या आधी त्या स्वतःचे सर्व उरकत. दुपारी बालाजीच्या मंदिरात त्यांचे जपजाप्य चाले. निरनिराळ्या पोथ्यांची पारायणे त्या करीत. प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या मातोश्री मोठ्या महाराजांचे प्रासादिक ग्रंथ गावोगाव घेऊन जात. त्यांच्याकडूनच ताईना दत्तमहात्म्याची पोथी मिळाली व त्यांचा सहवासही मिळाला. त्याबद्दल पू. ताईनी थोरल्या आईसाहेबांबद्दलची प्रेमभावना, भक्तिभावना त्यांच्या समाधी मंदिराला तनमनधनाने मदत करुन व्यक्त केली. ही समाधी सुलतानपूर, तालुका मेहेकर, जिल्हा बुलढाणा येथे आहे.

पू. सौ. ताईमहाराजाना रहाण्यास जागा फार अपुरी होती. पण स्वतःचा विचार त्यांनी कधीच केला नाही. त्यानी आपल्याभोवतीच्या परिवारातील मंडळीना सांगितले, समाधीमंदिर आधी झाले पाहिजे त्याला काय तो हातभार लावा. वारंवार त्या सुलतानपूर येथे जाऊन देखरेख करीत असत. तनमनाने त्यानी हे सेवाकार्य पूर्ण केले. आणि आपल्या गुरुमातेचे अशा तऱ्हेने सर्व भक्तमंडळीसह पूजन केले. पू. सौ. ताईंची गुरुभक्ती फार देखणी आहे. पण ते देखणेपण आपल्यासारख्याना कळायला अंतरंगातील जाणीव जागृत हवी. अशा लोकांचे थोरपण कळणे कठीण असते. पू. सौ. ताईंच्या पिताजीनी देह ठेवल्यावर त्यांच्या परिवारातील लोकांना निराधार वाटू लागले होते. पू. सौ. ताई जालन्यात आल्यानंतर त्यांचे गंगेप्रमाणे वाहाणारे परोपकारी जीवनकार्य पाहून लोकांना कळून चुकले, की सद्गुरु काजळकरमहाराजांचा वारसा (उत्तरदायित्व) पू. सौ. ताईकडे आला आहे. लोकांना त्यांचा आधार वाटू लागला. आज जालन्यात झालेला दत्ताश्रम हे एक पारमार्थिक केंद्र आहे. या केंद्रात पू. सौ. ताई सर्वांना जपाचा आधार देऊन संकटमुक्त करीत असतात. संत तुळसीदासजी म्हणतात,

रामनाम मनीदीप धरु जी देहरीद्वार।
तुलसी भीतर बाहेर हुँ जो चाहसि अुजिआर।।

"लौकिक पारमार्थिक ज्ञान पाहिजे असेल तर मुखाच्या द्वारी रामनामरुपी मणीदीप लाव. असा दीप तेल संपले म्हणून किंवा वाऱ्याने विझणार नाही" याप्रमाणे सौ. ताई दत्ताश्रमात अखंड नामाचा दीप लावून सेवाकार्य करीत आहेत. पू. सौ. ताई संसारात राहूनही संसारापासून पूर्ण अलिप्त आहेत. परोपकार करण्यात त्यांचे पोट भरते. स्वतःच्या खाण्यापिण्याची त्यांना आठवणही होत नाही. कित्येक दिवस त्यांनी उपवास केले आहेत.

सौ. ताईंची आतिथ्यशीलता

जालन्याला जायचा योग आला तेव्हां त्या आश्रमातील सर्व भक्तमंडळींकडून जे अगत्य दाखविले गेले त्याचे सर्व श्रेय पू. सौ. ताईना द्यावे लागेल.

गृहस्थाश्रमामध्ये अतिथीचे खूपच महत्त्व सांगितले आहे. आजचा काळ असा आहे की, या यांत्रिक युगात माणसाला माणसाकडे पहायला वेळ नसतो. त्यामुळे पाहुणे येणे अप्रिय वाटते. या दत्ताश्रमात जे काही प्रेमाने केले जाते ते पाहून सर्वांनाच आनंद वाटतो. दत्ताश्रमात त्यावेळी पंचकुंडी याग होता. पुष्कळ मंडळी जमलेली होती. प. पू. श्रीदत्तमहाराजांचे वास्तव्य तेथेच होते. स्वयंसेवक इतके तत्पर होते की आलेल्या मंडळीना काहीच अडचण भासत नसे. सकाळी उठल्यावर कोणाकडे मागावयास लागू नये म्हणून ब्रश, पेस्ट, राखुंडी याची व्यवस्था ठिकठिकाणी केली होती. साबण, कंगवा, आरसा, कुंकू या साधनांची भगिनी वर्गांची सोय सर्वत्र होती. पहाटेपासून चहा तयार होता. चहासुद्धा हातात आणून देत होते. पू. सौ. ताईना तेथे जातीने हजर रहावे लागत नव्हते. आपल्या भक्तांना पू. सौ. ताईंनी परमार्थातील खरी भूमिका समजावून दिली होती. त्यामुळे आश्रमात आरडाओरडा, कटूशब्द ऐकू येत नव्हते. प्रत्येक जण आपल्याकडे सोपविलेले काम निमुटपणे करण्यात दंग होता. उन्हाळा खूप होता. थोड्या थोड्या वेळाने हे स्वयंसेवक गार पाणी बसल्याजागी आणून देत असत. तेथे असलेल्या स्वयंसेवक भगिनीना विचारले तर त्या भगिनी म्हणत, 'भगवत् भक्ताची सेवा करणे हे भगवंताला अधिक प्रिय आहे.' या त्यांच्या उपदेशाप्रमाणे येथे येऊन आम्ही सेवा करतो. हा कृतीयुक्त परमार्थ पाहून आपल्याला खूपच शिकण्यासारखे आहे असे प्रत्येकाच्या मनात आले.

भगवत् सेवेचा आणखी एक नमुना

दत्ताश्रमापासून चार पाच किलोमीटरवर पाणमाळ नावाचे श्री गणपतीचे स्थान प्रसिद्ध आहे. दर संकष्टीला गावातील भक्तमंडळी पायी तेथे दर्शनाला जातात. पहाटे चारपासून दुपारी तीनपर्यंत पू. सौ. ताईचे स्वयंसेवक भक्त या गणेश भक्तांना नम्रपणे बोलावून चहापाणी देतात. कोणी कितीवेळा चहा घेतला याचे बंधन नाही. चहा उत्तम दर्जाचा असतो. आपण मंदिरात पाऊल टाकले की हसतमुखाने स्वयंसेवक पुढे येतो आणि निरोप देताना 'परत लवकर या बरं का?' असे म्हणतो. आपण या आतिथ्याने खरेच भांबावून जातो. पू. सौ. ताईंच्या वैयक्तिक गरजा नाहीतच म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. जीवाला ईश्वरभक्तीकडे वळवून दुःख हलके करायचे, प्रारब्धभोग हसत भोगायची मानसिक शक्ती द्यायची एवढेच त्यांना माहीत आहे. मुलांच्या लग्नाच्या निमित्त्याने आप्तेष्टांना, कुटुंबाना अहेर देण्यासाठी दागदागिने, कपडालत्ता, वस्तू यावर अमाप पैसा खर्च होत असतो. परंतु सौ. ताई हा खर्च धार्मिक पुण्यकर्मांवर खर्च करतात. त्यांच्या परिवारात फक्त स्त्रिया नसून डॉक्टर, वकील, चार्टर्ड अकाउंटंट, इंजिनिअर अशीही मंडळी आहेत. पू. सौ. ताईंना गुरुस्थानी मानणारे जरी हजारो भक्त आहेत तरी गुरुपद स्वतःकडे न घेता प. पू. श्रीदत्तमहाराजांना देतात. अनुग्रह दीक्षा कोणाला घ्यायची असेल तर प. पू.

श्रीदत्तमहाराजांकडे पाठवतात. येथे पंथ, गटबाजी दिसत नाही. हा श्रीधुंडिराजमहाराजांचा भक्त असो काजळकरांचा भक्त असो. एकाच भक्तिगंगेमध्ये स्वतःला सामावून घेतात. गुरुतत्व शेवटी एकच आहे. हा शास्त्रसिद्धान्त ह्या लोकानी जीवनांत प्रत्यक्ष उतरविला आहे.

एक आगळावेगळा रामनवमी जन्मोत्सव

दत्ताश्रम स्थापन झाला. प. पू. श्रीदत्तमहाराजांचे पाय त्या आश्रमाला लागावे अशी पू. सौ. ताईची खूप दिवसाची इच्छा होती. प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या कृपाप्रसादाने हा भव्यदिव्य आश्रम उभारला गेला अशी पू. सौ. ताईची खात्री होती. प. पू. श्रीदत्तमहाराज प्रकृति अस्वास्थ्यामुळे जालन्याला येऊ शकले नव्हते. पण तो योग देऊळगावराजा येथे होणाऱ्या रौद्रीशांतीमुळे अचानक जमून आला. दत्ताश्रमात भक्तीचे मळे फुलू लागले. सगळीकडे आनंदीआनंद झाला. प. पू. श्रीकाजळकर महाराजांची रामभक्ती तशीच त्यांची धुंडिराज महाराजांवरील गुरुभक्ती आणि ताईंची सेवापरायणता यांचा त्रिवेणी संगम दत्ताश्रमात झाला. संत तुलसीदासजी म्हणतात

वर जा रितु रघुपति भगति तुलसी साली सुदास ।।
रामनाम बर बरन् जुग सावन भादव मास ।। २५ दोहावली

रघुनाथाची भक्ती म्हणजे वर्षाऋतु आहे. उत्तम सेवकगण हे धनधान्य आहे रा आणि म ही दोन अक्षरे श्रावण, भाद्रपद आहेत. श्रावण, भाद्रपद हे दोन महिन्यात धान्यसमृद्धि होत असते. त्याप्रमाणे रामनामाचा जप भक्तिपूर्वक केला तर भक्ताच्या अंतःकरणात आत्यंतिक सुखाचे, आनंदाचे पीक येते.

अखंड रामनाम ज्या ठिकाणी सुरु आहे त्या ठिकाणी रामनवमीही सर्वांच्याच हृदयांत रामाचा जन्म करणारी होणार. यावेळी प. पू. श्रीदत्तमहाराजांनी सुवर्णाला सुगंध, नादाला स्वाद यावा त्याप्रमाणे ही रामनवमी साधली होती. पू. सौ. ताईचा जन्म रामनवमीचा होता. त्याचे स्मरण रामनवमीच्या उत्सवाच्या रुपाने सुरु करुन दिले. हे दोन्ही योग मणिकांचन योगासारखे जुळून आले. या मंगल दिवशी प. पू. श्रीदत्तमहाराजांचे रामायणावर प्रवचन झाले. त्या प्रवचनात रामायणातील प्रत्येक व्यक्तीचे आगळेवेगळे चित्रण केले आहे. ते प्रवचन पुढे देत आहोत.

प. पू. श्रीदत्तमहाराजांचा आशीर्वाद

सर्व सुखी व्हावेत म्हणून संत महात्मे देवतांना अशा ठिकाणी आवाहन करतात आणि त्यांच्या तपःसामर्थ्याने अशा स्थानात देवतांचे वास्तव्य होते. पू. सौ. ताईमहाराजांच्या संकल्पाप्रमाणे या ठिकाणी देवतांच्या व पिताजींच्या प्रतिमांची स्थापना झाली आहे. सर्वांचे चांगले व्हावे एवढीच पू. सौ. ताईमहाराजांची इच्छा आहे.

शास्त्राने सांगितलेले पुण्यकर्म आपण यथाशक्तीने करत राहणे एवढेच आपले कर्तव्य आहे. आज श्रीरामचंद्रांचा जन्मदिवस. तसाच सौभाग्यसंपन्न ताई महाराजांचाही वाढदिवस आहे. फार चांगला योग आहे. रामचंद्रांनी सगळ्या जगाला धर्ममर्यादा कशा असाव्यात, त्याचे कसे पालन करावे हे नुसते समजावूनच सांगितले असे नाही तर त्याप्रमाणे आचरण करून दाखविले.

भगवान् शंकरानी रामचंद्रांची सेवा करण्याकरता हनुमंताचे रुप घेतले म्हणतात. रामायणांतील हनुमंत, भरत, लक्ष्मण वगैरेंची चरित्र प्रसिद्ध आहेत. पण इतरही पात्रांची चरित्रे अवलोकन करण्यायोग्य आहेत. सुमित्रेने लक्ष्मणाला मोठ्या आनंदाने रामचंद्रांबरोबर वनांत पाठविले. रामचंद्र व सीतेला मातापित्यासमान मानून त्यांची आनंदाने सेवा करण्यास सांगितले. सुमित्रा अत्यंत धर्मशील होती. लक्ष्मण मूर्च्छित पडल्यावर तिला त्याच्यापेक्षा रामचंद्रांना सहाय्य कोण करणार ही काळजी पडली. तिने आपल्या दुसऱ्या मुलाला शत्रुघ्नाला रामरायांच्या सहाय्याला पाठवले. म्हणजे दोन्हीही मुले रामचंद्रांच्या चरणी सेवेला वाहिली. 'वाहू हा संसार देवापायी' तुकाराम महाराज सांगतात. त्यांची ही वृत्ती नुसती सांगण्यापुरती नाही. आपल्या ताईमहाराजही त्या वृत्तीच्या आहेत. त्यांना कोणी काही दिले की त्या ते या यज्ञाला द्या त्या कार्याला द्या असे करुन देऊन टाकतात. स्वतःकरता काहीही ठेवत नाहीत.

शत्रुघ्नाचे व्यक्तिमत्व कांही वेगळेच होते. भगवत् भक्तांची सेवा ही जास्त महत्त्वाची आहे या भावनेने त्याने मारुतीराय, भरत वगैरेंची सेवा केली आणि त्यामुळे त्याच्यावर रामचंद्रांची कृपा झाली.

वाल्मिकी महर्षिनी ब्रह्मदेवांच्या आज्ञेवरुन लोकांची बुद्धि शुद्ध करण्याकरता रामायण लिहिले. लक्ष्मणाची पत्नी त्याच्याबरोबर वनात न जाता सासू सासऱ्यांची सेवा करण्याकरता मागे राहिली. सेवा करताना मनात कोणतीही आसक्ती, अहंकार न येणे हे सेवेचे मुख्य फल आहे. देवाची सेवा करणाऱ्याने हे ध्यानात ठेवावे की सेवा करावी पण त्याबद्दल देवाजवळ काहीही मागायचे नाही. देवाने फल दिले तरी काही घ्यायचे नाही. रामचंद्रांचे चरित्र ऐकणे, वाचणे, त्याचे चिंतन करणे आणि मनावर त्याचे चांगले संस्कार व्हावेत म्हणून रामचंद्रांचीच प्रार्थना करणे हे आपले कर्तव्य आहे.

कैकेयीही फार मोठी भक्त होती. तिने तर रामचंद्रांना वनवासात पाठवून सगळ्या जगाचा रोष ओढवून घेतला. रामचंद्राना जर राज्यभिषेक होऊन ते राज्य करीत राहिले असते, तर रावणाचा नाश कसा झाला असता? प्रजेचे रक्षण कसे झाले असते? सरस्वतीदेवीने देवांच्या प्रार्थनेप्रमाणे कैकेयीच्या वाणीत प्रवेश केला, तिला तशी बुद्धी झाली आणि देवांचे कार्य झाले.

सुखी होण्याचे मुख्य साधन ईश्वराची भक्ती आहे. भगवत् भजन आहे हे सर्वांना पटावे अशी ताईमहाराजांची प्रार्थना चालू आहे. त्याकरता हे स्थान निर्माण झाले आहे. इथे महिना महिना अखंड नाम संकीर्तन चालते आणि ते पाहून त्यांना आनंद होतो.

इथल्या मंडळीनी दत्ताश्रम निर्माण केला याबद्दल त्यांच्यावर ईश्वराची कृपा झालेलीच आहे जितके जितके आपले इकडे लक्ष लागेल तितके तितके आपलेच कल्याण होणार आहे. चांगले मार्गदर्शन त्यांच्याकडून आपल्याला मिळते, त्याचा फायदा सर्वांनी करुन घ्यावा संसार करता करता परमार्थ साधावा. सर्वांना तशी सद्बुद्धी उत्पन्न व्हावी एवढीच आज भगवान् रामचंद्रांच्या चरणी प्रार्थना. त्या दत्तप्रभूनीच सर्वांना प्रेरणा द्यावी.

प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या या देवदरबारांतील अनेक श्रेष्ठतम व्यक्तींपैकी पू. सौ. ताईमहाराजांच्या जीवनाची एक तेजस्वी झलक आपण पाहिली. प. पू श्रीदत्तमहाराजांच्या त्या एक श्रेष्ठ गुरुभगिनी आहेत. महाराजांच्या प्रत्येक कार्याला त्या अतिशय प्रेमाने सर्वतोपरी मदत करीत असतात. वामन निवासापासून औरवाड येथील कामापर्यंत त्यानी तनमनधनाने सर्व प्रकारची मदत केली आहे. इतकेच काय पण महाराजांची तब्येत नेहमी चांगली रहावी म्हणून अनुष्ठाने सुद्धा करीत असतात. पू. सौ. आईसाहेबांवर पू. सौ. ताईंचा खूप जीव आहे. आईसाहेबांचा शब्द त्या कधीही मोडत नाहीत. महाराजांच्या सुना, कन्या. पुत्र या सर्वांवर त्या माया करतात.

भरजरी हा पितांबर दिला फाडून । द्रौपदीस बंधू शोभे नारायण।।

अशी पू. सौ. ताईंची प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या ठिकाणी अनन्य साधारण भक्ती आहे. ताईंच्या जीवनाचे हे शब्दचित्र रेखाटणे म्हणजे त्यांच्या चरणी भक्तिभावपूर्वक वंदन करणे आहे.



प्रगटलासी तू नंदगोकूळी । म्हणुनि इंदिरावास ये स्थळी ।।
सकळही सुखी या व्रजीहरी । विरह दुःखिता गोप सुंदरी ।।१।।
प्रगट होई तू विश्वभूषणा । प्रियत्तमा त्वरे दावि आपणा
हुडकितो तुते गोप कामिनी । तुजवरी हरी प्राण ठेवूनी ।।२।।

वामन पंडितांच्या गोपीगीतातून

प. पू. श्रीआत्मारामशास्त्री जेरे

एक तेजस्वी ज्योत

हळू हळू होते, पावते सुखसंगती। असा साक्षात्कारी अनुभव घेणारे संतसद्गुरू हे आजच्या काळाचे आधारस्तंभ! दिक्काल याच्या पैल असणारा अनुभव सगळयाच संतांनी घेतला. त्या आनंदमय चैतन्यशक्तीचा स्पर्श आजही उमटत राहिलेला आपल्याला दिसतो. अलौकिकाच्या गाभ्यापर्यंत नेणाऱ्या या स्पर्शाची जाणीव प. पू. श्रीआत्मारामशास्त्री जेरे यांच्या चैतन्यमय आठवणींतून होते.

पं. आत्मारामशास्त्री हे ज्याप्रमाणे प. प. श्रीवासुदेवानंद स्वामींच्या सहवासात आलेले होते, त्याचप्रमाणे प. पू. श्रीगुळवणीमहाराजांच्याही सहवासात पुष्कळ वेळा येत असत. जेरे कुटुंब नरसोबाच्या वाडीचे. वाडीवर अतिशय श्रद्धा. पं. आत्मारामशास्त्रींनाही वाडीच्या घराविषयी अतिशय ओढ होती. अमळनेरला नोकरी करीत असता सुटी लागली की लगेचच वाडीला येत. पहाटेपासून देवाची सेवा करीत. तीन महिने ते वाडीला असत. त्यावेळी प. पू. श्रीदत्तमहाराजही येत. न्यायशास्त्राचा शेवटचा भाग श्रीदत्तमहाराज आणि श्रीउपेनबेट्टीगिरी ह्यांना पं. आत्मारामशास्त्री यांनी शिकविला. ज्यावेळी हे तिघेही माडीवर अभ्यास करीत बसत त्यावेळी घरातील मंडळींना पर्वणी वाटे. पुण्याचे आश्रमात दरवर्षी श्रीदत्तमहाराजांचा भागवतसप्ताह असे. प. पू श्रीगुळवणीमहाराज, प. पू. श्रीदत्तमहाराज आणि पं. आत्मारामशास्त्री हे तिघेही एकत्र आले तिथे ब्रह्मानंद निर्माण होत असे. वाडीला तर प. पू. श्रीदीक्षित स्वामी महाराजांचाही सहवास शास्त्रीबुवांना घडला.

पं. आत्मारामशास्त्री यांचा आवाजही चांगला होता. संगीताची फार आवड होती. ज्या ठिकाणी ते रहात असत, त्यांच्या शेजारच्या खोलीत एका मुलाला संगीत शिकविण्यासाठी संगीततज्ञ येत असत. मुलाला शिकविलेले ऐकून पुढील संगीताची त्यांनी तयारी केली. दोन-तीन वर्षात त्यांची चांगली तयारी झाली. हौस होती पण पैसा नव्हता. एक दिवस संगीत शिक्षक खोलीत सहज म्हणून आले. तेव्हा पं. आत्मारामशास्त्रींनी दोनतीन चिजा आलापासह म्हणून दाखविल्या 'कोणाकडे शिकलात' असे विचारल्यावर शास्त्रीबुवांनी ''शेजारी जे जे शिकवितात ते ऐकून शिकलो'' असे सांगितले. संगीत शिक्षकांना त्यांच्या कुशाग्र बुद्धीचे अतिशय नवल वाटले. त्यावर आश्चर्य व्यक्त केले असता पं. आत्मारामशास्त्री अगदी सहजतेने म्हणून गेले की 'ही वाडीची कृपा आहे'

परमार्थमार्गातली नम्रता, विनयशिलता, मनाची शुचिता आणि परमेश्वर अनन्यता हे सद्गुण अलौकिकावरचे जीवन सुंदर पवित्र करायला नेहमीच साह्यभूत ठरतात. ही नैतिकता पं. आत्मारामशास्त्रींच्या जीवनाचा पाया असलेली दिसून येते.

वाडीला श्रीशांतानंदस्वामी महाराज होते. त्यांचा पं. आत्मारामशास्त्रींवर फार लोभ होता. श्रीशांतानंदस्वामींची जीवनविषयक भूमिका पूर्णपणे अध्यात्मिक होती. त्यांनी आपला फोटो कधीही काढून घेतला नाही. देवाच्या सेवेला ते वाडीला येऊन राहीले होते. दुपारी शिष्य माधुकरी मागून आणत पण ते खायचे नाही, रात्रीच फक्त जेवायचे, सर्व वृत्ती परमेश्वरचरणी लीन झाल्या होत्या. वाडीला ते रस्त्याने चाचपडत जात असत. 'चष्मा आणून देऊ का' असे विचारल्यास 'नको' म्हणत. ''आम्हाला सगळ्या ठिकाणी पादुका दिसतात. कोठे पादुका नाहीत ना हे पाहून जातो.'' श्री शांतानंदस्वामी रोज एक उदबत्ती, निरांजन व एक केळे पादुकांशी नेवून देत असत.

पं. आत्मारामशास्त्री यांचे शिक्षण झाल्यावर त्यांना अमळनेरला ज्यावेळी नोकरीकरता बोलावणे आले. त्यावेळी त्यांनी श्रीशांतानंदस्वामींजवळ अनुमती मागितली. तेव्हा स्वामी म्हणाले ''जा. पण गाडी तरी चुकेल किंवा सामान जाईल. पण नोकरी मिळेल.'' घरची गरिबी होती तरी पैशाची व्यवस्था करून ते मुंबईपर्यंत गेले. खरोखरच त्यांची अमळनेरला जाण्याची गाडी चुकली. सामान जाण्यापेक्षा गाडी गेली हे बरे झाले असे पं. आत्मारामशास्त्रींना वाटले. कारण नेसावयास काहीच राहिले नसते. दुसऱ्या दिवशी शास्त्रीबुवा अमळनेरला पोहचले. मुलाखतीच्या वेळी आणखीन दोन विद्वान शास्त्री बरोबर होते. त्या दोघांजवळ पदवी संपादनाचे दाखले होते.

पं. आत्मारामशास्त्रींनी काशीला जावून आपले अध्ययन केलेले होते. त्यांचेजवळ दाखले नव्हते. त्यामुळे शास्त्रीबुवांना नोकरीची खात्री नव्हती. पं. आत्मारामशास्त्री वेदांत, न्यायशास्त्र, ज्ञानशास्त्र शिकले होते. विद्यापारंगत होते. पण त्यांच्या गुरूंनी त्यांना परीक्षेला बसू दिले नव्हते. कारण त्यांचे गुरु म्हणत. ''३५% तयारी करणे म्हणजे परिक्षा! तुला १००% ज्ञान आले पाहिजे.'' आपल्या शिष्याकडून गुरुंनी पूर्ण ज्ञानाची अपेक्षा करावी, असा तो काळ होता. प्रत्यक्ष मुलाखतीत दोन तुल्यबळांनी पं. आत्मारामशास्त्रींचीच निवड केली. पदव्युत्तर परीक्षेला संस्कृत शिकवू शकतील अशी ह्यांची तयारी आहे, हे त्या दोघांच्याही लक्षात आले. पण पं. आत्मारामशास्त्रींजवळ पदवीचे दाखले नसल्याने त्यांना त्यांच्या गुरुंचा दाखला आणण्यास सांगितले. त्यावेळी नोकरी देताना एक अट अशी होती की आम्ही नेमणूक केली तर परतीचे भाडे देणार नाही. त्यामुळे काशीला जाऊन गुरुंचा दाखला कसा आणावयाचा हा पं. आत्मारामशास्त्रींना प्रश्न पडला. जवळ पैसेच नव्हते. मिळणाऱ्या पगारातून पैसे फेडीन ह्या बोलीवर त्यांना शंभर रुपये देण्यात आले. पं. आत्मारामशास्त्रींनी त्याप्रमाणे दाखला आणून दिला व नोकरी सुरु झाली.

पं. आत्मारामशास्त्रींच्या वडीलांनी नऊशे रु. किंमतीस एक कपाशीचे शेत खरेदी केले होते. शेतात नुकसान झाल्यामुळे ते पैसे भरु शकले नाहीत. त्यामुळे मालकाने शेत गहाण ठेवून घेतले. त्यावेळेस पं. आत्मारामशास्त्रींना केवळ एकशेपंचवीस रुपये पगार होता. त्यामधील पंचवीस रुपयात आपली गरज भागवून

दर महिना शंभर रुपये वडिलांना पाठवून शेत सोडवून घेतले. पंचवीस रुपयात आपला चरितार्थ त्यांनी कसा भागवला असेले हे त्यांचे त्यांनाच माहीत! पं. आत्मारामशास्त्री ज्या ठिकाणी काम करत होते तिथल्या प्रमुखांनी वेदांतावर ग्रंथ लिहिला. शास्त्रीबुवांना त्याच्यावर प्रास्ताविक लिहिण्यास सांगितले. ग्रंथ शास्त्रींनी वाचला. त्यात काही चुकीचे लिहिले होते. त्यांनी 'मला यावर लिहीता येणार नाही कारण चुकीची दुरुस्ती करावी लागेल' असे सांगितले. याचा राग म्हणून सर्वांचा पगार वाढवला. पण शास्त्रीबुवांना मात्र जन्मभर दोनशे रुपयांवर काम करावे लागले. इतक्या कमी पगारातही पुतण्यांना, भावंडांना आपल्याजवळ शिक्षणासाठी ठेवले. त्यांचे हे ऋण अजूनही त्यांचे नातेवाईक स्मरतात. सगळे भाऊ, नातवंडे वाडीला असले की त्यांना खूप आनंद होई. सर्वांनी एकत्र रहावे ही अतिशय हौस. वाडीला असताना पहाटेची सेवा त्यांनी कधीही सोडली नाही.

त्यांचे वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध पुतणे श्री. रामशास्त्री यांनी त्यांच्या आठवणी सदगदीत होऊन सांगितल्या. स्वतः प. पू. श्रीदत्तमहाराजांनीही एक आठवण सांगितली. प. पू. श्रीगुळवणीमहाराजांच्या सत्तरीच्या समारंभात त्यांना मानपत्र वयोवृद्ध व देवाचे उत्तम सेवेकरी म्हणून श्री. आत्मारामशास्त्री यांचे वडिलांचे हस्ते देण्याचे ठरले. त्यावेळेस शास्त्रींचे वडिल म्हणाले, ''मला खूप बोलायची सवय नाही. पण एक सांगतो. ज्या हातांनी पादुकांची सेवा केली, पूजा केली, ज्या हातांना पादुकांचा स्पर्श घडला, जे हात पादुकांवर फिरले, तेच हात मानपत्रावर फिरवून त्यांना देतो''. प. पू. श्रीदत्तमहाराज म्हणाले की, 'एका वाक्यात त्यांनी सगळे साधले. यावर पुन्हा काही बोलण्याची गरजच उरली नाही.'

प. पू. श्रीदत्तमहाराज व पं. आत्मारामशास्त्री यांचे बद्दल काय सांगाल असे विचारले असता, हात जोडून डोळ्यांमध्ये अश्रू आणून श्री. रामशास्त्री म्हणाले, ''दोघे ईश्वरांचे अवतार आहेत'' श्री. रामशास्त्री यांचीही वाडीवरील निष्ठा फार मोठी आहे. थंडी, उन, पाऊस काहीही असो, नदीवर स्नान करून पहाटे पावणेपाचला पहिली घंटा वाजवतात व पहाटेचा काकडा सुरु करतात ही सेवेची कामगिरी आहे म्हणून ते कोठेही रहायला जात नाहीत. गेले तर रात्री बारा पर्यंत परत येतात. एकदा जास्त पगाराची नोकरी त्यांना मिळत होती. त्यासाठी ते वाडीहून निघाले होते. मिरजेला गाडीत बसले. आपली पडशी ठेवली. बाथरूमला गेले. येवून बघतात तो पडशी गेलेली. तात्काळ डोक्यात प्रकाश पडला. वाडीच्या समर्थ पादुकांना सोडून आपण पैशासाठी दुसरीकडे जातो म्हणून ही अद्दल घडली आहे असेच त्यांना वाटले. लगेच ते परत आले व कधीही सेवा सोडायची नाही हा निर्धार कायम केला.

पं. आत्मारामशास्त्रींच्या साक्षात्कारासंबंधी एक हृद्य आठवणी श्री. रामशास्त्री यांनी सांगितली. प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या प्रमाणे आत्मारामशास्त्रींची भागवताची

अनंत पारायणे झाली. भागवतावर त्यांची अपार श्रद्धा होती. एकदा पं. आत्मारामशास्त्री ठाण्याला असताना पहाटे ३/४ ची वेळ होती. त्यावेळी भागवतातील काही श्लोकांचे अतिशय गोड आवाजातील पठण त्यांना ऐकू येवू लागले. झोपेतून त्या नादब्रह्मानेच ते जागे झाले. इतक्या मधुर स्वरात कोण पठण करीत आहे म्हणून ते बसून ऐकू लागले. श्लोक अधिक स्पष्ट ऐकू येवू लागले. दार उघडावे म्हणून दाराजवळ गेले. दार उघडता उघडता तेजोमय प्रकाश दिसला व थोड्या वेळाने विलीन झाला. ते श्लोक प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्णच म्हणत आहेत अशी खात्री झाल्यावर ते देहभान विसरले. ब्रह्मानंदात राहिले. अंतर्बाह्य बदलविणारा हा अनुभव त्यांनीच श्री. रामशास्त्रींना सांगितला.

घोरात् कष्टात् स्तोत्राच्या जन्माची आणखी एक आठवण श्री. रामशास्त्रींनी सांगितली. एकदा संध्याकाळची पालखीची वेळ होती. पालखी दोघांनी एकमेकांकडे न बघताच उचलली. खरे म्हणजे पालखी उचलताना पुढच्याने मागे वळून, दुसराही सावध आहे ना, बघायचे असते. पण यावेळी दोघेही बेफिकीर होते. त्यामुळे पुढच्याने मागे न बघताच पालखी उचलली. त्यामुळे पालखीत मूर्तीला धक्का बसला व मूर्तीला खोक पडली. हातून अपराध घडला. काळजी वाटू लागली. प. पू. श्रीवासुदेवस्वामी महाराज ब्रह्मावर्ताला होते. त्यांना कळविल्याशिवाय उपाय नव्हता.! ''असे असे घडले. काय करायचे आपण सांगा'' म्हणून महाराजांना कळविले. महाराजांचे ताबडतोब पत्र आले. ''तुमच्या निष्काळजीपणामुळे असे घडले आहे. यापुढे सावधपणे वागा. तुमच्यावर इंद्राचे वज्र उगारलेले आहे. मी स्तोत्र पाठवून देतो. (घोरात् कष्टात् त्यावेळी केले आहे.) पालखीच्या वेळी करुणात्रिपदी रोज म्हणा. म्हणजे महाराजांचा कोप कमी होईल.'' वाडीची शिस्त महाराजांनी लावली आहे. सर्व संकटातून त्यांनी पुजाऱ्यांना बाहेर काढले आहे. अशी वाडीवर निष्ठा होती.

अमळनेरची नोकरीची वर्षे संपल्यावर ठाणे येथील तत्त्वज्ञान विद्यापीठात प. पू. श्रीपांडुरंगशास्त्री ह्यांनी त्यांना बोलावले. तेथे बरीच वर्षे पं. आत्मारामशास्त्रींनी पदवीधर मुलांना संस्कृत शिकविले. तत्त्वज्ञान विद्यापीठाच्या नोकरीत असताना निवृत्त व्हावे असे त्यांना वाटू लागले. त्यांनी प. पू. श्रीगुळवणीमहाराजांचेकडे आश्रमात रहावयाचे ठरवले. प. पू. श्रीगुळवणीमहाराजांना अतिशय आनंद झाला. आता श्रवणामध्ये अतिशय चांगला वेळ जाईल असे वाटले. पण देवाच्या मनात वेगळेच होते. निवृत्त झाल्यावर ते आजारी पडले व वाडीला गेले. कर्करोगाचे निदान झाले. त्यामुळे आश्रमात येवू शकले नाही. ऑपरेशनसाठी मिरजेला न्यावे लागले. ऑपरेशननंतर परत त्यांना वाडीला आणण्यात आले. वाडीला देह ठेवावा हाच ध्यास त्यांना लागला होता. वाडीला आल्याबरोबर, 'आपण वाडीला आल्याचे कळताच' त्यांनी आपला देह परमेश्वर चरणी विलीन केला.

पू. कै. यशवंतराव मराठे

यांचा जन्म १५ मार्च १९१७ ला झाला. परंतु वडिलांचे छत्र एक वर्षभरही लाभले नाही. आईवर ही मोठी कुऱ्हाड ऐन तारुण्यात कोसळली. शिक्षण नसल्यामुळे धुणीभांडी करून त्यांनी आपल्या मुलाचा संभाळ केला. दुर्दैवाचे तडाखे सर्व बाजूनी बसत होते. श्रीयशवंतरावजींचे डोळे अधू झाले. पोटापाण्याचा प्रश्न सुद्धा बिकट होता. गाण्याच्या वर्गाला गेले. परंतु आठ आणे फी देण्याची सुद्धा ऐपत नव्हती. थोडी पेटी येत होती तीच ते शिकले. वर्गामध्ये अखंड राहून मुलांना शिकवीत असत. गरिबी, शिक्षण नाही व अंधत्व यामुळे उपहास पदरी आला. विवेकाने त्यांनी कसेबसे दिवस काढले. मेहनतीच्या जोरावर त्यानी यात यश कमाविले आपला स्वतःचा संगीतवर्ग काढला. या वर्गातही फारसा पैसा मिळाला नाही.

टिळक विद्यापीठात त्यांनी वेदान्त व न्यायशास्त्राचा अभ्यास ऐकून केला. इतरानी वाचलेले ऐकून ते अभ्यास करीत असत. प. पू. श्रीदत्तमहाराजांचे मार्गदर्शन त्यांना ह्या विषयात लाभले. मुलांना शिकविण्याची कला कै. श्री. यशवंतरावजींना उत्तम अवगत होती. मुलांना ते जीव लावून शिकवत. शास्त्राभ्यास व संगीत या दोन गोष्टीवर ते जगले. त्यांच्या संगीताच्या विद्यार्थ्यांनी मात्र त्यांना उत्तम नांवलौकीक मिळवून दिला.

प. पू. श्रीदत्तमहाराजांचा स्वभाव गुणीजनांचा गौरव आपण स्वतः जाऊन सुद्धा करण्याचा आहे. कै. श्री. यशवंतरावजी मराठे हे प. पू. श्रीदत्तमहाराजांचे शिष्य होते. कै. श्री. यशवंतरावजी मराठे हे अंध होते. कै. मराठेगुरुजींची जेव्हा साठीशांत झाली तेव्हा प. पू. श्रीदत्तमहाराज त्यांचे घरी स्वतः गेले. हार घालून त्यांचा सन्मान करून शुभाशीर्वाद दिला. या श्री. यशवंतरावजींबद्दल त्यांच्या चरित्रात लिहितांना महाराजांनी गौरवोद्गार काढले आहेत ते असे.

"यशवंत हे नांव मराठेगुरुजीनी सार्थ केले आहे. त्यांच्या मागे कुठलीही संस्था नाहीं ते कुठल्याही विद्यापीठाचे कुलपती नाहीत तरीही त्यांच्याकडे अनेक जण येत असत. त्यांना समजावून सांगण्याची त्यांची क्षमता होती. आपले कर्तव्य समजून अखंड ज्ञानसाधना त्यांनी केली. ते कर्मयोगी होते. परस्परांना सहाय्य करण्याची वृत्ती विशेषयोग सांगितल्याप्रमाणे वागण्याची वृत्ती. सर्वांनी आत्मकल्याण करून घ्यावे ही भावना" अश्या विभूतींची सर्वलक्षणे यशवंतरावजींपाशी होती असे गौरवोद्गार प. पू. श्रीदत्तमहाराजांनी काढलेले आहेत.

अशा थोर व्यक्तीला अभिवादन करण्याचा योग या प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या चरित्रामुळे येत आहे. डॉ. सौ. नलिनी चाफेकर यांनी कै. श्री. यशवंतराव मराठे यांचे

चरित्र लिहीले आहे. तसेच या चरित्रातील प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या सर्व ग्रंथ संपदेचे रसग्रहण त्यांनी उत्तमरित्या केले आहो. श्री. मराठेगुरूजींकडे त्यांनी शास्त्राभ्यास केला आहे.



यती नारायणानंद सरस्वती स्वामीमहाराज

प. पू. श्रीदत्तमहाराजांचे सान्निध्यात आलेले सर्वच लोक ज्ञानसंपन्न व उच्च अशा शैक्षणिक पदावर अधिष्ठीत आहेत. प. प. यतीमहाराजांसारख्या काही व्यक्ती प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या सानिध्यात परतत्वाचा स्पर्श प्राप्त करुन घेतलेल्या आहेत.

प. प. यतीमहाराजांनी टिळक विद्यापिठात प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या सानिध्यात वेदान्त विषयाचा अभ्यास केलेला आहे. प. पू. श्रीधुंडीराज महाराजांचेकडून श्रीगणेशमंत्र घेतलेला आहे. श्रीयतीमहाराज हे श्री गणेश भक्त असून श्री मंगलमुर्तीनी त्यांना दर्शनही दिलेले आहे. प. पू. श्रीदत्तमहाराजांच्याविषयी त्यांच्या मनात अतिशय भक्तीभाव आहे. दि. २०-२-९५ रोजी प. पू. श्रीदत्तमहाराजांचा वाढदिवस होता. श्रीयतीमहाराज त्यावेळी पुण्यात होते. मुद्दाम आवर्जून ते वर्धापन दिनाच्या समारंभास उपस्थित राहिले होते. प. पू. श्रीदत्तमहाराजांनाही श्रीयतीमहाराजांविषयी विशेष ओढ आहे. श्रीयतीमहाराजांना वनस्पतींचे ज्ञान आहे. आयुर्वेदाचा अभ्यास आहे. त्यामुळे औषधेही ते देत असतात. त्यासाठी सुद्धा त्यांचेकडे लोक येत असतात.

प. पू. श्रीदत्तमहाराजानी यती महाराजांच्या आठवणी त्यांच्याच शब्दात देण्याची सुसंधी त्यांच्या मराठवाड्याच्या नुकत्याच झालेल्या दौऱ्यात लाभली. चि. प्रसाद पाटणकर व चि. विद्याधर फडके ह्यानी त्या लिहून घेतल्या. प. पू. श्रीदत्तमहाराजानीच एकदा संभाषणाच्या ओघात त्यांचे जीवन चरित्र सांगितले ''उगारचे यतीमहाराज म्हणजे उत्तम वैद्य! त्यांनी सगळे सोडून द्यायचे ठरवले. गणपतीचे मोठे उत्तम भक्त. १०००/१५०० रु. त्यावेळेला मिळवायचे. इचलकरंजीला होते. त्यांच्या वडलांना ते पसंत पडले नाही. एवढी मोठी प्रॅक्टीस सगळे सोडून कसे देणार? त्यांनी आपल्या भावाच्या शिक्षणाची व्यवस्था केली. भावाचे शिक्षण झाल्यानंतर मग सोडून दिले. आई वडील रागावले त्यांची समजुत घातली. नंतर सगळ्या तीर्थयात्रा केल्या, संस्कृत रा. ल. उर्फ राजाभाऊ जोश्यांच्या वडीलांकडे शिकले. त्यांनी तर यतीमहाराजांना आपल्या गावी ठेऊन घेतले, त्यांचे संस्कृतमध्ये उत्तम अध्ययन झाले. ते पुण्याला जगद्गुरुंच्या आश्रमात होते, आम्हीही जायचो काही वाचन चालायचे. नंतर त्र्यंबकेश्वरला जाऊन राहीले, त्र्यंबकेश्वरला

२४ लाखाचे गायत्री पुरश्चरण केले. मधुकरी मागून आणायची. परशुराम मंदीरामध्ये माडीवर राहत होते. आम्ही गेलो होतो. त्यांचे वडीलही काही दिवस तिथे येऊन राहीले. शेवटी शेवटी हे सगळे पाहिल्यानंतर वडीलांच्या मनावर परिणाम झाला. राग गेला त्यांचा. ''माझे सगळे जन्माचे पुण्य मी तुला दिलेले आहे.'' असे बोलून दाखिवले. पुढे वडील गेले. यतींचे सज्जनगडला जाणे येणे होते तिथे त्यांना दृष्टांत झाला. ''तुम्ही संन्यास घ्या आता,'' संन्यास कोणाजवळून घ्यायचा त्यांना प्रश्न पडला. समर्थांनी त्यांना एक मूर्ती दाखवली म्हणाले हे तुमचे गुरु आहेत. कोण गुरु कुठे रहातात काही पत्ता नाही. शोध करीत करीत जात होते. गरुडेश्वराला गेले सकाळी आणी संध्याकाळी ते जे गुरु समर्थांनी दाखविलेले ते संध्याकाळी तिथे आले. त्यांच्याकडे गेले, मला असे असे दाखिवले. समर्थांचा दृष्टान्त झाला ते म्हणाले ''मला कुठे सांगितलय? मी काही संन्यास देणार नाही.'' तेही पंढरपुरचे चांगले उत्तम वैदीक (पूर्वाश्रमीचे) होते. मग दुसरे दिवशी त्यांनाही दृष्टान्त झाला. गरुडेश्वरला त्यांना सन्यास मिळाला. संन्यास घेऊन भिक्षा वगैरे सोवळ्यानी मिळणे फार कठीण. पुढे चिंचवडला राहिले होते ते! तिथे कुठली भिक्षा मिळायला? बायका सकाळी पाच/सहा वाजता उठायच्या. काही आंघोळ नाही काही नाही. डबे भरुन द्यायचे नवऱ्याला. तिथे त्यांनी भिक्षा सोडूनच दिली. पिठ आणले द्यायचे, दुध मिळाले तर दुध नाही तर पाण्यात कालवून प्यायचे साखर नाही तर नाही. त्यावर्षी त्यांनी पहीला चातुर्मास मोरगावला केला. अन्न सुटले एकदम, अशक्तपणा आला. पण टिकून राहिले ते. पुढे ती सवय झाली त्यांना आणि शेवटी शेवटी हे उत्तम झाले म्हणाले खरकट नाही काही नाही, भांडी नुसती विसळून टाकली की झाले. निश्चय असला म्हणजे होते सगळे! गणपतीची कृपा आहे. उत्तम काव्य संस्कृतमध्ये करतात. वेदान्ताचा अभ्यास स्वतः वाचन करुन खूप झालेला आहे. सगळ्या लोकांना सांगतात. प्रयत्नांनी सगळे होऊन जाते. आणि मुख्यतः गणपतीची उपासना, ४ महीने एका ठिकाणी रहातात. (चातुर्मासात) कोणीतरी तिथे ऐकायला जातात. झाले की बाहेर पडतात. अगदी ओळख नाही अशा ठिकाणी जातात. पण सगळी व्यवस्था देव करतो म्हणाले. म्हणजे देवावर विश्वास जास्ती वाढतो. ओळखीच्या ठिकाणी कोणीही करील. ओळख नसताना कोणी दुध आणून देणे हे चालतय् म्हणाले सगळ! उगारला कांची गुरुस्वामी राहीले होते. आम्हीही गेलो होतो. दोन चार दिवस होतो. पूर्वी ब्रह्मचारी अवस्थेत आमच्या पिताजींकडून गणपतीचा मंत्र घेतला होता. महाराजांच्या सत्तर वर्षांच्या शांतीला आले होते. देऊळगावराजाला होतो पाच सात दिवस-श्रीधर स्वामींच्याकडेही जाऊन राहीले. ब्रह्मसूत्राची पारायण केली. पंधरा दिवसांनी एक याप्रमाणे यथाविधी पालन. कुठेही जेवले खाल्ले असे नाही''

हे भक्त असल्यामुळे कडक आचार धर्माबरोबर प्रेमाने प्रभु गुणगान करणे त्यांना फार प्रिय आहे. तशी त्यांची भजनाची पुस्तके आहेत. फक्त फळे व दूधच ते

घेत असतात. भारतभर भ्रमण चालू असते. तामीळनाडूसारख्या भाषा जाणता येत नाही अशा ठिकाणी सुद्धा ते भ्रमण करतात. त्यांचे कायमचे वास्तव्य नरसिंहसरस्वती स्थापित दत्तात्रय मठ, नारदघाट, वाराणसी येथे आहे.

कांची पीठाधीश प. प. चंद्रशेखर सरस्वतीमहाराज यांचेबरोबर तामीळनाडूत, कर्नाटकात व महाराष्ट्रात पायी प्रवास केला आहे. आचार्यांची यतीमहाराजांवर विशेष कृपा आहे. सहा सहा तास दोघांचे अखंड सुखसंवाद चालत. हे परमाचार्य यतीमहाराजांवरील प्रेमापायी उगारला तीन महिने राहिले होते.

प. प. श्रीयतीमहाराजांनी 'मंगलमूर्ती विघ्नहरा दुरितनाशना कृपा करा.' हा नाममंत्र सिद्ध केला. याचा अनुभव अनेक भक्तांनी अनुभवला आहे. या मंत्राच्या आचार्यांनी हजारो प्रती छापून महाराष्ट्र व तामीळनाडूत वाटल्या आहेत. त्यांची पुस्तके :

१) प्रभुगुणगान खंड १ उपासनात्मकपदे व भजने
२) प्रभुगुणगान खंड २ वेदान्त चिंतनपर पदे
३) प्रभुगुणगान खंड ३ चिंतनपर वेदान्त तत्वज्ञानपर प्रश्नोत्तरे (प्रकाशनाच्या वाटेवर)
४) लघु वासुदेवमनन हा वेदान्त जिज्ञासा ग्रंथ (मराठी अर्थासह)

प. प. श्रीयतीमहाराज साक्षात्कारी असल्यामुळे प. पू. श्रीदत्तमहाराज हे त्यांचे जवळ आत्मसुखसंवाद करतात. या दोघांच्या भेटीचा आनंद हा लौकिक पातळीवर अजमावता येण्यासारखा नाही. सर्व जग हे परमेश्वरस्वरुप आहे अशा अद्वैत भावनेने जरी प. पू. श्रीदत्तमहाराज जगाकडे पहात असले व सर्वांशी प्रेमभावाने वागत असले तरीही ज्यांनी परमेश्वराला तपाने, ज्ञानाने, भक्तीने, जोडले, ज्यांचे अंतरंग भगवंतमय झाले अशा अनुभवी श्रीयतीमहाराजांशी बोलताना प. पू. श्रीदत्तमहाराजांना प्रसन्नता वाटणे हे स्वाभाविक आहे.

वर्धापनदिनाच्या दिवशी ज्या प्रेमाने ते आले, ज्या भक्तीभावाने स्वतःच्या हाताने कोकमाचे सरबत प. पू. श्रीदत्तमहाराजांना अर्पण केले "शास्त्रीबुवा घ्या असे म्हणून स्वतःच्या हाताने पात्र भरून प्राशन करण्यास लावले हा भक्तीचा जिव्हाळा काही वेगळाच. दोन संत भेटीच्या कथा आपण नुसत्या वाचतो. याठिकाणी या वर्तमान काळात हा आनंद सोहळा आपण पाहू शकतो.

प. प. श्रीयतीमहाराजांचा स्नेहसबंध फार जुना आहे. प. पू. श्रीगुळवणी महाराज असताना श्रीयतीमहाराज श्रीवासुदेव निवासातच उतरत असत. प. पू. श्रीगुळवणी महाराजाबद्दल त्यांचा असाच सद्भाव होता. श्रीयतीमहाराजांनी एक अष्टक (संस्कृत) प. पू. श्रीगुळवणीमहाराजांना शुभेच्छा म्हणून केलेले आहे. ते पुढे दिले आहे. प. पू. श्रीदत्तमहाराजांचे करिता सहस्त्रदर्शन शांतीसमारोहाचे वेळी शुभाशीर्वाद

पाठविले आहेत. हे त्यांच्या आदरयुक्त भावनेचे दर्शन आहे. यांचे संस्कृत काव्य सर्वसाधारणपणे वाचताना समजणारे आहे. शिवाय गेय असल्यामुळे वाचायला सोपे वाटते. अशा या प. प. श्रीयतीमहाराजांचे आशीर्वाद या चरित्राला लाभले आहेत ही एक मंगलकारक गोष्ट आहे. त्यांना आदराने नमन करताना त्यांच्याच शब्दातील प्रार्थना करूया.

सकल मंगल लाभो, चित्तात सर्वदा भक्ती ।
नारायण नारायण सौख्ये नांदोत जीव हे जगती।



आश्विन कृ. १०
२८-१०-१९६७ **॥ श्रीगणनाथ ॥** कोल्हापूर

श्री. वामनरावजी गुळवणी महाराजानां वयसोऽशीतिवर्षे निमित्ते
नृसिंहवाटिकायां सत्कारसमये-


मंगलात्मरूपाय भक्तमंगलकारिणे।
विश्वमंगलनाथाय गणेशाय नमोनमः ॥१॥
भक्ताभीष्टकरो दत्तः स्मर्तृगामी सुखप्रदः।
तस्मै नृसिंहयतये गुरुदेवाय ते नमः ॥२॥
सृष्टिशासनकारिण्यः सच्चिदानंददायकाः।
आशीर्वचःसमर्थाः श्रीनृसिंहयतिपादुकाः ॥३॥
यत ईशप्रसादाद्धि सामर्थ्यं देवतात्मनाम्।
तथा सभापतीनां वा चाधिकारोऽस्ति मे नहि ॥४॥
आचार्यपदमारूढा दत्तक्षेत्रनिवासिनः।
ज्ञानवृद्धास्तपोवृद्धा योग्या श्रीचरणाः खलुः ॥५॥
सत्कारी सफलो भाति चायुरारोग्यवर्धकः
कालौचित्यं प्रयोज्यानां चातुर्यमपि दर्शकम् ॥६॥
अश्विन्यां हितयोद श्याममायुर्वेदप्रमाणकाः।
जन्मोत्सवं प्रकुर्वंति धन्वंतरिनिमित्तकम् ॥७॥
वामनानां शुभे कार्ये श्रद्धाऽस्तिक्यविवर्धने।
यते नारायणस्यापि संति नारायणाः शुभाः ॥८॥



ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा रौद्रीशांती सोहळा

देऊळगावराजा

श्री वासुदेवनिवासाश्रम, पुणे



प्रयाग १९४

शीतल हा पंथ । माहेराची वाट । जवळीच नीट । सुखरुप।। या तुकाराम महाराजांच्या उक्तीप्रमाणे पुण्यातील आश्रम हे माहेर घर वाटते. मायबाप दोघे पहातिल वाट । या त्यातिल उक्तीप्रमाणे परमपूज्य दत्तमहाराज, ति. सौ. आईसाहेब या दोघांना भेटण्याची ओढ असते.

परमपूज्य श्रीगुळवणीमहाराज गेल्यानंतर आज वीस वर्षे ही उभयता सर्वच भक्तमंडळीना आधारवडासारखी आहेत. अशीच एकदा पुण्याला गेले असताना गेल्याबरोबर महाराजांनी खालील पत्र माझ्यापुढे टाकले व वाचून पहा म्हणाले. मी पत्र उघडले. त्यामध्ये महाराजांच्या रौद्री महोत्सवाबद्दल कार्यक्रमाची रुपरेखा लिहीली होती.

॥ ॐ नमो व्यंकटेशाय ॥

ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर - रौद्रीशांती महोत्सव समिती

९-१२-१९९३ देऊळगांव राजा, जि. बुलढाणा ४४३ २०४. श्री. वसंतराव कुलकर्णी

ब्रह्मश्री दत्तमहाराज यांचे चरणाशी सादर प्रणाम.

आपले दि. २४-११-९३ चे कृपा पत्र मिळाले. त्यानुसार दि. ५-१२-९३ ला बैठक घेऊन आपल्या पत्राचा सर्वांनी विचार विनिमय केला. त्यानुसार कार्यक्रम ४ ते ५ दिवसांचा होईल. कार्यक्रमाचा खर्च एकंदरीत रु. ५०,०००/- होईल असा अंदाज काढला. कार्यक्रमात पंचकुंडात्मक विष्णुयाग, रौद्री शांती, तुला व सत्कार इ. कार्यक्रम आयोजित केलेले आहेत.

पाचही कुंडाचे यजमान पद व पाच दिवसांच्या पंगतीचे (अन्नदान) यजमान ठरलेले आहेत. ब्राह्मण दक्षिणेबद्दल समक्ष बोलणे होईल.

संभाव्य तारखा शिवरात्री नंतर म्हणजे एप्रिल महिन्यात खालील प्रमाणे काढल्या आहेत.

१) चैत्र शु. १२ ते चैत्र व. प्रतिपदा (दि. २४-४-९४ ते २८-४-९४)
२) चैत्र व. ६ ते चैत्र व. १० (दि. १-५-९४ ते ५-५-९४)

सर्वसाधारण फाल्गुन महिन्यात परीक्षा व मार्च महिन्याची इतर कार्य असतात. त्यामुळे वरील तिथी काढल्या आहेत.

वरील तिथींमध्ये आपल्या सोयी प्रमाणे बदल सुचविले तरीही चालतील जमल्यास आम्ही २५-२६ डिसेंबरला पुण्यास दर्शनाला येऊ.

आपला दर्शनाभिलाशी

सही वसंतराव कुलकर्णी

सचिव, रौद्री शांती महोत्सव

पत्र वाचल्यावर माझ्या मनात आले, ''आल्या आल्या, हे पत्र मला का दाखविले?'' तो विचार मी मनातच ठेविला. महाराजांची प्रकृती त्यावेळी बिघडलेली होती. पूर्ण विश्रांतीची गरज होती. कार्यक्रमाला जवळ जवळ चार महिने अवकाश होता. तरीही माझ्या मनात आले, एवढ्या लांबचा प्रवास कसा काय झेपेल? एवढी दगदग झेपेल? थोड्या वेळाने महाराज म्हणाले, ''ईश्वराची इच्छा असेल तसे घडेल. पण बालाजी घरचे बोलावणे तर आले आहे. बघू काय होते ते! त्या लोकांची फार इच्छा आहे. म्हणून त्यांनी पत्र धाडिले आहे.'' एवढे बोलणे झाले व ते मूळपत्र मी माझ्या पर्समध्ये ठेवले. माझ्या मनांत एकच विचार आला. संतांचे बोलणे आपल्याला कळत नाही. म्हणून झेरॉक्स काढून मूळ प्रत परत देऊया. ज्या अर्थी आल्या आल्या हे पत्र दाखविले आहे; त्याअर्थी त्यात काहीतरी हेतू असावा. परमेश्वराची लीला परमेश्वरालाच माहिती! मी पत्र पर्समध्ये ठेवले तरी महाराज काही बोलले नाही. आम्ही दोघांनी त्या प्रतीची कॉपी काढून मूळ प्रत परत केली.

महाराजांच्या प्रकृतीत चढउतार सतत चालू होता. नाडीचे ठोके व्यवस्थित पडत नव्हते. दम लागत होता. औषधोपचार चालू होते. कधी बरे कधी बरे नाही अशा बातम्या येत होत्या. सर्व लोक काळजीत होते. वारंवार भेट घेण्यासाठी आम्ही जात होतो. महाराज निश्चल होते. आम्हाला मात्र फार काळजी वाटत होती. ते म्हणत, ''हा देह किती दिवस काम देणार. कधीतरी असे होणारच.'' रोज डॉक्टर येऊन रक्तदाब बघत होते. हृदयाचा फोटो काढत होते. अशा परिस्थितीत सुद्धा कधी स्नान राहीले नाही. उपासना चालू होती. दोन्हीवेळा संध्या जप चालू होते. सर्वांच्या सुदैवाने, ईश्वरीकृपने महाराजांना हळूहळू बरे वाटू लागले. आणि सर्वांनांच निश्चिंतपणा येऊ लागला. आईसाहेब तर पूर्ण घाबरून गेल्या होत्या. त्यांना काही सुचत नव्हते. त्यांनाही धीर येऊ लागला.

देऊळगावराजा ही महाराजांच्या वाडवडीलांची कर्मभूमी! येथे त्यांचे घर आहे. आजोबांपासून मराठवाड्यात भक्तसमूह खूप मोठा आहे. बालाजीचे देवस्थान तेथे आहे. त्याची पुराणसेवा कवीश्वर घराण्याकडे परंपरेने आहे. त्या देवळाचे विश्वस्त महाराजच आहेत. महाराजांना त्या गावी जायचे म्हणून आनंद व समाधान वाटत होते. हे त्यांच्या चेहऱ्यावरुन दिसत होते.

एप्रिल महिन्याचे दिवस. उकाडा तीव्र होता. पण शीतोष्ण सहन करण्याची शक्ति त्यांच्यात असल्याने त्यांनी कशाचीच काळजी केली नाही. तारखा निश्चित करण्यासाठी देऊळगावराजाची मंडळी पुण्याला प. पू. श्रीदत्तमहाराजांना भेटली. पू. सौ. ताईमहाराजांच्या विचाराने कार्यक्रम नक्की झाला. त्याची पत्रिका खालील प्रमाणे निघाली.

ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर

रौद्री शांती महोत्सव समिती

देऊळगावराजा, जि. बुलढाणा ४४३ २०४

रौद्री शांतीचा दैनंदिन कार्यक्रम

प्रतिदिनी सकाळी ७.३० ते १०.३० व दु. १ ते ३

दि. २३-४-९४ शनिवार चैत्र शु. १२ शके १९१६

गणपतिपूजन, पुण्याहवाचन, मातृकापूजन,
नांदीश्राध्द, ऋत्विगवरणं, मधुपर्क, दिग्रक्षण, पंचगव्य,
भूमिपूजन, अग्निमंथन, देवतास्थापन.

दिनांक २४-४-९४ रविवार चैत्र शु. १३

स्थापित देवतापूजन, ग्रहमंडल हवन
पंचायतनदेवता हवन.

दिनांक २५-४-९४ सोमवार चैत्र शु. १४

स्थापित देवतापूजन, पंचायतन हवन.

दिनांक २६-४-९४ मंगळवार चैत्र व. १

स्थापित देवतापूजन, हवन, रौद्रीशांती, तुलादान, गोप्रदान,
जाहीर नागरी सत्कार, मानपत्र प्रदान
कल्पवृक्ष पुस्तिका प्रकाशन

दिनांक २७-४-९४ बुधवार चैत्र व. २

स्थापित देवतापूजन, बलिदान, पूर्णाहुती, महाप्रसाद
वरील उत्सव काळांत मान्यवरांची प्रवचन
कीर्तनादी कार्यक्रम होतील.

रौद्री शांती महोत्सव समिती तर्फे

प्रयाग १९७

संतवाणी

दैनंदिन कार्यक्रम भरपूर होता. परमपूज्य महाराजांचा निरोप आला की, देऊळगावला रौद्रीशांतीसाठी या. त्यांचे बोलावणे आल्यावर माझे मन पुन्हा भूतकाळात गेले. परमपूज्य गुळवणीमहाराजांच्या रौद्रीशांतीची आठवण झाली. पुण्याच्या एम. ई. एस. कॉलेजच्या प्रांगणात झालेला भव्य दिव्य सोहळा डोळ्यासमोर आला. सहस्रचंद्रदर्शनशांतीप्रमाणे या सोहळ्याचे कार्यवाह परमपूज्य श्रीदत्तमहाराज होते. त्यानीच हा समारंभ घडवून आणलेला होता. त्यावेळी श्रीगुरुमहाराज म्हणाले होते की, दत्तमहाराजांचे असे सगळे सोहळे आमच्यापेक्षा मोठ्या प्रमाणावर साजरे होतील. संताची वाणी कधीच खोटी ठरत नाही. दोन्ही उत्सव पहाण्याचे भाग्य मला लाभले ही मात्र ईश्वरी कृपा आहे.

देऊळगावराजा येथेही सर्व यज्ञ यथासांग पार पडत होते. अन्नदान होत होते. रौप्यनाण्याची तुलाही झाली. पंचक्रोशीतून हजारो लोक दर्शनाला येत होते. माणसांची रीघ लागली होती. महाराज हे सर्व कसे पार पाडत होते ह्याचे आश्चर्य वाटत होते. मंत्रदीक्षा घ्यायला कुटुंबच्या कुटुंब यायची. श्रीमहाराज त्यांना कृतार्थ करीत होते. दोन अडीचशेची रांग असायची. उकाडा एवढा प्रचंड प्रमाणात होता, पण महाराजांना पंखा लागला नाही की, 'उकाडा फार' म्हणून तोंडातून शब्द काढला नाही. भक्तीला महापूर आला होता. श्रद्धा व भक्ति बघण्यासारखी होती. आपण शहरवासी माणसे ही भक्ति पाहून थक्क होऊन जातो. गुरुंना वस्त्र देण्याची अहमहिका लागली होती. किती देऊ व किती नको असे झाले होते. म्हाताऱ्या-कोताऱ्या बायका म्हणत होत्या, किती दिवसांनी आज आम्हाला दर्शन झाले. सासरी गेलेल्या मुली देऊळगावराजात येऊन थांबल्या होत्या. त्यांच्या भक्तीभावनेचे एक उदा. सांगते. एका बाईच्या हातात महाराजांना देण्यासाठी ताट भरलेले होते. २ उपरणी, २ धोतरे, २ लुगडी त्यात होती. मी म्हटले,''दोन धोतरे दिसतात?'' त्याबाई माझ्याकडे बघायला लागल्या. माझा प्रश्न ऐकून त्यांना फार आश्चर्य वाटले. ''काय हो'' त्या म्हणाल्या, ''घरात तुम्ही एकच घेता का? कधीतरी आम्ही गुरुंना देणार तर आमच्यासारखे नको द्यायला? तुम्ही शहरची माणसे पुस्तकेच वाचणार! आपल्यासारखे गुरुंना करावे असे तुमच्या पुस्तकात लिहिले नाही का? तुमचा प्रश्न ऐकून मला आक्रीतच वाटले. गुरु व देव एकच आहेत. एवढे कळले तरी पुष्कळ. कधीतरी अशी देण्याची वेळ येते. तर तेव्हा हात आखडता घ्यायचा? लक्षात ठेऊन जा बर का देऊळगावाहून'' त्यांचे प्रेमळ भाव, सात्विक संताप, श्रद्धा पाहून मला कौतुक वाटले. आपला हिशेबीपणा म्हणजे किती अज्ञान आहे हेही कळले. या प्रकारच्या श्रद्धेने तेथील वातावरण भारलेले होते. आणखी असेच एक उदाहरण! लग्नाची वरात दारावरुन जात होती. महाराज ज्या ठिकाणी उतरले होते

तेथे वरात थांबली. नवरानवरी उतरली. महाराजांच्या पाया पडली. सर्व लोकांनी महाराजांचे दर्शन घेतले. आम्हाला वाटत होते की, इतकी माणसे दर्शन घेणार तेव्हा महाराजांना त्रास होईल. त्याबरोबर लग्नातील मंडळी म्हणाली, ''अहो, असे काय करता. वाटेत देव बसलाय मग वरात कशी पुढे जाईल. महाराजांची काळजी कशाला करता. त्यांच्या मनात असले तर दर्शन देतील. त्यांनी नको म्हटले तर एकही माणूस येथे राहाणार नाही. ते देव आहेत हे तुम्ही विसरलात म्हणून तुम्हाला त्यांची काळजी वाटते. ते सर्वांसाठी आले, तुमचा कायदा पुण्याला लावा.'' अशी त्यांची श्रद्धायुक्त भक्ति मनाला विचार करायला लावणारी होती.

* * *


रौप्यतुला

आम्ही मुख्य दिवस होता त्यादिवशी मंगळ. २६-४-९४ देऊळगावराजाला खूप उशिरा जालन्याहून रिक्षा करुन पोहोचलो. तुलेचा कार्यक्रम चुकणार असे वाटू लागले. मी व मीना लेले नावाची मुलगी एका रिक्षात होतो. दुसऱ्या रिक्षांत अन्य मंडळी होती. दोन रिक्षांची चुकामुक झाली. बालाजीच्या देवळाशी आमची रिक्षा आली. प्रचंड गर्दी. आत जाता येणार नाही. सामान कोठे ठेवणार प्रश्न आला. महाराजांचे दर्शन कधी होईल ते खरे! पण मनातून त्यांना नमस्कार केला. तेवढ्यात महाराजांची गाडी आमच्या मागे आली. खूप आनंद झाला. डोळ्यातून अश्रू आले. आम्ही झटकन उतरलो. दर्शन घेतले. त्यांनाही आनंद झालेला दिसला. ते म्हणाले, ''निघतानाच आम्ही विचारले, नीलाताई कशा आल्या नाही?'' गाडी मंडपाकडे गेली. तेवढ्यात दुसरी रिक्षा आली. सामान उतरवून ठेवून दिले. आम्ही सर्वजण तुलादान पाहण्यासाठी पुढे जाऊ लागलो. गर्दी एवढी प्रचंड होती की, मला काही पुढे यायला जमणार नाही. मी येथेच सामानाजवळ बसते. असे म्हणून मी बसले. इतक्यात १२ वर्षाचा एक मुलगा माझ्याजवळ आला व म्हणाला,''ते महाराज तेथे बसलेत ना! ते तुम्हाला बोलवत आहेत. मी गर्दीतून वाट काढीत नेतो. तुम्ही माझ्याबरोबर चला. मी त्याच्याबरोबर निघाले. त्याने मला गर्दीचा थोडाही धक्का न लावून देता कसे नेले? माझ्या बरोबरच्या मंडळीनाही नवल वाटले की सामानाजवळ बसलेल्या नीलाताईना कोण मुलगा नेत आहे? तर तेवढ्यात महाराज सांगतच होते की, नीलाताई कोठे असतील त्यांना बोलवा. मुलानी मंडपापाशी नेले. चपला येथेच काढून ठेवा व आत जा असे म्हणाला. एवढ्या प्रचंड गर्दीत तुलेजवळ गेले. महाराजांच्या मुलीने महाराज बसले होते तेथे नेऊन मला बसविले. मी पूर्ण भांबावून गेले होते. दोन गोष्टीबद्दल विशेष ईश्वराची कृपा जाणवली. १) एवढ्या गडबडीत परमपूज्य श्रीदत्तमहाराज मला विसरले नाहीत. २) मला तुला बघण्यास मिळावी म्हणून श्रीबांलाजीच त्या मुलाच्या रुपाने आले का? हा मुलगा नंतर कोणासच दिसला

नाही. या ईश्वरी कृपेच्या दोन गोष्टी पाहून माझे मन भरुन आले. ज्यावेळी पत्र दाखविले तेव्हाच मी येथे येऊन सर्व पहावे हा त्यांचा संकल्प होता. हे त्यावरुन मला कळून आले. त्यापुढची आश्चर्याची गोष्ट म्हणजे महाराजांचा सत्कार होता. सभेचे आयोजन आधीच झाले होते. पण तेथील कार्यकर्त्यांनी मला भेटून विनंती केली की, आज रात्रीच्या समारंभात मुंबईच्या वतीने तुम्ही बोला. या त्यांच्या आग्रहाने मनातले नवल आणखीन वाढले आणि ते गतकाळात गेले. परमपूज्य श्रीगुळवणी महाराजांच्या समारंभातून व श्रीदत्तमहाराजांच्या समारंभातून मला बोलण्याची संधी मिळत गेली होती. अचानक बालाजीच्या देवळात महाराज्यांच्याबद्दल दोन शब्द बोलण्याची संधी मला मिळाली ही एक कृपेची गोष्ट वाटली. इतर समारंभात वावरणारी मी व या समारंभात वावरणारी मी ह्यात फरक होता. प्रत्येक समारंभात आम्ही दोघे होतो. माझे एकटेपण मन अस्वस्थ करीत होते. ही सर्व परिस्थिती महाराजांनी जाणून घेऊन जास्त आपुलकी, माया दाखविली त्यामुळे ही सेवा करता आली. प्रथमच उल्लेख केल्याप्रमाणे पत्र मला का दाखविले? या सगळ्या अमूर्त गोष्टीचा उलगडा पूर्ण झाला व संताचे वचन आज्ञा म्हणून पाळावे हा बोध मी घेतला.

❁

बालाजीचे देऊळगावराजा



श्री बालाजी

देऊळगावराजा येथे लक्ष्मी व्यंकटेशाचे पुरातन मंदिर आहे. ते जागृत आहे. या गावाला बालाजीचे देऊळगाव असेच समजतात. हे गाव विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यात असून चिखलीपासून सुमारे ३६ मैल आणि मराठवाड्यातील जालना पासून अवघ्या १६ मैलावर आहे. या गावाजवळ श्री छत्रपती शिवाजीमहाराजांच्या मातोश्रीचे प्रातःस्मरणीय जिजाबाई ह्यांचे माहेरघर, सिंदखेड राजा हे ऐतिहासिक ठिकाण प्रसिद्ध आहे.

आंध्रमधील तिरुपती देवस्थानच्या बरोबरीचे देऊळगावराजा येथील देवस्थान मानतात. तिरुपती बालाजीला केलेला नवस येथे फेडण्यासाठी येतात. ही बालाजीची मूर्ती अंगुष्ठमात्र आहे. ही पंचधातूची आहे. देवाला अनेक भक्तांनी स्वयंप्रेरणेने अलंकार अर्पण केलेले आहेत. अश्विन शुद्ध प्रतिपदेपासून कार्तिक वद्य प्रतिपदेपर्यंत या गावी उत्सव सोहळा सुरु असतो. या उत्सवातील लाटा मंडप पालखी सोहळा हे समारंभ प्रेक्षणीय असतात.

प. पू. श्रीसद्गुरु वक्रतुंडमहाराज कवीश्वर यांनी श्रीब्रम्हांडपुराणातंर्गत मानसोत्तर खंडातील देवालय ग्राम महात्म्य या साठ वर्षापूर्वी संपादित केलेल्या ग्रंथात

करवीर येथील कण्वशाखीय देवशर्मा नावाच्या ब्राम्हणांनी या श्रीव्यंकटेशाच्या अंगुष्ठमात्र मूर्तींची प्रतिष्ठापना केल्याचा उल्लेख आढळला. या बालाजीच्या मंदिरातील पटांगणांत महाराजांचा सत्कार सोहळा साजरा झाला. आजूबाजूच्या परिसरातील काही सत्पुरुष ह्या सत्कार प्रसंगी उपस्थित होते. या बालाजीच्या दरबारात जो सोहळा झाला त्याची पद्धत आगळी वेगळीच होती. महाराजांना घराहून आणताना बालाजीसंस्थानचे भालदार चोपदार बरोबर होते. आणताना महाराजांच्या डोक्यावर सुरेख छत्र होते. आणि ललकाऱ्या देत देत मिरवणूक काढून सत्काराच्या तेथे महाराजांना आणले. आल्यावर प्रथम देवाजवळ देवस्थानकडून महावस्त्र अर्पण झाले. बालाजीचे आशीर्वाद घेऊन सत्कारासाठी महाराज व्यासपीठावर बसले. महाराजांना अनेक संस्थानकडून मानपत्र मिळाले, अनेकांची गौरवपर भाषणे झाली. रेशमी फेटा, धोतर, उपरणे असे महाराजांना अर्पण करण्यात आले. महाराजांना दिले तसेच व्यासपीठावरील सर्व सत्पुरुषांना तसाच अहेर करण्यात आला. सर्वांनी मिळून एक हार घालण्याची कल्पना पटली नाही. प्रत्येकांनी आपापला हार महाराजांना अर्पण केला. ह्या सर्व प्रेमळ भक्तमंडळीच्या अगत्यांनी, सोहळ्यांनी परमपूज्य दत्तमहाराजांचे मनही भारावले. आपल्या आशीर्वादपर भाषणात ते म्हणाले, ''वडीलांची, सद्गुरुंची ही पुण्याई आहे. आमच्या मातोश्रीना सत्पुरुषांच्या गाठीभेटी घेण्याची, वंदन करण्याची स्वाभाविक ओढ होती. त्यामुळे आम्हालाही लहानपणापासून सत्पुरुषांचा सहवास घडला, ही आईची पुण्याई आहे.'' हे बोलत असताना त्यांचा कंठ एवढा भरुन आला की त्यांना पुढे बोलवेना. ''आमच्या पिताजींची रौद्रीशांती ह्या ठिकाणी झाली. आज येथे भक्तमंडळीनी सर्व तऱ्हेचे यज्ञयाग, रौद्रीशांतीचा समारंभ घडवून आणला. ह्या सर्व यज्ञाचे फळ सर्वांच्या हितासाठी व्हावे अशी प्रार्थना देवाजवळ आहे. स्वर्गस्थ मातापितरांना संतोष वाटला असेल असे मला वाटते.'' असे विचार मांडून सर्वांचे कौतुक केले.

समारोप

दुसऱ्या दिवशी महाराजांनी सर्व देऊळगावराजातील कार्यकर्त्यांना बोलावून प्रसाद भेट दिली. एवढे परिश्रम घेतल्याबद्दल सर्वांचे कौतुक केले. त्या सत्कारसमितीनेसुद्धा महाराजांच्या बरोबर आलेल्या सर्वांना साग्र संगीत निरोप दिला. सर्व भगिनीवर्गाला पातळे दिली. लहान मुलांचीही आठवण ठेवून काहीना काही वस्तू दिल्या. पुरुष वर्गाला वस्त्रे दिली. कुणालाही वगळले नाही. वस्त्राबरोबर श्रीफळ दिले. परमपूज्य महाराजांना अगर त्यांच्या नातेवाईकांना देणे योग्यच होते. पण आमच्या सारख्या त्यांच्याबरोबर आलेल्या भक्तमंडळीना सुद्धा ते विसरले नाही ही त्यांची श्रद्धाभक्ती कौतुकाची वाटली. येथे आणून महाराजांनी उत्कट श्रद्धा भक्तीचे दर्शन घडविले. त्यांचे भाव किती श्रेष्ठ प्रतीचे आहेत हे आम्हाला कळले. आणि

परमार्थ मार्गात प्रगती होण्यासाठी अशा श्रद्धेची किती जरुरी आहे ह्याची कल्पना आली. महाराज ज्यांच्या घरी उतरले होते ते श्री चंदूशेठ आमचेच झाले होते. त्यांचे अगत्य, चौकशी, विचारपूस गृहस्थाश्रमातील अतिथ्य जाणवण्याइतके वेगळे होते. महाराजांचे भक्त श्रीजगनशेठ म्हणाले, ''आम्ही येथे आलो तेव्हा आमच्या जवळ काही नव्हते. आता आहे ते सर्व महाराजांच्या कृपेने झाले. संकोच करु नका. सर्व त्यांचेच आहे.'' मराठवाड्यातील हा एक आगळा वेगळा सोहळा व तेथील भक्तमंडळी आणि महाराजांचा लोकसंग्रह पाहून मन विस्मित झाले.

प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या दौऱ्याची सुरवात जालन्यापासून झाली. नविनच स्थापन केलेल्या श्री दत्तमंदिरात प. पू. श्रीमहाराजांचे मोठे उत्साहाने स्वागत झाले ही हकीगत आलीच आहे. पू. सौ. ताईमहाराज धन्य झाल्या. देऊळगावराजाहून श्रीमहाराज पुनः जालन्याला आले. विश्रांती घेऊन पुढे हिंगोलीला आले.

हिंगोलीत प. पू. श्रीदत्तमहाराज

श्री. ओमप्रकाश देवडा हे प. पू. श्रीदत्तमहाराजांचे परमभक्त, हिंगोलीतील प्रतिष्टित व्यापारी. तेलाची गिरणी आणि त्याशिवाय मोठा व्यापारउदीम, समाजसेवक, काँग्रेसचे क्रियाशील कार्यकर्त्यामुळे पुढारी वर्गात गणना. श्री. शंकरराव चव्हाणांचे चाहते. हिंगोली जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष. महाराजांची पिढ्यान् पिढ्या भक्ति. श्रीमहाराज हिंगोलीला यावेत म्हणून २ वर्षे सतत प्रयत्न. त्यासाठी प्रार्थना, अनुष्टान सर्व चालू. २ वर्षापूर्वी त्यानी १००८ श्रीगुरुचरित्र पारायणाची आखणी केली होती. श्री महाराजाना आवडेल ते देवकार्य करावे ही मनापासूनची भावना. 'राजकारणी माणसांचे कांही खरे नाही. श्रीमहाराजांमुळे ह्या सर्व गोष्टीना आळा बसतो. त्यांच्या सहवासात सर्व प्रपंच विसरता येतो. देवाची आराधना कशी करावी याचे प्रत्यक्ष धडे मिळतात. त्यामुळे त्यांच्या स्वागतात काही न्यून राहू नये अशी आम्हा सर्वांची भावना असते' असे ते सांगतात. 'आम्ही श्रीमहाराजाना श्री दत्तप्रभूच मानतो. त्यांच्याच कृपाशीर्वादाने आमचा प्रपंच चालतो तसाच आमचा परमार्थही व्हावा' अशी त्यांची धारणा असते.

संस्कृत संमेलन उद्घाटन

शनिवार दि. ७ मे १९९४

जालन्याला ओमप्रकाशजींच्या गाड्या आल्या आणि प. पू. श्रीदत्तमहाराज आणि सर्व मंडळी शुक्रवार दि. ६ मे १९९४ रोजी हिंगोलीला श्री. ओमप्रकाश

देवडांच्या घरी रात्रौ मुक्कामाला आली. त्यांचे दुमजली घर प्रशस्त होते. पुढे-पाठी रस्ता असला तरी त्या रस्त्यावर फार वर्दळ नसल्यामुळे शांतता होती. बाहेरचा उष्मा घरात जाणवत नव्हता.

प. पू. श्रीदत्तमहाराजांचे धाकटे बंधू श्री. श्रीपादशास्त्री कवीश्वर, संस्कृतचे प्रचारक. त्यानी महाराजांचे संमतीने संस्कृत संमेलन भरविण्याचा बेत आखला. श्री. ओमप्रकाशजीनी सर्व साह्य करण्याचे मान्य केले. श्रीमहाराजांचेही संस्कृत भाषेवर विशेष ममत्त्व. त्यांचा वेद व्यासंग सर्व संस्कृत मधूनच झालेला. भारतभरच्या संस्कृत पंडितांचा सत्कार श्रीमहाराजांच्या हस्ते होणार होता. आपल्याला ह्या संस्कृत पंडिताना विनम्र अभिवादन करता येईल, त्यांचे कौतुक करता येईल. अशी श्रीमहाराजांची भावना तर श्रीमहाराजांच्या हस्ते सत्कार म्हणजे केवळ मणिकांचन योग ह्या भावनेने संस्कृत पंडितानी गर्दी केली होती.

प. पू. श्रीदत्तमहाराजांची नाजूक झालेली तब्येत, प्रवासाची दगदग. त्यामुळे हा स्वागत समारंभ कसा निभावू शकेल याची सर्वाना असलेली काळजी. श्रीदत्तमहाराज संस्कृत संमेलनाला उपस्थित राहीले. त्याचे उद्घाटन केले. सर्व पंडितांचा गौरव स्वतःही केला, संस्कृतमध्ये मार्गदर्शनही केले. सर्वच कार्यक्रम बहारीचा सुंदर झाला. श्रीमहाराजांच्या उपस्थितीने श्री. ओमप्रकाशजी व श्रीपादशास्त्री कवीश्वरांच्या श्रमाचे चीज झाले. समारंभाला आलेल्या सर्व वक्त्यानी श्रीमहाराजांचा गुणगौरव केला तो पाहून श्रीमहाराजांच्या बरोबर आलेल्या सर्व मंडळीना धन्य वाटलें. श्रीओमप्रकाशजीनी सुद्धा सर्व संस्कृत पंडितांची उत्तम व्यवस्था ठेवली. त्यांची संभावनाही राजाच्या उदारतेने केली. त्या सेवाभावी पंडिताच्या जाण्या येण्याचा खर्च, त्याशिवाय एक छोटी सूटकेस, श्री गुरुचरित्राची पोथी, शाल व श्रीफळ देवून आपली गुण ग्राहकता दाखविली. श्रीमहाराजानाही त्याचा संतोष झाला.



श्रीगुरुचरित्र पारायण

रविवार दि. ८ मे १९९४

हिंगोली व्यापारी पेठ खरी पण गाव तसे लहानच. श्री. ओमप्रकाशजींची तेलाची गिरणी थोडी गावांबाहेर होती. तिथल्या विस्तृत जागेत श्रीगुरुचरित्र पारायणासाठी ६०/६५ भक्त मंडळी बसली होती. प. पू. श्रीमहाराजांचे पाय हिंगोलीला लागावेत, त्यांची तब्येत उत्तम रहावी म्हणून हा श्री दत्तप्रभूना प्रसन्न करुन घेण्याचा खटाटोप पाहिला की महाराज येथे कोणत्या ओढीने आले हे लक्षात येते. प. पू. श्रीमहाराजांचे वडील प. पू. श्रीधुंडीराज महाराज हेही मोठे अधिकारी होते. त्यांची शिष्य परंपरा श्रीमहाराजानी त्याच समर्थपणे सांभाळली. त्यांच्या

कल्याणाची काळजी वाहीली. साधी, भोळी, प्रेमळ माणसे! श्रीमहाराजांवर परंपरांगत चालत आलेली दृढश्रद्धा, भक्ति व प्रेम श्रीमहाराजांच्या ह्या मराठवाड्याच्या दौऱ्यात पदोपदी पाहावयास मिळाली.

रविवारी सकाळी श्रीमहाराजानी ह्या पारायणाच्या मंडपाला भेट दिली तेव्हा आपल्या या पारायणात श्री दत्तप्रभूनी दर्शन दिले अशीच बसलेल्या ६०/६५ भाविक भक्त मंडळीची भावना झाली असल्यास नवल नाही. श्रीमहाराज तिथेच पाट घेऊन बसले. चाललेला थोडा भाग श्रवण केला आणि बाजूला प्रशस्त हिरवळीवर खास उभारलेल्या सुशोभित मंडपात आले. अनेकांची आज पाद्यपूजा होती. श्रीमहाराजानी मुक्त हस्ताने अनेकाना मंत्रदीक्षाही दिली. प्रत्येकाला त्याच्या इष्ट देवतेनुसार स्वहस्ते मंत्र श्रीमहाराज लिहून देत होते.

दुपारी श्री. ओमप्रकाशजींकडे भोजनप्रसाद झाल्यावर श्रीमहाराजानी थोडीशीच विश्रांती घेतली आणि पुनः संस्कृत संमेलनाच्या समारोप सोहळ्याला उपस्थित राहीले.

संस्कृत संमेलन समारोप

२५ वर्षानंतर हिंगोली सारख्या आडगावात भरलेले हे संमेलन केवळ श्री दत्तमहाराजांच्या उपस्थितीमुळे यशस्वी झाले असे सर्व उपस्थित संस्कृत पंडित मंडळी आर्वजून म्हणत होती. ते सर्वस्वी खरे होते. श्रीमहाराजानी संस्कृत भाषेसाठी प्रयत्न करणाऱ्या सर्व मंडळीचे कौतुक केले. प्रयत्न चालू ठेवा. श्रीकृपेने पुनः एकदा संस्कृत भाषेला चांगले दिवस येतील असे आशीर्वादही दिले.

* * *

एकमुखी श्रीदत्तमंदीर

सोमवार दि. ९ मे १९९४

संस्कृत संमेलन यशस्वी झाले म्हणून श्री ओमप्रकाश देवडा व सर्व मंडळी आनंदात होती. श्रीकृपेने महाराजांची तब्येतही ठीक होती. मंत्रदीक्षा, श्रीगुरुचरित्र पारायण श्रवण, तेथिल एकमुखी श्रीदत्तमंदीराला भेट असे श्रीमहाराजांना विश्रांती मिळेल अशी कार्यक्रमाची आखणी होती. श्रीमहाराज कोणाच्याही घरी जाणार नव्हते हे बंधन भक्त मंडळीनी अपणहून स्वीकारलेले. आमच्या गावाला महाराजांचे पाय लागले, महाराजांची तब्येत उत्तम राहू दे म्हणून सतत प्रार्थना, अनुष्टान, उपासना या विविध उपायाने श्रीमहाराज प्रसन्नचित्त होते. हवेत उष्मा होता. त्याकडे कोणाचेच लक्ष नव्हते.

प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती महाराज यांचे बंधू प. प. श्रीसीताराम महाराज हेही मोठे अधिकारी होते. असे सांगतात की श्री ओमप्रकाशजी देवडाजींच्या चुलत घराण्यातील एका व्यक्तीवर प. प. श्रीसिताराम महाराजानी कृपा केली. आपले आयुष्य त्याना देऊन त्यांचा प्राण वाचविला. आपण देह त्याग केला. त्याच्या स्मरणार्थ गावांबाहेरील श्री दत्तमंदीराची स्थापना देवडा कुटुंबियानी केली होती. त्या मंदीराचे आवार मोठे प्रशस्त, विस्तृत आहे. श्रीदत्तमहाराजांचा पुजारी व भक्तमंडळीनी छोटासाच भावपूर्ण सत्कार केला. त्यावेळी श्रींच्या दर्शनासाठी भक्त मंडळीनी गर्दी केली. येथिल श्री दत्ताची मूर्ती एकमुखी असून श्री दत्ताचा केशसंभार बांधलेला नसून खाली सोडलेला आहे हे विशेष वाटले.

तेथील एक भक्त श्री. सुधाकरराव मुळे ह्यांनी रात्री सुश्राव्य भजन सादर केले. आवाज चांगला आणि म्हणण्याची पद्धत भावभक्तीपूर्ण. श्रीमहाराजांची व्यवस्था माडीवर केल्यामुळे ते मुद्दाम खाली आले नाहीत. 'आम्हीं ऐकतो आहोंत' हे त्यांचे शब्द पुरेसे होते. श्री देवडाजींच्या घरीच श्रीमहाराजांची तब्बेत पाहून आयत्या वेळी केलेला हा अगदी घरगुती स्वरुपाचा कार्यक्रम होता.

श्री देवडा कुटुंबियांचा श्रीमहाराजानी त्याच संध्याकाळी संध्यावंदन झाल्यावर जातीने परामर्श घेतला. प. पू. श्रीमहाराज व्यवहाराला कधी चुकत नाही. ह्या मंडळीचे विशेष म्हणजे वारंवार महाराजांचे दर्शनासाठी गर्दी करणे नाही. उलट श्रीमहाराजांचे बरोबर आलेल्या मंडळींचे व्यवस्थित होते की नाही इकडे लक्ष. दर्शनाला आलेल्या स्थानिक मंडळीनाही बसवून ठेवून श्रीमहाराजानी अनुज्ञा दिली की दर्शनाला सोडत असत. श्री ओमप्रकाश देवडानी आपल्या छोट्या नातवाला महाराजांचे पायी घातले तेव्हां त्यांचे मामा देऊळगावराजाचे श्री जगनशेठ ह्यानी असेच श्री. ओमजीना महाराजांचे वडील प. पू. श्रीधुंडीराज महाराज यांचे पायावर घातल्याचे स्मरण झाले. पिढ्यान्पिढ्या कवीश्वर घराण्याचा व देवडा कुटुंबियांचा संबध आहे. आम्ही श्रीमहाराजांच्या कृपासावलीत आहोंत ती अखंड रहावी अशीच त्या सर्वांची धारणा. प. पू. श्रीमहाराजानी आठवणीने सर्वांची चौकशी केली. त्यामुळे सर्वानाच कृतकृत्य झाल्याचा आनंद लाभला.

श्रीगुरुचरित्र पारायण समाप्ती

मंगळवार दि. १० मे १९९४

श्रीदत्तमहाराजानी भक्तांचे सर्व मनोरथ पुरे करावयाचे असे ठरविल्यामुळे सकाळी मंगलस्नानालाही परवानगी दिली. घरातल्या सुवासिनीनी त्याना ओवाळून, सुंगधी तेल लावण्याचे शास्त्र श्रीमहाराजानी करवून घेतले. त्यांचे आन्हिक

आवरल्यावर सगळी मंडळी श्री दत्त पारायणाचे ठिकाणी आली. श्री गुरुचरित्र पारायण समाप्ती होती. म्हणजे ५१ वा अध्याय व अवतरणिका आज वाचावयाची ठेवली होती. श्रीमहाराजानी ती ऐकली. सर्व भक्त मंडळीना कृपाशीर्वाद देताना श्री नारायणस्वामीमहाराजाच्या चरित्रातील प्रसंग सांगितला. श्रीमहाराजांच्या तब्येतीला झेपणार नाही म्हणून तिथे 'भिक्षा' घेण्याचा आग्रह कुणीच धरला नाही. पाकसिद्धी सोवळ्यात होती. श्रीमहाराजाना जे जे प्रिय आहे ते ते करण्यास सर्व भक्तमंडळीनी धन्यता मानली.

श्री नारायणस्वामीमहाराजांची पुण्यतिथी

श्री नारायणस्वामीमहाराजांची आज पुण्यतिथी होती. वाडीचे निमंत्रण आलेले होते. परंतु मराठवाड्याच्या दौऱ्यामुळे ते शक्य होणार नव्हते. प्रवचन सेवा करायला श्रीमहाराजाना मनापासून फार आवडते. त्यांच्या नाजुक झालेल्या तब्येतीमुळे त्याना हा त्रास कसा घ्यावा असे वाटत असताना त्यांचे जवळ विषय निघाला. श्री देवडाजींच्या घरातच चार शब्द त्यानिमित्ताने सांगावेत अशी प्रार्थना श्रीमहाराजानी तात्काळ मान्य केली. फक्त सुचविले की "श्री नारायणस्वामीमहाराजांची सेवा घरांत कशाला? आम्ही श्रीदत्तप्रभूंसमोर पारायणाचे ठिकाणी करुं". 'आंधळा मागतो एक डोळा देव म्हणतो दोन घे' असेच श्री देवडा प्रभृतीना वाटले. श्रीमहाराजाना त्रास होऊ नये म्हणून त्यानी जाहीर सत्कार वगैरे कार्यक्रम ठेवला नव्हता. जेवढ्या लोकांना निरोप देऊन बोलवणे शक्य होते त्यांना निरोप गेले. संध्या. ६ चे सुमारास तेल कारखान्याच्या हिरवळीवर अस्तंगत होणाऱ्या सूर्यदेवाना साक्षी ठेवून श्रीदत्तमहाराजानी श्रीनारायणस्वामी महाराजांचे चरित्र जवळजवळ तासभर सांगितले. त्यांना सेवा घडली याचा परमानंद झालेला त्यांच्या शब्दातून, चेहऱ्यावरुन ओसंडत होता. श्रीमहाराजांसारखी भक्ति, सेवा आम्हाला सुद्धा करता यावी अशी कृपा त्या दयाघन प्रभूने करावी असेच सर्वाना वाटले.-

सुखी माणसाचा सदरा

हिंगोलीत श्रीमहाराजाना ४ दिवस झाले. चार दिवसात श्रीमहाराजानी मुक्त हस्ताने मंत्रदीक्षा दिल्या. अनेकांच्या पाद्यपूजा ह्याच सभामंडपात स्विकारल्या. श्री. ओमप्रकाश देवडा व सर्व भक्त मंडळीना परम संतोष मिळाला. सर्वांची व्यवस्था उत्तम ठेवली. ह्याचे सर्वांच्या मनात कौतुक होते. ते व्यक्त करण्याची संधी श्रीकृपेने श्री शरद दाते (मुंबई) याना लाभली. श्री. ओमप्रकाश देवडा, त्यांचे सर्व सहकारी ह्यांच्या अगत्याबद्दल, उत्तम पाहुणचाराबद्दल, सर्व व्यवस्थेबद्दल मराठवाड्यातील भक्तमंडळीनी दाखविलेल्या प्रेमाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. भाषणाच्या ओघात

शाळेत ऐकलेली सुखी माणसाच्या सदऱ्याच्या गोष्टीची आठवण होते याचा उलेख केला. श्री. ओमप्रकाशजीनी केलल्या श्रमांचे श्रीमहाराजांच्या वास्तव्याने चीज झाले. त्यामुळे त्यांच्यासारखा 'सुखी माणूस' आज तरी कुणी नसणार! हा आनंद त्याना चिरकाल लाभावा, त्यासाठी त्याना सदऱ्याचे कापड श्रीमहाराजांचे हस्ते 'सुखी सदरा' होण्यासाठी देत आहोत असे सांगताच सर्वांनी टाळयांचा कडकडाट केला. श्रीदत्तमहाराजानी मोठ्या संतोषानी 'घ्या' म्हणून श्री देवडाजींच्या हाती वस्त्र दिल्यावर सर्वांचे डोळे आनंदाश्रुनी भरुन आलें. देऊळगावराजाचे श्री जगनशेठ व श्री चंदूशेठ हे ओमप्रकाशजींचे मामा. त्यांनीही श्रीमहाराजांची व त्यांच्या समवेत असलेल्या सर्वांची उत्तम व्यवस्था ठेवली होती. त्याचा ही उल्लेख करुन त्यानाही अल्पशी भेट सर्वांच्या वतीने देण्यात आली. हा परस्पर जिव्हाळा, प्रेम, आदर पाहून सर्वांची मने भारावली नसतील तरच नवल.

श्री देवडाजींची पाद्यपूजा

बुधवार दि. ११ मे १९९४

श्री. ओमप्रकाशजीनी श्रीदत्तमहाराजांची पाद्यपूजा त्यांच्या कुटुंबियातर्फे करण्याचे बुधवार दि. ११ मे १९९४ रोजी ठरविले होते. तसा त्यांचा मोठा परिवार आहे आणि सर्व श्रीमहाराजांची भक्त. पहिल्या ४ दिवसात श्रीमहाराजांच्या दर्शनाची, नमस्कारासाठी कुणीही गर्दी केली नव्हती, गडबड केली नव्हती. सर्व मंडळी संतजन येती घरा तोचि दिवाळी-दसरा साजरा करण्यासाठी उत्तमोत्तम कपडे घालून जमली होती.

श्री. ओमप्रकाशजीनी श्रीदत्तमहाराजांच्या पायाच्या मापाच्या चांदीच्या पादुका तयार करुन घेतल्या होत्या. श्रीमहाराजानी त्याला पदस्पर्श करावा ही मनात इच्छा होती. परंतु श्रीमहाराजांनी त्याला नकार दिला. श्री. ओमप्रकाशजीनी आपली चिकाटी सोडली नव्हती. पाद्यपुजेच्यावेळी वेळी त्याही पादुकांची त्यानी पुजा केली. श्री. दत्तमहाराजानी त्याना न दुखावता गंमतच केली. वैदिक ब्राह्मणाबरोबर आपणही मंत्र म्हणायला लागले. त्याना मार्गदर्शन करु लागले. त्या गडबडीत नित्य पूजेतील पादुका त्यानी श्री देवडाजींच्या चांदीच्या पादुकावर ठेवण्यास सांगितल्या. त्याचीही संयुक्त पूजा करविली. श्री देवडाजीनी श्रीमहाराजाना पुनः विनंती केली की त्यांचा पदस्पर्श पादुकाना घडावा. श्रीदत्तमहाराज त्याना म्हणाले की, 'ते आता शक्य नाही. महाराजांच्या स्पर्शाने आपण आणलेल्या पादुका पवित्र झाल्या आहेत. आम्हा माणसांच्या पदस्पर्शाला काही अर्थ नाहीं' श्री देवडाजींची निराशा झाली खरी परंतु श्रीमहाराजांच्या गुरुभक्तीचा प्रत्यय सर्वाना येऊन गेला. एखादी गोष्ट भक्तांना न दुखावतांही किती सहजतेने ते करुन जातात याची प्रचीती आली.

श्रीमहाराजांची हत्तीवरुन मिरवणूक

हिंगोलीच्या कार्यक्रमातला सर्वोच्च भाग म्हणजे श्रीमहाराजांची हत्तीवरुन मिरवणूक हा होता. रौद्री शांती समारोहातील हा एक भाग असतो. प. पू. श्रीगुळवणीमहाराजांची अशी मिरवणूक निघाली होती. प. पू. श्रीदत्तमहाराजांची अशीच मिरवणूक निघेल अशा सदिच्छा श्रीगुरुमहाराजांनी लेखिकेजवळ व्यक्त केल्या होत्या. पुण्यातही तशी प्रार्थना श्रीमहाराजाना झाली होती. प. पू. श्रीगुळवणी महाराजांची इच्छा फलद्रुप होण्याचा योग मराठवाड्यात येत होता. श्रीमहाराजांचे वडील प. पू. श्रीधुंडीराज महाराज, श्रीमहाराजांचे आजोबा प. पू. श्रीवक्रतुंडमहाराज यांच्या कर्मभूमीत हा सोहळा संपन्न होणार होता. त्यात आगळे वैशिष्ट्य होते. श्री. कवीश्वर घराण्याची पिढ्यानपिढ्या चाललेल्या सेवेची श्री. बालाजीने दिलेली ही पोचपावती होती. श्री देवांची आज्ञा झाल्यावर श्रीमहाराजाना ती मान्य करावयास लागली. श्रीमहाराज स्वतः लौकिक उपचारापासून चार हात दूरच असतात म्हणून त्यांची संमती मिळणे कितीवेळा अवघड होते. भक्तांची मनकामना पुरी करण्यासाठी जणू श्री. बालाजीच आला. श्रीमहाराजांची तब्बेत तशी नरम/गरमच होती. त्यामुळे हत्तीवर बसल्यानंतर बसणारे गचके, हिसके महाराजाना क्लेशकारक तर नाही होणार ह्या आशंकेने सर्व मंडळी चिंतातूर झाली. श्री देवडाजीनी तयारी दर्शविली कीं श्री महाराजांची तब्बेत महत्त्वाची. हत्तीवरुन मिरवणूक नाही निघाली तरी चालेल. शेवटी निर्णयासाठी श्रीमहाराजांकडे सर्व मंडळी आली. श्रीमहाराजानी पुनः शांतपणे सांगितले की, आमच्या तब्येतीची काळजी श्री. बालाजीला आहे. तो सर्व यथासांग पार पाडील.

शेगांवच्या श्री गजाननमहाराजांचा हा हत्ती शेगांवहून ट्रकने श्री. देवडाजींच्या तेल गिरणीच्या आवारात आला. सर्वानाच या हत्तीचे अप्रुप होते. लहान थोर सर्वच त्याला न्याहाळत होते. मनातून नमस्कार करताना म्हणत होते की आमच्या महाराजाना नीट ने. तुझेही आज मोठे भाग्य आहे. साक्षात श्री दत्तप्रभूना तूं नेणार आहेस.

हत्ती हा बुद्धिमान प्राणी आहे असे म्हणतात. हाही गजराज त्याला अपवाद नव्हता. ट्रकमधून खाली उतरताना, त्यानी आपल्या सोंडेने खोलीचा अंदाज घेतला नी मगच उतरण्याच्या फळीवर पाय ठेवला. माहुत सांगत होता कीं त्याला कितीही सूचना दिल्या तरी त्याची खात्री पटल्याशिवाय गजराज आपले पाऊलही उचलत नाही.

संध्याकाळी श्रीदत्तमहाराज तेलगिरणीच्या आवारात आले. गजराज सजला होता. त्याला माहुताने खाली बसविले तरीही त्याच्यावर चढण्यासाठी शिडी लावावी लागली. श्रीमहाराज शिडीवरुन चढताना सगळ्यांचे श्वास रोखले गेले. श्रीमहाराज स्वस्थ चिताने हत्तीवरच्या अंबारीत स्थानापन्न झाले. ह्याला घ्या, त्याला घ्या असे म्हणता, म्हणता माहुताने अंकुश लावला. गजराज उभे राहीले आणि सर्वांच्या मुखातून एकच गजर झाला. श्री अवधूतचिंतन श्री गुरुदेव दत्त. हा अपूर्व सोहळा

पाहण्याचे भाग्य आपल्याला लाभले म्हणून सर्वांचे डोळे आनंदाश्रुनी भरले. श्री ओमप्रकाशजीना तर आपले अश्रू आवरणे कठीण झाले. त्याच्या मुखावर समाधानाचा, कृतज्ञेचा भाव पाहूनच सर्वाना आनंद झाला.

गजराज निघाले. त्याच्या पुढे सुवासिनी डोक्यावर कलश घेऊन चालल्या होत्या. त्यांच्या दिमतीला बॅन्ड होता. पाठीमागेही मंडळी दिगंबरचा गजर करीत चालली होती. त्या सुखाच्या क्षणी सर्वांचे नेत्र श्रीदत्तमहाराजांच्या ठिकाणी लागले होते. श्रीदत्तमहाराज स्थितप्रज्ञ वृत्तीने हा सर्व सुखसोहळा अनुभवित होते.

श्री देवडाजीनी आपले वजन खर्च करुन हिंगोली नगरपालिकेमार्फत रस्त्याचे डांबरीकरणही करुन घेतले होते. परंतु हा लांबचा रस्ता कशाला आणि लोकाना श्रीमहाराजांचे दर्शन घडणार कसे असा काहीसा विचार झाला आणि श्रीमहाराजांची मिरवणूक गावातल्या अरुंद रस्त्यावरुन निघाली.

लहान रस्ता, डोक्यावर वीजेच्या तारा. परंतु गजराजावर बसलेला माहूत मोठा चतुर होता. आपल्या हातातील काठीने वीजेच्या तारा वर उचलत होता तर अंकुशाने गजराजाना सुचना करीत होता. गजराज आपल्या सोंडेने सतत अंदाज घेऊन आपले भरभक्कम पाऊल टाकीत होते. त्याना तो रस्ता अरुंद वाटलाच नाही. एकदा तर त्याने गंमतच केली. एके ठिकाणी पिंपात भरलेले पाणी दिसले. गजराज थांबले. आपली सोंड भरून घेतली. गजराज कुणाला भिजवणार असे वाटत असताना त्यांनी आपली सोंड पोटाखाली घातली आणि पाण्याचा फवारा रस्त्यावर सोडला. रस्ता आपोआप ओला झाला आणि किंचित् उडणारी धूळही खाली बसली.

मोठ्या चौकात मिरवणूक आल्यावर मात्र लोकांचा उत्साह ओसंडून वाहू लागला. गजराज थांबले. गजराजांच्या पुढे पालखी होती. त्यात श्रीगुरूचरित्राच्या पोथ्या ठेवल्या होत्या. भक्तांनी ही पालखी खेळविली. गुलाल उधळला. रस्त्यावरची वाहतूक थांबली होती. सर्वजण अनिमिष नेत्रानी हा स्वर्गीय सोहळा पहात होते. त्या संधीप्रकाशात श्रीमहाराजांचा चेहरा दिसत नसला तरीही त्यांच्या मुखावरचा भाव हा कौतुकाचा, कृपेचा होता याची मनोमन खात्री पटत होती.

मिरवणूक श्री ओमप्रकाशजींच्या घरासमोर आली. पुन्हा एकदा वाद्यांचा जयघोष झाला. श्री अवधूत चिंतन श्री गुरूदेव दत्ताची आरोळी गगनात निनादली. श्रीमहाराज पुन्हा: एकदा शिडीवरून पायउतार झाले त्यांनी प्रेमभराने हत्तीच्या सोंडेला हात लावला. नमस्कार केला. श्री गजाननमहाराजांचा तो हत्ती होता. सोंड दुमडून महाराजाना त्यानीही प्रणीपात केला. त्याच्या भल्या मोठ्या डोळ्याच्या कडेला अश्रूही जमा झाले असावेत. जणू म्हणत होता की 'श्री दत्तप्रभू माझे केवढे भाग्य आपण माझ्यावर स्वार झालात आता त्या गजेंद्रासारखा आमचाही उद्धार करा.' सुवासिनीनी महाराजाना ओवाळले. श्री. देवडाजींच्या लक्षात आले कीं, आईसाहेब, ताईमहाराज कुठेतरी मागे राहील्या आहेत. त्याना हात धरून मोठ्या भक्तीभावाने, प्रेमाने, श्री

महाराजांचे समीप उभे केले. अनेकांचे कॅमेरे लकाकले. संध्यासमयी साक्षात लक्ष्मीनारायण दारात भगवती ताईच्या साक्षीने उभी होती. शब्दाने वर्णन करणे अशक्यच असा हा अपूर्व सोहळा झाला.

श्रीदत्तमहाराज घरात आले. श्रीमहाराज किती दमले असतील.! न राहवून कुणीतरी विचारतोय. महाराज फक्त स्मित करुन म्हणतात, ''देवडाजींचे समाधान झाले का?''

श्री देवडाजी बाहेरच होते. सर्वांचे आभार मानीत होते. प्रसाद घेऊन जा म्हणून आग्रह करीत होते. हिंगोलीतल्या सर्व भक्तमंडळीना महाराजांच्या कुंटुबियांनाही धन्यवाद द्यावेसे वाटत होते. महाराजांची मुलगी सौ. सुलभाताई पुढे झाल्या. त्या आपल्या सुरेल आवाजात म्हणू लागल्या ''हिंगोलीत कवीश्वर दत्त पातले। ग्रामस्थ धन्य धन्य झाले''

श्री बालाजीची कृपा

हिंगोलीला प. पू. श्रीमहाराज आले त्यावेळेपासून महाराजांना अतिसाराचा त्रास सुरु झाला. रात्री महाराज आपले मोठे चिरंजीव श्री. अशोकरावांना म्हणाले देखील की आपण लवकरच पुण्याला जाऊ या आमची प्रकृती काही ठीक वाटत नाही. सकाळी श्री. अशोकरावांनी श्री. देवडाजींना सांगितले की महाराज परत जावे असे म्हणतात. त्यांना देखील फार चिंता वाटली. ते धावतच महाराजांच्याकडे आले. रात्र गेली. श्री. बालाजीने कृपा केली. प. पू. श्रीमहाराज श्री. देवडाजींना म्हणाले, 'आमच्या प्रकृतीची तुम्ही काही काळजी करु नका, तुमचे जे काही कार्यक्रम असतील ते आम्हाला सांगा. ते सर्व पार पडतील. झाले देखील तसेच! श्रीमहाराजांचे जुलाब थांबले. पुण्याला पोहचल्यावर त्याचा थोडा त्रास श्रीमहाराजांना झाला.

हिंगोलीला प्रकृती बिघडल्यामुळे प. पू. श्रीमहाराजांनी बीडला डॉ. देशमुखांकडे दूरध्वनी करायला सांगितला. तब्येत ठीक नसल्यामुळे आम्ही येथील कार्यक्रम आटोपून पुण्यास जाऊ. परंतु हा दूरध्वनी ऐकल्याबरोबर प. पू. श्रीमहाराजांच्या तब्येतीने चिंतातूर होऊन सौ. सिंधुताई व डॉ. दिलीप ताबडतोब ४ तासांचा बीड हिंगोली प्रवास करुन रात्रीच हिंगोलीस आले. त्यांचा तो भाव आर्जवयुक्त प्रार्थना ऐकून प. पू. श्रीमहाराज म्हणाले आता आम्हाला बीडला जाणे भाग आहे. पूर्वी ठरल्याप्रमाणे बीड, वार्शी, वैराग सर्वच प्रवास करु. 'कर्तृम अकर्तृम अन्यथा कर्तृम' ही प. पू. श्रीमहाराजांची शक्ति या ठिकाणी अनुभवास येते. तब्बेत बिघडल्यावर देखील देव भावाचा भुकेला या उक्तीप्रमाणे शिष्यांचा भाव पाहून तब्येतीचा त्रास महाराजांनी बाजूला ठेवला. प. पू. सौ. आईसाहेबांची प्रकृती गेली दर्शभर मधुमेहामुळे अत्यंत नाजूक असतानासुद्धा त्यांनीही सर्व दौरा प. पू. श्रीमहाराजांबरोबर पार पाडण्याचा निर्णय घेतला. त्यांचीही प्रकृती प्रवासात ठीक राहिली.

बीडला प्रयाण

गुरुवार दि. १२-५-९४

श्रीदत्तमहाराजांच्या मराठवाड्याच्या दौऱ्यातील शेवटचा टप्पा सुरु झाला होता. बीडचे डॉ. देशमुख प. पू. श्रीमहाराजांचे परमभक्त! त्यांच्या मातोश्री सौ. सिंधूताई म्हणजे हैद्राबादचे प. पू. श्रीगुळवणी महाराजांचे परममित्र श्री. शंकरराव आजेगांवकर यांच्या सुकन्या श्री. माई क्षीरसागर यांच्या धाकट्या भगिनी. साध्या, प्रेमळ, अगत्यशील श्रीगुरुमहाराजांच्या आपुलकीने, कृपाशीर्वादात लहानाच्या मोठ्या झालेल्या. प. पू. श्रीदत्तमहाराज म्हणजेच श्रीगुरुमहाराज हा सात्विक, शुद्ध भाव.

गुरुवार दि. १२-५-९४ ला सकाळी ६ वाजेता निघता निघता उशीर झाला. हिंगोलीला श्रीमहाराजांचे ४ दिवस वास्तव्य झाले. त्यामुळे निरोप देताना व घेताना सर्वानाच जड जात होते. लवकर जायचे म्हणून श्रीमहाराजानी सुद्धा सर्वांचे ऐकले. स्नानही बीडला उरकू म्हणून गाडीत बसले.

गाड्या वेशीबाहेर आल्या आणि आम्ही बीडच्या मार्गी लागलो असू नसू. श्रीमहाराजांची गाडी मोठा आवाज होऊन थांबली. महाराजांच्या गाडीचा 'पाटा' तुटला होता. केवढा अनर्थ टळला. आम्ही गावातच होतो. डॉ. दिलीप गाडी घेऊन आले होते. त्यांच्या गाडीत आईसाहेब, ताईमहाराज, त्यांच्या मातोश्री सौ. सिंधूताई वगैरे मंडळी होती. श्री. देवडाजीना निरोप गेला. त्यांच्याकडून पर्यायी व्यवस्था होईपर्यत खूप वेळ गेला. आम्ही बाकी मंडळी दुसऱ्या एका जीप-ट्रॅक मध्ये होतो. प्रत्येकाचे निरनिराळे बेत चालू होते. श्रीमहाराज मात्र स्वस्थचित्त होते. श्री देवडाजीनी गाडी बदलली. त्यांचा मोठा मुलगा चक्रधर झाला. गमंत म्हणजे त्याला आदल्या दिवशीच मंत्र दीक्षा झाली होती. श्रीगुरुसेवेचा योग त्वरीत लाभला.

हिंगोली-बीड मोठा प्रवास होता. उन्हे होण्यापूर्वी जाण्याचा बेत मनातच राहीला. वाटेत औंढ्या नागनाथाला दर्शनासाठी मंडळी थांबली. श्री शंकराचे दर्शन श्रीमहाराजांच्या समवेत झाले हा आनंद काही निराळाच होता. श्रीगुरुकृपेनेच हे शक्य झाले.

डॉ. दिलीप देशमुखांचे स्नेही श्री. कुळकर्णीकडे परभणीला त्यांचे घर वाटेतच होते म्हणून निरोप गेला होता. त्यांच्याकडे पोचायला ८-८.३० चे ऐवजी ११ वाजले. या मंडळीचे भाग्य. ध्यानी मनी नसता श्रीमहाराजांच्या पदस्पर्शाने सर्व घर पवित्र झाले.

बीडला पोंचायला ३ वाजले. डॉ. दिलीप देशमुखांचा बंगला प्रशस्त मोठा होता. तिथेच त्यांचे रुग्णालय होते. प. पू. श्रीदत्तमहाराज येणार म्हणून रुग्णालयातिल आजारी माणसांची अन्य ठिकाणी व्यवस्था केली होती. श्रीमहाराजाना त्रास होऊ नये म्हणून त्यांच्या मनाप्रमाणे खाली रुग्णालयात किंवा वर घरांत व्यवस्था करावी हा

उद्देश. सर्व रुग्णालयाला रंग लावला होता. श्रीमहाराजानी निर्णय घेतला की, 'आम्ही तुमच्या घरातच वरच्या मजल्यावर राहू. 'आम्ही हल्ली खुर्चीवरुनच चढतो/उतरतो' प. पू. श्रीमहाराज चि. फडके, चि. पाटणकर, चि. सुरज, चि. अश्विन या मुलांकडे पाहून गंमतीने म्हणत होते. या मुलानी श्रीमहाराजांची फार काळजी वाहीली.

श्रीमहाराजानी स्नान, आन्हिक आवरले. भोजनास बसण्यास ५॥ वाजले. आमरस पुरीचा बेत. सौ. सिंधूताईचा प्रेमळ आग्रह. डॉ. दिलीप देशमुखांची श्री महाराजांवर अतोनात श्रद्धा. श्रीमहाराजांच्या कृपाछायेत सर्व घर आहे. त्यांच्या मार्गदर्शनाने उपासना घडत आहे. नवचंडी, शतचंडी, सहस्त्रचंडी आणि आता आयुतचंडी पाठ अशी मोठाली अनुष्टाने वर्षानवर्षे करीत आहेत. त्याव्यतिरिक्त प्रासंगिक विष्णूसहस्त्रनाम पाठ, श्रीगुरुचरित्र पारायण, भागवत सप्ताह वगैरे अनेक धार्मिक देवकार्य घडत आहे.

संध्याकाळी उशीरा स्थानिक भक्त मंडळी श्रींचे दर्शनास आली. त्यादिवशी कोणताच कार्यक्रम ठेवला नव्हता. प. पू. श्रीदत्तमहाराजाना जास्तीत जास्त विश्रांती मिळावी हा हेतू. दुसरे दिवशी **शुक्रवार दि. १३-५-९४** ला सकाळी मंत्रजागर, प. पू. श्रीदत्तमहाराजांची पाद्यपूजा, भोजनप्रसाद भावपूर्ण वातावरणात डॉ. दिलीप व त्यांचे बंधू यानी भक्तमंडळीच्या, कुंटुबिय मंडळी आप्तेष्ट, परिचित यांचे उपस्थितीत केली. श्रींचे पायावर मस्तक ठेवून सर्वानी आशीर्वाद घेतलें. श्रीमहाराजांचे येणे घडेल की नाहीं ही चिंता श्रीकृपेनेच दूर झाली. जिथे भाव तिथे देव याची प्रचिती आली. विन्महर्ता विनायक पावला.

वैरागला प्रयाण

शुक्रवारी संध्याकाळी वैरागला महाराज त्यांची कन्या सौ. सुमनताई भातलवणे यांच्याकडे आले. वैराग-बीड ३० कि.मी. असल्यामुळे जावयाचा आग्रह श्रीमहाराजाना मानावाच लागला. **शनिवार दि. १४-५-९४** रोजी होती विनायकीचतुर्थी. श्रीमहाराजांचा उपवास होता. श्रीमहाराजांनी त्यांना भगवंताला भेटण्याची ओढ लागली होती. प्रसाद घेऊन जावे हा मुलीचा आग्रह श्रीमहाराजांनी मानला नाही.

बार्शीच्या भगवंताकडे

बार्शींची मंडळी आलीच होती. तब्येत ठिक नसल्याने गेल्या २ वर्षात श्रीमहाराजांचे येणेच घडले नव्हते. दुपारचा फराळ, थोडी विश्रांती घेऊन श्रीमहाराज व सर्व मंडळी सायंकाळी बार्शीला पोचली.

रात्रौ ९ ते १० ह्या वेळात श्रीमहाराजानी भगवंतापुढे श्री शंकरजयंती निमित्त आद्य श्रीशंकराचार्यांच्या चरित्रावर आपली प्रवचन सेवा रूजु केली. ईश्वरी इच्छेनेच

सर्व घडून येते. श्रीमहाराजांना रविवार दि. १५-५-१९९४ रोजी श्रीमहाराजानी बार्शीच्या भगवंताची महापूजा केली. वैदीक ब्राह्मणांचा यथोचित सन्मान केला.

श्री. काळेगुरुजी वेद विज्ञान केंद्र कासारवाडीला नेण्यासाठी सकाळी आले होते. सर्व साधकांचे एक शिबिर श्री. काळेगुरुजीनी कासारवाडी येथे काही महिन्यापूर्वी आयोजित केले होते. तब्बेतीच्या अस्वाध्यामुळे श्रीमहाराज उपस्थित राहू शकले नव्हते. श्रीमहाराजानी सर्व आश्रम आस्थापूर्वक पाहीला. बटूंकडून वेदोक्त मंत्र ऐकले. सर्वानाच कृपाशीर्वाद दिले.

दुपारी भोजनानंतर वैदिक ब्राम्हणानी मंत्रजागर केला. श्रीच्या दर्शनासाठी लोकांची रीघ लागली होती. येथेही अनेकाना मंत्रदिक्षा झाल्या.

बार्शीच्या श्री. काका कुळकर्णी यांची जागा बरीच अडचणीची परंतु मंदीराला लागून होती. कित्येक वर्षांचा श्रीमहाराजांचा त्यांच्याकडे उतरण्याचा परीपाठ होता. श्रीमहाराजांचे पिताश्रीही त्यांच्याकडेच उतरत. बार्शीच्या भगवंताबरोबरच ती.सौ. आईसाहेबाचे माहेर बार्शीचे. चि. अश्विन, आमोदचे आजोळही बार्शीचे. प. पू. श्रीगुळवणी महाराजांचे वास्तव्य बार्शीला होते. श्रीगुरुमहाराजांचे परमभक्त श्री. दादाशास्त्री जोशी सुद्धा बार्शीचे. असा अनेकजणांचा ऋणानुंबध बार्शीशी होता. श्रीमहाराजांच्या येण्याने पुनः एकदा भगवंत संतुष्ट झाला असेल. श्रीदत्तमहाराज आणि सर्व भक्तमंडळीना कृपाशीर्वाद दिले असतील!

सोमवार दि. १६-५-९४ रोजी सकाळी बार्शीहून मराठवाड्याचा यशस्वी दौरा करुन पुण्य नगरीस सर्व मंडळी निघाली. मराठवाड्यातील रौद्रीशांतीचा कार्यक्रम थाटाने, उत्साहाने, सर्व भक्तांचे मनोरथ पूर्ण करुन पार पडला होता. प. पू. श्री वक्रतुंडमहाराज, प. पू. श्रीधुंडीराज महाराज यांचेपासूनच्या गुरु परंपरेचे दर्शन सर्वाना त्या दयाघन बालाजीने घडविले. मराठवाडा म्हणजे संताची भूमी. तिचे अलौकिक दर्शन, प. पू. श्रीदत्तमहाराजांवरील तेथिल लोकांचे अतूट प्रेम, भक्ति, श्रद्धा पाहण्याचा अपूर्व योग श्रीकृपेनेच आला. त्या आनंदात पुणे केव्हा आले तेही कळले नाही. ही सर्व श्रीदत्तप्रभूंची कृपा. त्या कृपेची तळमळ सर्वांच्या हृदयी राहो आणि सर्वांना ती लाभो एवढीच प्रार्थना त्या नारायणापाशी आहे.

प. पू. श्रीटेंबेस्वामीमहाराजाना रक्तातिसाराचा त्रास सुरु असताना, देवांनी जाऊ नका म्हणून सांगितले तरी देखील वाडीकरांचे भजन चालू असताना काहीही तब्येतीला होऊ दे असे निक्षून देवांना सांगितले व श्रीस्वामीमहाराज वाडीला आले ह्या प्रसंगाची आठवण प. पू. श्रीमहाराजांच्या या प्रवासातील प्रसंगावरुन आल्याशिवाय राहीली नाही. प्रवासातील दगदग, उन्हाळा, भक्तांची गर्दी, अवेळी भोजन त्या सर्व पार्श्वभूमीवर प. पू. श्रीमहाराजांची तब्बेत नाजूक झाली होती यावर विश्वासच बसत नव्हता ही सर्व श्री. बालाजीची कृपा आहे.



पुण्याची रौद्रीशांती

पुण्याला प्रथम माघ वद्य षष्ठी १९९४ यादिवशी आश्रमातच महाराजांचा वर्धापनदिन साजरा केला. त्यानिमित्ताने 'बोल अमृताचे' हे श्रीमहाराजांच्या प्रवचनाचे पुस्तक विश्वस्तांच्या मार्फत प्रकाशित करण्यात आले. त्याचे संकलन श्री गोपाळ गणेश गोडसे ह्यांनी ठिकठिकाणी घेतलेल्या ध्वनी मुद्रिकेवरुन सर्व प्रवचने लिहून काढली होती त्यातून केले. त्यांचे संपादन डॉ. माधुरी पणशीकर ह्यांनी केले. हे बिल्वपत्र भावभक्तीने महाराजांच्या चरणी अर्पण केले.

प. पू. श्रीमहाराज १६ मे १९९४ ला जालना देऊळगावराजा, हिंगोली, बीड, वैराग, बार्शी येथील दौरा करून पुण्याला परत आले. लगेचच २० मे पासून पुण्यातिल कार्यक्रमाची गडबड सुरू झाली. ईशकृपेने त्यांची तब्येत ठीक राहीली.

कार्यक्रम

स्थळ - श्री वामन निवास दशभुजा गणपतीमागे, पंडित दीनदयाळ शाळेसमोर, पुणे - ४११ ००४

शुक्रवार दि. २०-५-९४

सकाळी : **१) पुण्याहवाचन, श्री गणेश याग : वेळ ८ ते १२**
२) चतुर्वेद पारायण प्रारंभ

दुपारी : **चारीवेद मंत्रजागर - वेळ ३ ते ५**
प्रवचन : सौ. कल्याणीताई नामजोशी वेळ ५॥ ते ६॥
कीर्तन : ह. भ. प. कुबेरबुवा (नागपूर) वेळ ६॥ ते ८॥

शनिवार दि. २१-५-९४

सकाळी : **पुण्याहवाचन, श्री दत्तयाग : वेळ ८ ते १२**

सायंकाळी : **प्रवचन : प्रा. शिवाजीराव भोसले वेळ ५। ते ६।**
कीर्तन : ह.भ.प. कुबेरबुवा (नागपूर) वेळ ६॥ ते ८॥

रविवार दि. २२-५-९४

सकाळी : **पुण्याहवाचन, चंडीयाग, चतुर्वेद पारायण सांगता**
तुलादान : वेळ ८ ते १२

सायंकाळी : प. पू. श्रीदत्तमहाराज यांचा सत्कार समारंभ : वेळ ५॥ ते ८.
हस्ते प. प. श्रीमद् शंकराचार्य

प्रमुख अतिथी **पं. दातेशास्त्री** (पंचागकर्ते)
खा. अण्णा जोशी, पुणे
पं. काशिकर शास्त्री

सहस्त्रचंद्रदर्शन शांतीचे वेळी जशी आमंत्रणे मातापिता, श्रीगुरुदेव वगैरेना केली होती तशीच ह्यावेळीही केली गेली.

॥ श्री ॥



श्री गणेशदत्त गुरुभ्यो नमः

॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा॥

प. पू. सौ. सरस्वती आईसाहेब यांना सादर वंदन.

सहस्त्रचंद्र दर्शन शांतीला आपणास आमंत्रित केले होते.

प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या ८५ व्या वर्धापनदिना निमित्त आपण आश्रमात या. आईतुळजाभवानी व श्री रेणुकामाता याना बरोबर घेऊन या. आमची भक्तीची भावना वेडी असते म्हणून हे आमंत्रण. प. पू. श्रीदत्तमहाराजांना औक्षण करण्यासाठी आपण जरुर जरुर यावे.

आपली

१९-५-१९९४. सर्व भक्त मंडळी

॥ श्री ॥

श्री गणेशदत्त गुरुभ्यो नमः

प. पू. श्रीपिताजींचे चरणी सादर वंदन

आपण आज वासुदेव निवासात येण्यासाठी आमंत्रण. ज्यांचे अंतःकरण विश्वमनाशी एकरुप झाले आहे, ज्यांच्या अंतःकरणात अपार करुणा दाटली आहे, ज्यांचे मन भक्तीरसात पूर्ण बुडून गेले आहे अशा प. पू. श्रीदत्तमहाराजांचा लौकिक वर्धापन दिनाचा सोहळा आज आरंभ झाला आहे. आपण श्री वासुदेव निवासात जरुर या. आपली वाडीतील पुरातन व पवित्र अशी जुनी वास्तु आता पुण्याहवाचनाने संपन्न करुन प. पू. श्रीदत्तमहाराजांनी उभी केली. हा या वर्षी एक विशेष योग आहे. आपणास याचा खूप आनंद झाला असेल. तरी आपण यावे अशी भक्तीभावपूर्वक विनंती.



आपली

१९-५-१९९४. सर्व भक्त मंडळी

प. पू. श्रीगुळवणीमहाराजांचे आशीर्वाद

प. पू. श्रीदत्तमहाराजांची षठ्यब्दपूर्ती समारंभ २५ मे १९६९ साली प. पू. श्रीगुरुमहाराजांच्या व त्यांच्या पू. पिताजींच्या आशीर्वादात संपन्न झाला. त्यावेळी प. पू. श्रीगुरुमहाराजांनी जे आपले आशीर्वादात्मक विचार व्यक्त केले ते मोलाचे तर आहेतच पण पसायदानासारखे परिपूर्ण आहेत. ते प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या गौरव समारंभाच्या शेवटी एक तृप्तीचे, समाधानाचे आशीषांचे अमृत बोल म्हणून सारांश रुपाने देत आहो.

''आमचा व कवीश्वर घराण्याचा संबंध फार जुना आहे. श्रीसद्गुरु टेंबेस्वामींच्या समग्रवाङ्मयाचे बारा खंडात पाच हजार पृष्ठांचे प्रकाशन केवळ श्रीदत्तमहाराजांच्यामुळे शक्य झाले. एवढे प्रचंड कार्य करूनही त्यांनी सतत स्वतःचा उल्लेख त्यादृष्टीने कोठेही केलेला नाही. आमच्यामुळे (प. पू. गुरुमहाराजांच्यामुळे) ते घडले असेच त्यांना वाटत आहे. श्रींचा शतसावंत्सरीक उत्सव या वाङ्मय प्रकाशनाने साजरा झाला तो श्रीदत्तमहाराजांच्यामुळे. त्यानीच आमच्या हातून हे कार्य घडविले आहे. या निमित्ताने श्रीदत्तमहाराजांचा सहवास फार जवळून आला. आमचे मनात त्यांचे विषयी आदर नी स्नेह निर्माण झाला. श्रीदत्तमहाराज औरवाडच्या श्री. दीक्षितस्वामींनी स्थापन केलेल्या सद्गुरु पीठ संस्थानचे एक विश्वस्त आहेत. त्यांची तेथील जबाबदारी अगत्यपूर्वक पार पाडण्याची तळमळ व श्रद्धा पाहून आमचे अंतःकरण त्यांनी खेचून घेतले व त्याचेच पर्यवसान म्हणून श्री. वासुदेव निवासाचे, तेथील धार्मिक समारंभाचे, तेथील सत्कार्याचे संचालकत्व ओघानेच श्रीदत्तमहाराजांकडे आलेले आहे. येथे सर्व गोष्टी त्यांच्या इच्छेप्रमाणे घडून आलेल्या आहेत व पुढेही येत राहतील. त्यांचेकडे आलेली ही सेवा श्रीकृपेने पुढेही पार पडेल असा आमचा आत्मविश्वास आहे.

अशा भारतीय ख्यातीचे चतुरस्त्र विद्वान कार्यकुशल कर्णधार आम्हाला लाभले ही खरोखर ईश्वरीकृपाच होय. तेव्हा आपण सर्व त्यांच्या भक्तप्रेमी मंडळींनी हा जो उचित असा षष्ठ्यब्दपूर्ती समारंभ साजरा केला हे पाहून आम्हास समाधान होत आहे. त्यांच्या हातून अशीच देवाधर्माची, शास्त्राची, संतांची उत्तरोत्तर सेवा घडावी यासाठी त्यांना आयुरारोग्य व उत्तम ऐश्वर्य लाभो अशी आमची श्रीचरणी प्रार्थना व आमचेही आशीर्वाद आहेत. आपणाकडूनही त्यांचे अमृतमहोत्सव, सहस्त्रचंद्रदर्शन शांती, रौद्रीशांती, जन्म शताब्दी महोत्सव घडोत अशी आमची प्रभुचरणी नित्य प्रार्थना आहे.''

ही अमृतवाणी प. पू. श्रीदत्तमहाराजांचे प. पू. श्रीगुरुमहाराजांच्या अंतरंगातील स्थान दाखवून देतात. तसेच सर्व घडो. हीच प्रार्थना.

राष्ट्रपतीकडून गौरव

'दोवरी दो भुजा घेऊनी आलो कपिध्वजा' ज्ञानेश्वरीतील या ओवीत भक्ताला भेटण्यासाठी मला दोन हात पुरत नाहीत म्हणून मी चर्तुभुज झालो. माझ्या हातातील कमळाने मी माझ्या भक्ताची पूजा करीत असतो. माझ्या भक्ताला माझे सोलीव सुख देत असतो. असे वर्णन भक्ताच्या गौरवाचे केले आहे. त्याची आठवण प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या राष्ट्रपतींकडून पुण्याला तिसऱ्यांदा होणाऱ्या सत्कारामुळे होत आहे. आत्मसुखाचे लेणे प. पू. श्रीदत्तमहाराजांना देऊनही या थोर ज्ञानी महात्म्याचा गौरव पुनःपुन्हा लौकिक अर्थानेही व्हावा अशी भगवंताची इच्छा या सत्काराने प्रगट होत आहे. पहिला पुरस्कार उत्तम अध्यापक म्हणून राष्ट्रपतींच्या हस्ते १८ डिसेंबर १९६८ साली मिळाला. दुसरा संस्कृत राष्ट्रीय पंडित म्हणून २१ एप्रिल १९७० मधे मिळाला तिसरा सत्कार बालगंधर्व रंग मंदिरात वेदाचार्य घैसास गुरुजी, प. पू. श्रीदत्तमहाराज व पं. किंजवडेकर शास्त्री यांचा राष्ट्रपती शंकर दयाळ शर्मा यांचे हस्ते झाला. राजाला विष्णूरूप मानतात. राष्ट्रपती हे आपले अनभिषिक्त राजेच आहेत. आपले राष्ट्रपती भारतीय संस्कृतीचे चाहते आहेत. आळंदी त्यांना विशेष प्रिय आहे.

श्रावणमास म्हणजे श्रीकृष्ण व ज्ञानदेव यांच्या जन्मोत्सवाचा शुभमास- नारळीपौर्णिमेसारख्या शुभ दिवशी हा मणिकांचन योग जुळून आला.

श्री वासुदेव निवासातील विश्वस्ताना व तेथील सर्व मंडळींना समाधान वाटत होते. घरच्या कुटुंबात सुना, मुले, नातवंडे, लेक, जावई सर्व आनंदित झाले होते. प. पू. श्रीदत्तमहाराजांचे कुटुंब घरापुरते मर्यादित नाही. परिवार खूप मोठा होता. प्रत्यक्ष बाल गंधर्व मंदिरात जाता येणार नाही याची कल्पना या परिवाराला होती. प्रवेशपत्रिका फार मर्यादित होत्या. मुंबईकर मंडळी या अविस्मरणीय दिवशी पुण्यात हजर असणे, श्रीमहाराजांचे दर्शन घेणे महत्त्वाचे समजून आली होती.

श्री वासुदेव निवास विश्वस्त व भक्तमंडळी यांच्यावतीने प. पू. श्रीदत्तमहाराजांचा सत्कार करावा असेही सर्वांच्या मनात असणे स्वाभाविक होते. प्रत्येकाच्या मनातील भाव जरी विविध असले तरी प्रेममूर्ती मात्र एकच प. पू. श्रीदत्तमहाराज होती.

कोणत्याही प्रसंगी स्थिर चित्त असणारे प. पू. श्रीदत्तमहाराजांचे मन याही वेळी तसेच निर्लेप होते. त्यामुळे सत्कार प्रसंगी पोषाखात बदल करणे त्यांना आवडणार नाही. त्यांच्या सबाह्य अभ्यंतरी एक ईश्वर भावना भरून राहिलेली. परंतु धोतर तरी नवे असावे असे त्यांच्या मोठ्या सूनबाई सौ. सवितावहिनी यांना वाटणे स्वाभाविक होते. कोरे धोतर ते नेसणार नाहीत म्हणून चार दिवस आधी धोतरजोडी भिजवून

नेसावयास दिली. इतकी काळजी किंवा सावधानता बाळगूनही प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या ते लक्षात आले. ते हसत म्हणाले, ''आम्ही नवं धोतर नेसलो नाही तर आम्हाला आत घेणार नाहीत असे तर होणार नाहीना?'' आपले रोजचे आहे तेच खरे! देहाबद्दल आसक्ती नाही ही गोष्ट संतांच्या जीवनाकडे पाहताना त्याच्या बारीक सारीक वागण्यावरून आपल्या लक्षात येऊन जाते.

प. पू. श्रीदत्तमहाराज व ती. सौ. आईसाहेब सत्कारासाठी जाण्यास निघाली. त्या उभयतांच्या हातावर त्यांच्या सूनबाईंनी साखर दिली. श्री रेणुका मातेचा आशीर्वाद घेऊन प. पू. श्रीमहाराज गुरुमहाराजांच्या भेटीसाठी आश्रमात आले. श्री वासुदेव निवासात वंदन करून गाडी बालगंधर्व नाट्यमंदिरात पोचली.

संस्कृत सूत्र संचलन

सहस्त्रचंद्रदर्शन शांतीच्या वेळी ज्या सौ. शुभदा दातेबाईंनी सर्व समारंभाचे सूत्र संचलन केले होते त्याच दातेबाईंना आज राष्ट्रपतींतर्फे गौरव होताना सूत्रसंचलन करण्याची संधी मिळाली हाही योग अपूर्व व भाग्यशाली होता.

यावेळी सूत्रसंचनलावर फार बंधने होती. त्यामुळे बोलणे फार कठीण होते. पण प. पू. श्रीदत्तमहाराजांची विशेष योग्यता, प्रकांड पांडित्य याविषयीचा उल्लेख करणे तर महत्त्वाचे होते. तो करता यावा, राष्ट्रपतींनी स्वतः उठून हार प. पू. श्रीदत्तमहाराजांना घालणे सन्मानाचे होते. तसे घडावे असे वाटते होते. तसेंच ते घडले. यात राष्ट्रपतींच्या मनाचा मोठेपणा दिसून आला. सर्वांच्या मनाला त्यामुळे खूप आनंद झाला. सत्य व योग्य असे आपल्याला आपल्या गुरुदेवांबद्दल बोलता आले याचे समाधान दातेबाईंना लाभले. समारंभ संपवून महाराज घरी आले त्यावेळी कुटुंबीय मंडळींनी घरगुती स्वरुपाचा त्यांचा सत्कार केला.

श्री वासुदेव निवासातील भावपूजन

श्री तुळजाभवानी माता व गुरुमहाराज जणू वाटच पहात होते. दाराला फुलांचे तोरण स्वागत करीत होते. दारापुढे भव्य रांगोळी घातली होती. प. प. श्रीवासुदेवानंदस्वामी व प. प. श्रीलोकनाथतीर्थ स्वामी यांच्या फोटोला मोठे हार घातले होते. आजची देवपूजा अधिकच रेखीव, देखणी दिसत होती. हॉलमधे बैठका व प. पू. श्रीमहाराजांसाठी खास आसन बनविले होते.

सर्व मंडळी जमल्यानंतर सकाळची गौरवसमारंभाच्या वेळची सर्व हकीकत सौ. दातेबाईंना पुन्हा सांगितली त्यामुळे न गेलेल्या मंडळींना समारंभाचे वर्णन ऐकता आले.

विश्वस्तानी शाल व थैली देऊन प्रथम श्रीमहाराजांचा सत्कार केला नंतर मुंबईकरांनी केला. सर्वांना समाधान वाटले. सौ. दातेबाईंनाही शाल व श्रीफळ प. पू. श्रीदत्तमहाराजांचे हस्ते देण्यात आले. कुणाचे भाग्य कसे असेल ते सांगता येत नाही. सौ. दातेबाई खरोखरच भाग्यवान! प. पू. श्रीदत्तमहाराजांचे सर्व अध्ययन संस्कृत भाषेतून झालेले अशावेळी राष्ट्रपतींकडून होणाऱ्या गौरव प्रसंगी संस्कृत भाषेतून सूत्रसंचलन करण्याची सेवा त्यांचे हातून घडली. पवित्र शालीचा प्रसाद मिळाला. चित्ताला समाधान घेऊन त्या ठाण्याला परतल्या त्यावेळी मुळीच वाटले नाही की हा त्यांचा अखेरचा निरोप होता. सद्गुरु भक्तींची शाल परिधान करून अखंड सौभाग्याचे लेणे धारण करून त्या कृतार्थ झाल्या आहेत.

बालगंधर्व नाट्य मंदिरात प. पू. श्रीदत्तमहाराजांनी संस्कृत मधून आपले विचार राष्ट्रपतींपर्यंत पोचविले आहेत. त्यातील आशय असा आहे. श्री सोमनाथ मंदिराची उभारणी पूर्वीचे राष्ट्रपती बाबू राजेंद्र प्रसाद यांचे हस्ते झाली. सोमनाथ ज्या रामरायाचे स्मरण सतत करतात त्या रामजन्मभूमी राम मंदिराची उभारणी सर्वांच्या सलोख्यातून वाद मिटवून आजचे राष्ट्रपती शंकर दयाळ शर्मा यानी करावी असा मनोदय प. पू. श्रीदत्तमहाराजांनी व्यक्त केला. वेदाचार्यांच्या सत्कारासाठी राष्ट्रपती आले हे इतर सर्व मंत्रीजनाना आदर्श व मार्गदर्शन आहे असेही महाराजांनी आदरांनी बोलून दाखविले. प. पू. श्रीदत्तमहाराजांनी व्यक्त केलेले विचार आणि दाखविलेला मनापासूनचा आदर महाराजांच्या तपःपुनीत जीवनाला साजेसाच आहे.



भागवतील सुभाषिते

१) भगवंताच्या चरणाचा आश्रय हाच मनुष्याचे कल्याण करणारा आहे.

२) मनावर विश्वास ठेवून कुठेही मैत्री करू नये.

३) भगवान एकाद्यावर प्रसन्न झाले तर त्याला मुक्ती देतील पण भक्तियोग मात्र कधी देणार नाहीत

४) साधुपुरूषावर केलेला प्रहार, तो करणाऱ्याचेच अकल्याण करतो

५) हे सर्व जग भगवदस्वरूपच आहे, त्यावाचून दुसरे काही नाही

स्मृतींची चाळता पाने

म्हणोनी सदगुरुवर्णवेना हेगे हेचि माझे वर्णना।
अंतरस्थितीचिया खुणा अंतर्निष्ठ जाणती।

परमात्मा व्यक्तिला व विश्वाला पुरून शिल्लक राहतो म्हणून त्यास आपण अनंत म्हणतो. त्याचा अनंतपणा कोणालाच कळलेला नाही. असे हे कल्पनेच्या पलीकडील जे देवाचे स्वरुप म्हणजे सर्व संतानी वर्णन केलेला "सद्गुरु" होय हे सद्गुरूपद प. पू. श्रीदत्तमहाराज सतत भूषवीत आहेत.

टिळक विद्यापीठात त्यावेळी विद्यार्थी असलेले पण आज शिक्षणक्षेत्रात बहुमोल कामगिरी करून राहिले आहेत असे विद्वान व विद्याविभूषित लोकांकडून प. पू. श्रीदत्तमहाराज यांचे गुरूजी म्हणून गौरववर्णन ऐकताना वरील दासबोधातील समर्थांची सद्गुरुस्तवनातील ओवी प्रथम लक्षात येते. आपण त्यांचे थोरपण जाणण्याचा या विद्वान व त्यांचेच पूर्वकालात शिष्य म्हणविणाऱ्या लोकांच्या अनुभवातून प्रयत्न करणार आहोत.



टिळक महाराष्ट्र संस्कृत विद्यापीठ पुणे,



लोकमान्य बाळ गंगाधर टिळक

टिळक विद्यापीठ हे नांव ऐकताच एका फार मोठ्या पुण्यपुरुषांचे स्मरण होते. लोकमान्य एक असामान्य पवित्र जीवन. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ काढलेले विद्यापीठ एका विशिष्ठ उत्तम अशा हेतुने प्रेरित होते. त्या विद्यापीठांत प. पू. श्रीदत्तमहाराज २२ वर्षे शास्त्री म्हणून सेवाकार्य करीत होते. त्या विद्यापीठाविषयी आपल्याला माहिती असणे आवश्यक व आपले एक पवित्र कर्तव्य आहे.

कार्यपरिचय

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे शैक्षणिक स्मारक म्हणून ६ मे १९२१ रोजी टिळक म. वि. ची स्थापना करण्यात आली. विद्यार्थी जीवनात राष्ट्रीय वृत्तीची जोपासना कशी होईल, विद्यार्थी स्वावलंबी कसा बनेल, कठीण परिस्थितीवर मात करण्याची झुंझार वृत्ती त्याच्यात कशी निर्माण होईल, पदवी संपादन केल्यावर नोकरीच्या मागे न लागता, स्वतंत्र व प्रतिष्ठित जीवन तो कसा जगेल याची दक्षता, राष्ट्रीय शिक्षणाचे धोरण व योजना ठरविताना घेण्यात आले होते.

प्रारंभी वाङ्मयशाखा, वाणिज्य शाखा, स्थापत्य शाखा व आयुर्वेद शाखा स्थापन केल्या व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अध्यापनाची व्यवस्थाही करण्यात आली. राष्ट्रीय शिक्षणाचे आव्हान स्वीकारलेले या संस्थातील विद्यार्थी तसेच प्राध्यापक त्यावेळच्या स्वातंत्र्यासाठी चाललेल्या लढ्यात सहभागी झालेले होते. त्यामुळे राष्ट्रीय शिक्षण संस्थांवर ब्रिटिश राज्यसत्तेचा रोष होऊन त्याच संस्था १९३२ च्या सुमारास बेकायदेशीर म्हणून बंद पडल्या.

यापुढील काळात बदलत्या परिस्थितीला अनुसरून नवनवीन शैक्षणिक उपक्रम विद्यापीठाने हाती घेतले. भारतीय लोकजागृतीच्या कार्यातील ग्रामविकासाचे महत्त्व ओळखून विद्यापीठाने ग्रामसंघटन विषयक अभ्यासक्रम तयार केला. त्याप्रमाणे प्रत्यक्ष कार्य केले. महात्मा गांधीच्या जीवन शिक्षण पद्धतीचा पुरस्कार केला. काही प्राथमिक शाळा जीवन शिक्षण शाळा म्हणून चालविण्यास घेतल्या. त्याचप्रमाणे संस्कृत भाषा परीक्षांचे विविध अभ्यासक्रम तयार करून निरनिराळ्या केंद्रात परीक्षा घेण्याचा उपक्रम विद्यापीठात सुरु झाला. पाठशालेय पद्धतीस अनुसरून एक संस्कृत महाविद्यालय चालविण्याचे विद्यापीठाने ठरविले.

श्री बालमुकुंद संस्कृत महाविद्यालय

श्री बालमुकुंद संस्कृत महाविद्यालय हा टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने चालविलेला पहिला विभाग होय. २ डिसेंबर १९४८ पासून संस्कृत कोविद, विशारद व पारंगत इ. अभ्यासक्रमाच्या अध्यापनाची व्यवस्था या महाविद्यालयात केली गेली. ह्या अभ्यासक्रमात साहित्य, वेद, व्याकरण, साहित्यशास्त्र, वेदान्त इ. महत्त्वाची शास्त्रे शिकविण्याची तरतूद करण्यात आली. त्याचप्रमाणे प्राचीन भारतीय संस्कृतीच्या ज्ञानासाठी भारतीय विद्याविशारद व पारंगत हे अभ्यासक्रम सुरु आहेत.

वैशिष्ट्ये

१) प्राचीन प्रणाली व आधुनिक चिकित्सक दृष्टीकोन या दोन्ही पद्धतीचा अभ्यासक्रमात करण्यात आलेला समन्वय हे या महाविद्यालयाचे ठळक वैशिष्ट्य.
२) संस्कृत व भारतीय विद्या यांचे दर्जेदार शैक्षणिक केंद्र
३) अभ्यासक्रम नियमित अथवा बहिस्थ करण्याची सोय.
४) नियमित विद्यार्थ्यांसाठी संध्याकाळी अध्ययनाची सोय.
५) संस्कृत व इतर साहित्य असलेले अद्ययावत ग्रंथालय.

याशिवाय पुढील काळात संस्कृत व भारतीय विद्या या विषयांचा अभ्यास आशियाई देशांमधील संस्कृतींच्या वैज्ञानिक अभ्यासाचा एक भाग म्हणून व्हावा या दृष्टीने काही योजना विचाराधीन आहेत. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या नेहरु सामाजिकशास्त्र विद्यास्थान, मुक्त विद्याकेंद्र, ग्रंथालय, आर्युवेद विभाग व प्रसार परीक्षा या शाखांद्वारे पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकविले जातात. तसेच पूर्व प्राथमिक शिक्षिका प्रशिक्षण पदविका अभ्यासक्रमही राबविला जातो. मराठी, बंगाली, कन्नड भाषा प्रमाणपत्रवर्गही या संस्थेतर्फे चालविले जातात.

व्यवसायाभिमुख शिक्षणावर आजकाल विशेष भर देण्यात येतो. ही विचारसरणी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या स्थापनेच्या काळीच विद्यापीठातील शिक्षणतज्ञानी अंगिकारून प्रत्यक्ष कार्यवाहीत आणली होती ते कार्य आजही चालू असलेले आपल्याला दिसते.

टिळक विद्यापीठात प. पू. श्रीदत्तमहाराजानी २२/२३ वर्षे अध्यापक शास्त्री म्हणून काम केले आहे. त्यावेळचे विद्यार्थी आज विद्याविभुषित झाले असून त्यानी मोठा नांवलौकिक संपादन केला आहे. ही सर्व मंडळी प. पू. श्रीदत्तमहाराजांना गुरुजी या नावाने संबोधितात. श्रीमहाराजांची नम्रता, साधेपणा, अलौकिक बुद्धिमत्ता, याबद्दल अनेकानी आपले विचार सांगितले आहेत. त्या विचारातून एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ते म्हणजे महाराजांचे शिष्याविषयीचे प्रेम. हा प्रेमभाव अध्ययनाबरोबर

आवडीचा विषय त्यांनी घेतला होता तो म्हणजे भागवतातील भीष्मस्तुती. श्री. भीष्माचार्यांना भगवंताचे दर्शन झाले. त्यावेळी भीष्माचार्यांनी जे उद्‌गार काढले आहेत ते उद्‌गार प. पू. श्रीदत्तमहाराजांना फार जिव्हाळ्याचे वाटतात. भीष्मांनी भगवंताला आपली बुद्धि अर्पण केली. ती बुद्धि किती शुद्ध करून अर्पण केली हे फार महत्त्वाचे आहे. त्यांच्या बुद्धीतून रजोगुण व तमोगुण दोन्ही नाहीसे झालेले होते. त्यामुळे कसलीच तृष्णा नव्हती. अत्यंत सात्विक बुद्धि झाली होती. ती त्यांनी देवाला अर्पण केली. देवाला जे अर्पण करायचे ते शुद्ध हवे, स्वच्छ हवे, उत्तम हवे. अशी शुद्धबुद्धि होणे ही सोपी गोष्ट नाही. प. पू. श्रीदत्तमहाराजांना या शुद्धबुद्धिचे महत्त्व फार वाटत आहे. त्याकरता ते अतिशय सावध राहतात. परमार्थात आपण कशाला महत्त्व दिले पाहिजे हे त्यांच्याकडून अनुकरण करण्यासारखे आहे. अशावृत्तीमुळे प. पू. श्रीमहाराजांना शत्रु नाहीत. असले तरी श्रीमहाराज त्यांना शत्रु मानीत नाहीत.

उत्तमाते धरीजे। अधमाते अव्हेरिजे। हे काहीच नेणीजे वसुधा तेवी ।
गाईची तृषा हरू। का व्याघ्राते विष होऊनी मारू। ऐसे नेणेची का करू। तोय जैसे ।।

सर्वांची तहान भागविणे हा पाण्याचा धर्म आहे. गायीला शुद्ध पाणी द्यावयाचे, वाघाला मात्र विषबाधा करायची असा पाण्याचा स्वभाव नाही. ते सर्वांची तहान तृप्त करते. पृथ्वी देखील सर्वांना सारखा आधार देते. त्याप्रमाणे प. पू. श्रीमहाराजांचे सर्वांशी सम वागणे असते.

त्यांच्याबाबतीत आणखी एक गोष्ट अशी जाणवते की काही वेळेस बोलणे अगदी जरुर असते. बोलले नाहीतर गैरसमज होण्याचा संभव असतो असे आपल्याला वाटत असले तरीही ते पूर्ण मौन स्विकारतात. बोलण्यापेक्षा न बोलण्याचा प्रभाव अधिक पडत असतो. आपल्याला न समजल्यामुळे ते मौन वाटत असते.

'सुखदुःखे समे कृत्वा लाभा लाभौ जया जयौ' अशी स्थिती प्रत्यक्ष दिसणे अवघड आहे प. पू. श्रीमहाराज मात्र चालते बोलते वेदान्त आहेत. श्री. राजाभाऊंचे म्हणणे असे आहे की सर्व क्षेत्रात कर्तृत्ववान लोक सापडतील. महापंडित असतील परंतु आचार व हे समत्व पहावयास सापडणार नाही.

प. पू. श्रीमहाराजांचे सर्व संकल्प सत्य होतात. त्यांनी बोलावे व तसे व्हावे. सत्य संकल्पाचा दाता भगवान असे झाले आहे. भवभूतीने म्हटले आहे 'ऋषीणाम पुनाराद्याना वाचो अर्थो न धावती.' ऋषींचे दोन प्रकार. जे घडले त्याप्रमाणे बोलतात व बोलतात त्याप्रमाणे घडते. प. पू. श्रीमहाराज दुसऱ्या प्रकारात मोडतात. समष्टीचा संकल्प व महाराजांचा संकल्प एक होतो. एकदा समदृष्टी झाली म्हणजे सर्वत्र एकच ईश्वरी चैतन्य भरलेले आहे अशी अनुभूती आली की तो ईश्वरी संकल्प होतो. ईश्वरी संकल्प म्हणजेच समष्टीचा संकल्प होय. काही वेळेस मनाच्या या साम्यावस्थेमुळे अशा महात्म्यांची केलेली प्रार्थना फलद्रुप होते. कधी कधी समष्टीलाही आपला संकल्प अशा महात्म्यांकरता बदलावा लागतो अशी स्थिती होते

व पतिव्रता सौ. पार्वतीबाई याना मूलबाळ नव्हते. या उभयतांनी मोरगावी येऊन कडक तपश्चर्या केली. मोरयाने सांगितले की तपश्चर्या केलीस खरी परंतु तुझ्या नशिबी मूल नाही. खडतर अशा पूर्व संचिताने ते खचले नाहीत. त्यावर मात करण्यासाठी अधिक उग्र तपश्चर्या केली. चार तपांची सेवा फलद्रुप झाली. मोरयाने स्वप्नात येऊन सांगितले की मी तुझ्या पोटी जन्म घेईन.

माघ वद्य चतुर्थी इ. स. १३०५ शुक्रवारी रेवती नक्षत्र माध्यान्हकाळी वामन भटजींना मुलगा झाला. मोरया उदरी आला म्हणून त्याचे नाव मोरया ठेवले. मोरया पुढे खूपच आजारी पडले. त्यांना एका गोसाव्याने येऊन बरे केले. फक्त अंगाऱ्याने हे बरे झाले. यांनी येऊरला तपश्चर्या केली. चिंतामणीचे दर्शन झाले. गोसाव्यांनी बरे केल्यामुळे मोरयाचे मोरया गोसावी झाले. शरीर थकले तरी मोरगावची वारी अंतरली नाही. एकदा मोरयाने दृष्टांत दिला की आता मी तुझ्या बरोबर येतो. कऱ्हा नदीत संध्येचे अर्घ्य देताना हातात गणपती आला. तोच आज चिंचवडला आहे. डॉ. विघ्नहरी देव हे मोरया गोसावी यांच्या वंशातील आहेत. श्रीगुरुमहाराजांनी योगायोग असा उत्तम घडवून आणला की डॉ. विघ्नहरी देव यांची भेट चतुर्थीच्या दिवशी चिंचवड येथे झाली. प्रथम मोरया गोसावीच्या समाधीचे पवित्र दर्शन घेऊनच डॉ. विघ्नहरी देवांना भेटलो. त्यांनी देवस्थानाच्या बाबतीत दोन तीन महत्त्वाच्या गोष्टी सांगितल्या.

ते म्हणाले, ''कोणतीही अडचण निर्माण झाली की आम्ही गुरुजींकडेच जात होतो. डॉ. विघ्नहारी देव एकदा मंगलमूर्तींला घेऊन काशीला गेले. देवाला काशीचे स्नान घडावे हाच त्यांच्या मनी हेतू होता. परंतु लोकांना ही गोष्ट पटली नाही. लोकांनी हे सर्व प्रकरण कोर्टात नेले. आता काय करायचे अशा विचारात ते पडले. शेवटी गुरुजींकडे (श्रीदत्तमहाराज) जावून सर्व हकिकत सांगितली. गुरुजी म्हणाले चिंता करू नये. हेतु चांगला होता. कोर्टाला पत्र लिहून दिले. साक्ष म्हणून ते कोर्टात दाखलही केले. त्या पत्राचा फार उपयोग झाला. निकाल त्यांचे बाजूने झाला. अशीच एक दुसरी अडचण आली. तेथील मंगलमूर्तींचा खालील अर्धा भाग शेंदुरलेपनाने केलेला आहे. त्या शेंदूरलेपनाला खूप वर्षे झाली आहेत. दरवर्षी देवाला घेऊन मोरगावच्या मुख्य उत्सवाला जाण्याची देवस्थानची प्रथा आहे. त्यावेळी मूर्ती उचलताना खालचे शेंदराचे कवच खाली राहिले. मोठी चिंता निर्माण झाली. निरनिराळ्या लोकांची निरनिराळी मते होती. शेवटी गुरुजींकडे जाऊन विचारले. नवीन काही करू नका. नेहमीप्रमाणे पुन्हा शेंदुर लेपन करून पुजा सुरु करा. त्याप्रमाणे केले. प्रत्येक समस्या घेऊन गुरुजींकडे गेले असता योग्य उपाय सापडतो. त्या मार्गदर्शनाप्रमाणे पुढे काम सुरु होते.

अक्कलकोटला एक याग झाला होता. त्याच्याबद्दल बरीच उलट सुलट चर्चा झाली होती. डॉ. देवांनी गुरुजींना विचारले ही चर्चा बरोबर आहे का? गुरुजींचे म्हणणे पडले की याग ठीक झाला. त्यानिमित्ताने लोक येतात, धर्मजागृती होते,

अन्नदान होते. एखाद्या गोष्टीतून चांगले काय बघता येईल ही गुरुजींची वृत्ती असल्यामुळे ग्राह्य तेवढेच बोलतात. निंदा नालस्ती करणे नावे ठेवणे हा मुळातच गुरुजींचा स्वभाव नाही.

* * *

डॉ. शिवराम जोशी हे सध्या डेक्कन कॉलेजमध्ये संस्कृत कोशविभागाचे संपादक आहेत. पाणिनीच्या अष्टाध्यायीचे १२ मोठे खंड इंग्रजीतून प्रसिद्ध करून संस्कृत कोशाचे अवाढव्य काम पाहतात.

शुद्ध चरित्र

त्यांनी प. पू. श्रीदत्तमहाराजांबद्दल काही आठवणी सांगितल्या. प. पू. श्रीदत्तमहाराज त्यांना मधू या एकेरी नांवाने हाक मारीत हे मुद्दाम सांगण्याचे कारण महाराज कोणालाच, स्वतःच्या मुलांना देखील सहसा एकेरी नावाने हाक मारीत नाहीत. ही एक वेगळ्या प्रकारची आपुलकी त्यांना या एकेरी नावाने संबोधण्यात जाणवली.

पुण्याला मुंजाबाच्या बोळात श्रीशंकराचार्यांच्या मठात प. पू. श्रीदत्तमहाराज अध्यापनासाठी जात. श्री. शंकराचार्य संस्कृतचे फार प्रेमी होते. प. पू. श्रीमहाराजांनी त्यावेळी मधूची शंकराचार्यांना पाणिनीच्या अष्टाध्यायीवरील महाभाष्य वाचून दाखवण्यासाठी नियुक्ती केली. दुपारी २ ते ३ यावेळात रोज वाचून दाखवण्यासाठी डॉ. जोशी जात असत. हा संस्कृत अभ्यासाच्या दृष्टीने फायदा फार मोठा झाला. अष्टाध्यायीवरील १२ मोठे खंड इंग्रजीतून प्रसिद्ध केले आहेत त्याचे मूळ या सेवेत आहे. त्याबद्दल ते कृतज्ञ आहेत. श्री. शंकराचार्यांना वाचून दाखवण्याची संधी प. पू. श्रीदत्तमहाराजांनी त्यांना दिली. एक तास वाचल्याबद्दल आशीर्वादाचे २ रुपये ते देत असत. सद्गुरुंच्या आशीर्वादाचे फळ त्यांना आज लाभत आहे.

प. पू. श्रीदत्तमहाराज डॉ. शिवराम जोशींना सव्यसाची असे म्हणत. याचे कारण विचारता ''पूर्वीच्या जुन्या व हल्लीच्या नव्या अशा दोन्ही पद्धतींनी आपण चांगले शिकविता. आपला संस्कृतचा अभ्यास उत्तम आहे. म्हणून आम्ही आपणास सव्यसाची म्हणतो.'' सद्गुरुंच्या तोंडून विद्यार्थ्याचे कल्याण व्हावे या हेतूने उच्चारले गेलेले शब्द कसे फलद्रुप होतात हे आज डॉ. जोशी यांच्या प्रचंड संशोधनावरून दिसून येते!

या ठिकाणी आणखी एक गोष्ट प्रत्ययास येते की प. पू. श्रीमहाराजांचा वेदान्त शास्त्राचा अभ्यास परिपूर्ण असल्याने चित्तशुद्ध झालेले आहे. अशा निर्मळ अंतःकरणातून शिष्याला शिकवताना त्याचे कल्याण व्हावे या खेरीज कोणतीही

भावना उरलेली नसल्याने त्यांचे शिकवणे म्हणजे मिटलेल्या हृदयात ज्ञानाचे बीज पेरण्यासारखेच आहे. अनेकांच्या मुखातून सतत ही एकच गोष्ट प्रचीतीला आलेली आपल्याला दृष्टीगोचर होणार आहे.

प. पू. श्रीदत्तमहाराजांनी वैदिक संशोधन मंडळात परीक्षक म्हणून अनेक वर्षे काम पाहिलेले आहे. त्यांनी डॉ. शिवराम जोशींचे चुलते श्री. महेश्वरशास्त्री परीक्षार्थी म्हणून गेले असता प्रश्न विचारला. प्रकारतथा शाब्दबोध व संसर्गतथा शास्त्रबोध म्हणजे काय? त्यांनी दिलेल्या उत्तरावर प. पू. श्रीदत्तमहाराज काही बोलले नाहीत. त्यांनी त्यांना दुसरा प्रश्न विचारला. प. पू. श्रीदत्तमहाराज कधीही विद्यार्थ्यांचा पाणउतारा करीत नसत. त्याला काय येत नाही यापेक्षा त्याला काय येतय याकडे लक्ष केंद्रित करण्याची त्यांची पद्धत होती. हा एक शैक्षणिक दृष्टीकोण प. पू. श्रीदत्तमहाराज किती जाणीवपूर्वक बाळगतात याचे हे प्रत्यक्ष उदाहरण आहे.

१९३७ च्या आसपास पुण्यात विव्दत्चर्चा ठरली होती. तेव्हा धर्म परिवर्तनीय आहे की नाही अशी शास्त्रचर्चा होती. तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी व श्री. नारायणशास्त्री मराठे हे धर्म परिवर्तनीय आहे या मताचे होते. पं. राजराजेश्वरशास्त्री प. पू. श्रीमहाराज यासारखे प्रकांड पंडित धर्म परिवर्तनीय नाही या मताचे होते. पं. राजेश्वरशास्त्री द्रवीड व प. पू. श्रीमहाराज यांच्या सारख्या पंडितांची मते खोडता येणार नाहीत असे वाटून की काय प्रतिपक्ष उपस्थित राहिला नाही. कोणतीही बाजू कुशलतेने मांडून शास्त्रचर्चा करण्यात प. पू. श्रीदत्तमहाराज निष्णात होते. धारवाडच्या वास्तव्यातील असे अनेक प्रसंग पूर्वी दिलेले आहेत.

डॉ. शि. म. जोशी म्हणाले त्या काळात लग्नप्रसंगी मंत्रजागराबरोबर पंडितांना बोलावून अशी शास्त्रचर्चा करण्याची प्रथा होती. शास्त्रचर्चा कशी करावी हे देखील प. पू. श्रीदत्तमहाराज शिकवत असत.


श्री. शंकरशास्त्री मारुळकर हे डॉ. जोशी यांचे चुलते. पं. महेश्वरशास्त्री यांचे गुरुजी होते. ते भोरच्या संस्थानचे सल्लागार होते. प. पू. श्रीदत्तमहाराजांची एकूण विद्वत्ता व अधिकार हे भोरच्या संस्थानिकांना पं. मारुळकर यांचेकडून कळल्याने भोर संस्थानने प. पू. श्रीदत्तमहाराजांना वर्षासनाचा मान दिला होता.

डॉ. शि. म. जोशी यांच्या पत्नी पूर्वाश्रमीच्या कलावती भागवत. याही प. पू. श्रीमहाराजांची आठवण सांगत होत्या. कै. यशवंतराव मराठे हे अंध होते. त्यांचे अध्ययन प. पू. श्रीदत्तमहाराजांकडे झाले होते. पूर्वाश्रमींच्या कलावती भागवत कै. यशवंतराव मराठ्यांना तर्कशास्त्रासारखे अनेक ग्रंथ वाचून दाखविण्यासाठी जात असत. एकदा यशवंतराव मराठ्यांनी प. पू. श्रीदत्तमहाराजांना आपल्या घरी बोलावले होते. त्यावेळी कलावतींचे वाचन चालू होते. त्यांच्या संस्कृत अभ्यासाबद्दल प. पू.

श्रीदत्तमहाराजांना विचारता ते म्हणाले की गती चांगली आहे. त्या पुढे म्हणाल्या की गुरुजींचे साधेपण, त्यांची शांतवृत्ती, अबोल स्वभाव, गाढा व्यासंग याची प्रचिती सर्वांनाच होती. पुढे माझी गती खरोखरच डॉ. जोशी यांच्या व्यासंगपूर्ण साथीने चांगली ठरली. गुरुजींचे शब्द सार्थ झाले.

गुरुजींचा आचार किती शुद्ध होता याबद्दल बोलताना डॉ. शि. म. जोशी यांनी एक हकीकत जाता जाता सांगून आपला आदरभाव व्यक्त केला. ते म्हणाले १९५३ साली प्राच्य विद्या संशोधन संस्थेत पाश्चात्य संस्कृत पंडीत श्री. इंगॉल याना व्याकरण शिकवण्यासाठी श्रीमहाराज जात होते. प. पू. श्रीदत्तमहाराज बादरायण ब्रह्मसूत्रावरील भास्कर भाष्य शिकवण्यास जात असत. आचार इतका शुद्ध की ते संशोधन मंडळात काहीही घेत नसत. मला मात्र चहा लागे. मला संकोच वाटे गुरुजी काही घेत नाहीत. आपण कसे घ्यायचे पण गुरुजी म्हणत ''तुम्हाला लागतो ना चहा? खुशाल घ्या. संकोच करू नका.'' डॉ. शि. म. जोशी व सौ. जोशी गुरुंजींबद्दल सांगताना असे मनाने भारावून गेले.

❀ ❀ ❀



डॉ. त्रि. ना. धर्माधिकारी

डॉ. त्रि. ना. धर्माधिकारी यानी वेदामध्ये डॉक्टरेट घेतली आहे. तैत्तरीय संहित सायण आणि भाट्टभाष्य यांच्या ५ खंडाचे संपादन यांनी केले आहे. यज्ञविधानाचे पुस्तक लिहीले आहे. १००० हस्तलिखितांचा संग्रह केला आहै. हस्तलिखितांचे तीन कॅटलॉग केले आहेत. प. पू. श्रीदत्तमहाराजांबरोबर त्यांनी टिळक विद्यापीठामध्ये ४-५ वर्षे सदानंदकृत वेदान्तसार, नैयात्तिक न्यायमाला, मनुस्मृती चे अध्याय वगैरे विषयांचा अभ्यास केला.

धन्य ते गुरु


प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या शिकविण्याबद्दल सांगताना धर्माधिकारी म्हणाले, ''कापूस पिंजावा तसा संशय राहू नये म्हणून विषय पिंजून सांगत असत.'' शिकवताना केव्हाही पहिले तरी अनुग्रह पाझरत रहावा अशी त्यांची दृष्टी असे. हे वाक्य सांगतानाही प्रत्यक्ष ती स्थिती त्या क्षणाला अनुभवीत आहेत अशी अवस्था त्यांची झालेली दिसली. गुरुजींचे ज्ञान सर्वांगीण आहे. वेदान्तसार हा पायाभूत ग्रंथ शिकवत असताना भामती व प्रस्थान त्रयी असे सर्व दाखले देऊन ते शिकवित असत.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाची वेदान्त विषयाची पारंगत ही परीक्षा असे. त्यावेळी विद्यार्थ्याला ते सर्वदर्शनसंग्रह शिकवित असत. सर्व विषयांचा अर्थ स्पष्ट करून सांगण्याचे त्यांचे सामर्थ्य होते. त्यांच्या ज्ञानाच्या खोलीची जाणीव असल्याने अजूनही त्यांच्यापुढे आम्ही बिचकत जातो.

लहान मोठा हा भेद न ठेवता विद्येचा गौरव करण्याची त्यांची प्रथा पूर्वीपासूनची आहे. नुकतेच गीतानंदस्वामींना भेटण्यासाठी घेऊन गेलो होतो. त्यांची माहिती सांगितल्याबरोबर लगेच त्यांचा सत्कार शाल श्रीफळ देऊन केला. एकदा त्यांच्या घरी गेलो होतो. त्यांच्या नातवांच्या मुंजी झाल्या होत्या. ''आज चांगल्या दिवशी आलात. बटू आता शिक्षणयोग्य झाले. महावस्त्र देऊन तुमच्या विद्येचा आधी गौरव करतो'' असे म्हणून वस्त्र श्रीफळ मला दिले. असा त्यांचा स्वभाव होता. गुरुजींच्या पिताजींची सहस्त्रचंद्रदर्शन शांती झाली. त्यावेळी मी देऊळगावला गेलो होतो. गुरुजींना फार आनंद झाला. आपल्या विद्यार्थ्यांविषयी इतके विलक्षण प्रेम त्यांना होते.

प. प. श्रीवासुदेवानंदाच्या शिक्षात्रय या ग्रंथाच्या प्रती मुद्दाम आम्हा विद्यार्थ्यांना त्यांनी दिल्या होत्या. सांगितले की वाचून बघा. वेदान्ताचे आचरण करणाऱ्या क्वचित लोकांपैकी ते आहेत. एका वाक्यात सांगायचे तर Vedant incarnate असे त्यांना म्हणता येईल. आचार्य त्यांना म्हणतात की जे आपल्या आचाराने दुसऱ्यांना धडे घालून देतात. धन्य ते गुरु व धन्य ते शिष्य असे सर्व ऐकून वाटले.

भगवंताच्या अंतरी एका माणसाचाही विचार होतो. अत्री ऋषींच्या तपाचे फळ देण्यासाठी भगवंत अवतार घेऊन आले. प. पू. श्रीदत्तमहाराज या बाबतीत रुक्मिणीचे उदाहरण आवर्जून देतात. देवी रुक्मिणी भगवान श्रीकृष्णाला शरण आली होती. आपण या व मला घेऊन जा असा निरोप तिने पाठविला होता. सर्व विरोधी होते तरी केवळ तिच्या मनापासून केलेल्या प्रार्थनेने व तिचे अंतरंग जाणून आसुरी वृत्तीपासून तिचे संरक्षण केले. लोकशाहीत अनेकांच्या हिताबरोबर एका मनुष्य सज्जनाचे हित बघितले पाहिजे. याला खरी लोकशाही म्हणतात. या ठिकाणी संघटना लागत नाही.



श्री. लक्ष्मीकांत जांबोरीकर

विद्या विकास संस्कृत विद्यालयाचे प्रमुख संस्थापक व प्राचार्य. टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील पदवीधर. हे मूळचे विदर्भातील आहेत. संस्कृत प्रचारासाठी यानी परदेशात दौरेही केले आहेत. शाळेचा प्रथम आरंभ घरात शिशुवर्ग काढून झाला. आता माध्यमिक विद्यालयापर्यंत प्रगती झाली आहे.

सद्‌गुरु सारिखा असता पाठीराखा

टिळक महाराष्ट्र विद्यापीठात श्री. लक्ष्मीकांत जांबोरीकर प. पू. श्रीदत्तमहाराजांचे विद्यार्थी होते. या विद्या विकास संस्कृत शाळेच्या वाढीचे व आपल्या सर्व यशस्वी जीवनाचे श्रेय ते प. पू. श्रीदत्तमहाराजांकडेच देतात. आज सत्तरीच्या घरात असणारे हे जांबोरीकर म्हणतात आपल्या जीवनात जर गुरुजींसारखे गुरु आले नसते तर ते येवढ्या नामारूपाला आले नसते. विद्यार्थीदशेत कोणी चांगला मार्गदर्शक भेटला तर प्रगती करता येते. या मार्गदर्शनात जिव्हाळा असला तर विद्यार्थ्याच्या जीवनाचे सोने होते.

श्री. लक्ष्मीकांत पुण्याला आले आणि लगेचच घडलेला प्रसंग. पहिल्या वर्षीची गोष्ट. गणपतीचे दिवस होते. जवळच असलेल्या गुपचुप गणपती उत्सवात गणेशयाग होता. गुपचुप गणपती म्हणजे गुपचुप आडनावाच्या गृहस्थानी सुरु केलेला गणपती. गुरुजीही यागासाठी आले होते. सर्व शिक्षक, मुले तिकडेच गेली होती. इतक्यात लक्ष्मीकांत जांबोरीकरांना गावाहून तार आली की त्यांची आई जास्त आजारी आहे. लक्ष्मीकांत तसे नवखे. घाबरून गेले. जवळ पैसेही नव्हते. सर्वजण गणपती उत्सवात मग्न होते. गर्दी होती पण तसेच वाट काढीत पुढे गेले. चिंतातुर होऊन कोणाला सांगावे या गोंधळात ते पडले होते. इतक्यात गुरुजींचे लक्ष त्यांचेकडे गेले. ते बसल्या जागेवरून उठून जांबोरीकरांकडे आले, म्हणाले 'घाबरू नका हे पैसे घ्या व ताबडतोब निघा. आईला भेटून या' असे म्हणून त्यांनी शंभराची नोट हातावर ठेवली. त्यांना आईची ही बातमी कशी कळली हे त्यांचे त्यानाच माहित. त्यांनी पाठीवरून जो मायेचा हात फिरविला तो स्पर्श ते कधीही विसरू शकणार नाहीत. छात्रांविषयीचा जिव्हाळा गुरुजींच्या मनामध्ये पूर्ण भरला होता म्हणूनच आईची भेट झाली.

त्यांच्या विवाहाच्या बाबतीत असाच गुरुजींनी पुढाकार घेतला आहे. पुण्यातील डावरे यांची मुलगी सांगून आली. घराणे चांगले होते. काय करावे प्रश्न पडला. नोकरी अजून लागलेली नव्हती. अडचण आली की गुरुजींकडे धाव घ्यावयाची

येवढेच माहित. गुरुजींनी सांगितले की, 'मुलगी चांगली आहे हुशार आहे, जोडा चांगला आहे. विवाह करा, नोकरी लागेल. आपल्या कार्यांनी चांगले पुढे याल.' सुदैवाने त्यांना लगेच डेक्कन कॉलेजात नोकरी लागली. आपल्या पत्नीची आम्हाला ओळख करून देताना लक्ष्मीकांत म्हणाले ''यांची उत्तम साथ लाभली. त्यामुळे स्वयंपाकघराच्या एका खोलीत सुरु केलेली शाळा आज विद्या विकास संस्कृत विद्यालय म्हणून नावारुपाला आली. माझ्या पत्नीच्या सक्रीय सहभागमुळे आपण इतके चांगले काम करु शकलो. असे असले तरी वरदहस्त श्री गुरुजींचा आहे.'' असे ते पुन्हापुन्हा म्हणत होते.

१९७१ साली शाळा उभारली गेली. पण शाळेला मान्यता मिळविण्याच्या कामी शेवटी गुरुजींचेच सहाय्य झाले. प्रेरणा देणे, आशीर्वाद देणे, जमेल तेवढी मदत करणे हा गुरुजींचा सहज स्वभाव झाला. त्यांच्या निर्मळ मनाने केलेला संकल्प सत्यसंकल्प ठरतो. सर्व छात्र वर्गावर निरपेक्ष प्रेम करण्याची गुरुजींची पद्धत वेगळीच आहे, असे आदरयुक्त उद्‌गार त्यांनी काढले.

आज त्यांचे लौकिक जीवन कृतार्थ आहे ''संस्कृत विद्या विकास मंदिराचे ध्येय पुरे होत आले आहे. संस्कृत अध्ययन गुरुजींपाशी केले. त्यांच्या कृपेने विद्या विकास शाळेत पूर्व प्राथमिक पासून संस्कृत विषय ठेवता आला व संस्कृत भाषेची अल्प सेवा करता आली यातच त्यांना समाधान आहे.''

विद्या मंदिराची सुंदर इमारत आज वीस लाखाच्या पेक्षा अधिक किंमतीची आहे. त्यांनी काढलेली छोटी मोठी संस्कृत अभ्यासक्रमाची पुस्तके संस्कृत भाषेचा अभ्यास करण्यांसाठी फारच उपयुक्त आहेत. हे कार्य करवून घेणारे, त्यांना प्रेरणा देणारे, अनेक अडीअडचणींना तोंड देण्यास सिद्ध करणारे व्यक्तिमत्व म्हणजे त्यांचे गुरुजी आहेत. अशा कितीतरी व्यक्ती असतील त्यांना प. पू. श्रीमहाराजांनी प्रेरणा दिली आहे. पण त्याची जाण कुणालाही न देता कार्य चालू आहे.

अशा प्रकारचे संतांचे कार्य अखंड चालू असते. प्रसिद्धी परांड्‌गमुख असल्यामुळे ते कळत नाही. ते सूक्ष्म असते हेच खरे.

'सद्‌गुरु सारिखा असता पाठीराखा इतरांची लेखा कोण करी' या अभंगाच्या ओवीने श्री. लक्ष्मीकांत जांबेरीकरांनी शेवटी आपली भावना व्यक्त केली.

गुरू हा नौकेचा कुशल कर्णधार आहे.

भगवान श्रीकृष्ण

डॉ. विजया देशमुख यानी अश्वत्थामा या विषयावर पी.एच.डी. केली आहे. भांडारकर इनस्टिट्यूट मध्ये काम करतात. या टि.म.वीच्या विद्यार्थींनी आहेत


साधा स्वभाव

गुरुजी टिळक विद्यापीठाचे नियुक्त शास्त्री. ते नेहमी लेखनात निमग्न असत व कमी बोलत असत. त्यांना कॉलेजमधे रामानुजाचार्याचे श्रीभाष्य व शंकर भाष्य होते. श्रीभाष्य कॉलेज मध्ये अजिबात समजत नसे. गुरुजी नेहमी कामात. त्यांना विचारावे कसे हा त्यांना प्रश्न पडे. त्यांनी एक दिवस धीर करून विचारले. ''श्रीभाष्य आम्हाला सांगाल का? आम्हाला ते मुळीच समजत नाही. आम्ही केव्हा येऊ?'' 'तुम्ही याल तेव्हा सवड काढू' असे गुरुजी चटकन म्हणाले. डॉ. विजयाताई म्हणत होत्या ''श्रीभाष्य वाचायला अवघड म्हणण्यापेक्षा प्रचंड कठीण आहे. कॉलेजमध्ये एक अक्षर देखील कुणाला कळत नव्हते. परंतु आश्चर्याची गोष्ट गुरुजी वाचत असतानाच सर्व कळत असे. गुरुजींच्या वाचनाचे वैशिष्ठ्य असे समोरच्या माणसाला सर्व समजावे. डॉ. विजयाताई पुन्हा पुन्हा सांगत होत्या गुरौस्तु मौनंम् व्याख्यानम याचा प्रत्यय या ठिकाणी आला. केवळ वाचनच येवढे प्रभावी. ही योग्यता केवळ पंडिती योग्यता नव्हे. परतत्वाचा स्पर्श झालेल्या बुद्धीचे हे कार्य आहे असे मनाला पटून गेले. नतमस्तक झाले. गुरुजींची ही खोली कुणालाही कळणे कठीणच!

डॉ. विजयाताईंनी त्यांच्या साधेपणाची आणखी एक गोष्ट सांगितली. विजयाताईंच्या वडिलांची सत्तरी होती. बोलावणे करण्यासाठी त्या स्वतः जाऊ शकल्या नव्हत्या. निरोप पाठविला होता. गुरुजी यावे अशी इच्छा होती. गुरुजी फार मोठ्या मनाचे. ते बरोबर पाच वाजता हजर झाले. त्यांनी वडिलांना हार घातला. वडिलांच्या जीवनाचे सार्थक झाले. हे सांगताना विजयाताईच्या डोळ्यातून प्रेमाश्रू वहात होते. त्या एकदम भावमुग्ध झाल्या. मी देखील ऐकताना महाराजांच्या सात्विक शुद्ध मनाच्या दर्शनाने भारावून गेले. ''चित्त शुद्ध जरी शत्रू मित्र होती.'' इथे सर्वावरच प्रेम! मग शत्रू उरणार तरी कसे?

प. पू. श्रीदत्तमहाराजांचे असे विद्यावंत, किर्तीवंत, शिष्यवर्ग पाहून चरित्र शोधावे लागते हे गुळवणी महाराजांचे वाक्य पुन्हा पुन्हा आठवले. पण हे तर त्यांच्या चरित्राचे बाह्यरंग झाले. अंतरंग कोण जाणणार? अतर्निष्ठांच्या खुणा अंतर्निष्ठ जाणती ते गुरुमहाराजांनी जाणले. ब्रह्मरुपता लक्षात घेऊन त्यांना ब्रह्मपदी बसविले.

* * * *



श्री. अजित कुळकर्णी

श्री. अजित कुळकर्णी एम. ए. फिलॉसॉफी हे श्री गुरुचरित्र अखंड पारायण संस्था, पुणे या संस्थेचे कार्यवाह आहेत. पुणे विद्यापीठात ते प्राध्यापक असून अनेक लहान मोठी सामाजिक कार्य करीत असतात. अनेकवेळा परदेशात जाऊन आले आहेत. फ्रान्समध्ये भागवत सप्ताह त्यानी केला आहे.

जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती

श्री गुरुचरित्र अखंड पारायण संस्था, पुणे ही संस्था श्री दत्तभक्त भालचंद्र रामचंद्र खिस्ति स्थापित आनंदाश्रम म्हणून ओळखली जाते. जुने प्रसिध्द कादंबरीकार, थोर साहित्यिक कै. हरी नारायण आपटे यांचे चुलते फार मोठे अध्यात्मिक अधिकारी होते. त्यांची समाधी या ठिकाणी आहे. हे खिस्ति ज्यांची समाधी येथे आहे, त्या आपट्यांचे नातेवाईक होते. पूर्वी आनंदाश्रमामध्ये जुन्या संस्कृत ग्रंथाचे प्रकाशन होत असे. येथे बरेच जुने ग्रंथ व पोथ्या आहेत. प. पू. श्री दत्तमहाराजांनी येथील जुन्या ग्रंथाचे संशोधन केले आहे. बऱ्याच ग्रंथांची माहिती प्रकाशन करण्याकरता उपलब्ध करुन दिली होती. त्यावेळी पुण्यातील वेदमूर्ती श्री गणेशशास्त्री जोशीही तेथे येत असत.

श्री दत्तजयंती निमित्त श्रीगुरुचरित्र अखंड पारायणाचा उपक्रम १९५५ पासून सुरु आहे. पारायण संस्था म्हणून १९७५ साली नोंदणी झाली. या संस्थेचे अध्यक्ष प. पू. श्रीदत्तमहाराजच आहेत. प. पू. श्रीगुळवणीमहाराज पूर्वीपासून पारायणाचे वेळी आनंदाश्रमात येत असत. त्यांचे बरोबर प. पू. श्रीएरंडेस्वामी शंकराचार्य ही येत असत. प. पू. श्रीदत्तमहाराजही सुरवातीला पारायणासाठी येत असत.

प. पू. श्रीदत्तमहाराजांनी सांगून ठेवले आहे की ही श्रीदत्त प्रेरित संस्था आहे. कुणाकडे काही मागावयाचे नाही. त्याप्रमाणे कार्य चालू आहे. काही कमी पडत नाही. लोक आपणहून सेवा म्हणून देत असतात. श्री दत्तजयंतीच्या सुमारास रात्रंदिवस अखंड गुरुचरित्र साप्ताह चालू असतो. आपल्या सवडीने वेळ ठरवून लोक सप्ताहासाठी येत असतात. वातावरण दत्तभक्तीने भारुन जाते. १०० च्यावर लोक पारायणाला बसतात. सर्वांची व्यवस्था संस्थेमार्फत होते. शेवटी महाप्रसाद होतो. श्री अजितराव या कार्यात निमग्न असतात. हे सर्व सामर्थ्य प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या आशीर्वादाचे आहे अशी त्यांची निष्ठा आहे. प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या अनेकविध कार्याविषयी त्यानी माहिती दिली. दरवर्षी नारायण पेठेतील अष्टभुजा देवी मंदिरात सकाळी ८ ते ९ देवी भागवतावर प. पू. श्रीदत्तमहाराज अनेक वर्षे सांगत होते. पुढे प. पू. श्रीगुळवणी महाराजांनी सुचविल्यानंतर दुपारी श्री वासुदेवनिवासाश्रमात येत असत.

श्रीगुरुचरित्र पारायणाचे शेवटी ५५५, नारायण पेठ येथून दत्तपालखी निघे. ती आनंदाश्रमापर्यंत. या पालखी बरोबर पूर्वी प. पू. श्रीदत्तमहाराज येत असत. पालखी बरोबर दोन दिवट्या असत. तशाच दोन दिवट्या प. पू. श्रीदत्तमहाराजांबरोबर असत. लोकांनी भक्तीभावाने केलेला हा महाराजांचा बहुमान असे. त्यानंतर प. पू. श्रीदत्तमहाराजांचे आनंदाश्रमात प्रवचन होई. प. पू. श्रीगुळवणी महाराज, प. पू. श्रीएरंडेस्वामी व प. पू. श्रीदत्तमहाराज यांचे आगमनाने पारायणाला मोठी भव्यता दिव्यता प्रसन्नता येत असे. अजूनही प. पू. श्रीदत्तमहाराज पारायणाच्या दिवसात येऊन जातात. आता त्यांना जिना चढावयाचा नाही पण खाली येऊन बसून जातात. हा त्यांचा केवढा मोठा आशीर्वाद सर्वांना मिळतो! वास्तविक त्यांचा हल्लीचा वाढलेला व्याप व त्यांचे वय याचा विचार करता ह्यांनी प्रत्यक्ष येता येत नाही म्हटले असते तरी चालले असते. परंतु कोणतीही जुनी प्रथा त्यांनी आपली मानून ती अगत्याने निष्ठेने अखंड राखली यातच आपण कितीतरी शिकण्यासारखे आहे असे श्री. अजितराव मोठ्या भक्तीभावाने म्हणत होते. प. पू. श्रीदत्तमहाराजांचे मार्गदर्शन संस्थेला आजही लाभते. हे कार्य अखंड चालू रहावे अशी त्यांची इच्छा आहे. अशा वेळी प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या प्रवचनातील बोध आठवतो. श्रीमहाराज सांगतात की ज्या महात्म्यांची विशाल बुद्धि होते, मन शुद्ध होते त्यावेळी त्यांचे संकल्प हे ईश्वरी होतात. ते समष्टीचे संकल्प सर्वांच्या कल्याणाकरता होत असतात. ते सत्य संकल्प असतात. आपल्याला या ठिकाणी प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या ठिकाणी असलेल्या संकल्पशक्तीचा या वेगळ्या वेगळ्या कार्याने प्रत्यय येत आहे असे वाटले. जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती याचा प्रत्यय येतो.

प. पू. श्रीदत्तमहाराज श्री अजितरावांना आपल्या मुलाप्रमाणे वागवितात. श्री. अजितरावांच्या व्यक्तीगत जीवनातील काही हृद्य प्रसंग त्यांनी सांगितले. श्री. अजितरावांच्या लग्नाच्या वेळी महाराज मध्यस्त होते. व्याही भोजनापासून सर्व कार्यात प. पू. श्रीमहाराज व आईसाहेब यांनी जातीने भाग घेतला होता. त्यांना मुलगा झाला पण त्यांच्या पत्नीला खूपच त्रास झाला. कारण पोटात ट्युमर व गर्भ दोन्हीही वाढत होते. श्रीगुरुकृपेने तिच्या प्रकृतीचे संरक्षण झाले व मुलगा झाला. बाळ व आई दोन जीवांचे रक्षण करणारे श्रीगुरुदेव याना कितीही वेळा वंदन केले तरी ते अपुरे आहे. मुलगा झाल्याचे वृत्त सांगितल्यानंतर एकच वाक्य ते बोलले. हे वेदांनी दिलेले फळ आहे म्हणून त्यांचे नाव आम्ही 'वेददत्त' असे ठेवले असेही त्यांनी आवर्जून सांगितले.

प. पू. श्री. श्रीधरस्वामींचा व त्यांचा त्यांच्या आईपासूनचा लोभ होता. त्यांच्यावर अनुग्रहही होता. पण प. पू. श्रीधरस्वामींनी त्यांना प. पू. श्रीदत्तमहाराजांकडे सोपविले होते असेही त्यांच्या बोलण्यात आले.

प. पू. श्रीदत्तमहाराजांना उत्तराधिकारी पद प्राप्त झालेले होते. त्याला आशीर्वाद प. पू. श्रीधरस्वामींचाही होता. श्रीमहाराजाना सज्जनगडावर प. पू. श्रीधरस्वामींनी

बोलावून घेतले होते. या गोष्टीचा उल्लेख या पुस्तकात अन्यत्र केलेला आहे. प. पू श्रीगुळवणी महाराजांकडे प. पू. श्री श्रीधरस्वामी येऊनही गेले होते. या सर्व एकत्र सहवासातून, बोलण्यातून त्यांचे मंगल आशीर्वाद प. पू. श्रीदत्तमहाराजांना मिळणे हे अगदी सहजच आहे.

श्रीभागवतावर अखंड प्रीति असल्यामुळे प. पू. श्रीदत्तमहाराजांनी श्री. अजितरावना भागवत सप्ताह करण्यास सांगितले. ते दरवर्षी आनंदाश्रमात भागवत सप्ताह करतात. परदेशात अजूनही वेगवेगळ्या ठिकाणी त्यांना भागवत सप्ताहासाठी जावयाचे आहे. श्री अजितराव हे साधक भक्त असल्यामुळे प. पू. श्रीदत्तमहाराजांविषयी वाटत असलेला भक्तीचा जिव्हाळा हा अंतःकरणातून येत असल्यामुळे त्यांच्या डोळयात सतत प्रेमाश्रू येत होते. ऐकतानाही तो ओलावा इतरांच्या मनाला जाणवत होता. ही अश्रूंची फुले त्यांनी कृतज्ञतेने गुरुचरणी वाहून आपले बोलणे थांबविले.

❀ ❀ ❀



वे. शा. सं. श्रीअनंतशास्त्री

वे. शा. सं. श्रीअनंतशास्त्री व त्यांचे मोठे भाऊ सदाशिवशास्त्री पारखी यांनी श्रीदत्तमहाराजांजवळ सुमारे सातआठ वर्षे शिक्षण घेतले. ही गोष्ट १९६४-६५ सालची आहे. श्रीअनंतशास्त्रींनी न्यायशास्त्र, तर्कसंग्रह आणि श्रीसदाशिवशास्त्रींनी वेदांत परिभाषा, चित्सुखी, दशोपनिषदे या विषयांचे अध्ययन केले.

विद्या विनयेन शोभते

श्रीमहाराजांच्या घरी गेल्यावर ते त्यांना नमस्कार करुन आपल्या विषयांची पुस्तके घेऊन बसत. महाराजांना शिकवताना कधी पुस्तक बघावे लागले नाही. विषय समजावून सांगण्याची पद्धतसुद्धा फारच सोपी, सरळ आणि विषयात रस निर्माण करणारी अशी. त्यांच्या हरतऱ्हेने एकच गोष्ट समजावून सांगण्याच्या कौशल्यावर मोहीत होऊन शास्त्रीद्वय एकच प्रश्न अनेकवेळा विचारीत आणि प्रत्येक वेळा नवीन स्पष्टीकरण ऐकून कृतार्थ होत. तो आनंद काही वेगळाच असतो. इतक्या वर्षात स्पष्टीकरण ऐकून कृतार्थ होत. तो आनंद काही वेगळाच असतो. इतक्या वर्षात एकेक प्रश्न अनेक वेळा विचारूनसुद्धा श्रीमहाराज कधीही रागावले नाहीत. ते कधीही

आवाज चढवून बोलत नसत. शिकवताना ते इतक्या एकाग्रतेने शिकवत की विद्यार्थ्यालाही भोवतालच्या जगाचा विसर पडावा! व्यक्तिगत जीवनात घडणाऱ्या कोणत्याही बऱ्यावाईट घटनांचे पडसाद त्यांनी आपल्या शिकवण्यावर उमटू दिले नाहीत. शिकायला यायला लागल्यापासून ते शिक्षण पूर्ण करून जाईपर्यंत त्यांनी कधीही महाराजांच्या चित्तवृत्तीत बदल झालेला पाहिला नाही, शांती कधी ढळलेली पाहिली नाही.

महाराजांचा छोटा मुलगा अजित काहीवेळा शिकवत असताना तिथे येऊन विद्यार्थ्यांच्या हातातले पुस्तक ओढी. महाराज, त्याला शांतपणे म्हणत. 'अहो असे करू नका. त्यामुळे पाठात खंड पडतो' पण कधीही रागावले नाहीत.

श्री अनंतशास्त्री म्हणतात, ''त्यांनी आम्हाला इतके शिकवले, पण आमच्याकडून कोणतीही सेवा ते कधी करून घेत नसत. आम्हाला नेहमी वाटे, गुरुजींनी आपल्याला काही काम सांगावे. पण त्यांनी कधीही सांगितले नाही. ते म्हणायचे आम्ही केले ते आमचे कर्तव्य आहे. एकदा एका विद्यार्थ्याने महाराजांची एसटीची तिकिटे काढून आणण्याचे काम केले. तर महाराजांनी, 'तुम्ही आमचे केवढे काम केलेत' असे अनेक वेळा बोलून दाखवले.''

श्री. अनंतशास्त्री पुढे म्हणतात, ''श्रीमहाराजांना पुढे दृष्टीदोषामुळे संहिता वाचनाचा ताण पडू लागला. त्यावेळी त्यांनी आम्हाला संहिता वाचनाला बोलावले. यानिमित्ताने थोडी तरी गुरुजींची सेवा घडेल याचा आम्हाला आनंद वाटला. तिथे गेल्यावर गौरव होई, व्यासपीठावर गुरुजींच्यासमोर बसावयाचा फार संकोच होई, हे लक्षात आल्यावर माझे संहिता वाचन योग्य आहे याची खात्री करून घेतली नंतर ते वरच्या खोलीत बसून ऐकू लागले.''

श्रीपटवर्धनांच्या पाठशाळेत आचार्यांच्या जयंती उत्सवाच्या निमित्ताने निरनिराळ्या लोकांची प्रवचने होत. त्यात महाराजांचीही प्रवचने होत. इतर प्रवचनांच्या वेळी काही खोडकर मुले मुद्दाम गोंधळ घालीत. पण महाराजांचे प्रवचन ऐकून मात्र मंत्रमुग्ध होऊन त्यांना त्यांच्या खोडकरपणाचा विसर पडे.

इतक्या वर्षाच्या अखंड भागवताच्या अभ्यासामुळे त्यांची भूत-भविष्य-वर्तमान या तिन्ही कालात वृत्ती तदाकार झाली आहे. ज्ञान, वैराग्य आणि भक्ति हे मानवी जीवनाचे प्राप्त स्वरुप आहे हे त्यांनी ओळखले आहे. आपली योग्यता, साधना कमी पडते म्हणून आपण त्यांना ओळखू शकत नाही. आपली बुद्धि जर तेवढी सूक्ष्म झाली तरच त्यांची ही अखंड शांतीस्वरूप समदृष्टी आपल्याला लक्षात येईल. वे. शा. स. अनंतशास्त्रींना आपल्या गुरुजींचे मोठेपण किती सांगू आणि किती नाही असे झाले होते. ते इतक्या तन्मयतेने व तळमळीने सांगत होते की, त्यातून त्यांनी महाराजांच्या जीवनाची एक अव्यक्त बाजू दाखविण्याचा प्रयत्न केला.

प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या चरित्रग्रथांचे काम चालू झाले आहे असे समजल्यावरून धर्मकोश-वाई येथून काही पत्रे आली. ती श्रीमहाराजांवरील प्रेमाची, श्रद्धेची स्मृतीगंधच वाटली. लिहिणारी श्रीमहाराजांची शिष्य मंडळी असली तरी मोठी विद्वान आदरणीय अशीच आहेत.

श्री गुरुः शरणम्

धर्मकोश - वाई. ४१२ ८०३

श्री कवीश्वरगुरूजींची गुणसंपदा

१) महत्पाण्डित्य :- मी नुकताच तर्कतीर्थाची परीक्षा देऊन आलो होतो. नंतर वेदांत विशारद परीक्षेला बसण्यासाठी प. पू. श्रीकवीश्वरगुरूजींजवळ सिध्दान्तलेश संग्रह वाचत होतो. त्यावेळी त्यांनी ध्वंसाचाही ध्वंस होतो हे युक्तीने मला पटविले. आमची दोन तास चर्चा चालली होती. अर्थात ध्वंसाचा ध्वंस होत नाही हा माझा पक्ष होता. यावेळी त्यांचे महत्पाण्डित्य समजले.

२) स्पष्टवक्तेपणा आणि निर्भयपणा :- येथे वाईला श्रीशंकराचार्य जेरे, यांचे कोटिलिंगार्चन चालू होते. त्याच्या सांगतेचे वेळी गु. कवीश्वरशास्त्री यांचे व्याख्यान होते. त्यावेळी हजारो शिष्यवृंदासमोर स्वतः श्रीशंकराचार्य जेरे उपस्थित असताना त्यांच्या गुरुंशी शिरोळकरमहाराजांशी घडलेल्या वर्तनाविषयी त्यांना न आवडणारा अभिप्राय स्पष्ट बोलून पुढे सुश्राव्य व्याख्यान दिलेले आहे.

३) असाधारण स्मरणशक्ती किंवा अभ्यासपद्धत :- विद्यार्थीदशेत पं. नागेशशास्त्री उप्पन्नबेट्टेगिरी यांच्याजवळ न्यायाचा पाठ घेतल्यानंतर शांतपणे बसून रहायचे. चिंतनात असायचे. मात्र पुढील सर्व कार्यक्रमात उपस्थित असावयाचे ही गोष्ट माझे गुरुवर्य विष्णुशास्त्री खरे (वेदांत विद्यापीठ, सातारा) यांनी मला सांगितलेली आहे. श्री. खरेशास्त्री, श्री. कवीश्वरशास्त्री धारवाडला न्याय शिकत असताना तिथे होते आणि नंतर पुण्याला शंकराचार्य मठात त्यांच्याजवळ ५-६ वर्षे न्याय शिकलेलेही आहेत.

४) धर्मश्रद्धाप्रसार :- प. पू. श्रीकवीश्वरगुरुजी बालमुकुंन्द संस्कृत महाविद्यालयांत शिकवत असताना १९५८ जुलै-ऑगस्टचा लक्षणीय अनुभव. पाठाच्या वेळी एक-दोन दिवसाआड मंहतांचा चमत्कार विश्वसनीय पुराव्यानिशी सांगायचे. 'अमुक सत्पुरुषांचे अमुक वंशज, शिष्य किंवा अनुगृहीत अमुक अमुक ठिकाणी असतात' जणू काय तेथे गेल्यावर लोकाना पुरावा मिळेल. मला वाटतें हें साक्षेपी सांगणे हौस किंवा सवय म्हणून नव्हते, तर माझ्या सारख्या अल्पश्रद्ध किंवा अश्रद्ध विद्यार्थ्यांची देवाधर्मावर श्रद्धा बसावी, वाढावी, दृढ व्हावी म्हणून होते. कारण

आजच्या कालांत सामान्य लोकांना पुराव्याशिवाय पटत नसते आणि चमत्काराशिवाय नमस्कार नसतो.

प्रेषक -

दि. ९-३-१९९५ **नारायणशास्त्री सहकारी**

श्री गणेशदत्त गुरूभ्यो नमः

संपादक-धर्मकोश, वाई (सातारा).

श्री गुरूजींचे वात्सल्य

परमपूज्य गुरुवर्य श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांच्या शिष्याविषयीच्या नितान्त वात्सल्याचा मला आलेला अनुभव असा-

इ.स. १९४२ सालांतील ही गोष्ट. त्यावेळीं श्रीकवीश्वरगुरुजी पुण्यास सदाशिवपेठेतील मुंजाबाच्या बोळांत असलेल्या शांकरमठांत अध्यापन करीत होते. त्यावेळी मी काही कारणाने साताऱ्याच्या अद्वैतवेदान्त पीठातून बाहेर पडून पुण्यास गेलो होतो. तेथे शांकरमठांत श्रीकवीश्वरगुरुजींकडे भामती आणि व्यधिकरण या ग्रन्थांचे पाठ सुरु केले होते. पुस्तक आणि पैसा जवळ नसल्यामुळे भामतीचे पुस्तक विकत घेण्यासाठी मी पर्वतीवर एक महिन्याची वर्णी (विष्णु व देवी यांची पूजा) मिळविली होती. पंधरा दिवसांनी मला पर्वतीवरील भयंकर मलेरिया लागला. त्यामुळें पाठामध्ये खण्ड पडला. पंधरा दिवसांनी थोडे बरे वाटू लागल्याने पुनः पाठ सुरु केला. एक दिवस पाठाला गेलों आणि दुसऱ्याच दिवशीं पुनः ताप उलटल्यामुळे पाठाला हजर राहू शकलो नाही. त्यावेळी मी नारायणपेठ पोलीसगेटाजवळ असलेल्या गुलकंदवाले गोखले यांच्या वाड्यात तिसऱ्या मजल्यावर विद्यार्थ्यांसाठी बांधलेल्या खोल्यापैकी एका खोलीत रहात होतो. वर जाण्याचे जिने लाकडी, हलके, अरुंद, उभे आणि एखाददुसरी पायरी मोडलेले होते. वर जाणें क्लेशदायक होते. अशा स्थितीत मी पुनः आजारी झालो असे लक्षात घेऊन दोन दिवसांनी कोठूनतरी माझा पत्ता मिळवून माझ्या समाचारासाठी गुरुवर्य त्या दुर्गम खोलीत येऊन मला धैर्य देऊन गेले. त्याआधी गुरुवर्यांची विद्वत्ता, तपश्चर्या, आणि सौजन्य हे गुण मला श्रवणपरिचित होते तथापि प्रत्यक्ष संबध कधीच आला नव्हता. अशा स्थितीत संबध अत्यल्पकाल आला असतांनाहि प्रकट झालेल्या या उत्कट वात्सल्यवृत्तीने माझ्या चित्तात तेव्हापासूनच गुरुवर्यांविषयीं आत्यन्तिक पूज्यभावना उत्पन्न केली, जी आज परिपक्व झाली आहे.

प्रेषक -

दि. १०-३-१९९५. **गोविन्दशास्त्री केळकर,**

प्रयाग २४१

श्रीदत्तगुरुः शरणम्।

धर्मकोश, वाई, ४१२ ८०३.

श्री कवीश्वरगुरूजींचे अलौकिक दर्शन

१) श्रीमत्परमपूज्य गुरुवर्य वेदान्तविद्यावाचस्पति पंडितप्रवर श्रीदत्तात्रेयशास्त्री कवीश्वरमहाराज यांचे पवित्र दर्शन प्रथम सुमारे इ.स. १९५५ या वर्षी झाले. त्यावेळी मी धारवाड येथें श्रीशंकराचार्य संस्कृत पाठशाळेंत अध्ययनास होतो. श्रीगुरुवर्य पं. श्रीभालचंद्रशास्त्री यांचेबरोबर पुण्यास वेदशास्त्रोत्तेजक सभेच्या साहित्याच्या परीक्षेसाठीं गेलो होतो. पं. भालचंद्रशास्त्रीगुरुजी न्यायशास्त्राच्या परीक्षेंत परीक्षक म्हणून होते. श्रीकवीश्वरगुरुजी धारवाड पाठशाळेतच कै. पं. नागेशशास्त्री उप्पिनबेटगेरी (पं. भालचंद्रशास्त्री यांचे पितृचरण) यांचेकडें न्याय व वेदान्त या दोन्ही शास्त्राचे अध्ययन करण्यास राहिले असून पं. भालचंद्रशास्त्री यांना त्यांनी न्यायाचे काही वरिष्ठ ग्रंथ शिकविले होते. याप्रमाणे पूर्वपरिचय व गुरुत्वाचा संबंध यामुळे श्रीगुरुजी हे पं. कवीश्वर यांचे दर्शनास त्यांचे घरी गेले. त्यावेळी मी त्यांचेबरोबर होतो. त्यावेळी पं. कवीश्वर शनिवारांत ठाकरसी कन्याशाळेसमोर वर्तक यांचे वाड्यात दुसऱ्या मजल्यावर रहात होते. त्यावेळी त्यांचे जे अपूर्व दर्शन झाले त्यांतील वैशिष्ट्य अद्यापिही कायम आहे. प्रसन्न मुद्रा, नैसर्गिक गौरवर्ण त्यांत विद्वत्तेच्या तेजाची झाक, आनंदीवृत्ती, विनयशील, मधुर परंतु अत्यंत स्पष्ट भाषण, करुणापूर्ण नजर, आत्मीयतेचा वर्षाव इत्यादि सर्व श्रीदत्तमहाराजांच्या सानिध्याचे आविर्भाव अंतःकरणाचा ठाव घेणारे आहेत. त्यांचे श्रीमुख पाहतांक्षणींच मनासह तन चरणीं लीन होऊन जाते.

अशी प्रथम दर्शनी झालेली अनुभूति तेव्हांपासून आजपर्यंत अनेकवार घडलेल्या दर्शनांत एकरुप आहे.

२) श्रीकवीश्वरगुरुजी प्रथम नारायणपेठेतील मुंजाबाच्या बोळात असलेल्या श्रीशंकराचार्य मठांत अध्यापक होते. ब्रम्हीभूत श्रीशिरोळकर महाराज असताना तेथे पाठशाळा सुरु होती. ती बंद झाल्यानंतर ते टि. म. वि. मध्ये अध्यापक म्हणून रुजू झाले. मठाकडील प्राप्ती बंद झाली. तरी प्रत्यक्ष सकाळ संध्याकाळ मठांत जाऊन श्रीस्वामीमहाराजांचे दर्शन घेणे त्यांचे चालू होते. मठातर्फे होणाऱ्या कार्यक्रमाची धुरा पं. कवीश्वरांकडेच होती. मठाचे पूर्वीचे वैभव लुप्त झाले, शंकरजयंती वगैरे कार्यक्रमही वर्गणी गोळा करुन होत असत. अशावेळी वेतन नसतानासुद्धा श्री. कवीश्वरगुरुजी पुण्यांत असतानां रोज मठांत जाऊन विचारपूस करीत असत. हा एक कृतज्ञतेचा आदर्श आहे.

३) पं. कवीश्वरगुरुजींना अनेक जगत्गुरुपीठांकडून विद्यासन्मान मिळाले. शासनानेही त्यांचा सत्कार केला. अखिल भारतीय संस्कृत साहित्य संमेलनाने 'विद्यावाचस्पति' ही पदवी अर्पण केली. याप्रमाणे विद्वत्समाजामध्यें मोठें मानाचे स्थान मिळून सुद्धा त्यांचे ठिकाणी असलेली सहजसुंदर नम्रता पाहिल्यानंतर 'विद्या विनयेन शोभते' या सुप्रसिद्ध उक्तिलतेला भरभक्कम आधार देणारा परंतु स्वतःचे अस्तित्व प्रकट न करणारा हा एक विलक्षण महावृक्ष आहे असे वाटते. याचा एक अनुभव असा :- परीक्षेच्या निमित्ताने पुण्यास आल्यावेळी दोन तीन वेळां मी पं. कवीश्वरगुरुजींना भेटलों होतो. त्यानंतर माझ्या बहिणीचे लग्न ठरलें. ते पुण्यांतच होते. औदुंबरहून श्रीगुरुजींना लग्नाचें निमंत्रणपत्र पाठविले होते. दुपारी ११-११॥ च्या सुमारास लग्नसमारंभ झाला. श्रीगुरुजी लग्नास येतील अशी मुळीच कल्पना नव्हती. त्याप्रमाणे ते लग्नास आले नाहीतच. परंतु बहुतेक चार वाजण्याच्या सुमारास ते पत्ता काढून चित्रशाळेजवळ असलेल्या केसकरमंदिराच्या चाळीत आले. त्यावेळीं आम्हा सर्वांस आश्चर्ययुक्त आनंद होऊन धन्यता वाटली. मुहूर्ताच्या वेळीं अपरिहार्य कारणामुळे ते आले नाहीत. नंतर भेटण्यास आले. परिचय तर अगदी किरकोळ होता. तेव्हां माझ्या वडिलांचा व त्यांचा मुळीच परिचय नव्हता. या प्रसंगाने त्यांच्या ठिकाणी असलेल्या साधेपणाची कमाल पाहून विद्या व विनय यांचा दुर्मिळ एकोपा चटका देऊन गेला.

४) धारवाडचे गुरु पं. भालचंद्रशास्त्री यांच्यातर्फे पुष्कळ कर्मकांडाचे आयोजन होत असे. त्यामध्यें प्रवचनाच्या कार्यक्रमाचा समावेश असे. त्यासाठी पं. कवीश्वरांना आग्रहपूर्वक निमंत्रण असे. त्यापैकी एक कथा कर्नाटक व मलबार यांच्या सीमेवरील. अश्वत्थपूर या गावी सहस्रचंडीयागाचे अनुष्ठान होते. त्यासाठी पं. कवीश्वर आले होतेच. मद्रासकडील एक तरुण विद्वान आले होते. ते दक्षिणेंतील प्रसिद्ध अद्वैताचार्य श्री. अप्पयदीक्षित यांचे वंशज होते. हे समजल्याबरोबर पं. कवीश्वरगुरुजीनीं त्यांना साष्टांग नमस्कार घातला. यावेळी गुरुजींचे डोळे आनंदाश्रूंनी भरून आले होते. ते गहिवरले होते. यांतून अद्वैततत्त्वज्ञानावरची निष्ठा प्रकट होतेच. परंतु त्याबरोबर प्राचीन ग्रंथकार श्री. अप्पयदीक्षित यांचेवरील भक्तीचे विलक्षण दर्शन घडते. अध्यात्मविद्येवरील इतकी दृढनिष्ठा व तिची श्रद्धा आणि भक्ती यासह विराजणारी सतत मैत्री अत्यंत दुर्मिळ होय. ही गोष्ट सुमारे इ.स. १९५६ ची आहे.

५) याच अनुष्ठानाच्या समारोपाच्या वेळी पं. कवीश्वगुरुजींचे आशीर्वादात्मक संक्षिप्त परंतु सारगर्भित व भावगंभीर असे भाषण झाले. कर्म, भक्ति, ज्ञान यांचे विवेचन फार सुरेख झाले. 'ज्ञानादेव तु कैवल्यम्' 'सर्व कर्माखिलं पार्थ ज्ञाने

परिसमाप्यते' इत्यादि वचने उद्धृत करुन कर्मकाडांचे तात्पर्य याचे भक्ती ज्ञान याशी संबंध यांचे विवेचन करताना 'कर्म सोडणें योग्य नाही. ते सुटलें पाहिजे. निष्काम कर्माचे फल चित्तशुद्धि आहे. ती झाल्यावर भक्ति, ज्ञान स्वाभाविकपणे अंतःकरणी स्थिर होतेवेळी कर्म सुटतेच. कारण 'ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि' अशी भगवंताची आज्ञा आहे. इत्यादी श्रीगुरुजींचे प्रतिपादन ऐकताना सर्व भाविक श्रोते मंत्रमुग्ध झाले होते.

६) कै. विद्यावाचस्पति आप्पाशास्त्री राशिवडेकर यांचे मी लिहिलेले संस्कृत चरित्र पुण्यांतील शारदा या संस्कृत मासिकांतून प्रसिद्ध झाले. पुस्तकरुपाने ते बाहेर पडल्यावर त्याची प्रत देण्यासाठी मी श्रीगुरुजींच्याकडे गेलो होतो. त्यावेळी शारदा मासिकांत चरित्र वाचल्याचे सांगून त्यांनी माझी फार प्रशंसा केली. त्यामुळे मला लाजल्यासारखे झाले. ईश्वरदत्त भाष्यप्रभुत्व आपल्यास लाभले आहे, वगैरे त्यांची वाक्यें मी आशीर्वाद समजतो. यानंतर देऊळगांवराजा येथे श्रीगुरुजींच्या पितृचरणांचा त्यांच्या भक्तमंडळीकडून मोठा गौरव समारंभ निश्चित झाला. त्यावेळी गौरव समितीतर्फे संस्कृत मानपत्र देण्याचे ठरले. मानपत्र तयार करण्याचे काम श्रीगुरुजींनी मला सुचविले. यथामति केलेली मानपत्रसेवा त्यांना आवडली. कार्यक्रम देऊळगांवराजा येथे झाला. त्यासाठी मला बोलविले होते. परंतु कांही अडचणीमुळे मी जाऊ शकलो नाही. तथापि काही वाक्यपुष्पे त्यांच्या चरणी समर्पित करतां आली याचे समाधान लाभले.

७) श्रीगुळवणीमहाराजांनी श्री. टेंबेस्वामीमहाराजांचे संपूर्ण ग्रंथ छापून प्रसिद्ध करण्याची योजना आखली. त्याकामी श्रीगुरुजींनी सगळा पुढाकार घेतला होता हे प्रसिद्ध आहे. या ग्रंथापैकी श्रीगुरुकाव्यत्रिशती या ग्रंथाचा शब्दकोश तयार करण्याची कामगिरी श्रीगुरुजींचे कनिष्ठ बंधु व माझे पाठशाळामित्र श्री. श्रीपाद कवीश्वर यांच्याकडून माझ्याकडे आली होती. श्रीगुरुजींच्या प्रेरणेनें श्री. टेबेंस्वामीमहाराज व श्री. गुळवणीमहाराज यांची ही अल्पतम सेवा झाली. या विषयीं धन्यता वाटते.

८) श्रीगुरुजींची सत्तरीशांत मोठ्या समारंभाने श्रीवासुदेवाश्रमांत साजरी झाली. त्यावेळी झालेले कर्मकांड, प्रवचने वगैरे कार्यक्रम मी पाहिले आहेत. प्रवचने, व्याख्याने यावेळी श्रीगुरुजीं व्याख्यानपीठावर (स्टेजवर) एका कोपऱ्यांत बसून असत. जणूं या कार्यक्रमासाठी आलेला यःकश्चित श्रोता असावा असे त्यांच्याविषयी वाटावे. सगळ्याच कार्यकलापाचा केंद्रबिंदू श्रीगुरुजी होते. स्वतःकडे अणू इतकाही मोठेपणा न यावा यासाठी केवढी ही खबरदारी! इतर जे गौरवसमारंभ झाले त्यात सुद्धा हाच नमुना. विनयाचा हा आदर्श अनुकरण्यास फार कठीण आहे.

९) श्रीगुरुजींची सहस्त्रचंद्रदर्शनशांति झाली. त्यावेळची ही गोष्ट आहे.या कार्यक्रमासाठीं मी उपस्थित राहू शकलो नाही. माझ्या एका लघुकाय संस्कृत पुस्तकांचे प्रकाशन या समारंभातला एक लहानसा भाग होता. श्रीगुरुजींचे भक्त व माझे मित्र सोलापूरचे प्रा. श्री. राजाभाऊ जोशी यांचे प्रेरणेने मला श्रीकृष्णा नदीवर एक छोटासा प्रबंध संस्कृतांत लिहावा लागला.'कृष्णा विष्णु तनुः साक्षात्' या नावाच्या या पुस्तिकेला श्रीगुरुजींची आशीर्वादात्मक प्रस्तावना आहे. या समारंभाच्या मुदतींतच पुण्यांत मंगलकार्यासाठी आप्तांच्याकडे दोन दिवस माझा मुक्काम होता. पुस्तकप्रकाशन व लेखकाचा (अर्थात माझा) सत्कार दोन तीन दिवसांनी ठरविला होता. पुस्तक छापून तयार होणार होते. मला राहायला सवड नव्हती. तेव्हा मी दुसरे दिवशी संध्याकाळी आश्रमांत गेलो. त्यावेळी वे. धुंडीराजशास्त्री दाते यांचे प्रवचन चालू होते. श्रीगुरुजी एकीकडे बसले होते. त्यावेळी प्रवचन संपल्यानंतर प्रो. राजाभाऊंनी कुरवपूराहून आलेले शाल व धोतर श्रीगुरुजींच्याकडे देऊन मला पीठावर बोलाविले. त्यावेळी श्रीगुरुजींच्या मंगलकरानी माझ्या पाठीवर शालीचे अक्षय कृपेचे आवरण संरक्षण घातले. आशीर्वादाचा हा अपूर्व ठेवा परमकल्याणदायी ठरेल यांत संशय नाही.

श्रीगुरुजीनी प. प. श्रीटेंबेस्वामीमहाराजांचे चरित्र लिहिले आहे. त्यामध्ये 'वीतरागविषयं वा चित्तम्' योगसूत्राचा हवाला देऊन संतांच्या चरित्राचे परिशीलन अंतःकरण निर्मळ करुन उद्धार करीत असते असें चरित्र वर्णनाचे प्रयोजन सांगितले आहे. त्याचप्रमाणे श्रीगुरुजींच्या चरित्र महोदधींतील हे दोन चार बिंदू जीवनाचे सार्थक करणारे व्हावेत अशी प्रार्थना आहे.

प्रेषक

दि. १०-३-१९९५ **वासुदेव नागेश जोशी, औदुंबरकर**

❖ ❖ ❖

ज्या रितीने लोक माझी आराधना करतात त्याच रीतीने मी त्यांच्या इच्छा पुरवितो सगळ्या मार्गानी जाणारी माणसे माझाच मार्ग चोखाळीत असतात.

धन्योद्‌गार

प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या बरोबरीने काम केलेले, त्यांच्या प्रकांड पांडित्याची व ज्ञानाची सखोलता जाणणारे, श्री. प. प. शंकराचार्यांच्या विद्वत्‌सभेत प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या बुद्धी वैभवाचा प्रत्यक्ष प्रत्यय घेणारे, अशा मान्यवर लोकांच्या मुलाखती त्यांच्या भेटीगाठी घेऊन मिळविल्या आहेत. त्यावरून महाराजांच्या शास्त्राभ्यासाची कल्पना तर येतेच परंतु तीव्र स्मरणशक्ती, स्वयंअध्ययन, विचारांची परिपक्वता, सखोलता यांचा प्रत्यय येतो. श्रीमत् शंकराचार्यांनाही त्यांचा गौरव केल्याशिवाय राहवले नाही हे खास वैशिष्ट्य आहे.



पं. रामचंद्रशास्त्री जोशी

वेदान्ताचार्य, संपादक-अखंड भारत मराठी साप्ताहिक. निरनिराळ्या पंडित सभामध्ये सहभाग रामराज्य परिषद या राजकीय पक्षामध्ये सक्रीय सहभाग. पं. राजराजेश्वर शास्त्री द्रवीड, पं. हरिरामशास्त्री शुक्ल यांचेकडे काशीला अध्ययन. जैन न्यास ग्रंथावर, सार्थ मनुस्मृती यावर लिखाण.

प्रकांड पंडित श्रीदत्तात्रयशास्त्री कवीश्वर

पंडित रामचंद्रशास्त्री जोशी यांची भेट घेतली असता त्यांच्या बोलण्यातून प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या जीवनाबद्दल विशेष गोष्टी कळल्या.

१) तार्किक असून परमभक्त २) भारतात होणाऱ्या विविध विद्वत्सभेत भाग घेऊन सिद्ध केलेली अद्वितीयता ३) साहित्यक्षेत्रात दर्शनीय सिद्धातांचा अविष्कार व संशोधन. ती त्यांच्याच शब्दात वाचणे फार महत्त्वाचे. त्यांची खरी योग्यता सामान्य माणसाला नेमकेपणाने थोडीतरी कळावी हा त्यांच्या मुलाखतीचा उद्देश आहे.

प. पू. श्रीदत्तात्रयशास्त्री कवीश्वर यांचे एका शब्दात वर्णन करायचे तर ते प्रयाग क्षेत्राप्रमाणे सर्वथा पूज्य आहेत. प्रयागाला त्रिवेणी संगम असून तेथे स्नान करणाऱ्याला साक्षात स्वर्ग प्राप्ती होते असा वेदांचा आदेश आहे. श्रीक्षेत्र नरसोबाचीवाडी हे शास्त्रीबुवांचे निवासस्थान म्हणजे ती एक गंगा होय. त्यांच्या घराण्यातील तपश्चर्या आणि उपासना ही यमुना होय. स्वतः शास्त्रीबुवांनी बालकालापासून जे अध्ययन केले आणि परविश्वता निष्ठा मिळवली, ती सरस्वती होय. म्हणून शास्त्रीबुवा प्रयाग क्षेत्राप्रमाणे पुण्यवंत झाले आहेत यात तिळमात्र संशय नाही. लहानपणापासून न्याय वेदांतादि दर्शनशास्त्रात त्यांनी केलेले परिश्रम हे अपूर्व आहेत. उत्तम तार्किक असून सुद्धा ते परमभक्त आहेत हा एक फार मोठा योग आहे. शास्त्रीबुवांनी न्याय, वेदान्त, तर्क व भक्ति एकत्र आणून त्याला पूर्णतेचा आकार आणला हे त्यांच्या कतृत्वाचे विशेष रुप आहे. युगायुगात असे पुरुष फार विरळ असतात. आपल्या सर्वांच्या भाग्याने ते आपणास प्राप्त झाले आहेत ही मोठी सुसंधीच मानली पाहिजे. भारतात होणाऱ्या विविध विद्वत्सभेत शास्त्रीबुवांनी भाग घेऊन वेदांत सिद्धांताचे खंडण करुन आपली अद्वितीयता सिद्ध केली आहे. त्यांच्या बरोबर अनेक ठिकाणी मला विद्वत्सभेत जाण्याचा योग आला आणि त्यांच्या या अलौकिक गुणांचा उत्कर्ष मी आपल्या डोळ्यांनी पाहिला आहे. श्रीमद् जगदगुरुशंकराचार्य शिरोळकर स्वामीमहाराज संस्थान संकेश्वर यांनी स्थापन केलेल्या शांकर विद्यापीठातही दर्शनशास्त्राचे अध्ययन त्यांनी केले. तसेच टिळक महाराष्ट्र विद्यापीठातही दर्शनशास्त्राचे अध्ययन त्यांनी केले आहे.

निंबार्कमतावरील भाष्याचा अनुवाद त्यांनी केला आहे. साहित्यशास्त्रात दार्शनिक सिद्धांताचा अविष्कार करणे हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. दर्शनशास्त्रातील कठीण विचार सहज व सुगमरितीने विशद करून त्याला रमणीय रुप देण्याचे चातुर्य शास्त्रीबुवांच्या अंगी आहे हा एक मोठा अलौकिक गुण आहे असे म्हणावे लागते. प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामीमहाराज यांचा त्यांच्यावर कृपाप्रसाद असून त्यांच्याच परंपरेतील प. पू. श्रीगुळवणी महाराज यांच्या प्रेरणेने स्वामीमहाराजांच्या सर्व ग्रंथाचे प्रकाशन व संपादन श्री कवीश्वरशास्त्रींनी केले आहे यावरून त्यांच्या विशिष्ट प्रतिभेचे दर्शन होते.

प्रतिभा ही नवनवोन्मेषशालिनी असते. हा नवा अंकुर जुन्या अंकुराशी सुसंगत असून अधिक रमणीय करणे हे शास्त्रीय प्रतिभावंताचे काम आहे. हे कार्य शास्त्रीबुवांनी जन्मभर केले त्याबद्दल त्यांना शतशः प्रणाम करणे आवश्यक आहे. लेखनाबरोबरच प्रवचनाचेही फार मोठे सामर्थ्य त्यांचेकडे आहे. विशेषतः श्रीमद्भागवत या ग्रंथावर त्यांचा व्यासंग फार असून विद्यावतो भागवते परीक्षा या वचनाप्रमाणे त्यांनी भागवत ग्रंथात उत्तम प्राविण्य संपादन करून विद्यावंतामध्ये सतत अग्रक्रम मिळविला आहे हे एक त्यांचे वैशिष्ट्य आहे. प्रवचन शक्ती, तपश्चर्या शक्ती व लोकांना समजावून सांगण्याची युक्ती या तीनही गोष्टींचा संबंध पंडित कवीश्वर शास्त्री यांचेकडे आहे.

दुर्बोध तत्वज्ञान सुबोध रितीने सांगण्याचे काम ते करीत आहेत. भागवतातील एखादी कथा असो किंवा शांकर भाष्याचा पाठ असो दोनही गोष्टी इतक्या उत्तम रितीने ते विषद करतात की त्यामुळे पाठ शिकणाऱ्या विद्यार्थ्याला किंवा प्रवचन ऐकणाऱ्या श्रोत्यांना कंटाळा तर कधी येतच नाही. शास्त्रीबुवांचे प्रवचन झाल्यावर आपण एका मोठ्या महातीर्थात स्नान करून पुण्यसंपादन करून बाहेर पडत आहो असे वाटते. असे अनेक श्रोते सर्व भारतात आज आहेत. महाराष्ट्रात तर आहेतच पण काशीसारख्या क्षेत्रातही आहेत.

पंडित कवीश्वरशास्त्री यांचा सत्कार विद्वतग्रणी म्हणून करण्यात आला हे एक मोठे भूषण आहे. शासनालासुद्धा या विद्वत्तेजाला राष्ट्रीय पंडित ही पदवी दिल्याचाचून त्या पदवीचे सार्थक होणार नाही असे वाटले म्हणून त्यांनी शास्त्रीबुवांना राष्ट्रीय पंडित ही पदवी दिली. काही लोकांना पदवीमुळे मोठेपणा येतो तर काही लोकांना पदवी दिल्यामुळे पदवीचे महत्त्व वाढते. यात दुसऱ्या क्रमांकात शास्त्रीबुवा बसतात हे ध्यानात येणे आवश्यक आहे. आपल्या जीवनात अत्यंत शुचिता आणि निस्पृहता धारण करून आपली जीवनयात्रा आजच्या कठीण काळात व्यतीत करणे हे मोठे कठीण आहे. पण ते कार्य पंडित कवीश्वर लीलेने करीत आहेत हे त्यांचे वैशिष्ट्य ध्यानात घ्यावे लागते. त्यानी कधीही कोणाची याचना केली नाही. पण

कोणत्याही गोष्टीची उणीव त्यांचेजवळ नाही. यावरून खरोखरच भगवंताचा कृपाप्रसाद त्यांचेवर आहे म्हणूनच ते निष्ठेने आपले जीवन व्यतीत करीत आहेत.

पं. कवीश्वरशास्त्री यांचे संबंधी कितीही लिहिले तरी शब्द कमी पडतील एवढी तपश्चर्या त्यांनी केली आहे.

पं. रामशास्त्री जोशी यांना मुद्दाम प्रश्न विचारला होता की विद्वत्सभेत त्यांचा गौरव शंकराचार्यांनी केला किंवा विद्वत्सभेत त्यांच्या वाक्चातुर्याने सर्वांना थक्क केले असे सांगण्यात येते. परंतु सामान्य माणासाला त्यातील महत्त्वाचा भाग कळत नाही व तो कळावा अशी जिज्ञासा असते. आपण असे प्रसंग सांगू शकाल का? तेव्हा त्यांनी दोन प्रसंग सांगितले आहेत.

तत्तुसमन्वयात

कांची कामकोटी श्रीमद् जगदगुरु शंकराचार्यस्वामीमहाराज यांनी भरवलेल्या एका पंडित सभेत तत्तुसमन्वयात या सूत्रावर विचार चालला होता. तत्तुसमन्वयात् हे ब्रह्मसूत्रातील प्रसिद्ध चतुःसूत्रीपैकी चवथे सूत्र आहे. १) अथातो ब्रह्मजिज्ञासा, २) जन्माद्यस्य यतः, ३) शास्त्रयोनित्वात्' अशी पहिली तीन सूत्र आहेत. थोडक्यात ब्रह्माविषयी जिज्ञासा केली जात आहे, ज्यापासून जगाची उत्पत्ति इत्यादि होतात ते ब्रह्म ते शास्त्रमूलक म्हणजे श्रुतींनी सांगितले आहे असे सांगितल्यावर चौथ्या सूत्राने सर्व श्रुतींचा समन्वय म्हणजे सर्व वेदान्त वाक्यांचे तात्पर्य ब्रह्माच्याच ठिकाणी आहे असे सांगितले आहे. या सूत्रावरील शंकराचार्यांच्या भाष्यात वेगवेगळ्या दार्शनिकांची मते उद्धृत केली आहेत.

विविध पंडितानी खूप विवेचन केले. परंतु अपरेतु तेथे अपर शब्दानी कोणाचा परिग्रह करावयाचा या संबंधात संतोषकारक विवेचन कोणीही करू शकले नाही. त्यावेळी अपर शब्दानी बोधायनचा परिग्रह करावा. हे बोधायन विशिष्ट अद्वैत मताचे असून पूर्वोत्तर मीमांसा एकरुप आहेत असे मानणारे आहे हे जेव्हा पंडित कवीश्वरशास्त्रींनी सांगितले तेव्हा सर्वांनाच आनंद होऊन सर्वांनी त्यांची प्रशंसा करून श्रीमद शंकराचार्यानी त्यांचा सत्कार केला हा प्रसंग खरोखरच फार आनंदाचा होता. गुरूजींनी स्पष्ट केले कीं, विशिष्टाद्वैत मतानुसार ब्रह्मसूत्रावर रामानुजाचार्यांनी भाष्य लिहीले ते श्रीशंकराचार्यांच्या नंतरच्या काळात. परंतु बोधायन श्रीशंकराचार्यांच्या पूर्वी होऊन गेले. त्यांनी विशिष्टाद्वैत मतानुसार ब्रह्मसूत्रावर वृत्ती लिहीली आहे. टीकाग्रंथांमध्ये त्यांचा 'वृत्तिकार' असा उल्लेख केला जातो. नामशः उल्लेख मिळत नाही. संप्रदायपूर्वक सूक्ष्म अध्ययन व सखोल चिंतन असेल तरच या गोष्टी लक्षात येतात. गुरुजींच्या जवळ हे दोन्ही असल्यानेच त्यांना विद्वन्मान्यता मिळाली.


श्रीमद् जगदगुरु शंकराचार्यमहाराज श्री निरंजन देवतीर्थ गोवर्धन पिठाधीश्वर यांनी अकोला येथे (वऱ्हाड) विद्वत् परिषदेमधे वेदांच्या अपौरुषेयाबद्दल विचार केला असताना पंडित कवीश्वरशास्त्री यांनी जे विचार मांडले ते खरोखरच अद्वितीय व प्रशंसनीय होते. प्रत्यक्ष इंद्रियांनी न दिसणारी गोष्ट अनुमानाप्रमाणे म्हणजे एखादा हेतु देऊन सिद्ध केली जाते. जसे पर्वतावर अग्नि आहे, धूम आहे म्हणून, येथे धूम या हेतूने अग्नि सिद्ध केला जातो. अनुमानातील हा हेतू दोषरहित असावा लागतो. विरोध, बाध, असिद्धि इत्यादि हेत्वाभास म्हणजे दोष असले तर हेतु योग्य ठरत नाही. हेत्वाभासरहित म्हणजे निर्दोष असा हेतुच साध्य सिद्ध करायला कारण होऊ शकतो. त्याचप्रमाणे वेदांचे अपौरुषेयत्त्व सिद्ध करण्यासाठी 'पुरुषेदोषरहितत्व' हे प्रयोजक कारण आहे. पुरुषाने म्हणजे मानवाने निर्माण केलेल्या कृतीमध्ये भ्रम, प्रमाद, विप्रलिप्सा म्हणजे फसवणूक, करणापाटव म्हणजे इंद्रियांची अपुरी शक्ति इत्यादि दोष असण्याची शक्यता असते. वेदांमध्ये अशा प्रकारचे कोणतेही दोष दिसत नाहीत. वेद अपौरुषेय आहेत हे सिद्ध करण्यासाठी मोठमोठे विद्वान वेगवेगळ्या युक्तिप्रयुक्ति मांडत असतात. त्यावर मतभेद होऊ शकतात. 'पुरुषदोषरहितत्व' या गुरुजींनी दिलेल्या कारणाचे मात्र कोणालाही खंडन करता आले नाही. सर्व पंडितांनी ते मान्य केले. यावरून गुरुजींचे शास्त्रांवरील प्रभुत्व स्पष्ट होते.

हे दोनही प्रसंग श्री जोशीशास्त्रीनी स्वतः पाहिलेले आहेत त्यामुळे त्यांच्या विद्वतेबद्दल आणि प्राचीन शास्त्रनिष्ठेबद्दल अत्यंत आदरभाव ध्यानात घेऊन त्यांच्या सारख्या विभूतीची पूजा, सेवा, स्मरण हे सतत केले तर आजही आपला उद्धार झाल्यावाचून राहणार नाही अशी ही दिव्य विभूती आहे.

पंडित रामशास्त्री जोशी यांनी प. पू. श्रीदत्तमहाराजांबद्दल ज्या आठवणी सांगितल्या, त्यांच्या विद्वत्तेबद्दल, गाढ अभ्यासाबद्दल, त्यांच्या अनेक वैशिष्ट्याबद्दल जे आदरपूर्वक उद्गार काढले त्यावरून प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या सागरासारख्या मनाने विशाल व ज्ञानाने खोल अशा व्यक्तिमत्वाची कल्पना येते व फार आनंद वाटतो. इतके दिवस आपण ते पंडित आहेत, विद्वान आहेत असे फक्त ऐकत होतो पण या चरित्राच्या निमित्ताने त्यांच्या अलौकित्वावर प्रकाश पडला आहे.

एकांत प्रिय हो. सदा सावध राहण्याचा प्रयत्न कर आणि अविरतपणे माझे चिंतन करीत रहा.

भगवान श्रीकृष्ण



पं. गणेश शास्त्री द्रविड

पंडित राजराजेश्वरशास्त्री द्रवीड यांचे चिरंजीव. न्याय वेदांत व वेद यांचे अध्ययन, सध्या काशी येथिल सांगवेद विद्यालयात अध्यापन, सर्व भारतातील विद्वत्सभांमध्ये, पंडित परिषदांमध्ये सहभाग. तसेच निरनिराळ्या सनातन चळवळी मध्ये सहभाग. काशी विश्वेश्वराचे मंदिरातील सुव्यवस्थेसाठी सहा दिवस उपोषण केले होते.

दुर्लभ, चतिर्विध भद्र श्रीदत्तमहाराज

नम्रत्वेनोन्नन्तः परगुणकथनैः स्वान गुणान ख्यापयन्तः
स्वार्थान् सम्पादयन्तो वितत बहुतरा रम्भैयन्त्यः परार्थे
क्षान्तौवाक्षे परक्षा क्षरमुख मुखान् दुर्जनान् दुःखयन्तः
सन्त साश्वर्यचर्या जगति बहुमतः कस्य नाभ्यर्चनीयाः

सत्पुरुषांना नम्रतेनेच गर्व वाटतो. इतरांच्या गुणांचे वर्णन करताना स्वतःच्या गुणांकडे त्यांचे लक्ष नसते. इतरांच्या कल्याणासाठी प्रयत्नशील राहणे हाच त्यांचा स्वार्थ असतो. आपल्या कठोरपणाने व वाचाळपणाने सत्कार्यात विक्षेप आणणाऱ्या दुष्टदुर्जनाना असे सत्पुरुष क्षमाशील राहूनच पश्चातापाचे तीर्थात शुद्ध करतात. पश्चाताप हेच दुःख त्यांना देतात. जगन्मान्य सत्पुरुषांचे असे हे आचरण असते.

वरील श्लोकात केलेल्या वर्णनाप्रमाणे पूज्यपाद श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचे चरित्र अनुभवात आल्याने त्यांच्याविषयी मला अत्यंत आदर आहे. आमचे पूज्य पितृचरण पंडित राजराजेश्वरशास्त्री द्रवीड सांगत असत की प. पू. श्रीदत्तमहाराजांचे पूर्वज नित्य औदुंबरक्षेत्रात भगवान श्री दत्तात्रयांच्या सेवेनंतरच अन्न-जलग्रहण करीत होते. त्यांच्या तपाने प. पू. श्रीदत्तमहाराजांत उत्कृष्ट विद्वता आणि सदाचार संपन्नता साहजिक रुपाने प्राप्त झाली.

प. पू. श्रीदत्तमहाराज प. पू. श्रीगुळवणीमहाराजांबरोबर काशीत आले असताना श्री वल्लभ राम शालिग्राम सांगवेद विद्यालयात त्यांच्या सत्कार प्रसंगी न्यायसार्वभौम श्री हरिरामशास्त्री शुक्लांनी आपल्या भाषणात गौरवाने सांगितले. की प. पू. श्रीदत्तमहाराज व प. पू. श्रीगुळवणीमहाराज दोघेही समान आहेत.

व्यसनानि सन्ति बहुशो व्यसनद्वयमेव केवलं व्यसनम्
विद्याभ्यसनं व्यसनं ह्यथवा हरिपादसेवनं व्यसनम्

या श्लोकात सांगितल्याप्रमाणे कवीश्वरमहाराजांत विद्याभ्यसनं व्यसनं हे दिसते आणि गुळवणीमहाराजांत हरिपादसेवनं व्यसनम् हे दिसते.

मी त्यावेळी लहान असल्याने तितके स्पष्ट आठवत नसले तरीही एक खात्रीलायक आठवण देतो.

सांगवेद विद्यालयात श्री काशीराज विभूति नारायणसिंह बहादूर यांच्या सानिध्यात आमच्या वडिलांच्या उपस्थितीत काशी क्षेत्रातील विशिष्ट विद्वानांच्या सभेत प. पू. श्रीगुळवणीमहाराज व प. पू. श्रीदत्तमहाराज यांचा सत्कार समारंभ झाला होता. १९७६ मध्ये गाणगापूरला जात असताना पुण्यात श्री वासुदेव निवासात आमच्या वडिलांनी मुक्काम केला होता. त्यावेळी श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनाचा लाभ मिळाला. त्यावेळीही त्यांची परम विनम्रता पाहून आम्ही देखील चकीत झालो. गाणगापूर यात्रा प्रसंगी आमच्या वडिलांचा पं. राजराजेश्वरशास्त्रींचा सत्कार गाणगापूरला झाला होता. वडिलांना अर्पण केलेल्या मानपत्राची रचना प. पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वर महाराजांनी केल्याचे ऐकले होते. वडिलांबरोबर अशावेळी चर्चा होत असे. त्यावेळी श्रीदत्तमहाराजानी कारणत्व या विषयावर चर्चा केल्याचे स्मरते. उडपीच्या सभेत हा विषय आला होता असे स्मरणपूर्वक सांगितले त्याचे आश्चर्य वाटले. विद्या विनयेन शोभते यांचे मूर्तीमंत उदाहरण कवीश्वरमहाराज आहेत, असे आमचे वडील नित्य म्हणत असत. गुरुकृपा व ईश्वरकृपा यायोगे कवीश्वरमहाराजांचे जीवन असे विनम्र झाले आहे अशी आमच्या वडिलांची दृढ धारणा होती. वडील सांगत असत की,

यस्य देवे परा भक्तिर्यथा देवे तथा गुरौ।
तस्येते कथिता ह्यर्थाः प्रकाशन्ते महात्मनः ।।

असे उपनिषदात सांगितले आहे. ज्यांची देवावर तशीच गुरुंवर दृढ भक्ती असते अशा महात्म्यांना हे उपनिषदांतील गूढार्थ कळतात. गूढार्थ प्रकाश गुरुकृपेनेच होतो. नुसता वाच्यार्थ करून त्याचा फायदा नाही.

प. पू. श्रीकृष्णाश्रम स्वामी महाराज (श्री गणपती शास्त्री हेब्बार) हे कवीश्वर महाराजांविषयी वर्णन करीत असताना सांगत असत की कवीश्वर महाराजांत ''यः क्रियावान् स पण्डितः हे दिसून येते. त्यांच्याच भीमरथ शांतीच्या वेळी न्यायसभेत सिद्धांत लक्षणातील एका परिष्कराचा नीट समन्वय मला करता आला नाही. त्यावेळी माझा निग्रह न करता ''जानन्नपि ही मेधावी जडवल्लोक आचरेत्'', ही त्यानी भूमिका घेतली.

श्री वैदिक सिद्धान्त संरक्षिणी सभा द्वारा रचित भारत वर्ष की गौरवमयी सती प्रथा या ग्रंथातील काही भाग श्रीकवीश्वरमहाराजांना मी ऐकविला होता. त्या वेळी ते अत्यंत प्रसन्न झाले. विदिशा निवासी श्री. रामशास्त्री लोकरे दर्शनास आले असताना त्या ग्रंथासाठी केलेल्या परिश्रमाविषयी आणि त्याच्या महत्वाविषयी प्रशंसा केली होती.

दर्शन शास्त्रात येणाऱ्या 'प्रथमाह्निकम' 'द्वितीयाहिकम' इत्यादी शब्दांचा वास्तविक अर्थ श्री कवीश्वरमहाराजांनी आम्हाला आपल्या प्रश्नात्मक विवेचनात सांगितला आहे की,

दानं प्रियवाक्सहितं, ज्ञानमगर्वं, क्षमान्वितं शौर्यम् ।
वित्तं त्यागसमेतं, दुर्लभमेतच्चतुर्भद्रम् ।।

कोणाला दान देताना गोड शब्दात आदरपूर्वक द्यावे. आत्मप्रौढीने तुच्छता दाखवून उपकार करीत असल्यासारखे देऊ नये. ज्ञान असावे पण ज्ञानीपणाचा गर्व नसावा. शौर्याबरोबर क्षमाशीलता ही असावी. संपत्ती मिळवावी पण त्याचा त्याग करण्याची मनाची तयारी हवी. कल्याणकारक चार गोष्टी सहज साध्य नाहीत. प्रयत्न पूर्वक त्या मिळवाव्या लागतात.

वरील श्लोकात वर्णित दुर्लभ चतुर्विध भद्र श्री कवीश्वरमहाराजात पाहण्यास मिळते. प्रत्येक व्यक्तीतील चांगला गुणच त्यांना दिसतो व प्रत्येक व्यक्तीच्या कार्याबद्दल त्यांना आत्यंतिक तळमळ दिसून येते. श्री काशीविश्वनाथ मंदिराच्या सुव्यवस्थेसाठी दोन एक वर्षापूर्वी आम्हाला प्रायोपवेशन करावे लागले. त्याचे श्री कवीश्वर महाराजांना फार दुःख झाले आणि त्यांनी खेदानी भरलेले पत्र पाठविले हे त्यांचे दुःख जणू प्रत्यक्ष शिवगुरुनाच झालेले दुःख आहे असे आमच्या मनास वाटले. असा आधार कुठल्याही कामात त्यांचा लाभत असतो.

इतक्या दूरवर काशी क्षेत्रात जरी असलो तरी आम्हाला आदरणीय विद्वानांविषयी ज्यावेळी स्मरण किंवा नोंद करण्याचा प्रसंग येतो त्यावेळी श्री कवीश्वर महाराजांचे नाव अग्रगण्य असते. चर्चा करीत असताना शास्त्रीय सिद्धांताविषयी त्यांचे व आमचे कोणत्याही प्रसंगात मतभेद झाले नाहीत. वंचना करण्याची वृत्ती नसल्यामुळे कठीण विषयात प्रामाणिक निर्णय घेत असताना त्यांचा फार उपयोग होतो. श्री कवीश्वरमहाराज हे सत्पुरुष आहेत अशी आमची दृढ निष्ठा आहे. गुजराथ व काशीमध्ये त्यांची तशीच प्रसिद्धी आहे.

यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा।
तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंशसम्भवम् ।।

या भगवद्गीता वचनाप्रमाणे श्री कवीश्वर महाराजात ऐश्वर्य दिसत असल्याने ते ईश्वरांश सम्भूत आहेत. अशा दिव्य विभूतीचे सान्निध्य आपणास सर्वदा लाभावे. त्यासाठी भगवान श्रीकाशीविश्वेश्वर आणि जगदंबा अन्नपूर्णा त्यांना आरोग्य आणि दीर्घायुष्य प्रदान करोत ही भगवत् चरणी नम्र प्रार्थना आहे..

मार्गशीर्ष शुक्ल ७ विक्रम संवत २०५१. **पं. गणेशशास्त्री द्रवीड.**

* * *



डॉ. चिं. ग. काशीकर,

डॉ. चिं. ग. काशीकर, विख्यात संस्कृत पंडित म्हणून प्रसिद्ध. संस्कृत विषयात त्यानी महाराष्ट्र टिळक विद्यापीठ व पुणे विद्यापीठाची डी.लीट. पदवी मिळाली आहे. संस्कृत शब्दकोषाचे संपादक. अनेक ठिकाणी विद्वत्तापूर्ण भाषणे, असंख्य मौलीक लेख, राज्य, केंद्र व आंतरराष्ट्रीय पातळीवरील अनेक समित्यात सहभाग.

ज्ञान गंगेतील लव्हाळे

प्रियप्रायाः वृत्तिर्विनयमधुरो वाचि नियमः
प्रकृत्या कल्याणी मातिरनवगीतः परिचयः।
पुरो वा पश्चाद्वा तदिरमविपर्यासितरसं
रहस्यं साधूनामनुपधि विशुद्धं विजयते।।

भवभूतीच्या उत्तररामचरित्र या प्रसिद्ध संस्कृत नाटकाच्या दुसऱ्या अंकाच्या आरंभी जन्मस्थानाची वनदेवता वसन्ती आणि तापसी यांचा संवाद आहे. वनदेवतेने स्वागत केल्यानंतर त्या स्वागताचा स्वीकार करताना आत्रेयी सत्रवृत्त साधूंचे आंतरिक आणि बाह्यस्वरूप वर्णन करते. सत्पुरुष अत्यंत कनवाळू असतात. ते कमी बोलतात. त्यांच्या वाक्संयमामध्ये, त्यांच्या विनयशील वृत्तीमुळे एक प्रकारचे माधुर्य विलसत असते. त्यांची प्रकृती इतरांचे कल्याण चिंतणारी असते. त्यांचे चारित्र्य अत्यंत विशुद्ध असते. अशा सज्जनांचे आचरण निरपवादपणे निर्दोष आणि पवित्र असते.

या श्लोकात वर्णन केलेली सज्जनांची लक्षणे श्रीदत्तमहाराजांना पूर्णपणे लागू पडतात. कुणाच्या मनात अशीही कल्पना येईल की भवभूतीने हे वर्णन दत्तमहाराजांचे स्वरूप डोळ्यांपुढे ठेवून तर केले नसेल! उपनयनानंतर त्यांनी नृसिंहवाडीला अध्ययन केले. न्याय-वेदान्तातील उच्च अध्ययन धारवाडला पं. नागेशशास्त्री उप्पिनबेट्टीगिरी यांच्याकडे झाले. अन्य शास्त्रातील प्रकरण ग्रंथांचेही अध्ययन त्यांनी केले. पुण्याला आल्यानंतर संकेश्वर करवीर पीठाच्या शंकराचार्यांच्या संस्कृत पाठशाळेत त्यांनी अध्यापनाला आरंभ केला. त्यांचे पुण्याला आगमन झाले तेव्हापासून त्यांच्याशी थोडाबहुत परिचय झाला होता.

सन १९२१ मध्ये पुणे येथे स्थापन झालेल्या टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने सन १९४७ मध्ये स्थापन केलेल्या आपल्या संस्कृत महाविद्यालयात प्राचीन परंपरेला अनुसरून शास्त्रांचे अध्यापन करण्याचा उपक्रम केला. विद्यार्थ्यांसाठी निवास भोजनाची विनामूल्य व्यवस्था करून संस्कृत पंडित निर्माण करण्याचा विद्यापीठाचा

उद्देश होता. या विद्यालयात महाराजांनी न्याय-वेदान्ताचे अध्यापन करावे असे त्यांना सुचविण्यात आले. महाराजांनी ही विनंती मान्य केली. या विद्यालयाला आरंभापासून श्रेष्ठ विद्वान अध्यापकांची जोड मिळाल्यामुळे त्याला एकदम प्रतिष्ठा प्राप्त झाली. सकाळी तीन तास आणि दोन प्रहरी तीन तास याप्रमाणे अध्यापन चालत असे. वीस-बावीस वर्षे महाराजांनी विद्यापीठात अध्यापन केले. ब्रह्मसूत्रावरील निम्बार्कभाष्याचा टिपणीसह विस्तृत मराठी अनुवाद त्यांनी केला. तो विद्यापीठाने प्रकाशित केला. या काळात त्यांच्या हाताखालून जे विद्यार्थी गेले ते आजही त्यांच्या कुशल अध्यापनाचे आणि सात्विक भावाचे आदरपूर्वक स्मरण करतात.

विद्यालयाचा अभ्यासक्रम, त्याचे व्यवस्थापन इत्यादि निमित्ताने माझा विद्यालयाशी संबंध होता. काही निमित्ताने विद्यापीठात जाणे होत असे. तेव्हा श्रीमहाराजांची मधूनमधून भेट होत असे. संस्था म्हटली की नियम, शिस्त वगैरे गोष्टी आल्याच. तथापि त्यासंबंधी महाराजांनी कधीही अरुचि व्यक्त केली नाही. या काळात त्यांचा प. पू. श्रीगुळवणीमहाराजांशी निकटचा संबंध प्रस्थापित झाला होता. एकावर्षी श्रीगुळवणीमहाराजांचा काही समारंभ साजरा झाला होता. त्यानिमित्ताने आश्रमातर्फे विद्वानांचा गौरव करण्याचे ठरविण्यात आले होते. समारंभ झाल्यानंतर एके दिवशी स्वतः महाराज माझ्या घरी आले, आणि मानाचे वस्त्र त्यांनी मला दिले ते इतक्या नम्रभावाने की मी पराकाष्ठेचा संकोचून गेलो. निगर्वीपणाचा, निरंहकाराचा महाराजांचा भाव तेव्हापासून माझ्या अंतःकरणावर पक्का ठसला आहे.

महाराजांची सहस्त्रचंद्रदर्शन शांती वामननिवासात मोठ्या प्रमाणात साजरी केली गेली. आठवडाभर अनेक कार्यक्रम झाले. मुख्य समारंभात 'प्रसन्न पारिजात' या नावाचा गौरवग्रंथ महाराजांना अर्पण करण्यात आला. अनेकांचे विविध विषयांवरील लेख त्यात समाविष्ट करण्यात आले आहेत. मी त्यात 'वेद-वेदांता- संबंधी थोडेसे' लिहिले आहे. समारंभात महाराजांच्या गौरवार्थ अनेकांची भाषणे झाली. मलाही त्यावेळी दोन शब्द बोलण्याची संधी मिळाली.

पुढे माझ्या मुलांनी माझी सहस्त्रचंद्रदर्शनशांति करण्याचे ठरविले. त्याप्रसंगी प्रथम महाराजांचे पूजन करावे असे माझ्या मनात आले. आश्रमात महाराजांची भेट घेऊन मी त्यांना समक्ष विनंती केली ती त्यांनी आनंदाने मान्य केली. नियत वेळी त्यांचे आगमन झाले. त्यांचे पूजन आम्ही करणार त्या आधी स्वतः महाराजानीच महावस्त्र माझ्या अंगावर घातले. महाराजांच्या या उदार वृत्तीने मी सद्गदित झालो. त्यांनी हा माझ्यावर अनुग्रह केला अशी माझी भावना झाली. निमंत्रितांच्या उपस्थितीत आम्ही महाराजांचे पूजन केले. माझा संकल्प पूर्ण झाल्याचे समाधान मला लाभले.

महाराजांनी पंचाऐंशीव्या वर्षात प्रवेश केला त्यावेळी पुणे येथे झालेल्या समारंभातही त्यांचेबद्दल दोन शब्द बोलण्याची संधि मला पुनः मिळाली. जेव्हा जेव्हा आश्रमात महाराजांच्या भेटीला जाण्याचा योग येतो त्या त्या वेळी महाराजांचा सात्विक भाव उत्कटत्वाने जाणवतो. विद्वत्तेला विनयाची जोड महाराजांच्या ठिकाणी दिसते ती अतिशय दुर्लभ आहे. विनय मधुरो वाचि नियमः हे सत्पुरुषांचे लक्षण भवभूतीने सांगितले त्याचे महाराज हे आदर्श उदाहरण आहेत.


महाराजांचे जीवन ही ज्ञानगंगेची उपासना आहे. ज्ञानगंगेच्या प्रवाहात ते अखंड अवगाहन करीत आहेत. प्रवाहाच्या तीराला लव्हाळे असतात. त्याना प्रवाहाचे नित्य सान्निध्य तर घडतेच त्याचबरोबर ते विनम्र राहून प्रवाहाच्या वेगाने वाहून न जाता नित्य गंगेचे पान करीत राहतात. असे लव्हाळे होण्याचे भाग्य फार थोड्यांना लाभते. महाराज त्या मार्गाचे मेरुमणी आहेत.

भगवत्गीतेच्या प्रत्येक अध्यायाचे काही वैशिष्ट्य आहे. ज्ञानविज्ञानयोग या नावाचा जो सातवा अध्याय आहे त्यात विज्ञान आणि ज्ञान या दोहोंचे स्वरुप विशद केले आहे. चार प्रकाराचे लोक ईश्वराची उपासना करतात. आर्त, जिज्ञासू, अर्थार्थी आणि ज्ञानी या सर्वांमध्ये ज्ञानी हा श्रेष्ठ आहे आणि तो मला आवडतो असे भगवंतांनी म्हटले आहे. ज्ञानाचे स्वरुप त्या त्या प्रसंगाने गीतेत विशद केले आहे. ईश्वरी साक्षात्कार झालेल्या पुरुषांची नावे आपण वाचतो. असे काही सत्पुरुष आजच्या अवलोकनात असू शकतात. काही सत्पुरुषांचे बाह्य जीवन बाल, उन्मत्त किंवा पिशाच यांच्यासारखे असते. काही सत्पुरुष लौकिक जीवनामध्ये विज्ञानाचा व्यासंग करून आणि ज्ञान संपादन करून काही विशिष्ट उपासनेच्या द्वारे साक्षात्काराचा अनुभव घेतात. त्यांच्या त्या योग्यतेची प्रचीती त्यांच्या संपर्कात आलेल्या साधकांनाच येऊ शकते. श्रीदत्तमहाराजांच्या शिष्यवर्गाची अशी भावना झालेली असली तर ती उचितच आहे, अशा पराकोटीला पोचलेले सत्पुरुष सुख-दुःख, प्रवृत्ति-निवृत्ती, ज्ञान-अज्ञान इत्यादि द्वद्वांच्या पलीकडे पोचलेले असतात. हेच चिदानंदरुप शिवाशी तादात्म्य होय.

नभ पतन्त्यात्मसमं पतमिणाः

१-१८-१३ श्री. मद्भागवत

पक्षी आपल्या शक्तीप्रमाणेच अनंत असलेल्या आकाशात उडत असतात.



श्री. वा. ल. मंजूळ

श्री. वा. ल. मंजूळ, हे भांडारकर संशोधन संस्थेत काम करीत आहेत. त्यांचा व प. पू. श्रीदत्तमहाराजांचा जुना परिचय, त्यांचा अनुभव.

वेदान्ती, व्यासंगी पंडित प. पू. श्रीदत्तमहाराज


ऐंशी वर्षे पूर्ण झाल्यावर महाराजांच्या गौरवाचा एक आठवड्याचा एक मोठा समारंभ पुण्यात झाला. या समारंभाच्या निमित्ताने त्यांना एक गौरव ग्रंथ समार्पित करण्याचे चाहते मंडळीने ठरविले. विशेषतः प्राचार्य दि. ब. केरुर आणि पंचांगकर्ते श्री. दाते यांचा पुढाकार होता. समितीचा सचिव म्हणून प्रा. केरुर यांच्या मदतीसाठी मला घेतले. ऐनवेळी प्रा. केरुरना हॉस्पिटल मध्ये दाखल करावे लागल्याने गौरव ग्रंथाचे सर्व काम मला पहावे लागले. मी सुचविल्याप्रमाणे विद्वानांच्या अनेक विषयावर संशोधनात्मक लेखांचा यामध्ये समावेश व्हावा असे ठरले. नाव प्रसन्न पारिजात आणि मुखपृष्ठाचे चित्रही माझ्या पसंतीचे ठरविले. या सर्व गोष्टी प. पू. श्रीदत्तमहाराज मान्य करतील की नाही शंका होती. समारंभाआधी त्यांनी ग्रंथ पाहिला आणि कौतुकाचा हात पाठीवर फिरला. धन्य वाटले. सांप्रदायिक किंवा दीक्षित मंडळीपेक्षा माझा त्यांच्याकडे पाहण्याचा वेगळा दृष्टीकोन आहे. मी त्यांना वेदान्ताचे व्यासंगी पंडित म्हणून मानतो. आणि म्हणूनच गौरव ग्रंथाचा विषय केवळ त्यांच्या आठवणी न ठेवता विद्वानांनी त्यांची बांधलेली वाङमयीन पूजा असा होता. प्रकाशनाचा समारंभ आणि लेखकांचा सत्कार हे देखिल माझ्या पद्धतीने ठरविले होते. आंतरराष्ट्रीय कीर्तीचे प्राच्य विद्यापंडित डॉ. रा. ना. दांडेकर समारंभाचे अध्यक्ष होते. पुण्याचे उत्साही जिल्हाधिकारी आणि माझे वर्गमित्र श्री. श्रीनिवास पाटील प्रमुख पाहुणे म्हणून हजर होते. याशिवाय व्यासपीठावर डॉ. चिं. ग. काशीकर, डॉ. अ. म. घाटगे , डॉ. म. अ. मेहेंदळे, पंडीत श्री. वामनशास्त्री भागवत. श्री. एम्. आर्. यार्दी (सेवानिवृत्त आय्. सी. एस्.) डॉ. सरोजा भाटे अशी अधिकारी मंडळी होती. हा संपूर्ण समारंभ आगळा वेगळा झाला. प. पू. श्रीदत्तमहाराजांचा गौरव या विद्वानांनी भरभरुन केला आणि महाराजांनी विनम्रपणे स्वीकारला. सौ. मातोश्रींचाही सत्कार व्यासपीठावर झाला. या निमित्ताने पुण्यातील संस्कृत विद्वान महाराजांना किती मानतात हे लक्षात आले. महाराजांच्या विद्वत्तेचा, आचार संपन्नतेचा आणि कर्तृत्वाचा डॉ. दांडेकरांनी केलेला गौरव आजही आठवतो. मला ही सेवेचा आनंद मिळाला.

मे १९९३ मध्ये पुण्याला अ. भा. प्राच्यविद्या परिषदेचे छत्तिसावे अधिवेशन भरले होते. अधिवेशनाचे अध्यक्ष सुप्रसिद्ध प्राच्यविद्या पंडित, अमेरिकेच्या हार्वर्ड विद्यापीठाचे संस्कृत प्राध्यापक डॉ. इंगॉल्स नियुक्त झाले होते. प्रा. इंगॉल्स यांनी १९५०/५५ च्या सुमारास पुण्यात असताना प. पू. श्रीदत्तमहाराजांचेकडे काही काळ संस्कृतचे अध्ययन केले होते. परिषदेला जोडून भारतातील पारंपारिक संस्कृत पंडितांची एक परिषद आयोजली होती. सुमारे ऐंशी पंडित, तीन दिवसाचे शास्त्रार्थाला उपस्थित होते. अध्यक्ष म्हणून सर्वानुमते प. पू. श्रीदत्तमहाराजांची निवड झाली होती. प्रकृतीची साथ नसतानाही महाराजांनी या सर्व पंडितांचे नेतृत्व आपल्या विद्वत्तापूर्ण भाषणानी केले. सर्व पंडित प्रभावित झाले. प. पू. श्रीदत्तमहाराजांचा गौरव अखिल भारतभर जाऊन पोहोचला. हे सर्व होत असताना महाराजांच्या वागण्यात कोठेही अहंभाव किंवा डामडौल जाणवला नाही. सहजपणे पंडित परिषदेचे नेतृत्व त्यांनी पार पाडले. जर त्यावेळी महाराजांनी आमंत्रण नाकारले असते तर विद्वानांची राजधानी असलेल्या पुण्याची पत गेली असती.

नागपूरचे संस्कृत विद्वान डॉ. गु. वा. पिंपळापुरे यांनी काण्वांच्या शतपथ ब्राह्मणावर बरेच दिवस संशोधन केले होते. त्यावरील दुर्मिळ ग्रंथ त्यांनी क्रमशः प्रसिद्ध करावयाचे ठरविले होते. प्रथम काण्डाचे प्रकाशन श्री वासुदेवाश्रमात त्यांनी घडवून आणले. समारंभाला अर्थातच प. पू. श्रीदत्तमहाराज अध्यक्ष होते. श्री. मंजूळ स्वतः काण्व आणि तेही क्रियाशील असल्याने मी समारंभात सहभागी झालो होतो. या निमित्ताने महाराजांनी मांडलेले विचार एवढे कळकळीचे होते की, एक संस्कृतचा महापंडित अनुपलब्ध वाङ्मयाविषयी इतका अधिकारवाणीने बोलू शकतो याचे आश्चर्य वाटले.

आणखीन एक आठवण. कौटुंबिक दुःखात महाराजांनी केलेले सांत्वन. मार्च १९९३ मध्ये माझा मधला मुलगा चि. अजित, जो मुंबईत मास्टर ऑफ इंजिनियरींग करत होता, अवघ्या सव्वीसाव्या वर्षी अपघाताने मुंबईत गेला. दुःखाचा डोंगर आम्हा सर्वांवर कोसळला होता. सहनशक्तीची परिसीमा झाली होती. पहिल्याच आठवड्यात एक दिवस दुपारी घरी निरोप आला. प. पू. श्रीदत्तमहाराज भेटायला येत आहेत. महाराज आले. 'दुःख फार मोठे आहे. मी सांत्वन करू शकणार नाही. तुम्ही विवेकी आहात. सर्वांना सांभाळा' केवळ २/३ वाक्यात जीवनाचा मूलमंत्र त्यांनी मला ऐकवला. वेदान्त अशावेळी व्यर्थ वाटतो. पण व्यवहारी उपदेश मला खूपच मोलाचा वाटला. थोडासा धीर आला. १०/१५ मिनिटे माझ्यासमोर बसून कृपार्द्र दृष्टीने पाहून महाराज निघून गेले. मी कृतकृत्य झालो. महाराजांचे हे अनपेक्षित प्रेम पाहून मला तशाही दुःखात धन्यता वाटली.





वा. बा. भागवत

महाराष्ट्रातील प्रसिद्ध वैयाकरण, अध्ययन-अध्यापन पारंपारिक पद्धतीने, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, भांडारकर संशोधन संस्था यातून सेवा, अनेक शास्त्रार्थ परिषदा आणि पंडित संमेलनास उपस्थिती. संस्कृत व्याकरणाचे अधिकारी अध्यापक. अनेक शिष्योत्तम. नव्या पिढीत प्रसिद्ध. आदर्श शिक्षक म्हणून गौरव.

मण्डिता वसुधा

अप्रियवचनदरिद्रैः प्रियवचनाढ्यैः स्वभाग्यपरितुष्टैः।
परपरिवादनिवृत्तैः क्वचित्क्वचिन्मण्डिता वसुधा।।

बहुविधजनसंकुला इयं वसुधा क्वचिदेवास्मिन् भर्तृहरिसुभाषिते उपवर्णितैः गुणैः उपलक्षितैः पुण्यपुरुषैः मण्डिता भवतीति प्राणिनां समेषां महत् सद्भाग्यम्। तत्रापि एतैर्गुणैर्मण्डिताः ते पुण्यपुरुषाः पण्डिताः स्युस्तर्हि सुवर्णकुसुमे मार्दवं सौरोवानुभवे प्रथमवतरे सर्वेषाम्। पण्डितप्रवराः दत्तात्रेयशास्त्रिणः कवीश्वराः सांप्रतमेतादृशेषु पण्डितप्रवरेषु नैकगुणमण्डितेषु प्रथमस्थानभाजः इत्यहो महदाश्वासस्थानं नैकदुःखपीडितानां संभ्रान्तमनसां सामान्यजनानाम्।

व्युत्पत्तिः पक्षिणी प्रोक्ता कोशव्याकरणे उभे।
पक्षती, ते समालम्ब्य शास्त्रव्योम्नि समाविशेत्।।

इतीमां प्राचीनां संप्रदायाध्ययनसरणिमन्वसरन् एते। आगमकालेन स्वाध्यायकालेन प्रवचनकालेन व्यवहारकालेनेति विद्यायाः चतुर्धोपयोगं महाभाष्यकाराः पतञ्जलिमहाभागाः पस्पशायां निरदिक्षन्। स्वाध्यायप्रवचनाभ्यां न प्रमदितव्यम्' इति चोपनिषदादेशः। अपि च तैत्तिरीयोपनिषदि शिक्षावल्यां विद्यापरंपरोपवर्णिता 'आचार्यः पूर्वरूपम्' अन्तेवास्युत्तररूपम्, विद्या सन्धिः, प्रवचनं संधानम्' इति। तामिमां विद्यापरंपरा महत्या श्रद्धया संरक्षितुं ते पुणेनगरे शांकरमठे प्रवचनपरां आचार्या विद्यासन्धिना शिष्यान् संधातुं प्रायतन्त।

प्राचीनैः ऋषिभिः मुनिभिः सद्भिश्च प्रवर्तिते धर्मानुष्ठाने तेषामकम्पो नितरां क्रियाशीलः श्रद्धाभावो वरीवर्ति। 'स्वे स्वे कर्मण्यभिरतः श्रेयः परमवाप्नुयात्' इति तेऽभिप्रयन्ति।

न जातु कामान्न भयान्न लोभात् धर्मं त्यजेज्जीवितस्यापि हेतोः।
धर्मो नित्यः सुखदुःखे त्वनित्ये जीवो नित्यो हेतुरस्य त्वनित्यः।।
इति एतेषां दत्तमहाराजानां विद्वन्मूर्धन्यानां जीवनसारः।

'बुद्धेः फलमनाग्रहः' इत्यभियुक्तोक्तिः शास्त्रिमहोदयेषु नितरां परिणत-परिपाकासीत्, तयैवानाग्रहशालिन्या व्यवसायात्मिकया बुद्धया 'संचरन्ती अद्वैतविद्या' इति सार्थोऽसाधारणः उपाधिः पण्डित-मण्डल्या तेषु शास्त्रिप्रवरेषु समर्पितः साधिष्ठं विराजते। शास्त्रिमण्डलमण्डनेषु तेषु सप्रश्रयं भूयांसो नमोवाकाः

''अप्रिय भाषण न करणाऱ्या, प्रिय वचन बोलणाऱ्या, स्वतःच्या नशिबावर संतुष्ट असणाऱ्या आणि दुसऱ्याची निंदा न करणाऱ्या लोकांनी ही वसुंधरा कुठे कुठे सुशोभित झालेली दिसते.'' या भर्तृहरि कवीच्या सुभाषितात वर्णन केलेल्या गुणांनी युक्त असे पुण्यपुरुष जगात क्वचितच दिसतात. त्यातही ते पुण्यपुरुष विद्यासंपन्न असतील तर सोन्याच्या फुलाला सुगंध आणि मार्दव मिळाल्यासारखाच अनुभव येतो. पण्डितश्रेष्ठ दत्तात्रेयशास्त्री कवीश्वर हे अशा गुणसंपन्नांमध्ये अग्रस्थानी आहेत ही दुःखी आणि गोंधळलेल्या सामान्य लोकांना मोठीच आशादायक गोष्ट आहे.

''व्युत्पत्ति म्हणजे ग्रंथ आकलन करण्याची कुशलता ही कोणी एक पक्षिणी आहे. कोश (अमरकोश इत्यादींसारखे ग्रंथ) आणि व्याकरण हे दोन पंख आहेत. त्यांच्या मदतीने शास्त्ररूपी आकाशात विहार करता येतो'' या प्राचीन परंपरेला अनुसरून त्यांनी सर्व शास्त्रांचे अध्ययन केले. अध्ययन, अभ्यास, प्रवचन आणि व्यवहार असे विद्येचे चार प्रकारचे उपयोग व्याकरणमहाभाष्यकार पतंजलींनी सांगितले आहेत. 'स्वाध्याय आणि प्रवचन कधीही सोडू नये' अशी उपनिषदांची आज्ञा आहे. तसेच 'गुरु आणि शिष्य यांचे ऐक्य म्हणजे विद्या, ती प्रवचनाने मिळते' असे तैत्तरीय उपनिषदात सांगितले आहे, या विद्यापरंपरेचे श्रद्धापूर्वक रक्षण करीत त्यांनी शिष्यांना शिकविले. प्राचीन ऋषिमुनींनी सांगितलेल्या धर्मावर नितांत श्रद्धा ठेवून ते सतत क्रियाशील असतात. 'स्वकर्तव्य करीत राहणाऱ्याला परमश्रेय प्राप्त होते.' असेच ते मानतात.

''आसक्तीने, भीतीने, लोभाने किंवा प्राण वाचविण्यासाठीही धर्माचा त्याग करू नये. कारण धर्म हा नित्य आहे. सुखदुःखे अनित्य आहेत. जीव हा नित्य आहे आणि त्याचे कारण (जे कर्म, अज्ञान ते) अनित्य आहे.'' हेच विद्वद्वरेण्य दत्तमहाराजांच्या जीवनाचे सार आहे. ''कोणताही आग्रह नसणे हे ज्ञानाचे फल होय' या उक्तीची प्रचीती त्यांच्या ठिकाणी येते. या अनाग्रहयुक्त निश्चयात्मक बुद्धीने 'चालती-बोलती अद्वैतविद्या' असे त्यांचे यथार्थवर्णन होईल. त्यांना सविनय अनेक नमस्कार.



पं. श्री राजेश्वरशास्त्री उप्पिनबेटगिरी

ब्रह्मश्री भालचंद्रशास्त्रींचे धाकटे चिरंजीव पं. राजेश्वरशास्त्री हे प. पू. श्रीदत्तमहाराजांचे विद्यार्थी तर आहेतच पण मोठे व्यासंगी पंडितही आहेत. पंचागाचा त्यांचा उत्तम व्यासंग असून शताब्दी साजरी करीत असलेल्या धारवाड पंचागाचे ते क्रियाशील कार्यकर्ते आहेत. त्यानीही एक आठवण पाठविली आहे.


प. पू. श्रीदत्तमहाराजांचा धारवाड संस्कृत शाळेशी घनिष्ट संबंध सतत राहीला. तेथील सर्व कार्यक्रमात श्रीमहाराजांचे मार्गदर्शन व सहभाग असे. अशाच एक कार्यक्रमप्रसंगी श्रीमहाराजांचा गुणगौरव करण्यात आला होता. त्यांचे संक्षिप्त चरित्र कानडी भाषेत प्रसिद्ध करण्यास आले होते. त्याचा उल्लेख मागे येऊन गेला आहे. त्यातील महत्त्वाचा गुणगौरवाचा भागाचे मराठीत भाषांतर करून पं. राजेश्वरशास्त्रीनी पाठविले आहे. ते लिहीतात :--

''श्रीमज्जगद्गुरू शंकराचार्य संस्कृत पाठशाळेचे माजी प्रधानाध्यपक पूर्वाश्रमीचे ब्रह्मश्री विद्वत्रत्न कृष्णशास्त्री पुढे श्रीकृष्णानन्दस्वामी महाराज (तुर्याश्रमी) यांचा सुवर्णोत्सव श्रीशके १८९२ साधारण सत्वंसर फाल्गुन कृष्ण षष्ठी सन १९७१ला सत्कार झाला. त्यावेळी प. पू. श्रीकवीश्वरमहाराज उपस्थित होते. त्या प्रसंगातील स्मरणसंचिकेत कानडीभाषेत खालील मजकूर प्रसिद्ध करण्यात आला. 'ब्रह्मश्री विद्यावाचस्पती पंडितप्रवर दत्ताशास्त्री कवीश्वर महाराज, पुणे वय ६२ नरसोबावाडीतील ब्रह्मश्री पूज्य धुंडीराजमहाराज यांचे जेष्ठपुत्र आहेत. न्याय, वेदान्त, मीमांसशास्त्रामध्ये विख्यात पंडित आहेत. शास्त्रमहोदधि वगैरे पुष्कळ बिरूदानी अलंकृत आहेत. या पाठशाळेत विद्वन्यानि श्रीनागेशशास्त्री सन्निध साघंत शास्त्राध्ययन केले असून सध्या पुण्यातील श्रीशांकर विद्यापीठ वगैरे संस्थामध्ये शास्त्राध्यापन करीत आहेत. हे सौजन्यमूर्ति व सदाचार संपन्न असे सात्विक आदर्श पुरूष आहेत.''

अजातशत्रुत्व

१९८४ सालची गोष्ट आहे. एकदा पुण्याला आलो असता प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या पंक्तीचा लाभ मिळाला. जेवताना एका सद्गृहस्थाबद्दल सहज चर्चा झाली. १९८३ साली बेंगलूर येथे घडलेल्या 'गायत्रादि कोटी होमाची' त्याने टिंगल टवाळी केली होती. एवढेच नव्हे तर प. पू. श्रीमहाराजांचेबद्दल काही अपशब्द प्रयोग करून, श्रीमहाराजाना व काही लोकाना पत्रेही पाठविली. श्री. राजेश्वरशास्त्रीनी त्याला बोलाविले नसताना येण्याबद्दल आश्चर्य प्रगट केले होते. नागपूरचे श्रीकृष्ण आर्विकर म्हणाले, ''तुम्ही त्याला यज्ञात भाग का दिला?'' प. पू. श्रीमहाराज आमचा हा संवाद ऐकत होते. ते म्हणाले की, 'अनाहूतो ऽऽ ध्वरं गच्छेत्' या वचनाप्रमाणे तो

मनुष्य यज्ञाला आला. म्हणून त्याची चूक नाही. उलट त्याला परत न पाठविता भाग घेऊ दिलात हे केवढे सौजन्य आहे.'' खुद्द श्रीदत्तमहाराजांची केवढी सहनशीलता! आपल्याला विरोध करणाऱ्या व्यक्तीवर सौजन्य! आम्ही सगळे त्यांचे अजातशत्रुत्व पाहून आश्चर्यचकित झालो.



प्रसन्न पारिजात ग्रंथ प्रकाशन (संदर्भ पान क्र. १५९)

डॉ. इंगॉल्स यांचे पत्र

डॉ. इंगॉल्स अमेरिकेच्या हार्वर्ड विद्यापीठाचे संस्कृत प्राध्यापक आहेत. यांनी प्राच्य विद्या संशोधन भांडारात १९५० च्या सुमारास प. पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांचेकडे वेदान्त विषयाचे संस्कृत अध्ययन केले आहे. त्यानंतर मे १९९३ मधे पुण्याला अखिल भारतीय परिषदेचे छत्तिसावे अधिवेशन भरले होते. त्या अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. इंगॉल्स हे होते. प. पू. श्रीदत्तमहाराजांना त्यावेळी ते भेटले होते.

प. पू. श्रीदत्तमहाराजांचे चरित्र लेखन करण्याचे ठरले त्यावेळी डॉ. इंगाल्य यांच्याशीही संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. त्यांनी अगत्यपूर्वक त्याची दखल घेतली. उत्तर पाठविले म्हणून तेही या चरित्रात समाविष्ट करता आले. त्यांचे प. पू. श्रीदत्तमहाराजांबद्दलचे गौरवाचे विचार ऐकून आपल्यालाही आनंद वाटेल.

VIRGINIA HOT SPRINGS, INC.

P.O. Box 889
Hot Springs, Virginia 24445
Telephone (703) 839-2899

Smt. Neela K. Joshi
3/34 Dnyanyog Hag. Soc.
Lokamanya Tilak Road, Borivli (W.)
Bombay 400 091, India

February 16, 1995

Dear Srimati Joshi,

I well remember Sri Dattamaharaj Kavishvar, although it is many years now since I studied with him. Back in the 1950's, when I spent the better part of a year at the Nizam's Guest House of the Bhandarkar Oriental Research Institute in Poona, Sri Dattamaharaj was good enough to read Vedanta texts with me. I was working at the time of the *Brahmasutra* commentary of Bhaskara Vedanti, comparing it *sutra* by *sutra* with the *Sankara-bhasya*. There was only one printed edition of Bhaskara in those days, the Benares edition, full of misreadings and misprints. Sri Dattamaharaj's knowledge of the language and Vedanta were as invaluable help to me in making sense of it.

My mentor disapproved of Bhaskara, because Bhaskar was as outspoken opponent of Sankaracarya. He may well have felt that I was wasting my time on a wrong-headed interpretion when a far better interpretation, Sankara's, was at hand. But he was too polite and too kindly a scholar to repremand me. I remember one time, though, when leaning back from the book we had been reading, I admitted that Sankara's comment was more forceful and more beautiful than what we had been reading. He smiled at me, as though I had chosen the wrong words. "That of Sri Sankaracharya is the truth," he said. "This is not."

I cherish the memory of Sri Dattamaharaj Kavishwar, not only for the knowledfe he imparted to me, but for the example I found in him of honesty and devotion to the best ideals of traditional India Scholarship.

Daniel H. H. Ingalls
Wales Professor of Sanskrit emeritus,
Harvard University

Sincerely yours,

Daniel H. H. Ingalls

डॉ. सौ. नलिनी चाफेकर यांचा संस्कृत वाङ्मयाचा गाढा व्यासंग आहे. त्या पुणे विद्यापीठाच्या संस्कृत, पालीच्या एम. ए. आहेत. पुण्याच्या टिळक संस्कृत विद्यापीठाच्या विद्यार्थींनी असून प. पू. श्रीदत्तमहाराजांचे शिष्य कै. यशवंतरावजी मराठे यांचेकडे शास्त्राध्ययन केले आहे. टि. म. वि. ची न्याय कोविद ही पदवी त्यांनी संपादन केली आहे. त्यांनी मुंबई विद्यापीठाची प्राचीन भारतीय संस्कृती या विषयावर पीएचडी संपादन केली. पदव्युतर संशोधनाबद्दल मुंबई विद्यापीठाचे व्ही. एन. मंडलीक पारितोषिक मिळविले आहे. पुणे विद्यापीठाचे एम ए वेदान्त विषयावर प्रथम क्रमांकाबद्दल यार्दी वेदान्त पारितोषिक मिळविले आहे. तसेच जमशेटजी जीजीभॉय थर्ड बॅरोनेट नांवे मुंबई विद्यापीठाचे पारितोषिकही पटकावले आहे. त्याशिवाय अनेक निबंध लेखन, चरित्र लेखन त्यांचे चालू असते. कै. श्री. यशवंतराव मराठे यांचे चरित्र त्यांनी लिहिले आहे.

प. पू. श्रीदत्तमहाराजांची वाङमयसंपदा बहुतेक सर्व संस्कृत मधून आहे. त्यांचे परिक्षण करण्यास संस्कृततज्ञच हवा. तरच त्याचे मर्मग्राही परीक्षण करता येईल. डॉ. नलिनी चाफेकर यांनी त्यांचे समग्र साहित्य वाचले आहे. प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या सखोल ज्ञानाची घट्ट शास्त्रीय बैठकीची त्याना पूर्णपणे जाण आहे. प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या अमोल ग्रंथाचे विशेषत्व त्यांच्या अभ्यासपूर्ण लेखणीतून उतरलेले आहे. प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या चरित्रात त्यांचे महत्त्व अनन्य साधारण आहे.

प. पू. श्रीदत्तमहाराजांची वाङ्मय संपदा

पू. गुरुजींचे वाङ्मयीन क्षेत्रातील कार्य म्हणजे महत्त्वपूर्ण ग्रंथांचे त्यांनी केलेले संपादन होय.

१. प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराज यांचे वाङ्मय

प. प. टेंबेस्वामी यांचे समग्र वाङ्मय स्वामी महाराजांच्या जन्मशताब्दी महोत्सवाचे प्रसंगी १९५४ मध्ये श्रीवासुदेवानंद सरस्वती ग्रंथ प्रकाशन मंडळ, पुणे यानी बाराखंडात प्रसिद्ध केले. स्वामीमहाराजांचे बरेच वाङ्मय संस्कृतमध्ये आहे. ते प्रकाशित करावयाचे होते. 'चांगल्या संस्कृत पंडिताने आत्मीयतेने लक्ष घालून करण्याचे ते काम आहे,' असे प. पू. श्रीगुळवणीमहाराजांचे मत होते. पू. गुरुजींनी संप्रदायपूर्वक संस्कृत अध्ययनाने व स्वतःच्या चिंतन मननाने प्राप्त करून घेतलेली सम्यक्दृष्टि आणि सत्पुरुषांच्या कृपाप्रसादाने व स्वतःच्या उपासनेने साधलेली

आध्यात्मिक प्रगती पाहून श्रीगुळवणी महाराजांनी गुरुजींवर हे काम सोपविले. गुरुजींनी अमरापूर, माणगाव अशा गावोगावी हिंडून ठिकठिकाणाहून हस्तलिखिते गोळा केली. अव्याहत चार पाच वर्षे निरलसपणे दररोज दहा बारा तास खपून परिश्रम करून ग्रंथ सिद्ध केले ते बारा खंड असे

१. शिक्षात्रयम् - कुमारशिक्षा, युवाशिक्षा, वृद्धशिक्षा,
२ स्तोत्रादिसंग्रह
३ सप्तशतीगुरुचरित्रसार, दत्तलीलामृताब्धिसार, माघमाहात्म्य, स्त्री शिक्षा, वासुदेवमननसार इ. ग्रंथ मराठीत आहेत.
४ दत्तमाहात्म्य - मराठी ग्रंथ
५ श्रीगुरुचरित्रकाव्य (सटीक), श्रीदत्तचम्पू (सटीक)
६-७ श्रीदत्तपुराणम्
८-९ श्रीगुरुचरितम् - द्विसाहस्त्री
१०-११ श्रीगुरुसंहिता - समश्लोकी गुरुचरित्र
१२ पंचपाक्षिक स्तोत्र, वेदनिवेदस्तोत्र, श्रीकृष्णलहरी इ.

श्रीसरस्वती गंगाधर लिखित श्रीगुरुचरित्र हा ग्रंथ दत्तसंप्रदायाचा 'वेद' समजला जातो. तो मराठीत आहे. इतर भाषिकानाही त्याची माहिती व्हावी या हेतूने टेंबेस्वामींनी त्याचे संस्कृत भाषांतर केले. दत्तात्रेय संप्रदायाचे तत्त्वज्ञान, उपासना यांची माहिती देणारे इतरही ग्रंथ लिहीले. या वाङ्मयाचे स्वरूप गुरुजींनी एके ठिकाणी थोडक्यात सांगितले आहे, 'जगत्कार्य संचालक अशा परमेश्वराचे शुद्ध व शबल स्वरूप, त्याबद्दलची प्रमाणे, इतर प्रमाणांशी अविरोध, त्यांच्या ज्ञानाची साधने, त्याचे गौण व मुख्य फल इत्यादि मनुष्य जन्मातच जाणून घेण्याचे विषय स्पष्ट करून सांगणारे हे वाङ्मय आहे.' अवतारी पुरुषांच्या अशा प्रकारच्या लेखनाचे संपादन अत्यंत काळजीपूर्वक करावे लागते. 'श्रीदत्तमाहात्म्य' या ग्रंथाच्या चवथ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत गुरुजी लिहीतात, ''हा ग्रंथ सामान्य पुस्तकाप्रमाणे केवळ बुद्धीचा विषय नाही. हा मंत्रग्रंथ आहे. श्रीस्वामीमहाराजांनी स्वहस्ते लिहीलेल्या प्रत्येक अक्षरास विशेष महत्त्व आहे. तेव्हा शास्त्रशुद्ध पाठांचा विचार करीत असता काय प्रकारची अडचण आली असेल हे वाचकांच्या ध्यानात आले असेल. हंसक्षीरन्यायाने, ग्राह्याग्राह्य निर्णय करावा म्हटले तरी ही गोष्ट परमहंस पदास पोहोचलेल्या श्रीस्वामीमहाराजांच्या बाबतीत सामान्य माणसास न करता येण्यासारखी आहे. तरीही दोष दूर करण्याचा यथामति यत्न केला आहे. काही शंका श्रीगुळवणीमहाराज यांना विचारून खुलासा करून घेतला आहे.'' स्वतः पूर्ण ज्ञानी व अधिकारी असूनही एवढी विनम्रता व त्याचबरोबर सावधानता असणे हे गुरुजींच्या गुरुंवरील श्रद्धेचे व स्वकर्मावरील निष्ठेचे द्योतक आहे. या अलौकिक कार्यासाठी त्यांनी इतरांचे

साहाय्यही घेतले. संस्कृत ग्रंथांचे मराठी भाषांतर करण्याचे व वेगवेगळ्या ग्रंथांना प्रस्तावना लिहीण्याचे काम विविध शास्त्री पंडितांशी संपर्क साधून करून घेतले. पं. आत्मारामशास्त्री जेरे (अमळनेर), पं. धुंडिराजशास्त्री माहूरकर, पं. हरिरामशास्त्री शुक्ल, (वाराणसी), पं. भालचंद्रशास्त्री उप्पिनबेट्टिगिरी (धारवाड), पं. विनायकशास्त्री टिल्लू, (इंदूर), पं. हणमंतराव भिडे (अहमदाबाद) इत्यादी प्रांतोप्रांतीच्या पंडितश्रेष्ठांनी ह्या कामी मदत केली आहे. यावरून गुरुजींचे अजातशत्रुत्व व सौजन्यच लक्षात येते. एवढे असूनही गुरुजी लिहितात, '... जे दोष अजूनही राहिले असतील त्याबद्दल ग्रंथरूपी, ग्रंथकृद्रूपी, वक्तृत्त्वरूपी तसेच श्रोतृरूपी श्रीदत्तात्रेयगुरुंची क्षमा मागणे प्राप्त आहे.' ग्रंथसंपादकाने काय भूमिका ठेवावी आणि कामाची किती काळजी घ्यावी याचा एक वस्तुपाठच गुरुजींनी येथे घालून दिला आहे.

२. श्रीसायणमाधव-विरचित सर्वदर्शनसंग्रह, (मराठी अनुवाद व विवरणासह)

अद्यापपावेतो अप्रकाशित असलेला हा ग्रंथ आता प्रकाशनाच्या वाटेवर आहे. प्राचीन भारतातील सर्व दर्शनांची म्हणजे तत्त्वज्ञान प्रणालींची एकत्रितपणे माहिती करुन देणारा हा ग्रंथ पंधराव्या शतकात सायणमाधव यांनी रचला. यावर महामहोपाध्याय श्री वासुदेवशास्त्री अभ्यंकर यांनी दर्शनाङ्कुर नावांची संस्कृत टीका लिहून तो सन १९२४ मध्ये प्रथम प्रकाशित केला. भारतीय तत्त्वज्ञानाची चार्वाक, बौद्ध, जैन ही तीन नास्तिकदर्शने आणि सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, मीमांसा, वेदान्त अशी सहा प्रमुख आस्तिकदर्शने, या शिवाय पाणिनिदर्शन, प्रत्यभिज्ञादर्शन, रसेश्वर दर्शन इत्यादि दर्शने या सर्वांची ओळख करुन देणारा सर्वदर्शन संग्रह हा अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ आहे. श्री. र. प. कंगले यानी मराठी भाषांतर व विवेचन यासह संपादित केलेला हा ग्रंथ सन १९८५ मध्ये महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने प्रकाशित केला आहे. परंतु शास्त्राच्या परिपूर्ण ज्ञानामुळे योग्य व नेमके भाषांतर निःसंदिग्ध व मूलगामी विवरण आणि अत्यंत सुगम व सुंदर शैली यामुळे गुरुजींचे (प. पू. श्रीदत्तमहाराजांचे) लेखन वैशिष्ट्यपूर्ण व वेगळे आहे.

सर्व दर्शनांचे सखोल ज्ञान असल्याशिवाय हे कार्य करता येणे शक्य नाही. संस्कृतमधील शास्त्रग्रंथाचा मराठीत अनुवाद करणे हे काही सोपे काम नाही. संस्कृतमध्ये पुष्कळदा सूत्रमय पद्धतीने लेखन केलेले असते. मोठा अर्थ व्यक्त करणारा एखाद दुसरा लहान शब्द वापरलेला असतो त्याला सूत्र म्हणतात. याचा अनुवाद करताना मराठीत पुष्कळदा पूर्ण वाक्य लिहावे लागते. संस्कृत वाक्याचा भावार्थ जाणून मराठीतील योग्य शब्दाची निवड करावी लागते. संस्कृत शब्दाला नुसता मराठी प्रतिशब्द देऊन किंवा मराठीत रुढ असलेला संस्कृत शब्द तसाच ठेवून काम भागत नाही. उदाहरणार्थ 'सर्वं दुःखं, सर्वं क्षणिकं, सर्वं स्वलक्षणं, सर्वं शून्यं' असे बौद्धांचे सिद्धान्त आहेत. याचा अनुवाद करताना 'सर्व जग दुःख आहे,

क्षणिक आहे' हे सहज लिहीता येते. पण 'स्वलक्षणं' हा शब्द कठीण आहे. त्याचा अर्थ सर्व 'स्वलक्षण म्हणजे स्वतःच्याच असामान्य रुपाने राहणारा, ज्याच्यावर दुसरा कोणी आहे असे सांगता येत नाही' अशा वाक्यांनी स्पष्ट करावा लागतो. शास्त्रीय पारिभाषिक शब्दांच्या बाबतीतही केवळ अनुवाद शक्य होत नाही व पुरेसाही होत नाही. म्हणूनच शब्दशः अनुवादाबरोबरच सर्व ठिकाणी गुरुजींनी विवरणही केले आहे. संस्कृत शास्त्रग्रंथांची विवेचन पद्धती खंडनमंडनात्मक असते. म्हणजे, स्वतःचे मत मांडण्यापूर्वी इतरांची मते खोडून काढली जातात. त्यातील चुका दाखविल्या जातात. यावेळी बारीकसारीक खाचाखोचा केवळ अनुवादाने कळत नाहीत. त्या उलगडून दाखवाव्या लागतात. म्हणून अनुवादानंतर गुरुजींनी ' या आक्षेपाचा भावार्थ असा ....' 'या दृष्टान्ताचे तात्पर्य असे...' 'इथे प्रतिपक्षाला असे म्हणायचे आहे..' अशा प्रकारे मुद्दे स्पष्ट करुन दाखविले आहेत. हे सर्व विवेचन गुरुजींनी स्वतंत्रपणे केले आहे. त्यांचे लेखन म्हणजे संस्कृत टीकेचे भाषांतर नव्हे. संस्कृत टीकेमध्ये उद्धृत न केलेल्या ठिकाणीही गुरुजींनी सुंदर विवेचन केले आहे.

शास्त्रातील तर्ककर्कश गंभीर अर्थ साध्या शब्दात, ओघवती शैलीत स्पष्ट करण्याची गुरुजींची हातोटी तर विलक्षणच आहे. उदाहरणार्थ चार्वाक हे फक्त प्रत्यक्ष प्रमाण मानतात. अनुमान प्रमाण मानीत नाहीत. यासाठी 'अनुमानं न प्रमाणं, प्रमितिकरणतावच्छेदकधर्म शून्यत्वात्' असे सांगतात. ह्या मताचे खंडन करण्यासाठी व्यवहारातील उदाहरण दिले जाते. ते गुरुजी इतक्या सुंदर रीतीने सांगतात. 'चार्वाकांना अनुमान प्रमाणाचाच आधार घ्यावा लागतो. उन्हाळ्याचे दिवस. पायी प्रवास चालू आहे. तहान अत्यंत लागलेली आहे. अशा वेळी वाऱ्याची गार झुळूक आली. दाट झाडी दिसली. त्यामुळे तेथे पाणी आहे असे ज्ञान झाले ....' गंभीर तत्त्वज्ञानावरील ग्रंथात या ओळी अनपेक्षित पण तितक्याच सुखकर वाटतात. अशा शैलीने गुरुजी विषय एकदम सोपा करुन दाखवितात. इथे त्यांच्यामधील प्रवचनकार प्रकट झालेला दिसतो. मुख्य विषय गंभीर व म्हणूनच रुक्ष, कंटाळवाणा असला तरी हलकी फुलकी भाषा वापरुन, श्रोत्यांचे लक्ष उडणार नाही अशी काळजी घेऊन त्यांना अंजारुन गोंजारुन पुढे नेणे हे श्रेष्ठ प्रवचनकाराचे कौशल्य असते. तशाच पद्धतीने गुरुजी लिहीतात. त्यामुळे त्यांचे विवेचन वाचताना कंटाळा येत नाही. मात्र मुख्य विषय घट्ट धरुन ठेवलेला असतो. शास्त्रीय सिद्धान्त पक्केपणाने मांडलेले असतात. त्यामुळे वाचकाच्या समजुतीत गोंधळ होण्याचा प्रश्न नसतो. गुरुजींच्या लेखनाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे ते अत्यंत शास्त्रशुद्ध असते. शास्त्राच्या अध्ययनाची बैठक भक्कम असल्याने मूळ सिद्धान्ताला बाध आणणारे लेखन कधी होत नाही. तसेच मुख्य विषयाला सोडून केवळ मनोरंजनासाठी केलेला तत्त्वशून्य भाषेचा फुलोराही कुठे दिसत नाही. सोपी उदाहरणे देऊन सहज समजेल असे विवेचन हे शास्त्राच्या परिपूर्ण ज्ञानाचे गमक आहे.

३. श्री निम्बार्काचार्य विरचित वेदान्तपारिजातसौरभ (मराठी अनुवाद व विवरण यांसह)

हा ग्रंथ जून १९६५ मध्ये टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने पुणे येथे प्रसिद्ध केला आहे. महामहोपाध्याय श्रीवासुदेवशास्त्री अभ्यंकर यांनी ब्रह्मसूत्रावरील शंकराचार्यांच्या भाष्याचे मराठीत भाषांतर केले. ते सन १९११ मध्ये प्रथम प्रसिद्ध झाले. त्यानंतरचा वेदान्तातील मराठीत अनुवादित केलेला भाष्यग्रंथ म्हणजे गुरुजींचा प्रस्तुत ग्रंथ होय. वेदान्तपारिजातसौरभ म्हणजे निम्बार्काचार्यांनी ब्राह्मसूत्रावर लिहीलेले भाष्य होय. या ग्रंथाच्या सुरुवातीला गुरुजींनी लिहीलेली जवळ जवळ सव्वाशे पानांची विस्तृत भूमिका म्हणजे एक श्रेष्ठ संशोधन प्रबंधच आहे. यात 'दर्शन' 'शास्त्र' या शब्दाचा अर्थापासून सुरुवात करुन सर्व प्रमुख दर्शनांची सविस्तर माहिती दिली आहे. त्याच बरोबर इतर विषयांचीही चर्चा केली आहे.

प्रत्येक दर्शनाचा मुख्य प्रतिपाद्य विषय काय, त्यासाठी कोणती प्रमाणे स्वीकारली आहेत, त्यांचे ध्येय काय, त्यासाठीचे मार्ग कोणते इत्यादी विषयांची माहिती त्या त्या दर्शनातील सूत्र-भाष्य-टीका ग्रंथातील अवतरणे देऊन लिहीली आहे. सर्वही दर्शनांचा आपापसात विरोध नसून अंतर्गत समन्वयच आहे असे गुरुजींचे प्रतिपादन आहे. त्यामुळे दर्शनांमधील साम्य स्थळे तौलनिक अभ्यासाच्या द्वारा आवर्जून स्पष्ट केली आहेत. बौद्धदर्शनाची आवश्यकता पटविताना गुरुजी लिहीतात, 'यज्ञनिष्ठ वैदिक धर्मच श्रेष्ठ होय. परंतु रावण, इंद्रजित यांच्यासारखे ब्रह्मकुलप्रसूत पुरुषही जेव्हा ऐहिक सुखलोलुप अहंकारी बनून ते सुख मिळविण्याकरिता यज्ञमार्गांचा आश्रय घेऊ लागले तेव्हा त्यांच्यासारख्या आसुरी वृत्तीच्या लोकांना मोहित करण्याकरिता म्हणून वेदोक्त यज्ञमार्गांची निंदा अवतारी अशा बुद्धांनाही करावी लागली आहे. ...' (पृ. १५) . हे सर्व विवेचन 'संमोहाय सुरव्दिषाम्। बुद्धो नाम्ना जिनसुतः कीकटेषु भविष्यति।' या श्रीमद्भागवतातील वचनप्रामाण्यावर आधारित आहे. इथे आपल्या मनात प्रश्न येतो की बुद्ध हाही जर शास्त्रामध्ये अवतार मानला गेला आहे तर या अवताराचीही उपासना करायची का? याला गुरुजींनी उत्तर देऊन ठेवले आहे, 'बुद्धावताराविषयी आदर आहेच. फक्त धर्मसंरक्षणरुप अवतारकार्य बुद्धावतारात दिसत नसल्याने तो अवतार इतर अवतारांप्रमाणे भारतीय संस्कृतीमध्ये उपास्य ठरला नाही.' (पृ.१६) अशाप्रकारचे सुस्पष्ट विवेचन खरोखरच दुर्मिळ आहे. गुरुजींच्या लेखनाचे आणखी अनन्यसाधारण वैशिष्ट्य असे आहे की ह्या सर्व दर्शनांचा उद्देश मानवाची आध्यात्मिक प्रगती साधणे हाच आहे हे त्यांनी सप्रमाण स्पष्ट केले आहे. या ठिकाणी आत्यंतिक भौतिकवादी, भोगवादी असलेल्या चार्वाक दर्शनाचा काय उपयोग असू शकेल हे आपल्या लक्षात येत नाही. ते गुरुजी सांगतात, 'समन्वयदृष्टीने पाहता चार्वाक दर्शनही उच्छृंखल समाजाला संयम दाखवून हळूहळू शास्त्रीय मार्गावर आणण्याकरिताच बृहस्पतींनी निर्माण केले आहे. शरीरच

आत्मा आहे असे म्हटल्यावर इतर सर्व आत्म्याकरिताच आहे, आत्मा मुख्य आहे, म्हणून गृह, क्षेत्र, वित्त इत्यादि विषयांवरील आसक्ती कमी केली पाहिजे. शरीररुप आत्म्याचे रक्षण करणे हे पहिले कर्तव्य आहे...' (पृ.१२) भगवंताची वाङ्मयी मूर्ती असलेला श्रीमत्भागवत हा गुरुजींचा अत्यंत आवडता ग्रंथ आहे. त्यामध्ये सर्व दर्शनांचा समन्वय कसा आहे हे गुरुजींनी समर्पकरीत्या दाखविले आहे. 'भागवते शास्त्रवतां परीक्षा' श्रीमत्भागवताचा अर्थ योग्य रीतीने समजणे ही शास्त्रवत्यांच्या विद्वत्तेची कसोटी आहे, असे म्हणतात ते खरेच आहे. या निष्कर्षावर गुरुजींची विद्वत्ता अत्यंत तेजस्वीपणे तळपत आहे.

दर्शनांची माहिती देताना संस्कृत भाषेतीलच नव्हे तर पाली, प्राकृत या भाषातील ग्रंथातूनही अवतरणे घेतली आहेत. त्याचबरोबर प्राचीन ग्रीक तत्त्ववेत्यांची मते, फाहेन, मेगॅस्थेनीस इत्यादि परकीय प्रवाशांची वर्णने, लो. टिळक, ललितकृष्ण गोस्वामी, तसेच राहुल सांकृत्यायन, पं. बलदेव उपाध्याय, रोमा बोस इत्यादि आधुनिक लेखकांचे ग्रंथ, अशा अगणित ग्रंथांचा आणि ग्रंथकारांचा उल्लेख गुरुजींच्या लेखनात दिसतो. यावरुन त्यांच्या प्रचंड व्यासंगाची आणि अचाट बुद्धीमत्तेची कल्पना येते. या ज्ञानसामर्थ्याच्या बळावरच प्राचीन परंपरेवर घेतल्या जाणाऱ्या आक्षेपांना किंवा परंपरेच्या विकृत प्रकटीकरणाला गुरुजींनी वेळोवेळी समर्पक उत्तरे दिली आहेत. त्यापैकी काही येथे मुद्दाम नमूद कराविशी वाटतात. न्यायशास्त्रामध्ये 'परीक्षा' म्हणजे स्वतःच्या सिद्धान्तांचे परीक्षण ही एक आवश्यक गोष्ट मानली आहे. यावरुन गुरुजी लिहीतात, 'शास्त्रकार हे स्वतःच्या सिद्धान्ताबद्दल स्वतःच चिकित्सा करतात. चिकित्सा ही शास्त्ररचनेमध्ये त्यांनी घटकच मानली आहे. त्यावाचून शास्त्राची पूर्णताच नाही. अशी वस्तुस्थिती असताना शास्त्रज्ञ हे बाबावाक्यं प्रमाणम् अशा विचाराचे असतात हा आक्षेप अज्ञानमूलकच ठरतो. प्राचीन शास्त्रज्ञ परप्रत्ययनेय बुद्धीचे कधीही दिसणार नाहीत. उलट केवळ बुद्धीवादी म्हणविणारेच अंधश्रद्धा व गतानुगतिक होत असलेले दिसून येते.'(पृ. २५.) योगशास्त्राच्या सामुदायिक अभ्यासाबद्दल गुरुजी लिहीतात, 'या शास्त्राचा अभ्यास सामुदायिकरुपाने होणे शक्य नाही. एक तर मानसिक शक्तीविकास हे योगाचे फल फक्त त्या त्या अभ्यासी पुरुषाला स्वसंवेघ आहे. आणि कदाचित साधक जर रसास्वादादि दोषात अडकून चांगदेवाप्रमाणे अहंकारदोषग्रस्त होईल तर ते दोष दूर करण्यास समर्थ अशा शास्त्रज्ञांच्या सांनिध्याची पदे पदे जरुरी या शास्त्राच्या अभ्यासकांना लागणारी आहे.' (पृ. ३६) योगाने प्राप्त होणाऱ्या सामर्थ्याबद्दल अविश्वास व्यक्त करताना पुष्कळदा असे म्हटले जाते की, 'आम्हाला काही प्रचीति आली तर आम्ही विश्वास ठेवू' याला गुरुजींचे उत्तर असे आहे. 'प्रत्यक्ष काही कार्य दिसून आले तर श्रद्धा वाढेल व प्रवृत्तीही होईल. असे जरी गृहीत धरले तरी आज अणुशक्तीचे प्रात्यक्षिक होऊनही

त्या ज्ञानाकडे आकृष्ट होणारे खरे विद्यार्थी कितीसे सापडतील? आणि असे जिज्ञासू भेटल्यावाचून ते शास्त्रज्ञ आपण प्रयत्नाने मिळविलेले विद्याधन वाटेल त्याच्या हातात कसे देतील? आणि ते दिले तरी त्याचा कल्याण पर्यवसायी उपयोग निश्चित कसा होईल?' (पृ.३६)

प्राचीन गुरुशिष्यपरंपरेत शिष्याचा योग्य अधिकार पाहून मग ज्ञानदान केले जाई. तेही शिष्याच्या हिताच्या आत्यंतिक कळकळीने केले जाई. प्राचीन दर्शने व आधुनिक विज्ञान यामध्ये असा मूलभूत फरक आहे. 'विश्वात दिसून येणाऱ्या चेतन व अचेतन अशा विभागांपैकी चेतनप्रधान दृष्टीने जे विचारशास्त्र प्रवृत्त होते त्याला दर्शन म्हणतात आणि अचेतन प्रधानदृष्टीने प्रवृत्त होणाऱ्या विचारशास्त्राला विज्ञान अशी परिभाषा आहे. दार्शनिक मानसिक शक्तीच्या आधारावर आत्मतत्त्वापर्यंत जाऊन पोचण्याचा प्रयत्न करतात आणि वैज्ञानिक प्रयोगशक्तीच्या आधारावर विसंबून असतात. वैज्ञानिक सत्य स्थूल दृष्टीच्या लोकांनाही गोचर होते आणि भौतिक रुपाने सर्वांना उपलब्ध होते. .... दार्शनिकांचे फल मात्र विशिष्ट साधकालाच स्वानुभवगम्य असते. .... आध्यात्मिक सामर्थ्यावाचून जीवन अशांतीमय होत असलेले आजही अनुभवास येते. म्हणून दार्शनिकाच्या मार्गाने आत्मोन्नती करुन घेणे यातच जीवनाचे खरे साफल्य आहे. विज्ञान हे जीवनाचे गौण साधन आहे.' (पृ.२,३). 'जगाची तीन कारणे दिसतात. (एक) चैतन्य, (दोन) गती किंवा शक्ती आणि (तीन) जड. जड हे शक्तीचा परिणाम आहे आणि शक्ती हे चैतन्याचे रुपांतर आहे. असे श्रीनिम्बाकाचार्यांच्या वेदान्ताने मानले आहे. आजचे वैज्ञानिक जड हे गतीचे रुपांतर आहे असे सिद्ध करुन राहिले आहेत. त्यांचे संशोधन चालूच आहे. त्यावरुन कल्पना येते की निकटच्या भविष्यकाळात गती किंवा शक्ती हे चैतन्याचे रुपांतर आहे हेही वैज्ञानिक दृष्टीने सिद्ध होऊ शकेल. सांप्रतच्या वैज्ञानिक प्रगतीकडे पाहून असे वाटते की द्वैताद्वैतदर्शन वैज्ञानिकांच्या प्रमाणकसोटीस पूर्ण उतरणारे ठरेल. भागवताच्या प्रथम श्लोकात हेच वैज्ञानिक तथ्य 'तेजोवारिमृदां यथा विनिमयो यत्र त्रिसर्गो भृषा' याप्रमाणे सांगून जग हे ब्रह्माचा विनिमय (परिणाम) आहे हे सिद्ध केले आहे'. (पृ.७६) अशा रीतीने विज्ञानाची प्रगती प्राचीन दर्शनांच्या तत्त्वज्ञानाला पोषक ठरू शकते असे विज्ञानाचे महत्त्व आणि त्याचबरोबर विज्ञानाच्या मर्यादा अशा दोन्ही गोष्टी गुरुजी स्पष्ट करुन दाखवितात.

प्राचीन परंपरेने अध्ययन करणाऱ्यांचा बहुधा आधुनिक पद्धतीवर राग असतो. त्याकडे दुर्लक्ष करणे किंवा कमी लेखणे अशी प्रवृत्ती दिसून येते. परंतु योग्य मूल्यमापन करुन दाखविले जात नाही. या संदर्भात गुरुजींचा अभिप्राय बघण्यासारखा आहे. 'ऐतिहासिक पद्धती नावाची दुसरी एक पद्धती इंग्रजांच्या भारत प्रवेशापासून पुढे आलेली दिसते. ग्रंथकर्ता, त्याचा काल, त्यावेळची परिस्थिती इत्यादी ग्रंथबहिर्भूत

विषयाच्या विचाराचे महत्त्व या पद्धतीत प्रायः मानले जाते. हे सर्वथा अयोग्य आहे असे नाही. ... पण (ज्याला ग्रंथातून काही मिळवायचे आहे अशा) साधकाला फलपर्यवसायी होतील असे विचार ऐतिहासिक पद्धतीत फारसे सापडणार नाहीत. तसेच ऐतिहासिक पद्धतीमध्ये तर्काला प्राधान्य आहे आणि तर्क तर कोणताही प्रतिष्ठित नाही हे सर्वही विचारी माणसांना संमत आहे.' (पृ.३०) आधुनिक पद्धती नाकारण्याचे सयुक्तिक कारण गुरुजी सांगतात, '.... याप्रमाणे श्रीनिम्बार्काचार्यांच्या काळाबद्दल प्राचीन व नवीन दोघांचीही मते वर दिली आहेत. ... नवीन चिकित्सकांनी आपल्या विचारास पोषक म्हणून श्रीनिम्बार्काचार्यांच्या रचनेचे साहाय्य घेतलेले नाही. ज्यांनी थोडेफार घेतले आहे त्यांनी अवश्य उल्लेखनीय संदर्भ सोडला आहे. म्हणून नवीन विचारपद्धती सर्वांशाने प्रमाण मानता येत नाही.' (पृ.५२)

आपला तात्त्विक विरोधही इतक्या मृदु शब्दात मांडणे हा गुरुजींच्या सौजन्यशील व्यक्तिमत्त्वाचा भाग आहे. श्रीनिम्बार्काचार्यांच्या लेखनशैलीच्या संदर्भात गुरुजींनी जे लिहीले आहे ते त्यांच्याही बाबतीत खरे आहे की, 'त्यांच्या वाक्यार्थामध्ये इतर मताचे खंडन तर्कपुरस्सर करण्याचाच यत्न केला आहे. उगीच 'शेषं कोपेन पूरयेत्' असा प्रकार कोठेही दिसून येत नाही. हा फार मोठा सात्त्विकताविशेष त्यांच्या ठिकाणी दिसतो.' (पृ.११६) श्रीनिम्बार्काचार्यांच्या द्वैताद्वैतवादाचे सविस्तर विवरण गुरुजींनी भूमिकेमध्ये केले आहे. अध्यात्माच्या क्षेत्रात शंकराचार्यांचे अद्वैत तत्त्वज्ञानच सर्वश्रेष्ठ समजले जाते. असे असूनही श्रीनिम्बार्काचार्यांचा द्वैताद्वैतवाद गुरुजींना जवळचा का वाटतो, या भाष्याचा मराठी अनुवाद, विवरण इत्यादींचा एवढा खटाटोप गुरुजींनी का केला याचे स्पष्टीकरण सुरुवातीलाच गुरूजी देतात,'विश्व हे स्वभावाने भिन्न असले तरी परमात्म्याच्या नियामकत्वाखाली ते निरंतर असल्याने ते त्याच्याशी अभिन्नही आहे... विश्वात वाढणाऱ्या दौर्मनस्याचे निर्मूलन होण्याकरिता केवळ सर्वसंग परित्यागपूर्वक भिक्षू होऊन जंगलात जाणेचा बौद्धांचा उपदेशही उपयोगी पडणार नाही आणि सर्वसामान्य जनांना विश्व मिथ्या आहे हा तात्विक उपदेशही झेपणार नाही. त्याकरिता सर्वान्तर्यामी पुरुषोत्तमाचा भक्तीयोगच एक उत्कृष्ट साधन आहे. 'अमृतस्य पुत्रः' या उक्तीप्रमाणे आपण सर्वही एकाच मंगलमय अनंतशक्तीसंपन्न परमात्म्याचे संबंधी आहोत. आपले सर्वांचे कुटुंब एकच आहे. याकरिता 'एकमेका साह्य करु । अवघे धरु सुपंथ' ही भावना नित्य बाळगून ईश्वर समत्व योगानेच विश्वामध्ये शांती निर्माण होणे शक्य आहे. श्रीनिम्बार्काचार्यांच्या या प्रेमाच्या सिद्धान्तातच जगाचे हित साठलेले आहे. म्हणून जगाच्या व्यावहारिक सिद्धान्ताला हे दर्शन अत्यंत उपयुक्त आहे.' (पृ.९) ही विश्वमांगल्याची भावना ग्रंथलेखनाची प्रेरणा असल्यामुळे गुरुजींच्या लेखनाला एक भव्य परिमाण लाभले आहे.

४. गुरुदेवचरित्र

भारदस्त शैलीत पांडित्यपूर्ण विवेचन हा गुरुजींच्या लेखनशैलीचा एक गुण आहे. परंतु त्यांच्या लेखनाचे वेगळेपण असे आहे की साधकांना उपयुक्त होतील अशा सूचनाही त्यांनी वेळोवेळी इथे दिल्या आहेत. श्रीनिम्बार्काचार्यांचा भक्तीमार्ग स्पष्ट करुन सांगताना गुरुजींनी श्रीवासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामीमहाराज यांच्या जीवनातील व वाङ्मयातील उदाहरणे दिली आहेत. या ठिकाणी गुरुजींचे लेखन अगदी भावुकतेने केलेले दिसते. 'प्रसिद्ध महानुभाव सद्गुरु श्रीवासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामीमहाराज यांचा आचारपरिपालनावर मोठा कटाक्ष होता. त्यांचा मुक्काम गंगातीरावर ब्रह्मवर्तक्षेत्रात असताना त्यांना शौचाचा उपद्रव सुरु झाला. दिवसातून आठ दहा वेळा सुद्धा शौचास जाण्याचा प्रसंग येत असे. पण प्रत्येक वेळी शौचाहून आल्यावर गंगेमध्ये स्नान करुनच त्यांनी यावे. चैत्र वैशाखातील गंगाकाठचा उन्हाळा. नदीचे पात्र दूर असल्यामुळे तो वालुकानिकर तुडवीत जाणे व येणे. तेही कितीवेळा ते अनिश्चित. पण शास्त्रमर्यादेचे परिपालन अत्यंत निष्ठेने महाराज करीत असत हे आम्ही प्रत्यक्ष पाहिले आहे. .... यावरुन भक्तीमार्गात कर्माची जरूरी नाही. भोळा भाव पुरे इत्यादि काही लोकांचे उद्गार आलस्यादि दोषद्योतक असल्याने ते ग्राह्य ठरणार नाहीत.' (पृ.१०८) अशारीतीने विवेकी वाचकांची जिज्ञासापूर्ती व्हावी आणि सत्प्रवृत्तीच्या वाचकांना सन्मार्गदृष्टी लाभावी अशी कळकळ गुरुजींच्या लेखनामध्ये दिसते.

श्रोत्रियत्व, ब्रह्मनिष्ठत्व आणि कारुण्य अशा तीनही गुणांचा अपूर्व संगम गुरुजींच्या ठिकाणी असल्यानेच त्यांना प. पू. श्रीगुळवणीमहाराजांचा वारसा असे सद्गुरुपद मिळाले आणि अशा श्रेष्ठ सद्गुरुंकडून उपदेश घेण्याचे सौभाग्य साधकांना लाभले.

गुरुजींनी लिहीलेले परमहंस टेंबेस्वामीमहाराज यांचे हे समग्र व सविस्तर चरित्र श्रीवासुदेव निवास तर्फे सन १९९१ मध्ये पुणे येथे प्रसिद्ध झाले आहे. स्वामीमहाराज ज्ञानी असून 'लोकसंग्रहमेवापि संपश्यन् कर्तुमर्हसि' या श्रीमद्भगवद्गीतेतील उपदेशानुसार वागणारे कर्मयोगीही होते. 'स्वभावविजयः शौर्यम्' या श्रीमद्भागवतातील उक्तीवरून शास्त्रतः सन्मार्गाचे अवलंबन व अयोग्यमार्गाचा त्याग हाच स्वभावजय होय. स्वभावजय म्हणजेच लोकसंग्रह. सद्सत्विवेकशील लोकांना अयोग्य मार्गापासून परावृत्त करण्यास गुरुपदेश आवश्यक असतो. ते लोकसंग्रहाचे कार्य स्वामीमहाराजांनी केले आहे. याचे सविस्तर वर्णन या चरित्रात दिसते. चरित्रलेखनाचे महत्त्व गुरुजींनी सुरुवातीलाच सांगीतले आहे. ''वीतरागविषयं वा चित्तम्' या योगसूत्रकारांच्या आदेशाप्रमाणे जीवन्मुक्तमहानुभावांच्या चरित्राचे समालोचन चित्तस्थैर्यसंपादक असल्याने (चरित्रलेखनाची) ही प्रवृत्ती होत आहे.'' स्वामीमहाराजांचे

समग्र वाङ्मय संपादित केल्यानंतर हे चरित्र लिहून गुरुजींनी स्वामीमहाराजांचे अलौकिक व्यक्तिमत्त्व साधकांच्या मनावर ठसविले आहे.

५. गुणगाईन आवडी, बोल अमृताचे, आनंदलहरी, १, २,

गुरुजींचे चिंतनपर विचार व गुरुजींनी वेळोवेळी वेगवेगळ्या विषयांवर केलेली प्रवचने डॉ. सौ. माधुरी पणशीकर यांनी श्री. गोपाळ गोडसे व इतरांच्या साहाय्याने ग्रंथबद्ध केली आहेत. ही प्रवचने मुख्यतः गुरुचरित्रावर आहेत. गुरुजी सांगतात, "हे भगवंताचेच चरित्र आहे. मत्स्य, कूर्म इत्यादि अवतार दुर्जनांना शासन करण्यासाठी झाले. दत्तात्रेय अवतार गुरुस्वरूपी अवतार आहे. यात अज्ञानी लोकांना योग्यता पाहून मार्गदर्शन करायचे आहे." गुरुचरित्रात सकाम भक्तीच्याच कथा आहेत. याचे स्पष्टीकरण गुरुजी सांगतात, "मोक्षाची इच्छा असणारे जीव कमी आहेत -- सगुण भक्ति हे मिष आहे. काही मागण्याच्या मिषाने देवाकडे जातो आहे ना, जाऊ दे, हळू हळू त्याची सकामबुद्धी कमी होईल." यासाठी गुरुचरित्र आहे. विवेचनाच्या ओघात पुराणातील इतर ग्रंथातील अनेक कथा येतात. आपल्याला पूर्वी माहित असलेल्या कथा गुरुजी वेगळ्याच स्वरूपात आपल्यासमोर उभ्या करतात. उदाहरणार्थ - महाभक्त अंबरीष राजाला दुर्वास ऋषींनी दिलेला शाप भगवान् विष्णूंनी स्वतःवर घेतला आहे हे आपल्याला माहित असते. यात दुर्वासमुनींचा कोपिष्ट स्वभाव आपल्या मनावर ठसलेला असतो. पण गुरुजी सांगतात, "ऋषिमहाराज म्हणाले, वैकुंठ लोकातून भगवान् वाटेल त्याने बोलावले म्हणून येणार आहेत काय? माझी लोकात निंदा झाली तरी हरकत नाही. पण भूलोकावर दुर्लभ असलेले भगवान आले तर सर्वांना त्यांचें दर्शन घडेल हे पुण्यकारकच आहे म्हणून शाप दिला. तुम्हाला अनेक जन्म घ्यावे लागतील" अशा रीतीने दुर्वास लोकोपकारी व दयाळु स्वभावाचे होते असे गुरुजी दाखवितात. जमदग्नि ऋषींच्या कथेचे सारही गुरुजी असे उलगडून दाखवितात. रेणुका मातेच्या मनात थोडा मोह उत्पन्न झाला होता म्हणून तिचा वध करविला आणि पुन्हा जिवंतही केले. म्हणजे आपल्या सान्निध्यात असणाऱ्या लोकांकडून शारीरिकच काय मानसिकही दोष होऊ नयेत यासाठीच त्यांचा राग आहे. प्राचीन कथांकडे बघण्याची सम्यक्दृष्टि कशी असावी हेच गुरुजी अशा विवेचनातून उलगडून दाखवितात. या प्रवचनांचा मुख्य उद्देश निःसंशयपणे साधकांना मार्गदर्शन करण्याचा आहे. याबद्दलचे विचार ठायी ठायी व्यक्त झाले आहेत. तीर्थक्षेत्रांचे महत्त्व, प्रतिमापूजेची आवश्यकता, मानसपूजेची पद्धती अशा साधकांच्या मनात येणाऱ्या प्रश्नांची उत्तरे इथे मिळतात. तसेच प्रणवजपाचे स्वरुप, कुंडलिनी शक्ति इत्यादि योगमार्गातील विषय आणि अद्वैताचे प्रकार, पंचकोश साधनचतुष्टय, श्रवणादि साधने

इत्यादि वेदान्तशास्त्राचे विषय या सर्वांचे सूक्ष्म विवेचनही येथे सापडते. विशेष म्हणजे हे सर्व विषय सोप्या भाषेत, व्यवहारातील नेहमीचे परिचयाचे दृष्टान्त देऊन केलेले असते. त्यामुळे ते सहज समजते. मात्र हे विवेचन मूलग्राही आणि दुर्मिळ म्हणजे इतरत्र सहसा न मिळणारे असते. उदाहरणार्थ आत्मनिवेदन ही नवविधा भक्तीपैकी शेवटची भक्ति असे आपण वाचलेले असते. परंतु आत्मनिवेदन म्हणजे नक्की काय, 'आपणासी निवेदावे आपण' असं समर्थ म्हणतात त्याचा अर्थ काय हे समजत नाही. अत्रि-अनसूया यांच्या कथेच्या निमित्ताने गुरुजींनी हे इतके सुलभरीतीने उलगडून दाखवले आहे. ''भगवान आपले पुत्र व्हावेत, अशी अत्रिमहर्षींनी मागणी केल्यावर भगवान विष्णूंनी सांगितले, मी आत्मदानच तुम्हाला केलय्. मी माझेच दान तुम्हाला केलंय्. आत्मनिवेदन ही मोठी भक्ती आहे. आत्मनिवेदन याचा अर्थ असा. आपल्या घरातील गाय किंवा बैल दुसऱ्याला विकून टाकला तर त्याला चारा घातलाय की, पाणी पाजलय का ही काळजी आपल्याला राहते का? दिला की दिला. तसा देवाला देह अर्पण केल्यानंतर त्याला खायला मिळेल की नाही, प्यायला मिळेल की नाही ही चिंता नाही. स्वतःची सगळी चिंता सोडून देणे म्हणजे आत्मनिवेदन इथे देवानेच आत्मनिवेदन केले. 'दत्त' हे नाव त्यामुळे प्राप्त झाले.''– ''बुद्धी निश्चयात्मक असते. मन चंचल असते. चित्ताची स्थिरता ही परमार्थ मार्गातील पहिली पायरी आहे, म्हणून 'बुद्धी दे रघुनायका' असे मागणे परमेश्वराकडे मागायचं आहे.'' . . . अशी किती उदाहरणे द्यावीत. प्रत्येकाला त्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणे मार्गदर्शन या प्रवचनातून मिळत असते. कोणीही निराश होण्याचे कारण नाही. ''संतांच्या संगतीमध्ये काही प्रत्यक्ष वैयक्तिक उपदेश मिळालाच पाहिजे अशा आग्रहाची जरुरी नाही. कोणाच्या द्वाराने कसे मार्गदर्शन मिळेल याचा नेम नाही. अवधूतांनी चोवीस गुरु केले. ज्याच्या मनामध्ये पूर्ण भक्ती आहे असा जो अधिकारी साधक असेल त्या साधकाला कुठूनही मार्गदर्शन मिळू शकते'' असे गुरुजी आवर्जून सांगतात. तेव्हा आश्वासक सद्गुरु आपली काळजी घेतीलच असा मोठाच दिलासा साधकाला वाटतो. 'नाना सिद्धिद्येचे गुण। याहिवरी कृपाळूपणा।' हे समर्थांनी सांगितलेले सद्गुरुचे लक्षण गुरुजींच्या ठायी होते हे या ग्रंथाबद्दल प्रवचनातून ठळकपणे लक्षात येते.



सत्कार्ये/सत्कर्मे

प. पू. श्रीदत्तमहाराजांचे समग्रजीवन हे सत्कार्यरूपच आहे. वामननिवास बांधून झाल्यावर त्या ठिकाणी श्री. लोकनाथतीर्थांचे स्मरणार्थ तुळजाभवानी आरोग्यधाम हे स्त्रियांकरिता रोगचिकित्सा केंद्र सुरू झाले त्याप्रमाणे वाडीच्या पैलतीरावर असलेले अमरेश्वराच्या पुरातन मंदिराच्या जीर्णोद्धाराचे काम बऱ्याच प्रमाणावर पूर्ण होत आले आहे. अशी ही मोठाली कार्ये भविष्यात जनकल्याणासाठी उभी रहात आहेत.

श्री दत्त अमरेश्वर

नरसोबावाडीत मनोहर पादुकांचे दर्शन हजारो भक्तमंडळी घेत असतात. कृष्णामाईच्या ऐलतीरावर हे स्थान तर पैलतीरावर श्री अमरेश्वरांचे स्थान प्राचीन आहे. विश्वेश्वरांचे हे जुने स्थान गर्द अशा झाडीत लपलेले आहे. या ठिकाणी श्री. नरसिंहसरस्वती स्वामीमहाराज भिक्षेला जात असत. त्याला औरवाड म्हणतात. याचे जुने नाव अमरापूर असे आहे.

अमरापूर म्हणजे ग्राम। स्थान असे अनुपम। जैसा प्रयाग संगम। तैसे स्थान मनोहर वृक्ष असे औदुंबर। प्रत्यक्ष जाणा कल्पतरु देव असे अमरेश्वर। तया संगमी जाणया अमरेश्वर संविधानी। आहेत चौसष्ठ योगिनी भक्तितीर्थ निर्गुणी। प्रख्यात असे परियेसा (श्री गुरुचरित्र ८ वा अध्याय)

या अमरापुरात विश्वेश्वरांचा कायमच वास असतो. या ठिकाणी चौसष्ठ योगिनी रहातात. काशीक्षेत्रासारखे या ठिकाणचे महत्त्व आहे. कृष्णा पंचगंगा संगमात स्नान केल्याने प्रयागामध्ये स्नान केल्याचे पुण्य प्राप्त होते. अशा या ठिकाणी श्रीनरसिंहसरस्वती स्वामीमहाराज भिक्षेसाठी एका ब्राह्मणाच्या घरी आले. या ब्राह्मणाच्या घरी भिक्षा देण्यासारखे काही नव्हते. त्यावेळी घेवड्याची भाजी त्यांनी गुरुना दिली. श्रीगुरुमहाराज प्रसन्न झाले. जाताना त्यांनी घेवड्याचा वेल उपटून टाकला. त्याखाली पैशाचा हंडा सापडला. त्या ब्राह्मणाचे दारिद्र्य गेले. ही गोष्ट प्रत्यक्ष अमरापुरात घडली आहे.

श्रीनरसिंहसरस्वती स्वामीमहाराजांची पावले ज्या ठिकाणी फिरली ती सर्व जागा तीर्थक्षेत्र झाली. असे हे पुरातन शिवगुरुचे स्थान. या ठिकाणीच श्रीमद्वासुदेवांनदसरस्वती स्वामीमहाराज येऊन राहिले. त्यांचे शिष्य श्रीमत् दीक्षित स्वामी महाराज येऊन राहिले. प. पू. श्रीदीक्षीत स्वामीमहाराजानी चौसष्ट योगिनीची मूर्त स्वरुपात स्थापना केली. श्रीमत्वासुदेवानंसरस्वती स्वामीमहाराजांचे गुरुपीठ स्थापन केले. या अमरेश्वरात श्रीदत्तात्रय भगवंताची क्षुधा घेवड्याची शेगांनी तृप्त झाली. त्या अमरेश्वरी आपली भक्तीची भूक नाही का पुरी होणार?

चौसष्ट योगिनींची कथा

श्रीगुरुनृसिंहसरस्वती स्वामीमहाराज कृष्णातिरी असलेल्या औदुंबराखाली अनुष्ठानात बसले असताना मध्यान्हकाळी चौसष्ट योगिनी श्रीगुरुना भिक्षेस अमरेश्वरी न्यायला येत असत. त्यांच्या आमंत्रणावरून श्रीगुरु भिक्षेसाठी अमरेश्वरी जात. चौसष्ट योगिनींकडून भिक्षादान घेऊन परत येत. हा कार्यक्रम रोज ऐश्वर्यसंपन्न अशा थाटात चाले. सर्व जवळच्या लोकांना असे वाटायचे श्रीगुरु येथे असून भिक्षेला कसे येत

नाहीत. तिन्हीकाळ कोणता कार्यक्रम असतो? कोणाला पत्ता लागत नसे. एके दिवशी श्रीगंगानुज नावाच्या गरीब शेतकऱ्यास गुरुंबरोबर अमरेश्वरी जाण्याची संधी मिळून श्रीगुरुं मागोमाग लपत-छपत तो गेला आणि तेथील ऐश्वर्य पाहून दिपून गेला. श्रीगुरुंचे सहज त्याच्याकडे लक्ष गेले. तेव्हा त्याला येण्याचे कारण विचारता दर्शनास आलो क्षमा असावी असे म्हणाला. त्याचे उत्तर ऐकून श्रीगुरु म्हणाले ही बातमी कोणास सांगू नकोस. हे वृत्त प्रकट केलेस तर तात्काळ मृत्यू येईल. तरीही या वृत्ताचे पडसाद जनमानसात पसरले व गुरुंची किर्ती दिगंत झाली. श्रीगुरु कृष्णातटी बरीच वर्ष राहिले. पुढे गाणगापूरला जायला निघाले. चौसष्ठ योगिनी भेटण्यासाठी आल्या आणि नमन करून म्हणाल्या ''आपण निघालात? पुढे आमची वाट काय?'' श्रीगुरु म्हणाले या ठिकाणी औदुंबर आहे त्या ठिकाणी माझा नित्यवास आहे. या औदुंबर वृक्षाखाली मी पादुका ठेवीत आहे. या पादुकांची पुजाअर्चा जे करतील त्यांना तुम्ही सहाय्य करावे. ही सेवा तुमची श्रीगुरुचरणी रुजू होईल. दर्शन घडेल. त्यावेळेपासून सर्व योगिनी अमरेश्वरी राहिल्या. असे अमरेश्वराचे वेगळे महत्त्व आहे.

माणगांव महात्म्यामध्ये अशी एक कथा आहे. चौसष्ट योगिनीतील मुख्य देवी यक्षिणी हिला श्रीगुरुनी सांगितले की तू काही काळ या ठिकाणी वास कर. नंतर कोकणातील सावंतवाडीतील माणगांव मुक्कामी जा. या भूमीत टेंबेकुळी माझा भक्त श्रीगणेश वास करून राहील. त्यांचे पोटी तेजःपुंज ईश्वरीअंश जन्म पावेल. तोच योगिराज जाणावा. त्या ठिकाणी तू पुढे वास कर. माणगावला यक्षिणी देवीचे मोठे मंदिर आहे.

या दत्तअमरेश्वराचे व चौसष्ट योगिनींचे महात्म्य फार मोठे आहे. त्या चौसष्ट योगिनींची आठवण, स्मरण म्हणून आठ योगिनींची स्थापना अमरेश्वर मंदिरात प. प. श्रीदीक्षितस्वामी महाराजांनी केली आहे. असे हे प्रासादिक व जुने देवस्थान ह्याचा जिर्णोद्धार व्हावा अशी परमपूज्य श्रीदत्तमहाराजांच्या मनात बरेच दिवस इच्छा उत्पन्न झाली. त्यांचा तो हेतू पूर्ण होण्याची वेळ आली आहे.

सत्य संकल्पाचा दाता नारायण। सर्व करी पूर्ण मनोरथ ॥१॥
येथें अलंकार शोभती सकळ। भावबळे फळ इच्छेचे ते ॥२॥
अंतरीचे बीज जाणे कळवळा। व्यापक सकळा ब्रह्मांडाचा ॥३॥
तुका म्हणे नाही चालत तातडी। प्राप्त काळ घडी आल्यावीण ॥४॥

परमपूज्य श्रीगुळवणीमहाराजांनी नरसोबाची वाडी येथील सभामंडप उभारण्याचे काम केले. कोणतेही अशा तऱ्हेचे काम होण्यासाठी सत्पुरुषांचा सत्यसंकल्प असावा लागतो. अमरेश्वराच्या जीर्णोद्धारामागे परमपूज्य श्रीदत्तमहाराजांचा सत्यसंकल्प आहे तो जवळजवळ पुरा होत आला आहे. हे काम गुरुपरंपरेचे आहे. गुरुंची प्रेरणा सर्वांच्या मनामध्ये होऊन सर्व भक्तमंडळींच्या सहाय्याने ह्याला उत्तम स्वरुप प्राप्त होणार आहे.

ह्या कामामध्यें श्रीयुत नागले (गोरेगांव) व श्रीयुत लाटे (पुणे) ह्यांचा सिंहाचा वाटा आहे. परमपूज्य श्रीदत्तमहाराजांनी स्वतः या दोघांच्या बाबतीत असे उद्‌गार काढले आहेत की, ''श्री नागले व श्री लाटे एवढे मोठे दोन बलवत्तर आधार आहेत की पैशाकरिता काम अडू दिले नाही''. प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या तोंडची वाक्ये ऐकून प्रत्येकालाच आनंद झाला. अशी काम करणारी भक्तमंडळी असतात तेव्हाच मोठाली कामे उभी रहातात. मनाला वाटले आपण काय देणार यांना? श्रीगुरुमहाराजांच्या आशीर्वादानेच ऐहिक व पारलौकिक जीवनाचे सार्थक होईल. श्री गुरुद्वादशीच्या उत्सवात प. पू. श्रीदत्तमहाराज या अमरेश्वराच्या वास्तूत तीन रात्र राहिले. ही एक पुण्यप्रद घटना आहे. या अमरेश्वराच्या मंदिरात श्रीदीक्षितस्वामींच्या सांगण्यावरून वयाच्या १६ व्या वर्षापासून ४० वर्ष भागवत सप्ताह प. पू. श्रीदत्तमहाराजांनी केला. या मंदिराचा संपूर्ण कायापालट झाला. तेच मंदिर चांगले बांधल्यामुळे चौसष्ट योगिनी पुन्हा आनंदित झाल्या असतील. त्यांनी महाराजांशी हितगुज केले असेल. श्रीदीक्षित स्वामीमहाराजांना आनंद झाला असेल ह्यात शंका नाही. लोकांना या वास्तूत रहाता येईल. साधन, नामस्मरण, पठण ह्या गोष्टी करता येतील. पूर्व, पश्चिम दोन्हीकडे आरतीचे, महापूजेचे निनाद पुन्हा नव्या जोमाने उमटू लागतील ह्याचा आनंद गुरुपीठाला होणे स्वाभाविक आहे. या ठिकाणी लवकरच कृष्णेला घाट बांधला जाणार आहे.

प. प. श्रीवासुदेवानंदपीठ ज्या प. पू. श्रीदीक्षित स्वामीमहाराजांनी स्थापन केले, त्यामध्ये आपण स्वतः तेथे राहिले. असा हा सारा पवित्र परिसर! श्रीगुरुंचे स्थान देखणेपणे उभे राहिले हे ही प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या जीवनातील एक अतिशय भव्य दिव्य गुरुभक्तीने भारलेले असे काम आहे.



तो पूर्ण आनंद गुरू समर्थ

चराचरी व्यापकता जयाची। अखंडभेटी मजला तयाची।
परंपदी संगम पूर्ण झाला। विसरू कसा मी गुरूपादुकाला

प. प. दीक्षित स्वामीमहाराजांनी अमरेश्वर येथे प. प. वासुदेवानंद विद्यापीठ या नावाचे आपल्या गुरुंचे स्थान निर्माण केले आहे तर पुण्याला श्रीगुरूमहाराजांनी वासुदेव निवास स्थापन केला आहे. प. प. श्रीदीक्षितस्वामीमहाराज व प. पू. श्रीगुळवणीमहाराज, प. प. श्रीवासुदेवानंदाचे निस्सिम भक्त.

अमरेश्वर येथे प. प. श्रीदीक्षितस्वामी महाराजांनी प. प. श्रीवासुदेवानंदस्वामी महाराजांच्या पादुका ठेवल्या आहेत. त्यांची पूजा रोज एकभक्त येऊन करीत असतो.

प. पू. श्रीगुरूमहाराजांच्या अंतरीची तळमळ स्वामींनी जाणली व श्रीगुरूमहाराजांचा आनंद द्विगुणित करावा अशी इच्छा केली. एक दिवस विलक्षणच घडले. अमरेश्वरी पूजा करणाऱ्या भक्ताला आपण पादुका घेऊन जावे अशी इच्छा झाली. ती कां व्हावी हे एक देवच जाणे! पूजा करून पादुका पिशवीत घालून तो पुजारी निघून गेला. ज्यावेळी पादुका व सेवेकरी नाहीत हे लक्षात आले तेव्हा संस्थानचे विश्वस्तांनी ताबडतोब सर्वत्र तपास सुरू केला. प. पू. श्रीगुळवणीमहाराजांना देखील पुण्याला कळविले. हे वृत्त आश्रमात कळल्यावर प. पू. श्रीदत्तमहाराजांसकट सर्वांना हुरहुर लागली. त्याच रात्रौ प. पू. श्रीदत्तमहाराजांना स्वप्न पडले की, अमरेश्वर येथील पादुका घेऊन सेवेकरी आश्रमात येऊन एका कोपऱ्यात बसला आहे. प. पू. श्रीदत्तमहाराज आन्हिक आटपून सकाळी लौकरच आश्रमात आले. तो कोपऱ्यात एक मनुष्य गाठोड्यासह बसलेला दिसला.

स्वप्नाची प्रचीति आली. गाठोड्यात असलेल्या पादुकांचे दर्शन आम्हाला द्या असे प. पू. श्रीदत्तमहाराजांनी म्हणताक्षणीच तो मनुष्य गडबडला. घाबरू नका. आम्ही आपणास काही करणार नाही असे म्हटल्यावर त्याने पादुका दाखविल्या. प. पू. श्रीदत्तमहाराजांनी नमस्कार केला व पादुकांना वर घेऊन प. पू. श्रीगुरुमहाराज बसले आहेत त्या खोलीत चला असे त्याला सांगितले. आंतल्या खोलीत श्रीगुरूमहाराज बसले होते. हरवलेल्या पादुका आश्रमात नेमक्या आल्या हे कळल्यावर श्रीगुरूमहाराज अतिशय आनंदित झाले. अष्टसात्विक भाव उफाळून आले. भक्ताला भेटण्यासाठी स्वामीमहाराज आश्रमात आले. अंतरीचे मनोगत श्रीगुरुमहाराजांनी त्यावेळी प्रगट केले. ''आम्हाला फार वाटत होते की अमरेश्वरहून या पादुका मस्तकी धारण करून आणाव्यात व पोचवाव्यात. परंतु येथे पादुकांचे वास्तव्य एकदां व्हावे तो हेतु गुरूमाऊलींने ओळखून या चोरीचे निमित्त करून आमची हौस पुरी केली. त्यांचाच हा निवास आहे तो धन्य झाला. या पादुका आता चातुर्मास ठेवून घेऊ नंतर आम्ही त्या स्वतः आणून अमरेश्वरला पोचवू.''

अमरेश्वर विश्वस्त कसे नाही म्हणणार? गुरुभक्तांची तीव्र इच्छा कोण नाकारणार? तो सेवेकरी खजील होऊन परत चालला होता. त्याला तसे सोडले नाही. 'प्रसाद घ्या व नंतर जा पण पुन्हा असे करू नका' असे सांगितले.

आश्रमाच्या देवघरात वेगळे आसन तयार करून पादुका आसनस्थ झाल्या. रोज यथासांग पूजा घडू लागली. पहाटे ५॥/६ वाजता काकडा सुरू झाला. प. पू. श्रीगुरुमहाराज त्यावेळी पहाटे काकड्यासाठी खाली येत असत. प. पू. श्रीगुरुमहाराजांना इतका आनंद झाला होता की त्यांनी पं. आत्मारामशास्त्रींना बोलवून घेतले. वाडीसारखी काकड आरती करण्याची विनंती केली.

''तो पूर्ण आनंद गुरूसमर्थ'' प. प. श्रीस्वामीमहाराजांनी केलेल्या वर्णनाप्रमाणे गुरुंनी आनंदी आनंद केला यात शंकाच नाही. प. पू. श्रीगुरुमहाराजांनी चार

महिन्यानंतर स्पेशल गाडी करून आपण स्वतः जाऊन पादुका अमरेश्वर मंदिरात पोचवून शिवाय संस्थेला देणगी दिली.

प. पू. श्रीदत्तमहाराजाना पडलेल्या स्वप्नाप्रमाणे पादुका आश्रमात हजर व्हाव्यात व श्रीगुरूमहाराजांची इच्छा पूर्ण व्हावी यांत ईश्वरी संकेत दिसतो. पुन्हा एकदा प. पू. श्रीदत्तमहाराज व प. पू. श्रीगुळवणीमहाराज यांचे नाते कसे अतूट होते याची प्रचीती आली.

याच अमरेश्वराचा जीर्णोद्धार आज प. पू. श्रीदत्तमहाराजांनी केला आहे. श्रीवासुदेवानंदपीठ व श्रीवासुदेव निवास दोन्ही स्थाने सुंदर पवित्र ठेवण्याची धुरा ईशगुरुकृपेने त्यांनी सांभाळली आहे.

चराचरी व्यापकता जयाची । अखंड भेटी मजला तयाची
परंपदी संगम पूर्ण झाला। विसरू कसा मी गुरुपादुकाला ।

या श्लोकाप्रमाणे गुरुपदी आपण सर्वही एकरूप होऊया.

प. प. श्रीलोकनाथतीर्थ स्वामीमहाराज स्मारकातर्फे तुळजाभवानी आरोग्यधाम



श्री वामननिवासात श्रीगुरुमहाराजांचा जन्मशताब्दी उत्सव उत्तम तऱ्हेने पार पडला. दरवर्षी प. पू. श्रीगुळवणीमहाराजांची पुण्यतिथी या वास्तूतच साजरी होत असते. त्यानंतरचा मोठा कार्यक्रम म्हणजे प. पू. श्रीदत्तमहाराजांचा सहस्त्रदर्शन शांती सोहळा. हा कार्यक्रम पार पडल्यावर श्री वामन निवासाचे संपूर्ण स्वरुप आणखीनच बदलले.

यज्ञादिक कार्यक्रम, वेद पठण, नामजप या गोष्टीमुळे वामननिवास शुद्ध पवित्र झाला. प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या मनात या ठिकाणी एक आवश्यक असे सेवाकार्य सुरु करावयाचे होते. म्हणून या ठिकाणी मूर्तीची स्थापना केली नाही. एकतर मूर्ती म्हटले की पूजाअर्चा व्यवस्थित करणे आवश्यक. तेव्हा हे देवकार्य वेगळ्या प्रकारानी व्हावे अशी त्यांची इच्छा होती.

आपल्याला मिळणारा मानवदेह हा वारंवार मिळणारी गोष्ट नाही. सत्‌चिदानंद स्वरुप प्रत्यक्ष अनुभवण्याचे सामर्थ्य या मानवी देहात आहे. श्रीसमर्थ रामदास म्हणतात,

धन्य धन्य हा नरदेहो। येथील अपूर्वता पाहो ।
जो जो किजे परमार्थ लाहो। तो तो पावे सिद्धिते ।।

या नरदेहाचे आरोग्य सांभाळले पाहिजे. प. पू. श्रीदत्तमहाराजांचे म्हणणे असे आहे की आपल्याकडील माताभगिनी फार सोशिक असतात. त्या स्वतःच्या प्रकृतीची पुष्कळ हेळसांड करतात. तेव्हा त्यांना थोड्या मूल्यात औषधोपचाराची व्यवस्था उपलब्ध व्हावी. सर्वच भगिनी नोकरी करीत नाहीत. असलेल्यांनाही मिळालेला पैसा आपल्या प्रकृतिकरिता खर्च व्हावा असे वाटत नाही. तेव्हा त्या जे कष्ट सोसत असतात त्याकरिता त्यांच्या आरोग्याची योग्य काळजी घेतली जावी म्हणून श्री तुळजाभवानी आरोग्यधाम काढून हे सेवाकार्य येथे घडावे. अशी श्रीगुरुमहाराजांची प. पू. श्रीदत्तमहाराजांना प्रेरणा झाली होती. शिवाय प्रत्येक गोष्टीला भगवंताचे अधिष्ठान लागते. वामननिवास ही वास्तू अतिशय पवित्र आहे. त्या अधिष्ठानात आरोग्यधाम काढल्यामुळे मनास एक अध्यात्मिक आधार सापडतो. मनाचा धीर वाढतो. या ठिकाणी योगासने शिकविली जातात. नामसाधनाही येथे करता येते. पुष्कळ भगिनीना त्या ठिकाणी मनःशांती मिळते. श्री तुळजाभवानी हिचे सामर्थ्य आपण महाराष्ट्रवासी जाणतोच. पण प. पू. श्रीवामनरावजी गुळवणीमहाराजांची ही कुलदेवता आहे. प. पू. श्रीधरस्वामीमहाराजांनी तुळजाभवानीची महापूजा दरवर्षी करावी असे श्रीगुळवणीमहाराजांना सांगितले होते. प. पू. श्रीदत्तमहाराज दरवर्षी तुळजापूरला जाऊन हिची महापूजा करीत असत. अजूनही ते व्रत चालू आहे म्हणून आरोग्यधामला त्या शक्तीपीठाचे नाव दिले आहे.

हे लोकनाथतीर्थ स्वामीमहाराजांचेही स्मारक आहे. प. पू. श्रीवामनरावजी गुळवणीमहाराजांनी वासुदेवनिवासमध्ये आपल्याबद्दल कोणतीही गोष्ट राहू नये म्हणून काळजी घेतली होती. मग वामननिवासाला ते कसे हो म्हणाले याचे आश्चर्य वाटत होते. प. पू. श्रीदत्तमहाराज प. पू. श्रीगुळवणीमहाराजांच्या पुण्यतिथी उत्सवाच्या समारोपाच्या भाषणात म्हणाले, 'संताच्या वागण्याचा उलगडा तात्काळ होत नाही तो योग्यवेळी होत असतो. स्वामी लोकनाथतीर्थांचे नांवे काहीतरी सेवा करण्याचा हेतू श्रीगुरुमहाराजांच्या मनात होता. वामननिवास स्थापन झाला तर त्यामध्ये आपल्याला त्यांचे स्मारक करता येईल असे वाटून त्यांनी वामननिवासाला संमति दिली. हे वामन निवासाच्या अनुमतीने सिद्ध झाले आहे. त्यामुळे आमच्याही मनातील शंका पूर्णपणे दूर झाली आहे. प. पू. श्रीलोकनाथतीर्थांचे स्मारक ही प. पू. श्रीगुरुमहाराजांची प्रेरणा आहे असे महत्त्वपूर्ण उद्‌गार श्रीदत्तमहाराजांनी काढले. त्यामुळेच लोकनाथतीर्थांचे स्मारक म्हणून त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त आरोग्यधाम उघडता आले आहे. डॉ. पाध्ये व सौ. पाध्ये दोघेही येथे आयुर्वेदिक औषधे देऊन आरोग्यसेवा करीत असतात. शिवाय लहान मुलांना पोलिओ होतो त्यावरही या ठिकाणी इलाज होतात. डॉ. वाघण्णा जळगावहून प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शनिवारी येथे येतात.

१-४-१९९३ श्रीरामनवमीच्या शुभमुहुर्तावर तुळजाभवनी आरोग्यधामाच्या आंतररुग्ण विभागाचे उदघाटन प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या हस्ते करण्यात आले. रुग्णांना तपासून ॲलोपॅथिक उपचार करण्याचा बाह्य विभागही सुरु करण्यात आला. डॉ. अरुंधती मानवी प्रधान विश्वस्त म्हणून आपलेंपणाने आरोग्यधाम सांभाळतात. प. पू. श्रीगुळवणी महाराजांचा आशीर्वाद त्यांना लाभला आहे. त्याची हकीगतही विलक्षण आहे.

योजना ईश्वराची

ईश्वरी इच्छेने कशा गोष्टी घडतात हे मानवी मनाला समजत नाही. लहान असताना कु. अरुंधती आपल्या आईबरोबर दर्शनासाठी आश्रमात जात असत. त्यावेळी प. पू. श्रीगुळवणीमहाराज होते. त्या एस.एस.सी. झाल्या. आईबरोबर प. पू. श्रीगुरुमहाराजांना नमस्कार करण्यासाठी गेल्या असता कौतुकाने पाठीवर शाबासकी देताना प. पू. श्रीगुळवणीमहाराज सहजपणे म्हणाले की काय डॉक्टर होणार ना? डॉ. अरुंधती म्हणतात त्यांच्या सहज उद्‌गारामध्ये माझ्या भविष्याचे आलेख दडलेले होते. मेडिकल कॉलेजमधे प्रवेश मिळविण्यासाठी त्यांना फक्त दोन गुण कमी पडले होते. नाईलाजाने सूक्ष्मजीवशास्त्र घेऊन त्या बी.एस.सी उत्तमगुणाने उत्तीर्ण झाल्या. आता डॉक्टर होण्याची आशा संपलीच होती. त्यांची आई म्हणे की प. पू. श्रीगुळवणीमहाराजांचे शब्द खोटे ठरणार नाहीत. त्यांचे शब्द म्हणजे त्यांचा संकल्प असतो. प. पू. श्रीमहाराज देहाने ब्रह्मीभूत झाले असले तरी ते आहेतच अशी त्यांच्या आईची श्रद्धा होती. आता पुढे काय? असा प्रश्न होताच. पण अचानक जे घडले ती गुरुकृपा होती.

त्यांच्या मैत्रिणीचे वडील भेटायला आले. ते म्हणाले तुम्ही एम.बी.बी.एस.च्या प्रवेशासाठी अर्ज भरा. या वर्षी गुणांची टक्केवारी काही अनपेक्षित कारणामुळे खाली गेली आहे. त्यांनी दोघीचे फॉर्म भरून घेऊन नेऊन दिले आणि काय आश्चर्य? पंधरा दिवसात घरी पत्र येऊन पडले की त्यांचे यादीत नांव असून मुलाखतीसाठी त्यांना बोलावले होते. वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश ही किती कठीण गोष्ट आहे याची आपल्याला कल्पना आहे. पण सद्‌गुरुकृपेमुळे हे सारे घडले अशी त्यांची पूर्ण खात्री आहे. सदगुरुंचा शब्द खरा झाला. जीवशास्त्रामधेही त्यांना पारंगत करून डॉक्टर बनविले याचे डॉ. अरुंधती यांना फार नवल वाटले. यात प. पू. श्रीयोगीराजांची दूरदृष्टी दिसून येते. आधुनिक विज्ञानाचे संस्कार यथोचित व्हावेत अशी जणू काळजीच घेतली.

श्रीगुरुकृपेने त्यांचे पदव्युत्तर शिक्षण पार पडले. त्यांनी ''औषध चिकित्सा'' (जनरल मेडिसिन) हा विषय जेव्हा घेतला तेव्हा ह्या स्त्री विद्यार्थीनीने हा विषय घ्यावा

प. पू. श्रीगुरूमहाराजांच्या अंतरीची तळमळ स्वामींनी जाणली व श्रीगुरूमहाराजांचा आनंद द्विगुणित करावा अशी इच्छा केली. एक दिवस विलक्षणच घडले. अमरेश्वरी पूजा करणाऱ्या भक्ताला आपण पादुका घेऊन जावे अशी इच्छा झाली. ती कां व्हावी हे एक देवच जाणे! पूजा करून पादुका पिशवीत घालून तो पुजारी निघून गेला. ज्यावेळी पादुका व सेवेकरी नाहीत हे लक्षात आले तेव्हा संस्थानचे विश्वस्तांनी ताबडतोब सर्वत्र तपास सुरू केला. प. पू. श्रीगुळवणीमहाराजांना देखील पुण्याला कळविले. हे वृत्त आश्रमात कळल्यावर प. पू. श्रीदत्तमहाराजांसकट सर्वांना हुरहुर लागली. त्याच रात्रौ प. पू. श्रीदत्तमहाराजांना स्वप्न पडले की, अमरेश्वर येथील पादुका घेऊन सेवेकरी आश्रमात येऊन एका कोपऱ्यात बसला आहे. प. पू. श्रीदत्तमहाराज आन्हिक आटपून सकाळी लौकरच आश्रमात आले. तो कोपऱ्यात एक मनुष्य गाठोड्यासह बसलेला दिसला.

स्वप्नाची प्रचीति आली. गाठोड्यात असलेल्या पादुकांचे दर्शन आम्हाला द्या असे प. पू. श्रीदत्तमहाराजांनी म्हणताक्षणीच तो मनुष्य गडबडला. घाबरू नका. आम्ही आपणास काही करणार नाही असे म्हटल्यावर त्याने पादुका दाखविल्या. प. पू. श्रीदत्तमहाराजांनी नमस्कार केला व पादुकांना वर घेऊन प. पू. श्रीगुरुमहाराज बसले आहेत त्या खोलीत चला असे त्याला सांगितले. आंतल्या खोलीत श्रीगुरूमहाराज बसले होते. हरवलेल्या पादुका आश्रमात नेमक्या आल्या हे कळल्यावर श्रीगुरूमहाराज अतिशय आनंदित झाले. अष्टसात्विक भाव उफाळून आले. भक्ताला भेटण्यासाठी स्वामीमहाराज आश्रमात आले. अंतरीचे मनोगत श्रीगुरुमहाराजांनी त्यावेळी प्रगट केले. ''आम्हाला फार वाटत होते की अमरेश्वरहून या पादुका मस्तकी धारण करून आणाव्यात व पोचवाव्यात. परंतु येथे पादुकांचे वास्तव्य एकदां व्हावे तो हेतु गुरूमाऊलींने ओळखून या चोरीचे निमित्त करून आमची हौस पुरी केली. त्यांचाच हा निवास आहे तो धन्य झाला. या पादुका आता चातुर्मास ठेवून घेऊ नंतर आम्ही त्या स्वतः आणून अमरेश्वरला पोचवू.''

अमरेश्वर विश्वस्त कसे नाही म्हणणार? गुरुभक्तांची तीव्र इच्छा कोण नाकारणार? तो सेवेकरी खजील होऊन परत चालला होता. त्याला तसे सोडले नाही. 'प्रसाद घ्या व नंतर जा पण पुन्हा असे करू नका' असे सांगितले.

आश्रमाच्या देवघरात वेगळे आसन तयार करून पादुका आसनस्थ झाल्या. रोज यथासांग पूजा घडू लागली. पहाटे ५॥/६ वाजता काकडा सुरू झाला. प. पू. श्रीगुरुमहाराज त्यावेळी पहाटे काकड्यासाठी खाली येत असत. प. पू. श्रीगुरुमहाराजांना इतका आनंद झाला होता की त्यांनी पं. आत्मारामशास्त्रींना बोलवून घेतले. वाडीसारखी काकड आरती करण्याची विनंती केली.

''तो पूर्ण आनंद गुरूसमर्थ'' प. प. श्रीस्वामीमहाराजांनी केलेल्या वर्णनाप्रमाणे गुरुंनी आनंदी आनंद केला यात शंकाच नाही. प. पू. श्रीगुरुमहाराजांनी चार

महिन्यानंतर स्पेशल गाडी करून आपण स्वतः जाऊन पादुका अमरेश्वर मंदिरात पोचवून शिवाय संस्थेला देणगी दिली.

प. पू. श्रीदत्तमहाराजाना पडलेल्या स्वप्नाप्रमाणे पादुका आश्रमात हजर व्हाव्यात व श्रीगुरूमहाराजांची इच्छा पूर्ण व्हावी यांत ईश्वरी संकेत दिसतो. पुन्हा एकदा प. पू. श्रीदत्तमहाराज व प. पू. श्रीगुळवणीमहाराज यांचे नाते कसे अतूट होते याची प्रचीती आली.

याच अमरेश्वराचा जीर्णोद्धार आज प. पू. श्रीदत्तमहाराजांनी केला आहे. श्रीवासुदेवानंदपीठ व श्रीवासुदेव निवास दोन्ही स्थाने सुंदर पवित्र ठेवण्याची धुरा ईशगुरुकृपेने त्यांनी सांभाळली आहे.

चराचरी व्यापकता जयाची । अखंड भेटी मजला तयाची
परंपदी संगम पूर्ण झाला। विसरू कसा मी गुरुपादुकाला ।

या श्लोकाप्रमाणे गुरुपदी आपण सर्वही एकरूप होऊया.



प. प. श्रीलोकनाथतीर्थ स्वामीमहाराज स्मारकातर्फे



तुळजाभवानी आरोग्यधाम

श्री वामननिवासात श्रीगुरुमहाराजांचा जन्मशताब्दी उत्सव उत्तम तऱ्हेने पार पडला. दरवर्षी प. पू. श्रीगुळवणीमहाराजांची पुण्यतिथी या वास्तूतच साजरी होत असते. त्यानंतरचा मोठा कार्यक्रम म्हणजे प. पू. श्रीदत्तमहाराजांचा सहस्रदर्शन शांती सोहळा. हा कार्यक्रम पार पडल्यावर श्री वामन निवासाचे संपूर्ण स्वरुप आणखीनच बदलले.

यज्ञादिक कार्यक्रम, चेद पठण, नामजप या गोष्टीमुळे वामननिवास शुद्ध पवित्र झाला. प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या मनात या ठिकाणी एक आवश्यक असे सेवाकार्य सुरु करावयाचे होते. म्हणून या ठिकाणी मूर्तीची स्थापना केली नाही. एकतर मूर्ती म्हटले की पूजाअर्चा व्यवस्थित करणे आवश्यक. तेव्हा हे देवकार्य वेगळ्या प्रकारानी व्हावे अशी त्यांची इच्छा होती.

आपल्याला मिळणारा मानवदेह हा वारंवार मिळणारी गोष्ट नाही. सत्‌चिदानंद स्वरुप प्रत्यक्ष अनुभवण्याचे सामर्थ्य या मानवी देहात आहे. श्रीसमर्थ रामदास म्हणतात,

धन्य धन्य हा नरदेहो। येथील अपूर्वता पाहो ।
जो जो किजे परमार्थ लाहो। तो तो पावे सिद्धिते ।।

या नरदेहाचे आरोग्य सांभाळले पाहिजे. प. पू. श्रीदत्तमहाराजांचे म्हणणे असे आहे की आपल्याकडील माताभगिनी फार सोशिक असतात. त्या स्वतःच्या प्रकृतीची पुष्कळ हेळसांड करतात. तेव्हा त्यांना थोड्या मूल्यात औषधोपचाराची व्यवस्था उपलब्ध व्हावी. सर्वच भगिनी नोकरी करीत नाहीत. असलेल्यांनाही मिळालेला पैसा आपल्या प्रकृतिकरिता खर्च व्हावा असे वाटत नाही. तेव्हा त्या जे कष्ट सोसत असतात त्याकरिता त्यांच्या आरोग्याची योग्य काळजी घेतली जावी म्हणून श्री तुळजाभवानी आरोग्यधाम काढून हे सेवाकार्य येथे घडावे. अशी श्रीगुरुमहाराजांची प. पू. श्रीदत्तमहाराजांना प्रेरणा झाली होती. शिवाय प्रत्येक गोष्टीला भगवंताचे अधिष्ठान लागते. वामननिवास ही वास्तू अतिशय पवित्र आहे. त्या अधिष्ठानात आरोग्यधाम काढल्यामुळे मनास एक अध्यात्मिक आधार सापडतो. मनाचा धीर वाढतो. या ठिकाणी योगासने शिकविली जातात. नामसाधनाही येथे करता येते. पुष्कळ भगिनीना त्या ठिकाणी मनःशांती मिळते. श्री तुळजाभवानी हिचे सामर्थ्य आपण महाराष्ट्रवासी जाणतोच. पण प. पू. श्रीवामनरावजी गुळवणीमहाराजांची ही कुलदेवता आहे. प. पू. श्रीधरस्वामीमहाराजांनी तुळजाभवानीची महापूजा दरवर्षी करावी असे श्रीगुळवणीमहाराजांना सांगितले होते. प. पू. श्रीदत्तमहाराज दरवर्षी तुळजापूरला जाऊन हिची महापूजा करीत असत. अजूनही ते व्रत चालू आहे म्हणून आरोग्यधामला त्या शक्तीपीठाचे नाव दिले आहे.

हे लोकनाथतीर्थ स्वामीमहाराजांचेही स्मारक आहे. प. पू. श्रीवामनरावजी गुळवणीमहाराजांनी वासुदेवनिवासमध्ये आपल्याबद्दल कोणतीही गोष्ट राहू नये म्हणून काळजी घेतली होती. मग वामननिवासाला ते कसे हो म्हणाले याचे आश्चर्य वाटत होते. प. पू. श्रीदत्तमहाराज प. पू. श्रीगुळवणीमहाराजांच्या पुण्यतिथी उत्सवाच्या समारोपाच्या भाषणात म्हणाले, 'संताच्या वागण्याचा उलगडा तात्काळ होत नाही तो योग्यवेळी होत असतो. स्वामी लोकनाथतीर्थांचे नांवे काहीतरी सेवा करण्याचा हेतू श्रीगुरुमहाराजांच्या मनात होता. वामननिवास स्थापन झाला तर त्यामध्ये आपल्याला त्यांचे स्मारक करता येईल असे वाटून त्यांनी वामननिवासाला संमति दिली. हे वामन निवासाच्या अनुमतीने सिद्ध झाले आहे. त्यामुळे आमच्याही मनातील शंका पूर्णपणे दूर झाली आहे. प. पू. श्रीलोकनाथतीर्थांचे स्मारक ही प. पू. श्रीगुरुमहाराजांची प्रेरणा आहे असे महत्त्वपूर्ण उद्‌गार श्रीदत्तमहाराजांनी काढले. त्यामुळेच लोकनाथतीर्थांचे स्मारक म्हणून त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त आरोग्यधाम उघडता आले आहे. डॉ. पाध्ये व सौ. पाध्ये दोघेही येथे आयुर्वेदिक औषधे देऊन आरोग्यसेवा करीत असतात. शिवाय लहान मुलांना पोलिओ होतो त्यावरही या ठिकाणी इलाज होतात. डॉ. वाघण्णा जळगावहून प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शनिवारी येथे येतात.

१-४-१९९३ श्रीरामनवमीच्या शुभमुहुर्तावर तुळजाभवनी आरोग्यधामाच्या आंतररुग्ण विभागाचे उदघाटन प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या हस्ते करण्यात आले. रुग्णांना तपासून ॲलोपॅथिक उपचार करण्याचा बाह्य विभागही सुरु करण्यात आला. डॉ. अरुंधती मानवी प्रधान विश्वस्त म्हणून आपलेंपणाने आरोग्यधाम सांभाळतात. प. पू. श्रीगुळवणी महाराजांचा आशीर्वाद त्यांना लाभला आहे. त्याची हकीगतही विलक्षण आहे.

योजना ईश्वराची

ईश्वरी इच्छेने कशा गोष्टी घडतात हे मानवी मनाला समजत नाही. लहान असताना कु. अरुंधती आपल्या आईबरोबर दर्शनासाठी आश्रमात जात असत. त्यावेळी प. पू. श्रीगुळवणीमहाराज होते. त्या एस.एस.सी. झाल्या. आईबरोबर प. पू. श्रीगुरुमहाराजांना नमस्कार करण्यासाठी गेल्या असता कौतुकाने पाठीवर शाबासकी देताना प. पू. श्रीगुळवणीमहाराज सहजपणे म्हणाले की काय डॉक्टर होणार ना? डॉ. अरुंधती म्हणतात त्यांच्या सहज उद्‌गारामध्ये माझ्या भविष्याचे आलेख दडलेले होते. मेडिकल कॉलेजमधे प्रवेश मिळविण्यासाठी त्यांना फक्त दोन गुण कमी पडले होते. नाईलाजाने सूक्ष्मजीवशास्त्र घेऊन त्या बी.एस.सी उत्तमगुणाने उत्तीर्ण झाल्या. आता डॉक्टर होण्याची आशा संपलीच होती. त्यांची आई म्हणे की प. पू. श्रीगुळवणीमहाराजांचे शब्द खोटे ठरणार नाहीत. त्यांचे शब्द म्हणजे त्यांचा संकल्प असतो. प. पू. श्रीमहाराज देहाने ब्रह्मीभूत झाले असले तरी ते आहेतच अशी त्यांच्या आईची श्रद्धा होती. आता पुढे काय? असा प्रश्न होताच. पण अचानक जे घडले ती गुरुकृपा होती.

त्यांच्या मैत्रिणीचे वडील भेटायला आले. ते म्हणाले तुम्ही एम.बी.बी.एस.च्या प्रवेशासाठी अर्ज भरा. या वर्षी गुणांची टक्केवारी काही अनपेक्षित कारणामुळे खाली गेली आहे. त्यांनी दोघीचे फॉर्म भरून घेऊन नेऊन दिले आणि काय आश्चर्य? पंधरा दिवसात घरी पत्र येऊन पडले की त्यांचे यादीत नांव असून मुलाखतीसाठी त्यांना बोलावले होते. वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश ही किती कठीण गोष्ट आहे याची आपल्याला कल्पना आहे. पण सद्‌गुरुकृपेमुळे हे सारे घडले अशी त्यांची पूर्ण खात्री आहे. सदगुरुंचा शब्द खरा झाला. जीवशास्त्रामधेही त्यांना पारंगत करून डॉक्टर बनविले याचे डॉ. अरुंधती यांना फार नवल वाटले. यात प. पू. श्रीयोगीराजांची दूरदृष्टी दिसून येते. आधुनिक विज्ञानाचे संस्कार यथोचित व्हावेत अशी जणू काळजीच घेतली.

श्रीगुरुकृपेने त्यांचे पदव्युत्तर शिक्षण पार पडले. त्यांनी ''औषध चिकित्सा'' (जनरल मेडिसिन) हा विषय जेव्हा घेतला तेव्हा ह्या स्त्री विद्यार्थीनीने हा विषय घ्यावा

याचे त्यांच्या सहकाऱ्यांना फार आश्चर्य वाटले. त्यांना जनरल मेडिसन या विषयाचा काय फायदा असे व्यावहारिक दृष्टीने वाटले. त्यांनी नेटानी अभ्यास करून ध्येय गाठले. आज ते फलदायी ठरले असे कळून येत आहे. कुठलीही गुंतागुंतीची केस असली की त्या सद्गुरुंचे स्मरण करतात. त्यामुळे कोडे उलगडावे तशी केसची उकल होते. योग्य तो निर्णय घेता येतो असे त्या मोठ्या अभिमानाने सांगत असतात. त्याचे वरिष्ठ डॉक्टर्सही काही वेळा त्यांच्या निदानाने आश्चर्यचकित होतात. त्याचे स्पष्टीकरण विचारतात. सद्गुरु कृपेचा झालेला परिस स्पर्श त्यांना आठवतो. त्या मूक राहतात. त्यांच्यावरील शक्तिपात अशा रितीने त्यांना अनुभवायला मिळाला. हे सारे सद्गुरुच करून घेतात अशी त्यांची खात्री आहे. डॉ. अरुंधती MD झाल्यावर प. पू. श्रीदत्तमहाराजांनी त्यांना बोलावून घेतले व ही आरोग्यधामची जबाबदारी सांभाळाल कां असे विचारले. तेव्हा प. पू. श्रीगुळवणीमहाराजांची डॉक्टर होण्यामागील ही एक आणखी प्रेरणा वेगळी असावी असे त्यांच्या लक्षात आले. अर्थातच या सर्व गोष्टीच्या मागे असलेला सद्गुरु संकल्प आता उघड झाला.

सद्गुरुंच्या स्मृतीसाठी बांधलेल्या वास्तुमधे दुःखित रुग्णांना दिलासा देण्यासाठी सद्गुरुंनी त्यांची निवड केली असावी. हा देह, सेवेने या वास्तुसाठी झिजावा अशी त्यांची सद्गुरुचरणी प्रार्थनाही आहे.

या सर्व गोष्टीचे नीट लक्षपूर्वक चिंतन केल्यास असे लक्षात येते की सद्गुरु संकल्प हे समाजाच्या हितासाठी वेगवेगळ्या पद्धतीने साकार होतात. संतांचे जीवन हे निर्मळ असते. देहबुद्धी नसल्यामुळे ते ईश्वरस्वरुप झालेले असतात. जग नश्वर आहे हे त्यांना माहित असते तरीही हा परमेश्वराचा चिद्विलास आहे. तेव्हा जनताजनार्दनाची सेवा झाली पाहिजे अशी त्यांची भावना असते.

डॉ. अरुंधती मानवी यांची नियुक्ती अशी ईशसंकेताने झाली आहे. तेव्हा आपले हे आरोग्यधाम त्या सेवाभावी वृत्तीने चालवून भगिनी वर्गाला आधारभूत होतील याची खात्री बाळगण्यास हरकत नाही. औषधाबरोबर एखादी माळ देवाचे स्मरण म्हणून करित चला असेही त्या सांगू शकतील. ईश्वरी स्मरण किंवा त्याची भक्ति ही मनाला खरे समाधान देणारी आहेत. डॉ. अरुंधतींना हे पटलेले असल्यामुळे शरीराच्या आरोग्याबरोबरच मनाचे आरोग्य त्या रुग्णांना देतील. हे आरोग्यधाम एक वेगळ्याच प्रकारचे आहे असा नावलौकिक त्या प्राप्त करून घेतील. श्रीसद्गुरुंचे नांव उज्ज्वल करतील अशी खात्री वाटत आहे.

प. पू. श्रीस्वामीलोकनाथतीर्थांचे स्मरण अशा तऱ्हेने निरंतर जागृत ठेवण्याचे काम हे तुळजाभवानी आरोग्यधाम नंदादीपाप्रमाणे करील. हा सेवेचा नंदादीप असाच तेवत राहो. हीच सद्गुरुचरणी प्रार्थना आहे. ही प्रार्थना करीत असताना महाराष्ट्रामधे शक्तिपीठाची गंगा आणणारे प. पू. श्रीलोकनाथतीर्थ स्वामी यांच्या पदकमली कृतज्ञतेची अंजुळी वहात आहो.

प. पू. श्रीलोकनाथतीर्थ स्वामीमहाराज यांनी प. पू. श्रीवामनरावजी गुळवणी महाराजांचेकडे ही योगविद्या सुपूर्त केली. पुण्यामधे तर पाणपोईच आहे. आज या पीठाचे उत्तराधिकारी प. पू. श्रीदत्तमहाराज तृषार्त जिवांना मार्गस्थ करण्याचे काम अखंड करीत आहेत. अशा या त्रयमूर्तींना त्रिवार वंदन.

या तुळजाभवानी आरोग्यधामचे पाच विश्वस्त आहेत

१) डॉ. अरुंधती मानवी M. D. (Medicine) प्रधान विश्वस्त
२) डॉ. कु. रत्ना कोकजे M. D., D.G.O.
३) डॉ. सौ. विनजा राजीव पांडे M.B.B.S.
४) डॉ. व्ही. व्ही. देशमुख M.D. (Pathology)
५) श्री. रघुनाथराव कुलकर्णी विश्वस्त

डॉ. व्ही. व्ही. देशमुख :-- एक साधक भक्त. त्यांची वृत्ती ज्ञानभक्तीनी संस्कारित आहे. रोज ते श्री वासुदेवनिवासात येतात. प. पू. श्रीदत्तमहाराजांचे जवळ वेळ मिळेल तसा ग्रंथवाचून ज्ञानसाधना करीत असतात. प. पू. श्रीदत्तमहाराजांना आश्रमातून घरी घेऊन जाण्याचे काम श्रद्धेने, सेवाभावाने करीत असतात. अध्यात्माची आवड असणारे असे हे विश्वस्त आहेत. आरोग्यधामचे हे दुसरे आधारस्तंभ.

डॉ. कु. रत्ना कोकजे :-- स्वतःचे रुग्णालय असूनही तुळजाभवानी आरोग्यधामासाठी वेळ देतात. श्रीवासुदेवनिवासाजवळच राहतात.

डॉ. सौ. विनजा पांडे :-- श्रीदत्तमहाराजांवर श्रद्धा असणाऱ्या डॉक्टर स्वतःचा व्यवसाय संभाळून आरोग्यधामाला मदत करतात.

श्री. रघुनाथराव कुळकर्णी :-- प. पू. श्रीगुळवणीमहाराजांच्या वेळेपासूनचे सेवेकरी गुरुभक्त आहेत. प. पू. श्रीदत्तमहाराजांबरोबर ते सतत प्रवासात असतात त्यांच्या प्रकृतिची काळजी घेत असतात. लोकसंग्राहक वृत्तीने आरोग्यधामसाठी देणग्या गोळा करीत असतात.


श्री. उ. र. उर्फ अनंतराव कुर्लेकर :-- प. पू. श्रीगुळवणीमहाराजांपासून आश्रमात येणारे आहेत. पूर्वी दिल्लीला सरकारी नोकरीत होते. सेवानिवृत्तीनंतर पुण्यास स्थायिक. अनेक सामाजिक संस्थात ते काम करीत असतात. वामन निवासात योगासने शिकवितात कायदेशीर व तांत्रिक अडचणी मधे मार्गदर्शन करीत असतात.

असा प. प. श्रीलोकनाथतीर्थ स्वामीमहाराजांच्या स्मरणार्थ आरोग्य सेवा प्रकल्प सद्गुरु प्रेरणेने सुरु आहे.



कविश्वरांच्या वास्तुचा जिर्णोद्धार

नरसोबाच्या वाडीलाच प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या पिताजींचे घर आहे. या ठिकाणी महाराजांचे आजोबा प. पू. श्रीवक्रतुंडमहाराज ह्यांनी वास केला होता. वडिल धुंडीराजमहाराज हेही येथे राहिले. हे घर श्रीदत्तमहाराजांचे जन्मस्थान आहे. प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराज ह्यांची श्रीदत्तमहाराजांच्या बाबतीतील भविष्यवाणी ह्या घरातच उच्चारली गेली. सन्यासी असल्याने अत्यंत कडक सोवळे. कधीही कोठेही न जाणारे श्रीवासुदेवानंद स्वामीमहाराज श्रीदत्तमहाराजांना बघण्यासाठी १० दिवसाच्या आतच ह्या घरात गेले. श्रीदत्तमहाराजांकडे पाहून म्हणाले, ''वक्रतुंडबुवा आपण आलात का?'' पवित्र परमपूज्य श्रीवक्रतुंड महाराज हे फार मोठे अधिकार संपन्न असे अधिकारी सत्पुरुष होते. ते प्रवचन ऐकायला आल्याशिवाय प. प. श्रीवासुदेवांनदस्वामीमहाराज प्रवचनाला सुरवात करीत नसत. अशा या अवतारी विभूतीची पावले या घरात पडली. प. प. श्रीगुळवणीमहाराज ह्या घरात आलेले आहेत. श्रीदत्तमहाराजांचा जन्म, मुंज, शिक्षण, विवाह ह्या ठिकाणी झाला आहे. घर जुने झाल्यामुळे तेथे कोणी रहात नसल्याने त्या घराची दुरुस्ती करणे मंदिराच्या जिर्णोद्धारा इतकेच महत्वाचे काम होते. तेही काम देऊळगावराजा येथील लोकांनी पूर्ण केले आहे. श्रीदत्तमहाराज व आईसाहेब ह्यांनी श्रीवक्रतुंडमहाराजांचा फोटो हातात घेऊन गृहप्रवेश केला. पुण्याहवाचन झाले. पुण्याहवाचनाला बसले असताना मनात भावतरंग उमटले. प. पू. श्रीवक्रतुंड महाराजांना खूप आनंद झाला असेल की ही वास्तू चालू झाली. महाराजांनी ह्याचाही ट्रस्ट केला आहे. कोणाही साधकाला अनुष्ठानाला वाडीला जायचे असेल तर या जागेचा उपयोग करता येईल व तशी योग्य सोय उपलब्ध करून ठेवली आहे. अशी अनेक तऱ्हेची पुण्यकर्मे घराण्याच्या परंपरेला व गुरुपीठाला शोभतील अशी प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या हातून होत आहेत.



श्री दत्तमहाराजांचे जन्मस्थान
वास्तू श्रीक्षेत्र नृसिंहवाडी

वासुदेव निवासातील अतिरुद्र अनुष्ठान



आश्रमामधे अनेक धार्मिक अनुष्ठाने, यज्ञयाग, पारायणे चालू असतात. नामजपाचे सप्ताह ही चालतात. अशा या निरनिराळ्या वेदानुष्टानाने आश्रमातील वातावरण नेहमी पवित्र व प्रसन्न असते हा फरक जाणवतो. आपले मन आनंदित होते. साधनाला बसले तर वातावरणातील निरोगीपणामुळे, लक्ष चटकन लागते. याला ही अनुष्ठाने, रोजची यथासांग पूजा, नैवेद्य व धार्मिक अधिष्ठान कारणीभूत आहे. चालू काळात अशा यज्ञयागासाठी, अनुष्ठानासाठी योग्य ती शिकलेली माणसे मिळणे कठीण असूनही या ठिकाणी असे मोठाले यज्ञ याग होतात. अनुष्ठाने होत असतात. हे सद्गुरुंच्या कृपेचे फळ आहे.

आश्रमात नेहमी येणारे व प. पू. श्रीदत्तमहाराजांबरोबर प्रवासात नेहमी असणारे श्री. रघुनाथराव कुळकर्णी यानी नुकतेच एक अतिरुद्र अनुष्ठान केले. हे अनुष्ठान एक महान कार्य होते. सद्गुरु कृपाप्रसादाशिवाय ते पार पडणे अशक्य होते.

अतिरुद्राभिषेक ११ दिवस व नंतर पाच दिवस महारुद्र स्वाहाकार असा फार मोठा धार्मिक कार्यक्रम पार पडला. या अतिरुद्र अनुष्ठानासाठी निरनिराळ्या ठिकाणाहून ऋत्विज आलेले होते. नागपूरचे श्रीदत्तात्रयशास्त्री तेलंग, वे. मू. श्रीकृष्णराव आर्वीकर व त्यांचे पिताश्री श्रीगोविंदभट्ट आर्वीकर, गोकर्णाहून वे. मू. श्रीजोगळेकर, वसईचे श्रीगोविंदभट्ट परांजपे, पुण्यातील विद्वान मंडळीही होती. धारवाडचे पं. राजेश्वरशास्त्री उप्पिनबेटगिरी सपत्निक आले होते. या सर्व थोर मंडळीचा निवास आश्रमात होता. अशी सदाचार संपन्न उपासक वेदोमूर्तींच्या राहण्याने, त्यांच्या पवित्र शुद्ध वेदोच्चारामुळे आधीच शक्तिसंपन्न असलेला आश्रम किती तेजोमय होत असेल याची आपण सर्वांनी मनपूर्वक जाणीव मनात बाळगून आश्रम सदैव तेजस्वी पवित्र राहण्यासाठी प्रत्येकाने वागले पाहिजे, मदत केली पाहिजे, काळजी घेतली पाहिजे असे सहजच मनात येऊन जाते. आपुलकीची आपलीसुद्धा बांधिलकी आश्रमाशी नक्कीच आहे. अतिरुद्र अनुष्ठानाचा तपशील आपल्या सर्वांना माहीत असावा म्हणून खाली देत आहो.

१ लघुरुद्र	=	१२१ रुद्रावर्तने
११ लघुरुद्र	=	१३३१ रुद्रावर्तने = एक महारुद्र
११ महारुद्र	=	१४६४१ रुद्रावर्तने = अतिरुद्र

अकरा दिवसपर्यंत ३५ ब्राह्मण रोज ८ ते १२ हा रुद्राभिषेक करीत असत. प. पू. श्रीगुळवणी महाराजांच्या देवातील प्रसाद पादुकांवर हा अभिषेक होत असे. रोज सायंकाळी गायन प्रवचन असाही कार्यक्रम ठेवलेला होता. याच काळात पुण्यातील घनपाठी श्री. गुळसुंदकर गुरुजी यांनी ऋग्वेद पारायण तर श्री. अभय पाठक यांनी यज्जुर्वेद पारायण असे मोठे अनुष्ठान केले. दररोज अन्नदान झाले. इतके सर्व रोजचे व्यवस्थित पार पडले व प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या चित्ताला परम संतोष झाला.


वेदमूर्ती श्री. आप्पाशास्त्री कोडणीकर हे देवघरात पादुकांवर होणाऱ्या अभिषेकासाठी ८ ते १ बसत असत हीच फार मोठी सद्गुरुकृपा वाटते. जवळ जवळ २० एक दिवस तरी हे सर्व सातत्याने चालू होते.

प्रसाद पादुका.


श्रीवासुदेव निवासातील देवघरातील प्रसाद पादुका या प. पू. श्रीयोगीराज श्रीवामनरावजी गुळवणी महाराजांच्या मातोश्रींना प्रत्यक्ष मिळालेल्या प्रसाद पादुका आहेत. प. पू. श्रीगुरुमहाराजांच्या मातोश्रींची पवित्र स्मृती व पारमार्थिक अधिकार दोन्ही यात सामावलेले आहेत. या सदगुरु म्हणजेच शिवगुरु पादुका आहेत. आज अनेक वर्षे यांचे काळजीपूर्वक जतन, पूजन, भक्ति हे सर्व प. पू. श्रीगुळवणी महाराजांनी केलेले आहे. ही अर्चन भक्ती ती प. पू. श्री नाना भालेराव यांनी अनेक वर्षे केलेली आहे व आता ही सेवा नित्य नियमाने वे. मू. श्री आप्पा कोडणीकर गेली २० वर्षे तितक्याच प्रेमाने, पवित्र्याने, काळजीपूर्वक करीत आहेत. नित्य पवमानरुद्र अनुष्ठानपूर्वक पूजा असते असे सुपुजित झालेले हे देव पाहून पाहणाऱ्याचे मन भक्तीभावनेने फुलून येते. या प्रसाद पादुका श्री तुळजाभवानी माता व सद्गुरु श्री वासुदेवनंद सरस्वती यांच्यासाठीच प. पू. श्रीदत्तमहाराजांनी पानशेत धरण फुटल्यावर आश्रमाचा संकल्प केला. प. पू. श्रीदत्तमहाराज यांच्या अंतरंगात सदगुरुंचे स्थान किती अढळ आहे त्याचे महत्व त्यांना किती आहे हे जसे वेळोवेळी दिसून येते. त्याप्रमाणेच या अतीरुद्र अनुष्ठान त्याच प्रसाद पादुकांवर व्हावे ही जी प. पू. श्रीदत्तमहाराजांची योजना त्यात त्यांचा अतीव अशा गुरुभावना आहेतच त्या पादुकांचे महत्त्व किती आहे याची कल्पना आपल्यालाही यावी अशी त्यांची इच्छा आहे.

एरवी याच पादुकांवर अनुष्ठान व्हावे असे वाटले नसते. हे सर्व ऐकून मनात येते या प्रसाद पादुका या अभिषेकांच्या धारानी संतुष्ट झाल्या असतील. वरुन दिसणाऱ्या या मंत्रयुक्त जलधारा म्हणजे प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या अंतरंगातील भक्ती

श्री रेणुका निवास



देवतार्चन




श्रीगुरू करिती जै अंगीकारू। तैं होऊनी ठाके संसारू। मोक्षमय आघवा

तुळजाभवानी आरोग्यधाम उद्घाटनप्रसंगी




प. पू. श्रीदत्तमहाराज व डॉ. अरुंधती मानवी

वाडीत श्रीगुरूंची शुभद पावले पडण्यापूर्वीचे



श्रीदत्त अमरेश्वर स्थान (जिर्णोद्धाराचे काम चालू) (संदर्भ - पान क्र. २७७ वर)


आद्य शंकराचार्य



ज्या आचार्य पिठांनी
प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या
ज्ञानाचा सदैव गौरव केला
त्यांचे स्मरण हे या चरित्राचे
भूषण आहे.

धारवाडची आद्य शंकराचार्य पाठशाळा

याच पवित्र पाठशाळेत
प. पू. श्रीदत्तमहाराजांची
बुद्धी परतत्व स्पर्श
पावत होती.




सौ. आईसाहेबांची सहस्त्रचंद्रदर्शन शांती



तुलादान

सौ. ताईमहाराजांची वारूणी शांती



तुलादान

धाराही आहेत. त्याचे असे सतत आवर्तन सुरु आहे. या वेदोक्त व भक्तीयुक्त अशा अनुष्ठानाने सद्गुरु प्रसन्न झाले आहेत. व आशीर्वाद सर्व साधक मंडळींना मिळाला आहे. आपल्या सर्वांवर सद्गुरुमहाराजांचा कृपावर्षाव झाला आहे. श्री. रघुनाथरावांच्या हातून प. पू. श्रीदत्तमहाराजांनी हे पूजन सर्वांच्या कल्याणासाठीच करुन घेतले आहे स्वतः प. पू. श्रीदत्तमहाराजानी रोज हजर राहून हे यथासांग कर्म करुन घेतले आहे.

ग्रंथाचा समारोप करता करता अशा काही अलौकिक गोष्टी घडल्या. त्यामुळे या पवित्र पादुकाचे पुन्हा एकदा ग्रंथाच्या शेवटी स्मरण झाले, वंदन घडले या गुरुपादुकांवर शब्दरूपी बिल्वदल वाहता आले ही एक कृपा आहे. म्हणून म्हणते. हे शिवगुरुनाथा संभाळून घेऊन क्षमा करा

करचरणकृतं वाक्कायजं कर्मजंवा
श्रवण नयन जं वा मानसं वापराधम्।
विहितमविहितं वा सर्वमेतत्क्षमस्व
जय जय करुणाब्धे श्री महादेवशंभ्भो

श्रीमत् शंकराचार्य विरचितं शिवापराधमापनस्तोमं



एवं ॐ तत्सदाकारू । ब्रह्मनाम हे त्रिप्रकारू ।
हे फूल तुरंबी सुंदरू । उपनिषद ते

ज्ञाने १७/४३

• दर्शन

सगुणाचे दर्शन आपल्याला प. पू. श्रीदत्तमहाराजांचे पुण्याला गेले की होते. पण त्यांच्या अंतरंगाचे दर्शन हे खरे शाश्वत दर्शन आहे. ते आपण आपल्या केवळ बुद्धीने घेऊ शकत नाही. त्याकरिता स्वानुभवाचे मौक्तिकमणी हवेत त्याकरता भक्तांच्याच अनुभवाकडे पोचले पाहिजे तरच प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या परमेश्वरी अंतरंगाचे थोडे दर्शन होईल.



• सुसंवाद

सामान्य माणसांना अनेक प्रश्न भेडसावीत असतात. उत्तरे कोण देणार? प. पू. श्रीदत्तमहाराज आपणाशी सुसंवाद साधण्यास मोकळेपणी परवानगी देतात व त्यातूनच अनेकांचे समाधान होत असते.


प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या जीवनाचे संपूर्ण दर्शन आपल्याला आकलन होईलच असे नाही. त्यांच्या जीवनाला अनेक पैलु आहेत ते विश्वव्यापी आहेत. आपल्याला जे दर्शन हवे आहे ते त्यांच्या विशाल व शुद्ध अंतःकरणाचे. आपण त्यांच्या जीवनांतील वेगवेगळ्या प्रसंगातून वेगवेगळ्या व्यक्तींकडून ते आकलन करुन घेण्याचा प्रयत्न केला. पण आपल्यासारखे सामान्यलोक त्यांचेकडे लौकिक व पारमार्थिक मार्गदर्शनासाठी जातात त्यावेळीही प. पू. श्रीदत्तमहाराज प्रत्येक व्यक्तिची सात्विकता वाढावी, प्रत्येकाच्या आवाक्याप्रमाणे प्रभूसेवा हातून घडावी असा प्रयत्न करीत असतात.

अशा अनेकविध शिष्यांचे ते कल्याण करतात. त्याला ईश्वर सन्निध नेतात. व्यक्ती तितक्या प्रकृती याप्रमाणे प्रत्येकाचे पूर्वसुकृत जाणून त्याला मार्गस्थ करतात. त्याचा तोल संभाळतात, जीवनात उभा करतात. सामान्य माणसाला या आधाराची फार गरज असते. प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या याकार्याची आपल्याला कल्पना कशी येणार? ज्याला जे झेपेल तसेच ते सांगत असतात. याची वाच्यता नसते. कधी साध्या अभंगातूनही वात्सल्यभावाने उपदेश करीत असतात.

सुखाची आवडी घे कारे गोविंदी । चित्त हे आनंदी ठेवूनिया ।।
मनाची मोहर लावा की रे कामी । मनोरथ कामी गुंतू नका ।।
अकळित काळ जव आहे दुरी । तव तू श्रीहरी चित्तवेगी ।।

ज्ञानेश्वरांचा हा अभंग हे त्याचे उदाहरण आहे. नामस्मरण करुन मन आनंदित करा. स्तोत्रपाठ, पारायणे, देवदर्शन अशा वेगवेगळ्या पद्धतीने ते आपले जीवन निर्भर करतात. आपल्याला भक्तांच्या अनुभवावरुन हे दर्शन होईल त्याकरिता अशा निष्ठावान साधकांना जे भावले, अनुभवले ते त्या साधकांनी आपल्या सर्वांकरता खुले केले. पुस्तकाची मर्यादा संभाळून त्यातील काही आपल्या पुढे ठेवीत आहे. आपआपल्या कुवतीप्रमाणे आपण हे दर्शन घेऊया.

बार्शीचे श्री. दादाशास्त्री जोशी



प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या जीवनाशी परंपरेने संबंध आलेले असे काही लोक आहेत. त्यापैकी बार्शीचे पं. दादाशास्त्री जोशी हे आहेत. पं. दादाशास्त्रींच्या वडिलापासून हा संबंध आलेला आहे. पं. दादाशास्त्रींचे वडील पू. प्रल्हादशास्त्री हे उत्तम वैय्याकरणी होते. व्याकरणाचा फार मोठा व्यासंग होता. प. पू. योगीराज श्रीगुळवणीमहाराजांचा त्यांच्यावर फार

लोभ होता. श्रीदादाशास्त्रींच्या मातोश्रींना प. पू. श्रीगुळवणीमहाराजांनी पहिली शक्तिपात दिक्षा दिली. हे एक शक्तिपात दीक्षेचा आरंभ म्हणून महत्त्वाचे आहे.

प. पू. श्रीदत्तमहाराज व दादाशास्त्री समवयस्क. बार्शीतील घरी प. पू. श्रीदत्तमहाराज असताना श्रीदादांचे वडिलांकडे नेहमी सकाळी व्याकरणावरील चर्चेसाठी येत असत. कायम उभे असत. प. पू. श्रीदत्तमहाराजांचे विनम्रभाव असे अंगी मुरलेले आहेत. सहज स्वभाव झाले आहेत. प. पू. श्रीदत्तमहाराज बार्शीला खूप रहात असत. पं. दादाशास्त्रींबरोबर अनेक ग्रंथांचे वाचन होई. सिद्धांतलेशसंग्रहावर प. पू. श्रीदत्तमहाराज सांगत होते. त्यावेळी प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या तोंडून सहजच उद्‌गार आले की धारवाडला शिक्षण पूर्ण झाल्यावर ग्रंथाची गाठ बांधली ती आता सोडली. इतके तयारीचे अध्ययन प. पू. श्रीदत्तमहाराजांचे होते. सायंकाळी भगवंत मंदिरात महाभारतावर बोलत. सकाळी पंचदशीवर लोकांसाठी सांगत असत.

पं. दादाशास्त्रीही उत्तम भागवत सप्ताह करीत. गाणगापूरला श्री. साबळेशेठजींच्या मठात प. पू. श्रीदत्तमहाराज व पं. दादाशास्त्री अशा जोड सप्ताह झाला होता. पं. दादाशास्त्रींना प. पू. श्रीदत्तमहाराजांनी आर्वजून संहिता वाचनासाठी बोलावले होते. पं. दादाशास्त्रींनी ते मान्यही केले होते. भागवत सप्ताहाला सुरवात करण्यापूर्वी त्यांचा घसा एकाएकी बसला. पं. दादाशास्त्रींना फार वाईट वाटले. त्यांची निष्ठा बळकट होती. ते तसेच गाणगापूरला गेले. श्रीदत्तमहाराजांना सर्व हकीगत सांगितली औषधे घेतली परंतु आवाज सुधारेना.

परमेश्वरावर सर्व सोपवून संहिता वाचनाला सुरवात करावी असे श्रीमहाराजांनी सांगितले. वाचू लागले की आवाज सुधारत जाई व हरयेनमः म्हटले की पुन्हा आवाज अगदी बसून जाई असे सात दिवस झाले. परंतु भगवंतावरील श्रद्धा इतकी मोठी होती की या महत्त्वाच्या अडथळयाचा त्यांनी बाऊ केला नाही. बळकट श्रद्धेने ते त्यातून पार पडले. हे निश्चितपणे अनुकरणीय आहे.

पं. दादाशास्त्रींचे चिरंजीव श्री. शरदराव एम्. ए. संस्कृत घेऊन झाले. याचा फार आनंद प. पू. श्रीमहाराजांना झाला. त्यांना एम. ए. च्या परिक्षेला सांख्यकारिका होती. श्री. शरदरावाना ती नीट समजली नव्हती. ही अडचण प. पू. श्रीदत्तमहाराजांना कळवितांच प. पू. श्रीदत्तमहाराजांनी उलट टपाली कळविले की श्रीभागवत सप्ताहासाठी आम्ही बार्शीला येत आहोत तेव्हा सात दिवसात रोज १० कारिका याप्रमाणे सर्व कारिका होऊन जातील. एकूण कारिका ७२ आहेत. त्याप्रमाणे रोज सकाळी प. पू. श्रीदत्तमहाराजांनी शरदरावांना सांख्यकारिका समजावून दिल्या. कोणी भेटायला आले तरी श्रीमहाराज म्हणत 'एक विद्यार्थी एम.ए. च्या परिक्षेला बसतो आहे तो विषय समजून देण्याचे चालले आहे' असे सांगून त्या सर्व ७२ कारिका श्री. शरदरावांना समजावून दिल्या. त्या विषयात श्री. शरदरावांना उत्तम गुण

मिळाले. पुढे त्यांनी पीएचडी व्हावे असे प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या मनात खूप होते. पदवीपेक्षा ही दोनतीन वर्षे त्या विषयाचा अभ्यास होईल, वाचन, मनन, होईल असे प. पू. श्रीदत्तमहाराजांना वाटत होते. नोकरी न करता प्रवचनाद्वारे लोकांना मार्गदर्शन करावे असेही त्यांना वाटत होते.

''पं. दादाशास्त्रींच्याकडून आपणास उत्तम मार्गदर्शन होईल. त्यांनी कोणत्याही विद्यापीठाची पदवी घेतलेली नाही तरीही त्यांच्या ज्ञानाला तोड नाही. त्यांच्या याज्ञिकीचा अभ्यासही उत्तम आहे हे सर्व तुम्हाला वडिलांकडून मिळणारे अमोल धन आहे.'' असे श्रीमहाराज श्री. शरदराव सांगत असत. पं. दादाशास्त्रींचा संसार उत्तम झाला. मुलामुलींची शिक्षणे, लग्नकार्ये सर्व झाले. हा सुद्धा एक आदर्श आहे. त्यांच्या संसाराची चिंता त्यावेळी प. पू. श्रीगुळवणीमहाराजांना सुद्धा वाटत होती. परंतु सर्व भार ईश्वराने वाहिला होता.

पंडित दादाशास्त्रींच्या वडिलांपासून ते आज त्यांचे चिरंजीव श्री. शरदरावांपर्यंत प. पू. श्रीगुळवणीमहाराज व प. पू. श्रीदत्तमहाराज असा परंपरेने आलेला हा प्रवाह आहे. सतत संतसहवासाचा लाभ घेणे चालू राहणे ही दुर्मिळ गोष्ट आहे. संतांचा सहवासाचा हा तीर्थापेक्षाही श्रेष्ठ मानला आहे. म्हणून अशा पं. दादाशास्त्रींच्या घराण्याला आमचे शतशः वंदन

दिनांक १८।५।९५ यादिवशी श्री. दादाशास्त्रींचा रौद्रीशांती सोहळा संपन्न झाला. त्याकरिता प. पू. श्रीदत्तमहाराज मुद्दाम पुण्याहून बार्शीला गेले होते.



प्रयागचे श्री पित्रे गुरुजी

प. पू. श्रीदत्तमहाराजांचे चरित्र लिहिताना लांबचे लोक सुद्धा कसे भेटतील असे वाटत असतानाच ते भेटावेत असा योग आला. संपूर्ण चरित्र हे प. पू. श्रीवामनरावजी गुळवणीमहाराजांच्या प्रेरणेनेच लिहिले जात आहे. याच्या पोच पावत्या सतत मिळत आहेत. कार्य करवून घेणारे तेच आहेत याची खात्री सारखी पटत आहे. चरित्राचा समारोप करीत असतानाच प्रत्यक्ष प्रयागतीर्थराजाची कावड घेऊन श्री पित्रे गुरुजी आश्रमात आले. या योगायोगात ईश्वरी सूत्र आहे. त्यांनी प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या काही आठवणी सांगितल्या. त्या स्मृती ही प्रयागची कावड आहे असे समजून त्यांचा समावेश केला आहे.

एकदा प. पू. श्रीदत्तमहाराज प्रयागला गेले होते. एक श्राद्धविधी करण्यासाठी तळपत्या उन्हातून लांबवर चालत जावयाचे होते. मे महिन्याचे दिवस. ऊन रणरणते होते. सारे दगड तापलेले होते. प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या पायात कधीच काही नसते. परंतु पायाला फोड येतील अशा या तापलेल्या रस्त्यावरुन कसे जावयाचे असा आम्हाला प्रश्न पडला. आम्ही त्या दगडावर ओले पंचे अंथरले. प. पू. श्रीदत्तमहाराजांनी पंच्यावरुन जावे असे वाटत होते. परंतु आश्चर्य असे की प. पू. श्रीदत्तमहाराज आंथरलेल्या पंच्यावरुन न जाता सरळ त्या दगडावरुन शांतपणे आपण ज्या चालीने चालतो तसे चालत गेले. पाय भाजताहेत म्हणून भरभर चालणे नाही. सहजस्थितितील ते चालणे होते. "सहज स्थिती अक्षयी लाभता पावसी स्वरूपाने" असे म्हटले जाते. श्री पित्रे म्हणाले आमची सर्वांची धावपळ झाली. त्यांचे चालणे पाहून आम्ही सर्व मंडळी आश्चर्यचकित झालो. कोणत्या प्रकारची ही सहनशीलता हे कळेना.

दुसरी अशीच एक आठवण त्यांनी सांगितली. श्राद्धविधी घरात चालू होता. प्रयागला गेल्यानंतर हे सर्व शास्त्रोक्त विधी करावयाचे असतात. सर्व ब्राह्मण वर्गाचे मंत्र म्हणणे चालू होते. प. पू. श्रीदत्तमहाराज बसले होते. त्या ठिकाणच्या खिडकीचे झडप उघडलेले होते ते लक्षात आले नाही. प. पू. श्रीदत्तमहाराज काही देण्याकरता उठले ते झडप इतक्या जोरात त्यांच्या डोक्याला लागले की आम्हा सर्वांचा जीव कळवळला. येवढ्या वयात हे लागणे व ते ही जोराचे. साऱ्यानाच आपल्या अनावधानाचा राग आला. आपले लक्ष कसे नाही असे वाटले!! परंतु प. पू. श्रीदत्तमहाराजांचा हात सुद्धा डोक्याकडे गेला नाही. ते शांतपणे काही न घडल्यासारखे म्हणाले, "चालू दे मंत्रविधी. थांबू नका." हे सर्व पाहून मती कुंठीत झाली. देहबुद्धी नाहीशी झाल्याचे आणखी कोणते उदाहरण हवे!

त्रिविध तापाने पोळलेले अनेक लोक प. पू. श्रीदत्तमहाराजांकडे येत असतात. तो त्यांचा ताप शमन करण्याकरता स्वतः कसे व्हावे लागते याचा प्रत्यय या श्रीपित्रेगुरुजींच्या प्रत्यक्ष बघितलेल्या घटनेवरून कळून येत आहे.



समर्थांचियो पंक्ति भोजने । तळिल्या वरिल्या एक पक्वान्ने ।
तेवी श्रवणे । अर्थी पठणे मोक्षुरचि कामे । ज्ञाने १८/४७

स्वानुभवाचे मौक्तिकमणी

प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराज यांचे शिष्य व प. पू. श्रीवामनरावजी गुळवणीमहाराजांचे गुरुबंधू श्री. शंकरकाका आजेगावकर यांचे नातू डॉ. दिलीप देशमुख व त्यांच्या पत्नी डॉ. सुरेखा देशमुख या दांपत्याचे अनुभव तर मनाला धीर देणारे आहेतच पण त्यांची निष्ठा व अध्यात्मिक दैनंदिनी ठेवण्याची पद्धत खरोखरच अनुकरणीय आहे.

ती. श्री शंकरकाका आजेगावकर यांच्या धाकट्या कन्या सौ. सिंधुताई व जावई श्री. प्रभाकरपंत यांच्या कुटुंबात परंपरेने आलेला गुरुभक्तीचा वारसा मुले सुना नातवंडे यानी घेतला आहे. प. पू. श्रीदत्तमहाराजांवर त्यांची नितांत निष्ठा आहे हे त्यांच्या वेळोवेळी केलेल्या पत्रव्यवहारावरुन कळून येत आहे. सन १९८२ ते १९९५ अशा कालावधीतील पासष्ठ पत्रांचा हा खजिना त्यांनी आपल्या साधक वर्गासाठी मोकळा केला आहे. ही पासष्ठ पत्रे म्हणजे साधन पासष्ठी म्हणायला काहीच हरकत नाही. त्यांतील काही मौक्तिक मणी येथे गुंफले आहेत.

जगदंब नमोस्तुते

डॉ. दिलीप यांच्या जीवनाचे एक खास वैशिष्ट्य दिसून येते की देवी भगवतीची त्यांच्यावर कृपा आहे. बालपणी डॉ. दिलीप शिक्षणासाठी मावशीकडे अंबेजोगाईला राहिले होते. या आंबेजोगाईने त्यांच्यावर मातेप्रमाणे कृपा करुन त्यांच्याजवळ शक्तीरुपाने ती सतत राहिली हे प. पू. श्रीदत्तमहाराजांनी जाणले आहे.

आणखी एक विशेष. बीडला स्थायिक होण्याचे ठरविल्यावर त्यांनी जे जहागीरदारांचे घर घेतले ते मालकच देवी उपासक आहेत. या वाड्यात अंबेजोगाई निवासिनी श्री योगेश्वरी देवीचा वास आहे. घरमालकांचे तेच कुल दैवत आहे. जागा मिळाली तीही देवीचे अधिष्ठान असलेली. हे सारे गुरुकृपेचेच योग वाटतात.

प. पू. श्रीदत्तमहाराजांनी वेळोवळी प्रत्यक्ष मार्गदर्शन व स्वतः हजर राहून जी कृपा केली व जी देवीची सेवा करुन घेतली ते पाहून सद्गुरु समर्थ रामदासांची आठवण होते. त्यानी तुझा तू वाढवी राजा असे श्रीशिवाजीमहाराजांकरता तुळजाभवानी देवीकडे मागणे केले आहे.

प. पू. श्रीदत्तमहाराजांनीही आदिशक्ती त्यांचे लौकीक, पारलौकिक कल्याण करील अशी सेवा देशमुख कुटुंबाच्या उपास्यदेवतेकडे पाहून प्रेमाने करुन घेतली आहे.

डॉ. दिलीप यांची साधक दैनंदिनी वाचत असताना त्यांचे देवीसेवाकार्य पाहून आपल्या मनालाही असे वाटू लागते हे कार्य सोपे नाही. आपले मन भारावून जाते.

देवीपाशी मागणे मागू लागते की, 'हे देवी तू अशीच या कुटुंबावर प्रसन्न रहा यांचेकडून व्यष्ठी समष्टी करता उत्तम कार्य करुन घे.'

प. पू. श्रीदत्तमहाराजांनी त्यांची आवड व त्यांची पूर्वसुकृत लक्षात घेऊन डॉ. दिलीप यांची देवीभक्ती वाढेल अशी सत्कर्मे त्यांच्याच मनाप्रमाणे करुन घेतली. प्रत्येक वेळी स्वतः हजर राहून ती सेवा डॉक्टरांकडून निर्दोष व्हावी याची पूर्ण काळजी घेतली. अमक्याच देवतेचे तुम्ही केले पाहिजे असा आग्रह धरला नाही. साधुसंत अनाग्रही असतात हे एक प. पू. श्रीमहाराजांच्या अमोलिक गुणाचे दर्शन याठिकाणी आपल्याला होते आहे.

डॉक्टरांच्या घरी प. पू. श्रीदत्तमहाराजांचे कृपेने एकूण ५ नवचंडीयाग ३ शतचंडीयाग एक सहस्रचंडीयाग झाले. आता लक्षचंडीची इच्छा डॉ. दिलीपनी प्रगट केल्यावर अयुतचंडीची कल्पना प. पू. श्रीमहाराजांनी सांगितली. त्याप्रमाणे सुरवातही झाली. डॉक्टरांच्या मनातून अशी इच्छा असे की आपल्या उत्पन्नाचा काही भाग देवीप्रीत्यर्थ खर्च व्हावा.

डॉक्टरांच्या घरी प्रथम भागवत सप्ताह झाला. प. पू. श्रीमहाराजांनी भागवत सांगताना आपल्या संपत्तीचा विनियोग कसा करावा हे सांगितले. २०% धर्माकरिता २०% भोग २०% बचत २०% परिवाराकरता २०% नावलौकिक वाढून किर्ती संपादन करण्यासाठी हे ऐकल्यावर दहाव्या भागाचा विनीयोग कसा करावा हा प्रश्न सुटला. तरीही नेमके पैसे कोठे खर्च करावेत हा प्रश्न आला. श्रीमहाराजांचे नेमके मार्गदर्शन लाभते असे उदा. योगेश्वरी देवीचे बांधकाम चालू आहे त्याला दान द्यावे का असे प. पू. श्रीदत्तमहाराजांना विचारता नवचंडीयाग करुन दानदक्षिणादि कार्ये करावीत असे श्रीमहाराजांचे सांगितले तेव्हापासून हे याग सतत होत आहेत.

डॉ. दिलीपना पडणारी स्वप्ने व त्यावर उपाय

सर्वच गोष्टी श्रीदत्तमहाराजांना कळविण्याची सवय झाली होती. १९८४ साली त्याना वाईट स्वप्ने पडू लागली. त्यावर प. पू. श्रीदत्तमहाराजांनी पत्रात उपाय कळविला. 'आपली स्वप्ने वाईट नाहीत. परंतु सर्व दोष जाणेकरता श्री विष्णुसहस्रनामाचे १२०० पाठ ब्राम्हणद्वारा किंवा घरी कोणीतरी करण्याचा संकल्प करुन रोज होतील तितके पाठ वाचावेत. हॉस्पिटल बांधून झाल्यावर भूशुद्धी होऊन सर्वांचे संरक्षण अखंड चालू रहावे अशी प्रार्थना करावी. बांधून झाल्यावर उदकशांत करावी.'

याठिकाणी प. पू. श्रीदत्तमहाराजांनी नवचंडी वगैरे न सांगता विष्णुसहस्र नामाचे पाठ का सांगावेत असा प्रश्न मनांत उभा राहतो. याचे कारण लक्षात येते.

सर्व देव एकच आहेत हा अनुभव प्रत्यक्ष प. पू. श्रीदत्तमहाराजांना आहेच. पण कोणत्या वेळी काय उपाय करावा हे देवता विज्ञानाचे ज्ञान त्यांना असल्यामुळे योग्य निदान व योग्य उपाय यांचा मिलाफ होतो. आपण संकटमुक्त होतो.

श्री भागवत ग्रंथामधे युधिष्ठिराने भीष्माचार्यांना प्रश्न विचारला आहे की, 'कशाचा जप केल्याने जीव जन्ममरणरुपी सांसारिक बंधनातून मुक्त होतो?' तेव्हा भीष्माचार्यानी श्रेष्ठ अशा पुरुषोत्तमाच्या सहस्त्र नामाचा जप करावा. मनुष्य सर्व दु:खातून मुक्त होतो असे सांगितले. भगवान शंकराचार्यांना विष्णुसहस्त्र नामाचे पठण फार आवडत असे. पहिले भाष्य त्यावरुन आहे. श्रीभागवत व श्रीशंकराचार्य या दोन्ही गोष्टी महाराजांना अतिशय प्रिय आहेत. शास्त्राधाराशिवाय प. पू. श्रीदत्तमहाराज कोणतीही गोष्ट करीत नाहीत हे देखील या ठिकाणी कळून आले.

भागवतसप्ताह

बीडला १९८२ साली भागवत सप्ताह झाला. घर मोठे होते म्हणून घरी करावा असे डॉ. दिलीपना वाटले. पण प. पू. श्रीदत्तमहाराजांनी तो धुंडीराजशास्त्री पाटांगणकरांचे देवळात करावा असे सुचविले. देवळात केला की कोणालाही येता येते. बोलवण्याचा अडसर येत नाही. श्री पाटांगणकराना आपले पूर्वसुकृत फळाला आल्यासारखे वाटले. हा सप्ताह सुरु होण्याचे आधी आणखी एक शुभ गोष्ट घडली. शृंगेरीपिठाधीश श्री. शंकराचार्यांचा मुक्काम त्यावेळी तेथे होता. प. पू. श्रीदत्तमहाराज व श्री रघुनाथराव दोघेही त्यांना भेटून आले होते. आचार्यजीना दुसऱ्या दिवशी जावयाचे होते. आचार्यांना प. पू. श्रीदत्तमहाराजांविषयी फार प्रेम होते. दुसरे दिवशी दुपारी डॉ. दिलीपना शोधीत एक मनुष्य आचार्यांकडून आला. तो म्हणाला "आपके घरमे ठहरे हुऐ आचार्यजीको यहा जल्दी ले आना। गुरुवर्य शंकराचार्यजी उन्हीके लिये रुके है।" प. पू. श्रीदत्तमहाराज वामकुक्षी करीत होते. निरोप ऐकल्यावर त्वरीत श्रीमहाराज पाटांगण मंदिरात गेले. श्री आचार्यांना परमानंद झाला. त्यांनी प. पू. श्रीदत्तमहाराजांना जवळ बसवून घेतले त्यांचा सत्कार करुन त्यांना शाल, श्रीफळ दिले. श्रीदेवी शारदाम्बेचा फोटो प्रसाद म्हणून दिला. शारदाम्बेच्या रुपाने देवीही या भागवत सप्ताहाला सन्मानपूर्वक आली असे सर्वांनाच वाटले. प. पू. श्रीदत्तमहाराजाना चारी पीठांचे श्रीशंकराचार्य मान देतात. त्याचीही प्रचिती आली. भागवत श्रवणाला देवीही शारदाम्बेच्या रूपात आली.

प. पू. श्रीदत्तमहाराज आले की डॉ. दिलीपना असे वाटे की आपण त्यांच्या सहवासाचा फायदा घ्यावा. रोजचे काम आहेच. प. पू. श्रीमहाराज याबाबतीत फार कर्तव्यदक्ष होते. ते म्हणायचे "रुग्णांची गैरसोय आपण करु नये. आपण दोघेही आपल्या कामावर जा." डॉ. दिलीप यांचे वडील प्रभाकरपंत यांना बरे नाहीसे झाले.

आजाराचे स्वरुप गंभीर होते. कर्क रोगाची शंका डॉक्टरना येत होती. प. पू. श्रीमहाराजांना ताबडतोब पत्रांनी कळविले. प. पू. श्रीमहाराजांचे उत्तर आले 'रोज एक ब्राम्हणद्वारा सप्तशतीचा पाठ देवीवर करीत जा. वडिलांच्या मुंबईला टाटामध्ये सर्व तपासण्या करविल्या. भिती वाटत होती तो कर्क रोग निघाला नाही. प. पू. श्रीदत्तमहाराजांचे असे अचूक मार्गदर्शन लाभून त्या त्या देवतांचे पूजन घडत असे.

डॉ. दिलीपनी जहागीरदारांचे जुने घर पाडून ज्यावेळी नवीन रुग्णालय बांधावयाचे ठरविले तेव्हा श्रीमहाराजांनी सर्व पायासुद्धा खणण्यास सांगितले. तेथे पूर्वीचे एक तळघर होते. त्यामुळे आतल्या भुमीला सूर्यदर्शन होऊन ती शुद्ध झाली. पाया खणताना त्यात पुष्कळ हाडे सापडली. डॉ. दिलीपना प्रश्न पडला. प. पू. श्रीमहाराजांना शंका विचारली. श्रीमहाराजांनी लगेच कळविलेकी ''वाडा फार जुना आहे. त्याकाळी भितीने दारे वगैरे बंद करुन आतच कोंडून राहण्याचे प्रसंग फार येत असत. त्यामुळे जनावरांच्या अस्थी निघाल्या असतील. वास्तुशांतीच्या वेळी सर्व कल्याणार्थ शतचंडी करावी.''

सहस्त्रचंडीला श्रीमहाराजही हजर होते . त्यावेळी प. पू. श्रीदत्तमहाराजांनी केलेला उपदेश सर्वांनीच लक्षात ठेवण्यासारखा आहे. ''देवा धर्माचे करताना एक गोष्ट नेहमी लक्षात ठेवावी. मुलांची शिक्षणे, मंगलकार्ये हे सुद्धा देवाचेच करणे आहे असे मानून आनंदाने केले पाहिजे तिकडे दुर्लक्ष होता नये. संसार हाच परमार्थाचा आधार देऊन करावा.'' ही फार मोठी शिकवण सर्वांना उपयोगी पडण्यासारखी आहे.

डॉ. दिलीपना पुत्ररत्नाचा लाभ

दोन मुलींच्या पाठीवर सहा वर्षांनी गुरुकृपेने डॉ. ना मुलगा झाला. प्रसूतीच्या आधीच आठदिवस प. पू. श्रीमहाराज, आईसाहेब अचानक सर्व मंडळी बीडला येऊन गेली होती. पाद्यपुजा वगैरे सर्व व्यवस्थित झाले. दि. २२ ऑगस्टला डॉ. सौ. सुरेखाताईना मुलगा झाला. प. पू. श्रीदत्तमहाराजांना कळविल्यानंतर लगेच उत्तर आले. ''ही पुत्ररत्न लाभाची हकीकत ऐकून फार आनंद झाला. भगवतीची कृपा आहे. सौ. सिंधुताईची इच्छा देवाने पूर्ण केली. मुलगा/मुलगी सर्व देवाचीच रुपे आहेत. ''सर्वरुपी मयी देवी'' असे देवी महात्म्यातच म्हंटलेले आहे. डॉक्टरांच्या संसाराची चिंता भगवतीलाच आहे. नारायण नाव ठेवण्यास हरकत नाही. सर्वांच्या आवडीप्रमाणे ठेवावे. अश्विनात नातवाला येऊन आम्ही बघून जाऊ.''

बाळाच्या नामकरणास प. पू. श्रीदत्तमहाराज, ती. सौ. आईसाहेब ती. सौ. ताईमहाराज सर्व मंडळी आली होती. त्यावेळीही नवचंडी केली होती. बाळाला श्रीमहाराजांच्या मांडीवर दिला. त्यानीच बाळाचे नाव ठेवले. नारायण या नावात चारी वेदांचे सार आहे.

प. पू. श्रीदत्तमहाराजांचा साक्षात्कार

चि. नारायण वर्षाचा झाला होता. त्याची एकंदर मानसिक व शारीरिक वाढ कमी आहे असे वाटे. नारायण म्हणून हाक मारली तरी चेहेऱ्यावर तो काही भाव दाखवीत नसे. चालणे वगैरे उशीराच होते. सर्वांना खूप काळजी वाटत होती. प. पू. श्रीदत्तमहाराज घरी आलेलच होते. सायंकाळचे प्रवचन संपलेले होते. चि. नारायण हॉलमधे लांब बसला होता. चि. नारायणच्या आजोबाआजींनी आपली काळजी बोलून दाखविली. प. पू. श्रीदत्तमहाराज हसले. त्यांनी मंद स्वरात 'नारायण' अशी गोड हाक मारली. चि. नारायणने ताबडतोब श्री महाराजांकडे पाहिले व गोड हसला. भराभरा रांगत येऊन श्रीमहाराजांनी तळहातावर ठेवलेला खडीसाखरेचा तुकडा तोंडानेच उचलला. प. पू. श्रीदत्तमहाराजांनी त्यावेळी त्याचेवर टाकलेला कृपाकटाक्ष सर्वांनी पाहिला. डॉ. सौ. सुरेखाताई म्हणतात, तो प्रसंग आंम्ही कधीच विसरणार नाही.

चि. नारायणला अधूनमधून तापाबरोबर झटके येत. त्यावर उपाय श्रीमहाराजांनी सांगितला की "दर महिन्यात एक श्रीगुरुचरित्र पारायण ब्राम्हणद्वारा करावे. नैवेद्य दाखवून ब्राम्हण सुवासिनी भोजन घालावे. श्रीपाद श्रीवल्लभ या स्तोत्राचे तीन पाठ चालू ठेवावे." आता नारायणाची प्रकृती उत्तम आहे. त्याची शारीरिक व मानसिक वाढ चांगली आहे. तो प. पू. श्रीमहाराजांच्या दर्शनास उत्सुक असतो.

डॉ. दिलीप देशमुखांचे सर्व कुटुंबिय श्रीमहाराजांच्या कृपासावलीत आहे. त्यांचा मातोश्री सौ. सिंधुताई ह्याही तितक्याच धार्मिक, भाविक, प्रेमळ, अगत्यशिल आहेत. प. पू. श्रीगुरूमहाराजांच्या संबधात त्यांचेकडे आठवणींचा खजिनाच आहे. प. पू. श्रीदत्तमहाराज आणि प. पू. श्रीगुरूमहाराज एकच आहेत ही निष्ठा, श्रद्धा आहे. पुण्यातिल आश्रमनिवासियाना कै. श्रीमती माई क्षीरसागर माहीत आहेत त्यांच्याच सिंधुताई धाकट्या भगिनी.

डॉ. दिलीप यांच्या पत्रसंग्रहातील शेवटचा मौक्तिक मणी ओढून येते थांबते. श्रीमहाराज एका पत्रात लिहीतात 'प्रपंचात राहून यथाशक्ती परमार्थ करुन घ्यावा. वृध्दावस्थेत सामर्थ्यहीनतेमुळे घडणे कठीण असते. ही जाणीव ठेवावी. व्यावहारिक संग्रह करण्याकडे दुर्लक्ष करुन कर्तव्यो धर्म संग्रहा या प्रमाणे आपली वृत्ती ठेवावी'

❀ ❀ ❀

गुरुकृपेने अंतरंग विकास

श्वेतवस्त्र नेसून व हातात काठी घेऊन नित्यनेमाने प. पू. श्रीदत्तमहाराजांचे दर्शनास श्रीमती उर्मिला अग्नीहोत्री या भगिनी येत असतात. खरे पाहता स्वतःच्या लौकिक जीवनात त्या फारशा सुखी नाहीत. आपल्या माहेरच्या मायेच्या आधारावर

रहात असल्या तरी एकट्याच आहेत. वैवाहिक जीवनात पती निधनानंतर एकाकी जीवन कंठावे लागत असले तरी प्रबोध हाच आपला पुत्र मानून, संत दर्शन घेऊन विवेकाने रहात आहेत.

प. पू. श्रीगुळवणीमहाराजांचे यांना तीनदा दर्शन झाले आहे. त्या म्हणतात ''लग्न झाल्यावर लगेचच आठ दिवसातच त्यांचे दीर गेले. त्यानंतर त्यांच्या सासुबाई हृदयक्रिया बंद पडून एकाएकी गेल्या. घरांत औदासिन्य आले. विवाहाचा आनंद नाहीसा झाला. त्यांच्या मनामधे असा न्यूनगंड निर्माण झाला होता की आपण फार वाईट आहोत. आपणच सर्वांना दुखी केले. परिस्थितीची प्रतिकूलता वाढत होती. आईचा मायेचा आधार म्हणजेच सद्विचारांचा आधार तोही काळाच्या ओघात नाहीसा झाला. जोडीदारही सोडून गेले. परंतु रोजच्या आश्रमांत येण्याने त्यांच्या अंतरंगात बदल झालेला त्यांना जाणवू लागला. प्रथम त्यांचे दोष त्यांना कळू लागले. या अंतर्मुखवृत्तीने दोष सुधारण्याकडे त्या लक्ष देऊ लागल्या. जग चांगले वाटू लागले. प्रतिकूल परिस्थितीचा बाऊ वाटत नाहीसा झाला. रोज इतक्या लांबून येणे घडते ही त्याची फार मोठी कृपा आहे असे वाटू लागले. सहनशक्ती वाढली. सर्वांशी प्रेमानेच बोलावे असे वाटू लागले. रोज प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या सहवासात ते बोलताही अनेक गोष्टींचा बोध होऊ लागला. लोकांचे दोष पाहू नयेत. निरपेक्षता ठेवावी. देण्याघेण्यावर काही अवलंबून नाही. एकदा घरात त्या एकट्या बसल्या होत्या. अभंग म्हणत होत्या. आतूनच इतका आनंद होऊ लागला की त्यांचे त्यांनाच कळेना हा आनंद कसला आहे? परंतु खूप समाधान वाटले. त्या आश्रमात गेल्या तो महाराज ग्रंथ वाचन चालू असताना सांगत होते की परमेश्वराचा आनंद हा वेगळा असतो. त्या आनंदाला कोणतेही कारण लागत नाही. हा आनंदाचा झरा आपल्या आतच असतो. मनात आले की आपल्याला त्याची प्रचिती मिळाली.

एक सरडा दोन तीन दिवस देवाच्या जवळ बसत असे. तो मागच्या दाराने येई म्हणून ते बंद केले तर तो पुढच्या दाराने येई म्हणून त्याला त्या म्हणाल्या, ''कायरे तू रोज का येतोस? तुला देवाचे नाव ऐकवू कां? म्हणून मी दिगंबरा दिगंबरा असा जप केला. पांडुरंग हरी वासुदेव हरी असेही म्हटले. तो जरावेळ शांत बसला होता नंतर निघून गेला. आश्रमात हाच विषय असा चालला होता की जे जीव जिवाणू असतात त्यांचा उद्धार कोण करणार? त्यांची मागच्या जन्मीची जशी वासना असेल तशा तशा परिसरात त्यांचा जन्म होत असतो. माझ्या मनाचे समाधान झाले. आता एकटेपणाचे दुःख कमी झाले. ईश्वर आपल्या जवळ नित्य असतो. त्याचे संरक्षण हे खरे संरक्षण हे मनाला पटू लागले. प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या रोजच्या दर्शनाने असा बदल होत गेला. हा अंतरंगात जो थोडा देवाविषयी भक्तीभाव निर्माण झाला त्याने त्या सुखी झाल्या. भक्तीत सुख आहे हे त्याना कळून चुकले. ही

अंतरंगाची सुधारणा हीच आपल्याला करावयाची आहे असे म्हणून त्या रोज आश्रमात येतात. महाराजांच्या सहवासात थोडावेळ बसतात. हात जोडून मनोमन प्रार्थना करतात की शेवटचा दिवस असाच गोड करा.''

❊ ❊ ❊

एक वेगळीच प्रचिती

बडोद्याच्या संस्कृत विभागाच्या प्राध्यापिका डॉ. सौ. उमा देशपांडे यांनी काव्यस्फुर्ती कशी होत गेली याचा अनुभव कळविला आहे.

सौ. उमा देशपांडे या प. पू. श्रीरंगावधूतस्वामींच्या अनुग्रहीत आहेत. त्यांच्या वाङ्मयाचा त्यांचा अभ्यासही विशेष आहे. त्याचप्रमाणे प. प. टेंबेस्वामी महाराजांच्या साहित्याचा अभ्यासही सखोल आहे. लेखन व वकृत्व या दोन्ही गुणांची त्याना ईश्वरी देणगी आहे. प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या सहस्त्रदर्शनशांतीचे वेळी त्यांना पुण्याला प्रवचनासाठी मुद्दाम बोलाविले होते. या कार्यक्रमाचे आमंत्रण ज्या दिवशी त्यांना मिळाले त्यादिवशी रात्री घरातील कामधाम आटपून प. पू. श्रीदत्तमहाराजांकरिता काही लिहावे म्हणून त्या बसल्या. थोडे श्लोक लिहिले. त्यांना असे वाटू लागले की आपल्याला कोणी आंतून सुरेख मार्गदर्शन करीत आहे की, 'देवघरात बसून लेखन कर' हा जोर इतका झाला की त्या तशाच जाऊन बसल्या. ठराविक श्लोक झाल्याशिवाय त्याना उठणेच अशक्य झाले. तिसऱ्या दिवशीही तीच स्थिती झाली. एकूण ८५ श्लोक झाले. ही स्थिति अनुभवताना श्री ज्ञानेश्वरीच्या १३ व्या अध्यायातील ४६१ ओवीची आठवण झाली.

पुढा स्नेह पाझरे। मागे चालती अक्षरे।
शब्दपाठी अवतरे। कृपा आधी।।

पुढे प्रेम पाझरते, कृपा आधी प्रगट होते व मागून अक्षरे चालतात या ओवी प्रमाणे प. पू. श्रीगुळवणीमहाराजांचे भक्तीप्रेम व कृपा आधी मिळाली व मग नुसते शब्द लिहिले गेले. संस्कृतमधून ८५ श्लोक हे माझ्या बुद्धीने झाले नसते. हा प्रसादच होता. या भावपूर्ण काव्यात उपनिषदांचा मतितार्थ आहे. गीतेचा भावार्थ आहे. पुण्यश्लोक प. पू. श्रीदत्तमहाराजांचे आदरणीय चरित्र व लोक संग्रहात्मक कर्मयोगाचे निरुपण आहे. या रचनेमागे श्रीगुरुमहाराजांची स्फुर्ती आहे. डॉ. सौ. उमा देशपांडे पुढे असेही म्हणताहेत **यत्र देवी जगन्माता श्रयते शक्तिबुद्धीदा । वासुदेवा श्रमपरं दृश्यते दत्तभावितम्।।**

तसेच प. पू. श्रीदत्तमहाराजांच्यावर केलेले हे 'महिम्न स्तोत्र' खूप मोठे आहे. त्यातील काही श्लोक खाली देत आहे. सहजता आणि प्रासादिकता हे श्लोकांचे

वैशिष्ट्य आपल्या लक्षात येईल. हे श्लोक म्हणजे गगनातून अमृतबिंदु टपटप पडावे तसे उत्स्फूर्तपणे रचिले गेले आहेत.



श्रुति स्मृति पुराणानामालयं करुणालयम् ।
वन्दे कवीश्वरं नित्यं श्रीदत्तं सद्गुरु वरम् ॥१॥
पवित्रं दर्शनं यस्य पावनं स्मरणं तथा ।
शक्तिदं सन्निधानं तद् श्रीदत्तस्य महात्मनः ॥२॥
वचनं मधुरं यस्य श्रीदत्तस्य परात्मनः ।
उद्बोधक च व्याख्यानं युक्तिबुद्धि प्रबोधकम् ॥३॥
अध्यात्मज्ञान निरतं लोककल्याण संभृतम् ।
सत्कार्य लोकभद्राय तस्य श्रीदत्तयोगिनः ॥४॥
राजते पंडितो योगी रससिद्धः कवीश्वरः ।
नास्ति तस्य यशः काये जरामरणजं भयम् ॥५॥
जयस्तस्य यशस्तस्य सत्कीर्तिः शाश्वती प्रभा ।
भ्राजते हृदये यस्य श्रीदत्तस्य परमेश्वरः ॥६॥
बोधनार्थं न धर्मस्य रक्षणार्थं च संस्कृतेः ।
संवर्धनाया गैर्वाण्याः श्रीदत्तो यततो सदा ॥७॥
पंडितोऽयं परं ज्ञानी दाताऽयं सकलार्थदः ।
वक्ताऽयं सर्वशास्त्राणां श्रीदत्त कविशार्दुलः ॥८॥
भगवान् वासुदेवोऽयं दीप्यते यत्र स्वात्मविद् ।
वासुदेवाश्रमस्थानं भाति श्रीदत्तकीर्तितम् ॥९॥
लोकनाथो विभुर्यत्र वर्तते परमो गुरुः ।
वासुदेवाश्रमपदं दिव्यं श्रीदत्तसंस्थितम् ॥१०॥
योगिराट् वामनो यत्र वसति करुणालयः ।
वासुदेवाश्रमस्थानं भ्राजते दत्तसंयुतम् ॥११॥
यस्यस्मरणमात्रेण मनः शांतिः प्रजायते ।
वन्दे सादरं नित्यं श्रीदत्तं भक्तारकम् ॥१२॥
नमः श्रीदत्तरूपाय कवीश्वर परात्मने ।
नमः सद्गुरुदेवाय नमः शांताय तेजसे ॥१३॥
इत्येषा वाङमयी पूजा श्रीमद्दत्तपदाम्बुजे ।
अर्पिता तेन श्रीदत्तः प्रीयतां मे कवीश्वरः ॥१४॥

प्रत्येकाचे अनुभव हे जीवनाला अशा तऱ्हेने सात्विक आनंद देणारे पण निरनिराळ्या प्रकारचे असतात. हे एक दर्शनच आहे.

आमचे आजोबा

प. पू. श्रीदत्तमहाराजांचा नातू चि. आमोद कवीश्वर हा तसा महाविद्यालयात जाणारा मुलगा. त्यालाही विचारले अरे आजोबांबद्दल तुझे अनुभव किंवा आठवणी सांग ना. प्रथम काय सांगावे असे त्याला वाटत होते. नंतर मात्र तो मोकळा झाला. त्याच्या मनांत असे येत होते की आपले प. पू. आजोबा किती ज्ञानसंपन्न थोर आहेत. त्यांच्याविषयी बोलण्यास आपण किती लहान आहोत काय बोलणार? त्याचे त्याला पटले की आजोबा लहान थोर साऱ्यांचेच आहेत. आपल्याला जे वाटते ते लिहण्यास खरोखर काही हरकत नाही.

पहिली गोष्ट त्याने अशी सांगितली की आजोबांचा सर्वत्र वाटत असलेला आधार. एकादी गोष्ट करताना खूप अडचणी येतात. संकल्प विकल्प मनात घोंघावत असतात. आजोबांच्यामुळे एक खात्रीयुक्त विश्वास असतो. हे काम होणार तसे होऊनही जाते. हे येवढे कशामुळे घडते तर त्याला उत्तर एकच. देहाने तुमच्या आमच्या सारखे दिसणारे आजोबा हे एक विभुती आहेत. त्याला जर कोणी विचारले ईश्वराचे अस्तित्व तुला कोठे दिसून येते? तो म्हणतो मी आजोबांकडेच बोट दाखवीन. आपल्या या महानतेचा उच्चार तर सोडूनच द्या पण वागण्यातही कळू देणार नाहीत. विद्वानांशी, पंडिताशी ते जितके समरस होऊन बोलतील तितकचे लहान मुलाशीही बोलतील.

आणखी महत्वाची गोष्ट सांगायची तर आमच्या कवीश्वरांच्या येवढ्या मोठ्या कुटुंबाच्या पसाऱ्यांत अडीअडचणी येणे हे चालू असते. आजोबा येवढे प्रकांड पांडित असूनही रुक्ष नाहीत. तर विनोदीही आहेत. आपल्या विनोदी बोलण्याची झालर लावून गंभीर वातावरण ते केव्हाच बदलून टाकतात. त्यामुळे संकट किंवा अडचण वाटत नाहीशी होते असे आर्वजून तो सांगत होता.

चि. अमोद स्वतःचाच एक अनुभव सांगत होता. त्याला स्वतःला सायनसचा त्रास अतिशय होता. सगळी औषध झाली. ॲलोपॅथिक, आयुर्वेदिक, होमिओपॅथिक सर्व उपचार झाले शेवटी तो अगदी कंटाळून गेला. आजोबांच्याजवळ जाऊन सर्व हकीकत सांगितली. ते म्हणाले 'हे बघ मी तुला एक उपाय सांगतो. तू श्रद्धेने करुन बघ.' एका स्तोत्रातील एक श्लोक रोज अकरावेळा वाचायला सांगितला. आश्चर्य हे की थोड्या दिवसात त्याला पूर्ण बरे वाटले. कोणतेही औषध न घेता तो बरा झाला. त्याचा त्रास संपला.

दुसरा असाच अनुभव. त्याची बहीण रमा हिच्या बाबतीतला आहे. सकाळ पासून तिचे डोके दुखत होते. डॉक्टरकडून गोळ्या आणून दिल्या. चेपले, बाम लावला तरी तिचे डोके थांबेना. सारखी ओक्साबोक्शी रडत होती. आजोबा आश्रमात

गेले होते. ते सायंकाळी परत आले. तरीही ती रडतच होती. आजोबा घरात आले. रमाला काय झाले विचारले. तुझे डोके दुखते, थांब मी चेपून देतो. शांत बसले. नामस्मरण करीत डोके चेपून दिले. दहा मिनिटात तिला गाढ झोप लागली. उठल्यावर तिचे डोके एकदम थांबले.

एकदा त्यांनी आमोदला रिफील आणावयास सांगितले. आणल्यावर लगेच विचारले. याचे पैसे किती? आम्ही देऊन टाकतो. हा व्यवहारही काटेकोरपणे आजोबा संभाळत असतात.

वक्तशीर आजोबा

आजोबाना कुठेही जाताना उशीर झालेला मनांतून आवडत नाही. ते वेळच्यावेळी सगळीकडे जात असतात. एकदा आजी व बाबा कामासाठी कुठे तरी बाहेरगावी जाणार होते. त्यासाठी भाड्याची गाडी मागवली होती. गाडी येऊन दहा मिनिटे झाली होती. आजीचे आवरत होते. आजोबा आतल्या खोलीत होते. त्याना गाडी आल्याचे आम्ही सांगितले नव्हते. थोड्याच वेळात आजोबांनी आमोदला हाक मारली व विचारले "गाडी येऊन दहामिनिटे झाली अजून आवरले नाही का?" हे ऐकून आमोद चकितच झाला. आजोबांना हे कळले कसे? अशा तऱ्हेने अनुभव येत असतात.

वात्सल्य, शांती व प्रेम आजोबांकडे हे गुण अमर्याद आहेत. नवीन प्रगत शास्त्राची त्याना आवड आहे. आजोबांना संगीतातही रस आहे. रामायण, महाभारत उत्कटतेने ऐकतात. त्यांच्या प्रत्येक कृतीत निरागस आनंद असतो. पौर्णिमेच्या चंद्रा प्रमाणे ज्ञानभक्तीने परिपूर्ण व प्रसन्न असे आजोबा आहेत. म्हणून त्याना नुसते दीपस्तंभ न समजता पौर्णिमेय दीपस्तंभ म्हणावे असे आमोदला वाटते.

आपल्या अनुभवाचा शेवट करताना आमोद म्हणाला "आजोबांची प्रकृती नेहमी चांगली राहू दे. त्यांना दीर्घायुष्य लाभू दे. त्यांचा सहवास आम्हाला खूप खूप मिळू दे" अशी सर्वच नातवंडे देवाजवळ मागत आसतात.

★★★

सद्गुरुंचे सहाय्य असेल तर सर्व उद्योग सफळ होतात.

श्री. मुजुमदार हे पुण्यातील एक बांधकाम ठेकेदार (बिल्डींग कॉन्ट्रक्टर) त्यांनी आपली आठवण सांगितली.

"एक मोठे काम मिळाले म्हणून मी अतिशय खुशीत होतो. ठेकेदार (बिल्डर) खूप मोठा होता. स्वतःच्या मालकीचे मोठाले गाळे (फ्लॅट) बांधण्याची योजना होती.

रितसर करारही झाला होता. काम सुरु झाल्यावर काम मोठे व माझ्या जवळ भांडवल कमी. म्हणून मी व्याजाने भांडवल उभे केले. जवळ असलेल्या चीजवस्तू मजुरांचे पगार देण्यासाठी विकल्याही. केवळ विश्वासावर हे सर्व मी करीत होतो. मालकाचे रंग मात्र निराळे दिसू लागले. मला तो काहीच पैसे देईना त्यामुळे मोठी पंचाईत झाली. तो तर आता उलटेच बोलू लागला मी तुमचे सर्व पैसे दिले वरती एक लाख रुपये रोख दिले तेच परत द्या. हे सर्व बोलणे सांगून श्री. मुजुमदार म्हणाले, ''ते अगदी चक्रावून गेले. काय करावे हे त्यांना कळेना. त्यानी वकील गाठून कोर्टात फिर्याद लावली. पण मालक कशालाच दाद होईना. काम बंद, देणेकरी वाढलेले. कर्जाचा बोजा डोक्यावर होता. सर्वच आवक बंद झाली. वकील म्हणाले की आपल्याला नुकसान भरपाई मिळेल. देणेकरी रात्री अपरात्री घरी येऊन धमक्या देत असत. श्री. मुजुमदार, त्यांच्या सहधर्मचारिणी व मुलगा घाबरून जात असत. स्वतःचा धंदा सुरु केल्यापासून असे प्रसंग वारंवार येऊ लागले. हे तिसऱ्यांदा घडत होते. त्यामुळे ते वैतागून गेले होते त्यांचा देवावरचा विश्वासही उडत चालला होता. श्री. मुजुमदार हे वाडीचे भक्त आहेत. परंतु आलेल्या फार मोठ्या संकटाने ते खचून गेले होते. जीव देण्यापलीकडे आता काही मार्ग उरला नाही असे त्यांच्या मनात वारंवार येई. चार पिढ्यांची वाडीची भक्ती होती. जीवघेणी संकटे आल्यामुळे 'कोणाचे वाईट केले नाही, मग अशी संकटे का आणतोस' असे म्हणून ते देवावर खूप रागावले. वर्षभर वाडीला गेलेच नाहीत.

ते सांगत होते. वारंवार जीवन संपविण्याचे निराशाजनक विचार येत असत. सर्व उपाय संपला. आता निर्वाणीचे देवाला भेटून सांगून यावे म्हणून वाडीला ते गेले. नेहमीचे उपाध्याय होते. ते म्हणाले 'आज पौर्णिमा आहे. साधा अभिषेक तरी करा तसे जाऊ नका.' नाही हो करता अभिषेक करुन प्रार्थना करीत असतांना कानावर आवाज आला. 'श्रद्धा ठेव. राहिलेली सेवा वासुदेव निवासात कर.' कां कुणास ठाऊक त्यांच्या मनाला थोडा धीर आला. पुण्याला आश्रमात मधून मधून जात असत पण प. पू. श्रीदत्तमहाराजांची त्यांना काहीच माहिती नव्हती. त्याच्यात एक महिना गेला. चि. विद्याधर फडकेजवळ त्यानी आपले मन मोकळे केले. विद्याधर म्हणाला 'काही काळजी करु नका प. पू. श्रीदत्तमहाराजांना सारे काही सांगा ते तुम्हाला योग्य मार्ग सांगतील' पुढे ही सर्व हकिकत प. पू. श्रीदत्तमहाराजांना सांगितली. प. पू. श्रीदत्तमहाराजांनी ताबडतोब सांगितले की ''बिल्डरशी तडजोड करा कोर्टाची पायरी चढू नका. सध्या तुम्हाला दिवस चांगले नाहीत. तुमची बुद्धी सध्या योग्य निर्णय घेऊ शकणार नाही. चाळीस टक्के नुकसान होईल तेवढे सोसा व यातून प्रथम बाहेर पडा. तडजोडीची बोलणी करायला जाताना मंडळींना बरोबर घेऊन जात जा. घाबरू नका. तुमच्या अंगाला कोणीही हात लावणार नाही. रोज काय होते ते आम्हाला सांगत चला.'' प. पू. श्रीदत्तमहाराजांनी आणखी एक गोष्ट सांगून ठेवली होती की 'तुमच्यावर आता जरी कोणी काही आरोप केले तरी ते

सोसा.' दहा बारा दिवस कसे गेले ते कळलेही नाही. रात्र दिवस एकच झाले होते. आठ आठ दहा दहा तास फिरत होतो. ना जेवण ना खाण. परंतु अखेर प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या कृपेने सर्वातून ते सुटले. नुकसान व्हायचे ते झाले पण प. पू. श्रीदत्तमहाराजांनी त्रासातून बाहेर काढले. मुख्य म्हणजे कोर्टाची सारी भानगड संपली. तो खर्च वाचला. प्रकरण तडजोडीने मिटले. प. पू. श्रीदत्तमहाराजांनी सांगितले तुमचे काम झाले. प्रारब्ध आहे ते कुणाला चुकत नाही. प्रथम आता ऋणातून मुक्त व्हा. हळू हळू सारे सुरु झाले. उषःकाल झाला. त्या छोट्या कुटुंबाच्या मनाला उभारी आली.

जीवनातून संकटामुळे उठलेले कुटुंब पुन्हा उभारीने आपल्या संसारास सुरवात करु लागले. त्यातून प. पू. श्रीदत्तमहाराजासारखे 'सद्गुरु' त्यांना लाभले हा केवढा मोठा फायदा झाला. आजारात, कठीण प्रसंगात, आर्थिक ओढाताणीत, नोकरी धंद्यात अशा किती प्रसंगाने मनुष्य पोळला जातो, होरपळतो. सारे सुखाचे सोबती असतात. पण अशावेळी सद्गुरु पाठीराखे असतात. त्रिविध तापे तापणाऱ्या मनुष्याला परमार्थाचा आधार देतात. अशा कितीतरी घरांना उजळणारे हे दीपस्तंभ! यांचे हे दर्शन घेताना मूकपणे त्यांना वंदन करणेच योग्य.



श्री. प्र. र. देशपांडे हे कोथरुड, पुणे येथे राहणारे. प. पू. श्रीदत्तमहाराजांचे अनुग्रहीत, आश्रमात येणारे. पडेल ती सेवा करण्यास उत्सुक असे साधक. त्यांच्या जिवनात फार खडतर प्रसंग उभे राहीले. प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या कृपेने त्यातून ते सही सलामत बाहेर पडले. त्यांचा अनुभव फारच बोलका आहे. गुरु भक्तीची/गुरुकृपेची पावन पुण्यमय कथाच आहे.

श्री. प्र. र. देशपांडे हे महाराष्ट्र शासनाच्या भूमी अभिलेख खात्यात द्वितीय वर्ग अधिकारी म्हणून काम करीत होते.

१९८४ साली सातारा येथे चौकशी अधिकारी म्हणून त्याच खात्यात काम करीत असताना दुर्दैवाच्या फेऱ्याला सुरवात झाली. ध्यानीमनी नसताना लांच-लुचपत खात्याने त्यांचेवर धाड टाकली. धाडीमधे काही वावगे सापडले नाही. तरीही आरोपपत्रक ठेवायला ३ वर्षांचा काळ गेला. १९८७ साली सातारा येथील न्यायालयात गुन्हा दाखल झाला. सेवेतून निलंबित केले गेले.

श्री. देशपांडे यांची कोथरुडला एक तीन मजली इमारत आहे. त्या इमारतीतील तळमजल्यावरची जागा बँकेला भाडेतत्वावर देताना काही रक्कम आगाऊ घेतली होती. ही रक्कम वेळेवर परत करु शकले नाहीत म्हणून १९८७ सालीच बँकेने कायदेशीर वसुली कारवाई सुरु केली. व्याजाचा हिशेब करुन ही रक्कम ६० हजार रुपये झाली होती.

ह्या आर्थिक अरिष्टातून बाहेर पडण्यासाठी १ल्या मजल्यावरील दोन खोल्यांची जागा विकावी लागली. कायदेशीर अडचणीमुळे ह्या खोल्यांचे खरेदीखत होऊ शकले नाही. संबंधित गाळेधारकांनी पैसे वसूलीसाठी न्यायालयात दावा दाखल केला. इमारत जप्तीसाठी एक लाख रुपयांची डिक्री काढली. त्याचे वसुलीसाठी प्रयत्न चालू केले. एका भाडेकरुने जागा सोडण्यासाठी ४० हजार रुपयांची माणगी केली.

त्याच सुमारास एकुलत्या एक मुलीचा विवाह जमून आला. त्यासाठीही कर्ज झाले. एका पाठोपाठ येत गेलेल्या संकटातून बाहेर पडण्याचा मार्ग दिसत नव्हता. आर्थिक ओढगस्त इतकी सुरु झाली की चरितार्थ कसा चालवायचा याची भ्रांत पडत होती.

१९८७ च्या गुरुपोर्णिमेला त्यांचे मंत्रगुरु प. पू. श्रीज्ञानेश्वरमहाराज अमळनेरकर यांचेकडे चातुर्मासात पंढरपूरला श्री. देशपांडे गेले. त्यावेळी श्रीगुरुना फणफणून ताप आलेला. त्याही परिस्थितीत श्री गुरुनी त्यांची हकीगत ऐकून घेतली. श्रीगुरुचरित्राचे पारायण करावे म्हणून उपाय सुचविला. दुर्दैवाचा फेरा जबरदस्त होता. पुढे ८ दिवसातच श्रीगुरुमहाराज पांडुरंगचरणी विलीन झाले.

श्री. अमळनेरकरमहाराज यानी सांगितलेले श्रीगुरुचरित्राचे पारायण श्री. वासुदेवनिवासश्रमात झाले. श्रीगुरुशक्तीची प्रचिती त्याचवेळी मिळाली. आश्रमात नित्य येणारे श्री निजामपूरकर पूर्व परीचयाचे होते. त्याना श्री. देशपांडेवर आलेल्या संकट परंपरेची कल्पना होती. पारायण समाप्तीला त्यानी प. पू. श्रीदत्तमहाराजांबद्दल खूप माहीती श्री. देशपांडे यांना दिली. त्यानी श्रीदत्तमहाराजांचा अनुग्रह घ्यावा म्हणून मोलाचा सल्ला दिला. तोपर्यंत श्रीदत्तमहाराजाना श्री.देशपांडे यांनी पाहीलेलेही नव्हते.

श्रीगुरुकृपेची वेळ आली होती. श्री. निजामपूरकरांबरोबर श्री. देशपांडे श्रीदत्तमहाराजांचे दर्शनासाठी गेले. श्रीदत्तमहाजांनी अनुग्रह करावा म्हणून प्रार्थना केली. आश्चर्य म्हणजे श्रीदत्तमहाराजानी ती तात्काळ मान्य केली. श्री व सौ. देशपांडेना एका शुभदिनी सकाळी देवासमोर बसा म्हणून सांगितले. कृपा होईल असा मंगल आशीर्वादही दिला. मंत्रगुरुनी श्रीदत्तमहाराजांकडे श्री. देशपांडे दाम्पत्याला जणू सोपवून दिले असे त्यांना वाटले. 'साधू दिसती वेगळाले परी अंतरी मिळाले' याची प्रचिती आली.

प. पू. श्रीदत्तमहाराजाना नोकरीवर आलेल्या गंडांतराविषयी बोलले. इतर गोष्टीबद्दल सांगण्याचे धारिष्ट्य झाले नाही. प. पू. श्रीदत्तमहाराजानी द्विसाहस्री गुरुचरित्राचे पारायण करण्यास सांगितले. पुनः एकदां श्रीगुरुशक्तीचा अनुभव आला. अनुग्रह घेण्यापूर्वी श्री वासुदेव निवासात अधून मधून येत असताना प. प. श्री. वासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराजांची प्रश्नावली पाहिली होती. त्यातही दिसाहस्री गुरुचरित्र पारायणाची सेवा आली होती. तीच सेवा श्रीदत्तमहाराजांनी सांगितली. प. पू. श्रीदत्तमहाराज एक अवतारी पुरुष आहेत याची खात्री झाली.

द्विसाहस्त्री हे संस्कृत श्रीगुरुचरित्र, श्री. देशपांडे याना तर संस्कृतचा गंधही नव्हता. श्रीदत्तमहाराजांच्या कृपेने तेही शक्य झाले. पहिलाच सप्ताह श्रीक्षेत्र कुरवपूरला श्रीदत्तमहाराजांसमोर करण्याचा योग प्राप्त झाला. एवढेच नव्हे तर श्रीक्षेत्र गाणगापूर, श्रीक्षेत्र नृसिंहवाडी, गरुडेश्वर, नारेश्वर व माणगाव येथे श्रीदत्तमहाराजांसमोर सेवा करण्याचा योग जमून आला.

पारायण चालू असताना श्री मोघेकाकानी द्विसाहस्त्रीचे हस्तलिखित प्रत करावी असे सुचविले. त्या हस्तलिखिताच्या पहिल्या अध्यायाचा पहिला श्लोक श्रीदत्तमहाराजांनी लिहून कृपाशीर्वाद दिले आहेत. श्री क्षेत्र माणगाव येथे हस्तलिखित लिहित असताना स्वप्नदृष्टान्त झाला. त्यात, न्यास केल्याशिवाय लिहू नये असा आदेश आला. प. पू. श्रीदत्तमहाराजाना हा स्वप्नदृष्टान्त सांगितल्यावर त्यानी देवाची प्रार्थना करुन स्वप्नाचा खुलासा करुन घ्यावा असे सांगितले. श्री. देशपांडे सांगतात की दुसरे दिवशी दर्शनास गेलो असताना श्रीदत्तमहाराजच त्याना म्हणाले की शुचिर्भूत होऊन लिहित जा. प. पू. श्रीदत्तमहाराज हे दत्तस्वरुप आहेत याची आणखीन काय खात्री पटायची! अनन्यशरण होऊन प्रार्थना करावी हा बोध पटला. देवाजवळ केलेली प्रार्थना देवाला पोचली. त्याचा खुलासा श्रीदत्तमहाराजांच्या मुखातून प्रत्यक्ष मिळाला हेही केवढे भाग्य!

श्रीगुरुकृपेने अखंड द्विसाहस्त्री पारायण व लेखन सुरु राहीले. त्याचे दृश्य फळ म्हणजे १९९१ साली सातारा न्यायालयाने श्री. देशपांडे याना निर्दोष म्हणून सुटका करताना शासनावर खोट्या आरोपाबद्दल ताशेरे ओढले.

१९९२ साली या निर्णयाविरुद्ध शासनाचे अपिल उच्च न्यायालयात दाखलही करुन न घेता फेटाळून लावले. १९९३ साली श्री. देशपांडे यांची सर्व रक्कम त्वरित परत करण्याचा आदेश दिला. या निकालाचे आदले दिवशीच श्रीदत्तमहाराजांचे चरणी डोके ठेवून प्रार्थना करताना अनिवार दुःखाने अश्रुपात झाला होता. संध्याकाळी शेवटी शेवटी न्यायाधिशानी निकाल संपूर्णपणे श्री. देशपांडे यांचे बाजूने दिला. बँकेच्या जागेला चांगला भाडेकरी मिळाला. त्यातून बँकेचे देणे तर फिटलेच पण भाडेही वाढवून मिळाले.

इमारतीच्या जप्तीने उग्र रुप धारण केले होते. रक्कम वसूलीसाठी श्री. देशपांडे याना मिळणाऱ्या रकमेवरच डिक्री मिळविली गेली होती. त्यावेळीही श्री द्विसाहस्त्री पारायण चालू ठेवण्याचा सल्ला श्रीदत्तमहाराजानी दिला. एका दिवसात पारायण करण्याचा संकल्प केला. श्रीदत्तप्रभूंची कळवळून प्रार्थना केली. श्रीदत्तप्रभू धावून आले. श्री. देशपांडे यांच्या जावयाना प्रेरणा झाली. त्यानी त्यांच्या मित्रांमार्फत एका दिवसात लाख रुपये जमा केले. सर्वच अतर्क्य, अघटित घडले! आणखीन एक चमत्कार म्हणजे श्री. देशपांडे प्रकरणावर न्यायाधीश जप्तीचे आदेश लिहित असताना देशपांडे पहात होते. परंतु काय व कसे घडले माहीत नाही. कागदांची

उलटापालट झाली आणि जप्तीचे आदेश-दुसऱ्या प्रकरणात लिहिले गेले. श्री. देशपांडे यांच्या प्रकरणावर १ लाख रुपये भरण्याचा आदेश आला. श्री. देशपांडे यानी तीही रक्कम केवळ श्रीगुरुंच्या कृपेने भरली. संत श्रीदामाजीपंतासाठी विठ्ठल धावून आला होता. तसाच श्री. देशपांडेसाठी प. पू. श्रीदत्तमहाराज पाठीशी ठामपणे उभे राहीले. अपंरपार गुरुकृपेशिवाय अन्य काही नाही.

प. पू. श्रीदत्तमहाराजांना ही हकीगत समजली. त्यानाही परमसंतोष झाला. द्विसाहस्त्री गुरुसेवेचे हे अद्‌भूत फळ आहे. अशीच सेवा चालू ठेवा म्हणून उपदेश केला.

त्यांच्याच कृपाप्रसादाने ही सेवा अखंडपणे घडत आहे. बडोद्याचे श्री. शहापूरकर प. पू. श्रीगुळवणीमहाराजांचे पुण्यतिथी सोहळ्यात प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराज यांच्या समग्र ग्रंथाचे पारायण करीत असतात. द्विसाहस्त्री श्रीगुरुचरित्र पारायण करणारा त्याना बडोद्यात कुणी मिळाला नाही. आश्रमात चौकशी करताच श्री. आबा देशपांडेनी श्री. प्र. र. देशपांडे यांचे नांव सुचविले. अश्या तऱ्हेने सेवेची अपूर्व संधी प्राप्त झाली.

आश्रमात डॉ. देशमुखानी प. पू. श्रीदत्तमहाराजांचे समोर द्विसाहस्त्री वाचनाचा योग जुळवून आणला. अर्थ सांगताना श्रीदत्तमहाराज तल्लीन होतात. असे भावपूर्ण अर्थकथन ऐकण्याचा लाभ श्री. देशपांडेना मिळत आहे.

श्रीक्षेत्र माणगांवी ऑक्टोंबर १९९४ ला असाच प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराजांच्या समग्र वाडमयाच्या पारायणाचा योग श्रीशहापूरकरानी घडवून आणला. श्री. देशपांडे यानी द्विसाहस्त्री पारायण केले तर सौ. देशपांडे यानी श्रीदत्तमहात्म्याचे पारायण केले.


प. पू. श्रीगुळवणीमहाराजांच्या पुण्यतिथी महोत्सवात डॉ. देशमुखानी द्विसाहस्त्री गुरुचरित्राचे हवन करण्याचे ठरविले. त्यात भाग घेण्यास श्री. देशपांडे याना सोलापूरचे श्री. राजाभाऊ जोशी, डॉ. अशोकराव कवीश्वर व डॉ. देशमुख यांच्या समवेत हवन करण्याची संधी मिळाली. ही त्या दयाघन श्रीदत्तप्रभूंची कृपा होय असेच श्री. देशपांडे पतिपत्नीना मनोमन वाटते.

श्री. देशपांडे याना एकच मुलगी. तिला दोन जुळ्या मुली. मोठ्या हुषार आहेत. प. पू. श्रीदत्तमहाराजांचे कृपाशीर्वादाने त्यांची अभ्यासात उत्तम प्रगती आहे.

'संसारात जीवघेणे प्रसंग उभे राहिले. त्यातून प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या असीम कृपाप्रसादाने तरलो, त्यांच्याच कृपाशीर्वादाने सेवेची संधी मिळत गेली. प. पू. श्रीदत्तमहाराज आणि श्रीदत्तप्रभू हे एकच आहेत. अशी प्रत्येक प्रसंगातून खात्री पटली.' त्यांचेच चरणी हे निवेदन देशपांडे पतीपत्नीनी सादर केले आहे. त्यांचेवर श्रीमहाराजांची अखंड कृपा घडो तशीच ती तुम्हा आम्हावर घडो अशी प्रार्थना.

❖ ❖ ❖

सुसंवाद



साधकाच्या मनात नेहमी वेगवेगळ्या प्रकारचे प्रश्न उत्पन्न होतात. त्याचे निराकरण झाले की साधक निःशंक होतो. मनातील गोंधळ दूर झाला की त्याची उपासना अधिक निष्ठेने होते. सुखापेक्षा दुःखात त्याच्या मनाची कालवाकालव फार होते. प्रतिकूल परिस्थिती, इतरांनी केलेली निंदा, मानहानी ही सोसताना त्याची मनाची शक्ती फार खर्ची पडते. मन अस्वस्थ होते. तो आपल्या साधनेपासून काही काळ वंचित होतो. लक्ष लागत नाही. मनाचा तोल सावरला जात नाही अशावेळी सद्गुरुमुखाने दिलेली उत्तरे मनाला धीर देतात. विवेक शिकवितात. श्रद्धा दृढ करतात. अशी उत्तरे देणारे सद्गुरु भाग्याने लाभले आहेत.

डॉ. कोपर्डेकर हे एक अशाच प्रकारचे नित्य साधनरत असणारे साधक आहेत. त्यांनी अध्यात्मिक व इतर लौकिक जीवन जगताना येणाऱ्या अनेक समस्याबद्दलचे प्रश्न प. पू. श्रीदत्तमहाराजांना विचारले आहेत. त्यांचा झालेला हा सुसंवाद सर्वांना उपयोगी पडणारा, दिलासा देणार आहे म्हणून या चरित्रात तो भाग मुद्दाम घातला आहे. प. पू. श्रीदत्तमहाराजांचा उपदेश हा सर्वांचा असतो. जीवनात येणारे अनुभव हे व्यक्तिगत वेगवेगळे भासले तरी सर्वांचे मन हे सारखेच अस्वस्थ होत असते. तो सारखेपणा एकच असतो. या बोधवचनाचा सर्वांनाच फायदा होईल. तो आपण करून घेऊ या.

प्रश्न : साक्षात्कारी पुरुषाला कसे ओळखावे?

उत्तर : साक्षात्कारी पुरुषाला ओळखणे अवघड असते. श्रीकृष्ण अवतारी पुरुष होते. तरीसुद्धा भगवान श्रीकृष्णांना त्यांचे वडील ओळखत नव्हते असे म्हणतात. श्रीकृष्ण आपला मुलगाच आहे असे समजून वसुदेव भगवान श्रीकृष्णांना मुलासारखे वागवीत होते. आपल्या जीवनांतील समस्यांबद्दल ऋषींकडून वसुदेव मार्गदर्शन घेत होते. वसुदेव ऋषींना विचारीत, ''कसे करायचे? काय करायचे?'' ऋषींना आश्यर्च वाटायचे. प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्ण घरांत असताना वसुदेव आम्हा ऋषींना का विचारीत आहेत? सानिध्यामुळे अनादर होतो.

प्रश्न : अधून मधून जर साधकाने एकांतवास केला तर त्याचा आध्यात्मिक प्रगतीसाठी उपयोग होईल काय?

उत्तर : होय. साधकाने मधून मधून एकांतवास केला तर त्याचा आध्यात्मिक प्रगतीला उपयोग होतो. श्री क्षेत्र नृसिंहवाडी येथेही असे एकांतवासात रहाता येईल.

प्रश्न : म्हणजे महाराज असे का की प्रपंचात दैववाद मानायचा. परंतु परमार्थ मार्गात प्रयत्नवाद मानलाच पाहिजे? गुरुकृपेला प्रयत्नांची जोड दिलीच पाहिजे.

उत्तर : हा तसला दैववाद नाही आहे. प्रपंचात सुद्धा दैव व प्रयत्न या दोन्हींची सांगड घालायला हवी. दैव म्हणजे पूर्वीचा झालेला प्रयत्न आहे. **पुर्वजन्मसुकृतकर्म। दैवम् इति गच्छति।** म्हणजे जीवांनी केलेले कर्मच दैवरुपाने आहे. शिवोम्‌तीर्थ स्वामीमहाराजांनी असे म्हटले आहे की परमेश्वरा गुरुपदावर आम्हाला कदापी ठेवू नकोस. गुरुपदावर बसल्यानंतर स्वतःच्या सोयीकडे पहाता येत नाही हे त्यांनी जाहीररित्या सांगितले आहे. यश केवळ प्रयत्नावर असते असे नाही. आपले प्रयत्न दैवी प्रतिबंध असेल तर सफल होत नाहीत. अशी अनेक उदाहरणे आहेत. त्यामुळे दैववादही मानावा लागतो.

प्रश्न : परमार्थात सुद्धा दैववाद आहे काय?

उत्तर : होय. परमार्थमार्गात सुद्धा दैववाद आहे व प्रयत्नवादही आहे. बहुत सुकृताची जोडी हा दैववादच आहे. नामदेवांचा एक अभंग आहे. त्यात ते म्हणतात आम्ही पुष्कळ प्रयत्न केले तेव्हा आम्हाला पांडुरंग भेटला. मागच्या जन्मांत आम्ही जे काही केले ते या जन्मात दैवरुपाने आमच्या समोर येते. वास्तविक तो प्रयत्नच आहे. परंतु तो अदृष्ट आहे. या जन्मीचे प्रयत्न आपण करीत आहोत असे आपल्याला वाटते. केवळ दैववादी होणे फार कठीण आहे. अवधूत पडून रहायचे ना? झाडाखाली पडलेले असायचे. शास्त्रकारांनी हे तर्कनिं सांगितले आहे की सुख हे दैवाने मिळते. त्यांनी तर्क केला आहे की 'यथा दुःखम् अयत्नाः।।' हा मोठा तर्क आहे. दुःखाकरिता आम्ही काहीही प्रयत्न न करता दुःख आम्हांला कसे मिळते तसे सुख प्रयत्न न करता सुद्धा का मिळू नये? इतकी निश्चिंत अवस्था झाल्याशिवाय दैववाद पूर्णपणे मानता येत नाही. त्यामुळे दैव असले तरी प्रयत्न चालू ठेवावे लागतात.

प्रश्नः आपले गुरु ठरलेले असतात. दुसऱ्या गुरुकडे आपण गेलो तर आपले काम होणार नाही असेच म्हणायचे का?

उत्तरः होय. उद्धवजींना भगवान श्रीकृष्णांनी ज्ञानाचा उपदेश केला. त्यावेळी विदुरजी म्हणाले की तो उपदेश आपण मलाही करावा. तेव्हा भगवान श्रीकृष्ण म्हणाले की

आपण मैत्रेयांकडे जा. मैत्रेय त्यावेळेला होते. गोपाळकृष्णांनी त्यांना सांगून ठेवलेले होते की विदुरजींची भेट झाल्यावर त्यांना हे ज्ञान द्या.

प्रश्नः मग हे काम सद्‌गुरुंचे असते काय?

उत्तर : सद्‌गुरुच ईश्वररुप असतो.

प्रश्नः प्रत्येक माणसांत आत्माहि असतो व ईशशक्ती असते असे आपण आपल्या पत्रात लिहिले आहे. आत्मा व ईश्वरशक्ती वेगळ्या असतात काय?

उत्तरः होय. प्रत्येक माणसांत आत्माही असतो व ईश्वर शक्तीही असते. सुरुवातीला दोन्ही वेगळ्या असतात. पुढे माणसाची आध्यात्मिक प्रगति होत जाते. एक अवस्था अशी येते, जेथे जीवदशा संपते. त्या ठिकाणी आत्मा व ईश्वरशक्ती एक होतात. मग सारे मिळाले. मग पुन्हा जन्म उरत नाही. तोपर्यन्त जन्म येतच रहातात. आध्यात्मिक प्रगति हा जन्मजन्मांतरीचा प्रवास असतो. प्रत्येक जन्मांत मनुष्य आध्यत्मिक प्रगतीच्या मार्गावार पुढेपुढे जात असतो. जीवदशा संपली की मग सर्व साधले. मग जन्म उरत नाही.

प्रश्नः ज्यावेळी कोणी आपली निंदा करते किंवा तोंडावर नांवे ठेवते त्यावेळी आपल्या मनाची शांति व समाधान कसे टिकवावे? त्यावेळी काय करावे म्हणजे आपले मन प्रक्षुब्ध होणार नाही?

उत्तरः ईश्वराची उपासना चालू असली म्हणजे सारे होते. माणसे देहाला उद्देशून बोलतात. मी देहापेक्षा वेगळा आहे याची मनाला जाणीव करुन दिली म्हणजे मग त्या बोलण्याचे काही वाटत नाही. ज्ञानेश्वरांनी तेराव्या अध्यायात क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक जो सांगितला आहे तो त्याकरिताच आहे.

प्रश्नः कोणी जर आपल्यावर अन्याय करणारे बोलू लागला तर आपण उत्तरच द्यायचे नाही. शांत रहायचे, गप्प बसायचे, तितिक्षा ठेवायची, सहन करायचे तसे केले तर चांगल होईल कां त्यावेळी उत्तर देऊन त्या बोलणाऱ्या व्यक्तीवर घाव घालावा? कसे करावे?

उत्तरः आपण जर काहीही उत्तर दिले नाही, गप्प बसलो, सहन केले, शांत राहिले तर ते अधिक चांगले होईल. उत्तर न देताच अधिक चांगले काम होते. **अत्रिणे प्रतितोवध स्वयमेव उपशाम्यते.** अग्नीला जर आपण इंधन पुरवले नाही तर तो अग्नि आपोआप शांत होत जातो. अग्नीला इंधन घातले तर तो पेटतो. तसे आहे. कोणी काही बोलले तरी आपण कांही उत्तर द्यायचे नाही. गप्प बसायचे. तितिक्षा हे मोठेच साधन आहे.

प्रश्न : स्थितप्रज्ञ होण्यासाठी काय करावे? माझी फार इच्छा आहे की आपल्याला स्थितप्रज्ञ होता यावे.

उत्तर: विवेक वैराग्य ही सगळी साधने सांगितलेली आहेत. अगोदर विवेक प्राप्त झाला पाहिजे. त्याशिवाय स्थितप्रज्ञ कसे होता येईल? आत्मस्वरुपाचे ज्ञान झाले पाहिजे. अनात्म स्वरुपापासून बाजूला झाले पाहिजे.

प्रश्न: आपल्यावर कोणी अन्याय केला तरी गप्प बसावे कां? कांही उत्तर देऊ नये कां?

उत्तर: होय. त्याशिवाय शांती येत नाही. उत्तर देण्यासाठी बुद्धीचा वापर करावा लागतो. बुद्धीचा वापर केला की क्लेश होतात. आपण उत्तर दिल्यानंतर सुद्धा ते थांबेलच् असे नाही. विवेकानंदांची एक गोष्ट सांगतात. ते कॉलेजात शिकत होते. त्यावेळी त्यांच्या एका प्रतिस्पर्ध्याने कॉलेजच्या इमारतीतील काचा फोडल्या व आळ विवेकानंदांवर घेतला. प्राचार्यांनी विवेकानंदांना ५० रु. दंड केला. विवेकानंदांनी तो दंड भरुन टाकला. विवेकानंदांचे मित्र म्हणाले, तू जर काचा फोडल्याच नाहीस तर तू तसे प्राचार्यांना सांगत कां नाहीस. विवेकानंद शांत राहिले. जर मी काचा फोडल्या नाहीत हे सिद्ध करायचे असले तर बुद्धीचा खूपच वापर करावा लागेल. जाऊ दे. त्यांचे त्यांना काय वाटेल ते वाटेल.

प्रश्न: मनांत विचार येऊ नयेत म्हणून काही करता येत का?

उत्तर: विवेक झाला पाहिजे. देहापेक्षा मी जसा वेगळा आहे तसा मनापेक्षाही वेगळा आहे. मन हे एक साधन आहे. बोलणारा, करणारा वेगळा असतो. स्वत: मन ते करीत नाही. डोळे, नाक व कान ही इंद्रिये जशी ज्ञानाची साधने आहेत तसे मन हे एक विचाराचे साधन आहे त्याचा द्रष्टा मी आहे. मनांत विचार आलेले मला समजतात. मनांत विचार येण्याचे थांबलेलेही मला समजतात. म्हणजे त्या विचारांपेक्षा मी वेगळा आहे. त्या मनापेक्षा मी वेगळा आहे. मनांत विचार येतात. येईनात. आले तसे जातील हे कळले म्हणजे मग कांही वाटत नाही. विचार आले म्हणून कांही वाटत नाही. विचार गेले म्हणूनही कांही वाटत नाही. परंतु, मन जेवढे निर्विचार होईल तेवढ चांगले. मन जेवढे निर्विचार होईल तेवढी शांती मिळेल. निर्विचार मन हे शांतीचे स्वरुप आहे. मनाचे समाधान हाच खरा मोठा योग आहे.

प्रश्न: निर्विचार अवस्था सारखी राहू शकते? कां मधूनच येते व मधूनच जाते?

उत्तर: तो अभ्यास झाला तर सारखी रहायला काय हरकत आहे? निर्विचार अवस्था सारखी राहू शकते. व्याख्यान देताना व्याख्यानाचा जो विषय आहे तोच विषय व्याख्यान देणाऱ्याच्या मनांत येतो. दुसरे कांही येतच नाही. असे झाले की

व्याख्यानाचा जास्तीत जास्त परिणाम होतो. तसे केले की एक विषय आत्मानंद. त्या शिवाय कांहीही नाही. बाकी सारे बाजूला होतात. संस्कारही मनाचे बाजूला होतात. त्यांची आठवणही होत नाही. त्यामुळे मनाच्या वृत्ती शांत होतात. मनाच्या वृत्ती कमी करण्याचा अभ्यास आहे त्यालाच समाधी असे म्हणतात. निरोध करता करता सगळ्या गोष्टी शांत होतात. ती सवय झाली म्हणजे झाले. त्यासाठी ईश्वराचे सहाय्य घेतात हे संतमहात्मे. योगसूत्रकार असे सांगतात की, समाधि ईश्वराच्या कृपेने लाभते.

प्रश्नः पातंजल योगसूत्रांत साधनपाद या दुसऱ्या प्रकरणांत क्रियायोग सांगितला आहे. तप, स्वाध्याय व ईश्वरप्रणिधान या तीन गोष्टी करणे म्हणजे क्रियायोग. संसार करत असतानाच गृहस्थाश्रमी व्यक्तीला तप करता येईल काय? संसार सोडायचा नाही ना आपल्याला?

उत्तरः तप म्हणजे काय हे अगोदर समजून घेतले पाहिजे. मनातल्या वासना कमी कमी होणे हेहि तपच आहे. काही काही व्याख्या वेगवेगळ्याही केलेल्या आहेत. उद्धवजींना उपदेश करीत असताना **कंदत्यागः परम दानम्, कामत्यागः तपस्विधम्** असा एक उपदेश केला आहे. कंदत्यागः म्हणजे काय? कंद म्हणजे भूतद्रोहः असे श्रीधरस्वामींनी टीकेमध्ये लिहिले आहे. **कोणाहि जीवाचा न घडो मत्सर** ही पूजाच आहे. कोणाचाही द्रोह आपल्या मनांत न येणे, तितिक्षांच्या द्वारे अजातशत्रु होण्याचा अभ्यास करणे हे दान आहे असे म्हणतात. नुसते पैसा देणे, वस्त्रे देणे हे दान नाही. कामाचा त्याग, मनातल्या वासना विचाराने कमी होणे, निरोध करुन कमी होणे, योगाभ्यासाने कमी होणे. समाधी, ध्यानाच्या मार्गाने इच्छा व वासना कमी होणे हे तपच आहे. असे तप केल्यामुळे प्रज्ञा स्थिर होते. बुद्धी स्थिर होते.

प्रश्नः ईश्वरप्रणिधान म्हणजे आपले तन, मन व धन ईश्वराला अर्पण करणे हेच ना?

उत्तरः ईश्वर प्रणिधान म्हणजे ईश्वराचे अनुसंधान किंवा, त्याचे चिंतन. मनांत सारखे ईश्वराचेच विचार येणे हेच ईश्वरप्रणिधान. त्यामुळे मन स्थिर होते. ईश्वररूप स्थितप्रज्ञ झालेले जे महात्मे, त्यांच्या चरित्र वाचनाने व चिंतनानेहि मन स्थिर होते. हाहि एक स्वतंत्र उपाय सांगितलेला आहे. **वीतरागविषयं वा चित्तम** श्रेष्ठ पुरुषांच्या चरित्रांचे चिंतन केल्यामुळे मन शांत होते, मन स्थिर होते. मन स्थिर करण्याचा हा एक चांगला उपाय आहे. तसे ईश्वरप्रणिधान म्हणजे ईश्वराबद्दल प्रेम उत्पन्न झाल्यानंतर सारखी त्याचीच आठवण होते. ईश्वराबद्दल प्रेम उत्पन्न झाल्यानंतर त्याचे सारखे स्मरण होते. सात्विक अष्टभाव जागृत होणे, प्रेमाश्रु येणे हे सगळे आपोआप होते.

प्रश्नः गृहस्थाश्रमी माणसाला संसार करत असताना असे ईश्वरप्रणिधान करणे शक्य आहे नां?

उत्तरः हो. न व्हायला काय झाले? ईश्वरनिष्ठ संतांची चरित्रे वाचल्यानंतर ईश्वराबद्दल आवड निर्माण होते. संसारातील आवड कमी होते. ईश्वराबद्दलची भक्ति वाढायला लागते. इकडची कमी होते. तिकडची वाढायला लागते.

प्रश्नः परवा बोलताना श्री. अशोकरावांनी मला सांगितले की संसारात अतिथिसारखे राहिले पाहिजे. म्हणजे काय ते जरा सांगा.

उत्तरः आसक्ति कमी झाली पाहिजे. संसाराबद्दल जी ममता वाटते ती ममता कमीकमी झाली पाहिजे.

प्रश्नः आपण मला गीतेच्या तेराव्या अध्यायांतील नववा श्लोक सांगितला होता.

उत्तरः ही तितिक्षाच आहे. त्याच्यावरची श्री. ज्ञानेश्वर महाराजांची टीका फार चांगली आहे. इष्टप्राप्ती होणे किंवा अनिष्टप्राप्ती होणे त्यावेळी समचित्त राहिले पाहिजे. इष्टप्राप्ति झाल्यावर जास्ती आनंद होणे, अनिष्ट झाले तर विषाद वाटणे हे बरोबर नाही. **जैसी स्थिती आहे तैसा परी राहे।** हे साधले पाहिजे.

प्रश्नः बायकोमुलांवर प्रेम करायचे नाही असे नाही ना?

उत्तरः जोवर आपण गृहस्थाश्रमांत आहोत तोवर त्यांच्यावर प्रेम करणे हे आपले कर्तव्यच आहे. तुकाराममहाराजांनी उसाच्या मळ्यांत काम केले. त्यांना मळ्याच्या मालकाने येताना उसाची एक मोळी दिली. तुकाराममहाराज ती उसाची मोळी आपल्या डोक्यावर घेऊन आले. वेशीच्या आत आल्यावर सगळी मुले आली. सर्वांचा विश्वास तुकाराममहाराज आपल्याला उस देतील. मुले एक एक उस घ्यायला लागली. एकच उस राहिला. तेवढाच घरी घेऊन आले. मुलाला दिला. इतर मुलांनी उस मागतिल्यावर त्यांना नाही म्हणायचें व सगळे उस फक्त आपल्या मुलानाच द्यायचे असे तुकाराममहाराजांनी केले नाही. याला समचित्त म्हणतात. स्वतःच्या मुलांना प्रतिबंध नाही. तसाच इतर मुलांनाहि प्रतिबंध नाही. त्यांनाही उस दिले. असे समचित्त साधले पाहिजे. म्हणजे जास्ती आनंद होतो. संसारांत राहूनही असा जास्त आनंद मिळवता येतो. संसार म्हटला म्हणजे काही प्रतिकूल व्हायचेच. पण आपले चित्त जास्त व्यापक झाले म्हणजे तो आनंद मिळतो. इथे आपले घर मुलगा, बायको, आप्तेष्ट एवढीच आपण मानतो. पण चित्ताची समता निर्माण झाली की सर्वच माझे आहे हे विश्वचि माझे घर असे वाटले पाहिजे. अशी भावना होणे हे मोठेच भाग्य आहे. कारण त्यामुळे जास्ती आनंद मिळू शकतो.

प्रश्नः एकाने असे लिहून ठेवलय की, निंदा झाली तर वाईट वाटतां कामा नये. उलट आनंद वाटला पाहिजे.

उत्तरः खरे आहे. निंदा झाली की पापक्षय होतो असे म्हणतात. कोणी निंदा केली, नांवे ठेवली तर आपण म्हणावे वा छान झाले. पापक्षय झाला. चांगले झाले. परमार्थामध्ये स्तुतीला गौण मानले आहे. कारण स्तुतीमुळे अहंकार वाढतो. निंदेमुळे अहंकार कमी होतो. अहंकार कमी होणे हे परमार्थात प्रगतीचे लक्षण आहे.

प्रश्नः नोकरी करत असताना न रागावता शांत राहून सर्वांच्याकडून कामे करुन घेणे शक्य आहे कां?

उत्तर : नोकरी करणाऱ्या अधिकाऱ्याला प्रसंगाप्रमाणे रागवावे लागतेच. फक्त ज्याच्यावर आपण रागावलो त्याबद्दल मनांत काही कटु भावना नसली म्हणजे झाले. तो राग कायम ठेवू नये.

प्रश्नः पैशाबद्दल आपल्या मनांत लोभ निर्माण होऊ नये यासाठी काय केले पाहिजे? निर्लोभी कसे व्हायचे? मनांतील लोभ कसा काढून टाकायचा?

उत्तरः आसक्ति सगळीकडचीच कमी झाली पाहिजे. पैशाचीहि आसक्ती कमी झाली पाहिजे. आसक्ती कमी व्हायची याचा अर्थ कोणीहि पैसे मागायला आला म्हणजे त्याला पैसा देऊन टाकायचा असे नाही. मला हे पाहिजे, मला ते पाहिजे, पैसा वाढला पाहिजे असे वाटता कामा नये. समाधान राहिले पाहिजे. आहे त्यात समाधानात राहिले पाहिजे. त्यासाठीच दान करायला सांगितले आहे. इदं न मम असे वाटले पाहिजे. **देवाय स्वः इंद्राय स्वः** असे म्हणतात ना? तसे म्हणून दान करायचे. आत्मा वस्तुतः असंग आहे. दान, पुण्य, पाप यांचा व आत्म्याचा कांहीहि संबंध नाही. हे माझे आहे अशी जी ममता उत्पन्न होते ती ममता कमी करण्यासाठी दान आहे. यथाशक्ती दान व त्याग करत राहिले म्हणजे ममता कमी होत जाते. **धन हे साधन आहे.** साधन म्हणूनच धनाचा उपयोग केला गेला पाहिजे.

प्रश्नः धनाचा फार संचय करायचा नाही असा याचा अर्थ का?

उत्तरः मुद्दाम धनाचा संचय कोण करताय्? धन मिळाले असता ते टाकून द्यायचे असा त्याचा अर्थ नाही. अनासक्त वृत्ती पाहिजे. जे येईल ते येईल. जे जाईल ते जाईल. जे मिळेल त्याचा योग्य विनियोग केला पाहिजे. तुकाराममहाराज म्हणतात- **जोडोनिया धन उत्तम वेव्हारे। उदास विचारे खर्च करी।।** खर्चही त्यांनी करायला सांगितला आहे. औदार्य पाहिजे. मोठे मन पाहिजे. कर्ण उदार म्हणून प्रसिद्ध होता. धर्मराजाच्या राजसूय यज्ञात श्रीकृष्णाची सर्व देखरेख होती. श्रीकृष्णाने वेगवेगळ्या कामासाठी माणसांची नेमणूक केली. श्रीकृष्णाने दान करण्याच्या कामावर कर्णाची नेमणूक केली. हे पहाण्यासारखे आहे. यज्ञ करणारा धर्मराज. वास्तविक धर्मराजाने

दान करायला पाहिजे. त्याच्याकडचा पैसा आहे तो. श्रीकृष्ण म्हणाले तुला दान जमायचे नाही. पुन्हा अहंकार घेऊन बसशील. मला यज्ञासाठी इतके पैसे मिळाले. इतक्या राजांनी इतके दिले. मी इतके दान करतो. नाही. अहंकारहि उपयोग नाही. धन जाणार याबद्दल खेदहि उपयोगाचा नाही. तर ते खरे दान.

प्रश्नः ध्यानामध्ये निर्विचार मन होते. तीच निर्विचार समाधि का? निर्विचार समाधि व निर्विकल्प समाधि एकच कां? कां त्यात फरक आहे.

उत्तरः निर्विचार समाधि व निर्विकल्प समाधि एकच. **मनाच्या वृत्ती शांत झाल्या म्हणजे समाधिच आहे. ध्यानाची पुढची भूमिका म्हणजे समाधि.** जास्तीवेळ मन स्थिर झाले म्हणजे समाधि. मी ध्यान करतो आहे. हे ध्येय आहे. माझे ध्यान चाललेले आहे हे भेद असणे ही ध्यानाची अवस्था आहे. ध्येयाकार मन झाले म्हणजे काही उरत नाही. त्यालाच समाधि म्हणायचे.

प्रश्न : मन निर्विचार होते. पण त्यावेळी मी आहे ही भावना असते. ती भावनाही गेली पाहिजे का?

उत्तरः समाधित ध्येय काही रहात नाही. मनाचा पूर्ण निरोध होतो. मनाच्या सर्व वृत्ती थांबतात. मन ध्येयाकार होणे ही संप्रज्ञात समाधि झाली. ध्येयहि शिल्लक राहिले नाही की ती असंप्रज्ञात समाधि. मनाच्या सर्व वृत्ती थांबणे ही समाधिच आहे.

प्रश्नः ज्थिे कांही नाही तोच परमेश्वर असे म्हणणे बरोबर होईल काय?

उत्तरः कांही नाही म्हणजे परमेश्वर असे कसे म्हणता येईल? परमेश्वर आनंदरुप आहे. परमेश्वर भावरुप आहे. परमेश्वर सत् चित् आनंद रुप आहे. कांही नाही म्हणजे परमेश्वर असे म्हणता येणार नाही. शून्यवाद येईल मग बुद्धांचा! बौद्धांना परमेश्वर कळला नाही असे म्हणतात. अस्पर्शय योग ज्याला म्हणतात कोणताहि विषय नाही. परंतु एक आनंद कायम आहे तिथे मन राहिले पाहिजे. मन विषयापासून बाजूला झाले पाहिजे. कोणतातरी एक आत्मानंद आहे. त्या आत्म्यात देह स्थिर झाला पाहिजे. काही नाही म्हणजे आत्मा नाही. परमेश्वर शून्यरुप नाही. परमेश्वर सदरुप आहे तोच सगुण आहे. तोच निर्गुण आहे. सगळे तोच आहे. हळुहळु या भूमिका समजून येतात.

प्रश्नः क्षेत्र क्षेत्रज्ञ विवेक करायचा म्हणजे नेमके काय करायचे?

उत्तरः मी देहापेक्षा निराळा आहे. इंद्रियापेक्षा मी वेगळा आहे. बाह्य घरदार प्रपंचापेक्षा मी वेगळा आहे. मी फक्त साक्षी आहे. यालाच अतिथी म्हणतात. अतिथी नुसता प्रेक्षक असतो. बाहेरचा मनुष्य अतिथीच असतो. परंतु, घरातल्या माणसाला अतिथी होता येणे फार कठीण आहे. सगळा अधिकार असून कांही बोलायचे नाही. तो अभ्यासच होतो. निर्ममो निरहंकारः निर्मम होणे फार कठीण. त्यामुळे गृहस्थाश्रम

ही शाळाच आहे. गृहस्थाश्रमांत असताना अनेक प्रसंग आपल्या मनाच्या प्रतिकूल होतात. पण ते सगळे अनुकूल वाटावे. नारदांनी भागवतात सांगितले आहे. गृहस्थाश्रमी कुटुंबप्रमुखाने सगळ्यांना अनुकूलता दाखवावी. बरे आहे. तुमचेहि चांगले आहे. योग्य आहे. म्हणजे काही आग्रह रहात नाही. त्यांचेही समाधान होते. संसार देवाचा आहे. आपला नाही. असे मनात बिंबले म्हणजे संसाराबद्दलची ममता कमी होते. हे ऑफीसमध्ये काम करण्यासारखे आहे. ऑफीसात आपण काम करतो. पण ऑफीसात आपले काहीच नसते. नफानुकसानीची जबाबदारी रहात नाही. तसेच संसारातही राहिले पाहिजे.

श्री. अशोकराव कवीश्वर यांनी हे सर्व बोलणे ऐकले. बाहेर आल्यवर ते म्हणाले, 'महाराजांचे हे सांगणे आहे नां ते पूर्ण अनुभुतीचे सांगणे आहे. लहानपणापासून आंम्ही अनुभवतो आहोत. कधीही कोणावर रागावले नाहीत किंवा काही नाही. राग जरी आला तरी सांगायचा पर्याय वेगळा असतो. समजावून सांगतील. प्रति एकनाथच आहेत. फार विलक्षण आहे. घरांत सुद्धा अगदी तसेच वागतात. प्रसंगाला अनुरुप असे समजावून सांगतात. लहान मुलांपासून तो मोठ्या माणसापर्यंत सगळ्यांना आदराने अहोजाहो असे संबोधतात.

प्रश्नः एखाद्याच्या जीवनांत दुःखे व आघात यांची मालिका दिसते. हाही कर्मविपाक कां?

उत्तरः जीवनांत नुसते दुःख येत नसते. दुःखाबरोबर कांही सुखेही असतातच. जीवनांत नुसती दुःखेच आली व सुख अजिबात आले नाही तर मनुष्य जिवंतच रहाणार नाही. सुखाचे स्मरण करुन दुःखाचे विस्मरण करायचे. दुसरे काय करणार? दुःख कमी व्हायला वेळ लागणारच. सहाजिकच आहे. काळ हे एकच औषध आहे. काळ गेल्याशिवाय दुःख कमी होत नाही.

प्रश्नः महाराज सुखे व दुःखे ही एकाच कल्पनेची दोन रुपे आहेत असे म्हणायचे का?

उत्तर : आध्यात्मिक सुखे व दुःखे मानसिक आहेत. ती कांही शारीरिक नाहीत. आपल्या शरीरात बिघाड काय झाला? तुमचे दुःख मानसिक आहे. तुमच्या शरीरांत या मानसिंक दुःखामुळे काय बिघाड झाला आहे? झोप लागते आहे. तहान लागते आहे. खाणेपिणे चालले आहे. नित्याचे शारीरिक व्यवहार चालूच आहेत. मनावर जो परिणाम झाला आहे तोच मानसिक सुखे व दुःखे देतो आहे. हा परिणाम सहाजिकच आहे. आत्मीयता एवढी दृढ झालेली असते की वियोगाचे दुःख होतेच. उपयोग काय आता स्मरण करुन? असा विचार केला पाहिजे. सत्य कटु असले तरी ते मानावेच लागते. सात्विक जीवात्म्याला सुख हे लाभणारच. जीवनांत काय आणि मृत्युनंतर काय? आपला संबंध संपला त्याला कोण काय करणार?

कर्मविपाक सिद्धांत मानल्याशिवाय या घटनेचे स्पष्टीकरण करताच येणार नाही. आपला संबंध आहे तो संबंध कां आला व तो का संपला?

प्रश्नः ईश्वर करतो ते भल्याकरिताच करतो हा विचार बरोबर नाही का?

उत्तरः तो विचार फार मोठा आहे. अनेक जन्माची कर्मे आहेत. कोणत्या कर्माचे हे फळ आहे हे कसे समजणार आपल्याला? आपल्या कोणत्या जन्मांतील कर्माचे हे भयंकर फळ मिळाले व हा आघात झाला हे समजून काय करायचे आहे. स्वतःच्या हिताकडे लक्ष द्यायचे. दुःख कशाने कमी कमी होईल त्याचे मार्ग कोणते आहेत इकडे लक्ष द्यायचे. हा प्रयत्न करायचा. त्या जीवाचा आपला संबंध संपला हा विचार केल्याशिवाय दुःख कमी होणार नाही. एकत्र जमलेले जीवात्मे म्हणजे संसार आहे. अनेक कर्मफळे असलेले जीवात्मे एकत्र आले की संसार होतो. दुसरे काय? कोणाचा संबंध लौकर संपतो. कोणाचा संबंध जास्तीवेळ टिकून रहातो. कर्मसिद्धान्त मानावाच लागतो. जीवात्मा जन्ममरणरहित आहे. देहाला जन्म आहे व मृत्युही आहे. नवीन देहाचा जीवात्म्याशी संबंध येणे म्हणजे जन्म व देहाचा संबंध सुटणे म्हणजे मृत्यू. देह म्हणजेच आत्मा असे म्हणता येणार नाही.

प्रश्नः एकाद्या जीवाने आपल्या पुढील जीवनांत आघात किंवा दुःखे येऊ नयेत म्हणून काय करावे?

उत्तरः सदाचरण व सदवर्तन आघात आले तरी ठेवणे, सुखाचे प्रसंग आले तरी ठेवावे. ती बुद्धी देवानेच दिलेली आहे. चांगले वागण्याची बुद्धी देवाने दिल्याशिवाय कशी मिळणार? आपली चांगली बुद्धी शाबूत आहे ही ईश्वराची कृपाच समजायची. संसारात सुखे व दुःखे दोन्हीही असतात. केवळ दुःखेच आहेत असेही म्हणता येणार नाही. सुखाचे प्रसंगही असतात, चाललेच आहे .

प्रश्नः गुरुंच्या कृपेने शांती मिळते नां? मग आम्ही दोघेही आपणाला शरण आलो आहोत. आम्हाला शांती द्या.

उत्तरः देवावर भार घालायचा. संसार देवाचा आहे. असे जर पाहिल्यापासून असले तर कांही दुःख होण्याचे कारण नाही. दुर्योधन सगळेच माझे आहे म्हणून शेवटपर्यन्त धरुन बसला. भरताने हे माझे नाही हे पाहिल्यापासून मानले आणि सांभाळत बसला. मी देणार नाही असे भरत म्हणाला नाही. त्यामुळे चौदा वर्षे झाल्यावर भरत ते राज्य रामाला देऊ शकला. राज्य गेले म्हणून भरताला वाईट वाटले नाही. म्हणून रामाला सुद्धा म्हणावे लागले, ''माझ्यापेक्षा तुझा त्याग मोठा आहे. मला राज्य मिळालेच नव्हते. पण तुला तुझ्या आईने राज्य मिळवून दिले असतांना तू तुला ते राज्य नको आहे असे म्हणालास. हा फरक आहे.'' असे चांगले चांगले विचार वाचावेत व मनन करावे. त्याचा मनावर चांगला परिणाम होतो. असे विचार केले व संतांची चरित्रे वाचली तर श्रद्धा डळमळत नाही. या विचारांमुळे दुःखाच्या वेळी सुद्धा श्रद्धा अढळच राहील.

आमच्या आई सांगायच्या. आजींना अठरा मुले होऊन गेली. त्यातील एक नऊ वर्षाचा होऊन गेला. नरसोबाच्या वाडीला गोविंदस्वामी म्हणून सत्पुरुष होऊन गेले. त्यांनी दत्तात्रयाची उपासना सांगितली. त्याच्या जवळची दत्ताची मूर्ती आजींना दिली. हा तुमचा मुलगा आहे असे समजा म्हणाले. आमच्या आजींनी व आजोबांनी त्याला कपडे घालायचे, पाळण्यात निजवायचे. दत्तूबाळ म्हणून म्हणायचे. सगळे दत्तूबाळाचेच ते समजायचे. आमच्या देवांत अजूनही ते आहेत. रोज सकाळी आजी देवाकडे जायच्या. पाचशे प्रदक्षिणा घालून यायच्या. सकाळी गेल्यावर बारा वाजता परत यायच्या. घरी कोणीतरी बाई स्वयंपाक करायच्या. स्वामी किंवा आणखी कोणीतरी आले तर माधुकरी वाढायच्या. दमुन जायच्या. पण शेवटी फळ मिळाले. दुःखाचे प्रसंग प्रथम आले पण शेवटी सुख मिळाले. पहिली दुःखे होती, पण असे चांगले व वाईट प्रसंग सर्वांवरच येतात. असे अनेक जीव असतात. प्रसंग सर्वांवरच येतात. भीष्माचार्यांनी सर्व पांडवांना विचारले,''तुम्हाला हे दुःख कां भोगावे लागत आहे? तुमच्या बाजूला काय कमी आहे? हा धर्मराज म्हणजे धर्ममूर्ती आहे. शेवटपर्यंत याने धर्म सोडला नाही. भीम म्हणजे शक्तीची मूर्ती आहे. अर्जुनाने शंकरापासून सर्व अस्त्रविद्या मिळवलेली आहे. आणखी सर्वात मोठी शक्ती म्हणजे तुमचा मित्र कृष्ण आहे. असे असताना तुम्हांला दुःखे कां?'' काय याचे उत्तर आहे? कर्मविपाक सिद्धान्त मानावाच लागतो. अदृष्ट मानल्याशिवाय याचे उत्तर देता येतच नाही. ते अदृष्ट काय आहे याचा विचार करुन काय करायचे आहे? दुःख झाले की गेले. झाले गेले सगळे संपले. तुमचे तुम्ही चांगले वागून रहा. भीष्माचार्यांनी सुद्धा शेवटी हेच सांगितले.

प्रश्नः महाराज काही उपासना सांगा.

उत्तर : हरिपाठ चांगला आहे. श्री धुंडामहाराजानी त्याचा चांगला अर्थ सांगितला आहे. ज्ञानेश्वर महाराजांवर सुद्धा किती प्रसंग आले. ते घरात जाऊन दार लावून बसले. शेवटी मुक्ताबाईनी त्यांना ताटीचे अभंग म्हणून बाहेर काढले. विसरुन गेले पाहिजे. तर जगाची कामे होतात. नाहीतर नाही. स्वतः समाधानी असल्याशिवाय दुसऱ्याला काय सांगता येणार?

''तुम्ही जर दुःख करीत बसलात की माझा अपमान झाला तर काय होईल. ताटी उघडा ज्ञानेश्वरा.'' असे अनेक प्रसंग आहेत. संतांची चरित्रे वाचावीत. पातंजल योगशास्त्रात सांगितले आहे. ''वीतराग विषयम् वा चित्तम्'' महात्मे, ब्रह्मज्ञानी त्यांच्या चरित्राचे चिंतन केले तरीसुद्धा चित्त स्थिर होते. म्हणून तो उपाय सांगितला आहे. सर्वसामान्य माणसाने श्रद्धेने संतांची चरित्रे वाचावीत. एकनाथी भागवत वाचा. भावार्थ रामयण वाचावे. रामावर किती आघात झाले. पण ते धीरोदत्त महात्मा होते. ते ऐकून आपण प्रयत्न करायचा. प्राणायाम हाही उपाय आहेच. पण ते सर्वांना साधता येतील असे नाही.



युवकांचे मनोगत आणि महाराजांचे मार्गदर्शन

तरूण मंडळी या मार्गाकडे वळलो तर अधिक चांगले होईल. विज्ञानाच्या प्रगतीबरोबर ही मनाच्या विकासाची दृष्टी त्यांना लाभली तर योग्य व्यक्तिमत्व विकास होईल. निवृत्तीपर प्रवृत्ती अल्पवयात जोपासली जाण्याची भीती बाळगण्याचे कारण नाही. केवळ भोग प्रधानवृत्ती न राहता त्याग प्रधानवृत्तीकडे तरूणमंडळींचा कल गेला तर समाजाचे त्यात हितच आहे.

केवळ जप माळ घेऊन बसणे म्हणजे अध्यात्म नव्हे तर विचार जागृती होणे हे अध्यात्माचे काम आहे. वेगवेगळे परंतु विद्यार्थ्यांनी विचार करावे असे मुद्दे या ठिकाणी आलेले आहेत. त्याचा उपयोग व्हावा अशी अपेक्षा आहे.

युवकांचे प्रातिनिधिक विचार

प. पू. श्रीवामनरावजी गुळवणीमहाराजांकडे पुष्कळ विद्यार्थी वर्ग आकृष्ट होत असत. प. पू. श्रीगुरुमहाराज या मुलांबरोबर बोलण्यात रंगून जात. कुणालाही सत् प्रवृत्तीकडे वळवणे हे तर त्यांचे अव्यक्त कार्यच होते. परंतु अभ्यासाकडे दुर्लक्ष करुन परमार्थाची पुस्तके वाचायची नाहीत. अभ्यासाची पुस्तके हेच तुमचे धार्मिक वाचन आहे असे प. पू. श्रीगुरुमहाराज म्हणत असत. मुलांना एक विलक्षण ओढ पुण्याला जाण्याची असे. येथेही युवकमंडळी प. पू. श्रीदत्तमहाराजाकडे येत असतात. हे सारे म्हातारपणी करायचे असे या मुलांना वाटत नाही हे पाहून बरे वाटते. दूरदर्शनसारख्या माध्यमाने चित्रपट संस्कृतीचा प्रभाव अतिशय वाढलेला आहे. वास्तवतेपासून दूर नेणारे, संगीत कलेपासूनही फारकत झालेले. हे सारे प्रभाव मनावर असून जेव्हा तरुण मंडळी महाराजांकडे येताना दिसतात. तेव्हा त्यांचे मनोगत जाणून घ्यावे असे वाटले. मुलांनी योग्य दिशेने विचार केलेले आहेत. कुणालाही ते वाचून भारतीय संस्कार पूर्णपणे नष्ट होऊ शकणार नाहीत असे वाटून एक दिलासा वाटेल.

प. पू. श्रीमहाराज आमचे प्रेरणा स्थान आहे. ज्यावेळी ही मुले पुण्याला दर्शनासाठी जातात तेव्हा सर्व प्रथम प. पू. श्रीदत्तमहाराज त्यांच्या अभ्यासाची चौकशी करतात. कॉलेज, शाळा बुडवून आमच्याकडे येऊ नका असे आग्रहानी सांगतात. प. पू. श्रीमहाराज प्रयत्नवादी आहेत, कसून अभ्यास करावा. ९९ गुणांची तयारी करावी व एकगुण देवाकडे मागावा असे त्यांच्या बोलण्यात वारंवार येते. हा प्रयत्नवाद हीच आमची प्रेरणा आहे असे ही विद्यार्थीमंडळी म्हणतात. यांच्यातील कितीतरी मुले मनापासून अभ्यास करु लागली आहेत. ३५ टक्क्याचे ज्ञान म्हणजे परीक्षा हे प. पू. श्रीदत्तमहाराजांना मान्य नाही. अभ्यास पूर्ण हवा अशी प. पू. श्रीमहाराजांची धारणा आहे.

आजकाल नुसती हवाच दूषित आहे असे नाही, वृत्तींचेही आरोग्य बिघडले आहे. अशावेळी उगीच गप्पा मारण्यात वेळ न घालवता अभ्यासाकडे वळणारी यांची मने म्हणजे प. पू. श्रीदत्तमहाराजांनी केलेला संस्कार आहे असे ती मानतात. काही विद्यार्थी अजिबात अभ्यास करीत नसत. ते करु लागले आहेत हे प्रत्यक्ष डोळ्यांनी जेव्हा आपण पाहतो त्यावेळी प. पू. श्रीमहाराजांच्या शब्दांचा प्रभाव कळून येतो व शक्तीपाताचे महत्व कळते.

कोणतीही अपेक्षा न ठेवता प. पू. श्रीदत्तमहाराज आपल्याला जो आशीर्वाद देतात तो आधार येवढा मोलाचा असतो की त्यांना वाटते आपण उंच भराऱ्या मारुन ध्येय साकार करु. कारण पाठीशी ते आहेत. प्रतिकूल वातावरणात मनाला थोडा विवेक सुचतो किंवा चांगले काम करावेसे वाटते याला एकमेव कारण प. पू. श्रीदत्तमहाराज आहेत.

यश मिळवून प. पू. श्रीदत्तमहाराजांकडून कौतुक करुन घ्यावे यासारखे भाग्य नाही. स्कॉलरशिप मिळल्यावर त्याचे पैसे प. पू. श्रीदत्तमहाराजांचे चरणी अर्पण करावे अशी इच्छा या युवकांना होते. पण प. पू. श्रीदत्तमहाराज त्यात अधिक भर घालून ज्याचे त्याला बक्षिस म्हणून देतात तेव्हा त्यांच्या अंतरंगातील प. पू. श्रीदत्तमहाराजांचे स्थान अधिक दृढ होते. प. पू. श्रीदत्तमहाराजांचा जीवनाकडे बघण्याचा आशावादी दृष्टीकोन आहे तोच ते विद्यार्थ्यांना देतात. त्यामुळे परीक्षेच्या वेळी आजारी होणे, घेरी येणे हे प्रकार न होता प्रयत्न केल्याने मनाला धीर येतो. समजा अपयश आले तरी मन खचून जात नाही कारण सोशिकता प. पू. श्रीमहाराज देत असतात. अपयश पचवून पुन्हा उभे राहणे ही जिद्द आम्हांला प. पू. श्रीदत्तमहाराजच देत असतात व आम्हाला उभे करतात.

माणसाने ज्ञानाकरता व परमेश्वर प्राप्तीकरता वेडे व्हावे या दोहोंपैकी एक व्यसन जीवनाला उजळून टाकते असे त्यांचे म्हणणे आहे.

ज्ञानाचा हव्यास विद्यार्थ्याला असावा असे ते सांगत असतात. त्याचाही सुपरिणाम मनावर होत असतो. ज्ञानाबद्दल आस्था, जिज्ञासा हवी. ही जिज्ञासा या वयांत कोणत्याही ज्ञानाबद्दल ऐकताना त्यांच्यात दिसून येते. सखोलतेकडे लक्ष आणि ज्ञानाची खोली वाढवा ही तर त्यांच्या सांगण्यातील मुख्य गोष्ट आहे.

व्यवहार करतांना मिळणारी शिदोरी ही अध्यात्म साधनेचा पाया आहे. ही जाणीव हेच आमचे पुढील जीवनातील साध्य आहे. असे प्रातिनिधिक स्वरुपाचे अनेक युवकांचे विचार आहेत आज शैक्षणिक पदवी परीक्षा या वृत्तीची जोपासना करून त्यांनी मिळविली आहे.

* * * *

गोष्टी लहान पण तत्व महान

परीक्षेचे दिवस होते. प. पू. श्रीदत्तमहाराजांची नातवंडे रात्री त्यांच्याच खोलीत अभ्यास करीत बसली होती. ११च्या सुमारास प. पू. श्रीमहाराज झोपू लागले तेव्हा ही मुले उठून दिवा बंद करून बाहेर जाऊ लागली. प. पू. श्रीदत्तमहाराजांनी विचारले की, ''बाहेर का जाता? बसा ना इथे अभ्यासाला''. मुले स्वाभाविकपणे म्हणाली, ''आपण झोपत आहात तेव्हा आम्ही बाहेर अभ्यासाला बसतो म्हणजे दिवा बंद करता येईल.'' प. पू. श्रीदत्तमहाराज लगेच म्हणाले, ''डोळे बंद केले की झोप येते. डोळे बंद केल्याने जे काम होते, त्याकरता दिवे बंद कशाला करायचे? जे काम थोडक्यात होते त्यासाठी अवघड गोष्ट कां करावी? अल्प भोजनानंतर जर तेच फळ मिळणार असेल तर त्यासाठी उपास करण्याची आवश्यकता नाही.'' अशा अर्थाचे सुभाषित त्यावेळी त्यांनी मुलांना सांगितले. आपले जीवन कशाही तऱ्हेने जुळवून घेण्याची ही त्यांची पद्धत शांत स्थिर मनाची द्योतकच आहे.

प. पू. श्रीदत्तमहाराजांचा नातू चि. सूरज तांबोळी याने महाराजांना एक प्रश्न विचारला. ''सगळ्या गोष्टी जर देव करतो तर मनुष्याच्या प्रयत्नांना काय अर्थ आहे?'' नाथ भागवतातील अवधूत गीतेचा संदर्भ देऊन अजगराला गुरु करणे म्हणजे सर्व प्रयत्न सोडून देणे असा होतो कां?

प. पू. श्रीदत्तमहाराजांनी दिलेले उत्तर सर्वांनी लक्षात ठेवण्यासारखे आहे. 'सगळे अवधूतांच्या मनोवृत्तीचे असतात का? ती फार वेगळी अवस्था आहे. सर्व सामान्य माणसांना ते जमण्यासारखे नसते. तुम्ही सकाळी चहा पिता. देवाची इच्छा असेल तर मिळेल असे म्हणून स्वस्थ बसून चालते का? तोंड धुवून स्वयंपाक घरात जाता ना? तेव्हा ही फार मोठ्यांची अवस्था सर्व सामान्यांना लगेच जमणारी नसते. जोपर्यंत प्रयत्न खरा वाटतो. तोपर्यंत करीत राहायचे. हेच खरे. उगीच सगळे खोटे म्हणण्यात अर्थ नाही. प्राथमिक अवस्थेत विहीत कर्म करणे अत्यंत आवश्यक असते. कारण श्रीज्ञानदेवांनीच सांगून ठेवले आहे, ''आपुले जे विहित ते ईश्वराचे मनोगत'' हा मोठा पण छोट्यांसाठी प्रयत्नशीलतेचा संदेश देऊन महाराज स्तब्ध झाले.

* * *

माऊलीहूनही प्रेमळ

श्री. क्षेत्र कुरवपूर येथे भागवत सप्ताह करण्यासाठी प. पू. श्रीदत्तमहाराज कुरवपूरला गेले होते. आपणही या संधीचा फायदा घेऊन कुरवपूर सारख्या ठिकाणी श्रीगुरुचरित्राचा सप्ताह करावा असे त्यांच्या नातवाला वाटले. त्याप्रमाणे ठरले. सप्ताह सुरु झाला. पहिल्याच दिवशी अडचण म्हणजे जुलाब झाले. गावांत औषध-पाण्याची सोय नव्हती. आता दुसऱ्या दिवशी वाचन होईल की नाही असे वाटू लागले. मधे तर उठता येत नाही. अशी त्याची स्थिती झाली. प. पू. श्रीदत्तमहाराजांनी एकदा विचारले की, उद्या वाचणे जमेल ना! का आपल्या पिताजींना सांगू? त्याने नको म्हटले, मी वाचीन.

रात्री निजताना प. पू. श्रीदत्तमहाराज नातवाला म्हणाले, ''रात्री जावे लागले तर आम्हाला उठवा. एकटे जाऊ नका, आम्ही येऊ तुमच्याबरोबर. रात्री त्याला उठावे लागले. दाराच्या आवाजाने श्रीमहाराज उठले. पण श्री. रघुनाथराव असल्यामुळे प. पू. श्रीदत्तमहाराजांना जावे लागले नाही.

दुसऱ्या दिवशी पहाटे उठून स्नान करून नातू वाचायला बसला. खरोखर गुरुकृपा. पोथी व्यवस्थित वाचून झाली. प. पू. श्रीदत्तमहाराजांना नमस्कार करताना महाराज म्हणाले, 'श्रीपाद श्रीवल्लभांनी परीक्षा पाहिली. सप्ताह उत्तम पार पडला.'

जीवनमुक्त महात्मे अलिप्त असले तरी प्रसंगी असे प्रेम करतात. माऊलीहून हा वात्सल्यभाव व्यापक असतो. त्यांच्या नातवाच्या जागी अन्य कोणी असता तरी प. पू. श्रीदत्तमहाराजांनी हेच प्रेम त्याला दिले असते. कारण अलिप्तपणा बरोबर समदृष्टी आलेली असते. त्यामुळे सर्वांशी समभावाने वागणे होते.

* * * *

भागवत सप्ताह चुकेल

नारेश्वरला भागवत सप्ताह चालू होता. नारेश्वर हे प. पू. श्रीरंगावधूतस्वामींचे पवित्र व रम्य ठिकाण आहे. नर्मदेचे पात्र स्वच्छ विस्तृत आहे. मुंबईकर मुलांना त्याची अपूर्वाई जास्त.

प. पू. श्रीदत्तमहाराजांची सर्व नातवंडे सायंकाळी ५ वाजेपर्यंत सप्ताह ऐकत व नंतर नदीवर पोहण्यास जात. सायंकाळी ७ वाजेपर्यंत परत येत असत. प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या ही गोष्ट लक्षात आली. ते मुलांना म्हणाले, ''अरे, सायंकाळी नदीवर जाऊ नका. नर्मदेत खूप मगरी आहेत. त्या काठावर येऊन बसतात.'' सूरज त्यांचा नातू लगेच म्हणाला, ''आजोबा, ज्या ठिकाणी भागवत सप्ताह चालतो तो संपेपर्यंत कुणालाही मृत्यू येत नाही. मग भिती कसली.'' प. पू. श्रीदत्तमहाराज झटकन उत्तरले की, ''मगरीने आत नुसते ओढून नेले, मारले नाही तरी भागवत सप्ताह चुकेल त्याचे क़ाय?'' या समर्पक प्रत्युत्तराने सर्वच निरुत्तर झाले. सभोवतालच्या मंडळीत हशा पिकला.

तत्वज्ञानी माणसे केवळ गंभीर असतात असे नाही. त्यांच्याकडे विनोद बुद्धीही असते व प्रत्युत्तराची शैलीही असते.

समदृष्टीचे व्यापक मायेचे दुसरे उदाहरण

नरसोबाच्या वाडीला चि. विद्याधर फडके असाच एकदम आजारी झाला. तो औरवाडला होता. प. पू. श्रीदत्तमहाराज सकाळी वाडीला आले होते. चि. विद्याधर त्यांना आलेला दिसला नाही. प्रकृती बरी नाही असे कळल्याबरोबर प. पू. श्रीदत्तमहाराज म्हणाले, ''त्याला औरवाडला कशाला ठेवला.'' इतके म्हणून ते थांबले नाहीत. स्वतः त्याला आणायला जायला निघाले. अर्थात प. पू. श्रीदत्तमहाराजांना कोणी जाऊ दिले नाही. त्याला घेऊन आले. आणल्यावर लगेच प. पू. श्रीदत्तमहाराज म्हणाले, ''आता विश्रांती घ्या. कोठे झोपता? नाहीतर आमच्या इथे झोपा. उद्या सकाळी नदीवर स्नान करु नका.'' लगेच डॉक्टरांना दाखवून त्यांच्या औषध पाण्याची व्यवस्था केली.

* * * *

आजच्या विद्यार्थ्यांना नेमके काय सांगावे

विज्ञान युगाचा प्रभाव चालू काळावर फार पडलेला आहे. विज्ञान युगातील सुखे आपण सतत उपभोगीत असल्यामुळे त्याची उपयुक्तता आपणास नाकारता येणार नाही. तंत्रज्ञान इतके विकसित झाले आहे की मानवाची बुद्धी चकीत होते. त्याच्या प्रभावाने विद्यार्थ्यांची मने भारावून जाणे स्वाभाविकच आहे. शालेय जीवनात नेमकेपणाने अशी अध्यात्मिक शिक्षणाची व्यवस्था नाही. बुद्धी व मन यांच्या सात्विक विकासासाठी अध्यात्मिक शिक्षणाचा पाया आवश्यक आहे. पण मुलांना नेमके काय सांगावे किंवा काय वाचायला द्यावे असा प्रश्न पडतो? थोडी मोठी मुले विचारतातही, मग आम्ही काय सर्व सोडून अध्यात्मिक ग्रंथ वाचायचे काय? विज्ञानाची सुखे डोळ्यांना दिसतात, परंतु अध्यात्मिक शिक्षणाने झालेला बदल लगेच दिसणार नाही. या न दिसण्यामुळे नास्तिकतेकडे वळतात की काय असे वाटते. हे विचार डोळ्यापुढे ठेवून प. पू. श्रीदत्तमहाराजांपुढे मार्गदर्शनासाठी काही प्रश्न ठेवले त्याला त्यांचे उत्तर सर्वांनाच मार्गदर्शनपर होतील म्हणून पुढे दिले आहेत.


मुलांना महाभारत, रामायण तटस्थवृत्तीने वाचण्यास सांगावे. तटस्थवृत्तीने वाचायचे म्हणजे मन पूर्वग्रहदूषित न ठेवता वाचावे. रामायण, महाभारत या केवळ कथा आहेत. तसे घडलेच नाही असा भाव मनांत न ठेवता वाचणे म्हणजे तटस्थवृत्तीने वाचणे होय. आपल्या मनात असा विश्वास निर्माण झाला पाहिजे की रामायण, महाभारत हे राष्ट्रीय ग्रंथ आहेत त्या काही भाकडकथा नाहीत. अशातऱ्हेने जर वाचन केले तर फायदा आहे.

परमेश्वर सर्वव्यापी सर्वत्र आहे. तो निराकार आहे. हे जरी खरे असले तरी ते आपण शब्दज्ञानाने म्हणतो. निर्गुण निराकाराकडे एकदम वळणे जमत नाही म्हणून संत अगर थोर महात्मे तसे सांगत नाहीत. तुमची भावना म्हणजे भक्ती ही महत्त्वाची आहे. त्याकरिता अभ्यास व वाचन करायचे आहे. संस्कृत ग्रंथ सर्वांना अभ्यासता येत नाहीत. परंतु त्या सर्वांचे अनुवाद आता उपलब्ध आहेत. विज्ञानवादाच्या कल्पना डोक्यात धरून हेच खरे आहे असे मानले तर उपयोग होत नाही. विज्ञान जसे शास्त्र आहे तसे अध्यात्म हे एक पूर्ण प्रयोगशास्त्रच आहे. या शास्त्रात पुनर्जन्माचा सिद्धान्त मांडलेला आहे. त्यामुळे हा अभ्यास अनेक जन्मही चालत असतो. पुनर्जन्म मानावाच लागतो.

प. प. श्रीवासुदेवानंद स्वामीमहाराजांची एक गोष्ट पुनर्जन्माबद्दल बोलताना श्रीमहाराजानी सांगितली. केलेल्या बऱ्या वाईट कर्माचे फळ एकाच जन्मात भोगून संपत नाही. ते पुनर्जन्म घेऊन भोगावे लागते. प. प. स्वामीमहाराज वेदान्त सांगत होते. ते म्हणाले, ''न्यायाधीश महाराज एका खुनाबद्दल खुन्यास फाशीची शिक्षा देतात. परंतु तत्पूर्वी त्यांनी काही खून पचविलेलेही असतात. त्याची शिक्षा कोण

देणार? ही सोय परमेश्वराच्या दरबारात आहे. माणसानी केलेल्या कर्माचे फळ म्हणजे शासन त्याला पुढील जन्मी भोगावे लागते.

या कर्मानुसार कुठे जन्माला यावयाचे हे सर्व ठरलेले असते. त्याला पूर्व संचित म्हणतात. आपल्याला कळले नाही म्हणजे ते नाहीच असे मानायची गरज नाही. सगळेच कुठे कळत असते. काही अज्ञेय मानावे लागते.



बाह्यरंगाकडे लक्ष देऊ नका.

शिक्षकांनी मुलांना काही गोष्टी समजावून सांगितल्या पाहिजेत. पण त्याकरता शिक्षकाची ज्ञानावर निष्ठा हवी. त्यांनी आपल्या स्वतःच्या जीवनातील एका गोष्टीचा या ठिकाणी उल्लेख केला. ते म्हणाले, 'आम्ही धोतर व उपरणे अशा पोशाखात विद्यापीठात जात असू. त्याबद्दलची टीका आमच्या कानावर आली. तेव्हा आम्ही विचारले, ''तुम्हाला आम्ही शिकवतो तो विषय समजतो की नाही? आमच्या शब्दांनी आपणाला विषयज्ञान होते नां? मग पोशाख आमचा कसा का असेना त्याकडे लक्ष देऊ नका, बहिरंगाकडे लक्ष न देता विषयाकडे लक्ष द्या.'' मग ती टीका थांबली. आपण आपले विषयज्ञान अभ्यासाने पक्के केले असेल तर विद्यार्थ्यांना पटते. कारण विद्यार्थीही चांगले असतात. आपणही त्यांना योग्य ते योग्य त्या पद्धतीने सांगणे आवश्यक असते. देवाने जी भूमिका आपल्याकडे दिली आहे ते कर्तव्य पालन आपण केले पाहिजे सर्व विद्यार्थ्यात देव आहे असे मानता आले तर अधिक चांगले होईल, अशी सवय लावून घ्यावी.



अभ्यासाकडे लक्ष लागत नाही.

हल्ली बऱ्याच मुलांचे अभ्यासाकडे लक्ष लागत नाही. मन अस्थिर असते. यावर प. पू. श्रीदत्तमहाराजांचे सांगणे असे की, मधून मधून शिक्षकाने अभ्यास कसा करावा हे समाजवून दिले पाहिजे.

आपण कीर्तनाला जातो. चांगले वादन, चांगले गाणे याकडे लक्ष जाते. पण विषय कोणता सांगितला, तात्पर्य काय इकडे लक्ष जात नाही. इतर बाह्य गोष्टींकडे लक्ष वेधले की मुख्य विषय सुटतो. उपांगाकडे लक्ष उपयोगी नाही. १) ग्रंथाचे सांगणे काय २) ग्रंथकार काय म्हणतात ३) उपसंहार काय व मध्ये काय सांगितले आहे ४) मुख्य विषय कोणता. अशी अभ्यास करण्याची पद्धत असावी. बाह्य उपांगे नंतर करा असे त्यांना सांगण्याची जरुरी असते. नुसत्या वाचनापेक्षा श्रवण मनन हवे.

मनन म्हणजे त्याचे विचार सतत मनांत आणणे. याचेच नांव चिंतन. मननाचे, चिंतनाचे प्रकार दोन तीन आहेत. एकट्याने वाचलेले मुख्य मुख्य आठवावे. आपल्या बरोबरीचा सहकारी असेल त्यांचे बरोबर चर्चा करावी. आपल्या गुरुदेवांबरोबर चर्चा करावी चिकित्सा त्यालाच म्हणतात. तेच मनन आहे. 'परिप्रश्नेन सेवया' प्रश्न करून ज्ञान मिळवून घेणे हा सुद्धा एक मार्ग आहे. मननाने स्मरणशक्ती वाढते. स्मरण मनन यांची प्रथमपासूनच कल्पना द्यावी. शिक्षकाने हे सतत समजावून सांगावे. मुले कितीका असेनात अभ्यास कसा करावा हे अधून मधून त्यांना सांगून करून घ्यावे. केवळ प्रश्नोत्तरात पूर्णपणे गुंतवून ठेवू नये. अभ्यास करणाऱ्यांना श्रद्धाही एक आवश्यक बाब आहे. आपली बुद्धिही कशी अपूर्ण आहे हे पटवून दिले पाहिजे.

प. पू. श्रीमहाराज सांगतात, श्री विद्याधर फडके, श्री प्रसाद पाटणकर ही तरुण विद्यार्थी मंडळी पुष्कळ शिकली आहेत. विज्ञानाचे महत्त्वही त्यांना पूर्ण माहीत आहे. पण तरीही येथे येतात. श्रद्धा ठेवून श्रवण करतात व त्यावर विचार करतात. अभ्यास, विचार यांचा अभाव असताना मते बनविणे योग्य नाही, हे विद्यार्थ्यांना सांगितले पाहिजे. विचार करण्याची सवय नाही. मन बाह्यांगाकडे सदैव वेधलेले. मग एकाग्रता कशी येणार. एकाग्रता ही अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे. मोठ्या महात्म्यांच्या चरित्र वाचनाने, लेखनाने सुद्धा चित्ताची एकाग्रता वाढून थोरांविषयी, संताविषयी प्रेम निर्माण होते. या सर्व गोष्टी चित्ताची, बुद्धीची शक्ती वाढवण्यासाठी आवश्यक आहेत.

❁ ❁ ❁

शरीर शास्त्र व मन यांचा विचार

कांदा लसूण आपण खात नाही. तरुण पिढी म्हणते सर्वच देवाने निर्माण केले आहे. मग खायला काय हरकत आहे? अशा प्रकारची विचारसरणी सर्वत्र ऐकू येते. त्याबाबत प. पू. श्रीमहाराजांचे विचार लक्ष वेधून घेणारे आहेत.

शरीर शास्त्राचा विचार पूर्वकाली पुष्कळ सूक्ष्म केलेला आहे. शरीर व मन चांगले रहावे अशी इच्छा असेल तर हा केलेला विचार आपण मानला पाहिजे. पूर्वासुरींनी जितका खोल विचार केला आहे तितका सामान्य स्थूल बुद्धिने विचार करता येणार नाही. हे खायला काय हरकत आहे असे आपल्या मनाला वाटते. पण त्याचा परिणाम कसा होईल हे लक्षात येत नाही. अन्नानी मन तयार होते. मन सात्विक बनायला पाहिजे. चांगले विचार यायला पाहिजेत. आग्रह सुटला पाहिजे. या दृष्टीने त्यांनी जो विचार केला आपण कुठे करू शकतो. आपल्याला ते खाण्याची इच्छा होते तर खाना. ईश्वराचे नांव मधे कशाला गोवता? ईश्वर न मानणाऱ्यांनी त्यांचे नांव घेऊ नये. आपली वासना म्हणून खावे असे महाराजांचे म्हणणे आहे.

✣ ✣ ✣

प. पू. श्रीदत्तमहाराजांचा उपदेश

संसारात/व्यवहारात समाधानी असणे चांगले. पण या परमार्थात असमाधान शेवटपर्यंत राहाणे चांगले. श्रीगुरुचरित्रात गोष्ट आहे. दीपक गुरुंची सेवा करीत असतो. त्याला वाटते की मी करतोय तीं गुरुंची सेवा कमीच आहे.

आपण जे पहातो ते खरे आकाश नाहीच. खरी पंचमहाभूते फार सूक्ष्म आहेत आणि ध्यान धारणेच्या अभ्यासाने आपली बुद्धी सूक्ष्म झाल्याशिवाय त्यांचे खरे स्वरुप समजणार नाही.

दीपकाने देवाकडे काय मागितले ती ओवी श्रींनी म्हणून दाखवली. त्यात जे मागितले ते किती महत्त्वाचे आहे ते सांगितले.

एकाग्रतेचा/ध्यानाचा अभ्यास झाला म्हणजे बुद्धी सूक्ष्म होते आणि मग त्या बुद्धीला अनाकलनीय असा कोणताच विषय राहात नाही. मन एकाग्र केले की तत्क्षणी कोणत्याही गोष्टीचे ज्ञान होऊ शकते.

ही मनाची एकाग्रता साधनेचा अभ्यास करुनही साधते. शिवाय एरव्हीसुद्धा ध्यान धारणेचा अभ्यास चालू ठेवावा. आपल्या मनाची स्थिरता जास्तीत जास्त साधणे महत्त्वाचे आहे. नुसती प्रवचने वाचून किंवा ऐकून काय उपयोग? त्याप्रमाणे आपण वागले पाहिजे.

आपल्या साधकावस्थेत काहीच बदल झाला नाही हे आपण कोण ठरविणार? असे म्हणणे म्हणजे आपल्यालाही काहीतरी समजायला लागले असे म्हणावे लागेल. आपल्यात काही फरक पडलाय की नाही हे सद्गुरु ठरवतील.

पण त्याचबरोबर आपल्या वासना इच्छा कमी कमी होताहेत की नाही हे आपण जरुर तपासून पहावे. तेवढे आपल्याला समजते. आपल्या हातून जर कर्मानुष्ठान व्यवस्थित घडत असले तर फरक पडलेला आपल्याला जाणवतो.


आपल्या हातून काहीच पुण्यकर्म घडत नाही हे म्हणणे चुकीचे तसेच फक्त मीच अमुक, तमुक करु शकतो. दुसरे कोणीही तसे करू शकणार नाही हेही म्हणणे चुकीचे आहे. आपल्याला पुण्यकर्म करीत राहण्याची बुद्धी होणे ही कृपा काय कमी आहे? असे किती तरी लोक आहेत की ज्यांना जरा देखिल पुण्यकर्म करावेसे वाटत नाही.

प्रापंचिक/व्यावहरिक/सामाजिक व्याप कमी कमी करीत आणून तो वेळ जास्तीत जास्त साधनेला देता येतो. आपली झोप कमी होत नाही म्हणून अडून बसण्याचे कारण नाही. नोकरी धंदा करणाऱ्या माणसांना एकदम तहानभूक कमी करुन कसे चालेल?

शास्त्रवचनांवर विश्वास ठेवून शेवटपर्यंत राहाणे महत्त्वाचे. मोठे महाराज शेवटपर्यंत स्नान, संध्या कर्मे करीत असत. नामस्मरण, देवांची/गुरुंची सेवा/नवविधा पैकी कोणती ना कोणती तरी भक्ती सतत व्हायला पाहिजे. मनोभंग/वासना क्षय होणे महत्त्वाचे.

साधने व्यतिरिक्त आपले चित्त जास्तीत जास्त आत्मानात्म विचार/चिंतन/सद्ग्रंथ वाचन याकडे लावले पाहिजे जेणे करून आपल लक्ष संसारापासून दूर होईल. साधनेत आत्मानात्म विचार सद्गुरुकृपा असेल तर आपोआप येतात आणि तो अभ्यास होतो नाहीतर आपण स्वतः ते तत्वविचार आठवून त्यांचे चिंतन करावे.

सदगुरुंनी उपदेश केला मार्गदर्शन केले तर साधकाची प्रगती लवकर होते.



अध्यापक वृत्ती

प. पू. श्रीदत्तमहाराज टिळक विद्यापीठात संस्कृतचे अध्यापक होते. काम करताना त्यांची वृत्ती कशी होती हे त्यांचे थोर शिष्यांकडून कळलेले आहे.

प. पू. श्रीदत्तमहाराजांजवळ प्रामुख्याने तीन विशेष गुण दिसून येतात १) विषय सोपा करुन सांगणे, २) ज्ञानाची अत्यंतिक खोली, ३) विद्यार्थ्यांविषयी जिव्हाळा. ते शिकवित असताना त्यांच्या दृष्टीतून अनुग्रह पाझरत आहे असे सतत जाणवत असे त्यांचे विद्यार्थी सांगतात. प. पू. श्रीमहाराजांशी प्रत्यक्ष बोलण्यातून आलेले विचार शिक्षकाला त्याच्या उच्च भूमिकेची जाणीव करून देणारे आहेत. ते असे.

शिक्षकांनी आपल्याला मोठेपणा मिळावा ही वृत्ती ठेवू नये. विषयाचा सखोल अभ्यास करणे ही सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. जे सत्य आहे ते मांडावे. विद्यार्थ्याला केवळ आवडेल असेच बोलणे बरोबर नाही. जे काय सांगायचे सिद्धान्त मांडायचा त्याची स्पष्टता करता आली पाहिजे. अशा शिक्षकांबद्दल आदरभाव ठेवणारे विद्यार्थी निर्माण होतात. केवळ लोकानुसरण ही वृत्ती कोणत्याही वक्त्याला मग तो शाळेचा अगर बाहेरचा असो उपयोगी नाही. सत्य असेल ते निर्भयपणे मांडावे. पूर्ण अभ्यास करून त्याचे समर्थन करता येत असेल तर करावे. ''कारण अभ्यास तुका म्हणे'' शिक्षकाचा स्वतःचा अभ्यास पूर्ण असला पाहिजे व तो सतत करण्याची सवय हवी. तर सर्व यश मिळते.

लोकमान्यांची गोष्ट महाराजांनी सांगितली. लोकमान्य खाणावळीत सोवळे घेऊन जात असत. त्यांचे सहकारी विद्यार्थी त्यांचेकडे कुत्सितपणे बघत असत. लोकमान्य त्यांना ठणकावून सांगत असत. सोवळ्याने भोजन करावे हा संस्कार आम्हाला पटतो. आम्हाला काही स्वतःची बुद्धि आहे की नाही? आम्हाला आमच्या

मनाचे स्वातंत्र्य आहे की नाही, तुम्हाला पटत नसेल तर तुम्ही करू नये. अशी निर्भयवृत्ती. ही निर्भयता ज्ञानाने तपाने येते.

विद्यार्थ्यांचे कल्याण व्हावे ही इच्छा असणे हा एक संस्कार आहे. तो पक्का असावा लागतो. विद्यार्थ्यांच्या मनात आपल्याविषयी आदर आहे की नाही हा सुद्धा विचार करू नये. कर्तव्य चोख करावे ही दृढ भावना होण्यास कदाचित कुणाला वेळ लागेल पण ती झाली पाहिजे.



कठोरता नको

मुलांना बोलताना आपण अतिशय कठोरपणाने बोलू नये असे प. पू. श्रीदत्तमहाराजांचे सांगणे आहे. मुले आपल्यावर अवलंबून असतात. ती काहीच बोलू शकत नाहीत. यामुळे आपल्या शब्दाना फार धार येते. आपणही या मुलांच्या भूमिकेतून पूर्वी गेलेलो असतो. पण आपण ते विसरतो. त्यामुळे मुलांची फार केविलवाणी अवस्था असते. वाटेल त्यांनी बोलायचे. अशी परिस्थिती होते. तीच गोष्ट वृद्धांच्या बाबतीत असते. त्यांनाही तुच्छतेने व अुपहासात्मक वागविण्यात येते. ही गोष्ट चांगली नाही.



चि. रोहित मुजुमदार

अशा कठोर बोलण्याने एका उमलत्या अंकुराची कशी कुचंबणा झाली व त्याला प्रोत्साहित करण्याने त्याचे जीवन कसे फुलले त्याचे एक प्रत्यक्ष उदाहरण.

इयत्ता ६ वीत असलेल्या रोहितचे शिक्षण व्यवस्थित चालू होते. त्याचबरोबर त्याचे तबला वादनाचे शिक्षण चालू होते. तबल्यावर त्याचा हात चांगला होता.

एक दिवस काय झाले कुणास ठाऊक. त्यांचे तबल्याचे शिक्षक त्याला खूप रागावले. सगळ्या मुलांच्यादेखत त्याला खूप बोलले. त्यांनी ऐकून घेतले. उत्तर दिले नाही. आपल्याला तबला वाजविता येत नाही असे गुरुजींचे म्हणणे आहे. मग कशाला तबला शिकायचा. म्हणून मनांत ठरवून दोन महिने तबल्याला हात लावला नाही. आईवडिलांनी खूप समजावून सांगितले. पण पटले नाही. इतके दिवस मी वाजवित होतो आणि आजच कां गुरुजी इतके बोलले. मला तबला वाजविणे जमणारच नाही. त्याच्या मनाला ते खूप लागले.

चि. रोहित आईवडिलांबरोबर आश्रमात प. पू. श्रीदत्तमहाराजांकडे जात असे. त्यांनाही तो तबला शिकतो हे माहित होते. महाराजाना संगीतशास्त्राची जाणकारी

आहे. पूर्वी श्रीमहाराजही तबला वाजवित असत. प्रसंगी किर्तनात उत्तम साथही केली आहे. महाराज अधून मधून चौकशी करून त्याला प्रोत्साहन देत असत.

हळू हळू ही गोष्ट प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या कानावर गेली. ते म्हणाले 'अरे गुरुजी रागावले म्हणून तू तबला सोडणार का? तुला चांगले वाजविता येत नाही असे म्हणून तू तुझ्या आवडत्या कलेवर राग काढणार? निदान घरी तरी वाजव' या बोलण्याने थोडा इष्ट परिणाम झाला. परंतु वर्गाला जायचे नांव काढीना. पण घरी मात्र तबल्यावर थाप मारु लागला.

एकदा वामननिवासात सौ. अलका मारुळकर यांचे गाणे होते. प. पू. श्रीदत्तमहाराज रोहितला म्हणाले 'तुला आवड आहे, तर आज गाणे ऐकण्यास वामन निवासात जा.' त्याप्रमाणे तो गेला. तल्लीन झाला. स्वाक्षरी घेण्यासाठी तो गेला. सौ. अलकाताई म्हणाल्या 'घरी ये. तबला वाजवून दाखव. मी ऐकेन' पण तो गेलाच नाही.

प. पू. श्रीदत्तमहाराजांना ही गोष्ट कळली. ते म्हणाले, 'अरे तुला त्यांनी बोलावले तर जा. वाजवून दाखव. कोणी बोलावले तर जावे.'' त्यांच्या प्रोत्साहनामुळे तो गेला. तबला वाजवून दाखविला. त्यांना फार कौतुक वाटले. त्या म्हणाल्या 'पंडित सुरेश तळवळकर माझ्याकडे येणार आहेत. तेव्हा तू ये. तू तबला वाजवून दाखव.' त्यांनी बरे म्हटले. तो प. पू. श्रीदत्तमहाराजांकडे गेला म्हणाला की, मी दोन महिने तबल्याला हात लावला नाही. शिवाय तबला जमणार नाही असे सरांचे म्हणणे. ते पण हेच सांगणार. श्रीमहाराज म्हणाले 'हे प्रथम मनातून काढून टाक. त्यांच्याकडे जाऊन मोकळेपणाने तबला वाजव.'' श्रीमहाराजांच्या प्रोत्साहनामुळे तो तिकडे गेला. इतक्या छोट्या मुलाने व्यवस्थितपणे वाजविले हे पाहून तळवळकर गुरुजींना आनंद झाला. ते म्हणाले, ''मी याला शिकवितो. पण ह्याने करिअर केले पाहिजे. अुद्या डॉक्टर, इंजिनिअर झाल्यावर तबला सोडील तर मी शिकविणार नाही.'' हे ऐकल्यावर तो धावत महाराजांकडे गेला व सर्व हकिकत सांगितली. ते म्हणाले, ''आता तरी निराशा गेली नां? महाराजांच्या अुत्तेजनामुळेच त्याची निराशा दूर झाली. श्रीमहाराजांनी शिकण्यास सुरवात करावयाच्या आधी प्रसादास यायला सांगितले. ते म्हणाले ''गुरुगृही जाणार तर प्रसाद घ्या, प्रयत्नात कसूर न करता शिका.

पुढे सेंट्रल गव्हरमेन्टच्या सेंटर फॉर कल्चरल रिसोर्सेस अँड ट्रेनिंगच्या अधिपत्याखाली कल्चरल टॅलेन्ट स्कॉलरशिप स्कीममध्ये निवडला गेला. कोमलणारी कळी अशी उमलू लागली.

प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या सहवासात आल्यामुळे, त्यांच्या प्रेमळपणामुळे हे सारे घडले असे तो मोठ्या आदराने सांगत असतो. प. पू. श्रीमहाराजांचे प्रेमळ सांगणे नसते तर त्याने तबल्याला हात लावला नसता. आज रोहित महाराजांच्या नातवात मिसळून गेला आहे. त्यांच्याच घरातला झाला आहे.

❋ ❋ ❋

संताना मनुष्य स्वभावाची कल्पना असते

श्रवण, भजन, अर्चन अशा वेगवेगळ्या भक्ती प्रकाराने माणूस भगवंताची भक्ती करीत असतो. त्यात सावधानता ठेवावी लागते व ती कशी ठेवावी याचे मार्गदर्शन प. पू. श्रीमहाराजानी केले आहे.

❀ ❀

एक समन्वय ग्रंथ भागवत

श्रीभागवताची अनंत पारायणे प. पू. श्रीमहाराजानी केली. प. पू. श्रीदत्तमहाराजांची अत्यंत निष्ठा असलेला हा ग्रंथ आहे. ठिकठिकाणी झालेले भागवत सप्ताह श्री भागवत ग्रंथाचे अनन्य साधारण महत्त्व सांगतात.

❀ ❀

प. पू. श्रीदत्तमहाराजांची काही पत्रे, निवडक निबंध, काव्य, आवडती पदे (इत्यादी)

प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या विपुल पत्रसंग्रह होईल त्यांचे विद्वतापूर्ण लेखन खूप आहे. शालेय निबंधातूनही त्यांची वैचारिक बैठक जाणवते. प्रसंगी ते काव्यही करू शकतात त्याची छोटीशी झलक.

ज्ञान साधना

सद्ग्रंथ श्रवण

श्रीसमर्थांनी श्रवणभक्तीला अग्रस्थान दिले आहे. आत्मज्ञान प्राप्त करुन घेण्यासाठी ज्या नवविधा भक्ति सांगितल्या आहेत त्यात श्रवण हे प्रथम आहे. सद्ग्रंथाचे सद्गुरुंच्या मुखाने श्रवण ही तर अतिशय दुर्मिळ गोष्ट आहे. अध्यात्मिक जीवनात असा सशास्त्र श्रवणाचा साधकाला फार फायदा होतो असे म्हणतात. चित्तशुद्धी होण्यासाठी या श्रवणाभ्यासाचा पुष्कळ उपयोग होतो असे शास्त्रच सांगते. आजही अशा प्रकारची अध्यात्म ज्ञानसाधना श्रीवासुदेव निवासात चालू असल्याचे आपणास प्रत्यक्ष पहावयास सापडते.

दुपारी चार साडेचारच्या सुमारास श्री वासुदेव निवासात गेल्यास सभामंडपात आपल्याला एका आसनावर प. पू. श्रीदत्तमहाराज बसलेले आढळतील. सभोवती बरेच लोक ग्रंथ हातात घेऊन वाचताना दिसतील. प. पू. श्रीदत्तमहाराजांकडून त्या शास्त्रग्रंथातील गूढार्थ श्रवण करताना आढळतील. अगदी प्रथमपासून या संस्कृत ग्रंथाचे अध्ययन करणारे असे श्री. काशिनाथपंत देशपांडे व श्रीमती परांजपे ही दोन मंडळी दिसतात.

याचवेळी आश्रमात दर्शनार्थ लोक येत असतात. काही प्रश्न विचारीत असतात. प. पू. श्रीदत्तमहाराजांचे एकीकडे प्रसाद देण्याचे काम तितक्याच प्रेमाने सुरु असते. प्रसाद देतांनासुद्धा प. पू. श्रीदत्तमहाराज किती तरी अवधाने संभाळीत असतात. एखादे वयातीत मनुष्य आले तर महाराज कागदावर खडीसाखर घालून स्वतः पुडी करुन हातावर देतात. कोणी उपाध्याय वगैरे मंडळी आली तर पुडी करुन त्यात दक्षिणा घालून देत असतात. लहान मुले आली तर त्यांना वेगळे काढून ठेवलेले पेढे, वडी, फळे असे काही देतात. प्रसाद द्यावयाचा, पुन्हा प्रसादपात्रावर माशा बसतात म्हणून झाकण घालायचे. चौकोनी कागद मांडून ठेवायचे काम एकीकडे सुरु असते. प्रश्नांची उत्तरे देत असतातच. संस्कृत वाचन चालू असते त्याचेही विवरण श्रीमहाराज करीत असत. इतक्या सर्व गडबडीत ही सर्व अवधाने प. पू. श्रीदत्तमहाराज कशी सांभाळतात याचे तर नवल वाटतेच पण ऐकणाऱ्यांनाही अर्थ लक्षात घेणे जमते कसे?


❖ ❖ ❖

श्री काशीनाथपंत देशपांडे यांचे मनोगत

रोज बरेच वर्षे वाचावयास येणारे वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध श्री काशीनाथपंत देशपांडे १९८७ साली सेवानिवृत्त झाले. प. पू. श्रीदत्तमहाराजांकडे वेदान्त शिकावा असे

त्यांना वाटू लागले. त्यांनी तशी विनंती प. पू. श्रीदत्तमहाराजांकडे केली. त्यांनी मान्यता दिल्यावर ऑक्टोबर १९८७ पासून हा दुपारचा अभ्यास सुरु झाला.

त्यांनी कोणते ग्रंथ वाचले याची उत्सुकता मनाला होतीच त्यानी जी ज्ञानसाधना सांगितली ते ऐकून सर्वानाच आश्चर्य व आनंद वाटेल म्हणून अवलोकनार्थ यादी देत आहे.



श्री काशीनाथपंत देशपांडे

१)	मुक्तावली	न्यायशास्त्र ग्रंथ
२)	वेदान्तसार	सदानन्द
३)	पंचदशी	विद्यारण्य
४)	वेदान्त परिभाषा	
५)	सिद्धांत बिन्दु	मधुसुदनसरस्वती
६)	विवरण प्रमेयसंग्रह	विद्यारण्य
७)	सिद्धांत लेश संग्रह	अप्पया दिक्षीत
८)	संक्षेप शारीरक	मधुसुदन सरस्वती
९)	रत्नप्रभा	शंकराचार्यांचे ब्रम्हसूत्र , भाष्यावरील टीका.
१०)	भामती	
११)	जीवन मुक्तविवेक	विद्यारण्य
१२)	पंच पादिका विवरण	पद्मपादाचार्यांच्या ग्रंथावर विवरण प्रकाशात्मामुनी

इतक्या शास्त्रीय संस्कृत तत्वज्ञानाचे वाचन करण्यास तसे पाहिले तर वेळ फार थोडा. प. पू. श्रीदत्तमहाराज दुपारी दोन तास जेमतेम आश्रमात असतात. रोज दोन तास सलग मिळतील असेही नाही. अनेक वेळा उत्सव असतात. कुठे जाणे येणे असते. मिळेल त्यावेळात वाचून वेळाचे खरोखरच सार्थक केले. खऱ्या अर्थाने सद्गुरु सहवास घेतला. लौकिक सेवानिवृत्ती बरोबर खरी निवृत्ती साधली.

इतके सर्व साधल्यानंतर अध्ययन करीत असताना त्यांचा आंतरिक फायदा होणारच. तोही त्यांनी मोकळेपणी सांगितला तो चिंतनीय, अनुकरणीय आहे. ग्रंथाचे घरी चिंतन करीत असताना काही शंकांचा उलगडा होत नसे. पण प. पू. श्रीमहाराजांच्या जवळ शंका विचारायच्या आधीच केवळ सानिध्यामुळेच उलगडा होत असे. त्यांच्यापुढे ग्रंथ वाचताना अर्थ सहज समजत असे. श्री काशिनाथपंत याचे विश्लेषण असे करतात.

प. पू. श्रीदत्तमहाराज ज्ञानस्वरुप असल्यामुळे त्यांच्या शरीर केंद्रातून ज्ञान लहरी बाहेर पडत असाव्यात. त्या लहरींचा स्पर्श किंवा प्रभाव त्यांच्या सान्निध्यात आपल्याला होत असल्यामुळे त्या त्या ग्रंथातील रहस्य ध्यानात येत असे हा त्यांचा इतक्या वर्षाचा स्वानुभव आहे. त्यामुळे सद्गुरुंकडून ज्ञान प्राप्ती म्हणजे काय हे उमगले. हे झाले सद्ग्रंथ वाचनाविषयी. याचा आणखी एक फायदा ते सांगतात. श्री.

काशिनाथपंतांनी प. पू. श्रीगुळवणी महाराजांकडून दीक्षा घेतल्याला बरीच वर्ष होऊन गेली. साधनाला बसले असताना एकाग्र मन होण्यासाठी या वाचनाचा त्यांना उपयोग झाला.

मन एकाग्र चटकन होते. त्या वाचनाच्या थोड्याशा मननाने मनाचा विक्षेप म्हणजे भटकणे खूपच कमी झाले आहे. नजिकच्या काळात साधनेत बरीच प्रगती होईल असा विश्वास काशिनाथपंताना निर्माण झाला आहे. वेदान्त शास्त्र शिकण्यास 'शाब्देपरेच निष्णात सद्गुरु' लाभणे ही फार मोठी कृपा आहे असे ते समजतात.

'गुरोस्तु मौनं व्याख्यानम् शिष्यास्ते छिन्न संशयः' या श्लोकाची प्रचिती त्यानी आज प्रत्यक्ष घेतली आहे. हेही संत सहवासाचे महत्व प्रत्यक्ष प्रमाणाने सिद्ध झाले.

हल्ली बरीच मंडळी वेगवेगळे शास्त्रग्रंथ प. पू. श्रीदत्तमहाराजांजवळ वाचू लागली आहेत. डॉ. देशमुख, सर्वश्री रघुनाथराव कुळकर्णी, देशपांडे, चि. विद्याधर फडके, चि. प्रसाद पाटणकर, श्रीमती परांजपे त्याशिवाय मुंबईहून डॉ. सौ. माधुरी पणशीकर, डॉ. सौ. नलिनी चाफेकर शनिवारी, रविवारी येऊन श्रवणाचा लाभ घेतात. ज्ञानसत्र असे सदैव उघडलेले आहे.


* * *

गुरुचरित्र पाचवा वेद

१९५७ सालची गोष्ट आहे. श्री काशिनाथपंत आपला थोरला मुलगा तीन महिन्याचा झाला म्हणून वाडीला त्याला पादुकांच्या दर्शनासाठी घेऊन गेले. तेव्हा देवाजवळ असलेली सर्व पुजारी मंडळी म्हणाली की इतक्या लवकर या मुलाला वाडीला आणले नसते तर बरे झाले असते. त्यावेळी प. पू. श्रीधुंडीराजशास्त्री, प. पू. श्रीदत्तमहाराजांचे पिताजी तेथे होते. त्यानी चटकन प्रश्न केला की श्रीगुरुचरित्रात गंगाबाईने तिच्या बाळाला दर्शनाला केव्हां आणले होते? तेथे असलेल्यांपैकी कोणालाच नीट उत्तर देता आले नाही. प. पू. श्रीधुंडीराजशास्त्री म्हणाले याचा अर्थ श्रीगुरुचरित्र कोणीही लक्ष देऊन, मन लावून वाचीत नाही.

दहा दिवसांनी शुद्धी झाल्यावर गंगाबाईने बाळाला दर्शनाला आणले होते असा खुलासा त्यानी केला. प. पू. श्रीधुंडीराजशास्त्रींच्या या वाक्याचा श्री काशिनाथपंतांच्या मनावर खोल परिणाम झाला. ते श्रीगुरुचरित्र अतिशय मन लावून तर वाचू लागलेच. परंतु आपल्या मुलाला आपण वाडीच्या पादुकांच्या आशीर्वादासाठी आणले हे योग्य झाले याचाही आनंद त्यांच्या मनाला झाला.

संत वचनांचा योग्य तऱ्हेने अर्थ घेवून त्याचे अनुकरण करण्याची बुद्धी झाली की संत सहवास घेता येऊ लागला असे समजावे. संत सहवासातून नेमके घेण्याची दृष्टी असली तर खूपच फायदा आपल्या चित्तशुद्धीकरता होत असतो.



श्री ज्ञानेश्वर
माऊलीच्या
दर्शनाला
(श्रीक्षेत्र आळंदी)






थोरपण पऱ्हांचि सांडिजे ।
व्युत्पत्ति आघवी विसरिजे ।
जै जगा धाकुटे होईजे ।
तै जवळीक माझी ।


प. पू. श्रीदत्तमहाराजांची सहस्त्रचंद्रदर्शन शांती




जे संपत्तिजात आघवें । हे हवन द्रव्य मानावें । मग स्वधर्मयज्ञें अर्पावें । आदि पूरुषी




ते ब्रह्म भावयोग्यता । आत्मबोधप्रसन्नता । पदीं बैसे ।




श्री दत्तात्रेय




पू. श्रीपादश्रीवल्लभ



श्री क्षेत्र नृसिंहवाडी श्री दत्तमनोहर पादुका




पू. नृसिंह सरस्वती




बार्शीचा भगवान

श्रीक्षेत्र नृसिंहवाडी



पालखीतील उत्सवमूर्ती



श्री दत्त मंदिर, (श्रीक्षेत्र नृसिंहवाडी)

श्रीगुरुचरित्र लक्षपूर्वक वाचावे या वाक्याचा काशिनाथपंतांच्या मनावर परिणाम होऊन ते लक्षपूर्वक वाचू लागले. इतकेच नव्हे तर गुरुचरित्रातील कर्मकांडाचे अध्याय (१६, २६, २८, ३६, ३७, ४१) जे वाचताना थोडे कंटाळवाणे होण्याचा संभव असतो तेच अध्याय तीर्थयात्रा, वेद, आचारधर्म, काशीयात्रा यांचा त्यात दिलेला अचूक तपशील याने त्यांचे मन थक्क होऊन गेले. हा एक अजब ज्ञानकोश आहे असे त्यांचे मनात आले.

प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वतींनी लिहिलेला द्विसाहस्री हा संस्कृत श्रीगुरुचरित्र ग्रंथ साक्षात श्री दत्तात्रयांनी सटिक सांगितला आहे. तेव्हा तो पाचवा वेदच आहे अशी श्रीकाशिनाथपंतांच्या मनाची खात्री लक्ष देऊन वाचनामुळे झाली. श्रीगुरुचरित्रात उल्लेखलेली सर्व स्थळेही त्यांना प्रत्यक्ष पाहण्याचा नाद लागला. श्रीगुरुचरित्र हा दत्त सांप्रदायिकांचा उपासना ग्रंथ आहे. तो लक्षपूर्वक देवांनी प्रत्यक्ष सांगितलेला आहे असे जाणून जर वाचला तर तो भावेल असे मनांत दृढ झाले.

* * *

देव एकच आहे.

श्री काशिनाथपंत वाचीत असताना दर्शनासाठी आलेल्या एका मुलानी प. पू. श्रीदत्तमहाराजांना सांगितले महाराज मी तसा रामभक्त आहे. माझी रामावर अनन्य भक्ती आहे. मी रामरक्षा म्हणतो. मला एका सत्पुरुषाने देवीचे स्त्रोत्र म्हणावयास सांगितले. त्या स्त्रोत्रात देवी सोडून काही नाही असे लिहिले आहे. त्यामुळे माझा गोंधळ होता. देवीचे स्त्रोत म्हणत असताना मी रामाशी प्रतारणा करतो आहे असे वाटते व रामरक्षा म्हणत असताना मी देवीशी प्रतारणा करतो आहे असे वाटते. तेव्हा आता मी नक्की काय करु? त्यावेळी प. पू. श्रीमहाराजांनी एक गोष्ट सांगितली.

'एक न्यायाधीश होते. त्या न्यायाधीशांनी एक कुत्रा बाळगला होता. सकाळी न्यायाधीश कोर्टात जायला निघाले की सूट, बूट, टोपी असा पोषाख असे. कुत्रा त्यांचे अंग चाटून त्यांना निरोप देत असे. सायंकाळी न्यायाधीश घरी परत आले की कपडे बदलून घरी बसत. त्यांनी वेषांतर केल्यावरही तो कुत्रा हेच आपले मालक आहेत असे ओळखून त्यांचे अंग चाटीत असे. वेष भिन्न असला तरी मालक तोच आहे. असे कुत्र्याला जे समजते ते स्वरुपे भिन्न असली तरी परमेश्वर एकच आहे हे कुत्र्यापेक्षा बुद्धीने श्रेष्ठ असलेल्या माणसाला समजायला हरकत नाही.'

* * *

भजनानंद

श्रीवासुदेव निवासात जसे सत्शास्त्र श्रवण चालू असते, त्याप्रमाणे भजन रुपाने गानसेवाही चालू असते. श्रीवासुदेव निवास म्हणजे वासुदेवानंद ज्ञानभक्ती पीठच आहे.

कर्म, भक्ति, ज्ञान असे तिन्ही प्रकारचे कार्यक्रम या ठिकाणी सुरु असतात आपले मन व बुद्धि याना तदाकार व शुद्ध करुन घेण्याचे मार्ग येथे उपलब्ध आहेत. प्रत्येकाने तसे मनाला वळण लावावयाचे आहे. श्री दत्तात्रयांना गानसेवा प्रिय आहे असे म्हणतात. श्रीवासुदेव निवासात वासुदेवनिवास भजनी मंडळाचे सोमवार व गुरुवार असे भजन असते.

प. पू. श्रीगुरुमहाराजांनी मंगळवारी आपला देह ठेवला म्हणून दर मंगळवारी त्यांचा स्मृतीवार म्हणून रात्री ९ चे सुमारास काही मंडळी नित्य नियमाने भजन करीत असतात. यात श्री. पटवर्धन वगैरे मंडळी प्रथमपासून आहेत. ही स्मृती त्यांनी जागती ठेवली आहे.

अलिकडे दर गुरुवारी रात्री श्री. कुळकर्णी, श्री. फडके, श्री. पाटणकर आदी मंडळी ९ ते १० आश्रमात भजन करीत असतात. प्रत्येक जण आपआपल्या परीने सेवा करीत असते.

श्रीवासुदेव निवास भजनी मंडळाच्या विसाव्या वाढदिवसानिमित्त बोलत असताना प. पू. श्रीदत्तमहाराजांचे विचार हाही एक भक्तीसंदेशच वाटतो.

एखादी सेवा अप्रतिहत चालू राहणे हेच भक्तीचे फळ आहे. ती सेवा करताना किती काळ गेला हे समजू नये. वीस वर्षाची भजन सेवा असे म्हणताना सोमवार आणि गुरुवार एवढेच पदरात पडले. ते पुढे म्हणतात, 'एक भक्त काशीत राहावयास गेला. काशी विश्वेश्वराची उपासना करु लागला. त्याने देवाची प्रार्थना कोणती केली? श्री विश्वेश्वरा काशीत मला राहावयास मिळून आपली उपासना करताना युगे लोटली तरी निमिष गेल्यासारखे वाटू दे असे मागणे त्याने मागितले.' अशी भक्ती निर्माण झाली पाहिजे. भजन करताना संसाराचे विस्मरण झाले पाहिजे. अशा प्रकारचे फळ मनापासून केलेल्या भजन सेवेने लाभते .

एकदा सोमवारी दुपारी रोजच्याप्रमाणे प. पू. श्रीमहाराज आश्रमात आले. वार भजनाचा असूनही भजन चालू झालेले दिसले नाही. चौकशी केली की आज भजन कसे नाही. कळले की मे महिन्याची भजनाला सुट्टी दिली आहे. प. पू. श्रीदत्तमहाराज लगेच म्हणाले की भजनाला सुट्टी कसली? असे म्हणून ते थांबले. जास्त बोलण्याचा त्यांचा स्वभाव नाही. भजनामध्ये कंटाळा किंवा ते चुकविणे हे होता कामा नये असे त्यांना सांगावयाचे होते.

प. पू. श्रीदत्तमहाराज भजन पूर्ण तन्मयतेने ऐकत असतात. भजन अतिशय प्रेमाने झाले पाहिजे. मनाचा, भावनेचा हळुवारपणा भगवंतापाशी पोचला पाहिजे. श्री वासुदेवनिवास भजनी मंडळाने भजनांत संस्कृत स्तोत्र बसविली होती. ती ऐकून प. पू. श्रीदत्तमहाराजांना अतिशय आनंद झाला.

निर्विघ्नपणे उपासना, भक्ती चालू राहणे हेच मोठे फळ आहे. हाच अनुभव आहे. उपासनेमध्ये अनंत अडचणी अडथळे असतात पण भगवंताच्या कृपेने ते जातात म्हणून भगवंताला प्रार्थनेने आळवावे म्हणजे उपासनेतील विघ्ने दूर होतात. असे ते नेहमी सांगतात.

आवडीने भावे हरी नाम घेसी । तुझी चिंता त्यासी सर्व आहे ।
नको करु खेद कोणत्या गोष्टीचा । पती लक्ष्मीचा जाणतसे ।
जैशी स्थिती आहे तैशा परी राहे । कौतुक तू पाहे संचिताचे ।
एका जनार्दनी भोग प्रारब्धाचा । हरी कृपे त्याचा नाश आहे ।।

हा अभंग प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या फार आवडीचा आहे. सगळे सार या अभंगात आलेले आहे. आयुष्यभर पुरेल असा अभंग आहे. भजन करताना मनन चिंतन झाले पाहिजे. याचे सुंदर मार्गदर्शन या त्यांच्या एकूणच भजनाबद्दलच्या विचारातून होत आहे.

भावस्पर्शी अर्थाला बिलगणारे मन व सातत्य या दोन गोष्टी भजनाचा आनंद वाढवतात. भक्तीने भगवंताला आळवणे म्हणजे भजन संगीत म्हणजे नादब्रम्ह आहे असे ते मानतात.

प. पू. श्रीमहाराज सांगतात की प्रवचन, कीर्तन किंवा भजन असो, केवळ बहिरंगावर मन जाऊ देऊ नये, आवाज, ताल, सुरेलपणा, यापेक्षाही अभंगाच्या अर्थाकडे मन ठेवून भजन करावे म्हणजे ती तन्मयता भगवंतापाशी मनाला घेऊन जाईल.

प. पू. श्रीदत्तमहाराजांचे शास्त्राध्ययन, त्यांचा त्यांतील अधिकार आपण पाहिला. पण भजनसेवेत ते तितकेच तन्मय होतात. त्या सेवेचे मर्म सांगतात. कोणत्याही प्रकारच्या सेवेने आपली चित्तशुद्धी झाली पाहिजे. चित्ताची, बुद्धीची शुद्धी झाली की परमेश्वराचे ज्ञान ग्रहण करण्याची क्षमता वाढते. म्हणून ते मर्म बोधरुपाने आपल्या अंतःकरणात खोल जाऊन रुजले पाहिजे.

भिक्षुगीत व गोपीगीत श्रीदत्तमहाराजांना फार प्रिय आहे. वासुदेव निवासाच्या भजनी मंडळाला आशीर्वाद देतांना ते म्हणाले 'योगांनाही दुर्लभ अशी प्राप्ती त्या गोपींना झाली ती त्यांच्या विशुद्ध प्रेमामुळे. श्रीकबीरजी सुद्धा गोपींच्या भक्तीला मानत असत' ते म्हणतात.

कबीर क्या कहे चल जमुनाके तीर
एक एक गोपीके हृदय में बहगये कोटी कबीर

श्रीगोपालकृष्ण स्वतः गोपींचे प्रेम पाहून म्हणाले, ''तुमच्या प्रेमाची परतफेड करावी असे मला वाटतच नाही. कारण ती करणे म्हणजे तुम्हांला संकटात टाकणे आहे. तुमचे प्रेम माझ्यातच जिरुन जाऊ दे''

साध्या भजन सेवेकरता प. पू. श्रीदत्तमहाराजांनी दिलेला भजन संदेश तुमच्या आमच्या अंतरंगात राहू दे.

* * *

असे कां घडते

संतांजवळ राहूनही पुष्कळ वेळा आपल्यासारखी सामान्य माणसे योग्य तऱ्हेने वागताना दिसत नाहीत. त्यावेळी मनात येते की संतांचा सहवास घ्यावयाचा म्हणजे नेमके काय घ्यावयाचे हे न समजल्यामुळे समाजाला बोट दाखवायला एक कारण सापडते. येवढे संत सहवास घेतात पण वागण्यात काही सुधारणा नाही. अध्यात्ममार्ग स्वीकारला तर वागणे वेगळे स्वार्थरहित व्हावयास हवे पण तसे घडत नाही. संताना हे चालते कसे? ही रुखरुख मनाला लागली. ती प. पू. श्रीदत्तमहाराजांचेपाशी व्यक्त केली.

प. पू. श्रीदत्तमहाराजांनी या मनुष्य स्वभावाचा पूर्ण अभ्यास केला आहे. त्यामुळे त्यांना हे कोडे अध्यात्माच्या कर्मविपाक सिद्धांताने मनाशी समजून घेतले आहे त्यामुळे ते निराशावादी न होताही स्थिरपणे विचार सांगू शकतात. ते आपले विचार प्रगट करताना म्हणाले की 'तुम्हाला माहीत आहे का की देव फार क्षमाशील आहे. आपण जेव्हा पूजा करतो तेव्हा ''गंध निवारणे विनियोग!'' हा मंत्र म्हणून पूजेला सुरवात करतो. मनुष्याचा साधा गंधही देवाला सहन होत नाही इतका पवित्र शुद्ध परमेश्वर आहे. पण तो अतिशय क्षमाशील असल्यामुळे पूजा गोड करून घेतो. आपले अपवित्र अंतःकरण, आपले दुर्गुण, दोष त्याला कसे चालतील हा विचार माणसानी करावयास हवा. प्रत्येकाने वर्तमानकाळात तरी सद्विचार करावयास हवा.

कर्मविपाक सिद्धांताप्रमाणे पूर्वी केलेली कर्मे असतात तशी बुद्धी होते. देव दैत्य काही बाहेर नाहीत ते आपल्या मनातच आहे. सद्वासना व असद्वासना दोन्ही आहेत. ही देव दैत्यांची लढाई नित्य मनामधे चालू असते. आपण करतो ते बरोबर नाही असे अशा लोकांनाही वाटत असते परंतु ते टिकत नाही. मनावर जास्ती ज्या संस्काराचा पगडा असतो त्याप्रमाणे त्यांची वृत्ती बनते.

हिरण्यकश्यपुलाही वाटत होते की आपण प्रल्हादाला मारण्याचा इतका प्रयत्न केला पण तरीही हा मरत कसा नाही? आपल्यापेक्षा मोठी शक्ती असली पाहिजे हे त्याला कळत होते पण वळत नव्हते.

संत संयुक्तिकपणे सांगत असतात की देव सर्वज्ञ आहे. तुम्हाला कांही द्यायचे की नाही हे त्याला कळत असते. कशाला मागता? ही केवढी उच्च भूमिका आहे. पण माणसाला तेवढी दृढनिष्ठा नसते. बुद्धीचा निश्चय होत नाही. हे करावे की ते करावे असे चालू असते. अर्जुनाची स्थितीही तशीच आहे.

संताजवळ गेल्याने हे सर्व साधते. मौन पाळून ते काय सांगतात हे न ऐकता आपणच सारखे बोलत राहिलो तर दुसऱ्याचे गुण सुद्धा कळत नाहीत. चिकित्सेलाही मर्यादा असते. वादविवादाच्या वेळी संयमही पाळला पाहिजे. अधर्माचा काळ येतो तसा निघूनही जातो. असा विचार सहनशील असल्यामुळे संत करतात. संतांच्या जवळ राहून संताना आपण वाईटपणा देतो हा विचार संत करीत नाहीत. कारण सर्वांना सारखे प्रेम देणे हा त्यांचा धर्म असतो. समदृष्टी असल्यामुळे ते आपल्याजवळ आलेल्याचा अव्हेर करीत नाहीत. कसे वागायचे हा विचार साधकांनी करावयाचा असतो. संत मान अपमान मानीत नाहीत. मानही जायचा आहे व अपमानही जायचा आहे. काहीच शिल्लक रहात नाही अशी भूमिका ते घेतात. प. पू. श्रीदत्तमहाराजांचा स्वभाव आग्रही नसल्यामुळे ते अमुक एका पद्धतीने वागा असा आग्रह धरीत नाहीत. ज्याच्या त्याच्या मानसिक संस्काराप्रमाणे तो वागत असतो असे म्हणून तो विषय सोडून देतात.

वर्तमानकाळचा विचार करून माणसाने वागावे. भूतकाळ निसटलेला असतो भविष्यकाळ हातात नसतो. पण माणसे असे का वागतात याची कारण मीमांसाही त्यांनी केली आहे. या सर्व त्यांच्या दृढ विचारामुळे कोणालाही न दुखवता सांगण्याचे काम करतात. श्रवण, मनन, भजन याबद्दलचे विचार त्यांनी वेळोवेळी व्यक्त केले आहेत. आमच्यापासून जे चांगले असेल ते घ्या. वाईट सोडून द्या येवढेच सांगून त्यांनी येथे पूर्ण विराम दिला.

जे नातवाच्या बाबतीत तेच सर्वांच्या बाबतीत ही केवढी मोठी समदृष्टी आहे. याचे आपण प्रत्यक्ष उदाहरण पहात आहोत. आपल्याला मानवतेच्या दृष्टीकोनातून सुद्धा बरेच काही घेण्यासारखे आहे.



खर्डा येथील भागवत सप्ताह

मराठवाड्यातील खर्डागाव प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या आजोंबापासूनचे अनुग्रहीत गाव आहे. येथील प्रत्येक घरातील सुना, मुले, मुली प. पू. श्रीदत्तमहाराजांचे अनुग्रहीत आहेत. गोकुळामध्ये गोपींची जशी भगवंतावर भक्ती होती तशी खर्ड्यात प. प. श्रीदत्तमहाराजांवर सर्व गावाची भक्ती आहे. हे निरतिशय प्रेम प. पू. श्रीदत्तमहाराज अंतरंगात जाणून असतात. भक्त ज्यावेळी अनन्यपणे भक्ती करीत असतो. त्यावेळी देव किंवा गुरु यांनाही भक्ताची ओढ लागत असते. तसे खर्डागावावर प. पू. श्रीदत्तमहाराजांचे प्रेम आहे. त्या गावची त्यांना ओढ आहे.

खर्ड्याला १९९० साली भागवत सप्ताह झाला. त्यावेळी प. पू. श्रीदत्तमहाराज तेथे पंधरा वीस दिवस होते. सप्ताहाचा बाह्यरंगाने फार मोठा थाट नसे. साधे कॉटवर घातलेले गादीचे आसन असले तरी भाव मात्र चंदनाच्या आसनावर फुलांचा सडा पडावा तसा खर्डेकर मंडळीचा होता. दुपारी २॥ वाजता निरुपणाला सुरुवात होई. उन्हाळा कोण असे! पण खर्डेकरांचे भक्तिभावाने प. पू. श्रीदत्तमहाराजांना शीतलता येई. 'श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारे' ही वाक्ये ऐकली की खर्डेकरमंडळी उष्मा काय पण वेळ काळ सर्व विसरून जीवाचे कान करून ऐकत.

भक्तिचा नंदादीप लावियला अंतरात ।
गुरुदेवाचे ते शब्द मनी राहती तेवत ॥
भगवंत आले गावी भागवत सांगतात ।
बोध खोल खोल जाई देहभान विसरत ॥
किती दिसांनी आलात आता करु नका दूर ।
कसे राहू तुम्हावीण मना लागते हुरहुर ॥

सर्व भक्त मंडळीचे भाव हे असे तन्मयतेचे होते. एकरुप झाल्याचे होते.

निरुपण होऊन दोन तास झाले तरी महाराज निरुपण सांगण्यात रंगून जात. या लोकांना वाटे गुरुदेव आमचे दमले. असे किती बोलणार आमच्या कल्याणासाठी? ते सारे प्रेमार्द्र होत. लगेच 'श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारे' हा गजर सुरु करीत. भागवत सांगण्यात रंगून गेलेले महाराज भानावर येत. त्यांच्या मनातील भाव ओळखून हसून थांबत असत.

येथे भागवत रंगत होते. खर्डेकरांच्या भक्ति गुलाबपाण्याचा शिडकावा सारखा होत होता. श्रोता व वक्ता दोन्ही एकरुप होत होते. हा भागवत सप्ताह काही वेगळेच रुप घेत होता. चार तासाहून जास्त निरुपण होई. सर्वांना वाटे आपले श्रीमहाराज इतके सांगताहेत डोळ्यांना किती त्रास होत असेल असे वाटून रात्री त्यांच्यापैकी एक भक्त प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या पायाला गाईचे तूप लावण्यासाठी येई. प. पू.

श्रीदत्तमहाराज कुठेही कोणाकडूनही सेवा करून घेण्यास आजिबात तयार होत नाहीत. पण येथील भक्ति ही काही वेगळीच. त्यांचा भाव इतका कोमल मृदु होता की, प. पू. श्रीमहाराजांना नाही म्हणणे शक्यच होत नसे. त्यावेळी त्यांच्या बोलण्यातून एक गोष्ट सहजपणे कळून जायची. त्यावेळी प. पू. श्रीदत्तमहाराज म्हणायचे आम्ही वाचतो कुठे? नुसते निरुपण करतो. भागवत सप्ताह इतके झाले की ते मुखोद्गत झाले होते. प्रत्येकाला वाटे प. पू. श्रीमहाराजांनी आपल्याकडे जेवावे. या उतार वयात ते रोज वेगळ्या ठिकाणी जेवायला जात होते. हे कशाच्या बळावर? **भाव भक्ति भीमा उदक ते वाहे** तशी भक्तीची सरिता वहात होती. एवढे खरे.

सप्ताहाच्या समाप्तीचा सोहळा तर आगळा वेगळाच. ग्रंथराज भागवत व भागवत्तोत्तम व्यास श्रीमहाराजांची मोठी मिरवणूक खर्ड्यातून काढली. प्रत्येक घरातील स्त्रीने प. पू. श्रीमहाराजांना ओवाळले. तो प्रसंग विलक्षण पवित्र होता.

एकनाथांचे भागवतातील गोपींचे भक्तिवर्णन या वेळी आठवले. अनन्य भावाने गोपी एकरुप झाल्या. त्यांच्या भक्तिपुढे सर्व साधने पराभूत झाली. त्यांना वेद माहित नव्हता. सत्‌चिदान्द म्हणजे काय हे माहित नव्हते. पण सगुण रुपाची आराधना करता करता त्यांना आत्मसुखाचा लाभ झाला.

या वर्णनाप्रमाणे खर्डागाव अनन्य भक्तिने प. पू. श्रीदत्तमहाराजांशी एकरुप झालेले आहे. २॥ ते ३ तास मिरवणूक चालली होती. प. पू. श्रीमहाराज जरी कुठेही आसक्त होत नसले तरी खर्डागावाची भाक्ति पाहून त्यांच्या मनात या गावाविषयी ओढ वाटे. त्यांच्या त्या भोळ्या भावामुळे प. पू. श्रीदत्तमहाराज स्वतःचे कष्ट विसरत. पालखी मिरवणूक इतका वेळ झाली. प. पू. श्रीदत्तमहाराज आता थकले असतील असे वाटण्याच्या आत ते आल्या आल्या पाय धुवून संध्येसाठी बसते. सगळेच विलक्षण वाटते.

प. पू. श्रीदत्तमहाराज हे सर्वांचे भक्तीभाव ओळखून आपल्या थकलेल्या शरीराचीही फारशी तमा बाळगत नाहीत. सर्व वेळ अनुसंधान ठेवून ते न दाखविता राहतात. खर्ड्याला गोकुळाचीच उपमा द्यावीशी वाटते. कारण भावबळाने प पू. श्रीदत्तमहाराज इथे रमले. खर्डागाव श्रीमहाराजाना फार प्रिय आहे याचा उल्लेख अनेकवार आला आहे. एप्रिल १९९५ मध्ये श्रीमहाराज पुनः एकदा खर्ड्याला जाऊन आले. कोणताही कार्यक्रम न ठरविता अगदी मोकळ्या मनाने घरोघरी आपलेपणानी भेटी देऊन आले. सर्वांची प्रेमभराने चौकशी केली. सर्व गावाला शुभाशीर्वाद देवून तृप्त केले. तेवढेच स्वतःही अंतर्यामी समाधान पावलेले चेहऱ्यावरून उमटले गेले! धन्य ते गाव धन्य ते भाव. तुमचे आमचे त्याला कोटीकोटी प्रणाम !!

दादर येथील भागवत सप्ताह

दादरला श्री. जुवेकर वकिलांच्याकडे प. पू. श्रीदत्तमहाराजांचा भागवत सप्ताहाचा एक आगळा वेगळा सोहळा संपन्न झाला. श्रीमद् प. पं. वासुदेवानंदस्वामी महाराजांचे एक महान शिष्य प. पू. श्रीनानामहाराज तराणेकर यांनी अशी इच्छा प्रगट केली की, प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या तोंडून आम्हाला भागवत ऐकायचे आहे. प. पू. श्रीदत्तमहाराजानी ती आज्ञा शिरसावंद्य मानली व लगेच श्री. जुवेकर वकिलांच्या बंगल्यात हा भागवत सप्ताह घडून आला.

जणू ही हरीहरांचा भेटच

सांगणारे संत व श्रोतेही संतच. त्यामुळे हा सप्ताह ही एक पर्वणीच वाटत होती. ही हरी हरांची भेटच वाटे. दुपारी तीन वाजता निरूपणास सुरवात होई. प. पू. श्रीदत्तमहाराज निरूपण इतके सुंदर करीत की भक्ती रसाला पूर येई. कारण ऐकणारे श्रोते भावनेत रंगून गेलेले नानामहाराज होते. प. पू. श्रीदत्तमहाराज इतक्या खुबीने वेळेचे नियोजन करीत की काही न वगळता चार चार तासही न संपणारा निरूपणाचा भाग दोन अडीच तासात संपवीत. त्याना कळू न देता कटाक्षतेने पाळीत कारण प. पू. श्रीनानामहाराजांना फार काळ बसवत नसे. श्रोता, वक्ता इतके भगवदभक्त की त्यामुळे या सोहळ्याचे वर्णन करताना मनात येई.

सुवर्णाला सुगंध यावा, गंधा यावी रूची
दुग्ध शर्करा सुयोग यावा तैसी ही शुभ स्थिती
भागवताच्या आकंठ श्रवणे करूनी व्हा पावन
पवित्र ऐशा संतदर्शने कृतार्थ हो जीवन

काही काही कथाभागाला भक्तिरसाचा पूर लोटे.

श्री कपिलमहामुनीनी आपल्या आईला जो उपदेश केला त्याने ती माता उद्धरून गेली हे सर्व सांगत असताना

आसना वरी बसावे । मन स्थिर ते करावे ।
भगवंत चित्ती । ठसवूनियाच घ्यावे ।
उपचार ते मनाने । अती गौरवे करावे ।
मुखी हास्यते प्रभूचे । चित्ती सदा वसावे ।

प. पू. श्रीदत्तमहाराजांनी शेवट केला.

ध्यानात लीन झाली । देही विरून गेली
भक्ति मुक्ती ल्याली । माता कृतार्थ झाली.

असा अर्थपूर्ण मधूनमधून संवाद चाले. श्रोत्यांना श्रवण सुखाची मेजवानी होई.

दुसरे दिवशी जडभरताने आख्यान होते. भरत इतके तपस्वी थोर तरी मृगशावकात मन अडकले मग आपले काय

बाळपणी खेळ गोड । तरुणपणी संसार आवड
थकले शरीर वृद्धपण । चिंतन केव्हा करणार प. पू. श्रीनानामहाराज म्हणाले

हे सारे जाणून करावे नामस्मरण
सर्व विषयी सावधपणा सांभाळावे सर्वदा

श्रीकृष्ण भक्तीत गोपी कशा तल्लीन झाल्या हे प. पू. श्रीदत्तमहाराज रंगून जाऊन सांगत होते. रानावनातून येणारा तो बासरीचा गोड नाद ऐकून गोपी देहभान विसरून जात. प. पू. श्रीनानामहाराजांना भजनाचा विशेष नाद ते म्हणाले

गृही काम धाम करिता ओठात कृष्ण नाम
ध्यानी मनी तयांच्या तो कृष्ण पूर्ण काम
टिपरी वरील टिपरी तो नाद धुंद झाला
कृष्णासवे सख्या त्या खेळात मग्न झाल्या
नाही तयास भान ती लागली समाधी
संसार सागराची कसली तया उपाधी

सारे गोकुळ तेथेच अवतरले होते. सात दिवस कसे संपले ते कळले नाही. दोन संत एकत्र पाहणे हाच किती अपूर्व व दुर्मिळ असा योग होता.

भागवतासारखा भक्तिग्रंथ, दोन संताचा अखंड भेटीचा सोहळा पाहून जुवेकरांचे घर व परिसर तृप्त झाला.

❊ ❊ ❊

भागवताबद्दल बोलताना

प. पू. श्रीमहाराजांनी भागवत ग्रंथाचे अनेक पारायणे, अनेक सप्ताह केले. त्यांचे विचार हा एक भागवत ग्रंथाबद्दलचा संदेशच आहे.

चार्वाक मत 'लोकायत्त' म्हणजे लोकांमध्ये पसरलेले असे त्याचे नाव आहे. या देहात्मवादातून लोकांना भागवताकडे म्हणजे भगवंताच्या भक्तिकडे वळवण्याचे सामर्थ्य काही साधे नाही. याला कारण या शास्त्रकारांची तपस्या हे आहे. नुसत्या विचारांनी काही परिणाम होत नाही. त्यामागे तपश्चर्या व तन्मयता लागते. आम्ही विज्ञानवादी देखील योगीच समजतो. पूर्ण विचार करून तोही त्याच्या कामात तन्मय झालेला

असतो. त्याशिवाय शोध लागत नाहीत हे खरे पण ते पूर्ण नाहीत. बुद्धी ही पूर्ण हिताकडे जाऊ शकत नाही. असे महाराजांचे पुनः पुन्हा सांगणे आहे. बुद्धीत सतत बदल होतात.

व्यासांनी जी अनेक चरित्रे सांगितली आहेत ती याकरताच आहेत. त्या चरित्राचा, त्या लोकांचा विचार केला म्हणजे जीवन चरित्राचा कसा विकास होत गेला हे कळते. प्रथम सगळे नास्तिक म्हणजे देहात्मवादीच असतात. त्यांना सर्व विचार नीट ऐकायला मिळत नाहीत. अभ्यास करताना त्या विचारांचा नीटपणे मागोवा घेतलेला नसतो. सांगणारेही भेटत नसावेत. भेटले तरी पाश्चिमात्य विचारांचा प्रभाव जास्त असतो. एक उदाहरण द्यायचे झाले तर एम. ए. च्या परीक्षेला 'झाला वेदान्त' बक्षिस असते. परंतु गंमत अशी होते की शंकराचार्यांच्या मतानी लिहिणाऱ्या विद्यार्थ्याकडे लक्ष देत नाहीत त्यांना गुण कमी देतात. इंग्रजी ग्रंथावरून जे विचार मांडलेले आहेत ते लिहिले म्हणजे त्यांना जास्त गुण देतात हे बरोबर नाही. परीक्षा घेणाराही याच विचारातून वाढलेले आहेत. त्यांचाही कल पाश्चिमात्य विचारसरणीकडे असल्यामुळे जगात बुद्धीमान म्हणजे फक्त वैज्ञानिकच आहेत इतर कोणी बुद्धिमान नाहीत अशी गृहित समजूतच झालेली आहे. त्यामुळे आपले हे साहित्य कोण वाचणार? एखादाच त्यातला विचारी निघतो. ज्याचे असे संस्कार जागृत झाले आहेत तो इकडे वळतो. त्याच्यासाठीच प्रयत्न करायचा असतो. हे लक्षात ठेवावे.

खरी लोकशाही कशाला म्हणायची की ज्याचे एकट्याकडेही लक्ष आहे. एकट्या रुक्मिणीने पत्र पाठविले. आपला निश्चय कळविला. सगळे श्रीकृष्णाच्या विरुद्ध असूनही केवळ तिच्याकरता कृष्ण गेले. सगळ्यांना शासन त्यांनी केले व तिला घेऊन आले. सर्व लोकांच्या भल्याकरताही प्रयत्न करायचा. पण एक व्यक्ती गुणवान, विचारसंपन्न दृढ निश्चयाची असेल तर त्याकरताही प्रयत्न करणे जरुर आहे. पक्षपात करून उपयोग नाही. लोकांकरिता प्रयत्न करणाऱ्या माणसाची दृष्टीही अशी असावी लागते.

❀ ❀ ❀

भागवत एक समन्वय ग्रंथ

प. पू. श्रीदत्तमहाराजांनी वयाच्या सोळाव्या वर्षापासून प. प. श्रीदीक्षितस्वामी महाराजांच्या आशीर्वादाने भागवत् ग्रंथाची सतत पारायणे केली. प. पू. श्रीगुरुमहाराजांचीही श्रद्धा या ग्रंथावर होती. पण भागवतच प. पू. श्रीदत्तमहाराजांना

इतके प्रिय का आहे असा विचार मनात येत असे. एक भक्तिप्रधान ग्रंथ म्हणून त्यांचा गौरवही आपल्या नित्य वाचनात असतो. श्री. व्यासांनी श्री. नारदांच्या सांगण्यावरून सर्वात शेवटी ही ग्रंथ रचना केली व ते शांत चित्त झाले असे आपण नित्य ऐकत असतो. भागवत सप्ताह सुरु होण्यापूर्वी आदल्या दिवशी भागवत महात्म्य वाचतात तेही आपण ऐकतो.

सदा सेव्या सदा सेव्या । श्रीमद् भागवती कथा
यस्या श्रवण मामेणं हरि चित्तंम् समाश्रयेत
अर्थोयम् ब्रह्मसुत्राणाम् भारतार्थ विनिर्णयहा
गायत्री भाष्यं रुपो सौ वेदार्थ परिवृंहिता हा श्लोक आपण म्हणतो

वेदान्त पारिजात सौरभ या ग्रंथाचा अनुवाद त्यांनी केला आहे. त्याला प. पू. श्रीदत्तमहाराजांनी जी प्रस्तावना लिहिली आहे ती जवळजवळ सव्वाशे पानाची आहे. निम्बार्कभाष्याबद्दल लेखन करताना त्यांनी भागवत् हा समन्वय ग्रंथ कसा आहे हे स्पष्ट केले आहे. ते विचार आपल्यासारख्या जन सामान्यांना नवे आहेत. भागवताचे महत् कार्य सांगणारे आहेत म्हणून ते मुद्दाम देत आहो.

वेदान्त पारिजात सौरभ अर्थात ब्रह्मसूत्र निम्बार्क भाष्यम्

श्री निबार्काचार्यानी भागवत धर्माचा प्रसार व्हावा या हेतूने ग्रंथरचना केली असल्यामुळे प्रथम भागवत धर्माबद्दल व भागवत धर्माच्या प्रत्येक आचार्याबद्दल या ठिकाणी विचार केला आहे. उपनिषदे व त्यांचा अर्थ निर्णय करण्याकरता रचलेली ब्रह्मसूत्रे याच्या द्वाराने ब्रह्माची सिद्धी झाली. त्याला मूर्तस्वरुपाची असलेली आवश्यकता भागवत निर्माण करून व्यासांनी पूर्ण केली.

'तेनेयं वाङमयो मूर्तिः प्रत्यक्षा वर्तते हरेः।
सेवनाच्छ्रवणात्पाठाद्दर्शनात्पापनाशिनी।। पद्मपुराण उत्तरखंड

याप्रमाणे भागवताचे महात्म्य वर्णिलेले आहे. सर्व अनार्थाचे उपशमन करणारा उज्वल भक्तिमार्ग, लोकांना अज्ञात असलेला, तो समजावून सांगण्याकरता भागवताची रचना व्यास महर्षींनी केली.



भागवत धर्माचे प्रयोजन

नराचा अयन आधार म्हणजे नारायण याची उपासना हा भागवत धर्माचा विशेष आहे. नराला आत्मचिंतन करण्याचा सल्ला बौद्ध देऊन राहिले होते. अशावेळी नराचा सखा व रक्षक नारायण भागवत धर्माने दाखवून दिला. या धर्माची प्रेरणा

श्रीहरीच्या हंसावतार रुपाने झाली. सत्वाचा म्हणजे अंतःकरणाचा खरा विकास झाल्याशिवाय हा सात्वत भक्तिधर्म उत्पन्न होत नाही, असे श्री हंसानी सांगितले आहे.

सत्वाद्धर्मो भवेद् वृद्धातुसो लक्षणा।
सात्विको पासया सत्वं तता धर्म प्रवर्तते।। भागवत ११।१३।२

मन, बुद्धि, चित्त, अहंकार या अंतःकरण चतुष्टायात मन प्रधान आहे. सनक, सनंदन, सनातन, सनत्कुमार हे चार ब्रह्मदेवाचे मानसपुत्र अंतःकरण चतुष्ट्याचे प्रतीक आहेत. श्रीहंसाच्याद्वाराने यानाच तत्वोपदेश झाला. त्याचाच प्रसार मनाचे प्रतीक असणाऱ्या श्रीनारदांच्याद्वाराने संसारात सर्वत्र झाला.

पाच रात्र ग्रंथात श्रीनारदांनी हाच सात्वत धर्म प्रगट केला आहे. बादरायण व्यासांना श्रीनारदांनी हाच सात्वत धर्म प्रकट केला आहे.

अशात बादरायणव्यासांना श्रीनारदानीच या भक्ति धर्माचा उपदेश करून त्यांना भागवताची रचना करण्यास प्रवृत्त केले. श्रीनारदांच्या उपदेशाने समाहित चित्त झालेल्या श्रीव्यासांनी भागवत संहिता केली म्हणून भागवताला समाधिभाषा व्यासस्य असे म्हणतात. वेद, भगवद्गीता, ब्रह्मसूत्रे व भागवत ही भागवत धर्माची चार प्रमाणे पुढे दिली आहेत.

वेदाः श्रीकृष्णवाक्यांनी । व्यास सुत्राणी चैवहि
समाधि भाषा व्यासस्य । प्रमाणं तत्वतुष्ट्यम् शुद्धा द्वैत मार्तंड ७९

'भागवत' एक समन्वय ग्रंथ, भागवतामध्ये अनेक मतमतांतराबरोबर मोठ्या कौशल्याने भक्तिरसाची मांडणी केली आहे. हंसद्वारा भागवत धर्माचा उपदेश सनकादिकांना झाला. सनकादीकांनी आणि श्रीनारदानी त्याचा प्रसार विश्वामधे केला.

भागवत ग्रंथात सांख्यमताचा समावेश :-- प्राचीन सांख्यमत निरिश्वरवादी असून ते योगाशी संलग्न करून कपीलमुनींच्याद्वारा सेश्वर सांख्यांचा उपदेश देवहुतीला झालेला भागवताच्या तृतीय स्कंदात दाखविला आहे.

अणूकारणवाद :-- हा वादही समाविष्ट केला पण ईश्वरच परमाणू रुपाने सर्व कारण असल्याचे दाखविले आहे.

जैन धर्माला वैष्णव धर्माचे रुप :-- भवाटवी आणि ऋषभदेवांचे चरित्र वर्णन करून त्याच्याद्वारा जैन धर्माला वैष्णव धर्माचे रुप दिले. त्यातील केशोलुंचनाचे प्रकार अज्ञानमूलक असल्याचे सांगितले.

बौद्धभिक्षूची आत्मनिष्ठा :-- एल राजा म्हणजे पुरुखांच्या आख्यानामध्ये बौद्ध भिक्षूंच्या आत्मनिष्ठेची आवश्यकता सूचित करून तिला भक्तिमध्ये समाविष्ट केली.

* * *

चार्वाक मताचे प्रचारक

हिरण्याक्ष, हिरण्यकश्यपु, रावण, कुंभकर्ण, शिशुपाल, दंतवस्त्र, कंस इत्यादिकांचे दमन, ईश्वराकडूनच झाल्याचे भागवतात आहे.

येनराजा जो पूर्णपणे नास्तिक चार्वाक मताचा प्रतिकच होता. त्याचा नाश ब्राह्मणांच्या द्वारा करवून त्याच्यापासूनच ईश्वरांश पृथ्वीराजाला प्रकट केले.

चार्वाक मताप्रमाणे देह हाच आत्मा मानीत असत. चार्वक पुर्नजन्म मानीत नाहीत. १) पृथ्वी, २) आप, ३) तेज, ४) वायू ही चारच भूते मानतात. प्रत्यक्ष प्रमाणाला महत्त्व. अनुमान, प्रमाण मानीत नाहीत. दुःखाकडे लक्ष न देता सुख मिळेल तेवढेच भोगून घ्यावे असे होते. त्यामुळे मानवी जीवनातील सुखासीनता वाढली. भोगप्रधान संस्कृती होवू लागली, कपील, ऋषभ, बुद्ध, पृथु या सर्वांना ईश्वरावतार ठरवून त्यांना पूज्य बनविले. याप्रमाणे सर्व समन्वय ग्रंथरुपाने भागवत धर्मामध्ये भागवताने केला. संपूर्ण भागवतग्रंथ एक मोठा समन्वय ग्रंथ रूपाने प्रगट केला आहे.



बौद्ध धर्माचे प्रतिकूल परिणाम भागवताने टाळले.

बौद्ध धर्माने वैदिक कर्मकांडांचे निराकरण केले. त्याचा परिणाम असा झाला की, सर्व समाज कर्मत्याग करून जंगलात जाऊन आत्मचिंतन करणेच श्रेष्ठ समजू लागला. भागवत धर्माने त्याचे खंडन प्रत्यक्ष न करता अनासक्तीने कर्माचरण व भगवद्भक्ति ही प्रगट केली. त्यामुळे बुद्धांच्या उपदेशामुळे वाढणाऱ्या अकर्मण्यतेचा प्रवाह रोखला गेला आणि अनासक्त कर्मसहित भक्तिमार्गाकडे समाजाची प्रवृत्ति झाली.

कर्मवासनांनी त्रस्त झालेल्या जनसमूहाला गीता, ब्रह्मसूत्र व भागवत या भागवत धर्माच्या प्रस्थानत्रयीने भिक्षू होण्यापासून वाचविले. ब्रह्मवादाची स्थापना करून सांसारिक वासनाचे परिवर्तन ईश्वर विषयक वासनात करण्याचा सल्ला दिला आणि अशा वासनांची मूर्ती बनण्याचा आनंदघन वासुदेवाच्या स्वरुप चिंतनात जीवाने रमून निर्दुःख व्हावे असा प्रयत्न केला.



असुरी संपत्ती व दैवी संपत्ती दर्शन

श्रीभागवतामध्ये अनेक ठिकाणी सनकांदिकाचे व श्रीनारदाचे दर्शन होते. द्वेषवासना व रागवासना ज्यांना असुरी संपत्ती व दैवी संपत्ती म्हणता येईल. या वासनांचे प्रतीक भागवतामध्ये दाखविले आहे. सनकादिकांच्या शापाने ज्या जय विजय या विष्णूपार्षदाना असुरी संपत्तीयुक्त केले, ते जयवियज द्वेष वासनेचे प्रतीक आहे.

भागवत धर्माच्या उदयकाळी शांडिल्य, गर्ग, विष्णू, कौडिण्य व अरुणी हे पाच भागवत धर्माचे प्रत्यक्ष प्रवर्तक आचार्य आहेत. यांनी आसेतुहिमाचल भारत वर्षात भक्तिरसाची लूट केली. वृंदावन हे भारत वर्षात भक्तिचे केंद्र झाले. त्यावेळी बौद्ध व जैन धर्माच्या प्रभावाने वैदिक धर्म जवळ जवळ लुप्त झाल्या सारखाच होता.

पराजित ब्राह्मण, धर्म, ईश्वर व प्रारब्ध यांच्यावर हवाला ठेवून दिवस कंठीत होते. त्यांच्या ताब्यात कोणीही नव्हते. बौद्ध भिक्षू ईश्वराला न मानता स्वतःच आत्मोद्धाराचा उपदेश करीत फिरत होते. जैनांचा मुख्य भर कर्म बुद्धीवर होता. असा मतमतांचा गलबला त्यावेळी झाला होता. भारताच्या शासकांना राजधर्मास अनुसरून जैन, बौद्ध यांनाही मान्यता द्यावी लागत होती. अशा अनेक भिन्न मतांचा समन्वय भागवताने व भागवत धर्माने केला. श्रीव्यासांनी लिहिलेल्या या भागवताने अशा पद्धतीने बरेच मोठे समन्वयाचे काम त्या काळात साधले व अनेक मतामतांच्या गलबल्यात भगवदभक्ती व कर्मफलाचा त्याग हे ध्येय ठेवून संसार अशी एक सात्विक दिशा दाखवून समाजात स्थिरता आणली. हे आपण लक्षात घेतले तर भागवताबद्दलची आस्था अधिक वाढेल व श्रवण करताना एक वेगळी दृष्टी प्राप्त होईल.



हे गीता नाम विख्यात । सर्व वाङ्मयाचे मथित
आत्मा जेणे हस्तगत रत्न होय ॥

१८/२३ ज्ञाने

धर्मे प्रीतिं सन्मतिं देवभक्तिम्।

१९९४ सालातील अश्विन शुद्ध प्रतिपदेचा दिवस होता. आश्रमात आले होते. सकाळी साडे आठचे सुमारास प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या रेणुका निवासमधे गेले होते. प. पू. श्रीदत्तमहाराज व ती. सौ. आईसाहेबांना वंदन केले. आंत खोलीत जाऊन बसले. प. पू. श्रीदत्तमहाराज एकटेच पत्रलेखन करीत बसले होते. मनांत येत होते की प. पू. श्रीदत्तमहाराजांनी काही बोलावे. त्यांच्या या समाधानाचे, प्रसन्नतेचे रहस्य जाणून घ्यावे. साधकाना मार्गदर्शक असे हितगुज महाराजांनी करावे. मी सहज म्हंटले की, 'महाराज आपण उपासना सातत्याने आजपर्यंत करीत आहात पण आपली वेगळी दृष्टी उपासनेकडे बघण्याची असेल नाही का?'

प. पू. श्रीदत्तमहाराज एकदम म्हणाले "धर्मे प्रीतिं सन्मतिं देवभक्तिम्" या दृष्टीने साधकांनी अभ्यास करावा. अहंकार गेला पाहिजे. समन्वय दृष्टी व विश्वासाने सर्वांना सांभाळून घेण्याची वृत्ती हवी. प. पू. श्रीदत्तमहाराज एकदम गतकाळातील आठवण सांगू लागले.

"प. पू. श्रीगुरूमहाराज गेल्यावर आम्ही इकडे येण्यास तयारच नव्हतो. वास्तविक श्रीगुरूमहाराजांची प्रकृति बरी नव्हती म्हणून पुणे सोडू नये असे वाटत होते. श्रीगुरूमहाराज तर आपल्याला दूर पाठवून गेले. आम्हाला आग्रहाने नागपूरला का पाठविले ते कळले नाही. आता पुण्याला येण्यापेक्षा स्वामीमहाराजांनी ज्या ठिकाणी चातुर्मास केला त्या पवनीला एकांतात जाऊन थोडे दिवस रहावे असे मनांत आले. परन्तु फोन, तारा, पत्रे आल्यामुळे पुण्याला यावे लागले." प. पू. श्रीदत्तमहाराज अगदी आतून कळवळून बोलत होते. ते पुढे म्हणाले, "हे सारे नको वाटत होते, टाकलेली जबाबदारीही नको वाटत होती. अहंकार येण्याचा संभव असतो." प. पू. श्रीदत्तमहाराज किती विवेक करतात व अहंकार येऊ नये म्हणून किती सावध आहेत हे ऐकूनच मन थक्क झाले. विचारात पडले. प. पू. श्रीदत्तमहाराज सांगत होते "एकदा प. प. श्रीशिवोऽहम्तीर्थांची भेट घेतली. आमचे हे विचार त्यांना सांगितले. त्यांची दोन वाक्ये ऐकून हे आपल्याला जमेल असे वाटले. मन स्थिर झाले. ते म्हणाले, "आपण सारा भार, सारे कर्तृत्व श्रीगुरूमहाराजांवर सोपवा. आपणाकडे कर्तृत्वभाव घेऊच नये म्हणजे झाले." मनांत आले गुरुशक्ति जगात कार्य करीतच असते. खरे सांगायचे तर श्रीगुरुमहाराज नाहीत असे आजपर्यंत आम्हाला कधीच वाटले नाही. निश्चिंत मनाने श्रीगुरूमहाराज कर्ते आहेत असे समजून उरलेले कार्य करायचे असे ठरवले.

प. पू. श्रीदत्तमहाराज आज मोकळ्या मनाने बोलत होते. बोलत असताना सुद्धा त्यांचे ईश्वरी अनुसंधान सुटले नव्हते. ऐकताना आज काही वेगळाच अनुभव जाणवत होता. श्रीमहाराज पुढे म्हणाले "लोक म्हणत असतात श्रीगुरुमहाराज नाहीत त्यामुळे आश्रमात व्यवस्था नाही. सगळा गोंधळ आहे. आम्हांला मात्र तसे वाटत

नाही'' वेदमूर्ति श्रीकोडणीकरगुरुजी उत्तम पवमान म्हणणारे आहेत. ते लक्षपूर्वक यथायोग्य पूजा करतात. हल्ली पूजेला ब्राह्मण मिळणे कठीण झाले आहे. नुसते पाणी ओतून जाणारे काय करायचे? पवमानयुक्त पूजा करतात ही प्रेरणा श्रीगुरुमहाराजांची आहे. देवाला सोवळ्यात नैवैद्य श्री वासुदेवराव करंबेळकर करतात. त्यांना जागा नव्हती. वामन निवासात त्यांची जागेची सोय झाली. त्यामुळे नैवेद्याचे सहज जमले. हे सारे कार्य श्रीगुरुमहाराजांचे आहे. गुरुशक्तीच्या संकल्पाप्रमाणे सारे घडत आहे. कर्तृत्व आपलेकडे घेण्यास अवसरच नाही.'' हे वाक्य प. पू. श्रीदत्तमहाराज इतके ठासून म्हणाले की गुरुशक्तीबद्दल त्यांची खात्री केवढी निश्चयात्मक आहे हे कळून मन भारावून गेले. अकर्तृत्वभाव हेच जीवनाचे सूत्र आहे. मग काळजी कशाला? काळजी करून एखादी गोष्ट झाली की ती सकाम होते. काळजीचा भार श्रीगुरुमहाराजांच्यावर सोपविला की निष्काम कर्म होते. अकर्तृत्वभाव व निष्कामता ही दोन महत्त्वाची सूत्रे त्यांनी किती थोडक्यात सांगितली. त्यांच्या शांतवाणीतून आज एकामागून एक मार्गदर्शक तत्त्वे सहजपणे बाहेर पडत होती. आवाज गंभीर होता एखाद्या श्रोत्रासारखा कानावर पडत होता.

'बालादपी सुभाषितमग्राह्यं' ही आपली भारतीय संस्कृती आहे. आग्रह सुटणे ही लोकशाहीची व्याख्या आहे. श्रीमहाराज बोलतच होते. 'ती गुरुभक्ती होय अधिक मानसी। ऐसे ज्ञान मज द्यावे.' दिपकाला आपली गुरुभक्ती कमी वाटत होती असे वाटणे ही खरी गुरुकृपा आहे. खरी कृपा कशाला म्हणतात ते श्रीमहाराज सांगू लागले. 'पिताजींचे व गुरुमहाराजांचे सहस्त्रदर्शनशांती असे उत्सव पाहण्याचे भाग्य आम्हाला लाभले. श्रीगुरुकृपेमुळे आमचेही उत्सव झाले. हे आमचे आम्हाला लौकिक दृष्ट्या त्यानी पोचते केले पण ही खरी कृपा नाही. परामार्थ प्राप्ती ही खरी कृपा ती सतत लाभू दे. ज्ञान सुद्धा जावे लागते. दीपकाप्रमाणे गुरुभक्ती अधिक वाढत राहिली पाहिजे अशी कृपा लाभावी.

अर्जुनाचे कल्याण व्हावे अशी भगवंताची इच्छा होती म्हणून भगवंताने त्याला विश्वरुप दाखविले. अर्जुन ऐकणारा होता म्हणून भगवान त्यावर प्रसन्न होते. प्रसन्न याचा अर्थ 'प्रसादो अनुग्रह बुद्धी' अर्जुनाला शक्तिपाताने श्रीकृष्ण भगवंताने ज्ञान दिले. मध्येच त्यांना सहज विचारले, ''इतके शांत आपण कसे राहू शकता? इतका मोठा पसारा, व्याप संभाळताना आपला मनाचा तोल एकदाही गेलेला पहात नाही. हे आम्हालाही साधावे असे वाटत असते.'' प. पू. श्रीदत्तमहाराज म्हणाले, ''श्रीज्ञानेश्वरमहाराज असेच जगावर रुष्ट होऊन बसले. तेव्हा मुक्ताबाईना त्यासाठीच श्रीज्ञानेश्वरमहाराजांना सांगावे लागले. ताटी उघडा ज्ञानेश्वरा. त्या ज्ञानदेवांना म्हणताहेत'' जगाचे कल्याण व्हावयाचे म्हणजे आपण तसे वागून दाखवायला हवे. शास्त्र व संत खरे सांगतात असा जनतेला विश्वास यायला हवा मग ज्ञानदेवा आपण रागवून कसे चालेल?''

ही सहनशक्तीची सुरवात आहे. 'महाजनो येनगतस्थपंथा' सज्जन व साधु वागतात तसे वागावे. जरी अंतरी क्रोध आला तरी तो अशांत झाला. शांती आंत असावी लागते. ज्यांनी सन्मान केला त्यांच्या देखत अपमान सहन करण्याची ताकद हवी. हा खरा परमार्थ आहे. सर्व संतानी असे अपमान सोसले आहेत. तुकारामानी तर असे म्हटले आहे की, **मान अपमान गोवे। अवघे गुंडुनी ठेवावे । हेची देवाचे दर्शन। सदा राहे समाधान** अशी सहनशक्ती वाढली पाहिजे. नंतर थोडे थांबून प. पू. श्रीदत्तमहाराजांनी प. प. स्वामी महाराजांची एक गोष्ट सांगितली. एक तुकारामांचा अभंग आहे. तो वाडीला कुणीतरी म्हणत होते. त्यांचे शब्द ऐकून स्वामीमहाराजांची समाधी लागली इतका त्यांना तो भावला. श्रीमहाराज म्हणाले. आपणही लक्षात ठेवण्यासारखा आहे असे म्हणून प. पू. श्रीदत्तमहाराजांनी म्हणून दाखविला.

नमो आदी रुपा ओंकार स्वरुपा विश्वाचिया रुपा पांडुरंगा ॥१॥
तुझीये सत्तेने तुझे गुणगाण तेथे सुखी राहू सर्वकाळ
तूची श्रोता वक्ता ज्ञानासी अंजन सर्व होणे जाणे तुझे हाती ॥३॥
तुका म्हणे जेथे नाही मी तूपण स्तवावे ते कवणे कवणा लागी ॥४॥

प. पू. श्रीमहाराज म्हणाले,''स्तुती कोणी कोणाची करायची'' या ओळी लक्षात ठेवून घ्याव्या. हा अभंग सांगताना महाराजांचे डोळे पाणावले होते.

मनी धरावे ते होते विघ्न अवघेची नासून जाते
कृपा केलीया रघुनाथे प्रचीति येते येवढे नेहमी लक्षात ठेवीत जा.

प. पू. श्रीदत्तमहाराज ज्या तळमळीने बोलत होते ती त्यांच्या शब्दाशब्दातून जाणवत होती. इतके एकाग्र होऊन ते बोलत होते की ते आपल्या स्वरुपानुसंधानात आहेत असे वाटत होते. या लौकिकीजगातून त्यांचे मन असे विश्वाकार झाले होते. हे विचार अंतरंगातून प्रगट झाल्यावर एक सुरेख आतीव शांतता पसरली. प. पू. श्रीदत्तमहाराज बोलावयाचे थांबले. मीही एक वेगळ्या आनंदाची अनुभूती घेतली. माझे हात जोडले गेले. मीपण मूक झाले. थोडा वेळांनी मीच म्हटले,''खूप सांगितलेत महाराज. त्यावर ते अतिशय शांतपणे म्हणाले ''सांगायचे म्हणून सांगता येत नाही. ते आतूनच यावे लागते.'' किती महत्त्वाचे वाक्य!

प. पू. श्रीमहाराजांचे घरी आल्यावर जाणवलेली त्यांची प्रसन्नता, शांतवृत्ती, एकाग्रता हा सर्व गुरुमहाराजांचा प्रसाद होता. प. प. श्रीवासुदेवानंद स्वामीमहाराज म्हणतात, ''सदा संतापाशी जावे, त्यांचे जवळी बैसावे जरी ते उपदेश न देती । तरी ऐकाव्या त्या गोष्टी''. त्याची प्रचिती आली. हा कृपाप्रसाद जनताजनार्दनाच्या चरणी अर्पण करीत आहे.

प. पू. श्रीदत्तमहाराजांचा पत्र संदेश

प. पू. श्रीवामनरावजी गुळवणी महाराजांप्रमाणेच प. पू. श्रीदत्तमहाराजांचा पत्रसंग्रह विस्तारीत आहे. सर्व पत्रोत्तरांचे संशोधन करुन आणखी एक मार्गदर्शक तत्वांनी, सुवचनांनी, भरलेले चरित्र तयार होईल. आज काही पत्रे अशी आहेत की त्यावरुन सर्वांनाच हितोपदेश लाभेल म्हणून येथे देत आहे. अशा तऱ्हेची पत्रोत्तरे हाही त्यांच्या जीवनचरित्राचा अविभाज्य भाग आहे. हे सारे आपण आपल्याकरताच करीत आहो. जसे जमेल तसे मनाने चिंतन करुन आपले मन ईश्वर भक्तीकडे वळावे. हीच प्रत्येक साधकाचे मनात इच्छा असते.

प. पू. श्रीगुळवणीमहाराजांनी पत्राद्वारा केलेला उपदेश सर्वांनाच बोधप्रद आहे. थोडक्यात उपदेश करण्याची त्यांची पद्धती फार सुरेख होती. ते फार कमी बोलत. पत्राचे उत्तर न चुकता येई व त्यात थोडक्यात उत्तम विचार मांडलेला असे. प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या जीवनात त्यांचे स्थान अजोड आहे. म्हणून श्रीगुरूमहाराजांचे विचार व प. पू. श्रीदत्तमहाराजांचे विचार किती समान आहेत याची प्रत्यक्ष प्रचिती ते वाचून येईल. श्रीगुरूमहाराजांच्या काही निवडक पत्रातील मजकूर खाली दिला आहे.

''कौंतेय प्रति जानीहि नमे भक्त प्रणश्यति या वचनावर पूर्ण श्रद्धा ठेवून सद्गुरूंनी सांगितलेले साधन शांतमनाने करीत जावे इतकेच कर्तव्य आहे. ७-७-६१

सत् संगतीचा लाभ ईश्वरकृपेनेच होतो त्याचा उपयोग फार चांगला होतो. अंतःकरण सात्विक होते. साधनाला उत्साह वाढतो. २९-८-६१

सदैव अनुसंधान व यथाशक्ति लोकसेवा करण्याची आपली इच्छा उत्तम आहे भगवत्कृपेने त्यात यश येईल. २९-९-६२

श्री एकनाथी भागवत भिक्षुगीत आहे. भगवंतानी उद्धवाला सहनशीलता किती असली पाहिजे याबद्दल ही कथा सांगितली आहे. त्याचे नेहमी मनन करावे. भगवत्कृपेने सहनशीलता निश्चित प्राप्त होईल. ६-२-६५

प्रतिकूल परिस्थितीत मन शांत राहिले पाहिजे हेच मुख्य करावयाचे आहे १५-१२-६५

ईश्वरस्मरण, साधना, अभ्यास, सदग्रंथ वाचन, तीर्थयात्रा, श्रीगुरुमहाराजांचे अक्षय अस्तित्व, करुणात्रिपदीचे रोज पठण, कर्तृत्वभाव ईश्वरावर टाकावा, निर्धाराने सेवा, पितृसेवा, आत्मचिंतन, विचारापेक्षा आचार श्रेष्ठ, सन्मती असन्मती, मनाची निर्मळता, निर्मत्सरता. समष्टीरुप मन असे छोटे मोठे सदगुण या पत्रोत्तरात आहेत. दैवी संपत्ती वाढविता यावी, साधकाने तसा प्रयत्न करावा, त्याचा कंटाळा करु नये असे प. पू. श्रीदत्तमहाराजांचे सांगणे आहे. समाधान प्राप्त करुन घेण्याकरता, मनाचा

तोल सम राखण्याकरिता यासर्व सुचनांची आपणास जरुरी आहे. चातुर्मास नेम करण्याची पूर्वी प्रथा होती यातील एकेक सुचना आचरणात आणवयाचा आपण मनापासून प्रयत्न करुया.

परमात्मा पूर्ण शक्तीसंपन्न असून दयासागर आहे. त्याचे जवळच रोज प्रार्थना करुन न्यूनाधिक सर्व निवेदन करीत असावे. त्याचे कृपेने इष्टसिद्धी निश्चित होईल.
११.१०.७८

श्रद्धेने साधना, नामस्मरण, सद्ग्रंथवाचन चालू ठेवावे, त्याने शांती लाभेल. श्रीगरुडेश्वर, तिरुपती, गाणगापूर इ. तीर्थयात्रेस आपण अवश्य जाऊन यावे यानेही पापक्षय होऊन समाधान लाभते. ४-११-७८

कोणतीही विद्या, कला यांचा उपयोग जीवनामध्ये पोषक ठरतो. इतर वेळी साधनाभ्यास चालू ठेवावा. ६-६-७९

ईशस्मरणपूर्वक साधनाभ्यास चालू असावा. ८-६-७९

श्रीमहाराजांचा नित्य येथे निवास आहे अशी आमची भावना अनुभवाने आहे, आपली ही असावी. २१-११-७९

प्रतिवार्षिक नवरात्र अवश्य केले पाहिजे. एखाद्या वेळी अडचण आली तरी नेहमी तशी परिस्थिती नसते. साधनाभ्यास नियमितपणे चालू ठेवावा. मनोविकार हळूहळू कमी होतील. प्रभूची प्रार्थना चालू ठेवावी. नित्य उपासनाक्रम पुस्तकात करुणात्रिपदी श्रीमहाराजांची आहे. उत्तम प्रार्थना आहे. रोज रात्री शांतचित्ताने सर्वांनी म्हणावी याने पूर्ण शांतीचा लाभ प्रभुकृपेने होईल. २२-२-८०

कोणतेही अनुष्ठान दीर्घकाल, निरंतर श्रद्धापूर्वक केले म्हणजे त्याचा गुण निश्चित येतो. व्यवहारातही प्रमोशनकरिता वाट पहावीच लागते. ईश्वर दयाळू, सर्वज्ञ, पूर्णशक्तीसंपन्न आहे. त्याच्याच कर्तृत्वावर भार टाकून यथाशक्ती सेवा करीत रहाणे एवढेच साधकाचे काम आहे. १२-५-८०

तेथे ईशकृपेने सर्व व्यवस्था होईल. काया, वाचा, मन व धन या साधनानी जेवढी सेवा होईल तेवढी करावी..... आपण निर्धाराने निघाल्यावर देव सर्व व्यवस्था करतात. ९-५-८१

आपणास पितृसेवा घडत आहे हे योग्य आहे. सत्पुत्राचे कर्तव्य आहे. त्यातून अवसर मिळाल्यास आपला नित्यधर्मही चालू ठेवण्यास हरकत नाही. आपदधर्माचे पालन यथाशक्ती करतात. 'श्रीपाद श्रीवल्लभवं सदैव' या स्तोत्राचे पठण प्रारब्ध क्षय करण्यास समर्थ आहे. ते नित्य चालू ठेवावे. प्रभूची प्रार्थना, नामस्मरण यथावसर करावे. चित्तास शांती मिळेल. ७-७-८७

सन्मति व असन्मति दोनच प्रकार बुद्धीचे होतील. जी बुद्धी महात्म्यांच्या चरित्र आदर्शामुळे, त्याचप्रमाणे व्यक्तिगत लाभाचा विशेष विचार न करता, आर्तजनांची आर्ती दूर करण्याचा प्रयत्न करते ती सन्मति समजावी. हीच पूर्व सुकृतानुसार ईश्वरदत्त ठरते. आणि जी स्वतःचा व्यक्तिगत लाभ, यशोलाभ इ. स्वार्थाकडेच लक्ष देऊन स्वतःचा मानलेला मोठेपणा मानणाऱ्यांच्याच उपयोगी पडणारी ती असन्मति ठरेल. हीच केवल कर्मानुसारिणी आहे. पण हेदेखिल आपल्या पदरात टाकलेले दक्ष ईश्वरदत्तच स्वकर्माचेच फळ आहे असा विचार करावा. एखाद्या योग्य कर्माकरता प्रयत्न करु इच्छिणारी बुद्धी स्वतःच्या पारमार्थिक कल्याणाकरता आहे का लोकांच्या बरे वाईट म्हणण्यावर अवलंबून आहे. हाही विचार ईश्वर प्रार्थनापूर्वक केला तर समाधान होऊ शकेल. ६-५-८८

संसारात/व्यवहारात समाधानी असणे चांगले पण परमार्थात शेवटपर्यंत असमाधान असावे. दिपकाला नाही का वाटले की आपण करतो ती गुरुंची सेवा कमीच आहे.

मनाची एकाग्रता साधण्यासाठी साधनेव्यतिरिक्तही ध्यानाचा अभ्यास चालू ठेवावा. आपल्या मनाची जास्तीत जास्त स्थिरता साधणे महत्त्वाचे आहे.

बैठकीला बसल्यावर निर्विचार मन करुन तटस्थपणे काय होते ते पहात बसणे एवढेच अपेक्षित आहे. पण ध्यानाचे तसे नाही. तिथे प्रयत्न हवा. आत्यंतिक तळमळ हवी. सद्गुरुकृपा असेल तर बैठकीत आत्मानात्म विचार आपोआप येतात. पण तसे न झाल्यास आपण आठवून तो तत्वविचार करण्यास हरकत नाही. आत्मानात्म विचार / आत्म चिंतनाचा अभ्यास वाढवावा.

ज्यांना झोप कमी करणे शक्य नसेल त्यांनी आपले इतर व्याप कमी करुन जास्तीजास्त वेळ साधनेला द्यावा. नवीन क्रियमाण कर्म घडू न देण्याची आपण जास्तीत जास्त काळजी घ्यावी.

औषध किती दिवस घ्यायचे हे आपण कोण ठरविणार? डॉक्टर सांगेपर्यंत घेत रहायचे. तसे साधनेचे आहे.

प्रयत्न करीत राहिले पाहिजे. विचारापेक्षा आचार प्रधान आहे. विचारांचे पर्यवसान आचारात झाले पाहिजे तरच त्याचे साफल्य आहे. ईश्वरसुद्धा योग्य आचार ठेवणाऱ्याला फल देणारा आहे. असे नसेल तर त्याला हुकुमशहा म्हणतील. ईश्वराचेच सर्व कर्तृत्व आहे. असा सिद्धान्त अर्जुनाला सांगितला गेला. तो कर्म सोडण्याकरिता नसून ईश्वरशक्तीवर पूर्ण विश्वास ठेवून निरंहकार बनून कर्म करीत रहाण्यासाठी आहे. यात आपण निमित्तमात्र आहोत, अशी वृत्ती बाळगून कर्म करण्याकरिताच आहे. यात निराशाही नाही आणि अहंकारामुळे अति उत्साहही नाही.

चित्ताची समता व निर्विकारताच आहे. स्वतःचेच विचाराधिक्य असण्यापेक्षा संतांचेच विचार उत्साहवर्धक, मार्गदर्शन करणारे व निराशा दूर करणारे ठरतील असे वाटते.

श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात - **सकळ तीर्थांचीये धुरे। जिथे का मातापितरे। तया सेवेसी कीर। शरीरे लोण कीजे।** या तपामुळेच पुंडलिकाचे भेटी परब्रह्म आले गा असे श्री नामदेवरायही सांगतात. इकडे लक्ष ठेवून कृतज्ञता व संयम साधावा. हे जाणूनच खरी चित्तशुद्धि होऊ शकेल. २०-१२-८८

लहान मुलांचे मन मोठे असते कारण ते निर्मल असते. शुद्ध असते. ध्रुव, मीराबाई यांचे बरोबर देव बोलत होते. त्यांना सर्व संकटकाळात सांभाळीत होते. याचे कारण त्यांचे मन शुद्ध, निर्मल मोठे होते. म्हणून ते महात्मे होते. याकरता दिगंबराचे भजन करणे, तो मंत्र वहीत लिहिणे हे रोज तुम्ही करता ही देवाची तुमच्यावर कृपा आहे. म्हणून मोठ्या माणसांनी लहान होण्याची इच्छा करावी. ''लहानपण देगा देवा....'' असे श्री तुकाराममहाराजांनी लहानपणंच देवाजवळ मागितले आहे. आपले मोठेपण विसरुन देवाचे भजन करणे, त्याला कधीही न विसरणे हे खरे लहानपण आहे.

आता उरलो उपकारापुरता ही सिद्ध जीवन्मुक्तांची भूमिका आहे. इतरांनी ''कोणाही जीवाचा न घडो मत्सर। वर्म हे सर्वेश्वर पूजनाचे।'' या करता प्रयत्नशील राहायचे आहे ईश प्रार्थनेने हे घडून येते. ६-९-९१

शुभेच्छा ही ज्ञानाची पहिली भूमिका आहे. ती ईशकृपेने आपणा सर्वास लाभली आहे. ईशस्मरणपूर्वक हळूहळू मार्ग क्रमण करीत पुढे जावयाचे आहे. ते पूर्णतेस पोचण्याकरिता नित्य ईश प्रार्थना तळमळीने करीत राहिले पाहिजे.

२८-१०-९१

कार्य हे व्यक्तीकडून होत असलेले दिसले तरी समष्टि बुद्धीच ग्राहकरुपाने सहाय्यकरुपाने कार्य यशस्वी करणारी आहे. तीच परमात्मस्वरुप आहे. तिच्या अंतर्गातच आपण आहोत याची जाणीव ठेवून समाष्टि बुद्धीशी एकरुपही होऊ शकणारी व्यष्टि बुद्धी, मनी धरावे ते ते होते..... प्रचीत येते असे श्री समर्थांनी सांगितल्याप्रमाणे ईशशक्तीचेच सर्व कर्तृत्व जाणूनं पूर्ण शांती मिळू शकते.

२७-१०-९२



प. पू. श्रीदत्तमहाराजांची शुद्धविचारदर्शक व चिंतनीय पत्रे

प. पू. श्रीदत्तमहाराजांची अनेक पत्रे वेगवेगळ्या प्रसंगातून अनेक साधक, भक्त याना लिहिलेली आहेत. तोही एक फार मोठा चिंतनीय व मार्गदर्शक ग्रंथ होईल. त्यासर्व पत्रातून त्यांचे ईशभक्तीच्या कोमल भावनेने भरून गेलेले शुद्ध अंतःकरण दिसत आहे. निरनिराळ्या प्रसंगातील काही पत्रे मुद्दाम वानगी दाखल दिली आहेत. पत्रांची निवडसुद्धा करणे कठीण आहे.

या पत्रात अमरापूर येथील मंडळीनी केलेल्या कामाचे कौतुक केलेले आहे. कामाची निकड व त्यावर उपायही सुचविलेला आहे. लवकरात लवकर काम पूर्ण व्हावे अशी इच्छाही व्यक्त केली आहे. कुठेही संदिग्धता नाहीं. मोकळे मन, देवाविषयी आदरभाव, प्रयत्न अशा सर्व गोष्टी यातून कळतात.

श्रीदत्त

श्रीवासुदेव निवास, पुणे ४ दि. २३।६।९३

श्रीमान रा. अमरापूर ग्रामपंचायत व्यवस्थापक श्री. बापुराव रावण याना,

सप्रेम सादर स्मरणपूर्वक निवेदन वि. क्षेम

अमरापूरचा जीर्णोद्धार सध्या चालू असून ते काम काही अंशतः पूर्ण होत असल्याचे श्री. लाटे यांचेकडून समजले. आपणा सर्व भाविक सज्जनांच्या सहकार्यानेच हे देवाचे कार्य पूर्ण होऊन ते श्रेय सर्वांना मिळणार आहे यात संशय नाही. तेथील एक महत्त्वाचे अवशिष्ट कार्य आपणच पूर्ण लक्ष देऊन करावयाचे आहे. ते असे. वडाच्या झाडाजवळची मोकळी जागा, जेथे आज बराच काळ अनधिकृत सायकल दुकाने आहेत त्या देवस्थानच्या जागेत चारी बाजूनी कंपाउंड घालून तेथे श्रीवासुदेवानंद अमरेश्वर धर्मशाळा असा एक मोठा बोर्ड लावल्यास चांगले होईल. कन्यागताचा मोठा उत्सव आपण सर्वांनी श्रद्धेने निधी जमवून उत्तम प्रकारे भक्तिभावाने केल्याचे ऐकून आपणा सर्वांना जेवढे धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच आहेत. त्याच निधीतून काही शिल्लक असल्यास हे कंपाऊंडचे महत्त्वाचे काम आपण सर्वांनी पुढाकार घेऊन केल्यास देवस्थानालाही ती भरीव मदत होत राहील असे वाटते. अथवा जिर्णोद्धार समितीकडून या बांधकामाबरोबरच हे कंपाऊंडचे काम होईल काय याचा विचार करून दोघांचे विचारे जे सोईचे होईल ते करावे. शक्य तितक्या लवकरात लवकर हे काम पूर्ण झाल्याचे वरील पत्यावर आम्हाला कळवावे म्हणजे समाधान वाटेल.

तसेच पूर्वविचार झाल्याप्रमाणे श्रीमान रत्नाप्पा कुंभार याना भेटून घाटाचेही कामाबद्दल ईश्वरस्मरणपूर्वक प्रयत्न करावा. ईश्वर प्रार्थनेने असाध्य गोष्टी साध्य होतात आणि वैयक्तिक शक्तीपेक्षा सामुदायिक शक्ति-जनता जनार्दनाची शक्तीच कार्यकारी ठरेल. याचाही विचार करून लवकर प्रयत्नास लागावे व कार्य पूर्ण झाल्याचे समाधान मिळावे.

ही प्रार्थना कळावे.

आपला प्रेमाश्रित

दत्तात्रेय धुंडिराज वाडीकर

नृसिंह वाडीकर, श्रीमद अमरेश्वर दत्तगुरूभक्त



वाडीच्या विश्वस्ताना लिहिलेल्या पत्रात त्यांच्या कार्याचा गौरव केला आहे. पुजाऱ्यांबद्दल आदरभाव, अग्नीहोत्रासारख्या कार्याची जरुरी, वैदिक शिक्षण देण्याकरता शिष्यवृत्या देणे, ही वाडी सारख्या क्षेत्राला शोभून दिसणारी पद्धत आहे असेही आवर्जून लिहीले आहे. श्री अमरेश्वरकडे आपणही लक्ष द्यावे अशी प्रार्थनापूर्वक केलेली विनंती. प. पू. श्रीगुळवणीमहाराजांनी केलेले सभामंडपाचे काम, त्याचा अर्पणविधी या विषयीही सरळ सुस्पष्ट मार्गदर्शन आहे.

श्रीदत्त

श्रीबासुदेवनिवास पुणे ४

श्रीमान माननीय अध्यक्ष, श्रीनृसिंहसरस्वती दत्त देवस्थान नरसोबावाडी यांचे सेवेसी

साष्टांग स्मरणपूर्वक विज्ञापना

श्रीदत्तप्रभूंचे कृपेने इकडील सर्व क्षेम. आपलेही कुशल श्री प्रभूजवळ प्रार्थित आहे --

आपल्या श्रीसंस्थानद्वारा अनेक धार्मिक व व्यावहारिक क्षेत्र किर्तीवर्धक कार्ये श्रीप्रभुकृपेने नित्य घडत असलेली पाहून समाधान वाटते. या अनुषंगाने प्रभुप्रेरणेने आणखी काही पूण्यकर्मे आपणाकडून घडून आल्यास ती प्रभूप्रितीला व आपल्या किर्तीला पोषक ठरतील अशी खात्री वाटून हे प्रार्थना पत्र प्रभूस्मरणपूर्वक लिहीत आहे याबद्दल आपण सर्व विश्वस्तांचेकडून विचार फलपर्यावसायी होईल अशी आशा आहे.

पूर्वी वाडीत श्रीजेरेस्वामी पूर्वाश्रमात कोरान्न भिक्षा मागून अग्निसेवा करीत होते हे आम्ही पाहिलेले आहे. अग्निनारायणाच्या कृपेने त्यांचे तपाचे फळ म्हणजे अनेक याग त्यांचेकडून झाले हेही प्रसिद्ध आहे. त्यांचेप्रमाणे धर्मश्रद्धाळू योग्य अग्निहोत्री श्री. दत्तप्रभुंचे पंढरीत, अग्निसेवा स्वपरकल्याणसाधक अशी करून रहावेत. त्यांची धार्मिक व व्यावहारिक सध्याच्या महॅगतेप्रमाणे योग्य ती खर्चाची व्यवस्था आपल्या विश्वस्त संस्थेकडून होत राहिल्यास सर्वांचे कल्याण ईशकृपेने साधणारे आहे.

आपल्या चातुर्मास याग कार्यक्रमपत्रिकेत ट्रस्टतर्फे तीन मजली भक्त निवासाचे बांधकामास सुरवात झाली असून इकडे सर्व सश्रद्धदात्यानी लक्ष देण्याचे आवाहन केले आहे ते योग्यच आहे. श्री काशिविश्वंभर प्रभूचे इच्छेने हेही काम पूर्ण होईल अशी खात्री आहे. गाणगापूरी जाताना चौसष्ट योगिनी अन्नपूर्णा यांचेवर वाडीच्या संरक्षणाची जबाबदारी सोपविलेली आहे. त्याप्रमाणे ५०० वर्षांवर काळ लोटला तरी त्याबद्दल कोणालाही चिंता करावी लागली नाही.

प. पू. श्रीगुळवणीमहाराजांनी आपली विश्वस्तांची अनुज्ञा मिळवून मंडप बांधून तो आपणास समर्पण केला त्यावेळी ५ लाखाच्या वर खर्च झाल्याचे समजले. त्याची काहीच जबाबदारी ट्रस्टवर पडलेली नसावी ही प्रभुकृपा आहे. सशस्त्र सात्विक वृत्तीची दैवी संपत्तीचे अधिकारी सज्जन आजही कमी नाहीत. त्यांचेकडून प्रभूप्रेरणेने भक्त निवासाप्रमाणे अमरेश्वर जीर्णोद्धाराचे काम पार पडले. तथापी गोवर्धन पर्वत श्रीगोपाळकृष्णानीच हात धरला असला तरी इतरही गोपालांनी आपआपल्या काठ्यांचा आधार त्याला देऊन समाधान मानले होते. त्याप्रमाणे इतर सज्जनांचेप्रमाणे आपल्या ट्रस्टचे यथोचित लक्ष श्रीअमरापूर जीर्णोद्धाराकडे दिले जावे अशी प्रार्थना पत्राने करीत आहे याचाही विचार केला जाईल अशी आशा आहे. अमरापूरीही वाडीप्रमाणे एक सेवाकेंद्र ईशच्छेने तयार झाल्यास तेथेही भक्तांचे सेवाकार्य ईशप्रेरणेने सुरू होऊन वाडीतील उत्तम विधिज्ञ सज्जनानाच इकडे लक्ष द्यावे लागेल. भक्तकाम-कल्पद्रुप प्रभुंचे कृपेने गुरूभक्तांची कामे होत राहिल्यास धर्म व अर्थ दोन्हीही पुरूषार्थ समृद्धी राहून तेही श्रेय ट्रस्टींच्या पदरात पडून पुढील ट्रस्टींना ते मार्गदर्शन होईल.

आज पाच पिढ्या आपल्या सर्व पूजकांच्या प्रेमाच्या आश्रयाने आमच्या वाडीत गेल्या आहेत. तीच प्रेमदृष्टी सर्व पूजकांची आमच्या घराण्यावर अखंड रहावी एवढीच श्रीप्रभूरचरणी प्रार्थना आहे. कळावे.

आपला प्रेमाश्रित

दत्तात्रेय धुंडिराज कवीश्वर



तिसरे पत्र वैयक्तिक आहे. दुःखाने त्रस्त झालेल्या मनाला तो हितोपदेश आहे. पुढे काय घडते व आपण कसे वागले पाहिजे याचे मार्गदर्शन फार सोप्या शब्दात केले आहे. अपरिहार्य घटनेवर विचार करण्यापेक्षा कर्तव्यपालन ईश्वरी स्मरणात करावे. ही नाती मुक्ती मिळेपर्यंत अतुट असतात असा सार्थ बोध करून मनाला दिलासा दिला आहे. अशी पत्रे ही मौल्यवान पत्रे आहेत. आपल्या अंतःकरणात प्रत्येकाने जपून ठेवावी. प्रसंगी गडबडून जाऊ नये, प्रयत्न सोडू नये.

शिवाय अशी पत्रे नेहमीच लिहिली जातात असेही नाही म्हणून हे पत्र घरात प. पू. श्रीदत्तमहाराजांनी मुद्दाम सर्वांना वाचावयास दिले होते.

श्रीदत्त २३।३।९३

सप्रेम सादर स्मरण निवेदन

चि. शरदरावांच्या पत्राबरोबर आपलेही पत्र मिळाले. आपल्या मधे मधे होणाऱ्या अवस्थतेबद्दल चि.सौ. आशाताईची काळजी फोनवरून समजली. श्री. डॉ. आनंद यानीही स्वतःचे दुःख आवरून आमच्या प्रकृतीची, औषधाची चौकशी करून फोनवरून मार्गदर्शन केल्याचेही समजले. त्यांची ही आत्मीयता प्रथमपासूनच आहे. डॉक्टरांच्या औषधापेक्षा विशुद्ध आत्मीयतेचे समाधान चिरस्थायी असते. त्यांचे एक विशुद्ध प्रेमछत्र नाहीसे झाल्याने त्यांनाही दुःख होणे स्वाभाविक आहे. पण नित्य पेशंटच्या जवळ राहून त्यांचे दुःख कमी करण्याच्या त्यांच्या व्यवसायाने त्यांचा काळ जात असल्याने तेवढाच दुःखाचा विसर पडू शकतो. आपलाही कर्मयोग विद्यार्थ्यांची मने सुधारणे, त्यांचेवर चांगले संस्कार घडवणे हाच अखंड चालू आहे तो पुढेही चालू राहीलच. विशेषतः आपण ईशदत्त मातृभावना ठेवून हा कर्मयोग आचरणात आणीत असल्याने ईश्वर आज्ञेचे पालन केल्याचे श्रेय आपणास निसंशय मिळत राहणारच आहे. त्यानेच चित्तशुद्धी मिळणारी आहे.

''गृहेषु अतिथी द्वयेत'' घरामध्ये पाहुण्याप्रमाणे रहावे असे संत महात्मे, शास्त्रज्ञ सांगतात ते योग्य आहे. यामुळे अनायसे निरअंहकारवृत्ती, मानापमानाकडे दुर्लक्ष, स्पर्धा इत्यादी दोष कमी होत जाऊन सामाजिक कार्यही शुद्धबुद्धीने अहेतुक साधते. येथे मी एक अतिथी आहे. माझे हे घर सोडून केव्हातरी दुसऱ्या घरी (देहात) जायचे आहे या भावनेने, अभ्यासाने, ममता आसक्तिरहित कर्म होऊ शकते.

'अनित्यपम सुखं लोक' या श्लोकावरील श्रीज्ञानराजांचे विवेचन मननीय वाटले. फक्त या घरातून (देहातून) बाहेर पडताना अनायसाने बाहेर जावयाचे ही श्री. दादांची विवेकपूर्ण इच्छा देवाने पूर्ण केली हे भाग्य आहे. स्वपरदेहसबंध अनेक

जन्मात आलेले असून तो ईशकृपेने आत्मसाक्षात्कार होईपर्यंत येत राहणारच. तो त्रेपन्नवर्षाचा मर्यादित नाही. अहंता, ममता यामुळे तसे वाटते. घरात सर्वच आपल्या पूर्वकर्माप्रमाणे अतिथी म्हणून जमलेले असतात. स्वामी फक्त विश्व निर्माणकरता परमात्माच आहे. म्हणून भरताप्रमाणे निमर्म निरहंकार होऊन संसार (राज्य) करावा. दुर्योधनाप्रमाणे करू नये हे शिकविणेकरता महर्षींनी रामायण, महाभारताची रचना केली. टी. व्ही. वर महाभारत दाखवितात अर्थ सांगतात ''कथा है पुरुषार्थकी है स्वार्थकी परमार्थकी'' हे सांगून पुढे दाखवितात हेच खरे. ज्याच्या त्याच्या पूर्व वासनेप्रमाणे महर्षींचे सांगणे त्याला कळून येणारे आहे.

कोणाचेही शब्द हे ज्ञापक - ज्ञानकरून देणारे समजावून सांगणारेच असतात. ते कारक नसतात. कोणाकडून त्याप्रमाणे करवून घेऊ शकत नाहीत. ती शक्ति फक्त पूर्वसुकृतानुसार होणाऱ्या ईश्वराच्या प्रेरणेतच असते. त्या करता ''किंबहुना सर्व सुखी पूर्ण होऊनी तिन्ही लोकी भजिजो आदि पुरुषी अखंडित'' ही ज्ञानराजांची मागणी आहे. आपण पूर्ण विवेकी श्रवण मनन करणाऱ्या आहात. 'ईश्वराची, सद्गुरूंची आपणावर पूर्ण कृपा आहे.

सत्परिवार आपण पूर्वसुकृताने मिळविलेला आहे. इकडे लक्ष देऊन अपरिहार्य घटना विसरून जाऊन प्राप्त अंगीकृत कार्याकडे लक्ष द्यावे. श्रीगुरूमहाराज आपले चित्त तसे बनवोत अशी प्रार्थना करीत आहे. कळावे,

आपला



गंगा सिंधु सेवू गेली । पावताची समुद्र जाली ।
तेवी भक्ता — दिधली । निजपदाची

ज्ञाने १८/७१

निबंधातील विचार दर्शन

प. पू. श्रीदत्तमहाराजांनी आपल्या शालेय जीवनात साधारण इयत्ता ६वी ७वीत असताना काही विषयावरील निबंध लिहिलेले पाहण्यात आले. त्यातील काही विचार. त्यावयात ही वैचारिक उंची दाखवितात त्याची थोडी झलक.

प. पू. श्रीदत्तमहाराजांनी आजतागायत विद्येची सेवा केली. अंत:करणाने मृदु राहिले. विद्या विनयेन शोभते हे तर अंगी मुरले आहे. ज्ञानाची खोली अमाप आहे. प्रकांड पंडीत असूनही शालीनता म्हणजेच प. पू. श्रीदत्तमहाराज असेच समीकरण आहे. त्यावयात ज्ञानाविषयी केलेले विचार त्यांच्या जीवनात प्रत्यक्ष उमटलेले आपण पहात आहो.

विद्या

विद्या या विषयावर लिहिताना त्यांचे विचार आजही मननीय आहेत.

१) वर्तमान पत्रे वाचल्याने पुष्कळ ज्ञान होते अशी कल्पना असते. मोठाली पुस्तके वाचण्यापेक्षा त्याचे सार ज्यात आहे अशी मासिके, पुस्तके वाचावी असे पुष्कळांना वाटते. माहिती मिळेल पण माहिती व ज्ञान यात फरक आहे. ज्ञान मिळवायचे असेल तर मूळापर्यंत जाऊन मिळविले पाहिजे तर त्यात सखोलता येते.

२) वर्तमानपत्रात माहिती असली तरी त्यांचे लक्ष आपला खप कसा वाढेल या कडे असते. त्यामुळे निखळ ज्ञानाची अपेक्षा त्यातून पुरी होऊ शकणार नाही.

३) गरिबांना विद्या शिकण्याची इच्छा असते पण आर्थिक सामर्थ्य नसते. त्याना ही विद्या मिळावी म्हणून श्रीमंतानी मनापासून मदत केली पाहिजे तरच देशाचे भविष्य उज्वल होईल.

४) विद्वान किंवा शिकलेल्याना गर्व होतो. ते आपणास इतरांपासून वेगळे समजू लागतात. इतरांना तुच्छ लेखू लागतात. खरे पाहता विद्येने मन मृदू व खऱ्या अर्थाने सुशिक्षित झाले पाहिजे पण तसे होत नाही.

५) विद्या स्वभाषेतून शिकावी ती जास्त फलदायी होते. परभाषेवर आसक्ती ठेवून ती शिकू नये.

६) स्वभाषेचा उपहास करु नये किंवा त्याची लाज बाळगू नये.

७) निबंधाच्या शेवटी माझ्या हातून निरंतर विद्येची सेवा घडावी अशी श्रीगजाननाच्या चरणी प्रार्थना केली आहे.

❀ ❀ ❀

संतसेवा

या निबंधात संत अंतरंगाने कसे आहेत हे जाणून घ्यावे, सर्वच ढोंगी असतात असे मानू नये. पैसा जीवनावश्यक असला तरी खरे सुख पैशावर अवलंबून नाही. सुखापेक्षाही संतसेवेत कल्याण आहे हे त्यावेळचे लहान वयातील विचार व त्या प्रमाणे आचार आजही उद्‌बोधक आहे.

या विषयावर लेखन करताना संत या शब्दाची व्याख्या खूप चांगली केली आहे. संत म्हणजे सहा जे कामक्रोधादी षडरिपु त्याचा अंत करणारे ते संत. संत सेवेने कल्याण होते. परंतु जगात एकादा फसविणारा साधू निघाला तरी खऱ्यालाही त्रास होतो. ''गव्हा बरोबर किडा रगडला'' अशी स्थिती होते. संतांची सेवा करणाऱ्या लोकांना समाज हसतो. कारण हा मनुष्य गरिब असतो. नोकरी करतोच असे नाही. पैसा नाही तेव्हा हा असुखी आहे असे समाजाला वाटते. पैसा जीवनाला लागतो हे खरे पण त्यावरुनच सुखाची किंमत ठरवितात. संतसेवेने देवाची प्रसन्नता त्याला लाभते हे लोक विसरतात. देवाची प्रसन्नता लाभल्यावर माणसाला प्रसन्नता लाभणार नाही का? संत हे अत्यंत दयाळू व अपकाऱ्यावर उपकार करणारे असतात. संतांचे मोल आपण जाणत नाही. सामान्य माणसे अंतरंगाकडे बघत नाहीत. बाह्यरंगाकडे बघून मत ठरवितात. आपण स्वतः संताचे अंतरंग बघून आपल्याला चांगले वाटेल त्याची सेवा जरुर करावी.

संताची अवज्ञा देवाला सहन होत नाही. कलीला सुद्धा बांधून टाकले असा परिक्षित राजा. ज्याला महाभागवत अशी पदवी ऋषींनी दिली होती. अशा पारिक्षित राजालासुद्धा शमिक ऋषींची अवज्ञा करताच सात दिवसातच मरण आले. संतांची अवज्ञा कोणीही करु नये. संतांची सेवा अवश्य करावी. मला तशी बुद्धी सदैव असावी व सेवा सदैव घडावी ही प्रार्थना श्रीमहाराज निबंधाचे शेवटी करतात.



देशाटन

''केल्याने देशाटन पंडित मैत्री सभेत संचार'' या उक्तीप्रमाणे देशाटन केल्याने मोठ्या विद्वान लोकांची मैत्री होते. प्रथम जग फिरुन येणारा अनुभव हा वाचून येणाऱ्या अनुभवापेक्षा किती तरी जीवंत असतो. ज्ञानकक्षा विस्तारते. त्याला एक उदाहरण प. पू. श्रीदत्तमहाराजांनी दिले आहे. ते फार उद्‌बोधक वाटले. देशाटनाने बुद्धी कशी विस्तारीत होते त्याचे उदाहरण देताना ते लिहीतात की एखादा तेलाचा थेंब पाण्यावर पडला तर तो विस्तारीत होते. त्याप्रमाणे देशाटन करणाऱ्या माणसाची बुद्धी प्रसृत होते. परंतु तुपाचा थेंब पाण्यावर पडला तर तो आकुंचित होतो त्याप्रमाणे देशाटन नकरणाऱ्या माणसाची बुद्धी संकुचित होते. राजदरबारी सुद्धा प्रवेश या

देशाटनाने मिळू शकतो, निरनिराळ्या देशांतील कला, चाली, संस्कृती याची जाणीव होते. परिस्थिती कळते. ⁂ ⁂ ⁂

धन

आपल्या निबंधात श्रीमहाराजानी एक सुभाषित घातले आहे. त्यात मला द्रव्य मिळो असेही म्हटलेले नाही. मीचा अभाव या प्रार्थनेत आहे. प. पू. श्रीदत्तमहाराज आज जे उत्तुंग अशा मनाच्या अवस्थेत आहेत त्याचे मूळ त्यांच्या बाळपणातील संस्कारात, विचारात उमटलेले आहे. म्हणून या निबंधाचा उपयोग सर्वांना उत्तम मानसिक अवस्था राखण्याकरता व्हावा या हेतूने हे त्याचे शालेय जीवनातील विचार दर्शन केलेले आहे.

धन या विषयावर विचार प्रगट क़रीत असताना एका सुभाषिताचा उपयोग करुन त्यांनी पैशाचे महत्व सांगितले आहे.

वयोवृद्ध स्तपावृद्धा ज्ञानवृद्धा बहुश्रुता:
इत्येते धन वृद्धस्थ द्वारे तिष्ठन्ति किंकर ॥

वयाने वृद्ध झालेले, तपस्वी, ज्ञानी. पुष्कळ शास्त्रे पुराणे ज्यांनी वाचले आहेत असे सर्व लोक केवळ धनिकांच्या द्वारामधे रखडत पडलेले असतात. असा संपत्तीचा प्रभाव आहे.

धनाने पुष्कळ गोष्टी साधता येतात. परमार्थही साधता येतो. परंतु द्रव्य गेले की त्या माणसाला कोणीही विचारीत नाही ही एक मोठी शोचनीय स्थिती द्रव्यहिनाला येत असते. श्रीमंताला संपत्तीचा गर्व येतो. तो दुसऱ्याशी वाईट वागतो. पैसा योग्य ठिकाणी खर्च झाला पाहिजे. दान धर्मात त्याचा व्यय करावा. श्री ज्ञानदेवानी ''संपत्ती व दया'' या दोन्ही गोष्टी एकत्र पाहशील त्या ठिकाणी माझी विभुती आहे असे समज असे विभुती योग सांगताना म्हटले आहे. संपत्ती असेल तर दातृत्व हवे असे प. पू. श्रीदत्तमहाराजांनी या निबंधात पुनः पुन्हा लिहिले आहे. विशेष महत्त्वाच्या गोष्टीकडे त्यांनी लक्ष वेधून घेतले आहे की पैसा सन्मार्गाने मिळवावा. वाईट मार्गाने मिळविलेला पैसा टिकत नाही. कोणत्यातरी मार्गाने ते धन निघून जाते. कृपणता नसावी. पुढील जन्मी अश्या गुणांनी सर्व वाईट फळे भोगावीच लागतात हा कर्मसिद्धान्त आहे. अती कृपणता अन्नान्नदशा आणते. द्रव्याचा उपयोग केवळ सुखोपभोगाकरता करु नये. राघोबादादा व आनंदीबाई यांचेही उदाहरण त्यानी या निबंधात दिले आहे. शेवटची प्रार्थना या निबंधात अगदी वेगळी आहे. ती आपल्या मनात प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या निर्लोभ वृत्तीचा ढसा उमटविते.

द्रव्याचा सत्कर्माकडेच व्यय होवो व आमचे हे राष्ट्र उदयाला येवो अशी ईश्वराजवळ प्रार्थना करतो.



प्रश्न काव्यातून! आणि उत्तरही काव्यातून !!

हा एक आगळावेगळा प्रसंग आहे. प. पू. श्रीदत्तमहाराजांचे कनिष्ठ चिरंजीव श्री. अजित हे पुण्याहून मुंबईला रेल्वेने जात होते. रेल्वेमध्ये त्यांना अचानक काव्यपंक्तीं स्फुरू लागल्या. त्यांच्या मानसिक चिंतनाने काव्याचा आधार घेतला आणि त्या मनःस्थितीचे प्रतिबिंब काव्यात प्रगटले. हा काव्य स्फुरण्याचा अजितचा पहिलाच अनुभव. स्फुरलेले काव्य रेल्वेतच टिपून ठेवले आणि मुंबईला आल्यावर आपल्या भगिनी सौ. सुलभाताई तांबोळीना दाखविले. त्यांनी ते प. पू. श्रीदत्तमहाराजांना पाठवून दिले.

या काव्याला प. पू. श्रीदत्तमहाराजांनी काव्यातूनच उत्तर दिले. ते काव्य 'लीला समस्त अजित प्रभुराजयाची' या शिर्षकाने वासुदेवनिवासाच्या विजया दशमी १९८९ च्या अंकात प्रसिद्ध होते. चि. अजितची ही कविता १९८६ मधील आहे. त्याच्या चिंतनशील मनाची विमनस्क अवस्था त्याला चैतन्याचे स्फुलिंग फुलवून श्रीमहाराजानी जबरदस्त वैचारिक अवाका निर्माण केला आहे. कित्येकवेळा विमनस्क होत असलेल्या आपल्या मनाच्या अवस्थेला हे मार्गदर्शक ठरलेले आहे. प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या गुणांचा पार लागणे कठीण आहे, त्याची ही अल्प झलक!

संभ्रम

आक्रंदतो मी का असा
उमजेना माझेच मला
या तरूभूमीचा भार जणू
माझ्याच एकट्या शिरी आला ॥१॥

मळलेली वाट जपताना
कुणी दिसे कंटाळलेला
परी या वाटेवरीच असे
सुखदुःखाच्या शृंखला ॥२॥

हीच वाट पुसायची
असा निर्बंध आलेला
परी तो नसेची आलेला
तो तर लादलेला ॥३॥

लीला समस्त अजित प्रभुराजयाची!

कोणी सुयत्नरत सज्जन देवभक्त
सौख्यात जीवन सदोदित कंठतात
कोणीही कास धरि संभ्रम मालिकेची
लीला समस्त अजित प्रभुराजयाची ॥१॥

कोठे सदैव विपुलान्न जले प्रशान्ति
कोठे सदैव तदलाभ भरे अशान्ति
ऐशी दशा जगि दिसे नियतिक्रमाची
लीला समस्त अजित प्रभुराजयाची ॥२॥

की धर्ममार्ग बरवा जगदीश मान्य
की अर्थमार्ग बरवा व्यवहार मान्य
ऐसी अभागि जनपद्धति संशयाची
लीला समस्त अजित प्रभुराजयाची ॥३॥

अतिक्रमण करण्याने
वाव मिळतो विंवचनेला
ह्यातून मग कुणी मुकती
चैतन्यशील आनंदाला ॥४॥

मानतो मी चौकटी
आवश्यक जीवनाला
तरी का बरे त्यानी जखडावे
मनुष्य स्वभावाला ॥५॥

चैतन्य मी, सृजन मी
हा योग मला गवसला
परी जन्मसिद्ध हक्क हा
कुणी माझा हिरावला ॥६॥

निर्मम चैतन्य निसर्गातील
सळसळवी माणसाला
परी तो अभागी नसे
तितुकाच तृषार्तलेला ॥७॥

हे असेच चालायचे समजून
तडजोडीचा प्रोत आला
परंतु जिथे मात्र मी
असे उगाच गमलेला ॥८॥

मज काय हवे वदताना
मी बराच अडलेला
हेचि असे का योग्य
हाच संभ्रम पडलेला ॥९॥

खरंच सांगतो मी
काहीच कसे कळेना मला
दाखविली का कुणी वाट
नेणती या पांथस्थाला ॥१०॥

चि. अजित कवीश्वर

का हे सुधर्मनिरतास हि दृश्यदुःख
कां हे अधर्मनिरतासचि दृश्यसौख्य
सिद्धान्तरीति विलसे जनसंभ्रमाची
लीला समस्त अजित प्रभुराजयाची ॥४॥

मातापितास चिरपुत्रवियोग दुःख ।
बालास अल्पवयि मातृवियोगदुःख ॥
कोणास शक्ति जगि दुःख निवारणाची ।
लीला समस्त अजित प्रभुराजयाची ॥५॥

कोणी नियामक म्हणोनी जगात मान्य ।
कोणा नियम्य म्हणूनी अति हीन दीन ॥
ऐसी नियम्यनियति कधी जावयाची ।
लीला समस्त अजित प्रभुराजयाची ॥६॥

गुण तेचि दोष दिसती जगि ती असूया ।
नाहीं जिला म्हणुनि तीच त्रिमूर्तिमाता ॥
झाली जगी सततकीर्तिमयी हि साची ।
लीला समस्त अजित प्रभुराजयाची ॥७॥

सत्कर्मशील दमशील सुदानशील
ईशानुरक्त गुरूभक्त परोपरकारी ॥
पांथस्थ धर्मरत संभ्रममुक्त तोचि ।
लीला समस्त अजित प्रभुराजयाची ॥८॥

लीला समस्त अजित प्रभुराजयाची ।
लीला अमोघचि तया जगदीश्वराची ॥
लीला सुमंगला हितैषि जनार्दनाची ।
लीलानु चिंतन करी सुखि नित्य तोचि ॥९॥

प. पू. श्रीदत्तमहाराज

परिवार

प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या कृपाछत्राखाली असलेला परिवार खूपच मोठा आहे. परंतु कुटुंब म्हणून विचार करता त्यांना तीन मुलगे व तीन मुली आहेत. त्याचा अल्प परिचय.



हृदयी धरा हा बोध खरा

१९९५ च्या दशहराच्या प्रारंभी एका संध्या समयी प. पू. श्रीदत्तमहाराजांनी स्वतः दोन भजने म्हणून दाखविली. तो संध्यासमय, त्यांचे ते तळमळीने आतून येणारे भक्तीस्वर व अर्थपूर्ण अभंग हा प्रसंगच अविस्मरणीय यातील बोध मनात धरूया.



ऐश्वर्य योग

१९५५ साल उजाडल्यानंतर ती.सौ. आईसाहेबांच्या जीवनातील हा चैतन्य सौहळा संपन्न झाला आहे. चरित्राच्या समारोपाकडे वळत असताना या शांती सोहळ्याच्या निमित्ताने त्यांनी प्रकट केलेले आपले मनोगत ''ही बोधवाक्ये'' समईतील ज्योती प्रमाणे या चरित्राला शोभा देत आहेत. नंदादीपाप्रमाणे ती अखंड तेवत राहणार आहेत.



करवीरपीठाच्या शंकराचार्यांकडून गौरव

प. पू. श्रीदत्तमहाराजाना श्री शांकरपीठाबद्दल अतीव आदर त्यांच्याकडून पुनः एकदा त्यांच्या अखंड चाललेल्या लोकसेवेबद्दल पुरस्कार प्रदान करण्यासाठी आचार्यजी आश्रमात आले होते.

कृपेचा आधार वट



परिवार

ज्येष्ठ चिरंजीव **डॉ. अशोकराव** व त्यांच्या सहधर्मचारिणी **सौ. सवितावहिनी.** श्री. अशोकराव हे डॉक्टर असले तरी आज घरातील देवधर्म, कुळधर्म, कुळाचार तेच सांभाळतात. देवाची पुजा अर्चा, पाठ पठण, गुरूचरित्र वाचन, जप यात सकाळचा सारा वेळ लागतोच. देऊळगावराजा, बार्शी वगैर ठिकाणी ठराविक वेळेला प्रवचनासही जावे लागते. प. पू. श्रीमहाराजांचे पूर्वापार चालत आलेले अनेक कुलाचार आहेत. हे सर्व यथासांग पार पाडण्याची जबाबदारी आज प. पू. श्रीमहाराजानी डॉ. अशोकरावांकडे सोपविली आहे. सौ. सवितावहिनी घरातील मोठ्या सूनबाई. म्हणून स्वयंपाक, नेवैद्य, सासुसासऱ्यांची मनोभावे सेवा करण्याकडे यांचा कल आहे. त्याना चि. अमोद हा मुलगा व चि. रेणुका ही मुलगी आहे. चि. अमोदचे शिक्षण - इंजिनियरिंग डिप्लोमा होऊन पुढे शिकत आहे. चि. रेणुका १३वीला आहे. संगीत शिकत आहे.

श्री. अनिलराव हे प. पू. श्रीदत्तमहाराजांचे मधले चिरंजीव व त्यांच्या पत्नी **सौ. अनितावहिनी.** चि. अनिलराव हे हाउसिंग बोर्डात नोकरीला आहेत. सारी घरातील व घराबाहेरची कामे जातीने बघत असतात. कामावर जाण्यापूर्वी स्नानसंध्या, जप, आईवडिलांना नमस्कार केल्याशिवाय बाहेर पडत नाहीत. सौ. अनितावहिनी यांना पुणे नगरपालिकेच्या शाळेत शिक्षिकेची नोकरी आहे. सासरी आल्यावरच ती.सौ. आईसाहेब, प. पू. श्रीदत्तमहाराज यांच्या आशीर्वादाने पुढील शिक्षण घेऊन एम.ए. झाल्या आहेत. त्यांची प. पू. श्रीदत्तमहाराजांवर सासरे व गुरू म्हणून खूप श्रद्धा आहे. त्यांच्या आशीर्वादानेच आपण येथपर्यंत येऊन पोचलो अशी त्यांची खात्री आहे. सौ. सवितावहिनींचाही पाठिंबा चांगला आहे असे त्या म्हणतात.

श्री. अनिलरावाना दोन मुलगे. चि. अश्विन, चि. कपील व एक मुलगी चि. रमा. चि. अश्विन इंजिनियरिंग करीत आहे. चि. कपील शालान्त परिक्षेला बसला आहे, चि. रमा प्राथमिक शाळेत आहे.

श्री. अजितराव हे प. पू. श्रीदत्तमहाराजांचे धाकटे चिरंजीव. त्यांच्या पत्नी **सौ. जयश्रीवहिनी.** श्री. अजितराव धाकटे असल्यामुळे नित्याच्या कामांपेक्षा नैमित्तिक कामे यांच्याकडे बरीच असतात. त्यांचा इलेट्रॉनिक इंजिनियरिंग डिप्लोमा आहे. डॉयनोलॉक मायक्रोसिस्टिममधे अधिकारी म्हणून नोकरीला आहेत. प. पू. श्रीदत्तमहाराजांची वेगवेगळ्या विषयावरील प्रवचने 'भगवती प्रकाशन' काढून प्रकाशित करण्याचे महत्वाचे काम अंगावर घेऊन पार पाडीत आहेत. आवाजाची निसर्गदत्त देणगी आहे. पदे फार सुरेख चाली लावून म्हणतात. सौ. जयश्रीताई या बी.कॉम असून कॉम्प्युटरचे शिक्षण त्यांनी घेतले आहे. त्यांना एक मुलगी असून तिचे नाव ''गायत्री'' आहे. सर्वांशी मिळून मिसळून हसून खेळून धाकट्या बहिणीप्रमाणे जावांशी वागतात. चि. गायत्री पूर्वप्राथमिक शाळेत जाते आहे.

प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या ज्येष्ठ कन्या **सौ. सुमनताई**. त्यांचे यजमान **डॉ. यशवंतराव गुरूनाथ भातलवंडे**. डॉक्टरी व्यवसायातील यांचीही सातवी पिढी आहे. हे वैराग (बार्शी) येथे राहतात. स्वतःचे हॉस्पिटल आहे. सौ. सुमनताईची अशी निष्ठा आहे की ''कशास जावे दूर माझे इथेच पंढरपूर'' ती. सौ. आईसाहेब व प. पू. श्रीदत्तमहाराज हेच दैवते आहेत. डॉ.साहेब शांत, विचारी व प. पू. श्रीदत्तमहाराजांबद्दल निष्ठा बाळगणारे असे आहेत.

यांना तीन मुलगे व दोन मुली आहेत. डॉ. प्रमोद M.D. (Path) विरारला, डॉ. शिरीष M.D. वडिलांबरोबर काम पाहतात, धाकटा चि. किशोर टेक्सटाईल इंजिनियर महाडला, कन्या सौ. नीलाताई, यजमान डॉ. नगरकर M.D., दुसरी कन्या सौ. जया, यजमान श्री. रवी गद्रे आर्किटेक्ट पुणे.

सौ. सुलभाताई मधली कन्या व जावई **श्री. माधवराव तांबोळी.** सौ. सुलभाताईनी प. पू. श्रीदत्तमहाराजांबरोबर राहून खूप

सहवास घेतात. भागवत सप्ताह अनेक ऐकलेले आहेत. अनेक गाणी यांना पाठ येतात. श्री. माधवराव हे सचिवालयात निजी सचिव आहेत. अध्यात्मिक आवड व महाराजांचा गुरूपदेश उभयतानी घेतला आहे. पुण्याला, जालन्याला येणे जाणे सुरू असते. श्रीमहाराजांबरोबर खूप यात्रा केल्या आहेत. यांना दोन मुलगे व एक मुलगी.

मोठा मुलगा चि. मनोज हा टेक्सटाईल इंजिनियर असून मुंबईला नोकरीला. लग्न झाले असून एक मुलगी आहे. दुसरा मुलगा चि. सुरज हा बी.एसी. असून कॉम्पुटरचे वर्ग चालवितो. दर शनिवार, रवीवार पुण्याला येऊन प. पू. श्रीमहाराजांचा जास्तीत जास्त सहवास घेण्याचा प्रयत्न. अनेक ग्रंथ श्रीमहाराजांकडून समजावून घेतले आहेत. सध्या दासबोध वाचन चालू आहे. लहान वयात सत्संगाची आवड. मुलगी चि. रंजना विद्या विभूषीत असून भारत पेट्रोलियम मधे नोकरीला आहे. जावई श्री. अतुल वैद्य M.E. असून स्वतःचा व्यवसाय आहे. याना एक मुलगी आहे.

प. पू. श्रीदत्तमहाराजांची नंबर तीनची कन्या - **सौ. शैलाताई,** यजमान **श्री. अरूण रामचंद्र अडकर** इंजिनियर स्वतःचा बांधकामाचा व्यवसाय. दोन मुलगे चि. निरज M.B.B.S. (शेवटच्या वर्षात) २रा मुलगा चि. निहार इंजिनियरिंगचे २ रे वर्षाला.


असा हा सर्व परिवार सुशिक्षित मनमिळाऊ एकमेकांना संभाळून घेऊन राहणारा आहे. प. पू. श्रीदत्तहाराज व ती. सौ. आईसाहेब यांचे कृपाशीर्वादाखाली सर्व मंडळी आपला संसार आनंदाने करीत आहेत.

ह्या परिवाराचा अल्पसा परीचय दिल्यानंतर लक्षात आले की अभ्यासकाना प. पू. श्रीमहाराजांची जन्मकुंडली ज्योतिषशास्त्राच्या दृष्टीने येथे देणे उपयोगी होईल म्हणून ती देत आहोत. तसेच प. पू. श्रीमहाराजांची लग्नपत्रिका हाती आली. त्यावेळची कुमकुम पत्रिकेची पद्धत त्यातही संस्कृत काव्याने सुरवात हाही एक विशेष वाटतो.

श्रीगणेशाय नमः

नाम : **श्री दत्तात्रेय धुंडिराज कवीश्वर**

तारीख : २ मार्च १९१०
वार : बुधवार, सूर्योदय
जन्मसमय : (स्टॅ. टा.) क. ६ मि. २०
जन्मस्थलम् : श्रीक्षेत्र नृसिंहवाडी
अक्षांश : १६.४५ रेखांश ७४.५०
पल : ३.३६ वसईकर मोघेकृत पंचांगानुसारेण



सू. १०-१७-१४-५३ ल. १०-१९-५३-२९

श्रीमदभूपति शालिवाहन शके १८३१ सौम्य नामसंवत्सरे उत्तरायणें शिशिरऋतौ मांगल्य प्रदमासोत्तमे माघ मासे कृष्णपक्षे ६ तिथी घ. ३१ प. ११ परं ६ जन्मतिथौ सौम्य वासरे विशाखा नक्षत्रे घ. ४४ प. २३ परं विशाखा जन्मर्क्षे २ चरणे व्याघात् योगे घ. ४९ प. २२ परं व्याघात् जन्मयोगे तात्कालिके वणिज करणे तुळ राशिस्थिते चंद्रे व्याघ्रयोनी राक्षसगणे शुद्रवर्णे मानववर्गे मध्य भागयुंजायां वायूतत्व हंसके अंत्यनाडीस्थिते श्रीफणीश्वरचक्रे कुंभ संक्रातेर्गतांशाः १७-१४-५३ एवमादिपंचांग शुद्धावस्मिन्दिने श्रीमन्मार्तण्डमंडलोदयात् गतघट्यः ० पलानि १३ एतत्समये कुंभलग्ने ब्राह्मणज्ञातौ श्री. रा. रा. धुंडिराज वक्रतुंड कवीश्वर एषां भार्या अखण्ड सौ. सरस्वति धुंडिराज कवीश्वर कुक्षौ पुत्ररत्नमजीवन्त। अस्य तुळ राश्युपरि र. ह. आघाद्विरेण् इति नामानि। विशाखा नक्षप्रस्य द्वितीयचरणानुगतं 'तू' अक्षरोपरि नाम।। अथ धाताष्टकम् माघ मासः। ४-९-१४ तिथयः। गुरुवारः। शततारका नक्षत्रम्। ४ प्रहरः ३ चंद्रमा।। अस्य पूर्णकर्मानुसारेण विशोत्तरीमानतः गुरु महादशायां जन्म।। तस्याः प्रमाणं वर्षाणि १६

तत्र भुक्तवर्षादि

व.	म.	दि.	घ.	
४	०	२८	०	परं

जन्मतोग्रे भोग्यवर्षादि ११।११।२।० इति।।

वंशो विस्तारतां यातु. ।।श्रीरस्तु।।

शुभं भवतु ।।

॥ श्री गणेश ॥



श्रीमन्मंगलमूर्त्यखंडकृपया शाके खबाणाष्टभू — ।
युक्ते फाल्गुनमासि भार्गवदिने कृष्णा चतुर्थी तिथिः ॥
तस्यां ज्येष्ठ सुतस्य सत्परिणयो दत्ताभिधेयस्य वै ।
सुंदर्याख्यवधू स्तु पाठककुलोत्पन्ना सुभाग्यैषिणी ॥१॥

विज्ञप्ति स्तत्रभवान् सकुटुंबोऽवश्यमेत्य परिवारैः ।
समंलकरोतु मंगलविवाहकार्यं सदाशीर्भिः ॥२॥

सप्रेम विनंती विशेष

आमचे घरीं श्रीगणेशकृपेंकरून आमचे ज्येष्ठ चिरंजीव **वक्रतुंड** (दत्तात्रेय) याचा विवाह मिति फाल्गून वद्य ४ शके १८५० शुक्रवार ता. २९।३।२९ इ. रोजी दिवसा घ. २५ प. २८ (स्टँ. टा. ४।४५ वाजतां) निश्चित केला आहे. शरीरसंबंध वे. भगवान धोंडिबा पाठक बार्शीकर यांची कन्या सौभाग्य कांक्षिणी चि. **सुंदराताई** इजला वधू नेमस्त केली आहे. हे मंगलकार्य श्रीनरसिंहवाडी क्षेत्री श्रीदत्तचरणाजवळ होणार आहे. कार्य सिद्धीस नेण्यास श्रीसमर्थ आहेत. तरी आपण सकुटुंब सहपरिवार अगत्य येऊन कार्यसिद्धी करावी. आपण आल्यानें कार्यास विशेष शोभा येऊन आम्हांस आनंद होणार आहे. कळावें हे विनंती.

श्रीक्षेत्र नरसिंहवाडी — आपला
ता. ८।३।२९ — **धुंडीराज वक्रतुंड कवीश्वर**

सूचना - श्रीनरसिंहवाडीस येणेचे ते एस्. एम्. रेल्वेने व्हाया मिरज जयसिंगपूर स्टेशनहून यावें. मोटारीची सोय आहे.

नारायण जिन के हृदयमे

प. पू. श्रीदत्तमहाराजांना संगिताची विशेषतः भक्ती संगिताची फार आवड आहे. एकांतात आवडती गाणी ते गुणगुणत असतात. ती गाणी टेपही केली आहेत खरोखर जे नारायण स्वरुप आहेत तेच ''नारायण जिनके हृदयमे'' हे गाणे म्हणताना ऐकून देव होऊन देवाची पुजा असा प्रत्यय येतो.

नारायण जिनके हृदयमे
वो कुछ कर्म करे न करे रे ।।
सूरज के परकास भई अंदर
दिप की ज्योत जले न जले रे ।।
परिसमणी जिनके घर माही
दो धन संच करे न करेरे ।।
नाव मिली जिसको जल अंदर
बाहुसे नीर तरे न तरे रे ।।
ब्रम्हानंद रस जिनको जानी
कासी मे जाय मरे न मरे रे ।।
नारायण जिनके हृदयमें



त्यांना दरबारी कानडा याच रागातील भागवतातील गोपी गीत फार प्रिय आहे. भैरवीतील ''अवधुत चिंतनाची लागो मनास गोडी'' हे पद अतिशय प्रीय आहे.

न पडावा विसर

पहा ते पांडव अखंड वनवासी । परि त्या देवासी आठविती ॥१॥
प्रल्हादासी पिता करितो जाचणी । परि तो स्मरे मनी नारायण ॥२॥
सुदामा ब्राम्हण दरिद्रे पीडीला । नाही विसरला पांडुरंगा ॥३॥
तुका म्हणे तुझा न पडावा विसर । दुःखाचे डोंगर आले तरी ॥४॥

प. पू. श्रीदत्तमहाराजांची भक्तीकडे मनाची ओढ आहे. भक्तीमय अंतःकरण झालेले आहे. मृदूपणा भरुन राहिले आहे. करुणा त्रिपदी म्हणताना ते खूप गहीवरुन येतात. आपले मन भक्तीत कसे बुडून गेले पाहिजे. याची कल्पना त्यांची ही अवस्था बघून येत असते. देवाविषयी असलेले हे प्रेम, मनाला किती तृप्ती देत असेल, शांत करीत असेल, शीणभार हलका करीत असेल, शीतलता प्राप्त होत असेल याची कल्पना आपण तृषार्त होऊ तेव्हाच येईल. प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या मुखाने पवित्र झालेली असलेली गाणी मुखोग्दत करुया.

ऐश्वर्य योग

सौ. आईसाहेबांचा सहस्त्रचंद्रदर्शन शांती सोहळा

चैत्र महिना उजाडला व वसंतगौरीच्या उत्सवाचे दिवस सुरु झाले. चैत्र प्रतिपदेपासून तो वैशाखातील अक्षय तृतीयेपर्यंत हा गौरीचा म्हणजे पार्वतीमातेचा उत्सव सुरू होतो. देवी महिनाभर आपणाकडे माहेरपणासाठी आली आहे अशी या उत्सवामागे कल्पना आहे. वसंत पूजनही या दिवसात केले जाते. वसंत पूजन म्हणजे गुणी विद्वान लोकांचे पूजन. वसंतोत्सवाची कल्पनाच आनंददायी वाटते. यासर्व जुन्या परंपरा आहेत. चालू काळात त्याचा उपयोग तितक्या सहजपणे दिसत नसला तरी त्या प्रथा अजून पूर्णपणे नाहीशा झाल्या नाहीत.

वसंत म्हणजे नवीनता. नवपल्लवीत फळाफुलांनी सजलेली वनश्री. फळाफुलांची बरसात करणारा हा ऋतु. अशा या काळात आदिमाता पार्वतीप्रमाणे असणाऱ्या ती.सौ. आईसाहेबांचा गुरूवार दि. ११-५-१९९५ रोजी त्यांच्या मुलांनी, सुनांनी, आप्तेष्टांनी, भक्तानी केलेला **सहस्त्रचंद्रदर्शनशांतीचा सोहळा** अवर्णनीय झाला. हा एक आदिमातेचा उत्सव म्हणून गौरवास्पद ठरला. एक आगळे वेगळे आत्मपूजन झाले.

दाऊनी दोन पण । एकरसाचे आरोगण ।
करीत आहे मेहुण । अनादिजे अमृतानुभव २०।१

प्रकृती व पुरूष दिसायला दोन असले तरी मुळात एकच असलेले अनादि मेहुण आहे.

श्री. अशोकराव व सौ. सवितावहिनी यांचे हस्ते हा सोहळा व शांतीविधी प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या कृपाप्रसादात संपन्न झाला हेच परमभाग्य होय.

वास्तविक ती. सौ. आईसाहेब या उत्सवाला फारशा अनुकूल नव्हत्या. त्यांचे म्हणणे असे होते की प. पू. श्रीदत्तमहाराजांबरोबर अनेक शांतीत त्या होत्याच. आणखी वेगळेपणाने करायला नको. परंतु मुलांची इच्छा व प. पू. श्रीदत्तमहाराजांचा संकल्प यामुळे ती. सौ. आईसाहेबांनी अनुमती दिली. प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या चरित्राचा विचार करताना एक अलौकिकत्व आपणास सतत प्रत्ययास येते ते म्हणजे सात्विक अंतःकरण व विश्वाकार झालेले मन. त्यामुळे ''सत्यसंकल्पाचा दाता भगवान'' अशी येणारी प्रचिती. हे कार्य देवकार्य झाले.

सहस्त्रचंद्रदर्शनशांती विधीमधे तुलादान हाही एक विधी असतो. ती. सौ. आईसाहेबांची तुलादानविधी श्रीवासुदेवनिवासाच्या अंगणात औदुंबर वृक्षासमोर प. पू.

श्रीदत्तमहाराजांच्या उपस्थितीत संपन्न झाला. प. पू. श्रीगुरूमहाराज औदुंबरवृक्षापाशी हातात पळीभांडे घेऊन उभे आहेत आणि कौतुकाने शुभाशीर्वाद देत आहेत असे दृश्य मनःचक्षूसमोर तरळत होते.

तांदुळाने तुला झाली ते सर्व दान झाले. त्यादिवशी अन्नपूर्णाही प्रसन्न होती. अगदी नाही नाही म्हणता सहज ५०० पान झाले. ती.सौ. आईसाहेबांनी कित्येक सुवासिनींच्या खणपातळानी ओट्या भरल्या. कित्येकांना प्रेमाच्या शालीचे पांघरूण घातले. ती. सौ. आईसाहेबांच्या आनंदात सहभागी होण्यासाठी मुंबईकरानी हळदीकुंकवाच्या पुड्या आणल्या होत्या. सक्रांत संपली असली तरीही भगिनीनी ह्या प्रसादभेटीची लूट लुटली.

आश्रमात नेहमीप्रमाणे दुपारी स्त्रियांचे गुरवारचे भजन होते. त्याशिवाय श्री. अशोकराव कवीश्वरांचे प्रवचन होते. श्रीदत्तमहाराजांची परवानगी घेतली. ती. सौ. आईसाहेब व सौ. ताईमहाराज यांच्या गौरव समारंभाचा जोड कार्यक्रम गुरवार दि. ११-५-९५ ला आयोजित केला गेला. चि. अजितराव कवीश्वरानी आपल्या गोड सुरेल आवाजात श्रीशंकराचार्यांचें स्तोत्राने कार्यक्रमाची सुरवात केली. पहिले पुष्प डॉ. सौ. माधुरीताई यानी वाहिले. सौ. आईसाहेब, सौ. ताईमहाराज यांचे व्यक्तीचित्र शब्दरूप केले. सौ. आईसाहेबांची कन्या सौ. सुलभाताईनी सौ. आईसाहेबांवर गुलबर्ग्याच्या मीराताईने केलेले काव्य म्हणून दाखविले. कु. सुशीला मोडक यानी भक्तीभावाने प. पू. श्रीदत्तमहाराज, सौ. आईसाहेब, सौ. ताईमहाराज यांचेवर शब्दसुमनांची बरसात केली. खड्र्याच्या एक भगिनीने सौ. आईसाहेबांच्या लग्नसोहळ्यावर अधारित सुंदर काव्य केले होते. जणू तो प्रसंगच डोळ्यासमोर उभा राहिला. त्याला रागदारीत चाल लावून म्हटले गेले. छोटी मुले चुळबुळ करीत होती. त्यांच्या हस्ते श्रीमहाराजाना हार, सौ. आईसाहेब व सौ. ताईमहाराज यांना फुलांचा भला थोरला पण कलात्मक गुच्छ देण्यात आला. श्री. नीलाताईनी सौ. आईसाहेबांचे निरनिराळ्या प्रसंगी बोलल्या गेलेल्या साध्यासुध्या विचारातून ८० विचार मौक्तिके बनविली होती. ती वाहताना कधी गहीवर, कधी व्यवहार, कधी हासू तर कधी अश्रू येत होते. वेळ सरत होता पण भानावर कोणी नव्हते. त्याच भावनोत्कट अवस्थेत श्री. आशा धारप व सौ. वसुधा जोगळेकर यानी आपले हृदय रीते केले. ती. सौ. आईसाहेबांबरोबर सौ. ताईमहाराजांच्या तुलेचा हा अपूर्व योग श्रीदत्तमहाराजानी घडवून आणला त्यात फार मोठा अर्थ आहे. प. पू. श्रीदत्तमहाराज आपल्या छोट्या शुभाशीर्वादाच्या भाषणात म्हणाले की, मुलांनी आपल्या आईचा केलेला हा गुणगौरव आहे. अत्यंत प्रेमळ, कौटुंबिक प्रेमाने ओथंबलेला हा अवर्णनीय कार्यक्रमाचा शेवट श्रीज्ञानेश्वरांच्या पसायदानाने संपला.

ती. सौ. ताईमहाराजांची अबोलवृत्ती व सतत नामात राहण्याची वृत्ती भगवतीदेवीप्रमाणे त्यांच्या अंतरमनाची स्वरूपाकर होत असलेली स्थिती. यासर्व गोष्टींची पूर्ण जाणीव प. पू. श्रीदत्तमहाराज व ती. सौ. आईसाहेब दोघानाही असल्यामुळे ही वारूणीशांती मातापिता, गुरूदेव या सर्व नात्यांनी येथे करण्यात आली. ती.सौ. ताईमहाराजांचेही चिरंजीव या ठिकाणी येऊन त्यांच्याच हस्ते ही शांती झाली. पुढे भक्तीने व निस्वार्थ बुद्धीने त्यांच्याकडून जी कार्ये होणार आहेत त्याला लागणारी अतुलनीय अशी शक्तीं या शांतीने जणू वासुदेव निवास मधून प. पू. श्रीगुरूमहाराजांकडून त्यांना प्राप्त झाली असे सर्वांच्या मनाला वाटत होते. दोन देवकार्ये या वर्षात आश्रमात यथायोग्यपणे साजरी झाली आणि आश्रमवासी श्रीतुळजाभवानी या शांतीकार्याने प्रसन्न झाली.

दुसरे दिवशी म्हणजे शुक्रवार दि. १२-५-१९९५ ला पू. सौ. ताईमहाराजांचाही ५५ वा वाढता वाढदिवस तुलादानाने संपन्न झाला. त्यादिवशी श्रीआचार्यांची जयंतीही होती. त्यानिमित्ताने श्री. प्रकाशकरशास्त्रींचे किर्तन संध्याकाळी झाले.



आदिशक्तीचे कौतुक

ती. सौ. आईसाहेबांच्या सहस्त्रचंद्रदर्शनशांती सोहळ्याचे एक वेगळे कौतुक वाटते. मनात आलेल्या विचारांचे प्रगट चिंतन करते. श्रीज्ञानदेव या सर्व जगाच्या विलासाला चिदविलास म्हणतात. हे जग आदिशक्तीने निर्माण केले. आदिशक्तीचाच हा सर्व पसारा आहे. या सर्व जगाच्या मूळमायेचा म्हणजेच मातृत्वाचा हा गौरव असावा. जगन्मातेचा हा मुक्त सोहळा असावा. असे मनात येते. द्रौपदीच्या विशाल बुद्धीचे महाराज नेहमी कौतुक करतात. अश्वत्थामाला तिने क्षमा केली ही फार मोठी विशाल बुद्धी आहे. त्या विशाल बुद्धीची आठवण, गोकुळातील गोपींच्या शुद्ध भक्तीचे स्मरण, अनुसयामातेची असुया रहित बुद्धी, सीतामाईचा त्याग अशा स्त्री शक्तीच्या कितीतरी गोष्टी प. पू. श्रीदत्तमहाराजांचे मनी आहेत. त्या विशाल बुद्धीचा गौरव या रुपाने प. पू. श्रीदत्तमहाराजांनी केला असावा. त्यामुळे हा सोहळा बघताना नेत्राला रम्य, बुद्धीला तृप्त व मनाला प्रसन्न वाटत होते. वाणी सुद्धा मूक झाली व मग घडले ते दोघांना वंदन, त्रिवार वंदन.



द्वैतातून अद्वैताकडे जाणाऱ्या आनंदयात्रीना वंदन



ती. सौ. आईसाहेबांचे रेखाचित्र त्यांच्याच वेळोवेळी झालेल्या संवादातून शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. प. पू. श्रीदत्तमहाराज व ती. सौ. आईसाहेब यांचा विश्वव्यापी संसार आहे. एक साध्या गृहिणी परंतु प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या थोरपणाला जाणून एका वेगळ्या आत्मीयतेने त्यांना जपणारे त्यांचे मन या संवादातून दिसत आहे.

परमार्थाचा आधार असलेले हे संसारचित्र वाचताना कोणाचेही मन हेलावून जाते. संसार सारीच करतात. पण हा संसार ईश्वरी कृपेचा आहे. साधुसंतांच्या आशीर्वादाचा आहे व त्याचा आधार हजारो लोकांना आहे.

आज ती. सौ. आईसाहेबांच्या वयाला ८० वर्षे होत आहेत. त्या उभयतांच्या पण अद्वैत असणाऱ्या या अनादि शिवपार्वतीच्या चरणी भक्तिभावपूर्वक त्यांचीच शब्दसुमने त्यांना अर्पण करीत आहो.

१) मी एक साधी गृहिणी आहे

२) यांच्या ज्ञानाची सर मला नाही.

३) परमार्थाचा अर्थ 'यांच्या सहवासात असणे' येवढेच मला समजते.

४) त्यांच्या सत्कर्मात माझा उद्धार होईल याची खात्री वाटते.

५) धुणीभांडी आदी संसाराचे कष्ट करण्यात त्रास वाटला नाही.

६) भाग्य म्हणजे काय ते मी कवीश्वराच्या घरात पूर्ण उपभोगले आहे.

७) देवाला प्रदक्षिणा आमच्या घराण्याचा मोठा वारसा आहे.

८) नदीवरून घागर भरून पाणी आणण्यात फार छान वाटे. कृष्णामाईच आपल्याबरोबर येते आहे असे वाटे.

९) यांचा अबोल व विवेकी स्वभाव आणि माझा बोलका स्वभाव दोन्ही समान होऊन जाते.

१०) सुना मुलांनी भरलेल्या घरात माझ्या वाट्याला प्रेमच येते.

११) देवी रेणुका माता आईसारखी सर्वांना सांभाळते.

१२) श्री दत्तुबाळ सर्व मनीषा पुऱ्या करतो.

१३) शरीरकष्ट केल्याने वार्धक्यात प्रकृति निकोप राहते असे यांचे सांगणे असते.

१४) मामंजी सारे देवाचे मानावे असे सांगत त्याप्रमाणे मनात विचार करण्याची सवय केली.

१५) मुलगी सासरी जाऊ लागली की वाईट वाटे. मग हे म्हणत, "वाईट वाटून काय उपयोग? ती आपल्याजवळ राहिली तर चालेल का?" समजूत पटे.

१६) प. पू. श्रीगुळवणीमहाराज रोज सकाळी घरी येत असत. त्यांच्या दर्शनातच माझा सारा परमार्थ होई.

१७) सकाळी घाई असे पण महाराज मांडलेल्या पाटावर बसले की मन आनंदीत होई. देवच येऊन बसले असे वाटे.

१८) प. पू. श्रीगुळवणीमहाराज म्हणत तुझी घाई गर्दी आहे चालू दे काम. पण मुखाने नाम घे.

१९) प. पू. श्रीगुळवणीमहाराज सांगत त्यांचे नीट करतेस ना त्यात तुझी पूजाअर्चा सर्व आले.

२०) प. पू. श्रीगुळवणीमहाराज म्हणत 'अग लक्ष्मी, त्यांचे जवळ ज्ञान आहे म्हणून वैराग्य आहे हे समजले पाहिजे तुला'

२१) प. पू. श्रीगुळवणीमहाराज म्हणत खाण्यापिण्याचे हाल करू नकोस म्हणजे तब्येत ठीक राहते. आनंदात असावे. कुरकुर स्वभावात असू नये.

२२) माझी मुलगी गेली तेव्हा वडिलांप्रमाणे माझे सांत्वन गुळवणीमहाराजांनी केले व म्हणाले श्रीदत्तमहाराज येथे नसले तरी मी स्वतः तिचे सर्व करतो आहे ना! काळजी करू नकोस.

२३) दुःख होते पण मन आवरले पाहिजे.

२४) सुनबाई तुला पसंत पडली ना? तुला वागवून घ्यायचे आहे. आईच्या प्रेमाने सर्वांशीच वागावे.

२५) लोक ह्यांच्या सरळ स्वभावाचा फायदा घेत त्यामुळे मला राग येई पण हे म्हणत, ''सरळ स्वभाव देवाला आवडतो देवाला काय आवडते ते पहावे.''

२६) प. पू. श्रीगुळवणीमहाराज म्हणत तुला आवडेल असा शालु घे त्यात काटकसर नको. विचारीत असत, ''इतरांप्रमाणे ते हौशी आवडी पुरवीत नाहीत असे वाटते का तुला.'' पुढे म्हणत अग कसले शालु शेले घेऊन बसलीस? केवढी विद्वत्ता, ज्ञान, नम्रता त्यांचे ठिकाणी आहे याच्यापेक्षा तुला काय पाहिजे?

२७) सतत परगावी जाणे असे. काळजी वाटे मनाला. पण सतत यांचे सांगणे. खरे रक्षण करणारा देव असतो. असे मला सोपे सांगत पण प्रत्यक्ष करायला अवघड पडे.

२८) सासुबाई सप्तशती गुरूचरित्राची पोथी नेहमी वाचत असत व म्हणत ती नेहमी वाचीत जावी. गजाननमहाराजांच्या पोथीचे पारायणही करीत असत.

२९) स्वामी महाराजांची पुस्तके नेहमी त्यांच्या बरोबर असत. स्वामीच आपल्याबरोबर आहेत असे त्यांना वाटे.

३०) कॉफीत साखर न घालणे किंवा पदार्थात काही घालायचे विसरणे हे घडत असे. परंतु हे चुकूनही रागवत नसत. ''घाईगर्दीत असता. त्यामुळे होते'' असे म्हणत.

३१) प. पू. श्रीगुळवणीमहाराजांना यांचा बाहेर गौरव झाला की खूप आनंद होई. त्यांचा तो आनंद पाहिला की मला एकच वाटे तो देवाचा आनंद आहे.

३२) प. पू. श्रीगुळवणीमहाराज मला जेवायला जायला उशीर झाला की निरोप पाठवीत. असे त्यांचे विलक्षण प्रेम आम्हाला लाभले.

३३) परमेश्वर कुठेही असो, तो आम्हाला दिसो न दिसो. पण प. पू. श्रीगुळवणीमहाराज हे मात्र देवच होते. त्यांच्या दर्शनाने देव भेटल्याचा आनंद मिळे.

३४) माझे सासरे खूप मोकळेपणानी वागत. त्यामुळे त्यांच्याबरोबर सिनेमा पाहिला तरी संकोच कमी होई. वडिलांसारखे वाटे.

३५) साखर वाढते. तब्बेत बिघडते. हे सांगतात, जप वाढवा. देवाचे नाव घेण्याने सुद्धा रोग बरे होतात. माळ माझ्या हातात असते. मी नाव मात्र मनापासून घेण्याचा प्रयत्न करते.

३६) प्रारब्धानुसार जेवढे मिळावयाचे ते कोणी काढून घेऊ शकत नाही. अशी मनाची धारणा ठेवावी असे सतत ऐकून तशी ठेवते.

३७) नवीन लग्न होऊन कोणी नववधू दर्शनाला आली असली की मी विचारते, "काय ग फिरायला वगैरे जाऊन आला की नाही? घेऊन जात जा बरं का" असेही सांगते.

३८) प्रथम कांटकसरीने राहण्याची सवय होती. संसारात काटकसर केल्याशिवाय भागत नाही. तीच सुखाची ठरते.

३९) मुली लग्न होऊन गेल्या. परंतु सुना आल्या. आता तर सौ. सविता मला जास्त लागत असते. ती मोठी असल्यामुळे तिला सर्व करावेही लागते.

४०) सौ. अनिताची नोकरी. मग इकडे तिकडे आमच्याबरोबर येणे तिचे जमत नाही. पण यांचे लक्ष असते. सुट्टी असली की तिलाच बरोबर येण्याची संधी देतात.

४१) सर्व लोक नित्य प्रेमाने, भक्तीने घरी येतात. त्यांच्याशी बोलण्यात, सहवासात आम्ही आनंद उपभोगीत असतो.

४२) यांचा सहस्त्रचंद्रदर्शनशांती सोहळा झाला. इतकी भक्त थोर मंडळी आली होती. आपण किती भाग्यवान केवढी देवाची कृपा असे वाटले.

४३) 'तुला' झाली. त्यावेळी तुळसीपत्र घालण्याचा मान मिळाला व श्रीकृष्णाच्या कृपेत न्हाऊन निघाल्यासारखे वाटले.

४४) गोप्रदान करताना गोमातेकडे पाहून अंतःकरण भरून येत होते. मनात येत होते. जिथे जाशील तेथे सुखी रहा.

४५) कुमारिका पूजन खरोखर देवीदर्शनाचा आनंद लाभला. वाडवडिलांची, गुरूदेवांची कृपा म्हणून असे भाग्य लाभले,

४६) या सोहळ्याला श्रीशंकराचार्य महाराज आले होते. सर्वांचे आशीर्वाद लाभले. परमेश्वरा अशीच कृपा तू सदैव ठेव.

४७) रौद्रीशांत देऊळगावराजाला झाली. जुन्या आठवणी मनात उमलून आल्या. स्मृतिगंध मनांत दरवळू लागला.

४८) श्रीबालाजीचे देवस्थान आमचे सर्वांचे श्रद्धास्थान. त्याच्यापुढे गौरव झाला. भाग्यात भाग्य उजळले असे वाटले.

४९) बीड, हिंगोली येथील सर्वांची श्रद्धा भक्ती यांच्यावर असलेली पाहिली. तरीही ईश्वरी सामर्थ्याची कल्पना येत नाही.

५०) प्रेम, लोभ, श्रद्धा हे दर्शन वेगळे वाटते. घरात भाकरी पोळ्या करण्यात गेलेल्या माझ्या सारखीच्या जीवनाला हे विश्वरूप दर्शन मापता येत नाही, पण आनंद वाटतो. आनंद वोसंडतो येवढे मात्र खरे.

५१) मुला नातवंडानी हे भरलेले घर पहात पहात मला वाटते, ''माझी न दृष्ट लागो माझ्याच वैभवाला''

५२) हत्तीवरील मिरवणूक, ती दिगंबराची धुन, भक्तीने मळलेली वाट साऱ्याच गोष्टी मनात खोल रुतून राहतात. माझ्यासारख्या साध्यासुध्या गृहिणीला केवढे मोठे केलेस! भगवंता केवढी कृपा ही तुझी!!

५३) राष्ट्रपतींच्या हस्ते पुण्यात गौरव समारंभ झाला. मुलासुनांनी सत्काराला जावयाचे म्हणून लुगडे घेतले. मी नेसलेही मुलांच्या हौसेसाठी. पण परमेश्वराला म्हटले अरे अभिमान वाटावे असा देवाचा सहवास तू देत आहेस त्यापुढे आणखी काय मौल्यवान आहे?

५४) कधी कधी मनात येते मलाही संस्कृत येत असते तर यांचे जाडे जाडे ग्रंथ वाचून समजले तरी असते.

५५) ग्रंथ वाचून समजण्यापेक्षा त्या ग्रंथाप्रमाणे आचरण जे करताहेत तेच प्रत्यक्ष आपल्यापुढे आहेत. असे मनात आल्यावर माझे मलाच हसू आले.

५६) एक मोठे जेवणाचे वर्णन असलेले गाणे मी म्हणते. एकदा केव्हातरी यांनी ऐकले. तेव्हा बोलणे झाले. किती वेळ देवाला तिष्ठत बसावे लागले. इतके मोठे गाणे आहे.

५७) औदुंबरला प्रदक्षिणा घालताना अशी चित्रे खूप काही वेळा मनात गर्दी करतात. मी त्या औदुंबरला सांगते तुझ्या साक्षीने हे पुण्यस्मरण मी करीत आहे

५८) मध्यंतरी यांची प्रकृती बरी नव्हती. मग मात्र काळजीने जीव आटून गेला. वाटले मला काही झाले तरी चालेल पण यांना होऊ नको दे.

५९) देऊळगावराजाला इतका उन्हाळा होता मी आपली हायहुश करीत होते. परंतु यांना काही त्याचे वाटले नाही. स्थितप्रज्ञ का काय म्हणतात ना तसे वागणे असते.

६०) वासुदेव निवास रोज दर्शनाशिवाय ह्याना चैनच पडणार नाही.

६१) प. पू. श्रीगुळवणीमहाराज व प. पू. श्रीधुंडीराजमहाराजांचेही सर्व मोठाले उत्सव यांचे हातून झाले व ते पाहण्याचे भाग्य आम्हाला लाभले.

६२) हे म्हणतात हा ऐश्वर्ययोग देवांनी दिलेला आहे. त्याची भक्ति मनात अधिक वाढावी अशी प्रार्थना करावी.

६३) अलिकडे अलिकडे वाटू लागते की हे एका चिंतनात रंगून गेलेले असतात. आपल्यालाही तसे जमावे.

६४) एकदा नीलाताई म्हणाल्या, "तुम्ही रोज संध्याकाळी जाऊन का बसत नाही?" म्हणजे महाराज सांगतील तुम्हाला रोज छोटे प्रवचन. पण कसे हो जमेल?

६५) अहो नीलाताई अशी सवय नाही जाऊन बसण्याची! केव्हाच ते जमणार नाही मला. मी आपली रोज नमस्कार मनातूनच करीन.

६६) परवा वाडीला आमच्या जुन्या घरात गेले. साऱ्या भावना उफाळून आल्या. किती तरी मी बोलत सुटले खरच वाडी रम्य! वाडीच्या आठवणी रम्य! किती झाले तरी यांचा जन्म वाडीचा आहे. आमचे लग्नही वाडीचे आहे.

६७) स्वामी महाराजांची पाऊले या घरात याना बघण्यासाठी आली.

६८) या घरात राहून जे आयुष्य गेले तोच परमार्थ नाही का म्हणता येणार?

६९) माझे बालपण इथे मनमोकळे खेळण्यातही गेले आहे. लहान वय चार कामे केली की जबाबदारी संपली.

७०) सासुबाई म्हणायच्या जा खेळायला. सागरगोटे खूप खेळले आहेत. तो डाव जिंकला तरी संसाराचा डाव साधणे कठीण! परंतु सासर संतांचे घर आहे म्हणून डाव जिंकायला सोपे.

७१) वाडीले गेले की या साऱ्या संतमंडळीना डोके टेकून नमस्कार करते. खरच संभाळलेस असे म्हणते व दोन अश्रू डोळ्यात येऊन जातात.

७२) वर्तकवाडा तीन जिने खालून पाणी भरणे तेही दिवस आनंदात गेले. चांगली माणसे लाभली की कष्टही भासत नाहीत.

७३) प. पू. श्रीगुळवणीमहाराजांची रोज आठवण येते. कारण यांचे अंतःकरण त्यांनी ओळखले. जे मलाच काय पण कोणालाच ओळखता आले नाही त्यांच्या साऱ्या ज्ञानाची, विद्वत्तेची, भक्तीची प. पू. श्रीगुळवणीमहाराजांना ओळख पटली होती.

७४) प. पू. श्रीगुळवणीमहाराजांनी त्यांना ईश्वरसंपत्तीचे वारस केले. नाहीतर हे कोणी जाणले असते? कारण यांचा स्वभाव पुढे येण्याचा अजिबात नाही.

७५) लोकांनी त्रास दिला नावे ठेवली तरी हे कधी रागवत नाहीत. सारे मुकाट्याने सोसतात. यातच यांचे मोठे मन दडलेले आहे हे मला पण समजते.

७६ विद्यार्थी वर्गाचे प्रेम यांच्यावर फार होते.

७७) जीव लावून शिकविण्याची पद्धत होती.

७८) कुणाही वडीलमाणसाबरोबर बसलेले पाहिले नाही. सदैव उभे असत.

७९) भागवतावर फार श्रद्धा आहे. सांगताना रंगून जाणे होई.

८०) आज माझी ऐंशीवर्षे पूर्ण झाली. श्रीगुरूमहाराज उदंड दिलेत. तृप्त झाले. कृतार्थ झाले. यांच्या पायाशी सारे काही मिळाले.

८१) परमेश्वरा यांना, मुलाबाळांना, यांच्या भक्त मंडळींना, सदैव सुखी ठेव व मला कृतार्थ कर ही प्रार्थना.

नीला कृष्ण जोशी

तथास्तु  तथास्तु

करवीरपीठाच्या श्री विद्याशंकर भारती शंकराचार्यांकडून सांस्कृतिक पुरस्कार

शुक्रवार दि. ९।६।१९९५ हा दिवस एकादशीचा. यादिवशी आचार्यजी मुद्दाम वासुदेव निवासात आले त्यांनी प. पू. श्रीदत्तमहाराजांचा गौरव करून पुरस्कार दिला याची नोंद सुवर्णाक्षरांनी घेण्यासारखी आहे.


प. पू. श्रीदत्तमहाराजांना करवीरपीठाच्या आचार्यांकडून पुरस्कारासाठी कोल्हापूरला बोलविले होते. परंतु प्रकृतिच्या अस्वास्थ्यामुळे प. पू. श्रीदत्तमहाराज जाऊ शकले नाहीत. करवीरपीठाचे आचार्यमहाराज श्री. वासुदेव निवासात मुद्दाम दि. ९-६-१९९५ ला सकाळपासून आले. भिक्षा घेतली. प. पू. श्रीदत्तमहाराजांना पुरस्कार प्रदान केला.

या प्रसंगी बोलताना प. पू. श्रीदत्तमहाराज म्हणाले की, 'श्री. आचार्यमहाराजांनी बोलविल्यानंतर आम्ही त्वरीत जावयास पाहिजे होते. परंतु गेलो नाही ही एक श्री. आचार्यमहाराजांची आम्ही अवज्ञा केली हे अक्षम्य आहे.' असे म्हणून प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या नेत्रातून भक्तीचे अश्रू ओघळू लागले.

आशीर्वादाचे उत्तर देताना प. प. करवीरपीठाधीश आचार्यमहाराज म्हणाले 'आमचे नाते किंवा स्थान माऊलीचे आहे. एकादवेळी माऊलीने पुत्राकडे येणे हे अशास्त्रीय नाही तेव्हा प. पू. श्रीदत्तमहाराजांना अवज्ञा झाली असे वाटून घेऊ नये.'

श्री. आचार्य महाराजांचे हे पुत्रवात्सल्य त्यांना जगदंबेने दिलेला प्रसाद आहे.

चरित्राचा ओघ असा सतत सरितेप्रमाणे वाहता आहे. असे सद्गुरू लोकमहेश्वर आहेत म्हणूनच ते पुरूषोत्तम आहेत. त्यांच्या चरणी तुळसीपत्र वाहणे हेच जीवनाचे काम.



सद्‌गुरू

पुरूषोत्तम

तुळशीपत्र

प्रयाग ३८६

सद्‌गुरु

उभा पाठीशी तू असताना । कसली मज चिंता । सद्‌गुरु तू माझा त्राता। या भावभक्तीच्या दोन ओळी मनाला पटतात. लौकिक व पारलौकिक कल्याणासाठी सद्‌गुरु दीपस्तंभासारखे आधार देतात हे प्रत्येक अनुभवी माणसाला पटल्याशिवाय रहात नाही.

अध्यात्ममार्गात आपल्याला आत्मज्ञानाकरता जे सतत मदत करतात ते सद्‌गुरु होत. सद्‌गुरु हे स्वतः शास्त्रप्रचीति, गुरुप्रचीति व आत्मप्रचीति घेतलेले असतात. अनेक साधुसंतांनी सद्‌गुरुंबद्दल लिहिलेले आपण नेहमी वाचतो. 'श्री ज्ञानदेवांची गुरुभक्ती' हा तर एक स्वतंत्र विषय होईल इतकी महत्त्वपूर्ण आहे.

शाब्दे परेच निष्णात असतात ते सद्‌गुरु होत. आत्मज्ञान हा शब्दानी व्यक्त होणारा विषय नाही. तो अनुभूतीचा विषय आहे. तरीही शब्दाच्या माध्यमातून त्या अनुभवाचा प्रत्यय देता येईल तेव्हढा देण्याचा प्रयत्न सद्‌गुरु करीत असतात.

श्रीज्ञानेश्वरांचा अमृतानुभव, श्रीएकनाथांचे चिरंजीवपद व श्रीसमर्थांचा आत्माराम हे त्यांना जी आत्मप्रचीती आली त्याचे शब्दांकन करणारे स्वानुभवाचे बोल आहेत, ग्रंथ आहेत हा अनुभव ज्यांनी घेतला तेच अधिकाराने यथार्थ ज्ञान सांगू शकतात. श्री. ज्ञानदेव अमृतानुभवाच्या शेवटी लिहितात. **'म्हणोनी ज्ञानदेवो म्हणे। अनुभवामृते येणे। सणु भोगिजे सणे। विश्वाचेनी।।'** आत्मानुभव प्राप्त होणे हा विश्वाचा सण आहे असे ते म्हणतात

आत्माराम ग्रंथात शेवटच्या प्रकरणात श्रीसमर्थ म्हणतात **'ऐसा कृपाळू स्वामीराव। आदिपुरुष देवाधी देवो । शिष्यास निजपदी ठाव ऐक्य रुपे दिधला ।'** ईशशक्तीच्या विलासामध्ये साधकाला ईश्वराची दया दिसते. ती दया त्याच्यापर्यंत येण्यास ईश्वराशी संपूर्ण समरस झालेले थोर पुरुष आवश्यक असतात. त्यानाच सद्‌गुरु म्हणतात. आपल्याला आत्मज्ञान देणाऱ्या या सद्‌गुरुस शिष्य देव मानतो.

श्रीएकनाथानी म्हंटले आहे **'एका जनार्दनी गुरु परब्रम्ह । तयाचे पै नाम सदा मुखी।'** अशी तऱ्हेने आत्मज्ञान प्राप्त झालेल्या सद्‌गुरुंचे वर्णन सर्व संतानी केले आहे. सद्‌गुरु भेटणे कठीण, भेटले तर त्यावर विश्वास बसणे त्याहून कठीण. विश्वास बसला तर त्यांचा सहवास घेतला तर नेमके काय घ्यावयाचे ते कळणे आवश्यक असते. कळून आचरणात आणणे अधिक महत्त्वाचे असते.

या साऱ्या जर तरच्या प्रश्नातून बाहेर पडून प्रत्यक्ष सद्‌गुरु पाहण्याचे व सहवासाचे भाग्य या काळात लाभले आहे. प. पू. श्रीवामनरावजी गुळवणीमहाराज

यानी आपल्या कृपेने अनेक दीप प्रज्वलित केल्याचे आपण पाहिले आहे. उपासना, ज्ञान व भक्ती यांचे महत्त्व पटवून प्रत्येकाला मार्गस्थ केले आहे. प. पू. श्रीदत्तमहाराजही तेच कार्य अखंड करीत आहेत.

पूर्वीचे सद्गुरु शिष्याची परीक्षा घेत असत. परंतु तशा प्रकारची परीक्षा या दोन्ही सद्गुरुनी घेतली नाही तर शिष्याची कुवत जाणून त्याला सांभाळून घेतले. या बदलत्या वैचारिक परिस्थितीत आवश्यक तो बदल सद्गुरुंनी केला आहे. सद्गुरु आपले अंतःकरण जाणतात. त्यामुळे आपल्या दोषांवर उपाय होतो. आपले अंतःकरण शुद्ध करताना एकाचा दोष दुसऱ्याला सांगत नाहीत, कळू देत नाहीत. प्रत्येकात असलेला चांगला गुण परमेश्वरचरणी कसा लावावा हे शिकवितात. सद्गुरु बोलूनच दोष दाखतात असे नाही तर न बोलताही ज्याची चूक त्यास कळून येते.

एकदा आश्रमात सभामंडपात पाद्यपूजा चालू होती. प. पू. श्रीदत्तमहाराज खोलीत होते. आम्ही खोलीत बसलो होतो. त्यांच्याशी अधून मधून बोलत होतो. ते फ़ार थोडे बोलत. नाही तर हुंकार देत असत. आमच्या लक्षात त्यावेळी काही आले नाही. पादुकांची पूजा झाल्यावर ती मंडळी खोलीत प. पू श्रीदत्तमहाराजांना हार समर्पण करण्यासाठी आली. ते सर्व देऊन वगैरे झाल्यावर प. पू. श्रीदत्तमहाराज मोकळे बोलू लागले. याचा अर्थ असा की बाहेर पूजा चालू आहे. प. पू. श्रीदत्तमहाराज एकटे आहेत आपण बोलूया असे वाटते परंतु त्यांचे अवधान पूजेकडे असते. अशावेळी आपण बोलत राहतो हे बरोबर नाही. हे त्यानी न सांगताच कळून आले हीच त्यांची कृपा आहे. अनेकवेळा अशी जाण ते न बोलता देत असतात.

मनाचे हे शुद्धीकरण सद्गुरुंशिवाय अन्य कोणीही करु शकत नाही. त्याकरता त्यांचा परमेश्वरी शक्तीचा ते उपयोग करतात. याची जाणीव सामान्य माणसाला नसते. प्रत्येकाकडून वेगवेगळ्या प्रकारे सतकर्म करुन घेतात, उपासना करुन घेतात. कधी कोणाला त्यांच्या प्रवचनाच्या ध्वनीफिती लिहून काढणे, प्रवचने सर्वांना उपलब्ध करुन देणे ही प्रेरणा देऊन सेवा करुन घेतात. चित्तशुद्धीचा मार्ग उपलब्ध करुन देतात तर या प्रवचनाचे संपादनशुद्धी करणारे काम सांगून सेवा करुन घेतात. काहीना संतांवर अभ्यासपूर्ण बोलण्याची संधी उपलब्ध करुन देतात. समाजसेवा ही निरपेक्ष करण्याची शिकवण देऊन आत्मज्ञानाकडे वाटचाल करावयास शिकवितात. असे अनेक प्रकारे कार्यप्रवण करुन सेवायोगे चित्त शुद्ध होण्याची संधी उपलब्ध करुन देतात. जनसेवा हीच ईश्वरसेवा असे त्यांचे मत आहे.

''तया सतकर्मी रती वाढो'' ज्ञानेश्वरांचा महामंत्र प्रत्यक्षात करुन घेतात असे हे सद्गुरुपद आहे. आत्मसाक्षात्कार एका जन्मात घडत नाही म्हणून सतकर्माची शिदोरी बरोबर देऊन शेवटी आत्मसाक्षात्कारापर्यंत पोचवितात. सत्कर्माला अहंकाराचा दोष लागू नये असे प्रबोधन ते करीत असतात.

थोर पण पन्हा सांडिजे । व्युत्पत्ती आघवी विसरीजे। जै जगा धाकुटे होईजे तै जवळीक माझी।। ज्ञानेश्वरीतील हा संदेश सतत देत असतात. सर्व कर्ता परमेश्वर आहे ही त्यांची शिकवण असते. अकर्तृत्व भाव हेच तर त्यांच्या जीवनाचे सूत्र असते. श्री संत नामदेवाना सगुण भक्तीचा अहंकार झाला. त्यामुळे विठ्ठलाच्या मूर्तीतच फक्त देव आहे अशी संकुचित कल्पना झाली म्हणून देवानीसुद्धा नामदेवाना सद्गुरुंकडे पाठविले. आपल्याला सर्व बाजूंनी संभाळून आपल्या उपासनेला संरक्षण देणारे सद्गुरु असतात.

प्रसिद्धी त्यांना नको असते. त्यांची स्तुती केलेली त्यांना अजिबात आवडत नाही. **पुज्यता डोळा न देखावी । स्वकिर्ती कानी ना ऐकावी** हे श्री ज्ञानेश्वरांचे सांगणे त्यांच्या जीवनात पूर्ण उतरलेले असते. केलेली स्तुती ते ऐकूनच घेत नाहीत आपल्यामुळे झाले असे वाक्य उच्चारु देत नाहीत. त्यांची देहबुद्धी पूर्ण नाहीशी झालेली असते. शब्दाने, दृष्टीने, स्पर्शाने, संकल्पाने ते आपणावर शक्तिपात करीत असतात. श्रीसमर्थ म्हणतात

म्हणे दास सायास त्याचे करावे । जगी जाणता पाय त्याचे धरावे ।
गुरु अंजने वीण ते आकलेना । जुने ठेवणे मीपणे ते कळेना ।।

गुरुचे कृपाअंजन म्हणजेच शक्तिपात होय. असा सद्गुरु लाभणे कठीण असते. ज्याला समदृष्टी प्राप्त झालेली असते, ज्याचे चित्त राग द्वेष मत्सर या दोषापासून पूर्ण मुक्त झालेले असते असे साधुपुरुष संकल्प दीक्षा देण्याचे अधिकारी असतात. सद्गुरुपदी आरुढ झालेले महात्मे अत्यंत निरासक्त पवित्र असतात. या श्लोकातील जाणता हा शब्द महत्वाचा आहे. ज्याला आत्मस्वरुपाचे ज्ञान झाले तो जाणता त्याला शरण जावे. नामदेवांना विसोबा खेचरांकडे याच ज्ञानासाठी पाठविले होते. ते आपल्या एका अभंगात म्हणतात. 'माझी दृष्टी आंत वळली. इंद्रियांच्या वृत्तीही आंत वळल्या आणि एका ठिकाणी स्थिर झालो. माझ्या गुरुंनी दिलेल्या आत्मबोधाने मी शांत झालो.' हा संकल्पशक्तीचा प्रभाव आहे.

प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या शब्दातच संकल्पशक्ती म्हणजे काय हे पाहूया अनुग्रह या विषयावर बोलताना ते म्हणाले. "सर्वांकडे समदृष्टीने पाहता येणे, भिन्न भाव नाहीसा होणे अशी बुद्धीची,मनाची स्थिती ज्या महात्म्यांची होते त्यांचा संकल्प हा ईश्वरी संकल्प होतो. अशा थोर संतमहात्म्यांनी आत्मस्वरुपाचा अनुभव घेतलेला असतो अशांची दृष्टी ज्यांच्यावर पडते त्यांचा पापक्षय होतो. हीच संकल्प दीक्षा होय. यापुढेही सद्गुरुंचे मर्म आपल्याला प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या या प्रवचनातील विचारावरुन कळेल. ते सांगतात असे ईश्वरीभूत जे सतपुरुष आहेत त्यांच्या सत्य संकल्पाचा प्रभाव दुसऱ्याच्या चित्तावर पडतो. त्यांचे पारलौकिक कल्याण होते ही सत्यसंकल्पशक्ती सर्वांजवळ असू शकत नाही. हेच संकल्प दीक्षेचे वैशिष्ट्य आहे.

तसाच अधिकारी महात्मा असावा लागतो. हे त्यांच्या प्रवचनातील विचार आपल्याला सद्गुरु मिळणे का कठीण आहे हे दाखवितात. पूर्ण चित्तशुद्धी असावी लागते तेव्हाच सद्गुरु पद प्राप्त होते.

शब्दज्ञानाचा उपयोग कुठपर्यंत होतो, प्रत्यक्ष अनुभूती म्हणजे काय याबद्दलचे विचार प. पू. श्रीदत्तमहाराजांनी स्पष्ट शब्दात मांडलेले आहेत. ''नुसता तत्वविचार ज्यावेळी करावयाचा असतो त्यावेळी सत्श्रवणाचा किंवा शब्दप्रमाणाचा उपयोग होतो. परंतु हे तत्वज्ञान अनुभवापर्यंत पोचणे हे महत्त्वाचे आहे. परमेश्वर स्वरुपाचे ज्ञान प्राप्त होण्यासाठी सत्य संकल्पशक्तीचा उपयोग होतो.''

अर्जुनाच्या मनाची स्थिती अशीच अस्थिर झाली होती. चंचलपणा हा मनाचा दोष आहे. तसे पाहिले तर अर्जुनाजवळ काहीच कमी नव्हते. शास्त्रअस्त्रविद्या, संगीतशास्त्रातही निपुणता, गुरुकृपा, ईश्वरनिष्ठा इतके असूनही म्हणतो आहे मला मनाचा निग्रह करता येत नाही. मी काय करु? त्याच्या बुद्धीची समजूत घालण्यासाठी जे तत्वज्ञान सांगितले ती गीता. या तत्वज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव येण्यासाठी भगवंताने अर्जुनाला शक्तिपात दीक्षा दिली.

एका दिव्याने दुसरा दिवा लावला असता दिसावयास जरी ते दोन दिसतात तरी प्रकाशाच्या दृष्टीने त्यांचे ऐक्य मोडत नाही.

दीपे दीपु लावला। तैसा परिष्वंगु तो झाला।
द्वैत न मोडता केला। आपण पे पार्थु।। १४२२/१८ ज्ञाने

अर्जुनाचे त्याबरोबर जगाचे कल्याण व्हावे असे श्रीकृष्णांनी मनांत आणल्याबरोबर त्याचेवर अनुग्रह झाला. हेच गुरुच्या संकल्पाचे मोठे महत्व आहे हाच शक्तिपात होय.

प. पू. श्रीलोकनाथतीर्थ स्वामीमहाराज असा आचार विचाराने समर्थ शिष्य शोधीत बंगालमधून महाराष्ट्रात का आले हे आपल्याला वरील प. पू श्रीदत्तमहाराजांच्या थोर विचारातून कळून येत आहे. योग्य महात्मा सांपडणे दुर्लभ असते. पण ती काशीची गंगा महाराष्ट्रात आली. प. पू. श्रीबामनरावजी गुळवणीमहाराज असे थोर व सद्गुरुपदासाठी योग्य महात्मे त्यांना लाभले. आपले सर्वांचे कल्याण झाले. प. पू. श्रीयोगीराज गुळवणीमहाराजांनाही आपले आत्मधन देण्यासाठी पूर्ण चित्तशुध्द असलेलें शास्त्रसंपन्न असे थोर महात्मे लाभले. प. पू. श्रीदत्तमहाराजासारखे शक्तिपात विद्येचे अधिकारी असे सद्गुरु झाले. हे सर्व आपल्या महाराष्ट्राचे नव्हे भारताचे भाग्य आहे.

आपणा सारिखे करिती तात्काळ असे सामर्थ्य अशा सद्गुरुपदाचे असते. समर्थ शिष्याची ते वाट पहात असतात. तरी सामान्य जनांचा ते अव्हेर करीत नाहीत. त्यानाही संकल्प शक्ती देऊन मार्गस्थ करतात. लोकसंग्रह वाढत जातो तो असा.

सद्गुरु हे आपल्या अंतरंगाला व्यापून टाकतात. ते अंतरंगाचे अधिकारी असतात. सद्गुरुंच्या कृपेने साधनातील अडचणी दूर होतात. सर्व विघ्ने दूर होतात. जे मिळवायचे आहे ते प्राप्त होते व जे प्राप्त झाले आहे ते स्थिर होते. देव व गुरु एकच असतात. सदगुरु भक्तांचा योगक्षेम वाहतात तो दोन्ही दृष्टीने व्यावहारिक व पारलौकिक अडचणी दूर करुन पारमार्थिक योगक्षेम करतात. साधनेला संरक्षण ही केवढी आधारभूत गोष्ट आहे.

असे सद्गुरु आपल्याला लाभले आहेत तेव्हा त्यांना शरण जाणे हेच आपले काम आहे. भगवंतानी सांगितले

तमेव शरणं गच्छ सर्व भावेन भारत ।
तत्प्रसादात्परां शांतिं स्थान प्राप्स्यसि शाश्वतम् ॥६२॥



भागवतातील सुभाषिते

१) भगवंताच्या चरणाचा आश्रय हाच मनुष्याचे कल्याण करणारा आहे.

२) मनावर विश्वास ठेवून कुठेही मैत्री करु नये.

३) भगवान एखाद्यावर प्रसन्न झाले तर त्याना मुक्ति देतील पण भक्तीयोग मात्र कधी देणार नाहीत.

४) साधु पुरुषावर केलेला प्रहार, तो करणाऱ्याचेच अकल्याण करतो.

५) हे सर्व जग भगवद्स्वरूपच आहे, त्यावाचून दुसरे काही नाही.

पुरुषोत्तम

या चराचरात अमुर्त असलेले अस्तित्व म्हणजे चैतन्य सर्वत्र भरुन उरलेले आहे. हे चैतन्य आनंदरुप आहे. निसर्गाच्या सानिध्यात गेले की पहाटे पक्षी आकाशाकडे झेपावतात. निरनिराळे आवाज काढून मोठ्या आनंदाने साद घालीत असतात. या झाडावरुन त्या झाडावर फुलपाखरे विहार करीत असतात. उन्हाळा, पावसाळा, हिवाळा सारे ऋतू नियमाने आपआपली कामे करीत असतात. अशा या सृष्टीच्या अखंड चाललेल्या विहाराकडे पाहिले की असे वाटते प्रत्येक जीव एका ओढीने जगत आहे, धावत आहे, तो स्वःतात दंग आहे, रमला आहे ही ओढ कसली? हे रमणे म्हणजे तरी काय? या सर्व सृष्टीकडे तटस्थवृत्तीने पाहताना आनंददायी व सुखद वाटते. जग म्हणजेच प्रभूचा विहार. आत्मसत्तेला आनंद भोगण्यासाठी अनेक व्हावेसे वाटले व जग निर्माण झाले. जगाच्या निर्मितीची कथा मानतात. चैतन्य व सृजनशक्ती यांचा संगम झाला. मग त्यात आनंदाचे तरंग निर्माण झाले. त्या आनंदातून विश्व आकाराला आले. आनंदातून निर्माण झालेले जग आनंदातच विलीन होत असते. प्रत्येक सजिवात आनंद सारख्या प्रमाणात प्रगट होत नाही. सजिवांची उक्रांत अवस्था म्हणजे माणूस होय. या मानवात आनंदाचे प्रगटीकरण जास्त प्रमाणात व ज्ञान, विज्ञान, कला, साहित्य अशी वेगवेगळ्या माध्यमातून उत्कटपणे प्रतितीला येत असते. या मानवी मनाची उत्क्रांत अवस्था म्हणजे पुरुषोत्तम होय. पुरुषोत्तम म्हणजेच संत होय. संत या शब्दाची व्याख्या प. पू. श्रीदत्तमहाराजांनी आपल्या एका लेखात केली आहे ती अशी - ''जेथे षडरिपूंचा अंत होतो ते संत'' याप्रमाणे काम, क्रोध, लोभ, मद मत्सर या षडरिपूंना संत काबूत ठेवत असतात असे हे पुरूषोत्तम असतात. पुरूषोत्तमाचे मन हे विश्वाकार असते. देहात राहूनही आकाराचा लोप होतो. त्यामुळे सर्व विश्वात एक जाणीव व्यापून राहिलेली आहे. अशी आत्मप्रचिती त्यांना सतत असते. या जाणीवेचे सतत स्मरण त्यांना असते हेच त्यांचे नामस्मरण होय. हे विश्वाकार मन पेलणे सोपे नाही. एकूण आवांका, सूक्ष्मता, महान असावी लागते ते सारे प. पू. श्रीदत्तमहाराजांचे ठिकाणी आहे. परमात्मा या पुरुषोत्तमांना जगाच्या पलिकडे असलेल्या आनंद साम्राज्यात नेत असतो. त्यामुळे संतांचे जीवन नेहमी प्रसन्न सात्विक दिसते. तसे पाहिले तर सर्व संत जीवनात किती तरी कष्ट करीत असतात. लोकनिंदा सहन करीत असतात. परंतु ते कधीही दुःखाने खचलेले दिसत नाहीत. ग्रीष्मऋतुतही झाडे टवटवीत, दिसतात. ती सुकलेली नसतात. त्याप्रमाणेच संतांचे जीवन अनेक संकटे, त्रिविध ताप सोसूनही टवटवीत प्रसन्न असते. संतांच्या या जीवनाशी ज्याचा संपर्क येईल त्याला आनंद व धीर देत दिपस्तंभाप्रमाणे हसत असतात. असे का घडते? राखेत दडलेला विस्तव जसा दिसून येत नाही त्याप्रमाणे ब्रम्हचिंतनात लीन झालेल्या ज्ञानी माणसाचे जीवन ओळखले जाऊ शकत नाही. संत हे कुठेही मायेत गुंतलेले नसतात. अंतःकरणात कोणतीही वासना शिल्लक उरलेली नसते. अंतःकरण प्रभूस्वरूपात विलीन झालेले असते. देह, अहंता गळून गेलेली असते. यादृष्टीने प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या जीवन

चरित्राकडे पाहिले की ते पुरुषोत्तम आहेत हे कळून येते. त्यांची सारी जीवननिष्ठा श्री भागवतग्रंथावर स्थिरावली आहे. त्या ग्रंथाचा अभ्यास व त्याची पारायणे हा त्यांच्या तपश्चर्येचा भाग आहे. भागवतग्रंथाच्या सततच्या परीशीलनाने ते भक्तीकडे वळले आहेत.

पंडित, ज्ञानी, कर्मयोगी असूनही ते भक्त आहेत. श्री ज्ञानेश्वर महाराज ९व्या अध्यायात म्हणतात, 'झाडाला कणसे दाटीवाटीने लागली पण त्यात दाणेच नाहीत, सुंदर नगर आहे पण त्यात माणसेच नाहीत, सर्व शरीर सुंदर आहे पण त्यात प्राण नाही. त्याप्रमाणे भक्तीवाचून सर्व निरर्थक रसहीन आहे. प. पू. श्रीदत्तमहाराज ज्ञान व कर्माला भक्तीची जोड असली पाहिजे असे सांगत असतात.

अशा भक्ताचे वर्णन करताना संत एकनाथ म्हणतात

जपे वीण नाम वदनी । धारणे वीण ध्यान मनी ।
संकल्पेवीण मदर्पणी । सर्वकर्मे सर्वदा ।
निरोधेवीण वायुरोधू । मर्यादेवीण स्वरूप बोधू ।
विषयेवीण सदा स्वानंदू । मद्भक्त शुद्धयानाव । एकनाथी भागवत ११वा

त्यांच्या या आनंदी जीवनयात्रेचे प्रवासी होण्यासाठी ते सर्वांना संभाळून घेत आहेत. प. पू. श्रीदत्तमहाराज भागवतातील राजा भरताची गोष्ट नेहमी सांगतात. भरत हे फार मोठे तपस्वी होते. परमेश्वर चिंतनासाठी वनात जाऊन राहिले. पण मृगशावकाच्या मायेत अडकले. या बालकाला कोणी नाही आपणच याचे रक्षण करणारे आहो अशी भावना झाली. प्रभूचिंतनाऐवजी त्या शावकाचे चिंतन करू लागले. खरा रक्षण करणार परमेश्वर आहे ही भावना विसरले. हरीण बालक निघून गेले. भरताना त्याचीच काळजी वाटून अंतकाळी त्या शावकाचे स्मरण झाले. त्यामुळे एक जन्म हरणाचा घ्यावा लागला. भरतमुनींचा पारमार्थिक अधिकार फार मोठा होता. त्यामुळे या मृगाच्या जन्मातही त्यांना मागील जन्माचे स्मरण होते. त्यानी आपला उद्धार करुन घेतला पण सामान्यांचे काय? प. पू. श्रीदत्तमहाराज सांगत असतात की, घरात राहिलात तरी चालेल पण मनात घर ठेवू नका, संसार ठेवू नका, श्रीहरी ठेवा. दुसरे उदाहरण प. पू. श्रीदत्तमहाराज प्रल्हादजींचे देतात. प्रतिकूल परिस्थितीत भजन कसे करावे हे प्रल्हादजींच्या उदाहरणावरुन शिकावे. अनुकूल वातावरण असूनही मनुष्याने सावध राहिले पाहिजे. नाहीतर प्रभूचिंतनात अडथळा येता हे भरतमुनींच्या उदाहरणावरुन सावध रहा असा इशारा देतात. प. पू. श्रीदत्तमहाराजांचा संसार वटवृक्षाप्रमाणे असूनही ते कशात गुंतलेले नाहीत हे तर आपण पहातच आहो. तसेच त्यांचे प्रभूचिंतन कोणत्याही परिस्थितीत चालू आहे. म्हणूनच प्रसन्नता त्यांना लाभली आहे. शेवंतीच्या फुलाच्या जरी हजारो पाकळ्या विकासल्या तरी शेवंतीचे फूल एकच. तशी त्यांची वृत्ती परमेश्वरचरणी एकाकार झाली आहे.

असे हे अनासक्त निर्मल जीवन आनंदपदावर आरुढ झाले आहे. शरद ऋतूत सरिता शांत वाहते. भरतीची गडबड कमी होते. गाणे थांबले असता तबला, तंबोरा ही वाद्ये थांबून जातात. आत्मप्रसन्नता प्राप्त व्हावी म्हणून जी जीवनभर धडपड चाललेली असते ते श्रमसुद्धा शांत होतात. याप्रमाणे प. पू. श्रीदत्तमहाराजांना प्रसन्नता लाभली आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज या परिस्थितीला आत्मबोध प्रसन्नता असे म्हणतात, ही सहजस्थिती किंवा ज्ञानोत्तर भक्ती आहे. जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन संपूर्ण आशावादी आहे.

आपले ऐहिक व पारमार्थिक कल्याण साधण्याकरता उदंड प्रयत्न केला पाहिजे. साधन किती केले पाहिजे प्रयत्न किती केला पाहिजे याचे उत्तर एकच यश मिळेपर्यंत. ध्येय प्राप्ती होईपर्यंत केला पाहिजे त्याचा कंटाळा करु नका असे त्यांचे सांगणे आहे.

त्रिवेणी संगम प्रयाग

प. पू. श्रीदत्तमहाराजांचे चरित्र म्हणजे त्रिवेणी संगम आहे. प. पू. श्रीदिक्षित स्वामीमहाराज, प. पू. श्रीधुंडीराजमहाराज, योगीराज गुळवणीमहाराज या तीन सत्पुरुषांकडून तीन प्रवाह एकत्र आले व प. पू. श्रीदत्तमहाराजांचे जीवन तीर्थराज प्रयाग झाले. ज्ञान भक्तीरुप गंगा, संसाररुपी यमुना, स्वानंदरुपी सरस्वती या त्रिवेणी संगमात प. पू. श्रीदत्तमहाराज सतत सहजावस्थेत आहेत. अंतरंग परमेश्वराशी सतत जोडलेले आहे म्हणूनच ते जीवनमुक्त आहेत.

या प्रयाग तीर्थात जाणीवपूर्वक सुस्नात होऊन आपणही आपले जीवन उजळून घ्यावे. श्री ज्ञानदेव म्हणतात,


म्हणौनि भलतेणे एथ सद्गावे नाहावे। प्रयाग माधव विश्वरुप पहावे।
येथूनी संसारासी द्यावे तिलोदक ॥ ज्ञाने. ११।१०

या त्रिवेणी संगमात हवे त्याने अस्तिक्य बुद्धीने स्नान करुन विश्वरुप माधवाचे दर्शन घ्यावे व अनित्य अशा संसारात गुंतून पडू नये.

प. पू. श्रीगुळवणी महाराजांचे चरणी भावसुमने अर्पण करताना प. पू. श्रीदत्तमहाराजांसारखे उत्तराधिकारी लाभल्याबद्दल शतशः ऋणाईत होऊया. प. पू. श्रीगुरुमहाराजांचे चरणी प. पू. श्रीदत्तमहाराजांकरिता एकच प्रार्थना की त्यांना दीर्घ आयुरारोग्य लाभू दे. या प्रयाग क्षेत्रात सुस्नात होऊन आपला महाराष्ट्र शक्तिसंपन्न व तेजाने बलशाली बनू दे.



तुळशी पत्र



योगीराज श्रीवामनरावजी गुळवणी महाराज

प. पू. श्रीगुरुमहाराज (वामनरावजी गुळवणीमहाराज) आपले चरणी प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या जीवनाचे पवित्र स्मरण करता करता मन त्या जीवनात पूर्ण बुडून गेले रमून गेले. अमृततत्त्वाचा लाभ या चरित्रामधे झाला. कार्य करुन घेणारी सद्गुरु शक्ति किती समर्थ व अतर्क्य आहे याचाही अनुभव हे लेखन करताना पूर्णपणे आला. **मूकम् करोती वाचालम!** अशा ज्यांचा अधिकार ते कोणाकडूनही कार्य करुन घेतात येवढे खरे! श्रीएकनाथांनी नाही कां गावबाकडून भावार्थ रामायण लिहून घेतले. त्याप्रमाणे देवगुरुशक्ती निमित्तमात्र कोणालाही करते असे मनापासून वाटते. केवळ नम्रता स्वीकारावी म्हणून मी लिहित नाही. विचार करताना पुन्हा पुन्हा हे मनात येते की आपणाकडे हे काम कसे आले?

शास्त्र जाणणारे संस्कृत पंडित, ज्ञानाने समृद्ध असे कितीतरी लोक प. पू. श्रीदत्तमहाराजांचे शिष्योत्तम आहेत. त्यानीच हे चरित्र यथायोग्य तऱ्हेने अधिक विस्तृत समर्थपणे लिहिले असते. चरित्राची व्याप्ती व खोली न अजमावण्यासारखी आहे हे त्याकरीता माहिती गोळा करू लागल्यावर कळून चुकले. असेही वाटू लागले अरे आपण विचार न करताच हो म्हटले. या विचाराचे माझे मलाच हसूं आले. वाटले **साळुंकी मंजुळ बोलतसे वाणी। बोलविता धनी वेगळाची।।** करवून घेणारे वेगळे आहेत असे समजल्यावर आता असा विचार सोडला पाहिजे. एकदा मनाने तसा निश्चय केला. या चरित्र लेखनाला सुरुवात माझी देवपूजा समजून जशी जमेल तशी भावभक्तीने करीत राहिले.


या पूजेसाठी पवित्र जल कुठून आणायचे म्हणून प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या समकालीन विद्वान मंडळीकडे धाव घेतली. त्यांनी पवित्र स्मृतींचे गंगाजळ दिलेच पण आणखी ठिकाणे सांगितली. त्या सत्शिष्यांची भेट घेतली. त्यांनी प्रत्येकानी तीर्थजल भरभरुन दिले. त्यांचे छोटे मोठे कलश भरले. पूजेला सुरवात केली. भावभक्तीची ओंजळ हाती घेऊन अभिषेक केला. लहान, थोर, ज्ञानी, संत या सर्वांनी स्मृतीसुमने वाहून पूजा सुशोभित केली. प. पू. श्रीनानामहाराज तराणेकर, ह. भ. प.

धुंडामहाराज, सौ. ताईमहाराज, प. प. यतीमहाराज ब्रह्मश्री भालचंद्रशास्त्री यांनी आशीर्वादाचा प्रसाद दिला. अशी ही वाक्पूजा पूर्ण झाली.

प. पू. श्रीगुरुमहाराजांची आठवण खूप झाली. त्यांनी वेळोवेळी सावरुन घेतले. लौकिक जीवनाला परमार्थाची जोड दिली. संसार सफळ केला. निमित्तमात्र करुन सेवा करुन घेतली. जीवनाची सायंकाळ झाली. अशावेळी त्यांच्या पदी नम्र होणे, शरण जाणे हे तर करायलाच पाहिजे पण **'झाली संध्या संदेह माझा गेला आत्मारामहृदयी प्रगटला''** अशी पूजेची पूर्णता व्हावी अशी अपेक्षा केली.

प. पू. श्रीदत्तमहाराजांनी सर्वांनाच संभाळून घेतले. आश्रमाचा निवारा चालू राहिला. माहेरपण लाभले. संसाराच्या उलाढालीतून चार दिवस ईश्वरसानिध्यात राहण्याची संधी दिली. हे तर शब्दात न सामावणारे असे महान सिद्ध कार्य आहे. हे पवित्र मंदीर आम्हाला कुठे मिळणार होते की जेथे आम्ही सर्व देहभाव विसरुन निवांत निःसंकोच राहू? पुन्हा नवा भक्तीचा उत्साह घेऊन कार्यरत होऊ?

''धूपदीप झाला. आता कर्पूर आरती'' करताना असे अनेक चिंतनात्मक विचार मनात उफाळून येतात. डोळ्यातून अश्रूधारा वाहू लागतात. महाराज मी काय देणार आपल्याला? जीवनाच्या सांजवेळी भक्तिने ओले झालेले हे तुळशीपत्र आपले पदी वाहते, जीवनाची अखेर सद्गुरु स्मरणात घडू दे येवढाच प्रसाद मागते. आपण **तथास्तु म्हणा. तथास्तु म्हणा.**




परिशिष्ट

❖ श्री वासुदेव निवास
गुरू माऊली प्रासाद

❖ प. पू. श्रीदत्तमहाराजांना मिळालेले
पुरस्कार व मानपत्रे

श्री वासुदेव निवास



वेदमूर्ती कोडणीकर गुरूजी वासुदेव निवास येथे पुजा करताना सोबत
श्री. भगवान पाध्ये व सुनिल कुवठेकर

प. पू. श्रीवामनरावजी गुळवणीमहाराज व प. पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वर या दोन महान पुरुषांच्या सत्य संकल्प सिद्धिने उभी राहिलेली व त्यांच्या वास्तव्याने पावन झालेली ही गुरुनिवासची वास्तू आहे. प. पू. श्रीगुरुमहाराजांच्या इच्छेनुसार परंपरेने आचार शुद्धतेने चालविली जात आहे. ती योग्य तऱ्हेने चालण्यासाठी विश्वस्तांबरोबरच इतर सर्व सहकारी वर्गाची सेवा अखंड चालू रहावी लागते तर अशा संस्थांचे पावित्र्य टिकते. सेवा सहकारी अनेक प्रकारची अशी कामे करीत असतात. येणाऱ्या साधकांना, अतिथींना याची कल्पना नसते ती येणे अतिशय जरुरीचे आहे. आश्रमाचे मंगल स्वरुप टिकविण्यासाठी कष्ट आहेत. येणाऱ्या मंडळींना याची जाणीव मनात जागृत ठेवणे साधक म्हणून आवश्यक आहे. त्यामुळे आपण ही आपली वास्तू नीट राखण्यासाठी सहकार्य केले पाहिजे.

या दोन संताचे जीवनातील श्री वासुदेवनिवास व श्री वामननिवास हे अविभाज्य घटक आहेत. पुण्यप्रद असा इतिहास आहे.

अनेक उत्तम साधक, साधु, संन्यासी, पंडित, चारी पिठांचे आचार्य, यांची पाऊले येथे पडलेली आहेत. अनेक यज्ञ, याग, अनुष्ठाने या ठिकाणी झालेली आहेत. अशा या पवित्र वास्तुची निगा राखणारे हात किती आहेत याची आपण ओळख करुन घेणे गरजेचे आहे.

ती तोंड ओळख देण्याचा अल्प प्रयत्न आहे.

श्री वासुदेव निवासाचे विश्वस्त

१) प. पू. श्रीदत्तात्रय ढुंढीराज कवीश्वर. प्रधान विश्वस्त
२) श्री. लक्ष्मण व्यंकटेश वाकडे, पुणे
३) श्री. नारायण यशवंत ढेकणे, नासिक
४) श्री. श्रीपाद पांडुरंग आघारकर, पुणे
५) श्री. सुभाष अनंत दामले, पुणे



प. पू. श्रीदत्तात्रय ढुंढीराज कवीश्वर. प्रधान विश्वस्त




श्री. लक्ष्मण व्यंकटेश वाकडे, पुणे



श्री. नारायण यशवंत ढेकणे, नासिक



श्री. श्रीपाद पांडुरंग आघारकर, पुणे



श्री. सुभाष अनंत दामले, पुणे

श्री लक्ष्मण व्यंकटेश वाकडे :- हे वयोवृद्ध निष्ठावंत फार जुने जाणते असे विश्वस्त आहेत. प. पू. श्रीगुळवणी महाराजांपासूनचे यांचे गुरु शिष्य सबंध आहेत. प. पू. श्रीदत्तमहाराजांवर एक अत्यंत आदराचा, आपुलकीचा त्यांचा भाव आहे. रोज यांची खेप या वयातही आश्रमात होत असते. सर्व व्यवस्थेत जातीने लक्ष घालतात.

श्री नारायण यशवंत ढेकणे :- सचिवालयात इंजिनियर म्हणून मोठ्या हुद्दयावर होते. गुरुभाव वाखाणण्यासारखा आहे. प. पू. श्रीगुळवणीमहाराजांपासून येत आहेत. प. पू. श्रीलोकनाथतीर्थ स्वामीमहाराजांचे मोठे स्मारक नाशिक येथे केले आहे. प. पू. श्रीदत्तमहाराजांवर प्रेम आहे. मनात आदरयुक्त भाव आहेत.

श्री श्रीपाद पांडुरंग आधारकर :- हे पी.डब्ल्यू.डी. च्या वॉटर वर्कस्मध्ये होते. प. पू. श्रीगुळवणीमहाराजांपासून येणे जाणे आहे. वासुदेव निवास त्रैमासिकाची व्यवस्था पाहतात. उत्सवादी सेवाभावाने करीत असतात. आश्रमात रोज येणे असते प. पू. श्रीदत्तमहाराज हे यांच्याही परमादराचे स्थान आहे.

श्री. सुभाष अनंत दामले :- हे सी.ए. असून नवे विश्वस्त आहेत आश्रमाचे सर्व हिशेबाचे काम पहात असतात. विनयशील, शांत, अबोल असे व्यक्तिमत्व आहे.

सेवा सहकारी

सुरवातीच्या काळात म्हणजे प. पू. श्रीदत्तमहाराज उत्तराधिकारी झाल्यानंतर बदलता काळ होता. नवीन बदल असला की घडी बसण्यास मधे थोडा कालावधी जावा लागतो. प. पू. श्रीदत्तमहाराजांवर ही जबाबदारी सर्वार्थाने पडली होती. सुरवातीच्या काळात. **कै. श्री. जगन्नाथपंत पुजारी** यानी आश्रमातील अनेक धार्मिक कृत्ये प. पू. श्रीगुळवणीमहाराज व प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या संमतीने पार पडली. आश्रमातील व्यवस्थेकडे जातीने लक्ष घालत असत.

कै. श्री. नाना कुळकर्णी यांनी सात वर्षे आश्रमाची सर्व व्यवस्था पाहिली. अतिथी अभ्यागतापासून, हिशेब, उत्सव, स्वच्छता, आणणे नेणे, देखभाल अतिशय आपले पणानी केली. येणारी मंडळी कोणत्या हेतुने येथे येतात व त्यांचेशी आपण कशा तऱ्हेने वागले पाहिजे याची जाण त्यांना होती. आश्रमात येणाऱ्या मंडळींशी आपुलकीचे सबंध त्यांनी निश्चितपणे राखले हा त्यांचा विशेष गुण होता.

श्री पद्मनाभ मनोळकर - यानी आश्रमाच्या व्यवस्थेत हिशेब ठेवणे वगैरे बाबतीत उत्तम मार्गदर्शन करुन व्यवस्थापकीय व्यवस्थेला मूलभूत वळण लावले.

श्री. कुंभारे व **श्री. बर्वे** यानीही श्री. नाना कुळकर्णी नंतर व्यवस्थापनाचे काम उत्तम रितीने पार पाडले.

श्री. आबासाहेब देशपांडे :- यानीही व्यवस्थापनाची व्यवस्था उत्तम प्रकारे पाहिली. आज तरी ते व्यवस्थापकीय व्यवस्था पहात नसले तरी उत्सवाच्या कार्यक्रम ठरविण्याची सर्व जबाबदारी ते संभाळतात. मंगळवार हा प. पू. श्रीगुरुमहाराजाचा पुण्यस्मरणाचा वार. या दिवशी रात्री ते भजन करतात. पूर्वी बरेच लोक असत पण कारणपरत्वे आता इतर नसले तरी ते एकटेच असले तरी ही प्रथा चालू ठेवण्याचा ते प्रयत्न करतात ही अनुकरणीय बाब आहे.

बी. आर. कुळकर्णी :- कार्यालयीन सर्व जबाबदारी संभाळतात.

श्री. भास्करराव कुळकर्णी :- कार्यालयीन व्यवस्था संभाळण्यास मदत करतात व इतर ही सेवा कार्य उत्तम चालू असते. हे गोवईकरांचे चाळीत प. पू. श्रीगुरुमहाराज होते तेव्हापासून श्रध्देने येणारे आहेत.

श्री. निजामपूरकर :- पुस्तके, पत्रे व फोटो याचे सर्व काम पाहतात या बाबतीत त्यांच्याकडून कोणतीही माहिती चटकन मिळते.

श्री. राजन कुळकर्णी :- रोजची भाजी व उत्सवाची भाजी आणण्याचे काम चोखपणे गेली पंधरा वर्षे करीत आहेत. हे काम जबाबदारीचे आहे परंतु नियमितपणे करतात.

श्री. बाळासाहेब कोंडरे :- गेली पंधरा वर्षे आश्रमाची स्वच्छता व बैठक व्यवस्था संभाळतात. हे काम फारच आपलेपणाने करतात.

श्री. किसन भिवा माळीबाबा :- पेशवे पार्क मधे नोकरीला होते. भल्या पहाटे उठून सर्व कामे उरकून आंघोळ करुन, भस्म लावून नोकरीला जात असत. आता निवृत्त होऊन गावाला रहात असले तरी मोठ्या उत्सवाना येथे येतात. आश्रमाची बाह्यस्वच्छता करीत असत. रोज सर्व परीसर स्वच्छ करीत.

सौ. राधाबाई निंगुणे - देवाची सर्व भांडी घासून पुसून चकचकीत ठेवतात. तसेच धान्य निवडणे, टिपणे, पाखडणे, दळण आणणे इतर सर्व भांड्याची निगा राखणे ही कामे शांतपणे इतर भगिनींच्या साह्याने करतात.

सजावट सुशोभन फलक लेखन

कोणत्याही समारंभाचा फळा सुंदर अक्षरात व्यवस्थित लेखनाचे काम **श्री. नारायणराव दाते** सर करतात. भागवत सप्ताह असो किंवा इतर उत्सव असो नीटनेटकेपणा सजावट आरास हे सर्व श्री. दाते करीत असतात. रात्रौ सुध्दा स्वयंपाक घरापासून मंदिरापर्यंत स्वच्छतेसाठी यांचा हात फिरत असतो. आपलेपणाने सर्वत्र लक्ष ठेवून काम चालू असते.

श्री. अविनाश भोपटकर :- उत्सवातील छायाचित्राचे काम मोठ्या हौसेने करीत असतात. त्याशिवाय उत्सवात पंक्ती वाढण्याचे कामही आपुलकीने करतात.

❊ ❊

पाक सिद्धी

श्री. वासुदेवशास्त्री करंबेळकर व त्यांची मंडळी पाकसिद्धीची नित्य नैमित्तिक बाजू संभाळतात. हजारो लोक यांचे हातून प्रसादाचे अन्न ग्रहण करीत असतात. प्रसादाचे काम यांचे हातून अखंड होत असते.

चि. विद्याधर फडके, चि. प्रसाद पाटणकर, चि. आषुतोश कुळकर्णी ही सर्व नवीन तरुण मंडळी आहेत. अशी अनेक छोटी मोठी मुले येथे येतात. मदत करतात त्यांचा उल्लेख फक्त उत्तेजनार्थ म्हणून केला आहे. ही त्यांची वासुदेव निवासाबद्दल भक्तीची भावना अखंड टिको व पुढे अशीच सेवा यांचे हातून घडो एवढीच गुरु चरणी प्रार्थना आहे.

भगिनीवर्गापैकी अनेक भगिनी वेगवेगळी सेवा करण्याचा लाभ घेत असतात.

मंदीर सेवा पूजा अर्चा

कै. पू. नाना भालेराव यांनी अखंडपणे प. पू. श्रीगुरुमहाराजांच्या देवांची यथा सांग पूजा केली. त्या करता ते कधीही कुठे गेले नाहीत. ते आपल्या मुलाकडे राहिल्या गेल्यानंतर ती सर्व व्यवस्था **वे. मूर्ती आप्पाशास्त्री कोडणीकर** यांचेकडे आली. हे वाडीचेच असल्यामुळे देवाची पुजा करण्यास यथा योग्य व्यक्ती लाभली. पवमान, रुद्र म्हणून अभिषेकयुक्त पादुका पूजा व्यवस्थित सुरु झाली . अत्यंत पावित्र्य राखून ते हे अर्चन करीत असतात. ते अबोल आहेत. शांतपणे काम चालू असते. देवाचा निवास स्वतः झाडलोट करुन स्वच्छ करणेही ते सेवा समजतात व

पूजे इतकेच महत्वाचे मानून करतात हे खरोखर सेवावृत्तीचे दर्शक आहे. लक्षात घेण्यासारखे आहे. मुलाना शिकविण्याचे काम आवडीने करतात.

वे. मू. आप्पाशास्त्रींनी केलेली पूजा अतिशय देखणी असते. कोणालाही बघून समाधान होईल अशी असते. सर्व धार्मिक कार्याची जबाबदारी यांचेवर असते.

श्री. भगवान पाध्ये - वे. मू. आप्पा शास्त्रींबरोबर तयार झालेले श्री. भगवान पाध्ये यांचा सर्व धार्मिक कामात मोठा वाटा असतो. सप्तशती पारायणाची नित्य सेवा हे करीत असतात. आल्या गेल्यांची सर्व व्यवस्था हे बघतात. मोठ मोठे उत्सव होतात त्यावेळी यांची जबाबदारी वाढते. श्री. कोडणीकर नसले तर श्री. भगवानही पूजा चांगली सुशोभित करतात. येथे असणारी विद्यार्थी यांचाही सहभाग या धार्मिक कामात सतत असतो. श्री. वे. मूर्ती कृष्णराव आर्वीकर व श्री. सप्रे, श्री. घैसास, श्री. राजाराम यांचा उल्लेख मागे आलेला आहे. अनुष्ठान, पारायणे, अभिषेक, यज्ञयाग हे सर्व संभाळणारी ही मंडळी आहेत.

गुरुचरित्र पारायण

श्री. भुसारी हे प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या अनुमतीने गुरुचरित्र पारायणाची अखंड सेवा निरलसपणे करीत असतात. ते सकाळी वासुदेव निवासात लवकर येऊन या सेवेला प्रारंभ करतात. फार मोठी सेवा गुरु निवासात त्यांचे हातून होत आहे. हे एक दैवी भाग्य आहे.

येथील सर्वच कार्य लोककल्याणार्थ चालू आहे. हे सर्व व्यवस्थितपणे घडण्यासाठी सर्वांचे सहकार्य लागते.

प. पू. श्रीगुरुमहाराजांचे लौकिकार्थाने देहाने येथील अस्तित्व संपल्यावर प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या सत्य संकल्प व एकरुप झालेल्या गुरुनिष्ठेने हे कार्य उत्तम तऱ्हेने चालू राहून सर्वानाच आधारभूत होत आहे.

❀ ❀ ❀

आपणा सर्वांकरता

आपण सर्व आश्रमात अत्यंत प्रेमाने येत असतो. संसाराची सर्व उठाठेव करीत असताना थोडा वेळ काढून संतदर्शन व प्रसाद घेण्यासाठी येत असतो. येथे येऊन या पवित्र आश्रमात साधन करता. प. पू. श्रीदत्तमहाराजांचे दर्शन घेऊन समाधान

पावतो. मनाला शांत करतो व पुन्हा आपआपल्या कर्तव्यासाठी परत जातो. नवा उत्साह घेतो. मनाची मरगळ घालवितो. हे सारे अध्यात्म जीवनात जास्त जास्त प्रगती व्हावी म्हणून करीत असतो.

येथे आल्यावर आपल्याला प्रत्यक्ष रोजच्या व्यवहारापासून अलिप्त राहता येते. भोजनप्रसाद आयता मिळतो व सर्व भक्तमंडळींची भेट झाली की एकमेकांच्या सहवासात आनंद लुटता येतो. हे आपले मायमाऊलीचे घर आहे. आपण प्रेमाच्या भक्तीच्या हक्काने तेथे जातो. हे आपले सौख्य उत्तम रहावे यासाठी आपली सर्वांचीही काही कर्तव्ये असतात. आपण त्याचीही जाणीव मनात बाळगीत असलो तरी ती अधिकाधिक बाळगली पाहिजे.

येथे आल्यावर वेळच्यावेळी भोजनास हजर राहणे, तसेच बरेच वेळा मंडळी येतो म्हणून कळवून ठेवतात व येत नाहीत. स्वयंपाक करून वाया जातो. असे होऊ नये असे वाटते. तसेच बरीच मंडळी घेऊन येणार असलो तर आगाऊ कळवावे म्हणजे सोय करण्यास बरे पडते. आपण केवळ सुखद सहल म्हणून इकडे येण्याची वृत्ती ठेवू नये. एक तीर्थक्षेत्राची भावना ठेवावी. येथील लोकांनी आपल्याला समजून घ्यावे असे वाटत असते ते जसे बरोबर तसेच आपण ही इथल्या अडीअडचणींची कल्पना करून घ्यावयास हवी. नेहमी आपण तेथे नसल्यामुळे त्या अडीअडचणींची कल्पना आपणास येणे किंवा त्या लक्षात येणे या गोष्टी कठीण असतात.

अर्थात प्रत्येक जण विचार करीत असतो. त्रास देण्याच्या उद्देशाने कोणी येत नसले तरी नकळतही कोणाचीही गैरसोय आपणाकडून होऊ नये या हेतुने हे निवेदन आपणा सर्वांकरिता करीत आहे.

गुरूगृहातील सर्वच मंडळी आपण वंदनीय समजतो. असा हा आपला वासुदेव निवास हा "आमचा गुरू माऊली प्रसाद" निर्मळ आनंदाचे ठिकाण. जीवाला शांतता देणारे विश्रांतीस्थान येथे येऊन या प्रयाग राजाचे दर्शनाने कृतार्थ होऊन एकमेकांना सहकार्य देऊया येवढीच अपेक्षा आहे.



श्री वासुदेव निवासात होणारे मोठे उत्सव

प. प. स्वामीमहाराज पुण्यतिथी	आषाढ शुद्ध १
श्री गुरू पौर्णिमा	आषाढ शुद्ध १५
प. प. स्वामीमहाराज जयंती	श्रावण वद्य ५
भागवत सप्ताह	भाद्रपद शुद्ध ९ ते १५
नवरात्र	अश्विन शुद्ध १
श्री दत्तजयंती	मार्गशीर्ष १५
प. पू. श्रीगुळवणीमहाराज जयंती	मार्गशीर्ष वद्य १३
प. पू. श्रीगुळवणीमहाराज पुण्यतिथी	पौष वद्य ८
प. पू. लोकनाथतीर्थ स्वामीमहाराज पुण्यतिथी	माघ वद्य ३
प. पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वर वर्धापन दिन	माघ वद्य ६
प. प. नारायण स्वामीमहाराज पुण्यतिथी	चैत्र वद्य ३०

श्री वासुदेव निवासात होणारे अन्य उत्सव

✣ श्रीपाद श्रीवल्लभ जयंती	भाद्रपद ४
✣ श्री नरसिंह सरस्वती जयंती	पौष शु. २
✣ गोकुळ अष्टमी	श्रावण कृष्ण ८
✣ राम नवमी	चैत्र शुद्ध ९
✣ हनुमान जयंती	चैत्र शुद्ध १५
✣ श्री. शंकराचार्य जयंती	वैशाख शुद्ध ५
✣ महाशिवरात्र चारी यामांची महापूजा	माघ कृष्ण १३
✣ श्रावणातील श्रावणी (२)	नागपंचमी/नारळी पौर्णिमा
✣ श्रीतुळजाभवानीची महापूजा	श्रावण
✣ गुरुद्वादशी महानैवैद्य	अश्विन व. १२



मैं, भारत का राष्ट्रपति

वराहगिरि वेंकट गिरि

दत्तात्रेयशास्त्री धुंडिराजमहाराज कशीश्वर

को

संस्कृत में पाण्डित्य तथा

शास्त्रनिष्ठा के लिए

यह प्रमाण-पत्र प्रदान करता हूं।

नई दिल्ली,

दिनांक 21 अप्रैल, 1970
वैशाख 1892

राष्ट्रपति

प्रयाग ४०६

भारत सरकार

शिक्षा मन्त्रालय

अध्यापकों के लिये राष्ट्रीय पुरस्कार



GOVERNMENT OF INDIA

Ministry of Education

National Awards for Teachers

प्रयाग ४०७

भारत सरकार

शिक्षा मन्त्रालय



ह राष्ट्रीय पुरस्कार

श्री दत्तात्रेय धुंडिराज कवीश्वर,

श्री बालमुकुन्द संस्कृत महाविद्यालय, पूना, महा

को अध्यापन के क्षेत्र में प्रशंसनीय लोक

सेवा के लिए सम्मानार्थ प्रदान किया

जाता है ।

नयी दिल्ली

तारीख १८ दिसम्बर, १९९८

भारत सरकार

के

शिक्षा सलाहकार



महाराष्ट्र

96. श्री दत्तात्रेय धुंडिराज कवीश्वर

श्री बालमुकुन्द संस्कृत महाविद्यालय, पना

आप 'सिद्धा वाचस्पति' और 'न्याय चूडामणि' हैं । आपको वेदों का विशद ज्ञान है। पिछ 20 वर्षों से आप विद्यार्थियों को संस्कृत विभिन्न परीक्षाओं के लिये सफलतापूर्व तैयार कर रहे हैं ।

।। श्री द्वारकाधीशो विजयते।। श्री चन्द्रमौलीश्वरो विजयतेतराम्।। श्री शारदाम्बा विजयतेतमाम्।।

पुरुषोत्तमे मासि पुण्यपुरे सेवा-संतोष-मूला

शुभाशीर्वाद–पत्रिका



श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यवर्यैत्याबिसप्तबिरुदांकित-श्रीपश्चिमाम्नाय-
श्रीद्वारकाशारदापीठाधीश्वर-श्रीमद् जगद्गुरु शंकराचार्य-

श्रीअभिनवसच्चिदानन्दतीर्थस्वामिनां

स्वधर्मपरायणश्री विद्यावाचस्पति पं. दण्डी कवीश्वर प्रति
पुण्यपत्तनस्थ-सत्कार-समारोह-निमित्तेन सार्वदिक-सार्वत्रिक-ऐहिक-आमुष्मिक-पारमार्थिक-
श्रेयोऽवधिकाः श्रीनारायणस्मरणसंसूचिताः शुभाः हार्दिकाश्च आशिषः समुल्लसन्तुतराम्।

१८९१ अधिक आषाढशुक्लपूर्णिमायाम्

भानुवासरे २९ जून १९६९
उद्यानप्रासादः, पुण्यपत्तनम् ३०.

अखिल-भारतीय-संस्कृत-साहित्य-सम्मेलनम्

दिल्ली



"विद्यावाचस्पतिः"

संमेलनमिदं षड्विंशाधिवेशनावसरे श्रीमतां पण्डितप्रवराणां श्री दक्षिणात्य कवीश्वराणाम् (महाराष्ट्र-निवासिनाम्) अनितरसाधारणं चैदुष्यं देववाण्या गरीयसीं सेवाञ्चालोच्य तान् महामहिमभारतराष्ट्रपति-डा० राजेन्द्रप्रसादमहोदयकरकमलद्वारा **"विद्यावाचस्पतिः"** इत्युपाधिना सादरं संमानयति ।

वैक्रम संवत् २०१८
आषाढ़ कृष्ण ४
२ जुलाई १९६१ ई०
कलकत्ता

बलवन्त नागेश दातारः
(भारत-प्रशासन-गृहकार्य-मंत्री)
सम्मेलन-समापतिः

नरहरिविष्णु गाडगिलः
(पंजाब-राज्यपालः)
कार्यवाहक-समापतिः

डा० मंडन मिश्र शास्त्री
महामंत्री

॥ वेदोऽखिलो धर्ममूलम् ॥

विश्व-विद्या-क्षेत्रे विश्रुता पुण्यपत्तनस्था



स्वीये शतमानोत्सवे 'सभा'-सर्वोच्च-परीक्षोत्तीर्णाय न्याय-
चूडामणि-पद-भूषणाय पं. दत्तात्रेय धुंडिराज कवीश्वर महोदयाय
तद्-विद्या-वंश-समृद्धिं कामयमाना भारत-परराष्ट्र-मन्त्रिणः
नामदार चव्हाणकुलोत्पन्नस्य बलवन्तरायसूनोः यशवन्तरायस्य
शुभ-कर-कमलाभ्याम् इदं गौरव-पत्रं साभिनन्दनं समर्पयति ।

(पां. द. बेलणकर)
कार्यवाहः

(श्री. प. मराठे)
कार्याध्यक्षः

(म. स. पारखे)
सभाध्यक्षः

फाल्गुन कृ. ३० शके १८९८
शनिवासरे दिनांक १९ मार्च १९७७

श्री द्वारका शारदा पीठ, द्वारका



श्री परमहंस परिव्राजकाचार्यवर्येत्यादि समस्त विरुदांकित श्रीपश्चिमाम्नाय श्री द्वारका शारदापीठाधीश्वर श्री जगद्गुरु श्री शंकराचार्य श्री अभिनव सच्चिदानन्दतीर्थ स्वामिभिः

卐  卐

अस्मदत्यंतप्रियशिष्य श्री दत्तात्रेय कवीश्वर शास्त्रिणः

प्रति

श्रीमन्नारायणस्मरणसंसूचिताः शुभाः हार्दिकाः आशिषः समुल्लसंतुतराम्। भवतां किल आश्वलायनादिवैदिकशाखाध्ययनं वीक्ष्य प्रमुदितांतःकरणा वयं भवद्भ्यः

म ङ्ग ल ो प ा ध्या यः

इति सत्पदवीं संप्रयच्छामः। तामिमां शुभां पदवीं सफलयतां भवतामायुरारोग्यैश्वर्याभिवृद्धिपरम्परा भूयात् भगवतोद्वारकाधीश श्रीचन्द्रमौलीश्वरयोरमितयाऽनुकम्पयेतिशम्।

श्रीनारायण स्मरणानि।

संवत् २०३८ कार्तिक २३७१
तिथि आश्विन शुक्ल दशमी
तारीख २५-१०-८१ स्थल पूना

॥ श्रीः ॥

अभिनंदन पत्रम्

परमादरणीयाः अधिगत वाग्देवी समनुग्रहाः श्रीमन्तः ॥

अद्य वयं तत्र भवतां स्वागतानुगम् अभिवादनं कुर्वाणाः परम-तोषम् अनुभवामः ॥

प्रथमं तावत् शिवं तत् निमित्तम् एव स्तुमः यत् ॥ श्री सरस्वती-वैयाधिकरण्यं समाधिकरण्ये परिवर्तयतः, शमदमादि साधनैश्चित्तनैर्मल्यम् आप्त दयतः श्रोत्रिय ब्रह्मनिष्ठान् तत्र भवतः अन्वर्थक कवीश्वरोपाधि भाजः श्री दत्त महाराज शर्मणः पुण्यपत्तनात् पुण्यक्षेत्रं प्रयागं प्रापय्य अस्मान् अन्वग्रहीत् ।

मान्यवराः ॥

श्रीमत् पूर्व पुरुषैः सह श्रीमतामपि तानि तानि यशोवर्धनानि सुकृतानि स्मारं स्मारं, मोदभरेण हृष्यन्तो वयं, श्रीमत् सपर्यायै-युक्तम् उपकरणम् अलभमाना अपि, भवदीयम् औदार्यम् स्मरन्तः, सामान्येनैव भावसुरभिमला वाक्कुसुमाञ्जलिना भवदर्चनं विदधामः ।

भारतवर्षस्य विशिष्ट महिमा वशात् स्वयं वाग्देवी काले काले ज्ञान महादिरूपेण पुरुषाकारं गृह्णातीति नाविदितम् ..... मन्यामहे-उक्त स्वभाववशात् सरस्वती देवी स्व निवास योग्यं सुस्थलं पश्यन्ती पूर्वजानां तपोभि स्वतपोभिश्च पावनं भवच्छरीर मंदिरं स्ववासयोग्यं मन्वाना इमम् आश्रितवती । अन्यथा कुत इदं लोकातिशायि सरस्वत्याः वैदग्ध्यम् ?

श्री वासुदेव निवास संचालन संवर्धनादिभिः समये समये शिष्ट विद्वदुज्जन परिपालन रूपां भगवतः प्रतिज्ञां पूरयन्तो भवन्तः आस्तिक-जनानाम् कृते किमपि विश्रामस्थानम् ।

किंबहुना । अनन्त गुण राशेः गुणवर्णनम् इव एतत् अभिनंदनम् श्रीमत् समर्चनाय नाहम् इति जानन्तेऽपि वयं प्रयागवासिनः आढ्ये अनाढ्येऽपि समानां भवतः स्नेह प्रवृत्तिं वीक्ष्य सरस्वत्या इमं भावैक भावरस सौरभ समन्वितम् वाक्कुसुमाञ्जलिं समर्पयन्तः मोदामहे । इमं स्वीकृत्य महाभागाः अस्मान् आशीर्भिरनुगृह्णन्तु इति प्रार्थया-महे ।

भवतां वशंवदाः
समस्त प्रयागवासिनः

दिनांकितम्
२९-९-१९८३

॥ श्रीविश्वेश्वरः शरणम् ॥

अखिल भारतीय महाराष्ट्रतीर्थ पुरोहितसंघः, वाराणसी।



काशीमहाराष्ट्र भवनम्
२९/१३, गणेश दीक्षित वीथी, वाराणसी—१.

विद्वत्सन्मान-पत्रम्

श्रीमन्तः सकलविद्याविद्योतितान्तः करणाः

पण्डित दत्तात्रेय धुण्डिराज कवीश्वर महोदयाः

महाराष्ट्रराज्यान्तर्गत-पुण्यपत्तनवासिनः, विद्यावाचस्पति, न्यायचूडामणिप्रभृति-पदवी-समलङ्कृताः भारतसर्वकारेण "राष्ट्रियपण्डितः" इत्यलङ्करणभूषिताः अविमुक्तां त्रिकण्टकविराजितां मोक्षदायिनीं काशीपुरीं समागत्य, स्वोपार्जितज्ञानतीर्थेन सामाजिकान्पावयन्तः, विदुषः सन्तोषयन्तः कृत-स्वाध्यायेन भगवन्तं विश्वेश्वरमसेवन्त ।

एषां महानुभावानां वंदुष्येण तपसा च प्रभाविताः काशीवासिनो विद्वांसः श्रद्धया भक्त्या च सम्मानपत्र प्रदानेन पण्डितप्रवरान् समलङ्कृत्य "योग-वेदान्त-सार्वभौम" पदवी-समर्पणेन सभाजयन्ति समुद्घोषयन्ति च वेदवाक्यमिदम् ।

"तस्यराजामित्रं भवति, द्विषन्तमपबाधते, क्षत्रेणक्षत्रंजयति, बलेनबलमश्नुते, तस्मै-विशःसञ्जानते, सम्मुखा एकमनसो यस्यैवं विद्वान् ब्राह्मणो राष्ट्रगोपः पुरोहितः" ॥ इति ॥

गणेश दत्तात्रेय मोघे
स्थायी अध्यक्षः

डॉ. विश्वनाथ वामन देवः
प्रधानमंत्री

अ. भा. म. ती. पु. संघ
वाराणसी

वयम्
वाराणसेय नागरिक प्रतिनिधिभूताः

पं० मूलशंकरशास्त्री व्यास
पं० विश्वनाथ शास्त्री दातार
पं० गजानन शास्त्री मुसलगांवकर
पं० बटुकनाथ शास्त्री खिस्ते
पं० रामचन्द्रशास्त्री होसमने
पं० जनार्दन शास्त्री खुष्टे
पं० जगन्नाथ शास्त्री तैलंग

९ जून १९८३, ज्येष्ठ कृष्ण त्रयोदशी, गुरुवासरः, विक्रमसंवत् २०४० शके. १९०५

ॐ

॥ महर्षि-वेदव्यास-पुरस्कारः ॥

॥ महर्षि-वेदव्यास-प्रतिष्ठानम् ॥

। अलंकावती ।

॥ श्रीवेदव्यासमहर्षये नमः ॥

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीवेदपुरुषाय नमः ।

तपःपूतपरंपरानुसारम् आशैशवात् अनुष्ठितया गणेशदत्तोपासनया प्राप्ततेजसे

श्रीमन्नृसिंहसरस्वतीस्वामीमहाराजानुग्रहेणप्राप्तवर्चसे

संस्कृतप्राकृतधर्मशास्त्रग्रंथानुशीलनेन सद्धर्माचरणेन श्रीमद्भागवतप्रसंगेनच प्राप्तहरसे

विद्यावाचस्पतिराष्ट्रीयपंडितोपाधिविभूषिताय

श्रीमज्जगद्गुरुशंकराचार्यपीठाधिष्ठितैः चतुर्भिराचार्यैः सम्मानिताय

कांचीकामकोटिपीठेन च कांचनकंकणेनालंकृताय

परमश्रद्धेय श्रीदत्तमहाराज कवीश्वर महोदयाय

सहस्रचंद्रदर्शनशांतिकर्मावसरे

भगवद्गीतोपदेशप्रतीकं रथं, वेदविद्यासंरक्षणसंवर्धनकार्यप्रतीकं महावस्त्रं

निष्क्रयद्वारा गां च समर्पयित्वा

कृष्णार्पणाशयाकरणेन अतीव प्रमोदंते नः चेतांसि ।

दीर्घमायुः श्रेयः शांतिः पुष्टि स्तुष्टिश्चास्त्विति प्रार्थना ।

इति ।

पुण्यपत्तनम्

प्रमोदनामसंवत्सरः

शालिवाहन शकः १९९२,

वैशाख कृष्णा सप्तमी गुरुवासरः

विनीताः

[illegible]

ओंकारनाथ मालपाणी

श्रीमती